कथा भारती

तेलुगू लघुकथा

संपादक

पुराणम् सुब्रह्मण्य शर्मा

वाकाटि पांडुरंगाराव

अनुवादक

नरेन्द्र बल्लाळ

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

पहिली आवृत्ती : 1974 (शाके 1896)
तिसरी आवृत्ती : 1990 (शाके 1911)

Original Title : Katha Bharati : Telugu Kathanikalu (Telugu)
Marathi Translation : Katha Bharati : Telugu Laghukatha
रु. 19.00
प्रकाशक : संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क,
नवी दिल्ली-110 016 द्वारा प्रकाशित

प्राक्कथन

मानवाबरोबरच कहाणी निर्माण झाली. कहाणीनंतरच साहित्याच्या विविध प्रकारांचा जन्म झाला. आजची कथा जितकी आधुनिक आहे तितकाच तिचा इतिहास पुरातन आहे. कथेसमोर कादंबरी म्हणजे कालचे पोर. जीवन जितकी वळणे घेते तितकीच साहित्यालाही वळणे घ्यावी लागतील. तेलुगूभाषिकांच्या जीवनाच्या वेगवेगळ्या वळणांचा आविष्कार घडवणारा साहित्यप्रकार आहे— तेलुगूमधील कथा.

तेलुगू कथेचे भाग्य हे की, महाकवि गुरजाड अप्पाराव यांच्या लेखणीतून तिने जन्म घेतला. तिचा इतिहास साठ वर्षांपेक्षा जुना नाही. पाश्चिमात्य साहित्याच्या प्रभावाने निर्माण झालेले हे अभिनव रूप जगन्मोहिनीप्रमाणे वाचकांचे मनोरंजन करीत आहे. तेव्हापासून आतापर्यंत या नव्या साहित्य-प्रकारास सजवण्याचे श्रेय अनेक प्रातःस्मरणीय साहित्यिकांना आहे.

आधुनिक तेलुगू गद्याच्या विकासाचे दर्शन तेलुगू कथा घडवते. तेलुगू कथेचे नाव घेताच काही साहित्यिकांचे सहज स्मरण होते. त्यांना श्रद्धांजली अर्पण केल्याशिवाय लेखणी पुढे जाऊ शकत नाही.

'बॅरिस्टर पार्वतीशम'चे लेखक श्री. मोक्कपाटि नरसिंह शास्त्री, 'वटीरावु कथलु' (वटीरावच्या गोष्टी) चे लेखक श्री. चिन्ता दीक्षितुलु, 'कान्तम कथलु' (कान्तमच्या कथा) चे लेखक श्री. मुनिमाणिक्यम नरसिंह राव, 'पितळेचा दरवाजा'चे लेखक श्री. वेलूरि शिव रामशास्त्री, 'एमि अनुबंधम ?' (हे कसले बंधन ?) सारख्या स्मरणीय कथांचे प्रणेते श्री. विश्वनाथ सत्यनारायण, 'असावेरी', 'अल्लो नेरेडु', 'मुनि गोरिंता' इत्यादी कथांचे रचनाकार श्री. मल्लादि रामकृष्ण शास्त्री, 'अरिकालु क्रिंद मंटलु' (तळव्यांखाली आग) चे स्रष्टे आणि यशस्वी लेखक श्री. श्रीपाद सुब्रम्हण्य शास्त्री, करुणकुमार कथांचे

लेखक 'करुणकुमार' या सर्वांनी आधुनिक कथा घडवली आहे. प्रारंभीच्या या लेखकांत 'साहिती' पत्रिकेचे लेखक श्री. त्रिपुरारि भट्ला वीर राघव स्वामी, श्री. कोडवटि गंटि वेंकट सुब्बय्या आदींची नावेही उल्लेखनीय आहेत.

गुरजाडपासून आजवर क्रमाक्रमाने झालेल्या विकासात वर उल्लेखिलेल्या गुरुजनांपासून आजच्या नव्या पिढीपर्यंत झालेल्या मार्गक्रमणात तेलुगू कथेत आशय, शैली, रचना आणि भाषा या सर्व दृष्टींनी बरेच परिवर्तन घडून आले आहे. तिला आता पूर्वीपेक्षा अधिक गती आणि शोभा प्राप्त झाली आहे. या संग्रहात संकलित केलेल्या कथांमध्ये हे वैविध्य सादर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. खरे पाहता, राष्ट्रीय वा आन्तरराष्ट्रीय पातळीवर तेलुगू कथा इतरांपेक्षा खालच्या दर्जाची नक्कीच नसेल.

हजारोंनी प्रसिद्ध होणाऱ्या कथांतून प्रस्तुत संग्रहासाठी तेलुगू कथांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कथांची निवड करणे सोपे काम नाही. एक संग्रह काढल्याने हा प्रयत्न पूर्ण झाला असेही मानू नये. तेलुगू कथेला खरोखरीच न्याय द्यायचा असेल, तर गेल्या साठ वर्षांच्या काळाचे सहा दशकांत विभाजन करून प्रत्येक दशकाचा एक-एक संग्रह तयार केला पाहिजे. तेलुगू कथेचे स्वरूप समजण्याच्या दृष्टीने हा संग्रह केवळ तोंड-ओळख करून देण्याचे काम करील, असे आम्हाला वाटते.

नॅशनल बुक ट्रस्टने प्रत्येक भारतीय भाषेतील उत्कृष्ट साहित्यकृती दुसऱ्या भाषांतील लोकांच्या हाती पडाव्यात या उद्देशाने 'आदान-प्रदान' योजना आखून त्यात तेलुगू कथा प्रकाशित करण्याचा संकल्प केला आहे. ट्रस्टने घालून दिलेल्या मर्यादा लक्षात ठेवून सत्तावीस निवडक गोष्टींचा हा संग्रह सादर केला जात आहे.

कै. गोपीचंद यांच्या कथेने या संग्रहाचा आरंभ होतो आणि नालं चिरंजिवीच्या कथेने तो संपतो. दोन्ही लेखक तेलुगू-भाषी शेतकऱ्यांच्या ग्रामीण जीवनाचे प्रतिनिधित्व करतात. (या संग्रहात ज्या कथाकारांच्या कथा समाविष्ट करण्यात आल्या आहेत, त्यांचा परिचय अन्यत्र दिला आहे.) नॅशनल बुक ट्रस्टच्या अपेक्षांची पूर्ती करण्यास हा संग्रह साहाय्यक ठरू शकेल. पण आधीच सांगितल्याप्रमाणे हा संग्रह समग्र वा संपूर्ण असल्याचा आमचा दावा नाही. स्थलमर्यादेमुळे अनेक चांगल्या कथा आम्हांला बाजूला ठेवाव्या लागल्या.

अखेर, 'अरे, ही किती चांगली गोष्ट राहून गेली', हा पस्तावाच आमच्याजवळ उरला आहे. या संग्रहातील कथांनी आंध्रेतर वाचकांना थोडा जरी आनंद मिळाला, तरी आम्हाला आमच्या प्रयत्नांचे सार्थक झाल्यासारखे वाटेल.

विजयवाडा

बाकाटि पांडुरंगाराव
पुराणम् सुब्रम्हण्य शर्मा

अनुक्रमणिका

ममता

— गोपीचंद

जोगय्यामामा काठी टेकीत कालव्याच्या काठावर आला आणि जांभळाच्या झाडाच्या सावलीला बसला. डोळ्यांवर येणारे ऊन हातांनी अडवण्याचा प्रयत्न करीत त्याने एकवार आपल्या शेताकडे नजर टाकली. शेताच्या बांधावर उभी असलेली जांभळीची झाडे त्याच्या चांगल्या ओळखीची होती. तीदेखील त्याच्याच बरोबर उगवली आणि त्याच्याचबरोबर वाढत आली आहेत. एकदा नांगराला लावायला लाकूड पाहिजे होतं, तेव्हा त्याने त्यातली दोन झाडे तोडली होती. आजदेखील त्याची जागा कशी सुनी-सुनी वाटते. जेव्हा जेव्हा त्याची नजर तिकडे जाते तेव्हा तेव्हा जणु आपले दोन मुलगे आपल्याला दुरावले आहेत असे त्याला वाटत राहते.

जोगय्यामामाने दीर्घ निःश्वास टाकला आणि डोक्यावरचे पागोटे जमिनीवर अंथरून जांभळाच्या झाडाखाली तो बसला. त्याला तीन मुलगे आहेत. थोरला मुलगा नरसय्या शेती पाहातो. दुसरा दोरय्या कापडाचे दुकान चालवून चार पैसे कमावू लागला आहे. धाकटा सुब्बय्या इंग्रजी शिकला आहे. याशिवाय जोगय्या-मामाला दोन मुली आहेत. त्याच्या सगळ्या मुलांचे त्याच्यावर फार प्रेम आहे आणि त्याचीदेखील त्यांच्यावर खूप माया आहे. वेळच आली तर तो मुलांना सोडून राहू शकेल, पण आपले शेत पाहिल्याशिवाय त्याला पळभरही राहावणार नाही. आपल्या सगळ्या मुलांनी शेतीचेच काम करावे असं त्याला वाटते. शेतीवाडी करण्यातच त्यांच्या आयुष्याचं सार्थक आहे, असे त्याचे मत आहे. यामुळेच कापड-दुकान चालवणाऱ्या मुलाबद्दल त्याच्या मनात थोडासा रुसवा आहे. तो म्हणतो, "तो चांगला मुलगा आहे, पण बायकोचं ऐकून बिघडलाय्."

जोगय्यामामाजवळ आज शंभर एकर जमीन आहे. आपल्या या मालमत्तेचा मोठा भाग त्याने स्वतःच्या मेहनतीने कमावला आहे. त्यामुळे जमिनीपुढे त्याला बाकी सारी नाती गौण भासतात. जमिनीची तो जिवापाड देखभाल करतो. चांगले पीक यावे म्हणून तो सगळे उपाय करतो. जिवाची पर्वा न करता शेजाऱ्यांचे बांध

तुडवून तो आपले शेत शिपून घेतो. "या, कोण अडवणारा असेल तो या" असे म्हणून हातात भक्कम लाठी घेऊन तो शेताच्या बांधावर अुभा राही तेव्हा सगळा गाव घाबरून जाअी. तहानेली शुष्क जमीन जेव्हा पाणी पिअू लागे तेव्हा बाळाला पाजणाऱ्या आईसारखा तो मनोमन खूष होअून जाअी. त्याची मोठी झालेली मुले आता त्याला म्हणतात, "आम्ही असताना आता तुम्ही कशाला कष्ट करता ? देवाचं नाव घेत स्वस्थ बसा नं." जोगय्या मनातल्या मनात म्हणतो, "लहान पोरं आहेत. या कष्टांमुळेच मला किती आराम वाटतो, हे त्यांना कसं कळणार ?"

महिन्यापासून जोगय्यामामाची बायको आजारी होती आणि दिवसेंदिवस तिची प्रकृती बिघडतच चालली होती. धहा दिवसांपासून ती कण्हते आहे, पण जोगय्याने तिकडे लक्ष दिलेले नाही. घरातली माणसे काही बोलली तर तो म्हणतो, "आजार माणसाला होणार नाही, तर आणखी कुणाला होअील ?"

कापणीचे दिवस होते. त्याला अजिबात वेळ मिळत नव्हता. शिवाय हा आजार अितक्या लवकर अितकं भयानक स्वरूप धारण करील, हे त्याच्या ध्यानीमनीही आले नव्हते.

"तुम्ही घरी जाऊन आईजवळ बसा. शेत मी शिपून घेअीन," थोरल्या मुलाने त्याला सांगितले. पण जोगय्याला घरी राहावले नाही. तशात पाण्याची फार टंचाई होती. कोण कोठे अडवण्याचा प्रयत्न करील, त्याचा नेम नव्हता. त्याचा मोठा मुलगा हुषार आहे पण स्वभावाने जरा मऊ आहे. समोरच्याने आवाज चढवला की मागे सरकेल. सगळ्या शेताचे शिपण झाले नाही, तर मागून पस्तावा करून काय फायदा ? तेव्हा गावातल्या वैद्याला बोलावून चार गोळ्या बायकोला दिल्या आणि थोडे पाणी पाजून जोगय्या तिला म्हणाला, "डोळे मिटून नीज जरा. येअील झोप." आणि तो शेताकडे निघाला. गावाबाहेर चिंचेच्या झाडापर्यंत तो पोचला तेवढ्यात थोरल्याचा निरोप अेका माणसाने आणला. "तिकडची माणसं भाले-बरच्या घेअून मारायला निघालीत आणि थोरल्या बाबूंचे हात बर्फासारखे गोठून गेले आहेत."

जोगय्या झपझप चालत शेतावर गेला. गेल्याबरोबर त्याने पाटात घातलेला अडसर काढून टाकला आणि आपल्या शेताकडे जाणाऱ्या पाण्याला वाट करून दिली. तिकडे भाले-बरच्या घेतलेले लोक गुपचूप अुभे राहिले. ते काही करू शकले नाहीत. आपल्या शेताकडे वाहणाऱ्या पाण्याची खळखळ अैकत जोगय्या जगाला विसरून शेताच्या मेरेवर अुभा राहिला.

"आईची प्रकृती कशी आहे ?" नरसय्याने विचारले.

"आहे तशीच आहे," जोगय्याने अुत्तर दिले.

"काही आराम वाटला का ?" पुन्हा नरसय्याने विचारले.

"का वाटणार नाही ?" जोगय्या अुत्तरला.

"आता आपण निघू या ?" नरसय्याच्या या प्रश्नावर जोगय्या चमकला आणि म्हणाला, "शेतात सगळं पाणी पोचल्याशिवाय कसं जायचं ?"

"घरी कोणी नाही. कधी काय होअील सांगता येत नाही," नरसय्या बोलला.

"तू जा. मी राहातो अिथं," जोगय्या म्हणाला. जोगय्या काम अर्धवट सोडून जाणार नाही, हे नरसय्याला माहीत आहे. नरसय्याला ते बरे वाटले नाही, पण नाईलाजाने शेताच्या बांधावर वडिलांना सोडून त्याने घराची वाट धरली.

कावळे कावकाव करीत होते. तेवढ्यात जोगय्याला ताबडतोब घरी परत येण्याचा निरोप आला. बायकोचा—आपला संबंध तुटतो आहे हे त्याला माहीत होते. पण शेताचा अेक कोपरा अजून कोरडा आहे. सगळ्या शेतात अजून पाणी पोचलेले नाही. काम अर्धवट सोडून जोगय्या जाअू शकला नाही.

थोड्या वेळाने पाणी त्याही कोपऱ्यात पोहोचलं, तसा जोगय्या घाअीघाअीने घराकडे निघाला—बायकोला पाहाण्यासाठी.

तो घरी पोचला तेव्हा ती अखेरच्या घटका मोजीत होती. त्या अवस्थेतही ती घराच्या संबंधीच बोलत होती. "छोटूच्या लग्नाबद्दल मी किती वेळा बोलले, पण आपण अैकलंच नाहीत," नवऱ्याजवळ ती तक्रार करीत होती. धाकटी सून तिचे अैकत नव्हती, याबद्दल तिने नाराजी व्यक्त केली. अुंदीर. . .चावताहेत," मध्येच ती कोणाला तरी सांगे, "बिळं मातीनं बुजवून टाका म्हणजे अुंदीर कधी बाहेर येअू शकणार नाहीत."

मग कधी तो धोब्याला काताबून म्हणे, "पाटाच्या पाण्यात कपडे नीट धुतले जात नाही आहेत." ताक ती स्वतः करायला निघे आणि म्हणे, "मोठ्या सूनबाईला लोणी काढणं मुळीच येत नाही. . .निम्मं लोणी ताकातच राहून जातं." आपल्यामागे या कुटुंबाची काय अवस्था होअील याची तिला चिंता लागली होती.

"आता हे बोलून काय फायदा ? क्षणभर आराम कर नं," जोगय्या तिला समजावू लागला.

पण शेवटच्या क्षणापर्यंत ती काही ना काही बोलतच राहिली. अंत्यकाजवळ

ती काहीतरी बोलत होती, काहीतरी करायला सांगत होती. आणि जेव्हा तिला बोलता येईना तेव्हा कण्हत कण्हत तिने जोगय्याचा हात घट्ट धरला. त्याच्या हाताचा आधार घेऊनच ती या जगातून निघून गेली.

जोगय्याच्या बायकोला जग सोडून ठीक अेक महिना झाला. बायकोच्या प्रकृतीकडे लक्ष न देता, आपल्या जिवाची पर्वा न करता जोगय्याने जे शेत पिकले, त्यात आता पीक आले आहे. मजूर कापणी करताहेत. स्त्री-पुरुष मिळून आनंदाची गाणी गाताहेत.

जोगय्या जांभळाच्या झाडाखाली तसाच बसून राहिला. त्याचे मन आता पहिल्यासारखे भक्कम राहिलेले नाही. बायकोने मरताना जी चिंता आणि व्याकुळता प्रकट केली होती, ती तो अजून विसरू शकलेला नाही. आपण चाललो हे तिला माहीत होते. तरीही जणु आपण झोपूनच अुठणार आहोत, असे ती बोलत होती. जात्या जिवाचा या गोष्टींशी काय संबंध? खरे म्हणजे कोणाचाही त्याच्याशी काय संबंध? सगळे लोक एक ना एक दिवस मरणारच आहेत, मग त्याच्याशी काय संबंध?

शेतातून गाणे अैकू आले. जोगय्याने अेकवार डोळे अुघडून चहूकडे पाहिले. काही दिवसांपूर्वी त्याचा नातू त्याच्याबरोबर शेत पाहायला गेला होता. "बाबा, आपले शेत कुठं आहे?" त्याने विचारले होते. "समोर जे काही दिसतंय ते सगळं आपलंच शेत आहे, बेटा!" जोगय्याने अुत्तर दिले होते.

शंभर अेकरांची विस्तीर्ण जमीन. समुद्राप्रमाणे शेताचे पलीकडचे टोक दिसत नव्हते. असे ते शेत नातवाला दाखवताना जोगय्याचे मन आनंदाने फुलून निघाले. आरंभी तो बैल विकण्यासाठी या गावात आला होता. ज्या घरी त्याने आपले बैल विकले होते, त्याच घराचा तो जावई बनला. लग्नानंतर तो सासुरवाडीलाच राहू लागला. त्याची चाल-चलणूक पाहून सासू-सासऱ्यांनी त्याला घरजावई करून घेतले. त्या दिवसापासून तो फारच मेहनत करू लागला. त्याचे लग्न झाले तेव्हा त्याच्या सासऱ्याजवळ फक्त पाच अेकर शेती होती. दहा वर्षांत त्याने रक्ताचे पाणी करून पीक वाढवले आणि आणखी पाच अेकर जमीन घेतली. आता त्याच्या सासऱ्याची त्याच्यावर आणखी मर्जी जडली. शेवटचा श्वास घेताना सासरे त्याला जवळ बोलावून म्हणाले, "मी तुला आश्रय दिला, तू माझं वैभव वाढवलंस." बस्. या शब्दांनीच त्याला त्याच्या मेहनतीचे सार्थक झाल्यासारखे

वाटले. सासऱ्याच्या मृत्यूच्या वेळेपर्यंत जोगय्याने शंभर अेकर जमीन मिळवली होती. पण मेहनतीने जमीन घेताना त्याला जो आनंद वाटे, तो आज वाटत नाही. रोज शेत पाहायला जायचे, अेकवार सगळ्या शेतावर नजर टाकायची, मजुरांना हुकूम द्यायचे—आता अेवढाच कार्यक्रम अुरला आहे. म्हणजे आनंद निघून गेला आणि सवय तेवढी अुरली.

जोगय्यामामा जांभळाच्या झाडाखाली तिथेच बसून राहिला. दुपार झाली. जांभळीच्या पानांतून ठिबकणारे अुन जोगय्यामामाच्या चेहऱ्यावर सांडले होते. अुकडू लागताच जोगय्याने डोळे अुघडून पाहिले. शेतात मजूर नाहीत असे पाहताच त्याने अुठून चालण्याचा प्रयत्न केला. झाडांच्या फांद्यावर अडकवलेली जेवणाची गाठोडी सोडून जेवणारे मजूर समोर दिसले. काही जण जेवत होते, काही लोक पागोटी अुशाला घेऊन पडले होते.

"अुठा अुठा," जोगय्याने हाळी दिली.

"या वयातसुद्धा मालक कामाची किती काळजी घेतात," असे म्हणत सगळे हसले.

"नुकतंच तर आम्ही जेवायला बसलोत मालक," कोणीतरी विनवणीच्या सुरात म्हणाले. मग अेक-अेक जण शेतात अुतरला, आणि सगळे कामाला लागले.

जोगय्याने अेकदा गावाकडे पाहिले. दुपारच्या वेळी त्या जांभळाच्या झाडाखाली बसून तोदेखील जेवण करीत असे. अजूनही त्याची नात त्याच्यासाठी रोज जेवण आणते. जेवणाची टोपली डोक्यावर ठेवून येणारी नात त्याला दुरून दिसली. ढग खूप दाटून आले. कदाचित पाअूस पडेल. तो भिजला तर हरकत नाही. पण नात भिजली तर. . .पाअूस जोरात पडला तर त्याला फणसाच्या झाडाखाली असलेल्या झोपडीत जावे लागेल. ही झोपडी आजची नाही. त्याने हे शेत खरेदी केले तेव्हा बांधलेली झोपडी आहे ती. तेव्हापासून आतापर्यंत अुन-पाऊस सहन करीत ती जशीच्या तशी अुभी आहे.

"बाबा, जेवण आणलंय," असे म्हणत नातीने टोपलीवरचे फडके बाजूला केले. अेकीकडे गोंगूर (अेक भाजी)ची श्यामल कोमल चटणी शोभते आहे तर दुसरीकडे तोंडाला पाणी आणणारे रक्तासारखे लालभडक आंब्याचे लोणचे. मधोमध पांढराशुभ्र भात.

"बाबा, तुम्ही जेवून घ्या. तोवर मी शेतात जाअून येत्ये," असे म्हणत

नात झरकन् पळून गेली. जोगय्यामामा सावकाश अुठला. कपडे झटकीत त्याने डोक्याला पागोटे बांधले आणि काठी टेकीत तो पाटाकडे गेला. पाटाच्या पाण्याने त्याने चूळ भरली. मग हळू हळू चालत तो झाडाच्या सावलीत जाअून बसला. काठी बाजूला ठेवून त्याने खाण्याची टोपली समोर ओढली. आंब्याचे लोणचे बोटावर चाटले आणि त्याचा स्वाद घेण्याचा प्रयत्न केला. जिभेच्या चाटण्याचा आवाज आला नाही पण सवयीप्रमाणे त्याला स्वाद जाणवला.

शेतात मजूर धान्य कापत होते. जोगय्यामामाची नात शेताच्या बाजूला बसून थोडा वेळ हे सगळे पहात बसली. मजूरांनी 'छोटी मेमसाहेब' म्हणून तिला चिडवायला सुरुवात केली. परकर पायांत अडकत होता. त्याचा शेव हातात धरून ती शेताच्या कडेकडेने आजांकडे धावत निघाली. वाटेत तिचे वडील भेटले.

"जरीचा परकर नेसून शेतात का आलीस, बाळ ? अिथं चिखल आहे नं ?" वडिलांनी विचारले.

"नाही बाप्पा, आबांनी मला हा परकर नेसून यायला सांगितलं होतं. त्यांना मला या परकरात बघायचं होतं," मुलीने अुत्तर दिले.

"अस्सं. मग पाहिला का आबांनी ?"

"नाही, विसरले."

"बाबा जेवले, बेटा ?"

"जेवण देअून आल्ये."

"कुठं आहेत बाबा ?"

"तिथंच, जांभळाच्या झाडाखाली."

दोघे जांभळाच्या झाडाकडे निघाली. आकाशात ढग दाटले होते. पाअूस पडेलसे वाटत होते. साठी उलटल्यावरही वडिलांनी शेतावर देखरेख करण्यासाठी येजा करावी, हे त्याला बरे वाटत नव्हते. शेतात जेवण मागवून जेवणे तर त्याला अजिबात आवडत नव्हते. तो सरपंच होता. गावात आपल्या पदाला शोभेलशा थाटात राहायची त्याची अिच्छा होती. पण काय अुपयोग ? वडील त्याचे अैकत नव्हते. म्हणत, शेतात जेवल्याने अब्रूला धक्का लागतो की काय ?

कुठे तरी ढग गडगडला. वीजही चमकली. मग टप टप थेंबही पडू लागले. मुलगी जिभेवर थेंब झेलीत पुढे चालली होती. नरसय्या लगबगीने जांभळाच्या

झाडाकडे गेला. वडील झाडाखाली बसले होते.

लाठी आणि पागोटे जवळच ठेवली होती. डोळे मिटून वडील काय विचार करीत होते, कोण जाणे. विचार असोत नसोत, विचार तर करावाच लागतो. मुठीतल्या कशाचा तरी वास घेत होते. मुठीत काय आहे? फूल? तंबाखू? नाही. माती... फक्त माती! जांभळाच्या झाडाखाली ओली माती.

"बाप्पा! बाप्पा!" मुलाने हाक मारली, पुनः पुन्हा हाक मारली.

"बेटा!" वडिलांचा आवाज क्षीण होता. मूठ ढिली पडली आणि हात खाली घसरला. माती सरसरत जमिनीवर पडली. मातीत माती मिसळून गेली.

"बाप्पा! बाप्पा!"

बाप्पांनी उत्तर दिले नाही.

नौका-यात्रा

— पालगुम्मि पद्मराजु

सूर्यास्तानंतर सगळ्या जगावर औदासिन्याची छाया पसरली आहे. पाण्यावरून नाव हलके हलके पुढे सरकते आहे. नावेवर आपटून पाण्याचा खळखळ आवाज येतो आहे. नजर पोचेल तिथपर्यंत कशालाही आवाज ऐकू येत नाही. या नीरवतेत आवाज येतोय तो फक्त 'झुपझुप' असा. तो केवळ कानांना नव्हे, तर साऱ्या शरीरभर घुमतो आहे. मनाच्या आतल्या कप्प्यात भरून तो थरथरतो आहे. आयुष्याच्या अखेरच्या क्षणातले वैराग्य त्यात साकळले आहे. दूरची झाडे पुढे येताहेत आणि जवळची झाडे केस मोकळे सुटलेल्या प्रेतांसारखी मागे सरकताहेत. नाव चालत नाही, नदीचा किनारा चालतो आहे. मी डोळे फाडून पाण्याकडे पाहातो आहे. त्यावर पसरलेला अंधार फाडून बघतो आहे. आकाशातले तारे क्षीण होऊन लाटांच्या झोपाळ्यावर झुलत उघड्या डोळ्यांनी झोपले आहेत.

वारा अजिबात पडला आहे. नाव ओढणारी दोरी वल्ह्याच्या आवाजाबरोबर कधी ताणली जाते, कधी ढिली पडते. नावेच्या मागच्या बाजूस शेगडी जळते आहे. ती मधून मधून फुलून उठते, पुन्हा कमी होते. नावेत येणारे पाणी एक मुलगा बादल्या भरून बाहेर फेकतो आहे. नावेत धान्य, गूळ, मीठ, चिंच या पदार्थांच्या अनेक गोण्या ठेवल्या आहेत. नावेच्या छपरावर मी स्वस्थ पडलो आहे. नावेच्या आतून चिरूटाच्या धुराबरोबरच निघणाऱ्या लोकांमधील गप्पांचे आवाज हळूहळू सर्व दिशांना पसरत आहेत. नावेचा मुनीम बसला आहे त्या खोलीत एक लहानसा दिवा मिणमिणतो आहे. नाव पुढे चालली आहे.

"अरे नाववाल्या! इकडे घेऊन ये, या किनाऱ्यावर!" कोणीतरी साद घातली.

नाव किनाऱ्याला लागताच दोन व्यक्ती वर चढल्या. नाव किनाऱ्याकडे थोडी कलली.

"काही हरकत नाही, आम्ही छपरावर बसू," एका बाईचा आवाज ऐकू आला.

"कुठं होतीस इतके दिवस ? अजिबात दिसली नाहीस ती ?" सुकाणूवर बसलेल्या माणसाने विचारले.

"विजयनगर, विजागापट्टणमला माझ्या माणसाबरोबर खूप भटकून आल्ये. अरकूच्या डोंगरापर्यंतदेखील गेलो होतो."

"आता कुठं निघालीस ?"

"पंडपाकला जायचंय, भाऊजी ! तुमचं ठीक आहे ? मुनीमबाबू आपले खुशाल आहेत नं ?"

"हो."

तिच्याबरोबरचा माणूस छपरावर पालथा पडला आहे. त्याच्या तोंडातला चिरूट हलतो आहे. त्या बाईने त्याच्या तोंडातून चिरूट बाहेर काढून विझवून टाकला.

"अहो, उठा नीट बसा की !"

"चूप बस... रांडे ! तुला काय वाटलं, मी प्यालोय म्हणून ? थोबाडं फोडीन !" कुशी बदलून तो पुन्हा पडला. बाईने त्याला पांघरूण घातलं. मग त्याने एक चिरूट काढून शिलगावला. चिरूटाच्या प्रकाशात मी त्याचा चेहरा पाहिला. काळा चेहरा प्रकाशात लाल झाला.

तिच्या आवाजात मर्दानी झाक आहे. बोलण्यात आपलेपणा आणि विश्वास निर्माण करण्याचा गुण आहे. चेहरा फारसा आकर्षक नाही. केस विखुरलेले आहेत. तरीही मुद्रेवर काहीसा प्रौढपणा आहे. काळी चोळी... बहुधा नाहीय. अंधारातदेखील तिचे डोळे सावध होऊन चमकताहेत. काडीच्या प्रकाशात जवळ पडलेल्या मला तिने पाहिले.

"जवळ कोणी झोपलंय रे !" असे म्हणून तिने त्याला उठवले.

"ए रांडे, मुकाट्यानं येऊन झोप. ओरडलीस तर आतडी बाहेर काढीन !" बऱ्याच प्रयत्नानंतर तो जरा सरकून झोपी गेला.

एवढ्यात कंदिल वर उचलून मुनीमाने नावेच्या कडेला उभे राहून पाहिले आणि विचारले, "हा कोण आहे, रंगे ?"

"माझा माणूस आहे, साहेब. रिमार्क लिहू नका, साहेब," रंगी म्हणाली

"असं ! पद्दाल आहे तर हा ! उतरवा त्याला रांडलेका. तुला अक्कल नाही ? या दारुड्याला नावेवर चढवलं ते ?"

"मी कुठं प्यालोय ? कोण म्हणतो मी प्यालो म्हणून ?" पद्दालने विचारले.

"अरे, कोण आहे रे तिकडे ? याला उतरवा खाली. फार प्यालाय !"

"फार नाही साहेब. थोडीशी !"

"गप्प बस. मुनीमजी आहेत ते. साहेब, मंडपाकला आम्ही उतरून जाऊ साहेब."

"मुनीमजी ! हात जोडतो मी. मी प्यालो नाही आहे साहेब."

"गडबड केलीस तर पाण्यात ढकलून देईन, समजलास ?" असे म्हणून मुनीम आपल्या खोलीत निघून गेला.

पद्दाल उठून बसला. खरे म्हणजे तो फार प्यालेला नव्हता. "पाण्यात ढकलायला पाहातो साला !" पद्दाल हळूच बोलला.

"गप्प रे. मामला बिघडून जाईल."

"उद्या सकाळी नाव पाहिली म्हणजे कळेल. रुबाब करतो साला !"

"गप्प. तिकडं कुणी झोपलंय."

"कोण ? . . . झोपलंय !" पद्दालने चिरूट पेटवला.

पद्दालच्या मिशा दाट आणि चेहरा लांबट आहे. छाती फुगलेली आहे. पाठीचा कणा गोफणीसारखा वाकलेला आहे. एकूण तो चंचल आणि कृतघ्न वाटतो.

नाव पुन्हा मुकाट्याने पुढे चालली आहे. नावेच्या मागच्या बाजूस आता शेगडी जळत नाहीय. नावाडी जेवण आटोपून भांडी घाशीत गप्पा करताहेत.

हवेत गारवा नाही. तरीही मी अंगावर चादर ओढून घेतली. त्या असीम अंधःकारास असहाय होऊन आपले शरीर अर्पण करायला मला भय वाटत होते. वारा वेगाने वाहातोय. नाजुक स्त्रीच्या स्पर्शाप्रमाणे नाव पाण्यावरून अलगद पुढे सरकत चालली आहे. या कोमलतेचे वर्णन करणे कठीण आहे. त्या रात्रीवर स्त्रीत्वाची छाया सर्वदूर पसरली आहे. आणि मला खूप जुन्या करुणकथा---प्राचीन काळापासून पुरुषाचे मन रिझवीत आलेल्या स्त्रीजीवनाच्या रमणीय कथा---हळूहळू आठवताहेत.

मी झोपलोय तिथून काही अंतरावर दोन चिरूट लाल लाल जळताहेत.

वाटले, जीवन आपला जडपणा घेऊन, तिथून बसून चिरूट ओढीत विचार-मग्न झाले आहे.

"कोणतं गाव येतंय?" पद्मालने विचारले.

"काल्दारी," रंगीने उत्तर दिले.

"अजून तर बरंच दूर आहे."

"आज राहू दे रे! नको. . .नको. . .संधी पाहून नंतर! कायरे, माझं ऐकणार नाहीस?" रंगी दीनपणे मिनतवारीच्या स्वरात त्याला विनवू लागली.

"भीती वाटतेय रांडेला!" असे म्हणत पद्मालने तिच्या कुशीत बोट टोचले.

"बापरे" म्हणून रंगी स्वतःला विसरून आकाशाकडे डोळे फाडून अंधारात पाहात राहिली. जणु, या कोमल स्पर्शाचे सुख आपल्याला सतत मिळत राहावे, अशी ती आकाशापाशी प्रार्थना करीत होती.

हळूहळू मलाही झोप आली. सगळी नाव झोपली आहे आणि पाण्याच्या प्रवाहाच्या दिशेने हळूहळू पुढे चालली आहे. माझ्यापासून काही अंतरावर झोपलेली ती दोघे काही वेळ कुजबुजत राहिली. मला झोप आली होती, पण फार गाढ नाही. नाव चालली आहे, पाणी हलते आहे आणि झाडे मागे पडताहेत, हे सगळे मला कळत होते. नावेला कोणी चालवत नाहीय. नावेत असलेली सगळीच माणसे डुलक्या घेताहेत. रंगी माझ्याजवळूनच सुकाणूवरील माणसाजवळ जाऊन बसली.

"भाऊजी! कसं काय आहे?" तिने विचारले.

"तुझं कसं काय आहे?" सुकाणूवर पहारा करणाऱ्याने विचारले.

"किती अजब-अजब गोष्टी दाखवल्या त्यानं मला. सिनेमा पाहिला. नावा पाहिल्या—नावा अशा-तशा नाहीत. आमच्या गावाएवढ्या मोठाल्या. सुकाणू कुठं आहे त्याचा पत्ता लागत नाही." रंगी अशा प्रकारच्या गप्पा करीत बराच वेळ तेथे बसून राहिली. या गप्पा मला झोपेच्या झोपाळ्यात झुलवताहेत.

"रंगे, मला झोप येतेय," सुकाणूवाला म्हणाला.

"सुकाणू मी सांभाळते, भाऊजी! तुम्ही इथं बाजूला झोपी जा," रंगी म्हणाली.

गाव हलके-हलके वाकली आहे. त्या नीरवतेला धक्का न लावता रंगी धीर आवाजात हळूहळू गाऊ लागली:

कुठं गेला रे साजण माझा, कुठं गेला रे साजण
जेवण वाढून पहात बसल्ये वाट सख्याची
नीज न आली रातभरी, मज कुठं गेला रे साजण
दुंबळीसम ही अंग भारते अंग हुसा
लहान होते आभाळ सारे, कुठं गेला रे साजण
शरीराच्या रजईत तुझ्या मज घेई कवळून
मरणाचे मग टळेल संकट, कुठं गेला रे साजण...

रंगीच्या आवाजात गदनीपणाबरोबरच संगीतही आहे. त्या संगीताच्या लहरीत पसरलेल्या सगळ्याच प्राण्यांना झोपेने घेरले. जुन्या प्रेमकथा आपल्या विविध, कोमल आणि उदास छायांसह त्या गीताबरोबर थरारून उठल्या. ते आणि पाण्याचा प्रवाह वाहले आणि सगळे जग गाव अन् त्यात तरंगू लागले. या वेगाने ओतप्रोत भरून मानवी जीवन श्रान्त, विचित्र आणि जडगीळ वाटू लागले.

काही अंतरावर पद्दाल डोक्यावरून चादर घेऊन बसला आहे. त्याच्यात आणि रंगीत युगायुगांचे अंतर पडल्यासारखे वाटू लागले. तो छपरावरून उतरून खाली नावेत निघून गेला. मी एकटा उताणा पडून पाहातो आहे. रंगीचे संगीत चालू आहे—

त्या गल्लीची छेलछबेली
चोरून तिजला भेटु नको ना!
सांग सख्या, ती कोण नवेली ?
भाऊजी, ती मीच असे ना ?

मला झोप येऊ लागली. रंगीचे गीत माझ्या अन्तःकरणाला स्पर्श करते आहे. मी झोपी गेलो. त्या अवस्थेत माझ्यापुढे सहजसुंदर प्रेमाची दृश्ये तरळू लागली. खेड्यातल्या गीतकन्यांच्या मुली आपल्या प्रियकरांबरोबर लपंडाव खेळता खेळता गीताच्या मस्तीत हरवून गेल्या आहेत. पूर्वी कधीही पाहिले नव्हते, असे स्वप्नांचे एक जग माझ्यासमोर प्रकट होऊ लागले. त्यात रंगी आणि पद्दाल अनेक रूपांत विहरत होती. हळूहळू गीत माझ्या स्मृतिपटला-

वरून दूर जाते आहे. झोपेने मनाचे दरवाजे बंद करून घेतले.

नावेत आरडाओरडा झाल्याने मी डोळे चोळीत उठून बसलो. नाव किनाऱ्याला लागली आहे. हातात दोन कंदिल घेऊन नावाडी घाबऱ्या घाबऱ्या नावेवरून चढता-उतरताना दिसत आहेत. किनाऱ्यावर रंगीला दोघांनी घट्ट पकडून ठेवले आहे. त्यातला एक मुनीम आहे. त्याच्या हातात दोरी गुंडाळलेली आहे. रंगीने मार खाल्ला असणार. मी झटकन खाली जाऊन किनाऱ्यावर उडी टाकली, आणि विचारले, "काय झालं ?"

"तो चोर पळाला, साला सामान घेऊन पळाला ! त्याच्या या रखेलीनं नाव कुठं तरी किनाऱ्याला लावली. सुकाणूपाशी जाऊन पोचली रांड !" मुनीमाने चिडून निराशपणे सांगितले.

"काय काय गेलं ?" मी विचारले.

"गुळाच्या दोन आणि चिंचेच्या तीन गोणी गेल्या. म्हणून मी त्याला नावेत घेत नव्हतो. आता मालक हे सगळं नुकसान माझ्याकडून भरून घेईल. बोल ग, कुठं उतरवलं सामान ?"

"काल्दारीला, साहेब."

-"हट् रांडे ! काल्दारीला मी जागाच होतो."

"मग निडद्रवोलला असेल."

"ही आता नाही सांगायची. उद्या अत्तिलीला पोलिसांकडे देऊ तिला. चला. चढा."

"मला इथंच सोडून द्या, साहेब."

"फुकट हट्ट करू नकोस, नावेत चढ," मुनीमाने तिला नावेत ढकलले. दोघा नावाड्यांनी तिला नावेवर चढवले.

"कुचकामाची माणसं आहेत सारी. नेहमी झोपी जातात. कुठं काय होतंय एवढं तर पाहायला पाहिजे ? तिच्या हातात सुकाणू कसं गेलं ? अक्कल नाही या लोकांना !" मुनीम सर्वांवर तोंडसुख घेत झाडीत आपल्या खोलीत निघून गेला. रंगीला त्याने जबरदस्तीने छपरावर बसवले. नाव पुन्हा निघाली. मी चिरूट पेटवला.

"भाऊजी ! मला पोलिसांच्या हवाली करून तुम्हाला काय मिळणार आहे ?"

"गुनीम सोडणार नाही," नावाड्याने म्हटले.

"हा पट्टाल सुद्धा कोण ? नवरा ?" मी विचारले.

"माझा माणूस आहे तो," रंगीने उत्तर दिले.

"हिला पळवून नेलंय त्यानं, तिच्याशी लग्न नाही केलेलं. त्याची आणखी एक रखेली आहे. रंगे, आता कुठाय ती ?" नावाड्याने रंगीकडे पाहिले.

"कोव्वूरला आहे. खूप नटूनथटून गोठी मजेत राहते. माझ्यासारखी मार खाईल तर तीदेखील माझ्यासारखी बनेल. . .झोपडीवाली !"

"मग त्याच्याबरोबर कशाला जातेस ?" मी विचारले.

"तो माझा माणूस आहे, साहेब", रंगी म्हणाली. जणु तेवढ्या शब्दांत तिने सगळे काही सांगून टाकले होते.

"पण तूच तर म्हणतेस, तो दुसरीबरोबर जातो म्हणून ?"

"पण तो माझ्याकडे येतोच येतो. पुरुष आहे नं ? कितीही जणींकडे गेला, तरी काय झालं ? तो तर राजा आहे राजा. असा माणूस पुन्हा मिळायचा नाही."

"साहेब, तुम्हाला माहीत नाही. हिची गोष्ट मला विचारा. ही किती मजेत राहात होती, तुम्हाला माहीत नाही. एकदा हिला झोपडीत ठेवून त्यानं बाहेरून झोपडी पेटवून दिली. आतल्या आत ही गुदमरत राहिली. तिचं आयुष्य अजून शिल्लक आहे, म्हणून तर. . ." एका नावाड्याने सांगितले.

"साहेब, तेव्हा तो समोर आला की त्याचं नरडं आवळावंसं वाटे. वरून एक जळकं लाकूड माझ्या पाठीवर पडलं होतं," असे म्हणत तिने चोळी जरा वर करून दाखवले. इतक्या अंधारातही तो पांढरा डाग स्वच्छ दिसला.

"तो तुला इतका त्रास देतो, तरी तू त्याच्या मागे-मागे अशी का फिरतेस ?" मी विचारले.

"काय करू साहेब ? तो समोर आला की सगळं काही विसरून मी विरघळून जात्ये. फार मनधरणी करतो तो माझी. आज संध्याकाळी आम्ही कोव्वूरहून निघालो. रस्त्यात तो मोठ्या आर्जवानं माझ्याशी बोलू लागला. या नावेत चढून हाती लागेल ते सामान पळवण्याचा त्याचा विचार होता. माझ्याशिवाय हे काम झालं नसतं. जवळच्या रस्त्यानं नदीकिनारी पोचलो. ."

"सामान कुठं उतरवलं ?"

"माहीत नाही, मला आठवत नाही."

"चोराचीच रांड !" नावाडी हसत म्हणाला.

रंगीचा चेहरा पाहायला मी फार उत्सुक होतो. पण त्या अंधारात ते शक्य झाले नाही.

नाव हळूहळू चालली आहे. मध्यरात्रीनंतर हवेत गारवा येऊ लागला. झाडांवरची पाने जरा सळसळताहेत. पहाऱ्यावरचा माणूस थोड्याच वेळात डुलक्या देत देत झुकत झुकत शेवटी झोपी गेला. रंगीने आता पळून जाण्याचा प्रयत्न सोडून दिला. ती आरामात बिडी पीत बसली.

"तुझं लग्न झालं की नाही ?" मी विचारले.

"नाही झालं. लहानपणीच पट्टालनं मला पळवून नेलं."

"तुझं गाव कोणतं ?"

"ईडुपालेम . . . तेव्हा मला माहीत नव्हतं, तो पितो म्हणून . . . आता तर काय, मीदेखील पित्ये. पिण्याचं एवढं नाही . . . पण तो पिऊन मला मारतो."

"मग सोडून का नाही गेलीस ?

"मार खाताना असंच वाटतं . . . पण असा दुसरा माणूस नाही साहेब. तुम्हाला माहीत नाही साहेब, जेव्हा नशेत नसतो, तेव्हा लोण्यासारखा विरघळून जातो तो. शंभर रांडांकडे जाऊनही शेवटी तो येतो माझ्याकडेच. मी त्याला सोडलं तर त्याचं काळीज फाटून जाईल, आणि एका मिनिटात त्याचा प्राण जाईल."

या बाईचा स्वभाव मला अजब वाटला. त्या दोघांमधला संबंध माझ्या नीट लक्षात येईना. रंगी पुन्हा आपली कहाणी सांगू लागली:

"आम्ही दोघं कुठल्याच कामात टिकलो नाही. शेवटी अशा चोऱ्या करू लागलो. मला आई होती, ती परवाच वारली. ती मला अगदी नालायक म्हणे. एक दिवस, साहेब, तो त्या रांडेला माझ्याकडे घेऊन आला."

"कोणत्या ?"

"तीच. आता तो जिच्याकडे गेला आहे, तीच. माझ्यासमोर माझ्या घरात तो तिच्याजवळ झोपला. माझ्या डोळ्यांदेखत. खूप पिऊन आला होता. तीदेखील प्याली होती — माझी सवत ! मी तिच्यावर झेप टाकली आणि

तिला ओरबाडू लागल्ये, तशी तो मला मारू लागला आणि अर्ध्या रात्री तिला उचलून कुठे तरी घेऊन गेला. पुन्हा तो माझ्याकडे आला. मी भलं-बुरं बोलल्ये, त्याला आत येऊ दिलं नाही. तो दाराजवळ बसून लहान मुलासारखा रडू लागला. माझं मन विरघळलं. मी त्याच्याजवळ गेल्ये तशी त्यानं मला मांडीवर बसवून माझ्या गळ्यातला हार मागितला. मी विचारलं, "कशाला?" तो म्हणाला, "ती मागते आहे." मी भानावर नव्हत्ये. बरं-वाईट बोलून गेल्ये. तो रडू लागला. म्हणाला, 'तिच्याशिवाय मी जगणार नाही.' माझा राग आणखी वाढला. त्याला बाहेर काढून मी आतून दार लावून घेतलं. बराच वेळ तो दारावर धक्के मारत होता. शेवटी निघून गेला. बराच वेळ मला झोप आली नाही. झोप लागताच घराला आग लागली. दार बाहेरून बंद करून त्यानं छपराला आग लावली होती. कोणी आलं नाही. अर्धी रात्र झाली होती. माझं सगळं शरीर थकून गेलं होतं. खूप वेळ दार ठोठावलं आणि बेशुद्ध झाल्ये. तेवढ्यात कोणी तरी बाहेरून दार उघडलं. दुसऱ्या दिवशी तो पोलिसांच्या हवाली झाला. मला विचारण्यात आलं, आग लावणारं कोण असेल? मी सांगितलं, तो नाही. संध्याकाळी पुन्हा माझ्याजवळ येऊन त्यानं रडायला सुरुवात केली. नशेत असतो तेव्हा तो रडतो. एरवी अजिबात नाही. एक थेंब पोटात गेला की बस्, रडणं सुरू. मुलासारखं रडतो खूप. मी माझा हार त्याला देऊन टाकला."

"इतकं असून तू त्याला चोरीत पाठीशी का घालतेस?"

"काय करू साहेब? तो भांडला, तर..."

"पण तू तर सांगत होतीस तो तुला विजयनगरम आणि कुठं कुठं घेऊन गेला होता म्हणून?"

"ते सगळं खोटं. मी ते तसंच सांगितलं. हे नावाडी माझ्यावर विश्वास ठेवतात. यापूर्वीही दोनदा या नावेत चोरी झाली आहे."

"पोलिसांनी तुला पकडलं, तर काय करतील?"

"काही करणार नाही. मला पकडून ते काय करणार? माझ्याजवळ चोरीचा माल नाही. कोणी चोरी केली, कुणास ठाऊक? एक दिवस मारतील, दुसऱ्या दिवशी सोडून देतील."

"पद्दालला पकडलं तर? मुद्देमालासकट तो हाती लागला तर?"

"तो सापडणारच नाही ! आतापर्यंत मालदेखील गायब झाला असेल. तो हाती लागणार नाही, आणि मी नावेतच राहीन."

दीर्घ श्वास घेऊन ती स्वतःशीच हलक्या आवाजात बोलू लागली, "हा सगळा पैसा त्या रांडेकडे जाईल. मजा आहे तोपर्यंत तिला सोडणार नाही. हालअपेष्टा तेवढ्या मी सहन करतये. बदमाश रांड कुणीकडची ! माझ्या दुःखावर जगतेय."

रंगीच्या या बोलण्यात काही आकान्त वा जोर नाही. आपल्या माणसाला तिने जसेच्या तसे स्वीकारले आहे. पद्मालसाठी ती वाटेल ते काम करायला तयार आहे. त्यात कसलाही आदर्श नाही, भक्ती नाही वा प्रेम नाही. ईर्ष्या, अनुराग आणि अशाच अनेक भावनांनी भरलेले ते स्त्रीहृदय आहे. आणि एवढे असून तिचे चित्त एकाच ठायी लागले आहे—आपल्या माणसासाठी ती तळमळत असते. पण त्याचे आचरण निर्दोष, नीतिसंमत असावे याबद्दल तिचा विशेष आग्रह नाही. आपल्या पुरुषाचा तिने सगळ्या गुणदोषांसकट स्वीकार केला आहे. मला तिचे जीवन कठीण, जडशीळ भासले. कोणी सांगावे ? माझेच जीवन तिच्यापेक्षा अधिक जडशीळ असेल !

हळूहळू वारा जोरात वाहू लागला. प्रसन्न वाटू लागले. नाव वेगात चालली आहे. सगळे जग शीण दूर करून उठायला सज्ज झाले आहे. इकडे तिकडे शेतांच्या बांधांवरून चालणारे शेतकरी दिसताहेत. पहाटतारा अजून उगवलेला नाही. गुडघे जवळ घेऊन रंगी बेफिकिरपणे कुठेतरी पहाते आहे.

"तो माझा पुरुष आहे. कुठंही गेला तरी तो माझ्याकडे येतोच येतो," ती मनातल्या मनात म्हणते आहे. या म्हणण्यात एक प्रकारची आशा, एक प्रकारचा धीर आणि एक प्रकारचा विश्वास आहे. हाच तिच्या जीवनाचा आधार बिंदू असावा. हे ऐकताना माझे मन भय, आदर आणि दया या भावनांनी भरून आले. मी गप्प राहिलो. पहाट फुटेपर्यंत आम्ही तसेच बसून राहिलो.

नावेतून उतरून जाताना मी खिशातून एक रुपया काढून अचानक तिच्या हातावर ठेवला, आणि घाईघाईने गावाकडे निघालो. तिच्या उत्तरासाठी मी तिथे थांबलोच नाही. पुढे तिचे काय झाले, मला माहीत नाही.

दोषगुण

— गुडिपाटि वेंकटचलम

"मुलाला राज्याभिषेक केल्यानंतर राजा आणि राणी दोघेही राहिलेलं आयुष्य सुखासमाधानात घालवू लागली." आदल्या रात्री पाहिलेल्या 'मंगम्म-शपथम' या चित्रपटाची गोष्ट आजोबा आपल्या नातवंडांना समुद्राच्या काठावर बसून सांगत होते.

आजोबांच्या गोष्ट सांगण्याच्या पद्धतीमुळे, चित्रपटकथेत विशेष स्वारस्य नसणारे जवळच बसलेले नगरपालिकेतले कर्मचारीही आपल्या कचेरीच्या गप्पा सोडून त्यांची गोष्ट मन लावून ऐकू लागले. आजोबा आणि त्यांची नातवंडे घरी चालली आहेत---- तिथे ऐकू येणारे रेडिओसंगीत मजेने ऐकत आणि त्याच्या तालावर नाचत-बागडत—आजोबांचे मुलांबरोबर नाचणेबागडणे पाहात रंगम् हेव्याच्या स्वरात म्हणाला, "पाहा, जुनी माणसं किती उत्साही आहेत ! आपण इतके दिवस जगणारच नाही, आणि जगलो तरी हा उल्हास आपल्यात उरणार नाही."

"तुमचं काय मत आहे ? जीवन असं का बदलतं ?" सुरीने विचारले.

"कलियुग आहे."

"नॉन्सेन्स ! आमच्या सवयी, शहरी राहणी, गिरणीतला तांदूळ, बिन-लोण्याचं ताक—ही सगळी आमचं शरीर दुर्बळ बनवताहेत."

"या सगळ्याचं मूळ कारण राजनैतिक दास्य हे आहे," जॉन म्हणाला.

"का ? सरकारनं आम्हाला हातानं सडलेला तांदूळ खाण्याची मनाई केली आहे की काय ?"

"मनाई तर नाही केलेली. पण गिरणीत सडलेला तांदूळ खाण्याची मनाई केली पाहिजे."

"मग लोक ओरडतील, त्यांचं व्यक्तिस्वातंत्र्य हिरावलं जातंय म्हणून. रशियात लोक, त्यांना सक्तीनं आराम दिला जातो म्हणूनच ओरडताहेत नं ?"

"तुम्ही लाख म्हणा, पण जुन्या गोष्टीच चांगल्या आहेत. लोकशाही,

कम्युनिझम, लोकशासन ही सारी अशान्तता आणि उपद्रवच निर्माण करणारी आहेत. सर्वाधिकार असणारा राजा असेल, तर कोणी काही बोलू शकणार नाही."

"त्यालाच हुकूमशहा म्हणतात ना ?"

"पण प्रत्येकाला तसाच हुकूमशहा बनावंसं वाटतं. त्यापेक्षा मग राजाच चांगला !"

'मंगम्मशपथम'मध्ये आपण पाहिलं, तसं रुबाबात, मस्तीत भटकण्यासाठीच लोक राजा बनतात. त्यांचा शासनाशी काय संबंध असतो ?"

"बरं, मग ती शपथ कोणती आहे ते जरा सांगा बघू. जुन्या गोष्टीतसुद्धा काही पटणारी गोष्ट हवी ना ?"

"मुलाच्या राज्याभिषेकाच्या वेळी राणीचं वय काय असेल ? कमीत कमी चाळीस. राजाचं वय असेल पन्नास. त्या अवस्थेत ती सुखी झालेली दाखवण्यात काय फायदा ? सगळं तारुण्य व्यर्थ शपथात निघून गेल्यावर काय उपयोग ? हरिश्चन्द्र, श्रीराम हे सगळे लोक आयुष्यभर हालअपेष्टा सोसून मरण्यापूर्वी काही काळ सुखी झाले, तर काय झालं ?"

"एखाद्या आदर्शासाठी जगणाऱ्यांचं आयुष्य असंच असतं."

"चालायचंच. पण त्यांच्या जीवनात कसंही करून सुख दाखवून कथाकार आम्हाला फसवतात."

"पण अनेक लोकांच्या जीवनात हे अंतिम सुखही नसतं."

"जे लोक एखाद्या आदर्शावर उभे असतात, त्यांना त्या आदर्शाच्या सिद्धी-साठी भोगावी लागणारी दुःखं सुखासारखीच भासतात. महान कार्यासाठी आपण हे भोगतो आहोत, याचा संतोष त्यांना वाटत असतो. पण सामान्य जनतेत दुःखमय जीवन असणारे अनेक लोक आहेत."

"याचं कारण आमची अर्थव्यवस्था आहे. खरं म्हणजे, सगळे हाल गरीबी-मुळेच होतात.

"मग हे हत्याकांड, अत्याचार आणि धूर्तता—हे सगळं का घडतं ?"

"प्रारब्ध."

"जेव्हा आम्ही काही बोलू शकत नाही, समजू शकत नाही, आपलं अज्ञान मान्य करू इच्छीत नाही, तेव्हा आम्ही हेच म्हणतो. काही लोक

'देवाची इच्छा' म्हणतात आणि काही लोक म्हणतात 'प्रारब्ध'. आपल्यावर येणाऱ्या संकटांचं आम्ही असं समर्थन करतो." केवळ संकटांनाच नाही, अनुचित प्रकारांना, स्वार्थ साधू न शकणाऱ्या अनुचित विधानांना आणि अशाच इतर प्रकारांना ते परमेश्वरावर लोटून मोकळे होतात. म्हणूनच रशियातून ईश्वराची हकालपट्टी करण्यात आली आहे."

"मी एक खरी गोष्ट सांगतो. ऐका. मग सांगा, तुम्हाला काय वाटतं ते," आतापर्यंत स्वस्थ बसलेले डॉक्टर जोजफ (जॉनचे मामा) म्हणाले—

"चार वर्षांपूर्वी मी निवृत्त होण्याआधी समोरच्या त्या इस्पितळात काम करीत होतो. माझ्या वॉर्डसमोर एक म्हातारी नेहमी उभी राहात असे. तिच्यात रडण्याचंदेखील त्राण नव्हतं. त्यामुळं आभाळाकडे पहात काहीतरी पुटपुटत ती तिथं उभी असे. डॉक्टर मंडळी बरीच कामात गुंतलेली असतात. त्यांच्या दृष्टीपुढे आधी असतं इस्पितळ. त्यांच्या आयुष्यात प्रतिदिनी अशी अभागी माणसं येतच असतात. अशी माणसं पाहाण्याची त्यांना सवयच होऊन जाते. कितीही दुःख त्यांचं मन विचलित करू शकत नाही. युद्धात प्रत्येक रोगी मृत्यूच्या दारी उभा असलेला दिसतो. फुटलेलं डोकं, तुटलेले पाय, पोटाबाहेर आलेली आतडी—प्रत्येकजण म्हणतो, 'डॉक्टर, डॉक्टर, माझं ऐका—माझ्याकडे पाहा.' शेकडो माणसं एकदम हाका मारू लागतात. त्या हाकांनी मन कळवळलं, तर एकही काम व्हायचं नाही. बड्या इस्पितळांत तर आणखी एक त्रास असतो. रोगीच नाही, तर त्यांचे नातेवाईकही येऊन रडतात—भेकतात. गरज तर सगळ्यांनाच असते. डॉक्टर थोडा दयाळू असेल, तर आपल्या वॉर्डशिवाय दुसऱ्या वॉर्डचं कामही त्याच्या अंगावर पडतं. भुकेनं तडफडणाऱ्यांना औषध काय लागू पडणार? ते राहू द्या.

कामात व्यग्र असल्यानं त्या बिचाऱ्या म्हातारीचं केविलवाणं चित्र माझ्या मनाच्या एका कोपऱ्यात अंधुकसं उमटलं होतं. एका दिवशी नर्सेस तिच्यासंबंधी बोलत होत्या, तेव्हा ती कोण आहे म्हणून मी चौकशी केली. माझ्या वॉर्ड-तल्या एका रोग्याची ती आई असल्याचं कळलं. फुफ्फुसाच्या विकारानं त्याची अवस्था फारच चिन्ताजनक झाली होती. तो चाळीस वर्षांचा असेल. आई त्याच्याजवळ जाते तेव्हा तो तिला शिव्याशाप देऊ लागतो. आणि तिला बाहेर काढा म्हणून ओरडतो. त्यामुळे तो झोपलेला असेल तेव्हा ती म्हातारी

येते आणि त्याच्याकडे पाहून अश्रू गाळीत बसते. बाकीचा वेळ ती बाहेर उभी असते. त्या दिवशी संध्याकाळी मला तिची दया आली, आणि मी तिच्याशी बोललो. कसंही करून मुलाला वाचवा म्हणून रडत रडत तिनं मला विनवलं. अशा परिस्थितीत डॉक्टरनं काय करावं? खोटी आशा दाखवून दिलासा द्यावा की खरं सांगून तिचं मन दुखवावं? यातलं काय बरोबर ते माझ्या चाळीस वर्षांच्या अनुभवानंतर अजूनही मला समजलेलं नाही.

मी विचारलं, "तुझा मुलगा तुझ्यावर इतका नाराज का?" ती म्हणाली, "माझं प्रारब्ध." पुढं ती काही बोलली नाही. मग मी तिच्या मुलाला भेटून त्यालाही विचारलं, "तुझी आई अशी रडते तरी तू तिच्यावर नाराज का असतोस? कितीही वैर असलं, तरी अशा परिस्थितीत तुला तिच्याशी बोलायलाच हवं."

"तिची नियत वाईट आहे. माझ्यासमोर तिचं नावदेखील काढू नका."

"तू तिला क्षमा करू शकत नाहीस, असं काय केलंय तिनं? ती आई आहे तुझी!"

"आई? ती माझी आई? दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला क्षमा करता येईल, पण तिनं माझ्या साऱ्या आयुष्याचीच राखरांगोळी करून टाकलीय. तिनं जे काही केलंय त्याचा गेली चाळीस वर्षं मला पस्तावा होतोय. वाटतं मी हिच्या पोटी जन्मलोच का? नाव काढू नका तिचं माझ्यासमोर."

"मला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटली नाही. त्याचं बरोबर असेलही. पण आज तिच्या मनात जे दुःख आहे, जे प्रेम आहे, ते तर खरं आहे. तो रोगी दुष्ट वाटला नाही. एकटा आहे, कुटुंब नाही, शिकलासवरलेला आहे, सुसंस्कृत आहे. कोणाला काय सांगायचं?"

"आई-बापांचं प्रेम खरं असतं. मुलांमध्ये कृतज्ञता असू शकते, भक्तीची भावना असू शकते; पण प्रेम त्यांच्या ठायी कधीही नसतं. दुसऱ्यांनी केलेले अपकार आपल्या लक्षात राहातात. पण दुसऱ्यांवर आपण केलेल्या अपकारांची आपण कधी आठवण ठेवीत नाही. इतका द्वेष आणि शिव्याशाप असूनही विस्मृती, क्षमा आणि ममता या भावनांमुळेच हे जग आपल्याला राहण्यालायक राहिलं आहे."

दुसऱ्या दिवशी माझ्या श्रद्धेचा केन्द्रबिन्दू त्या रोग्याऐवजी त्याची आई

बनली. मुलगा आणि मुलाचे प्राण याव्यतिरिक्त तिच्या मनात कसलाही विचार नव्हता. कोणीही भेटलं की त्याला ती म्हणे, "त्याला वाचव बेटा !"

"तुझं नाव ऐकलं की तो थुंकतो. असा मुलगा जगला काय न जगला काय, तुला काय करायचं ?" एक दिवस मी तिला म्हटलं. ती काहीच बोलली नाही.

आपल्या मुलावर तिचा चरितार्थ अवलंबून होता असंही नाही. कोणाच्या तरी घरी काम करून ती आपलं पोट भरीत होती. आता तर ती तेही काम सोडून इस्पितळातल्या जमिनीवर दिवस काढीत होती. मला वाटलं, ही आपल्या अपराधांबद्दल स्वतःच स्वतःला शासन करून घेते आहे.

"त्यानंतर दोन दिवसांनी मी एका दिवसाची रजा घेतली—घरी पाहुणे येणार होते."

"पाहुणे येणार म्हणून रजा का घेतली ?" रंगाने विचारले.

"त्याच्याशी तुम्हाला काय करायचं ? घेतली रजा, बस्स. आता गोष्ट ऐका."

"नेहमी तीच गोष्ट ऐकवता, जरा स्वतःची कहाणीदेखील ऐकवा नं, अंकल," जॉन हसत म्हणाला.

"पाहुणे कोण होते ? स्त्री की पुरुष ?" सुरीने विचारले.

"स्त्रीच समजा. माझी सासू. वीस वर्षं झाली आता ती वारल्याला."

"टेम्पररी सासू होती काय ?"

"गोष्ट ऐकायची की नाही ?" डॉक्टरांनी दटावले.

"ऐकणार तर. सांगा."

"पण पाहुणी आली नाही."

"बिचारी !"

"त्या दिवशी रोग्यांचं काय झालं असेल, देव जाणे," सुरी बोलला.

"नर्सेसही नव्हत्या, डॉक्टर ?"

"बरं मग, मी निघू ?" डॉक्टरांनी हसत विचारले.

"आता नाही गडबड करणार. सांगा."

"घरात एकटाच होतो."

"ही खरी गोष्ट आहे."

"तोंड बंद ठेवून गोष्ट ऐका. घरात बसून बसून कंटाळा आला तेव्हा इस्पितळात गेलो आणि समुद्राकडे पाहात व्हरांड्यात आरामात बसलो.

व्हरांड्याच्या दुसऱ्या बाजूला बसलेल्या दोन नर्सेस आणि त्यांच्याजवळ उभे असलेले मेडिकलचे तीन विद्यार्थी यांच्या गप्पा मला ऐकू येत होत्या. आता मी गोष्ट सांगतोय नं, तशाच त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. तीच गोष्ट मी तुम्हाला पुन्हा सांगतोय्——

"आत्ता जळवेसारखी तुझ्यामागे लागली होती ती कोण होती ?" वेंकटप्पा या विद्यार्थ्यानं विचारलं.

"आमच्या गावची आहे ती," श्रीनिवास उत्तरला.

"मग तुझं वय काय ?" वेंकटप्पाने विचारले.

"मला नाही माहीत. तिचा मुलगा माझ्या मोठ्या भावाचा वर्गमित्र आहे. कोणीतरी सांगितलं होतं की तिचा भूतकाळ मोठा रोमँटिक आहे म्हणून."

"हे ऐकताच मी त्यांचं बोलणं लक्षपूर्वक ऐकू लागलो. जुन्यापुराण्या कॅन्व्हासच्या पडद्यामधून सकाळच्या प्रकाशात त्यांचे चेहरे थोडे थोडे दिसत होते.

"अच्छा, म्हणून तू इतकं केलंस."

"मी नव्हे, माझ्या वडिलांनी तिच्यासाठी बरेच प्रयत्न केले होते, असं ऐकतो."

"ठीक आहे बाबा, आता हे सांग, ती तुझ्यासाठी कसले प्रयत्न करते आहे?"

"तिचा मुलगा याच वॉर्डातला रोगी आहे."

"कोण ? एकवीस नंबरचा नं ? बिचारी ती म्हातारी, किती रडत असते," इंग्रजी बोलण्याचा नर्स बालम्माने प्रयत्न केला.

औषधांची वगैरे नावं सोडल्यास बालम्माला इंग्रजी फारसं येत नाही.

"ठीक आहे, आई म्हणून. . ."

"पण तो रोगी तिच्याशी बोलत नाही. तिच्याकडे पाहातसुद्धा नाही. एकदा आईला म्हणत होता, 'शी : तुझं काळं तोंड मला पाहायचं नाही,' म्हणून !"

"काय श्रीनिवास, ती तुझ्या गावची आहे आणि तिचा इतिहास मोठा विचित्र आहे म्हणून तू सांगतोस. तुला तिच्यासंबंधी आणखी काही माहीत आहे ?"

"मला तर काही माहीत नाही. ते लोक आमचं गाव सोडून निघून गेले, त्याला खूप दिवस झालेत."

"चला बाबा, चला," तिसऱ्या विद्यार्थ्याने आपल्या घड्याळाकडे पाहात म्हटलं.

"घाई कसली आहे?" म्हणत नर्स एलिझाबेथने त्यांच्याकडे कटाक्ष टाकला. पुरुष तिच्यावर लुब्ध होतात, पण तिच्यापाठी का लागत नाहीत, हे तिच्या लक्षात येत नाही. चित्रपटगृहात हातात हात घेतल्यावरदेखील दिवे लागताच एकदा चेहरा पाहून मान फिरवतात. तिची वेषभूषा पाहिल्यावर एक वेळ अगदी जवळ येऊनदेखील आयुष्यभर तिच्यापासून बचावून राहावे लागते.

"तू म्हणतेस, घाई कसली आहे? आज ऑपरेशनचा दिवस आहे. थिएटरमध्ये पोचायला एक मिनीट जरी उशीर झाला, तरी तो डॉक्टर रोग्याच्या जागी मला टेबलावर झोपवील," श्रीनिवास म्हणाला.

"तिघे विद्यार्थी तिथून निघून गेल्यावर दोघी नर्सेस शिवणकाम करीत गप्पा मारू लागल्या. झाडा-झुडुपांना स्पर्श करून, गवताच्या रानात गुद-गुल्या करीत स्वच्छंद वाहणारी थंड हवा किंवा सागराच्या पाण्याची कोमलता घेऊन भिंतीवर प्रतिबिंबित होणारी किरणं हे त्यांच्या गावीही नव्हतं. हेडनर्सकडे रात्री पुलावाची प्लेट गेली होती, ते बक्षिस होतं किंवा काय, याबद्दल त्यांच्यात चर्चा चालू होती. थोड्याच वेळात त्यांच्या गप्पांनी तो पुलाव पाठवणारा पोलिस इन्स्पेक्टर आणि चाळीस वर्षांची ती नर्स यांना एकाच पलंगावर दररोज रात्री आरामात झोपवून टाकलं. त्यानंतर त्या दोघांत जे काही घडलं त्याची कल्पना करून त्यांनाही सविस्तर वर्णन त्यांना करायचं होतं, पण ते अश्लील असल्यामुळे त्यांच्या ओठांनी त्या शब्दांचा उच्चार करायचं नाकारलं.

वॉर्डमधून बाहेर येऊन डॉक्टर कामेश्वर राव म्हणाले, "तुम्ही इथं आरामात बसला आहात आणि तिकडे बारा नंबरच्या तोंडातून रक्त येतंय."

"मग आम्ही काय करावं? औषध द्या, रक्त थांबेल."

"ते देतोच आहे, पण..."

"कोणाला कोणाचं नेहमी कुठून ना कुठून, काही ना काही निघतच असतं. आम्हीसुद्धा माणसं आहोत. तुमचं काय? दोन अक्षरं लिहून आरामात घरी जाऊन पत्ते खेळत बसता!"

"गेल्या आठवड्यात आरोग्य मंत्र्यांनी दिलेलं भाषण तुम्ही ऐकलं असेल."

"हो. नीट ऐकलंय. मग रेडिओवरूनही ऐकलं आणि वर्तमानपत्रांतूनही वाचलं. मग त्यावरच हेडनर्सनंही एक लेक्चर झोडलं! आधीच्या मंत्रीमहाशयांनीही हेच सांगितलं होतं, आणि पुढं होणारे मंत्रीही हेच बोलणार आहेत. आम्ही भत्त्याचा विषय काढला की कोणी काही बोलत नाही." बालम्मा म्हणाली, "म्हणतात, रोगी हीच तुमची मुलं."

"अग वेडे, त्या मंत्रीमहाशयांना अकरा मुलं आहेत," एलिझाबेथ म्हणाली.

"बरं बाई. रोगी आमची मुलं. मग आमच्या मुलांचे बाप?"

"डॉक्टर लोक," असे म्हणून एलिझाबेथ हसली आणि कामेश्वर रावकडे पाहू लागली.

"सरकारनं असा एक हुकूम काढून टाकला तर..." बालम्मा हसत म्हणाली.

"भत्ता वाढवण्यासाठी म्हणे पैसा नाहीय."

"पण औषधांच्या इंडेंटमध्ये त्या दोन लाखांच्या प्रकरणाचं काय झालं?"

"कोणाला विचारत्येस?"

"अखेर..." इतक्यात ते तिघे विद्यार्थी परत पळत येताना दिसले.

"इतक्या लवकर ऑपरेशन झालं?"

"आज साहेबांनी एकच ऑपरेशन केलं."

"का?"

"घरी लवकर जाण्यासाठी."

"लवकर कशाला?"

"त्यांचा पाहुणा आहे नं—तो इंग्लंडहून आलेला—न्यूजप्रिंट एजंट आहे तो—आपल्या सौभाग्यवतीबरोबर त्यानं एकट्यानं घरात राहावं हे या महाशयांना पसंत नाही. त्यामुळे सर्वांवर रागावत सुटले आहेत साहेब."

"तो एकमेव ऑपरेशन पेशंट — तोही मेल्याचं कळलं."

"नशीब असावं तर असं!"

"इस्पितळातल्या नशिबाचं सोडा. खरं म्हणजे घरी त्याचं नशीब कसं होतं कोण जाणे."

"बरं डॉक्टरसाहेब, आपल्याला या वॉर्डातल्या एकवीस नंबरच्या रोग्याबद्दल काही माहीत आहे? माझ्या गावचा आहे नं तो!" श्रीनिवासने विचारले.

"एकवीस नंबरचं तर मला माहीत नाही, पण. . ."

"आई–मुलाचं पटत नाही . . ."

"ते काही मला माहीत नाही. पण त्याच्या आईची केस वैद्यकशास्त्राच्या दृष्टीनं बरीच रंजक आहे. तुम्हाला ऐकायची असेल, तर सांगतो."

"सांगा, सांगा. एक वाजेपर्यंत खाण्यापिण्याची काही घाई नाही."

आपल्या रोग्यांना देवाच्या हवाली करून डॉक्टर कामेश्वर राव सांगू लागले :

"हायस्कूलमध्ये असताना आमच्याबरोबर कनकय्या नावाचा एक मुलगा शिकत होता. तो सगळ्यांत हुशार होता. त्याचे आईवडील फार गरीब होते. एकदा त्याला एकाएकी खूप ताप आला आणि भराभर चढू लागला. गावात एकच इंग्रजी डॉक्टर होता. त्या काळी इस्पितळात एक मुसलमान डॉक्टर होता. त्यानं औषध दिलं. पण दुसऱ्याच दिवशी कनकय्याची शुद्ध हरपली आणि त्याला वात झाला. तो बडबडू लागला. एरवी साधा ताप आला तरी तो असाच बडबडू लागे. बहुतेक हुशार मुलांप्रमाणे तोही फार हळवा होता. आम्ही आणि आमचे शिक्षक सकाळ-संध्याकाळ त्याची प्रकृती पाहायला जात असू. आमच्या मुख्याध्यापकांनी विचारलं तेव्हा डॉक्टरांनी त्याला 'सेप्टिसिमिया' झाल्याचं सांगितलं. तो लवकरच बरा होईल, असंही ते म्हणाले. दुसऱ्या दिवशी रात्री ताप आणखी चढला. गावात सगळ्यांना हे समजलं. सगळे चिंताक्रांत झाले. गरीबीमुळे कनकय्या सगळ्यांकडे वार लावून जेवायला जात होता. त्याचे वडील गावाचे पुरोहित होते. बापलेकांबद्दल सगळ्यांना प्रेम वाटे.

"लोकांनी घाबरून गोपय्या या आयुर्वेदिक वैद्याला बोलावलं. त्यानं रोग्याची नाडी पाहाताच सांगितलं की हा दोषगुण नावाचा विकार आहे. त्याच्यावर एकच उपाय आहे. ज्या स्त्रीशी समागम करताना हा दोषगुण जडतो, त्याच स्त्रीच्या मांडीतलं रक्त काढून त्याचं अंजन रोग्याच्या डोळ्यांत घातलं पाहिजे. वैद्य गोपय्याचं म्हणणं सगळ्यांनी खोडून काढलं. कनकय्या अगदी लहान आहे, दिसायला फारसा सुंदर नाही, चेहऱ्यावर देवीचे वण आहेत. अभ्यासाशिवाय दुसरा कसलाही विचार तो करीत नाही, असं सगळे म्हणू लागले. त्या काळातले लोक (त्यातही आमच्यासारख्या छोट्या गावातले लोक) इंग्रजी औषधांकडे संशयाने पाहात."

"संशयाने पाहात म्हणजे काय ?" एलिझाबेथने विचारले.

"म्हणजे दोषगुण स्त्री-संपर्कामुळे होत नाही."

"म्हणजे ?"

"आजारी अवस्थेत..."

"पण चिकित्सा-ग्रंथांत हे कुठंही लिहिलेलं नाही."

"इंग्रजी पुस्तकांत नाही."

"मग आपण हे मानता ?"

"तेच तर ! आता तुम्ही ही गोष्ट ऐकून स्वतःच काय ते ठरवा. गोष्ट ऐका—शेवटी तो गुणी मुलगा आहे. पण एखाद्या वाईट बाईनं त्याला वाममार्गाला नेलं असलं तर कोणास माहीत ? कोणाची तरी बुद्धी फिरली असेल. गोड बोलून किंवा पैसे देऊन फसवलं असेल, असा विचार सगळे लोक करू लागले.

मुसलमान डॉक्टरांना हे सांगण्यात आलं तशी ते म्हणाले—"नॉन्सेन्स ! दोषगुण नावाचा काही आजार मुळी नाहीच. थांबवा हा गोंधळ !"

"त्यामुळे त्या डॉक्टरबद्दलचा आमचा आपलेपणा पार नाहीसा झाला. आता प्रश्न उपस्थित झाला की, ती स्त्री कोण असावी ?

"ती स्त्री कोण असावी ? या प्रश्नानं गावात एकच खळबळ उडवून दिली. गव्हर्नर जनरलला गोळी घालून ठार केल्यानंतर त्यावेळी वृत्तपत्रांतून जी चर्चा झडली, तिच्यामुळेदेखील इतकी खळबळ उडाली नसेल ! रोगी शुद्धीत नसल्यानं त्याला विचारता येत नव्हतं. मग हे कळणार कसं ? त्या गावात कोणी शर्लाक होम्सही नव्हता. पण तसे सगळेच डिटेक्टिव्ह होते. शेवटी, गावाबाहेर एका लहानशा झोपडीत राहणाऱ्या नागीचा लोकांना संशय आला. अर्ध्या रात्री लोकांचा जमाव नागीच्या झोपडीवर चालून गेला. लोकांची खात्री होती की गावातल्या सगळ्या बायका पतिव्रता आहेत—— नागी सोडून ! त्यांना भीती ही होती की, अशा प्रकारे नागीवर हल्ला केला नाही, तर गावातल्याच सगळ्या बायकांवर संशय राहील. कनकय्या गावातल्या सगळ्याच लोकांच्या बायकांशी, विशेषतः विधवांशी मिळून-मिसळून वागतो. कोणी त्याचा भांग पाडून दिला होता, कोणी त्याला कुडता शिवून दिला होता तर कोणी त्याच्या चिमुकल्या गालांचं प्रेमानं चुंबन घेतलं होतं.

प्रत्येकाच्या भय वाटत होतं की, ही वीज आपल्या मस्तकावर पडते की काय ? त्यामुळे आपापली बायको पतिव्रता आहे हे सर्वांनी एकमतानं ठरवून टाकलं, आणि ते नागीच्या झोपडीवर चालून गेले. त्या रात्री त्यांनी नागीचं काय केलं असतं सांगता येत नाही. पण सुदैवानं रामन्ना त्या दिवशी खूप पिऊन नागीबरोबर झोपला होता. गोंधळ ऐकू येताच हातात कोयता घेऊन तो बाहेर आला आणि त्यानं आरोळी ठोकली —या पुढं, कोण हिंमतवान असेल तो ! . . . ते ऐकताच नागीबद्दलचा आपला संशय निराधार आहे, याबद्दल लोकांची खात्री पटली आणि ते घरोघर परतले.

"पण याच वेळी कनकय्याचे आईवडील भलतेच बुचकळ्यात पडले होते. कारण ताप आल्यापासून कनकय्या सारखा शारदाम्बा, शारदाम्बा असं म्हणत होता.

"शारदाम्बा त्या गावात साक्षात् भगवती शारदेचा अवतारच मानली जाते. दिसायला सुंदर आणि सद्‌गुणी अशी ती आदर्श गृहिणी आहे. तिचं घराणं मोठं श्रीमंत आहे. तिला एकच मुलगा आहे. कनकय्याशी तिचं दूरचं नातंही आहे. हायस्कूलात गेल्यापासून आठवड्यातून तीन वार कनकय्याचं जेवण तिथचं होत असे. आर्थिक मदतही बरीच मिळे.

"दुसऱ्याचं गुह्य त्याच्या तोंडावर सांगण्याचं धाडस यमराजालाच काय पण सीतेला अग्निप्रवेश करायला सांगणाऱ्या श्रीरामालादेखील झालं नव्हतं. गोष्ट काही केल्या पटत नव्हती. ती तर धर्माची मूर्ती आहे. सगळा गाव तिला आईच्या जागी मानतो.

"आरंभी आरंभी कनकय्या शारदांबेचं नाव वारंवार घ्यायचा तेव्हा लोकांना वाटलं, शुश्रुषेत काही कमी पडलं असेल म्हणून त्याला चिन्ता वाटत असेल किंवा शारदाम्बा आपल्याजवळ असली, तर आपला रोग नाहीसा होईल, असं त्याला वाटत असावं.

"शारदाम्बा कनकय्याला पाहायला दोनदा आली आणि अश्रू गाळून निघून गेली. तिच्या घरी नवरात्र होतं. ब्राह्मणभोजनं चालू होती. त्यामुळं कनकय्या-साठी अधिक वेळ तिला देता येत नव्हता, नाहीतर आठही प्रहर ती त्याच्या-जवळ बसून राहती. तिच्या या कनवाळूपणाचा लोकांना अचंबा वाटला.

"पण वैद्याच्या म्हणण्याप्रमाणे हा दोषगुणनामक विकार आणि गुरुशानं

शारदाम्बेच्या नावाचा चालवलेला जप या दोन गोष्टींमुळे कनकय्याच्या आई-आपांना वाटू लागलं की, कसंही करून आपल्या मुलाला वाचवण्याचे प्रयत्न करण्यासाठी त्या स्त्रीला तयार करावं. पण तिला हे सांगायचं कसं ?

"नाइलाज होऊन नापास. पडलेल्या आपल्या मुलाला उठवून आईनं विचारलं—बाळा, तू सारखं शारदाम्बेचं नाव का घेतोस ? खरं काय आहे ? आम्हांला सांग बाळ. आम्ही कोणालाही सांगणार नाही. खूप वेळा विचारून झालं, पण तो शुद्धीत नव्हता म्हणा अथवा त्याला सांगायचं नव्हतं म्हणा, काहीही उत्तर मिळालं नाही.

"ताप वाढत चालला. आता तो चोवीस तास तरी जगेल की नाही, याची शंका होती. तेव्हा हताश होऊन त्याची आई सकाळीच उठून शारदाम्बेच्या घराच्या मागच्या बाजूला जाऊन बसली, शारदाम्बेच्या उठण्याची वाट पाहात.

"तुम्ही का ? मला वाटलं, दुसरं कोणी आहे. कशी आहे. . . .कनकय्याची प्रकृती ?"

"काय सांगू, आईसाहेब. गोपालय्यानं सांगितलं, आता काही आशा नाही म्हणून, उद्यापर्यंत. . ." ती रडू लागली. शारदाम्बेनं तिला जवळ घेऊन तिचं सांत्वन केलं.

कनकय्याच्या आईनं झटकन—"मला पुत्रदान करा आईसाहेब" असं म्हणत शारदाम्बेचे दोन्ही पाय धरले. शारदाम्बेनं चकित होऊन तिला उठवलं आणि विचारलं, काय करू, सांग. देवावर विश्वास ठेव, चिन्ता करू नकोस. मी येऊन पाहून जाईन.—तिला जणु काहीच माहीत नव्हतं. "तसं नाही, आईसाहेब. आता आपल्यावरच सगळा भार आहे. माझा हा एकुलता एक मुलगा आहे, तो राहिला नाही, तर मी जगू कशी ?" ती स्फुंदू लागली.

"मी तरी काय करू शकणार ताई ? मीदेखील माणूसच आहे. देवीचं कुंकू देते, ते घेऊन जा. देव दयाळू आहे. तुझ्यावर तो अन्याय नाही करणार. धीर बाळग."

"असातसा ताप असता तर काळजीचं कारण नव्हतं. औषध दिलं, बरा झाला. पण लोक म्हणतात हा दोषगुण आहे. कोणत्या माईनं हा उपकार केला कोण जाणे. . .!"

"तो गोपय्या कोण ? त्याला काय माहीत आहे तुम्ही इंग्रजी औषध

बंद का केलंत ? पैशांचा प्रश्न असता, तर आमच्याकडून घ्यायचे. दोषगुण ? जोडे मारले पाहिजेत त्याला ! इतका लहान मुलगा आणि दोषगुण ? कोणी वेडं म्हणेल आपल्याला. तुमचा तरी यावर विश्वास कसा बसला ?"

"नाही माई, तो दोषगुणच आहे. सगळी लक्षणं तीच आहेत. दुसरा ताप असता, तर एवढे हाल झाले नसते !"

"मग गोपय्या त्याला बरं का करीत नाही ?"

"कसं बरं करणार ? त्याच्यासाठी औषध तर मिळायला हवं ना ? आपली चूक कबूल करून मला पुत्रदान करील आणि आमच्या वंशाचे रक्षण करील अशी स्त्री कोण असेल ?"

"शारदाम्बेला यावर बरंच भलं-बुरं ऐकवता आलं असतं, पण आपलाच अपमान होण्याच्या शंकेनं तिनं संभाळून विचारलं :

"मग कनकय्याला नाही विचारलं ?"

"विचारलं. पण तो शुद्धीत नाही." मग धीर करून ती बोलली: "ताप आला तेव्हापासून त्याच्या तोंडातून एकच शब्द बाहेर पडतोय — शारदाम्बा!" थोडं थांबून ती म्हणाली : "कधीही विचारलं, की तो शारदाम्बेचंच नाव घेतो."

"बापडा मला फार मानतो. चांगला मुलगा आहे. दिलेलं कोणतंही काम अगदी मन लावून करायचा," असं म्हणत शारदाम्बेनं डोळ्यातून पाणी काढलं.

"कनकय्याच्या आईला आता राहावलं नाही. काम करून घेण्याच्या दृष्टीनं ती म्हणू लागली :

"तो तर पुन:पुन्हा म्हणतो, शारदाम्बाबाई, मला त्रास देऊ नका. मला काही माहीत नाही, मी असा मुलगा नाही."

"हो. आता मला आठवलं. चार दिवसांपूर्वी मी कपाटात सहा रुपये ठेवले होते. नंतर ते दिसले नाहीत. मला वाटलं, त्याला मी काही तरी विकत आणायला ते दिले असतील आणि मग ते विसरून गेले असेन. तेच मी त्याला विचारलं. ते त्याच्या मनात असावं. नाजुक मन आहे त्याचं !"

"आता कनकय्याची आई असहाय्य होऊन म्हणू लागली—पापपुण्य सगळं देवाला माहीत. आईसाहेब, आपल्याला स्पष्ट सांगायला जीभ धजत नाही. पण स्त्री कितीही पतिव्रता असली, तरी मनात कधी काय येईल, हे सांगणं

कठीण आहे. . .आपल्याला आपलं रक्त देऊन आमच्या मुलाचे प्राण वाचवावेच लागतील, त्यानं आपलंच नाव सांगितलं."

"माई, मी हे कोणाला सांगणार नाही. आपल्या दोघींतच राहील ही गोष्ट ! आयुष्यभर आपल्या घरी काम करीन मी."

"यावरही शारदाम्बेनं असं दाखवलं की, जणु तिला काहीच कल्पना नाही, माझं रक्त घेऊन काय करशील ? इस्पितळातल्या लोकांनी काय रक्त द्यायला सांगितलं आहे ?"

"नाही हो, हा दोषगुण आहे ना ?"

आता शारदाम्बा काय ते समजली आणि एकदम भडकली—"काय म्हणालीस ? काय बोलतेस ?" पूर्वेकडे तांबडं फुटत होतं—तिकडे पाहात कनकय्याची आई म्हणाली :

"कशीही माणसं असली, तरी कधी कधी चुकतात. मी तुम्हाला काही म्हणत नाही. फक्त माझ्या मुलाच्या प्राणांची भीक मागते." तिचं हे बोलणं चालू असतानाच शारदाम्बा कडाडली—"एक शब्द बोलू नकोस. चालती हो इथून ! असं आहे काय ? मला अशी समजलात तुम्ही ? तुझा कनकय्या जसा तुझा मुलगा, तसाच माझाही मुलगा ! निघून जा इथून. आणखी कोणापुढं हे बकू नकोस. डोकं फिरलंय तुझं ! आता सरळे घरी जा—कोणी ऐकलं तर तोंडावर गरम पाणी फेकतील तुझ्या ! जा ! जा !" असं म्हणून तिला बाहेर काढून शारदाम्बा आत निघून गेली.

"त्या दिवशी सकाळपासून गाववाल्यांनी कनकय्याच्या घरी जाणं सोडून दिलं. कोणाचा चेहरा पाहून तो कोणाचं नाव घेईल, याचा नेम नव्हता. स्त्रिया तर तिकडे फिरकेनाशा झाल्या. संध्याकाळ होता होता कनकय्याची शेवटची अवस्था आली. आईबाप हताश झाले. अर्ध्या रात्री दोघं शारदाम्बेच्या घरापुढं जाऊन शिव्याशाप देऊ लागली—तू आमच्या मुलाचा जीव घेतलास. तू कुलटा आहेस, बाजारबसवी आहेस, वगैरे वगैरे.

"आमचाच भोळाभाबडा मुलगा बरा मिळाला तुला ! इतकी मस्ती होती, तर एखादा मर्द नाही मिळाला ? बाहेर मजूर आहेत, जनावरं आहेत, इ. इ."

"शारदाम्बेच्या पतीनं दार उघडून चौकशी केली. आई-बाप त्याच्या पायावर पडले. त्यांच्यामागे वैद्य गोपय्या उभा होता. शारदाम्बा एकदम बाहेर

आली नाही. त्या लोकांवर तिच्या नवऱ्याचा मुळीच विश्वास बसला नाही. विश्वास बसला आणि संशय आला, तरी तसं कोणता पुरुष बाहेर दाखवील ? आत जाऊन त्यानं बायकोला विचारलं.

"काय बोलता ? तुम्हालाही वेड लागलंय का ? ती तर वेडी आहेतच. त्यांना चांगला धडा शिकवून पाठवायचं आपण... ते राहिलं बाजूला आणि उलट मलाच येऊन विचारता ?"

"बायकांचा कोणी भरोसा द्यावा ? जर काही नाही, तर हे सगळं लोक तुझा संशय का घेतात ? हे खरं असो-नसो, तो मुलगा मेला, तर आयुष्यभर तुला तो ठपका राहील. लांछन तर लागलंच, मग आता रक्त देण्यानं काय बिघडतं ? तो जगणार नाहीच. तुझा काही दोष नाही, हे लोकांना पटेल." पतीनं समजावलं.

"छी: छी: ! माझ्यासमोर असं बोलू नका ! मी रक्त द्यायला तयार झाले, तर मी माझ्यावरचा आरोप मान्य केल्यासारखं होईल. ते कार्ट माझं नाव का घेतंय कोण जाणे ! ते घेऊन ही माणसं..."

"सगळं तुझं प्रारब्ध आहे. काय करायचं ? तूच विचार कर. [illegible] दे. माझं ऐकून रक्त दे." पतीनं अशा प्रकारे पत्नीला समजावण्याचे [illegible] प्रयत्न केले. पण ती ऐकेना.

"पण पतिराज हट्ट सोडीनात. एखाद्याचे प्राण वाचवण्यासाठी हा त्याग केलाच पाहिजे, असं ते बोलू लागले. पुराणातल्या पतिव्रतांची नावं त्यांनी घेतली. शरीराचं मांस तोडून देणाऱ्या शिबीची आणि कातडं काढून देणाऱ्या कर्णाची आठवण त्यांनी करून दिली. ही गोष्ट बाहेर कोणाला सांगणार नाही म्हणून कनकय्याचे आईबाप आणि वैद्य गोपय्या यांना शपथ घ्यायला लावली. तरीही ती राजी झाली नाही. शेवटी गुराप्रमाणे तिचे हातपाय बांधून रक्त काढून ते घेऊन ती माणसं गेली. त्याचं अंजन करून त्यांनी कनकय्याच्या डोळ्यांत घातलं.

एक आठवड्यात कनकय्या बरा झाला आणि शाळेत जाऊ लागला."—इतकं बोलून डॉक्टर कामेश्वर राव थांबले.

"डॉक्टरसाहेब, आपल्या मते खरोखरी दोषगुण नावाचा काही आजार आहे ?" वेंकटप्पय्याने विचारले.

समुद्रावर ढगांची दाटी झाली आहे. मंद वायू लाटांशी खेळतो आहे. समुद्राच्या शाखाधिकाऱ्यांसाठी बनवल्या जाणाऱ्या रस्त्याप्रमाणे एक रेषा समुद्रात पसरत जात आहे. हवा शान्त झाली आहे.

"आजार नाही कसा ? नि:संशय आहे."

"पण आमच्या पुस्तकांत तर नाही."

"एक गोष्ट लक्षात घ्या—मग कळून उपयोग नाही. तुम्ही लोक डॉक्टर बनल्यावर थोड्याच दिवसात तुमचा पुस्तकांवरचा विश्वास उडून जाईल ! असं झालं नाही, तर तुम्ही मूर्ख समजले जाल !"

"मग हे सगळं शिक्षण कशासाठी ?"

"आपण काय केलं पाहिजे हे कळण्यासाठी. हे समजण्यासाठी की, आपल्याला फार कमी समजतं !"

"मग काय ते रक्त हाच त्या आजारावरचा उपाय आहे ?"

"आतापर्यंत तरी तेवढंच माहीत आहे."

"मग हा दोषगुण आहे हे आम्हाला कसं समजेल ?"

"कशाला समजेल ?"

"म्हणजे ?"

"ज्याला जगायचं आहे, तो माणूस दोषगुणावर इलाज करण्यासाठी ॲलोपॅथीच्या डॉक्टरकडे मुळी जाणारच नाही !"

"साधा ताप समजून आमच्याकडे आला, तर ?"

"तर मरून जाईल ! त्यात तुमचं नुकसान काही नाही. तुमची फी तुम्हाला मिळेल."

"मग डॉक्टर बदनाम नाही होणार ?"

"काही होणार नाही. आम्ही म्हणू रोग्याच्या आयुष्याची दोरीच तुटली होती. मग त्याला वाचवायला आम्ही परमेश्वर थोडीच आहोत ?"

"म्हणजे आयुर्वेदच आपल्या देशासाठी अधिक उपयुक्त आहे तर !"

"नाही. कारण आयुर्वेदिक वैद्यांनी काय करावं, काय करू नये, हेही कोणाला माहीत नाही."

"बरं. चर्चा राहू द्या. तुमची गोष्ट संपली का ? की अजून राहिली आहे ? मला जाऊन त्या रोग्याचं रक्त थांबलं की नाही, ते बघायचंय," नर्स

एलिझाबेथ म्हणाली.

"अजून थोडी शिल्लक आहे."

"म्हणजे हा सारा प्रकार त्या साध्वीनंच केला तर," नर्स बालम्मा आश्चर्याने बोलली.

"त्यात काय झालं ? सगळे लोक जे करतात, तेच तिनंही केलं. याचा असा परिणाम होईल, हे तिच्या ध्यानीमनीही आलं नाही. ते तिचं दुर्दैव होतं."

"पण तिच्यापायी एका निष्पाप मुलाचे प्राण चालले होते आणि त्याचे आई-बाप रडत होते. तिचं मन किती कठोर असेल ? ती माणूस नाही, हडळ म्हटली पाहिजे."

"दुरून गोष्ट ऐकणाऱ्यांना असंच वाटतं. पण स्वतःला तिच्या जागी कल्पून जर आपण विचार केला, तर तिच्यापेक्षा अधिक उदारपणे आपण आचरण करतो की नाही, ते कळेल. आत्मनिरीक्षणाचा हा विषय आहे. ती चांदिशीच्या घरातली आहे. मोठ्या मानसन्मानानं ती . . ."

"अशा बाईनं असं कृत्य करू नये."

"अशा अजाण बालकाबरोबर."

"कोणाला माहीत कोणी त्याला पुढाकार घेतला ते ? मुलानं की बाईनं ?"

"तो तर शाळकरी पोरगा होता. तो तिला कशाला भाग पाडील ?"

"तीसुद्धा घरंदाज बाई होती. नवरा होता, एक मुलगा होता, दोन मुली होत्या. तीन मुलांची आई होती ती. तोही तिच्या मुलासारखाच होता."

"आपल्याला काय वाटतं, डॉक्टर ?"

"मलाही कळत नाही. पण माझ्या अनुभवावरून मी सांगतो की . . ."

"अशा बाबतीत आपण बरेच अनुभवी दिसता, डॉक्टर."

"स्वानुभवाची आवश्यकता नाही. आमच्याकडे जे रोगी येतात, त्यांच्या आजाराचं निदान करून पुस्तकांत लिहिलेली औषधं लिहून देऊन काहीही अनुभव मिळत नाही. पण एखादा माणूस आमच्यावर विश्वास ठेवून आमच्या सहवासात आल्यानंतर जेव्हा आजारी पडतो, तेव्हा तो कोणत्या परिस्थितीत आजारी पडला हे पाहिलं पाहिजे. तिथं नुसती औषधं देऊन भागणार नाही. त्याची शारीरिक अवस्था, खाण्या-पिण्याच्या सवयी, आणि मुख्य म्हणजे त्याचं मन—या सगळ्या गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. वैद्यक हे फार सखोल

शास्त्र आहे."

"असं पाहात बसलो, तर आपल्याला काहीच करता येणार नाही."

"नाही नं करता येणार. तीनचतुर्थांश लोक आमच्या सांगण्याप्रमाणे आहार घेण्याच्या स्थितीत नाहीत. बरं, ते राहू द्या. मला तर माझ्या रोग्यांकडूनच अनुभव मिळाला आहे," असे म्हणून कामेश्वर राव समुद्राकडे पाहू लागले.

"त्या लाटा, तो फेस, पाहिल्यात ? हे सगळे जर आजार असतील, तर त्यातल्या किती लाटा तुम्ही रोखू शकाल ? किती फेस बाहेर काढाल ?"

"मला लवकर जायचंय. गोष्ट संपवणार की नाही ?" नर्स बालम्माने विचारले.

"त्यानंतर ? त्यानंतर तो कनकय्या एक अजब प्राणी बनला. शाळेत शिक्षक काही म्हणत नसत. त्यांनी नुसतं 'कनकय्या' म्हणून त्याचं नाव घेतलं की आम्हाला हसू येई. त्याची किळस वाटे आणि काही लोकांना त्याची दयाही येई.

"कसं होतं यार ?—केलंस कसं ?" असे प्रश्न विचारून आम्ही त्याला छळत असू. तो वैतागून म्हणे —"अरे जा बाबांनो !"—दुसरं काय म्हणणार ? शारदाम्बेच्या घराचं तर नावच त्यानं टाकलं होतं.

मुलं त्याच्यामागून 'शारदाम्बा, शारदाम्बा' असं ओरडत धावत. गावात कोणी त्याला आपल्या घरी येऊ देईना. लवकरच तो आईबापांना सोडून कुठंतरी पळून गेला."

"परत नाही आला ?"

"नाही. दुसऱ्या दिवसापासून शारदाम्बेचा पती तिच्याशी कसा वागू लागला असेल, याची सहज कल्पना करता येईल. कातडं देणारा कर्ण आणि हाडं देणारे दधीचि यांचं काय झालं असेल, सांगता येत नाही, पण शारदाम्बेच्या पतीला खात्री होती की, कनकय्या वाचणार नाही आणि पत्नीचं शील लोकांपुढे उजळून निघेल. जानकी आगीत जळून गेली असती, तर श्रीरामाची काय दशा झाली असती ? आगीतून अर्धजळलेली सीता बाहेर आली असती, तर श्रीरामानं काय केलं असतं ? सगळ्या गावात तिच्याबद्दल उपहास आणि घृणा निर्माण झाली.

"काहीतरी निमित्त काढून शारदाम्बेला भेटायला जाणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली. लोकांच्या मनात तिच्याबद्दल इतके दिवस असलेली आदराची

व थोरपणाची भावना नष्ट झाली.

"एकाएकी ती ते गाव सोडून नाहीशी झाली. लोक म्हणाले ती बहिणीच्या बाळंतपणासाठी तिच्या गावाला गेली. पण ते बाळंतपण अजून संपलेलं नाही. तिचा मुलगा सुब्रह्मण्यम आमच्याबरोबर शाळेत शिकत होता. आमच्या बोलण्याला कंटाळून त्यानंही शाळेत येणं सोडून दिलं. गावात खेळणं-फिरणंही त्याला अशक्य होऊन बसलं. एवढंच नाही, तर दोन वर्षांनी त्याचे वडील आपली सगळी मालमत्ता थोडक्यात विकून टाकून मुलाला घेऊन कुठंतरी निघून गेले. दोन्ही मुलींची लग्नं होऊन तेव्हा त्या सासरी गेल्या होत्या, म्हणून बरं. नाहीतर त्यांची लग्नंही झाली नसती." एवढे सांगून कामेश्वर राव थांबले.

"संपली गोष्ट ?" तसं बालय्याने विचारले.

"हो."

"मग ही तीच माणसं आहेत का ?"

"इथं बाहेर उभी असलेली ती दुर्दैवी म्हातारी म्हणजेच शारदाम्बा. ते गाव सोडून गेल्यावर ते गरीब झाले. वडील लवकरच वारले. या मुलाचं लग्न झालं नाही."

"इतके दिवस त्याची आई कुठं होती ?"

"त्यात काय विचारायचंय ? हे सगळं आधीच ठरलेलं असणार. कनकय्या-बरोबर तिनं संसार मांडला असेल. तो मुलगा त्या म्हातारीला किती दिवस सांभाळणार ? मग लाचार होऊन कोणाच्या तरी घरी मोलमजुरी करीत राहिली असेल." मेडिकलचा विद्यार्थी नागय्या म्हणाला.

"काय लोक असतात, पाहा — एका लहान मुलाच्या लोभात पडून तिनं सगळ्या कुटुंबाची वाताहत करून टाकली."

"सगळेच लोक असे असत नाहीत. काही महात्मे जगाच्या उद्धारासाठी कधीकधी अशा प्रकारे अवतार घेतात."

"आता मुलाला भेटायला यायला तिला लाज वाटत नाही ?"

"कसंही असलं तरी, आईचं हृदय आहे — कळवळत असेल."

"त्या कनकय्याचं काय झालं असेल ?"

"सोडून गेला असेल. तो तरुण मुलगा या म्हातारीवर किती दिवस अवलंबून राहाणार ?"

"कनकय्याचे आई-बाप कुठं असतील ?"

"थोड्याच दिवसांत ते वारले," असे म्हणून कामेश्वर राव तिथून निघाले.

"आपल्याला कनकय्या पुन्हा कधी दिसला नाही ?"

"दिसला का नाही ? कनकय्या मी स्वतःच आहे." असे म्हणून डॉक्टर व्हरांड्याच्या वळणावरून निघून गेले.

मिनीटभर सगळे अवाक् झाले. मग ते पाचही जण झटकन उठून डॉक्टर कामेश्वरांजवळ गेले आणि त्यांनी त्यांना घेरले.

"हे खराय्, डॉक्टर ?"

"खरं आहे."

सगळी जणं त्यांच्या अवतीभवती उभी राहिली आणि ती त्यांना जाऊ देईनात.

"आता खरं सांगा डॉक्टर, खरं काय घडलं ?"

"काय झालं ? कसं झालं ?"

"काय कसं झालं ?"

"तेच, तुम्ही आजारी कसे झालात, ते ?"

"माझ्या अंगठ्याला ठेच लागली, तिथं सेप्टिक झालं आणि मला ताप आला."

"म्हणजे, तो दोषगुण नव्हता ?"

"नाही."

"म्हणजे तिनं काही केलं नव्हतं ?"

"तिनं काय केलं, माहीत नाही; पण माझ्याशी काही केलं नव्हतं. मेडिकल कॉलेजात गेल्यानंतर विद्यार्थिनी माझ्यावर खूष होऊ लागल्या. तोपर्यंत स्त्रीशी माझा काहीही परिचय नव्हता. तसा मी फार संकोची आहे."

"म्हणजे तिला काही माहीत नाही ? अजिबात माहीत नाही ?"

"बापडीला काही माहीत नाही."

"मग आपला आजार बरा कसा झाला ?"

"तिच्यावर इतका अन्याय होत असताना आपण गप्प कसे राहिलात ?"

"खरं काय [झालं, त्याचा मला पत्ताच नव्हता. सगळा गाव आपला शत्रू बनलाय, एवढंच मला कळत होतं. माझी आई माझ्या आजारावरच्या उपाया-

बद्दल माझ्याशी काहीतरी बोलत असे, पण ते माझ्या नीट लक्षात येत नव्हतं. शारदाम्बेनं स्वतःच्या मांडीतून रक्त देऊन माझे प्राण वाचवले, असं मला कळलं, तेव्हा तिच्याबद्दल माझ्या मनात भक्तिभाव दाटून आला. असं रक्त द्यायला कोणतीही स्त्री तयार झाली नसती, आणि इतका अपूर्व त्याग करणाऱ्या शारदाम्बेची आपण पूजा केली पाहिजे, असं मला वाटू लागलं. तेव्हापासून अजूनपर्यंत मी तिला आदर्श स्त्री मानतो. लोकांबद्दल तिच्या मनात असणारी कणव, तिचा शिष्टाचार, अतिथी-सत्काराची वृत्ती, नम्रता, औदार्य – सर्व गुण असणारी आदर्श हिंदू गृहिणी आहे ती. आजारातून बरा होताच मी तिच्याकडे गेलो–आपलं सगळं जीवन तिच्या चरणी अर्पण करण्याचा विचार होता माझा. पण मला पाहिल्याबरोबर भूत दिसावं तशी ती भयभीत झाली आणि तिनं झटकन दार लावून घेतलं. मी दुखावलो. इतका खोलवर दुखावलो की, त्या गावात राहावंसं मला वाटेना. माझ्या शिक्षणासाठी पैशाची मदत मिळणंही बंद झालं. कोणी मला आपल्या घरात येऊ देईना. आई-बापही मला पाण्यात पाहू लागले."

"मग आपण नंतर तिचा शोध नाही घेतलात?"

"कसा घेणार? त्याआधीच मी काशीला निघून गेलो आणि नाव बदलून धर्मशाळेत राहून शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर ती आताच मला दिसते आहे."

"आता आपण पुन्हा तिच्याशी बोलला नाहीत?"

"तिनं मला ओळखलं नाही. जेव्हा मी माझी ओळख दिली, तेव्हा किंचाळून ती पळून गे !"

"आपल्यावर ती इतकी नाराज का?"

"त्यात नवल काय? माझ्यामुळेच तिच्या आयुष्याची वाताहत झाली. माझ्या बडबडण्यानंच हे सगळं झालं!"

"आपण का बडबडत होतात?"

"आता मी कसं सांगू? तिच्याबद्दल माझ्या मनात अतिशय आदर होता. तिला मी देवीचा अवतार समजत होतो. तिचं नाव घेतल्यानं आपला आजार बरा होईल, अशीही कदाचित तेव्हा माझी भावना असावी"

"मग पुढची सगळी गोष्ट आपल्याला कशी समजली?"

"पुढे मी त्या गावी जाऊन तपास केला," असे म्हणून डॉक्टर कामेश्वर

राव आपल्या वॉर्डमध्ये निघून गेले आणि बाकीचे लोकही आपापल्या कामाला गेले.

"ही सगळी कहाणी मी पडद्यामागून ऐकत होतो. ती ऐकल्यानंतर समुद्राकडे पाहात मी विचार करू लागलो – जीवनाचा आणि जीवनात येणाऱ्या या आपत्तींचा अर्थ काय ? त्या लोकांच्या जीवनाची अशी धूळधाण का झाली ? त्या साध्वीनं केलेले पूजा-पाठ, घातलेली ब्राह्मण-भोजनं या सगळ्यांचं काय फळ मिळालं तिला ? कोणा एका दुर्दैवी विद्यार्थ्याला दया दाखवल्यानंच तर तिचा असा सर्वनाश झाला. तिच्यामुळे तिच्या पतीला व मुलालाही त्याचं फळ भोगावं लागलं. इतकी वर्षं तिचे काय हाल झाले, तिनं किती यातना सहन केल्या, कोण जाणे. माणसं कुत्री आहेत–मालकानं पोटावर का मारलं याचं कारण समजून न घेताच त्याच्यावर निष्कारण भुंकणारी कुत्री आहेत ही ! हे सगळे अत्याचार कोण करतंय ? मानव की ईश्वर ?

"समाज – समाज करतोय हे सगळं ! आजकाल सगळ्या लेखकांनी याच समाजावर टीकेची झोड उठवली आहे. समाज म्हणजे आम्ही लोकच. आपण काय करायला पाहिजे ? कसं बदलायला पाहिजे ? ज्या लोकांनी त्यांना त्या गावात राहू दिलं नाही, तीदेखील आपल्यासारखीच माणसं होती.

"पण त्या दिवशी शारदाम्बा निरपराध आहे हे सिद्ध करायचं धाडस कोणी केलं होतं का ? एवढ्या उच्च कुलातील स्त्रीने एका लहान मुलाशी असा घृणास्पद व्यवहार केला तर तिचा तिरस्कार करण्यात लोकांची काय चूक होती ? काहींच्या मते हा व्यभिचार हे चुकीचे कृत्य नसेलही, किंवा तो उत्कृष्ट गुण मानला तर बाकी वाईट गोष्टींचं काय ? चांगल्या–वाईटातलं अंतरच नष्ट झालं तर समाज आणि संस्कृती यांना आधार कोणता राहील ?

"असं जीवन चाललंय. याला प्रारब्धाशिवाय दुसरं काय नाव देता येईल ? आणि असंच असेल, तर भाग्य म्हणून काही चीजच नाही ईश्वर नाही, न्याय नाही, सत्य नाही, हे जग म्हणजे एक चेतनाहीन आंधळा योगायोग आहे. समोरच्या त्या समुद्रात पाणी नेहमी खळाळत असतं. त्याचे काही थेंब उन्हात चमकतात, काही पायावर आपटून फुटून जातात, काही वाळूत सुकून जातात तर काही समुद्रात विलीन होतात. माणसांचंही असंच होतं, आणखी काय म्हणायचं ?

"अशा प्रकारे जीवनाचा अर्थ शोधणंच कदाचित अविचाराचं ठरेल. पण ज्यांना हृदय आहे, ते असा विचार न करता केवळ उदासीन कसे राहू शकतील? इतकी युगं विचार करूनदेखील त्यांना सत्य समजलं नाही? मग काय फायदा? उदारमनस्क व्यक्तींचा मेंदू थकून जातो आणि कोणत्या तरी मर्यादेपाशी एखाद्या सिद्धान्तावर संतुष्ट होतो. काही निश्चित सिद्धान्त प्रामाणिक मानून विचारशाखा संपवली नाही, तर शान्ती मिळणार नाही. तरीदेखील शंका राहतातच. फक्त एवढंच जाणून घ्यायचंय असं जे लोक म्हणतात, ते अगदी आळशी, दुर्बळ आहेत. काही सत्य असेलही. आम्हाला ते कळत नसावं किंवा आम्ही कधी ते समजूही शकणार नाही. पण आपल्याला सगळं कळलं आणि आता समजून घेण्यासारखं काही राहिलेलंच नाही, असं म्हणणं माझ्या मते केवळ आळसाचं लक्षण आहे.

पस्तावा नाही

—बुच्चि बाबू

कमलम्माने मला पुन्हा दोन साड्या विकत आणायला सांगितल्या. गेल्या वेळी मी ज्या साड्या नेल्या होत्या त्या तिच्या मैत्रिणींना फार आवडल्या होत्या म्हणे. कोणाला कोणती साडी खुलून दिसते, हे मला फार चांगले कळते, असे त्यांना वाटते. साड्यांचे वैशिष्ट्य, प्रकार, बनावट, काठाचे मॅचिंग हे सगळे मला जितके चांगले कळते, तितके कोणाला समजत नाही. खरे सांगायचे म्हणजे, मला या गोष्टींची काही खास माहिती नाही. त्यात खोट्या अभिमानाची गरज नाही. या गोष्टींची मला बिलकुल माहिती नाही हे मी मान्यच करतो. महाभारतात कोण्या एका प्रसंगाने धर्मराज धर्माच्या रूपाने प्रसिद्ध आला. मग लक्षात आलं की, हे यश टिकवण्यासाठी त्याला बरेच कष्ट सोसावे लागले. दुसरे लोक आपल्याला नीट समजून घेत नाहीत तेव्हा आपल्याला नाना अडचणींना तोंड द्यावे लागते. ते आपल्याला पूर्णपणे समजून घेतील, तर न जाणो आणखी किती त्रास होईल. काही लोकांबद्दल काही समजुती होऊन जातात. त्या समजुतींनुसार वागण्याचा ते लोक प्रयत्न करतात, आणि आपल्याबद्दलची लोकांची समजूत चुकीची नाही, हे सिद्ध करण्यासाठी कधी कधी त्यांना तसे नाटकही करावे लागते.

मला साड्यांतले चांगले कळते असे कमलम्माने म्हटल्यापासून साड्यांच्या दुकानात चकरा मारणे मला अटळ होऊन बसले. खरेदीदार म्हणून दुकानात जाणे, तऱ्हेतऱ्हेच्या साड्या काढायला लावून पाहाणे, कोणती साडी कोणाला चांगली दिसेल याचा अंदाज घेणे, त्यांचे भाव, त्यांची पेठ आदींची माहिती मिळवणे — हा माझा परिपाठच बनून गेला आहे.

शहरातले माझे काम संपवून कमलम्मासाठी साड्या खरेदी करण्यासाठी मी दुकानात शिरलो, तेव्हा संध्याकाळचे चार वाजले होते. दुकानदाराने तऱ्हेतऱ्हेच्या साड्या माझ्यापुढे पसरून त्यांचे वर्णन सुरू केले. पंधरा-वीस मिनिटे लक्षपूर्वक पाहूनही त्यांतल्या कोणत्या साड्या चांगल्या आहेत, त्याचा

मला निर्णय करता येईना. तशी तर प्रत्येक साडी चांगली आहे—पण गंमतीची गोष्ट अशी की, जास्त किंमतीची साडीच सगळ्यांत चांगली वाटते. या साड्या पाहिल्यावर आपल्या देशातल्या कारागिरांच्या कौशल्याची कल्पना येऊन किती आनंद होतो. पूर्वीच्या काळात तर याहून अधिक कुशल कारागिर होऊन गेले असतील. आगपेटीतून साडी काढून नेसणारी मुमताज बेगम, झांशीची लक्ष्मीबाई, आणि प्राचीन काळातील गार्गी, मंदोदरी, दमयंती आणि साड्यांच्या प्रसंगात सर्वात आधी आठवणारी द्रौपदी या लावण्यमूर्तींची आठवणच किती आनंददायक आहे. साड्यांचे डिझाइन आणि छपाईचे कौशल्य पाहिल्यावर ती कल्पना प्रथम सुचणाऱ्यांचे आणि तिचा प्रसार करणाऱ्यांचे कौतुक करणे जास्तच सुखकारक असते. पण दुकानदार आपल्या चेहऱ्याकडे पाहून वैतागून जेव्हा म्हणतो, 'काही घ्यायचंय की नाही, साहेब?' तेव्हा आजीने बनवलेल्या चिंध्यांच्या गादीतून निघणाऱ्या फाटक्यातुटक्या जुन्या कपड्यांप्रमाणे आपल्या सगळ्या कल्पनांच्या चिंध्या उडतात!

खरे म्हणजे आजही तेच झाले. दुकानदार कंटाळला आणि दुसऱ्या गिऱ्हाईकाला माल दाखवण्यासाठी दुसऱ्या बाजूला गेला. मुमताज बेगम, झांशीची लक्ष्मीबाई, गार्गी, मंदोदरी, दमयंती, द्रौपदी यासारख्या महिला तिकडे 'हे पाहिजे', 'ते पाहिजे,' 'हे नको, ते हवे' असे म्हणत आपापल्या आवडीनुसार साड्या निवडताहेत. त्यांची गोष्टच वेगळी. त्या पाहिजे ते म्हणू शकतात. सुवर्णकांती आहे त्यांच्या देहांना. . .कोणतीही साडी त्यांना खुलून दिसेल. पण कमलम्मा काळी आहे. काळी म्हणण्यापेक्षा सावळी म्हणणे बरे, ती नाराज होणार नाही. त्यामुळेच भडक चटपटीत रंगांच्या साड्यांऐवजी फिकट रंगछटा असलेल्या साड्या बाहेर काढायला लावून मी पाहू लागलो. इकडेतिकडे पाहिले तर बरेच स्त्रीपुरुष दिसले. त्या गर्दीत मोठ्या मुष्किलीने दुकानदाराला हेरून मी जवळ बोलावले आणि साड्यांच्या ढिगाऱ्यातून एक साडी काढून जवळ उभ्या असलेल्या व्यक्तीकडे न पाहाताच मी सहजपणे विचारले, "ही साडी बरी आहे का ?"

"यापेक्षा ती सिमेंट कलरची साडी चांगली आहे," ती व्यक्ती उत्तरली. मी चपापलो. मागे वळून पाहिले. ती एक स्त्री होती. वाटले, क्षमा मागावी. पण माझ्यापेक्षा लहान असणाऱ्यांची क्षमा मागणे मला बरे वाटत नाही.

ती स्त्री विशीच्या आतली दिसत होती.

"नाहीतर ती तपकिरी रंगाची साडीदेखील चांगली आहे," ती पुन्हा म्हणाली. तिने पसंत केलेली साडी न घेणे मला ठीक वाटले नाही पण कमलम्माला तपकिरी किंवा सिमेंट रंगाच्या साड्या शोभत नाहीत.

"काळ्या रंगाच्या माणसाला या बऱ्या दिसतील ?"

"माझ्यापेक्षा काळ्या ?" ती काळी नाही, गोऱ्यांतच जमा होण्यासारखी आहे.

"वा ! . . .आपला रंग तर. . .आपण. . ." तिच्याशी कसे बोलावे तेच मला कळेना. ती हसली.

"फार काळ्या समजा !" म्हणताना मला हसू आले.

"कोणासाठी नेताय या साड्या ?" तिने विचारले.

"कमलम्मा नावाची आमची एक आप्त स्त्री आहे."

बायकांना सौदा करायला कितीही वेळ लागला, तरी दुकानदार कंटाळत नाही. तो झटकन आमच्याजवळ आला. ती मोकळेपणाने बोलू लागल्याने मला थोडा धीर आला.

"तुम्ही नेसलेली साडी फार छान आहे," असे म्हटल्याने बायका फार खूष होतात, हे मला माहीत आहे.

"ही साडी. . .!" तिने आपल्या साडीकडे पाहिले." ही मी मद्रासला घेतली होती. जुनी झाली आता."

"मला वाटतं, अशा साड्या इथं मिळत नाहीत," मी पुटपुटलो.

थोड्याच वेळात तिने दोन साड्या पसंत केल्या आणि दुकानदाराला बिल आणायला सांगितले.

"काही निर्णय होत नाही. तुम्हीच नक्की करा साड्या. तुम्हाला या गोष्टींची चांगली माहिती दिसते." माझ्या या बोलण्यावर ती अभिमानाने हसली.

"मग तुम्ही त्या कमलम्मालाच दुकानात का आणीत नाही !"

"कमलम्मा इथं राहात नाही – आपण ?"

"मीही इथली नाही."

शेवटी तिने दोन साड्या निवडून दिल्या. कमलम्माच्या नाराजीची पर्वा न करता ती सिमेंट रंगाची साडीही मी घेऊन टाकली. तिने रुबाबात मान

हळूहळू गर्दी पांगली. बाकीचे पैसे घेण्यापूर्वी मी सहज तिच्याकडे पाहू लागलो. खरे म्हणजे स्त्रियांशी बोलण्याच्या बाबतीत मी फार लाजाळू आहे. परक्या स्त्रियांपुढे तर मी आणखीनच लाजून चूर होतो.

पण तिच्या सरळपणातून व्यक्त होणारा आपलेपणा, 'माझ्याशी मोकळे-पणानं बोलू शकता' असे निमंत्रण देणारा आर्जवीपणा, पारखून किंमत करण्याची वृत्ती आणि अपरिचित यौवनाची लागलेली चाहूल — तिच्या या वैशिष्ट्यांनी मला आकर्षून घेतले आणि मी सहजपणे गप्पा मारायला तयार झालो. जोपर्यंत मी बोलत होतो, तोपर्यंत ती दिसायला सुंदर आहे की नाही, इकडे माझे लक्षच गेले नाही.

"ब्लाऊजसाठी कापड काही घेणार?" तिने विचारले.

मी वळून तिच्या खांद्याकडे पाहिले. दोन-तीन माळा दिसल्या. लाल रंगाच्या साडीच्या पदराने खांदा झाकून तिने तो मागे टाकला.

"यातलं तुम्हाला कोणतं पसंत आहे?" काही कपडे दाखवीत तिने विचारले.

गर्दी कमी झाली.

दुकानातल्या घड्याळाने अर्ध्या तासाचा टोला दिला. साड्यांची पिशवी हातात घेऊन मी दारापर्यंत पोचलो, तेव्हा थोड्या वेळापूर्वी पडणारा पाऊस आता जोरात कोसळत होता. तीदेखील माझ्याबरोबर आली.

"या पावसात कसं जायचं?"

"मीही तोच विचार करतेय." दुकानदाराने आणून ठेवलेल्या खुर्चीत ती बसली.

"आपण?"

"ठीक आहे."

"आपण काय करता?"

"काही नाही. कधी कधी गोष्टी लिहितो."

"अस्सं!" ती आश्चर्याने म्हणाली. पण मला मी असे सांगितल्याचा पश्चात्ताप वाटू लागला. गोष्टींबद्दल अपरिचित व्यक्तींशी, आणि त्यांतही स्त्रियांशी चर्चा करणे मला आवडत नाही. "आपलं नाव मी कधी ऐकलं नाही. खरं म्हणजे मी कधी वाचीतच नाही...अभ्यासाची पुस्तकं वाचण्यातच सारा वेळ जातो."

मी सुटकेचा श्वास सोडला.

"गोष्ट म्हणजे कादंबरी का ?"

"खूप मोठ्या गोष्टीला कादंबरी म्हणतात."

माझी तिने बरीच चौकशी केली. स्वत:बद्दलही बरेच काही सांगितले. आम्हा दोघांत साम्य असणारी एकही गोष्ट नाही. आमच्या वडिलांचे व्यवसाय भिन्न आहेत. तिला आई-वडील नाहीत. मोठा भाऊ वकील आहे. त्याच्याच जवळ ती राहाते. आपल्या आईबद्दल ती बरेच बोलली. आणखी गप्पा वाढण्यापूर्वीच पाऊस थांबला. ती उठून उभी राहिली. मीही निघालो. त्याच क्षणी तिने एक नाजुक प्रश्न विचारला—

"आपलं लग्न झालंय ?"

"नाही."

आम्ही रस्त्यावर आलो. बाहेर हवा थंड आहे. थंडीमुळे पक्ष्यांचे आवाज कापरे येतात, ते स्पष्ट जाणवते.

"आपलं ?" मी हळूच विचारले.

मला कॉफी घ्यायची इच्छा झाली. मी ती बोलून दाखवली. तीदेखील माझ्याबरोबर कॉफी घ्यायला तयार झाली. आधी मला भय वाटले, पण अंधारामुळे धीर आला. कोणी आम्हाला पाहिले तरी काय ? हे काही आमचे गाव नाही.

आम्ही हॉटेलात एका कोपऱ्यात जाऊन बसलो.

"तुम्ही तुमच्याबद्दल सांगितलं नाही," मी मघाच्या प्रश्नाची आठवण दिली.

"नाही," असे म्हणून कदाचित लज्जेमुळे असेल, आपल्या खांद्याकडे पाहात ती हसली. मी तिच्याशी बोलतोय खरा, पण माझे डोके ठिकाणावर नाही. कोणत्याही गोष्टीत आमच्यात साम्य नव्हते, पण लग्नाच्या बाबतीत आम्ही एक झालो. आम्ही दोघेही अविवाहित आहोत, हाच दूरवर दिसणाऱ्या आमच्या स्नेहमंदिराचा पाया आहे.

यानंतर आम्ही स्तब्ध झालो. बोलायला काही सुचलेच नाही.

"काय घेणार ?"

"घेतलं की !"

"काय घेतलं ?"

"साड्या !"

"ते नव्हे. खायला काय घेणार, विचारतोय मी !"

"असं ! नको मला, काही नको," ती हसली. सुंदर दंतपंक्ती. नेहमी हसतमुख . . . टुथपेस्टच्या जाहिरातीतील स्पर्धेसाठी हिची हसरी चित्रे खुशाल पाठवून द्यावी !

"आणि तुम्ही ?"

"मी काय ?"

"काही घेणार नाही ?"

"अच्छा, अच्छा," हसत हसत मी हातरुमालाने दात झाकले. माझा एक दात थोडा मागे आहे. यानंतर थोडा वेळ आम्ही गप्प बसलो. बैरा कप-बशा उचलून घेऊन गेला. तो काळा आहे. डोक्यावर लाल रंगाचा फेटा. अजिंठ्याच्या अंधाऱ्या गुहेत, भिंतीवरील चित्रात राजाच्या पायाजवळ झुकलेला मुलगाच जणु हा !

मी बिल दिले — आम्ही बाहेर पडलो. पायी निघालो. थोडे चालून गेल्या-वर–तिथे दुसरा रस्ता फुटला होता.

"आपण मदत केली नसती, तर साड्यांची निवड इतक्या लवकर आणि इतकी समाधानकारक झाली नसती," बोलायचे म्हणून मी बोललो.

"मला 'आपण' काय म्हणता ? मी आपल्यापेक्षा लहान आहे. 'आपण' म्हणु नका."

लहान-मोठेपणाचा हा वाद चाळिशी ओलांडणाऱ्यांसाठी आहे. वयाचा हिशेब करणारी माणसे त्यात पडतात तसतशी ती तारुण्यापासून दूर जातात.

तिने तिचे नाव सांगितले, "कमला."

"आमच्या कमलम्माचं आणि आपलं. . .नाही, तुमचं नाव एकच आहे. गंमत आहे, नाही ?"

मी माझ्या शहराचे नाव सांगितले.

"आमचं गाव तिथून जवळच आहे," ती म्हणाली. ती इथे कॉलेजात शिकते. सुट्टी लागली म्हणून गावाला जाण्यापूर्वी काही साड्या खरेदी करण्या-साठी इथे आली आहे. एका दुकानात तिला बोलावून तिची मैत्रिण मात्र तिथे आलीच नाही. तिचे काय झाले कोण जाणे !

तिचा धाकटा भाऊ मद्रासच्या कॉलेजात शिकतो. ती इथे आणि धाकटा भाऊ तिथे. वेगवेगळ्या कॉलेजात का शिकता, म्हणून मी विचारणार होतो, पण या गोष्टींशी मला काय करायचे? संबंध नाही तर का विचारणार होतो? मला काहीच कळत नव्हते.

मला वाटले, कदाचित ती तिच्या घरी मला बोलावील. पण तिने असे काही केले नाही.

"आपल्या गावात आपलं घर कुठं आहे?"

मी घराचा पत्ता व्यवस्थित सांगितला.

"बराय्, मी निघतो..." मी म्हटले. तिने माझ्याकडे विलक्षण आर्तपणे पाहिले. आपल्या हृदयातली व्यथा आणि ओठावरचे शब्द आतच रोखून ती म्हणाली, "कमलम्माला माझा नमस्कार सांगा." आणि ती निघून गेली.

मी तिथेच उभा राहून पाहात राहिलो. जाता जाता तिने तीनदा वळून माझ्याकडे पाहिले.

वेणी साडीत मिसळली, नंतर दोन्ही अंधारात मिसळल्या व थोड्या वेळाने ती दिसेनाशी झाली. माझे डोळे भरून आले. मला वाईट वाटले. मी खोटे बोललो–माझे लग्न झाले नाही म्हणून सांगितले–त्या भोळ्या-भाबड्या स्त्रीशी असे खोटे बोलण्यात माझा काय हेतू होता तेच मला कळेना. बाकी सगळे मी खरे सांगितले होते. मग याच बाबतीत असे का झाले? ऐन वेळी माझी तर्कबुद्धी जड होऊन गेली. माझा विचार न घेताच माझ्या पंचें-द्रियांनी मला खोटे बोलायला भाग पाडले. बस. भाषेची किंमत एवढीच. याचा अर्थ असा की, माझ्या शरीरावर माझा जेवढा ताबा आहे, तेवढा माझ्या विचारावर नाही. मी लज्जित झालो. स्वतःचाच मला राग आला. मला अविवाहित समजून ती माझ्याशी निःसंकोचपणे बोलेल, एवढ्याच विचाराने मी तसे सांगितले होते का? खरे सांगून मला ते साधता आले नसते? तिला खरोखरच मी आवडलो असेन आणि तिला माझ्यावर प्रेम करायचे असेल, तर माझी पत्नी त्या प्रेमाआड आली असती काय? मग मी खोटे का बोललो?

माझ्या व्यक्तित्वाने जगापुढे आपली पराधीनता मान्य करण्याच्या अनिच्छेतून बंडखोरीच्या भावनेने तर मला खोटे बोलायला नाही ना लावले? अविवाहित

पुरुष स्वतःला स्वच्छंद समजतो. आपल्यापासून स्त्रीला ताजेपणा, गाढ आणि पवित्र प्रेम मिळेल असे त्याला वाटते. विवाहानंतर हा ताजेपणा, हे स्वातंत्र्य नष्ट होऊन जाते--आणि स्त्री-जगाशी असलेले त्याचे प्रेमाचे बंधन तुटून जाते. या निराधार समजुतीचा उपहास करण्यासाठीच जणु मी खोटे बोललो. लग्न होऊन एक तर वर्ष झाले आहे. एक वर्ष नाही, एक दिवस जरी झाला तरी विवाहित माणसाला अविवाहित कसे मानता येईल ?

खोटे बोलल्याने ती स्त्री खूष होऊन मला अधिक मोकळेपणाने बोलण्याची मुभा देईल, असेही कदाचित मला वाटले असेल.

शिवाय, आयुष्यात पुन्हा आपली कधी गाठ पडणार नाही, अशी माझी पूर्ण खात्री होती. तेव्हा थोड्या वेळासाठी खोटे बोलून तिचे मन प्रसन्न करण्यात मला फारसे गैर वाटले नाही. माणसाला त्याच्या वर्तनाची प्रेरणा हृदयाकडून मिळते, आणि वर्तन घडून गेल्यावर त्याच्या औचित्याचा विचार करणे डोक्याचे काम आहे. हृदयाने म्हटले, खोटे बोलून का होईना, तिला प्रसन्न ठेव. इंद्रियांनी या सूचनेला अनुमोदन दिले.

पण माझी विवेकबुद्धी हे मानायला तयार नाही. ती मला सतावते आहे. कमला किती निष्कपट आहे, उत्साही आहे! तिच्या तुलनेत मी किती धूर्त आहे. आपल्या विवेकबुद्धीची समजूत घालायला मला बराच वेळ लागला. कमलाची आणि माझी आता गाठ पडायची नाही. पडली तरी या सगळ्या गोष्टी कुठे लक्षात राहाणार आहेत ? नाही तर मी सांगेन, नंतर माझे लग्न झाले म्हणून. घरी पोचल्यावर मला स्वतःचा आणखीनच राग येऊ लागला. माझी पत्नी कमलापेक्षाही सुंदर आहे. हे सगळे कशासाठी ? माझा हेतू काहीही असो--खोटे बोलणे चूकच होते. परिणामी या विचाराने मी पुढे काही महिने बेचैन होतो. झालेल्या अपराधापेक्षा नंतर त्याबद्दल होणारा पश्चात्ताप अधिक दुःखदायक असतो.

एक वर्ष लोटले. उन्हाळ्याचे दिवस आहेत. मी झोपेतून जागा झालो, तेव्हा चार वाजले होते. मला उठवले नसते तर मी आपणहून जागा झालोच नसतो. रंगय्या मला उठवून म्हणाला, "साहेब, बाहेर आपल्याकडे कोणी आलंय."

"कोण आहे रे ?"

"कोणी माणूस दाराशी आपली चौकशी करतोय."

आत जाऊन मी तोंड धुतले. मग टॉवेलने तोंड पुसून फ्लास्कमधली कॉफी ओतून घेऊन पिऊ लागलो. रंगप्पा दाराजवळच उभा आहे. तो सांगतो :

"मी म्हटलं, साहेब आत बसले आहेत. तशी तो माणूस त्या गल्लीशी उभ्या असलेल्या गाडीजवळ गेला. त्या गाडीतून कोणी बाई उतरल्या आणि सरळ अंगणाजवळच्या आपल्या खोलीत जाऊन बसल्या. तो माणूस आपल्याबरोबर एक करंडीभर फळं घेऊन आला आहे. त्यात आंबे आहेत. साहेब—ती करंडी इथं ठेवून तो माणूस परत गाडीकडे गेला."

"बाई कुठं आहेत ?"

"अंगणाजवळच्या खोलीत बसल्या आहेत, साहेब."

"अरे, मी आपल्या बाईबद्दल विचारतोय."

"बाईसाहेब, मंदिरात गेल्या आहेत."

ही कोण आली असेल ? हृदय जोराने धडधडू लागले. किती वेळ झाला ? कुठं आहे ? असे म्हणत मी बाहेर आलो. तिथे कमला बसली आहे. नाडी [illegible] आहे, ती थांबावी म्हणून मी मूठ घट्ट आवळून धरली. शंभर विंचवांनी [illegible] झाली होती माझी अवस्था.

[illegible] असेल ? बाकी सगळे विसरली असेल, पण ती गोष्ट जरूर लक्षात असेल. आणि आता माझ्या खोटच्या बोलण्याचा पत्ताही तिला लागला असेल. कारण बाहेरच्या टेबलावरच आमचा लग्नानंतरचा फोटो ठेवलेला आहे. फोटोग्राफरने आपल्या यशाची जगभर जाहिरात करण्यासाठी आपले नाव, आपल्या दुकानाचे नाव, फोटो काढल्याचा दिनांक, महिना आणि वर्ष हे सगळे मोठमोठ्या आकड्यांत आणि अक्षरांत छापून फोटोचा अर्धा भाग झाकणारे कार्ड त्यावर लावले आहे. भिंतीवर आणखी काही चित्रे आहेत. हिंदी चित्रपटातले तारे, काँग्रेसचे पहिले अध्यक्ष, रवीन्द्रनाथ ठाकूर आदींच्या तसबिरींबरोबरच पोट्टी श्रीरामुलूचे चित्र असलेले कॅलेंडरही आहे

"कधी आलात ? किती वेळ बसलात ?" वर्तमानपत्राचा कागद मिळाला, तर फोटोचा तो दिनांकवाला भाग लपवावा या दृष्टीने मी इकडे तिकडे पाहू लागलो.

"या गावात आमची चुलती असते नं. धाकट्या भावासाठी मुलगी पाहायला आम्ही इथं आलो."

"असं !"

वर्तमानपत्र किंवा कागद मिळेना. आणि आता काही करून उपयोगही नव्हता. तिने फोटोवरचा दिनांक पाहिला असेल अशी शंका मला यावीच का? आणि पाहिला असला, तरी तो फोटोग्राफरचे दुकान सुरू झाल्याचा दिवस म्हणून सांगता येईल.

मी रंगन्नाला कॉफी आणायला सांगितले.

"असू दे—मी घेऊन आलेय."

"घ्या हो, कॉफी तर आहे! काय, मुलगी पसंत पडली?"

"मुलाला पसंत पडली पाहिजे नं."

"बरोबर आहे."

"आपली इतक्या लवकर भेट होईल, असं वाटलं नव्हतं मला," असे म्हणून ती हसली.

"हो नं, इतक्या लवकर...पृथ्वी तर गोल आहे!"

'ही साडी त्याच दिवशीची आहे."

"होय, तीच. फार छान आहे. आपल्याला तर सांड्यातलं चांगलं कळतं." गेल्या वेळचेच मी पुन्हा बोललो.

"माझं नाव विसरलात?"

"नाही, नाही...कमला."

"मग 'आपण' काय म्हणताय?"

दोघेही हसलो.

जवळ ठेवलेल्या आंब्याच्या करंडीकडे पाहिले.

"आंबे आहेत?"

"हो, आंबे आहेत."

"आणले आहेत?"

ती हसली.

मग भिंतीवर तिने नजर टाकली.

"ही साडीदेखील खूप छान आहे, कमलम्मा इथेच राहातात काय?" असे म्हणत हँगरवर टांगलेल्या निळ्या रेशमी साडीकडे तिने पाहिले.

जे व्हायचे तेच झाले. माझ्या कोटाजवळच हँगरवर बायकोने साडी टांगली

आहे. मला तिचा राग आला. साडी सगळ्यांना दाखवण्यासाठी म्हणून तिने बाहेरच्या खोलीत माझ्या कोटाजवळ टांगली असावी. आत एक कपाट आणि दोन ट्रंका आहेत. तिथे जणु साडी ठेवायला जागाच मिळाली नाही ! म्हणतात ते खरे आहे : गृहिणी स्वतःच्या नट्टापट्टयात व्यग्र राहून घराच्या सजावटीकडे अजिबात लक्ष देत नाहीत.

"ती . . . ती . . . ती नाही ना."

"म्हणजे ? ती साडी नाही ?"

"नाही, नाही . . . ती कामलम्माची . . . म्हणजे . . . नाही आहे !" दुसऱ्यांदा खोटे बोलण्यात अर्थ नाही हे एव्हाना माझ्या लक्षात आले. खरे ते कळणार— दुखापत होणारच. त्यासाठी तयार राहाणेच ठीक.

"तुम्हाला कदाचित माहीत नसेल . . . अलिकडेच . . ."

"कोणी नव्या नात्याची . . ."

मला आणखी राग आला. गप्पा करण्यासाठी लाखो विषय असताना याच साडीबद्दल पुनःपुन्हा खोदून खोदून विचारण्यात स्त्रीस्वभावाचा कोतेपणाच दिसून येत होता.

"दुसरी कोणी नाही . . . ती माझ्या पत्नीची आहे." एवढे बोलून मी तिच्यावरून नजर काढून टेबलावरचे कापड बोटाभोवती गुंडाळू लागलो. तिने आश्चर्य कसे प्रकट केले, ते मी पाहिले नाही.

"तुमची . . . पत्नी . . ." असे म्हणत तिने माझ्याकडे बोट दाखविले.

"त्यात नवल कसलं ?

"मला तर तेव्हा सांगितलं नव्हतंत. उलट म्हणाला होतात, असं काही नाही म्हणून." समोर फोटो पाहून आणि खरी गोष्ट कळूनही जणु काही माहीत नाही असे दाखवून तिला माझ्या तोंडून हे वदवायचे आहे. यात तिला काही दाखवायचे आहे की आपल्या मनाला भिडलेले दुःख व्यक्त करायचे आहे, ते कळत नाही. माझे लग्न नुकतेच झाले आहे असे मी सांगितले तरी तिचा विश्वास बसणार नाही, कारण सासरी नव्याने आलेल्या स्त्रियांच्या साड्या बाहेरच्या खोलीपर्यंत येत नाहीत. आता खरेच सांगायचे तर सगळेच खरे सांगणे बरे.

"हो, खरी गोष्ट आहे."

"काय खरी गोष्ट आहे ?"

"आलं आहे. झालं आहे."

"का ?"

"सगळ्या तरुण मुलींचं होतं असंच !"

"ते विचारत नाही. त्यावेळी तसं का सांगितलंत ?"

"का सांगितलं, समजत नाही. त्यावेळी तसं म्हणावंसं वाटलं होतं."

"आश्चर्य आहे."

"तुम्हाला माहीत आहे."

"सगळं काय माहीत ?"

रंगय्यानं कॉफी टेबलावर ठेवली. कमला म्हणाली, "मी नाही पिणार."

"बरं मग आता काढून देतो," असं म्हणत मी आंब्याची करंडी माझ्याकडे ओढली. कमलाने ती स्वतःकडे ओढली. मी रंगय्याला पान आणायला बाहेर पाठवलं. कमला उठून बाहेरच्या दाराजवळच्या खुर्चीत जाऊन बसली. ती रागावली आहे. रागाने जळजळणारे डोळे ती पुनः पुन्हा बंद करून घेते आहे. तिचे गाल लाल झाले आहेत. भुवया वक्र होऊन कपाळावर चढल्या आहेत. तिला वाटलं असेल की, तिला एकाकी करून मी पत्नीसह तिला फसवतो आहे.

"तो समोर फोटो आहे नं, तीच..." मी बोललो.

"समजलंय. मला वाटतं, माझ्याशी खोटं बोलल्याचा तुम्हाला मनोमन आनंद होतो आहे," या वाक्यातून चांगलाच राग [आणि तक्रार व्यक्त होत आहे. मीही काही महिने अस्वस्थ होतो, तेव्हा मी या सगळ्याची तयारी ठेवली आहे. एखाद्या नाटकातल्या पात्राकडे पाहावे, तसा मी तिच्याकडे पाहातो आहे.

"तुम्ही असं समजू नका. त्यावेळी मला तसं वाटलं आणि मी सांगून टाकलं. मला सगळं काही कळतंय."

"तुम्हाला आणि तुमच्या पत्नीला दोघांना या गोष्टीचा मोठा अभिमान वाटत असेल—"

"तिला यात आणू नका."

"वा ! वा ! पत्नीचं नाव घेताच एवढा गर्दपणा ? इतका रोष ?"

"चूप कमला ! चूप ! मला पाहिजे ते म्हण. मी ऐकून घेईन. तिच्या-

बद्दल बोलू नकोस. तिला काही माहीत नाही."

"माझ्याशी जर तुम्ही खोटं बोलू शकता तर स्वतःच्या पत्नीशी बोलत नाही ? मला तुम्ही जे फसवलंत, त्याबद्दल इतका आनंद साजरा करण्याची गरज नाही. अशा चार खोट्या गोष्टी शिकवल्या तर तुमची पत्नीही तुम्हाला असंच फसवील."

यावर मला फार वाईट वाटले. मला इतके तोडून बोलायचा कमलाला धीर कसा झाला ? मी खोटे बोलल्यामुळे ? स्त्रियांना जरा पुढे जाऊ दिले की काय होते, ते सांगायला नको.

"असं बोलू नकोस, कमला. मी तुझी क्षमा मागतो."

पण मी जेवढे मऊपणाने बोलतो आहे तेवढा कमलाचा आवाज वाढतो आहे. मी गंभीर होऊन कडकपणे बोलू लागलो तेव्हा—

"शिकलेसवरलेले, संसारी गृहस्थ आहात, आणि असं खोटं. . ."

"बराच त्रास झालाय, आता थोडी कॉफी घे ना," मी तिला मध्येच थांबवीत बोललो.

एकाएकी माझ्या मनातले हसू ओठांपर्यंत आले आणि जणु वादळात वीज कोसळली.

कमला उठून उभी राहिली. मीही उभा राहिलो.

"इतकं हसायला नको काही. जणु तुम्हीच काही वेगळं केलंय. तुम्हाला वाटतंय, लग्न जणु फक्त तुमचंच झालंय, दुसऱ्या कोणाचं झालंच नाही. तुमचं लग्न वर्षापूर्वी झालं असेल, पण माझं त्याच्याही आधी झालंय. ज्या कारणासाठी तुम्ही खोटं बोललात, त्याच कारणासाठी मीही खोटं बोलल्ये. काय, बराय ना ? आता मलादेखील हसू येतंय पण मी तुमच्यासारखं मोठ्यांदा हसू शकत नाही. . ."

मला उत्तर देण्याची संधी न देताच ती निघून गेली. मी मागे निघालो. रंगन्ना पान घेऊन आला. ती गाडीत चढून बसली. मी चकित होऊन परतलो. मला हलके हलके वाटत होते. माझ्या खोटे बोलण्याच्या पापाला मला कोणी भागीदार आहे तर ! आपण स्वतःला समजतो तेवढे वाईट नाही तर ! माझे मलाच वाटले. मला वाटते, कदाचित सगळे लोक असेच असतील. हे सत्य समजण्यासाठी खोटे बोलावे लागले, तरी काय बिघडलं ? कमलाबद्दल

माझ्या मनात राग नाही. स्त्रीला राग आला तर त्याचा बदला घेणं महाकठीण कर्म. पण दर क्षणाला वय वाढत ती वृद्धावस्थेकडे जाते आहे या कल्पनेने मनाचे समाधान करण्यात काही बिघडत नाही. मी रस्त्याच्या कोपऱ्यापर्यंत नजर टाकली. माझी पत्नी खालच्या मानेने मंदिरातून परत येते आहे.

आंब्याची करंडी गाडीत ठेवून यायला रंगन्नाला सांगून मी घरात आलो. पत्नीला या साऱ्या गोष्टी इतरांकडून कळणार. त्यापेक्षा मी स्वतःच पत्नीला हे सगळे सांगून टाकावे, हेच बरे!

पार्वती-परिणय

—कोडवटिगंटि कुटुंबराव

दक्ष प्रजापतीच्या कन्यांपैकी उमेने पित्याच्या इच्छेविरुद्ध शंकराशी विवाह केला. दक्षाला आपला जावई शंकर आपल्या योग्यतेचा न वाटल्यामुळे आपल्या घरी होणाऱ्या यज्ञाचे निमंत्रण त्याने उमा आणि शंकर यांना दिले नाही. शंकराचे न ऐकता उमा निमंत्रणावाचूनच पित्याच्या यज्ञासाठी गेली आणि तिथे अपमानित होऊन यज्ञकुंडात क्षेप घेऊन भस्मसात झाली.

याहून अधिक स्वाभाविक घटना दैनंदिन जीवनातदेखील घडू शकणार नाही. अनेक देशांत, वेळोवेळी अनेक उमा अनेक शंकरांशी विवाह करून नाना यातना आणि अपमान भोगून चुकल्या आहेत.

असे असूनही या पौराणिक कथेबद्दल गेले काही दिवस माझ्या मनात अनेक शंका निर्माण होऊ लागल्या आहेत. उमेने खरोखरच शंकरावरच्या प्रेमादरापायीच त्याच्याशी विवाह केला की संस्कृतीशी अनभिज्ञ असणाऱ्या शंकरावर स्वामित्व गाजवण्यासाठी ? शंकराचा सल्ला न मानता पित्याच्या घरी जाण्यात उमेचा भोळेपणा दिसला की, तिने तसे जाणूनबुजून केले ? आणखी एक शंका अशी की, उमेने यज्ञकुंडात खरोखरीच उडी घेतली की, स्वयंपाकघरात जाऊन ती लपली ?

उमा आणि शंकर यांच्या अत्यन्त पवित्र कथेबद्दल माझ्या मनात इतके घृणास्पद संदेह उत्पन्न होण्याचे कारण, पुढे मी जे सांगणार आहे, त्यावरून तुमच्या लक्षात येईल. माझे असे ठाम मत आहे की, जेथे जेथे उमा आणि शंकर यांचा विवाह होईल, तेथे तेथे त्याचा परिणाम दक्ष किंवा उमा यांना प्रतिकूल असा होणार नाही. त्याचा दुष्परिणाम होईल शंकरावर.

पार्वती रामकोटींची मुलगी आहे. रामकोटी लहानपणापासूनच सुधारक. त्याने बालपणी वीरेशलिंगमला अनेकदा पाहिले होते. थोडा मोठा झाल्यावर गांधीजींच्या सुधारकी मतांनीही त्याला आकृष्ट केले होते. काँग्रेसच्या चळवळीशी काही संबंध न येताही तो स्वतःला गांधीभक्त म्हणवू लागला.

रामकोटींची काय किंवा दुसऱ्या कोणाची काय, सुधारकी मते पटत नाहीत, हे इथे सांगितले पाहिजे. याचे मुख्य कारण असे की, या सुधारणांचे व्यावहारिक रूप कोणत्या प्रकारचे असेल हे सांगणे कठीण आहे. अनेक विधवा-विवाह रामकोटीजींनी जुळवले आणि अशा अनेक विवाहांना ते हजरही राहिले, पण त्यांनी स्वतः मात्र एखाद्या विधवेशी लग्न केले नाही. एका सामान्य मुलीशी—तेदेखील ती रजस्वला होण्याआधी—त्यांचा विवाह झाला. विधवाश्रमात त्यांना योग्य स्त्री मिळाली नाही असे नाही. अनेक विधवा त्यांनी पाहिल्याही होत्या, पण त्यातल्या कोणाचेच रंगरूप त्यांना पसंत पडले नव्हते.

त्यांच्या विवाहाबद्दल त्यांच्या एका मित्राने टीका केली तेव्हा रामकोटीजींनी त्याला उत्तर लिहिले : "मी विधवेशी लग्न करू इच्छित नाही असे जे लोक म्हणतात, ते नरकात जातील ! विवाहामागे केवळ सामाजिक दृष्टीच असली पाहिजे, असे मी मानीत नाही. त्यात विवाह करणाऱ्या व्यक्तीच्या पसंती-नापसंतीला प्रमुख स्थान आहे. विवाह मुख्यतः व्यक्तिगत असतो आणि नंतर त्याचा समाजाशी संबंध असतो. . .

"मला जी मुलगी आवडली तिच्याशी मी लग्न केले. याबाबत कोणी टीका-टिप्पणी करण्याची वा त्याचे खंडनमंडन करण्याची जरूर नाही."

रामकोटीजी भले आपल्या या कृतीचे समर्थन करोत, पण आम्ही त्यावर विश्वास ठेवीत नाही. त्यांच्या पत्नीला मी ऐन तारुण्यात पाहिले आहे. तिच्यात कसलही विशेष आकर्षण नाही. ज्यांनी तिला तेव्हा पाहिले नव्हते, ते आज पार्वतीला पाहू शकतात. पार्वती हुबेहूब आईसारखी आहे. रामकोटीजी म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी ज्या विधवा पाहिल्या असतील, त्या हिच्यापेक्षाही कुरूप असाव्यात. माझ्या सांगण्यावर तुमचा विश्वास बसणार नाही कदाचित. पण खरी गोष्ट अशी आहे की, जोपर्यंत रामकोटीजी स्वतःच्या सुधारकी-पणाविरुद्ध केलेल्या कृतीचे योग्य समर्थन करू शकणार नाहीत, तोपर्यंत मला समाजसुधारणेबद्दल आस्था वाटणार नाही.

रामकोटीजींच्या सुधारकीपणाबद्दल माझ्या मनात एक शंका आहे. तिचे निरसन आतापर्यंत होऊ शकलेले नाही. विधवा-विवाह, आंतर-जातीय विवाह, हरिजनांबरोबर सहभोजन, आदी अनेक सुधारणांचा ते पुरस्कार करतात; पण त्यांच्या नातेवाईकात जे कट्टर सनातनी, कर्मठ आणि रूढीवादी आहेत,

त्यांच्याशी कधी रामकोटीजींचे मतभेद वा संघर्ष झालेले नाहीत. याचे कारण काय ? स्वत: त्यांनी किंवा त्यांच्या एखाद्या भावाने अथवा बहिणीने किंवा त्यांच्या मुलांपैकी कोणी, किंवा त्यांचा मुलगा रमापतीने कमीत कमी आंतरजातीय विवाहदेखील केला नाही. ते का ? इतक्या दिवसानंतर आता पार्वतीने हरिजनाशी लग्न केल्याबरोबर "रामकोटीजींसारखे सुधारक पुन्हा निर्माण व्हायचे नाहीत." या गोष्टीवर लोकांचा विश्वास बसण्यासाठी त्यांनी जे प्रयत्न आणि परिश्रम केले, ते मला माहीत आहेत. त्यांचा उल्लेख झाला पाहिजे.

पार्वतीला मी चांगली ओळखतो. तिची मनोवृत्ती मला कधीही चांगली वाटली नाही. पण याबद्दल मी तिला दोष देत नाही. ती दिसायला सुंदर नाही, शरीरप्रकृतीही किरकोळ. त्यामुळे आपल्यापेक्षा सुंदर व निकोप मैत्रिणीचा तिला नेहमीच हेवा वाटे. त्यांच्यासारखे आपण सुंदर दिसावे, म्हणून ती खूप धडपड करी. तेराव्या-चौदाव्या वर्षी तिला एक वाईट सवय लागली. ती म्हणजे पुरुषांना आकृष्ट करण्याच्या स्वत:च्या सामर्थ्याची प्रचिती पाहाणे. मी तिच्यापेक्षा वीस वर्षांनी मोठा आहे, पण तिने मलादेखील सोडले नाही. मी मानसशास्त्रज्ञ नसतो, तर मला तिचा राग आला असता. मला थोडीफार अक्कल नसती, तर हाहाकार उडाला असता. पण मी पार्वतीची समजूत घालीत म्हटले, "स्त्री कितीही कुरुप असली तरी कोणत्या ना कोणत्या पुरुषास ती आकर्षित करू शकते. हे शरीर आहे, तोपर्यंत शरीराच्या मोहात पडणारी शरीरेही राहाणारच."

"अस्सं, आपण तर तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगू लागलात," असे म्हणून पार्वतीने माझा उपहास केला. तेव्हापासून ती माझ्यावर नाराज आहे.

आपला वडील भाऊ रमापती याच्या सर्व मित्रांवर पार्वतीने आपल्या आकर्षणशक्तीचे प्रयोग केले. मुलांमध्ये असे मानसिक परिवर्तन होत असताना ते ओळखू न शकणारे आईबाप खरोखरी आंधळे म्हटले पाहिजेत. पार्वतीला तिच्या आईवडिलांपैकी कोणी ना कोणी योग्य वेळी समजवू शकेल अशी मला आशा वाटत होती. हे झाले नाही तेव्हा मी या कल्पनेने शंकाकुल झालो की, पार्वती एखाद्या अडचणीत सापडते की काय ?

अखेर तसे काही झाले नाही. म्हणजे पार्वती एकदम अविचारी नाही तर !

किती दूर जायचे आणि स्वतःला कसे वाचवायचे हे तिला माहीत असावे. काहीही असो, पार्वती स्वतःला कसलाही कलंक लागू न देता, कसल्याही अडचणीत न येता तेरा-चौदा वर्षे वाढत राहिली. . .शंकरमशी तिचे लग्न झाले, तेव्हा ती सत्तावीस वर्षांची होती.

शंकरम आणि रमापती कॉलेजात चार वर्षे बरोबर शिकले होते. माझ्या मते रामकोटींचा मुलगा रमापती बापापेक्षाही अधिक सुसंस्कृत आहे. शंकरम हरिजन आहे हे माहीत असूनही रमापती त्याच्याशी अगदी मिळूनमिसळून वागे. हरिजनांवर दया दाखवणारे लोक शंकरमला आपल्या औदार्याची कल्पना यावी, म्हणून त्याच्याशी मित्रत्वाने वागत. शंकरमचे असे बरेच मित्र होते. शंकरम त्यांना देवतुल्य मानी. लोक त्यामुळे फारच खूष असत. शंकरम आपले देवत्व विसरील की काय या भीतीने ते लोक क्षणोक्षणी कोणत्या ना कोणत्या प्रकारे शंकरमला तो हरिजन असल्याची जाणीव करून देत.

हे मित्र आणि रमापती यांच्यात असणारे अंतर बरेच दिवस शंकरमच्या लक्षात आले नाही. उलट रमापतीपेक्षा त्याच लोकांत त्याला अधिक त्याग-शीलता दिसे. याचे कारण असे की, रमापतीच्या सहवासात असताना आपण हरिजन आहोत आणि आपला सामाजिक दर्जा काहीसा खालचा आहे हे त्याच्या लक्षातदेखील राहात नसे. इतरांबरोबर असताना हे विसरण्यास सवड नसे.

पण शंकरम अगदी असमंजस नाही. शतकानुशतके दाबली गेलेली त्याच्या जातीची प्रतिभा आणि कार्यशक्ती संधी पाहून हळूहळू प्रकट होत राहिली. त्याचे आजोबा-पणजोबा कसले लाजिरवाणे जिणे जगत होते, हे त्याच्या मनात इतके खोलवर गेले होते की ते तो शब्दांनी प्रकट करू शकत नव्हता. त्या लोकांचे आयुष्य बैलगाडीसारखे चालत होते, तर आता त्याचे जीवन विमानवेगाने धावते आहे. आता तो आपल्या जातीतर्फे क्षणोक्षणी नवे क्षेत्र पादाक्रान्त करतो आहे, नवे जग उभारतो आहे. त्यात त्याचे आरोग्याकडे दुर्लक्ष झाले, पण त्यामुळे लाभणारी अद्भुत प्रसन्नता त्याला विलक्षण आनंदित करी. कधी कधी तो इतका खूष होई की, स्वतःला सावरू शकत नसे. आपल्या नावापुढे 'बी. ए.'ची पदवी लागेल, थोड्या मेहनतीने 'एम. ए.'-देखील लावता येईल. मग नोकरी मिळेल. तेव्हा या सुसंस्कृत जगात आपल्याला

प्रतिष्ठा लाभेल. आपणही रमापतीसारखे राहू शकू. थोडी सुसंस्कृत पत्नी मिळाली की काहीही उणे राहाणार नाही. आपल्या मुलांना आपल्यासारखे जिणे जगावे लागणार नाही. केवढा हा बदल! कुठून कुठे गेलो आपण!

शिकार बनणारे जनावर बहुधा अधिक शंकाकुल असते. आपले खरे मित्र कोण आणि मैत्रीचा देखावा करणारे मित्र कोण हे ओळखण्याचा शंकरम सतत प्रयत्न करी. शेवटी, रमापती आपला सर्वात चांगला व सच्चा मित्र आहे, याबद्दल त्याची खात्री पटली. हे त्याच्या लक्षात आले, तोपर्यंत दोघांचे कॉलेज शिक्षण पूर्ण झाले होते.

शिक्षण संपवून शंकरमने आयुष्याला सुरुवात केली आणि त्यानंतरच त्याची खरी प्रगती होऊ लागली. कामासाठी येणाऱ्या लोकांचे काम करून देणे, त्यांच्याशी नम्र वर्तन, त्याच्या योग्यतेबद्दल लोकांची परस्परात होणारी चर्चा—या सगळ्यामुळे हळूहळू त्याच्यातला आत्मविश्वास वाढला. जातिभेद आणि स्पृशास्पृश्यता यापासून तो जणु मुक्त झाला. त्याचे सहकारी अधिकारीही होते. ते तर जातिभेद अजिबात मानीत नसत. शिवाय शहरी जीवनात गुंतून गेल्यावर भूतकाळ चटकन विसरून जाणे त्याला सहज शक्य झाले. त्याचे आप्तेष्ट त्याला कधीमधी भेटायला येत तेव्हा हा भूतकाळ जागा होई. पण तो शक्य तितके त्या लोकांपासून दूर राहाण्याचा प्रयत्न करी.

एकदा कोणीतरी त्याला चिठ्ठी पाठवली. चिठ्ठी लिहिणारा हरिजनच असावा — "तू आपल्या मुक्तीचा विचार करतो आहेस, पण आपल्या माणसांपासून दूर दूर चालला आहेस. आपले नशिब आपल्या माणसांसमवेत उपभोगीत नाहीस? आपल्या जातीच्या उद्धारासाठी तू काय केले आहेस, त्याचा स्वतःशीच विचार कर?"

पण शंकरम कोणाचाही विचार करू इच्छित नव्हता. आयुष्यात कोणत्याही एका यशापाशी थांबण्याची त्याची आकांक्षा नव्हती. त्याला आणखी पुढे जायचे होते.

कॉलेजच्या शिक्षणानंतर शंकरम आणि रमापती यांची एका हॉटेलात गाठ पडली. रमापतीने शंकरमला ओळखले नाही. शंकरमने रमापतीला ओळखले. शंकरमची झालेली उन्नती आणि त्याला लाभलेली सुस्थिती पाहून रमापतीला फार आनंद झाला. रमापतीने शहरात वकिली सुरू केली होती. तो ॲडव्होकेट आहे.

"आम्ही ट्रिप्लिकेनमध्ये राहातो. एकदा आमच्याकडे ये. तुला पाहून सगळ्यांना आनंद होईल," आपले व्हिजिटिंग कार्ड देत रमापती बोलला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी शंकरम स्वतःच्या मोटारीतून रमापतीच्या घरी गेला. रमापतीने त्याला आत नेऊन बसवले. थोड्या वेळाने पार्वती दोघां-साठी कॉफी घेऊन आली.

स्तुती करण्यात पार्वती फार चतुर आहे— "आपण दोघं एकत्र शिकलात हे मला खरं वाटत नाही. तुम्ही तर माझ्या भावापेक्षा पाचसहा वर्षांनी लहान वाटता. माझ्यावर विश्वास नसेल, तर दुसऱ्या कोणालाही विचारा," पार्वती बोलताना म्हणाली.

मग दुसऱ्यांदा ती म्हणाली, "आपण हरिजन आहात, असं कोणालाही वाटणार नाही. माझा भाऊ खोटं सांगून मला बनवतोय. आपल्या बोलण्याच्या पद्धतीवरून तर हे कळतच नाही."

या दोन गोष्टी त्या दिवशी रात्री झोपण्यापूर्वी शंकरमने किती वेळा आठवल्या त्याची गणतीच नाही करता यायची.

पार्वतीने शंकरमशी लग्न करण्याचा निश्चय केला की नाही, हे मी सांगू शकत नाही. पण एवढे निश्चित म्हणू शकतो की, मागचा-पुढचा सगळा विचार करून फायदेतोटे समजून घेऊनच तिने या गोष्टीचा विचार केला असेल. पण पार्वतीचे कौशल्य हे की, शंकरमशी लग्न करण्याची आपली इच्छा आहे अशी शंका तिने ब्रह्मदेवाच्या मनातसुद्धा येऊ दिली नाही

शंकरमला जाळ्यात पकडण्यासाठी तिने आणखी काय काय केले याचा अंदाजच करता येत नाही. आणि ते तितके सोपेही नाही. तिच्यात आणि शंकरममध्ये जातीचे जे अंतर आहे, त्याची भावना तिला त्याच्या मनातून काढून टाकायची आहे. लग्नाची मागणी घातल्यास पार्वती कदाचित ती मान्य करील, असा विश्वास त्याला वाटला पाहिजे. पण याबाबतीत तिच्या-कडून एकदेखील पाऊल पुढे पडता कामा नये. हे सगळे पार्वतीने कसे जमवले, ते मी सांगू शकत नाही. जमवले आहे जरूर, एवढेच मी म्हणू शकतो !

एक वर्षभर पार्वतीशी मैत्री केल्यानंतर तिच्याबरोबर अनेकदा समुद्रावर फिरून आल्यावर व चित्रपट बघितल्यावर, एक दिवस रमापतीमुळे परिचय झालेल्या व रमापतीच्या घरी नेहमी दिसणाऱ्या एका मित्राला शंकरम

म्हणाला, "आंतर-जातीय विवाहावर माझा विश्वास आहे. असे विवाह होतील, तेव्हाच आपला समाज बदलेल."

या एवढ्याशा गोष्टीने लोक भडकून गेले. शंकरमशी थोडीफार ओळख असणाऱ्या आणि बरेचदा "रमापतीच्या घरी येणाऱ्या काही मित्रांनी सल्ला दिला, "रमापती, तू या सापाला आपल्या घरात घेतलं आहेस. त्याची तर एखाद्या ब्राह्मण मुलीशी लग्न करण्याची महत्त्वाकांक्षा आहे. वरून सरळ दिसतो, पण मनातले विचार कसे असतील कोणास माहीत ! . . .खरं म्हणजे या महारांना जवळ बोलावणंच चुकीचं आहे. . .शंकरमपासून जपून राहायला पार्वतीला बजावून ठेव."

त्यांचे सगळे बोलणे मी सांगत नाही. दुर्दैवाने मीदेखील त्यांच्यातलाच एक आहे. म्हणूनच त्यांच्या सडक्या मेंदूतून निघालेली घाण उपसायची मला भीती वाटते. एक गोष्ट मात्र खरी आहे. हे सगळे लोक बाहेरून जाति-भेदांचे खंडन करणारेच आहेत. शंकरम त्यांना स्वखर्चाने हॉटेलात खाऊ घालील किंवा स्वतःच्या घरी बोलावून कॉफी पाजील तर त्याचा ते आनंदाने स्वीकार करतील, यात शंका नाही.

रमापतीला त्यांच्यापैकी कोणाचे म्हणणे पटले असेल, असे मला वाटत नाही. पण त्यांच्या बोलण्याचा त्याच्यावर परिणाम जरूर झाला. पार्वतीजवळ तो सूचकपणे बोलला, "शंकरम एखाद्या ब्राह्मण मुलीशी लग्न करण्याच्या विचारात आहे, म्हणे."

"नॉन्सेन्स ! त्यात वाईट काय आहे ? जर त्यानं कोणाशी लग्न करायचं ठरवलं असेल तर जरूर करावं. लग्नाशिवाय घरात बसलेल्या स्त्रियांनी लाचार होऊन कोणा नालायकांशी लग्न करण्यापेक्षा अशा लोकांशी लग्न केले तर ते त्यांना फुलासारखं जपतील, डोक्यावर घेतील आणि त्यांचं ऐकतील," पार्वती म्हणाली.

पार्वती हे आपल्यालाच उद्देशून बोलते आहे, हे रमापतीच्या लक्षात आले. खरे म्हणजे गेल्या दहा-बारा वर्षांत पार्वतीच्या लग्नाचा विषयच निघाला नव्हता.

यानंतर थोड्याच दिवसात शंकरमने पार्वतीला मागणी घातली. ती उत्तरली, "घरातल्या माणसांना मान्य असेल तर. . . माझी काही हरकत नाही."

यानंतर पंधरा दिवस पार्वतीच्या आई-बापांशी झगडा चालला होता. या प्रकरणात रामकोटीजींनी अनेक लोकांना आपल्या बाजूने पार्वतीला सांगायला लावले की, हे चुकीचे कृत्य आहे. त्यांना विरोध करणारा फक्त मी एकटा होतो.

मी म्हणालो, "पार्वती शंकरमशी लग्न करील, तर नुकसान शंकरमचं होईल."

शेवटी पार्वतीने कोणाचेच ऐकले नाही. "तुम्ही तयार झाला नाहीत तर आम्हाला तुमच्या इच्छेविरुद्ध लग्न करावं लागेल," असा निर्वाणीचा इशारा जेव्हा पार्वतीने दिला, तेव्हा रामकोटीजींनी माघार घेतला.

लग्न झाले. जणू आपण फार मोठे समाजकार्य केले, पतनोन्मुख समाजाचा उद्धार केला, अशा थाटात रामकोटींनी या गोष्टीचा प्रचार केला आणि भोळ्या लोकांची तशी खातरजमाही करून टाकली.

शंकरम आपल्या स्वप्नांच्या स्वर्गात किती दिवस राहिला, कल्पना नाही. पार्वती हळूहळू त्याला नरकाचे रूप दाखवू लागली. शंकरमच्या सवयी एकदम बदलून टाकण्याचा तिने निश्चय केला. त्याच्या परिवारातल्या सगळ्या लोकांना तिने घराबाहेर काढले. त्याच्यावर तिने शेकडो निर्बंध घातले. त्यातला एक जरी त्याने थोडा मोडला, तरी ती त्याच्याशी भांडू लागली. शंकरमला आयुष्यात पूर्वी कधीही एवढी गुलामगिरी अनुभवावी लागली नव्हती. पुष्कळ दिवस त्याने हे सगळे सहन केले. बंडखोरीची भाषा कधीही काढली नाही. पार्वतीच्या अहंपणापुढे मान तुकवून अनेकदा तिची क्षमा मागितली. तिचे मन राखण्यासाठी किती मर्यादेपर्यंत स्वाभिमान सोडावा लागेल, याचा शोध घेण्याचाही त्याने प्रयत्न केला. पण काहीही फायदा झाला नाही. खूप विचार करूनही पार्वती त्याला जेवढा दोषी समजत होती, तेवढा दोष त्याला स्वतः-मध्ये दिसला नाही. पार्वती आपल्यापेक्षा अधिक सुसंस्कृत आहे हेही स्वतःला पटवण्याचा त्याने आटोकाट प्रयत्न केला.

एक दिवस दोघात कडाक्याचे भांडण झाले. शंकरमचा स्वतःवरचा संयम त्या दिवशी सुटला. बराच वेळ त्याने सहिष्णुता दाखवली. आता ती सहिष्णुता पार्वतीत असली पाहिजे, असे त्याला वाटले. आपण आक्रमक पवित्रा घेतला, तर पार्वती माघार घेईल, असे त्याला वाटले होते, पण ते झाले नाही.

पार्वती त्याच्या वरताण ठरली. ती सरळ माहेरी निघून गेली.

पार्वतीच्या सहवासात त्याला जर नरक लाभला, तर ती गेल्यावर त्याला काय वाटले, याचे वर्णन करायला त्याच्याजवळ शब्द नाहीत. खोलीत एकटाच बसून तो ढसढसा रडला – पार्वतीसाठी नाही ! –– त्याने स्वतःच्या हातांनी गमावलेली शांती, इतरांना दाखवलेली सहिष्णुता आणि त्याच्या वाट्याला आलेला अपमान यासाठी !

दोन-तीन दिवस त्याने खाणे-पिणे सोडून दिले तो वेड्यासारखा झाला, आणि आपल्या पत्नीला भेटायला गेला. ती त्याला वेगळी वाटली. त्याने फारसे बोलणे केलेच नाही. तो एवढेच म्हणाला, "हे लग्न आपण करायला नको होतं. त्यात माझीच चूक आहे, मला मान्य. पण आता लग्न केलंच आहे, तर अशा प्रकारचा संसार सुखी होत नाही, हे जगाला कशाला दाखवायचं ? यापुढं असे विवाह करणाऱ्यांच्या मनात शंका निर्माण करण्याचं श्रेय आपण कशाला घ्यायचं ?"

पार्वती उत्तरली, 'मला वाटलं ते माझं घर बनेल. पण ती माझी चूक होती. या घरात मला जेवढं स्वातंत्र्य होतं, त्याच्या तिसरा हिस्सासुद्धा तिथं नाही – असूही शकत नाही. मी तिथं कशाला येऊ ? मी इथंच राहाणार. आपण वाटलं तर इकडे या. माझं काही म्हणणं नाही. पण दाम्पत्यजीवनाचा याच्याशी काही संबंध नाही."

शंकरमने हे मान्य केले. त्याला नोकरी आहे, जवळ पैसा आहे, आता तर मूलही आहे. पण त्याला स्वतःचे आयुष्य राहिलेले नाही. आता त्याला कोणतीही जात नाही. त्याचा आत्मा दिशाहीन होऊन वाळवंटात भिरभिरतो आहे. मृत्यूनंतरच त्याच्या आत्म्याला शांती लाभेल.

आंब्याचे झाड

—राचकोंड विश्वनाथ शास्त्री

विहीर आणि बाग असलेली पाचशे वार जमीन खरेदी करून नीलमणींनी तीत घर बांधले. अलिकडेच त्यांनी गृहप्रवेशही केला आहे. मी त्या घराचा भाडेकरू झालो आहे. जमिनीबरोबर मिळालेली बाग म्हणजे आंब्याचे फक्त एक झाड आहे.

आंब्याचे झाड मला प्राणांहून प्रिय आहे. आंब्याचे झाड मला कुठेही दिसले, तरी त्याच्याकडे पाहात मी त्याच्यासमोर बसून राहू शकतो. माझ्या जीवनातल्या मधुर भावलतांनी आम्रवृक्षाला लपेटले आहे.

दहा वर्षांपूर्वी – मी पंधरा वर्षांचा होतो, तेव्हा – एक दिवस दुपारच्या वेळी गावाबाहेर उत्तरेला, शेतांच्या पलीकडे, डोळ्यांची तहान भागवणारे काळे-भोर ढग रणरणत्या उन्हात शेतांवर लहरत होते, तेव्हा गावाबाहेरच्या विहिरी-जवळ मोहरलेला, फळलेला आम्रवृक्ष मी पाहिला होता. त्याच्या सौंदर्याचे वर्णन मला नीट करता येत नाही. एवढेच म्हणू शकतो की, सासरी निघालेल्या मुग्ध वधूप्रमाणे, उन्हात काहीशी कोमल, काहीशी जड आणि थोडी केविल-वाणी मुद्रा करून तेव्हा वाहाणाऱ्या वाऱ्यात तो काहीसा खिन्न, दीनवाणा भासत होता.

त्याच दुपारी त्या विहिरीतून पाणी शेंदून एका हातात लोखंडी बादली आणि डोक्यावर कळशी घेऊन एक मुलगी अगदी एकटी, बहुधा सासरच्या वाटेने सावकाश चालली होती. तिच्या अंगावर दागिन्यांचे ओझे नव्हते, पण तिच्या अंगातून सौंदर्य निथळत होते. कळशीतल्या उसळणाऱ्या पाण्याचे थेंब डोक्यावरच्या केसांना भिजवून तिथून गालांवर हलकेच उतरत होते. अजूनही कधी त्या दिवशीच्या दुपारी पाहिलेले ते सुंदर आंब्याचे झाड आणि पाणी घेऊन सावकाश घराकडे जाणारी ती ग्रामबाला जेव्हा माझ्या डोळ्यापुढे येतात, तेव्हा जीवनात एकत्र राहाणारे श्रम आणि सौंदर्य, दुःख आणि माधुर्य, वेदना आणि चेतना यांचे मला स्मरण होते.

त्या दिवशी ती बाला उन्हातल्या ढगासारखी प्रसन्न भासली होती. तिच्यात आणि मोहरलेल्या त्या आम्रवृक्षात मला एक विचित्र आणि अनिर्वचनीय साम्य आढळले होते. आता दुपारच्या वेळी ढगाकडे पाहिले की मला तो मोहरलेला आम्रवृक्ष आणि पाणी नेणाऱ्या त्या प्रसन्न बालेचे मुखमंडल आठवते. कधी एखादे मधुर गीत ऐकू येते, तेव्हा त्या दिवशीचे ते दृश्य—रणरणणारे उन, शेताच्या त्या बाजूला पाण्याने ओथंबलेला ढग, ती विहीर, ते झाड, ती एकटी बाला — सगळे दृश्य माझ्या डोळ्यापुढे येते आणि सुखाबरोबरच एका विचित्र दुःखाची शिरशिरी शरीरातून लहरत जाते. वाऱ्याच्या सळसळत्या लहरी, आंबराईतल्या झऱ्याचे गीत, ग्रामबाला, काळे मेघ हे सारे माझ्या मनात कसले तरी विलक्षण भाव निर्माण करून जाते.

त्यामुळेच नीलमणींनी घराच्या समोरच्या खोलीचे भाडे वीस रुपये सांगितले आणि माझ्या दृष्टीने ते जास्त होते, तरी घरासमोरचे आंब्याचे झाड पाहून मी ते मान्य केले. यापेक्षा कमी भाड्याच्या दोन-तीन खोल्या मी पाहिल्या होत्या. पण त्या फार लहान होत्या, आणि त्यांच्या आसपास एकदेखील हिरवे झुडूप नव्हते. म्हणूनच नीलमणींच्या अनेक अटी मान्य करून मी त्यांची खोली भाड्याने घेतली.

नीलमणींच्या अनेक अटी होत्या — पहिल्या तारखेला संध्याकाळपर्यंत पै न् पैचा हिशेब चुकता झाला पाहिजे, दरमहा दोन रुपयांच्या हिशेबाने विजेचे पैसे त्याच वेळी दिले पाहिजेत; रात्री अकरानंतर दिवा जाळता कामा नये; त्या खोलीत माझ्याबरोबर माझा कोणी मित्र भाडेकरू नसला पाहिजे, आई, बहीण, मुलगी आणि म्हातारी मोलकरीण सोडून माझ्या खोलीत अन्य कोणाही स्त्रीस प्रवेश करता येणार नाही; गडबड होता कामा नये, आणि मी सद्वर्तनी व प्रामाणिक राहिले पाहिजे.

ते अशी नियमावली वाचीत चालले तशी मी त्यांना मध्येच थांबवून म्हटले, "ठीक आहे महाराज, आणखी सांगायची गरज नाही. माझ्या सगळं लक्षात आलं. धन्यवाद."

यावर त्यांचा चेहरा बदलू लागलेला पाहाताच मी ताबडतोब दहा-दहाच्या दोन नोटा त्यांच्या हातात ठेवीत म्हटले, "घ्या, हा या महिन्याचा ॲडव्हान्स."

दोन्ही नोटा दोन हातांत घेऊन त्यांनी बनियनच्या खिशात टाकल्या आणि

ते एकदम हरवल्यासारखे दिसू लागले. पैसे मिळण्यापूर्वी त्यांच्या मनात जो विचार आला होता, तो पैसे हाती येताच जणू ते एकदम विसरून गेले.

"पावतीची गरज नाही." मी म्हणालो.

"त्यात काय आहे? मिळेल की," ते बोलले.

"गरज नाही—पण हां! आता मला व्हरांड्यात एक मुलगी दिसली. . ."

"कोण? कुठं? . . .हां हां. . .ती मुलगी?"

"तिला माझ्या खोलीत येऊ देऊ नका. मला मुलीचं जाणं-येणं आवडत नाही," असे म्हणून मी घाटग्यात सामान आणण्यासाठी बाहेर पडलो.

मालगुजारी कचेरीत काम करताना नीलमणींनी दोन जागतिक युद्धे पाहिली होती. परकी सरकारचे आघात त्यांनी पाहिले होते, जनतेत उसळलेली क्रांतीची लाटही त्यांनी पाहिली होती, गांधीजींनाही त्यांनी पाहिले होते. अगदी शनिवारी-रविवारीदेखील त्यांनी कचेरीत जाऊन कष्ट केले, पण शेवटी ते तहसीलदार बनू शकले नाहीतच. आता रिटायर्ड होऊन घर बांधले आहे. माझ्या खोलीशिवाय आणखी दोन खोल्या भाड्याने दिल्या आहेत. भिकाऱ्यांना ते पळवून लावतात, मुलांना दूर ठेवतात, भाव करून करून भाजी खरेदी करतात आणि कुठून तरी मागून आणून वर्तमानपत्र वाचतात.

नीलमणी . . . . . .

नाव तर चांगले आहे. पण त्यांना अथवा त्यांच्या घरातल्या कोणाला भेटायला मला आवडत नाही. चिंचेच्या सुकल्या आकड्यासारखे आहेत ते, कापले तर आंबटपणा जरूर जाणवेल. त्यांची पत्नी सुकलेल्या साळीसारखी आहे. स्पर्श केला तर काटे टोचतील. तुम्ही पाहिले आहे का मला माहीत नाही, नारळाची काही झाडे असतात. दिसायला चांगली उंच वगैरे. पण त्यांना फळ लागत नाही. सगळा वरवरचा देखावा. आतून पोकळ. नीलमणींचा असा एक मुलगा आहे. तेव्हा तो कायद्याचा अभ्यास करीत होता आणि एका तेल कंपनीत नोकरीसाठी प्रयत्न करीत होता. नीलमणींच्या मुलीला अंधारात पाहू गेले, तर ती एकदम बाभळीच्या झाडासारखी वाटेल. जावई तिला जवळून पाहून भ्याला आणि तिला सोडून गेला. तिची एक मुलगी—म्हणजे मांजर आहे, तिला ती सांभाळते.

यावरून . . . . .

नीलमणीच्या कुटुंबात मला आवडेल असे कोणी नाही, हे स्पष्ट आहे.

पण बाहेरच्या खोलीतल्या खिडकीजवळ खुर्चीवर बसून समोरच्या आंब्याच्या झाडाकडे पाहाणे मला आवडते. थोडे उजव्या बाजूस सुमारे वीस फुटांवर ते झाड उभे आहे. डावीकडे दोनतीन इतर झाडे आहेत. दुसरे काही झाड-झुडुप नाही. आंब्याच्या त्या झाडामागूनच सूर्य-चन्द्र उगवतात. रात्री त्याच्यावर तारे नाचताना दिसतात. दिवसा त्याच्याखाली उनसावल्या पाठशिवणीचा खेळ खेळतात. त्या सावलीत बसून एक म्हातारी मक्याची कणसे विकते. त्याच्या फांद्यांवर पोपट येऊन बसतात. त्याच्या फांद्या हलल्याने येणारा वारा मला स्पर्श करतो, तेव्हा अनेक गोड अनुभूती मला उल्हसित करून जातात.

ते आंब्याचे झाड मला फार आवडते.

पण.....

एका रात्रीची गोष्ट—रात्र फारच स्वच्छ, निरभ्र होती. आकाशात ढग नव्हते, चंद्रही नव्हता. आकाशातल्या अंधारात तारे, पणतीच्या प्रकाशात मुलांचे डोळे चमकावेत, तसे लुकलुकत होते. वारा वाहात नव्हता, पण हवेत गारवा होता. मी नेहमीप्रमाणे खिडकीजवळच्या खुर्चीत बसलो होतो. आंब्याचे झाड घुंघट घेऊन आलेल्या बालेप्रमाणे समोर उभे होते—रात्रीचे आठच वाजले होते. सगळीकडे नीरवता दाटली होती. त्याच वेळी हिरव्यागार सुगंधाने ओथंबलेल्या आणि आळसावलेल्या वायुलहरींवरून एक मधुर गीत हलकेच तरंगत आले आणि हळूहळू ऐकू येऊ लागले. ते गीत हलके हलके येताना, वाटेत रस्ता चुकून, दुसरीकडे जाऊन पुन्हा रस्ता धुंडीत माझ्याकडे येत होते. ते पकडून आपल्याजवळ दडवून ठेवावे असे मला वाटले. इतके सुरेख होते ते गीत. गीताच्या माधुर्याचा आणखी आनंद उपभोगायच्या विचाराने मी सिगरेट शिलगावली, एक झुरका घेऊन धूर सोडला आणि डोळे मिटून घेतले.

मी डोळे उघडले तेव्हा समोरची बाला घुंघट काढून हिरव्यागार कांतीने दिव्याच्या प्रकाशात झगमगत होती. मला आश्चर्य वाटले.

दुसरे काही नाही आहे. शेजाऱ्यांनी झाडाच्या फांदीवर विजेचा दिवा टांगला आहे. त्याखाली एक टेबल आहे, टेबलाच्या चारी बाजूंना खुर्च्या आहेत आणि त्यावर बसून चार गृहस्थ पत्ते खेळताहेत. "छान जागा आहे ही," कोणीतरी म्हणाले. "आतापर्यंत लक्षातच आलं नव्हतं," दुसरा म्हणाला.

तिसरा म्हणाला, "आमच्या भावाला आंबे काढण्याशिवाय या झाडाचा दुसरा काही उपयोग करायचं माहीतच नाही." "नीलमणीला हे कळलं तर आपल्याला फाडून खाईल, असं बोलू नका." शेजाऱ्याने बहुतेक आपल्या मित्रांना इशारा दिला असावा. "पानं सगळी त्याची आहेत, आंबे आपले आहेत," असे म्हणून एक गृहस्थ खो खो हसू लागले.

माझ्या मनात येत होतं, "नीलमणींनी हे ऐकलं, तर..." एवढ्यात व्हरांड्यात काही हालचाल झाली. मी बाहेर जाऊन पाहिले तर झुडपांच्या आडोशाला दबा धरून बसलेल्या हिंस्त्र पशूप्रमाणे नीलमणी त्या अंधारात व्हरांड्यात उभा राहून तिकडे पाहात होता. त्याच्या चेहऱ्यावरील भाव पाहून भीतीच वाटली.

जवळ जवळ चार दिवस रात्री शेजाऱ्यांना तिथे पत्ते खेळताना मी पाहिले. पाचव्या दिवशी संध्याकाळी नीलमणी माझ्या खोलीत आला आणि म्हणाला' "पाहिलंस, बेटा ?"

त्याला खुर्चीत बसायला सांगून मी म्हटले, "काय पाहायचं ?"

तो बसला नाही. मळकं बनियन आणि लाल रंगाचे धोतर यांत तो अर्धवट जळालेल्या ओंडक्यासारखा दिसत होता. शेजारच्या घराकडे बोट दाखवीत तो म्हणाला, "पाहा, ते लोक स्वत:चा खड्डा स्वत: खणताहेत."

मी म्हणालो, "बरोबर आहे. पत्ते खेळणं चांगलं नाही."

"चांगलं असो की वाईट—खेळायचं तर आपल्या घरात खेळावं, हरकत नाही. घरात जागा नसेल तर मसणात जाऊन खेळावं. खेळून ते स्वत: बरबाद झाले, तर माझं काय जातंय ? हे नालायक खेळणारे दुसरीकडे कुठं न जाता माझ्या झाडाखाली का खेळतात, मला समजत नाही."

"जागा त्यांची आहे नं ?"

"असेल, पण माझ्या झाडाखाली ते खेळू शकत नाहीत."

"मग तसं त्यांना सांगा नं. "

"सांगणार का नाही ? सांगितलं. तशी म्हणाले, तुम्ही कोण सांगणारे ?"

"मग आपण काय म्हणालात ?"

"कळेल म्हटलं, मी कोण आहे ते ! कळेल की नाही ?"

एवढे म्हणून झटकन नीलमणी निघून गेला.

"ते आंब्याचे झाड नीलमणीचे आहे," यात काही शंका नाही. पण त्याचा खालचा भाग त्यांच्या आवारात आहे. काही चांगल्या फांद्या रस्त्यावर तर काही शेजाऱ्यांच्या आवारात गेल्या आहेत. त्याला कोण काय करणार ?

दोन दिवसांनंतरची गोष्ट. दिवस रविवारचा होता. शहरात फिरून वगैरे दुपारी एकच्या सुमाराला मी खोलीवर आलो. त्यावेळी घरासमोरच्या रस्त्यावर बराच गोंधळ सुरू होता. केस पिंजारलेली एक म्हातारी कोणाला तरी शेलक्या शिव्यांची लाखोली वाहात होती. ऐकणाऱ्याचे कान फाटून जातील अशा शिव्या होत्या त्या. मी तिच्याजवळ जाऊन पाहिले—दुसरे कोणी नाही—तीच मक्याची कणसे विकणारी म्हातारी होती ती. तिच्या बोलण्यावरून एवढेच लक्षात आले की, भांडण आता संपले आहे, विजय म्हातारीचा झाला आहे, पण शत्रू हाती लागला नाही—पळून गेला.

"काय आजीबाई, काय झालं ?" मी विचारले.

"बघितलं साहेब ? तो टकल्या आहे नं, त्याच्यामुळं हे सगळं झालं," नीलमणीला खरेच टक्कल आहे.

"का ? काय म्हणाला तो ?"

"ऐका साहेब, तो म्हणतो, झाड माझं आहे, तेव्हा त्याच्या फांद्यादेखील माझ्या आहेत, त्याच्याखाली कोणी बसता कामा नये. म्हणतो, आमच्यामुळे त्याला त्रास होतो ! तसं तर तो राहातो त्याचा आम्हालाही त्रास होतो, पण तो कुठं जाईल ? जाणार नाही ! जागा त्याची आहे. साहेब, मला एक सांगा. ही सडकदेखील त्याची आहे काय ? पैसे मोजून त्यानं ही घेतली आहे काय ? की डांबर आणि दगड आणून स्वतः मजुरांकडून करून घेतली आहे ? टकल्या लेकाचा ! या सडकेवर एकट्यालाच चालायचा हक्क आहे की काय ? हिंमत असेल, तर म्हण म्हणावं पुन्हा, माझी एकट्याची सडक आहे, म्हणून ! याचं टक्कल ठिकाणावर आणून याच्या बायकोपोरीला रस्त्यावर ओढत नेलं नाही तर आम्ही अस्सल अवलादीचे नाही !" म्हातारीने प्रतिज्ञा केली.

रस्त्यावर पडलेल्या सावलीवरदेखील हक्क सांगण्याची नीलमणीची हट्टी वृत्ती मला आवडली नाही. तीन दिवसांनी त्याने लावलेला बांबूचा तट्टा ओलांडून मी व्हरांड्यात गेलो, तर त्याचा मुलगा दिसला.

"काय चाललंय ?" मी विचारले.

"शिव्या ऐकतोय." तो उत्तरला.

"काय करणार ?" मी म्हणालो.

"तेच तर मी म्हणतोय. काही करता येत नाही. या नीच लोकांमुळे फार त्रास होतोय."

दोन दिवसांनी प्रकरण आणखी पेटले. त्या दिवशी मी संध्याकाळी सात वाजता घरी (म्हणजे माझ्या खोलीवर) पोहोचलो. शेजारी तोपर्यंत खेळात रंगून गेले होते. पण झाडावर दिवा जळत नव्हता. टेबललॅम्पच्या प्रकाशात खेळ चालू होता. व्हरांड्यात खुर्चीवर नीलमणी बसला होता. मला पाहाताच म्हणाला, "आज झाडावर दिवा लावलेला नाही. पाह्यलंत ?"

"हो, पाह्यलंय."

"दिवा लावला असता तर मी जीवच घेतला असता त्यांचा." झाडाऐवजी दिवा खाली लागल्याने त्या लोकांना मारता येत नाही, याचे नीलमणीला दुःख झाले असावे.

"पण कचाट्यात सापडतीलच कधीतरी. मग त्यांना चांगला धडा शिकवीन मी."

मी म्हणालो, "बघू या."

"तिचा फैसल्ला आज झाला." तो म्हणाला.

"कोणाचा फैसल्ला ?"

"ती कणसं विकणारी म्हातारी. त्राटिकेचा अवतार. तिला धडा मिळाला !"

"अस्सं ? काय झालं ?"

"म्युनिसिपालिटीच्या लोकांना मी म्हटलं, सडक तुमची आहे. तरी ते गप्प बसले. मग मी बीटवाल्याच्या हातात तीन रुपये दिले, तशी तो येऊन तिला फरफटत घेऊन गेला. नाहीतर म्हणत होती, माझादेखील हक्क आहे. तिचा कसला हक्क ?"

दुसऱ्या दिवशी रात्री मी घरी जरा उशिरा गेलो, तर नीलमणी रागाने फणफणत होता. व्हरांड्यात त्याची बायको आणि मुलगी खाली माना घालून अशा उदास बसल्या होत्या की जणु घरात कोणी मेलेच आहे ! मी तिथे पोहोचल्यावरदेखील नीलमणीने त्यांना आत जायला सांगितले नाही. याचा

अर्थ प्रकरण फारच गंभीर दिसते.

प्रत्यक्षात परिस्थिती भयंकर गंभीर होती.

त्या दिवशी दुपारी शेजाऱ्यांची मुले आंब्याच्या झाडाच्या फांद्यांना झोपाळा बांधून (झोपाळा कधीपासून बांधलेला होता, कोण जाणे) मजेत झोके घेत होती. नीलमणीने त्यांना झोपाळ्यावरून उतरायला आणि तिथून निघून जायला अनेकदा सांगितले. पण काही उपयोग झाला नाही. मग त्याने त्यांना, मारायची तयारी केली. त्यावर लोकांनी त्याला बजावले की, आमच्या जागेत पाऊल टाकले तर तंगडी मोडू. तो मारणार असल्याचे मुलांनी सांगितले, तेव्हा ते त्याच्यावर धावले. त्यांनी दगडफेक सुरू केली

"मारामारी नाही नं झाली ?"

मी मध्ये पडल्ये, बटा. नाहीतर डोकी फुटली असती," नीलमणीच्या बायकोने सांगितले.

कणसंवाली म्हातारीही पुन्हा आपल्या जागी आल्याचे कळले. पोलिसांना सांगितले, तेव्हा ते म्हणाले असावेत, "गरीब म्हातारी आहे, जाऊ द्या." तिच्याकडून आता पोलिसांना रोज दोन कणसे मिळतील, हेही पक्के ठरले.

"असा समझोता झाला नसता, तर तिची काय टाप लागली होती इथं पुन्हा येऊन बसण्याची ? बीटवाल्याविरुद्ध बिनसहीचा रिपोर्ट पाठवण्यात आला आहे. कोणी लिहिलाय कोण जाणे. ते जाऊ द्या. आता हा झोपाळा फासासारखा माझ्या गळ्याला लागलाय. यासाठी काय करावं ? पोलिसाकडे तक्रार करावी का ? पोलिसात तुमचं कोणी ओळखीचं आहे ?" नीलमणीने विचारले.

पोलिसांत ओळख असणे अधिकारी, सावकार आणि पैसेवाली मंडळी यांच्या फायद्याचे असते. पण आमच्यासारख्या लोकांना अशा ओळखीचा काय उपयोग ? उलट कधी कधी ते धोक्याचेच ठरते. तरीही पोलिसात माझ्या ओळखीचे कोणी नाही, आणि हेच मी नीलमणीला सांगून टाकले.

"तुम्ही तर पोलिस खात्यात काम करता नं ? तरीही तुमची कोणाशी ओळख नाही ?"

"मी मॅजिस्ट्रेटच्या न्यायालयात कारकून आहे."

"म्हणून काय झालं ?"

"मी नवीन आलोय्, त्यामुळे कोणाची ओळख नाही."

"तुमची ओळख असलीच पाहिजे. तुम्ही नाही म्हणू शकत नाही."

"तसा एखाद्याला ओळखतो मी."

"चरो आहेत ते ?"

"म्हणजे काय ?"

"म्हणजे, सल्ला देण्याची फी घेणार नाहीत ना ?"

"माहीत नाही, ते मी कसं सांगू ?"

शेवटी वकिलांचा सल्ला घेण्याचे काम नीलमणीने माझ्यावरच सोपवले. मी ते टाळू शकलो नाही.

वकिलांनी दिलेला पहिला सल्ला असा की, नीलमणीच्या झाडाच्या फांद्या त्या लोकांच्या आवारात जाता कामा नयेत. त्या लोकांनी त्या तोडून नीलमणीच्या घरात टाकून दिल्या, तर कोणालाही काही बोलता येणार नाही.

ते लोक खरोखरीच फांद्या तोडतील की काय, या विचाराने आम्ही दोघे घाबरलो. पण थोडा विचार करून नीलमणी म्हणाला, "नाही तोडणार."

"का नाही तोडणार ?"

"फांद्या तोडल्या, तर आंबे कसे मिळतील त्यांना ?"

"नाही तर नाही."

"तुम्हाला जगाची रीत माहीत नाही. आंबे तोडण्यासाठीच तर हा डाव आहे." असे डावपेच नीलमणीच्या चटकन् लक्षात येतात.

"मोलकरीण सांगत होती की, उद्या ते आणखी गडबड करणार आहेत," नीलमणीच्या मुलीने सांगितले.

या चकमकी पुढे गंभीर रूप धारण करणार, असे मला वाटू लागले.

आणि तसेच झाले !

म्हणजे असे झाले......

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी घरी गेलो, तेव्हा नीलमणी घरी नव्हता. रोज दारात खुर्चीवर बसून या पापी जगाकडे बारकाईने बघत बसण्याची त्याला सवय झाली होती. पण त्या दिवशी तो आपल्या जागेवर नव्हता. घरातूनही कोणाचा आवाज येत नव्हता. काहीतरी झाले असेल, असा विचार करून मी हलकेच दार उघडले आणि खोलीत गेलो. दाराचा आवाज ऐकताच त्याची बायको बाहेर आली.

"नीलमणीजी कुठं गेले ?" मी विचारले.

"काय सांगू, बेटा ? माझ्यानं बोलवत नाही."

"का ? काय झालं ?"

"आज इथं मुडदे पडले असते," ती सांगू लागली. . . .

"दुपारी एक वाजता ते घड्याळ दुरुस्त करीत होते. बाहेर गडबड झाली. जाऊन पाहिलं तर काय, लहान लहान मुलांची वानरसेनाच शेजारच्या घरी आली होती. आल्याबरोबर ती झाडावर चढली, झोपाळ्यावर बसून झोके घेऊ लागली. ह्यांनी त्यांना उतरायला सांगितलं तशी त्यांनी शिव्या द्यायला सुरुवात केली. खालच्या जातीच्या लोकांच्या तोंडूनसुद्धा अशा शिव्या आम्ही ऐकल्या नव्हत्या. इतक्यात आमच्या मुलीची मांजर–तू ती पाहिली असशील–उंदीरसुद्धा पकडत नाही, गरीब गाय आहे बापडी–ती चुकून त्यांच्यात गेली. त्याबरोबर त्या नीचांनी–लकवा होवो मेल्यांना–तिचं शेपूट धरून आमच्या जागेत का आलीस, कशी आलीस, असं विचारत तिला गरगरा फिरवलं. ही काय माणसांची पोरं ? पण मोठ्यांचीच फूस असल्यावर त्यात त्या पोरट्यांची काय चूक ? शेवटी मांजरीचा पाय मोडला. तिचं कण्हणं ऐकून आम्हाला राहावलं नाही. हे आता तिला घेऊन ठाण्यावर गेलेत."

"ठाण्यात का गेलेत ?" मी विचारले.

"काय सांगू बेटा ? आमच्या मांजरीचा पाय मोडला. आम्हाला नाही नाही त्या शिव्या दिल्या. आमच्या झाडाचं नुकसान केलं. हे सगळं त्यांनीच केलं नं ? इतकं करून त्यांनीच पोलिसांत तक्रार केली, आम्ही त्यांना मारलं म्हणून. मांजर ओरडू लागलं तेव्हा त्याची दशा पाहून आमची मुलगी बेशुद्ध होऊन पडली. ती मुलगी काठीनं त्या पोरांना कशी मारू शकेल ? आमच्या मुलीनं त्यांच्या मुलांना मारलं, म्हणून फिर्याद केलीय त्या लोकांनी. त्यांची अक्कल ठिकाणावर आहे का ? आता हेदेखील फिर्याद करायला गेलेत."

हे प्रकरण आमच्याच न्यायालयात येणार हे मला माहीत होते. त्यामुळे मी शान्तपणे झोपी गेलो. मध्यरात्री दारावर टकटक झाली म्हणून दार उघडले, तर मला तावडतोब घरी बोलावणारी तार होती–काही महत्त्वाच्या कामासाठी––

सकाळीच मी निघून गेलो. तीन दिवस मला गावी राहावे लागले. काम

संपले नाही, पण चौथ्या दिवशी सकाळी मला परत यावे लागले.

या गर्दीत मी आंब्याच्या झाडाचे प्रकरण पार विसरून गेलो. गाडीतून उतरून मी रिक्षाने नीलमणीच्या घरी पोहोचलो. रिक्षावाल्याला पैसे देऊन हातात बॅग घेऊन मी समोर पाहिले, तर शंका आली, हे दुसरे कोणाचे तर घर नाही ? पण नाही. नीलमणीचेच घर आहे हे ! मी चकित होऊन थोडा वेळ तसाच उभा राहिलो.

नंतर मी नीलमणीला बोलावून विचारले, "हे काय झालं नीलमणीजी ? आपण हे काय केलंत ?"

माझे बोलणे ऐकताच नीलमणीचा चेहरा धूळ उडविणाऱ्या गल्लीसारखा झाला. जणु तो मला मारणार अशी त्याची मुद्रा झाली. मग त्याने जे काही सांगितले, त्यांत चांगल्या गोष्टी कमी, वाईटच जास्त होत्या. त्याच्या तोंडून जणु धुळीचे लोट उडत होते.

त्याने सांगितलेला प्रकार थोडक्यात असा——

"मी मला वाटेल ते करीन. माझी मर्जी. तुम्ही कोण विचारणारे ? दुसऱ्यांचं सोडा. पण तुम्ही मला विचारणारे कोण ? हिंमत असेल तर जाऊन त्या नीचांना विचारा. मी केलेली फिर्याद खरी होती. मान्य आहे ना ? हे कोणी नाकारू शकेल का ? पण माझं भलं त्यांना पाहावलं नाही. खोटे-नाटे रिपोर्ट देऊन माझ्या घराच्या छपराला आग लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. माझ्या छायेत राहून माझे शेजारी आणि रस्त्यावरून जाणाऱ्या वेसवा-सगळे माझ्या आसऱ्याला राहून माझ्यावरच उलटले. माझं घर पेटवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. शेवटी त्यांनी मला बेवकूफ बनवलं. आता माझ्याजवळ ती छायाही उरली नाही. आंबे लागले तर हे लोक मला ते खाऊ देतील असं तुम्हाला वाटतं काय ? तुम्ही खात्री देता ? लिहून देता ? माझ्यावर हल्ला करण्यापासून त्या नीचांना रोखू शकता ? रस्त्यावरून येणारे-जाणारे आंबे तोडून नेतील. त्याला आळा घालण्यासाठी तुम्ही पहारा करू शकाल ? माझ्या फांद्या मला मिळणार नाहीत. जे मला मिळणार नाही, ते मी दुसऱ्यांसाठी का राहू देऊ ? लहानसं पान का होईना, माझं असलं तर ते मी दुसऱ्यांना देणार नाही. का द्यावं ? हे झाड जर तुमचं असतं, तर तुमच्याकडून त्याचं अर्धं पान तरी मला मिळालं असतं का ? म्हणूनच माझ्या

बसलूच मी हवं ते करीन."

आता नीलमणीशी वाद घालण्यात काही अर्थ नव्हता.

त्याच्या डोक्यासारखे आता सगळे घर भुंडे वाटते. समोरची मोकळी जागा स्मशानासारखी भासते. सगळ्या फांद्या छिन्नविच्छिन्न झाल्या आहेत. झाडाचे तुकडे तुकडे झाले आहेत. पाने सुकून वाऱ्यावर उडताहेत. सगळे घर कळाहीन स्मशानासारखे वाटते आहे. माझ्या खोलीत उन्हाने कळकळते आहे. रस्त्यावर बसणारी ती म्हातारी उन्हाने भाजून निघाली असेल.

मी तर दुसऱ्याच दिवशी खोली सोडली.

ही सगळी गोष्ट मी विस्ताराने सांगितली, ती यासाठी की--हे घरमालक, हे शेजारी, ही नालायक माणसे, ही भांडणे, या कोर्टकचेऱ्या, [इथले न्यायाधीश, वकील, फिर्यादी, पोलिस, तुरुंग, बेड्या, निष्पाप जिवांना बांधणाऱ्या या शृंखला हे सगळे पाहून मला वाटते की मनुष्यनामक हे क्षुद्र जीव आता बदलणार नाहीत, हे जग हा घोर नरक आहे, इथे आता काही होऊ शकत नाही. मला जगणे असह्य वाटले.

पण याचबरोबर......

लखलखते उन्ह, आईप्रमाणे ममता बरसणारे काळे मेघ, मोहरलेला आम्रवृक्ष, उन्हात हलके हलके चालणाऱ्या ग्रामकन्येचे मुखमंडल--हे सगळे आठवते. पावसाळ्यात तेथील लोक आठवतात, आनंदाने जिवापाड मेहनत करणारी जनता डोळ्यासमोर येते. झाडाच्या सावलीसाठी तडफडणारी ती म्हातारी मी विसरू शकणार नाही. अशा वेळी पुन्हा मनात येते, निराश व्हायचे कारण नाही. हा नरक आपण नाहीसा करू शकू, परिश्रमांनी आनंद निर्माण करू शकू. मग माझ्या मनात आशेची हलकीशी रेषा उमटू लागते.

आशाकिरण

—बाळ गंगाधर टिळक

वेंकटेश्वर्लू वणवण फिरत एक वाजून गेल्यावर घरी पोचला. त्याला कुठेही तांदूळ मिळाला नाही. आता आपल्याला तांदूळ मिळणार नाहीत, हे तो जाणून होता. कुठूनही तांदूळ आणण्याची त्याची परिस्थिती नाही तरीदेखील वेड्यासारखा भटकून आला. भूक, निराशा आणि हिवाळ्यातली दुपार—या तिहींनी, त्याला दिङ्मूढ करून टाकले. शेवटी तो तांदळाच्या एका दुकानाशी गेला—तांदूळ मागायच्या विचाराने.

विचारले, 'तांदूळ काय भाव आहे?' दुकानदाराने थोडा वेळ त्याच्याकडे विचित्र आणि संशयी दृष्टीने पाहून म्हटले, 'ऐंशी रुपये मण.'

'बरं,' असे म्हणून वेंकटेश्वर्लू मागे फिरला. वाटेत धर्मशाळेच्या ओट्यावर तो थोडा वेळ बसला. मातीच्या भांड्यात भिकारी अन्न शिजवीत होते. त्याने त्यांच्याकडे मोठ्या आशेने आणि असूयेने पाहिले. त्याच्या डोळ्यात पाणी आले. लहानपणी तो रडला की आई जवळ बोलावून त्याला उगी करायची. आता बायको त्याच्यावर ओरडते आणि मुले कावरीबावरी होऊन त्याच्याकडे पाहू लागतात. तो भुकेने रडत नाही, तांदूळ न मिळाल्यानेही रडत नाही. आपल्या असहायतेचे, आपल्या नाकर्तेपणाचे त्याला रडू येते आहे. त्या रडण्यात बळ नाही. हृदय फाडून बाहेर पडणारा आणि जग दणाणून सोडणारा तो आक्रोश नाही. चिखलातल्या गांडुळावर कोणाचा पाय पडल्यावर असहायपणे, निःशक्तपणे चिरडून मरणाऱ्या त्या गांडुळाप्रमाणे तो रडतो आहे. नाकर्तेपणाची ती असह्य वेदना आहे.

डोळे चोळून जरा वेळ इकडे-तिकडे भटकून तो पुलावर पोहोचला, मग कालव्याच्या काठाने थोडे चालत जाऊन तो माघारी फिरला. आणि पुन्हा गावाकडे निघाला. शेवटी तो सरळ घरी गेला. या सगळ्या लोकांना काय सांगावे? घरातली ही सगळी माणसे—बायको आणि पाच मुले—भुकेने तडफडून मेली, तर कदाचित तो सुखाने श्वास घेऊ शकेल. मग कोणी,

तांदूळ आणले नाहीत का म्हणून विचारणार नाही. त्याच्याकडे तुच्छतेने, तिरस्काराच्या दृष्टीने पाहाणारे कोणी राहाणार नाही. पण ती मेली नाहीत. वाटेत जमिनीवरच बायको झोपली आहे. नवऱ्याची चाहूल लागताच तिने डोळे उघडले आणि विषण्णपणे पुन्हा मिटून घेतले. दीर्घ सुस्कारा टाकून तो आतल्या खोलीकडे जाऊ लागला. मोठी मुलगी जया धाकटचा बाळाला मांडीवर झोपवून तिथे दाराजवळच भिंतीला टेकून बसली आहे. सुकलेल्या ओठांनी ती छताकडे पाहाते आहे. बाकीच्या मुलांचा काही पत्ता नाही. वेंकटेयवर्लू मुलीची नजर चुकवून परसात गेला. विहिरीतून पाणी काढून त्याने हात-तोंड धुतले आणि बदामाच्या झाडाखाली तो जाऊन बसला.

आपण अशक्त होत चाललो आहोत, असे त्याला वाटले. क्षणभर विहीर, झाड, झाडावर बसलेला कावळा—सगळे गरकन फिरले. तेथेच पाचोळ्यावर तो लवंडला. आपले प्राण चालले आहेत असे त्याला वाटले. तो घाबरला. तसा मरण्याचा विचार त्याच्या मनात अनेकदा आला होता. पण असे पूर्व-सूचना न देता मरणे त्याला नाकर्तेपणाचे वाटले. 'मी नालायक आहे, एकदम नालायक आहे, अजिबात नालायक आहे,' असा त्याने मनातल्या मनात आक्रोश केला आणि खळकन् त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळले.

तांदळाच्या दुकानदाराला जर त्याने केविलवाण्या स्वरात म्हटले असते, 'शेटजी, मी गरीब माणूस आहे, दोन दिवसांचा भुकेला आहे, थोडे तांदूळ द्याल, तर मोठी मेहेरबानी होईल,'——तर त्याने तांदूळ दिले असते कदाचित. पण हे लहानसे काम तो का करीत नाही ? कारण तो निरुद्योगी आहे. भीक मागणारे जगताहेत, कावळे व गाढवेदेखील जगताहेत. जगायला नालायक आहे फक्त तो !

त्याला वाटले होते, घरी जाताच बायको आपली हजेरी घेईल. पण ती काहीच बोलली नाही. त्याला शंका आली——या लोकांनी कदाचित कुठून तांदूळ आणून जेवण तर केले नसेल ? असे असेल, तर मला का नाही जेवू घालीत ? कोणी मला जेवायला बोलावलेदेखील नाही. त्याच्या मनात आशा जागी झाली. हळूच उठून तो गुपचूप स्वयंपाकघरात गेला. भाताच्या भांड्या-वरचे झाकण उघडून पाहिले: त्यात भात आहे, थोडी चटणी आहे. इकडे तिकडे दबकत बघत त्याने चटणी-भात कालवला आणि घास घेणार, तेवढ्यात

फटकन् दार उघडून त्याची बायको तिथे आली आणि त्याचा हात धरून तिने त्याला बाहेर ओढीत नेले.

"सकाळपासून तांदूळ आणायला गेला होतात, ते आत्ता आलात? माझ्या मुलांचा काही विचार केलाय तुम्ही? थोरल्या मुलीनं बिचारीनं चार घरी तोंड वेंगाडून अर्धा शेर तांदूळ आणले. काल रात्रीपासून मुलांनी काही खाल्लं नव्हतं. आतापर्यंत उलथले असते म्हणजे तुम्हाला आनंद झाला असता! तुम्हाला काय चिन्ता आहे? कुठंतरी काहीतरी गिळलं असेल. धाकटा मुलगा बिचारा गेलाय कुठून तरी ताक आणायला. त्याच्यासाठी ठेवलेलं खाणं तुम्ही चोरून येऊन खाता काय? मुलाच्याच तोंडचा घास ओढता?"

ती कडाडू लागली. पण दुसऱ्याच क्षणी ती अतिशय खिन्न झाली आणि मुसमुसून रडू लागली. वेंकटेश्वर्लूच्या शरीराचा कणन् कण वेदनेने कळवळला. तोंड बेचव झाले. त्याला स्वतःचाच तिरस्कार वाटू लागला. त्याला बायकोची दया आली. ती सासरी आली तेव्हा अतिशय शांत आणि गोड स्वभावाची होती. आता ती अशी बदलून का गेली आहे, याचे कारण त्याला माहीत आहे. तिचे सांत्वन करावे, तिला समजवावे असे त्याला उत्कटतेने वाटले. पण मग तो बाहेर निघून गेला.

पुन्हा धर्मशाळेजवळ जाऊन तिथल्या एका ओटयावर तो कोपऱ्यात बसला. काही भिकारी ओटयावर पडून आपसात बोलताहेत. आपापले कपडे आणि भांडी प्रत्येकाने जवळच ठेवली आहेत. फाटके-तुटके घाणेरडे कपडे, विस्कटलेले केस, लाज राखू न शकणाऱ्या कपडयांतली धुळीने माखलेली शरीरे—गटारातल्या किडयांसारखे ते तिथे गर्दीगर्दीने पडले आहेत. वेंकटेश्वर्लूने एकदा स्वतः-कडे, स्वतःच्या कपडयांकडे पाहिले. त्या भिकाऱ्यांत आणि आपल्यात त्याला विशेष फरक वाटला नाही. पण ते जगताहेत, काहीही करून जगताहेत. अशा हीन-दीन अवस्थेत कशाला जगायचे? जगण्याचीही आसक्ती, हा मोह कशासाठी?

आंधळे-पांगळे असूनही रस्त्याच्या धुळीतून सरकत सरकत लोकांपुढे आपल्या दयनीय अवस्थेचे वर्णन करून त्यांच्या दयेवर जगण्याची ही लालसा का? जीवनाबद्दलच्या या आकर्षणाचे रहस्य जणु आपल्याला कळले, असे त्याला एकदम वाटले. ही सगळी फसवणूक आहे, थोतांड आहे. गळाने मासा पकडावा

त्याप्रमाणे या लोकांना अडकवून त्यांना कधी पाण्यात बुडवत तरी कधी आशा दाखवत कोणी तरी या सर्वांना हळूहळू मारते आहे, रडवते आहे, तुकडे तुकडे करते आहे.

वेंकटेश्वर्लूने मोठा सुस्कारा सोडला. त्याने मरायचा निश्चय केला. जगण्याहून भयंकर वेदना या जगात दुसरी कोणतीही नाही, असे त्याला वाटले आता आपण जगू शकत नाही आणि कुटुंबालाही जगण्यासाठी आधार देऊ शकत नाही. आपण कुचकामी आहोत. अशा अभागी, नालायक लोकांना देव जन्मालाच का घालतो ? धर्मशाळेच्या भिंतीस टेकून बसल्या बसल्या तो आपल्या आयुष्याकडे पाहू लागला.

त्याची नोकरी गेली, त्याच दिवसापासून त्याच्या जीवनाची अशी परवड सुरू झाली. प्राथमिक शाळेत तो शिक्षक होता, तेव्हा संसार कसा तरी चालत होता. पण त्याचा मूर्खपणा, वेडेपणा नडला. नाहीतर स्कूल इन्स्पेक्ट्रेसचा पदर त्याने कशाला ओढला असता ? आपला गैर हेतू नव्हता, असे त्याने कितीही सांगितले, तरी त्यावर विश्वास ठेवणार कोण ? शाळा-तपासणीचे दोन दिवस ती त्याच्याशी हसून खेळून का वागत होती ? कोणत्या तरी कामाच्या निमित्ताने ती त्याला वारंवार घरी का बोलावत होती ? त्याला वाटले, आपल्याबद्दल बाईसाहेबांचे चांगले मत आहे, त्यांची आपल्यावर मर्जी आहे. शेवटच्या दिवशी ती त्याच्या वर्गावर गेली, तेव्हा तो झोपला होता. खरे म्हणजे त्याच वेळी त्याचा डोळा लागला होता. ती नाराज होऊन त्याला भले-बुरे बोलू लागली. मुलांना प्रश्न विचारू लागली, तशी सगळेच्या सगळे चकित होऊन उभे राहिले. तिने दुर्गावतार धारण केला. सगळ्या शिक्षकांदेखत, "हे काही गुरं चारण्याचं काम नाही, वेंकटेश्वर्लू. मी आपल्याविरुद्ध रिपोर्ट करणार आहे," असे म्हणून ती निघून गेली. तो घाबरून गेला. "मॅडम, मॅडम" म्हणत रस्त्यावरून तिच्या मागे धावू लागला. ती त्याच्याकडे लक्ष न देता पुढे जात राहिली, तशी घाबरून त्याने तिचा पदर धरला आणि "मॅडम" म्हणत तो ओढला. तिचा पदर ढळला. सगळे लोक हसू लागले. "ब्रूट ! बीस्ट !" असे म्हणत विलक्षण संतापून ती निघून गेली. झाले. त्याची नोकरी हिरावून घेण्यात आली.

तसा पदर धरणे आणि ओढणे चूक होते, हे त्याला चांगले कळत होते.

पण घाबरून जाऊन आपण काय करतो आहोत हे त्याचे त्यालाच समजत नव्हते. त्याचा उद्देश केवळ तिला थांबवून विनंती करण्याचा होता. पण दुर्दैव त्याचे ! म्हणून तर त्याची बायकोसुद्धा त्याला नालायक आणि तुच्छ मानते.

मग तो काही शिकवण्या करू लागला. पण तेही जमले नाही. त्याच्यात काय उणे होते, कोण जाणे, पण एका मागोमाग एक सगळ्यांनीच त्याच्याकडे जाणे सोडून दिले. अनेक ठिकाणी नोकरीसाठी प्रयत्न केले. पण यश मिळाले नाही. मिळालेली कोणतीही नोकरी टिकली नाही. स्वाभिमान गुंडाळून चित्रपटगृहांत तिकिटे विकायचेही काम केले. पण तिथेही तो टिकला नाही. घरोघर जाऊन पापड आणि सांबर पावडर विकण्याचा प्रयत्न केला. पण कोणीच खरेदी केली नाही. त्याच्यात विक्री करण्याचे कौशल्य नाही. शेवटी त्याची बायको लोकांकडे स्वयंपाक करून मुलांचे पालन-पोषण करू लागली. लोक त्याची निंदा करू लागले. म्हणत, "भीक माग, चोरी कर, पण बायकोला बाहेर कसं पाठवतोस ?" गावोगाव जाऊन त्याने लोकांकडे पैसा मागितला पण त्याची मागण्याची पद्धत पाहून लोक त्याच्याकडे संशयाने पाहू लागले. काही ठिकाणांहून रिक्त हस्ताने परत यावे लागले. त्यानंतर चोरी करण्याचा प्रयत्न केला. रेल्वेस्टेशनवर आधी सुरुवात केली. एक दिवस धीर करून डब्यात घुसणाऱ्या गर्दीत कोणाच्या तरी खिशात हात घातला. त्याने त्याला पकडले आणि लोक त्याला मारू लागले. एवढ्यात त्याच्या ओळखीच्या एका शिक्षकाने मध्ये पडून त्यांना सांगितले, काही तरी चूक होत आहे, हा असा माणूस नाही. नाहीतर त्या लोकांनी त्याला जिवंत सोडले नसते.

त्याने चाळिशी ओलांडली आहे. तरीदेखील आपला स्वभाव आणि संस्कार याविरुद्ध उपजीविकेसाठी त्याने अनेक हलकीसलकी कामे केली. पण अपमान आणि यातनाच त्याच्या वाट्याला आल्या.

आता असे किती दिवस जगणार ? कुटुंबाला त्याचा कसला आधार आहे ? भीषण असहाय्यतेने तो व्याकुळ झाला. आपण अंधारात कोसळत खोल पाण्यात बुडतो आहोत, असे त्याला वाटू लागले. अशक्तपणामुळे त्याचे हात-पाय गळून चालले आहेत. डोक्याची विचारशक्तीही क्षीण होत चालली आहे.

अशा प्रकारे तो पडला असतानाच "बाप्पा !" या हाकेने त्याची झोप उडाली. त्याने डोळे उघडून पाहिले, तर त्याचा मोठा मुलगा—दहा वर्षांचा—

म्हणत होता, "आई बोलावत्येय."

"कशाला ?"

"खायला."

"काय खायला ?"

"घारगे."

वेंकटेश्वर्लू मुलाच्या मागोमाग निघाला. त्याची बायको दाराशीच त्याची वाट पाहाते आहे.—"चला, चार घारगे खाऊन घ्या," ती मोठ्या उत्साहाने म्हणाली, "सूरम्माच्या घरी आज देवीची पूजा होती. आम्ही सगळे तिकडंच घारगे खाऊन आलो. आता उद्यापर्यंत पाहायला नको. मी तुमच्यासाठी हे घारगे साडीत लपवून आणले." बायकोने आणलेले घारगे खाताखाता वेंकटेश्वर्लूला वाटले, "या बाईच्या मनात अजूनही प्रेम आहे, दया आहे, नवऱ्याच्या खाण्या-पिण्याची चिंता आहे." त्या भावनेने त्याला गदगदून आले. त्याने घारगा तोंडात टाकला, पण त्याला त्याचा स्वाद जाणवत नाही. भुकेने व्याकुळ झालेली त्याची जीभ सुकून गेली आहे. तरीही घाईघाईने घारगे खाऊन तो पाणी प्याला. अंधार पडतोय. तो घरामागच्या ओटयावर चटई टाकून लवंडला. बदामाच्या झाडाच्या फांद्यांतून दोन चांदण्या दिसताहेत. शेजारच्या घरातून गाणे ऐकू येते आहे. काळ्या वाळूप्रमाणे अंधार टप टप झिरपत होता. त्या गीताबरोबर तो जणु त्याच्या अंगांगास खुपतो आहे. निराशेने धुंद होऊन तो झोपी गेला.

थोड्या वेळाने, बायकोने त्याला जागे केले. तो उठून बसला आणि म्हणाला, "काय आहे ?"

"नऊ वाजताहेत. जया आणि धाकटी संध्याकाळी बाहेर गेल्या होत्या. अजून परत आल्या नाहीत."

"अससं."—मला हे कशासाठी सांगते आहे ही ?

"अससं म्हणून कसं चालेल ? त्यांचं काय झालंय कोण जाणे. असं परक्या-सारखं 'अससं' काय म्हणता ?"

मग शिव्या सुरू झाल्या. आयुष्यभर फक्त शिव्याच शिव्या. कधीतरी पळ-अर्धा पळच ती प्रेमाने बोलते, नंतर पुन्हा रागावणे, दटावणे, फडाफडा बोलणे सुरू करते. त्यात तिचा तरी काय दोष ? घरात भुकेली मुले

आक्रोश करू लागतात, तेव्हा तिचे काळीज फाटते. मग ते कठीण बनते आणि नवऱ्याच्या नालायकपणावर, त्याच्या दगड बनलेल्या हृदयावर डोके आपटून रडू लागते.

अश्रू गाळीत त्याची बायको बोलू लागली——

"सतरा वर्षं पूर्ण झाली तिला. अजून बिचारीला आनंद कसा तो माहीत नाही. शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे जाऊन 'आमच्याकडे हे नाही, ते नाही' असे म्हणून त्यांच्याकडून मागून सगळ्या वस्तू आणून देते आपल्याला. शहाणी मुलगी आहे—लग्नाचं नावसुद्धा काढीत नाही; पोटभर खाणंसुद्धा नाही; लहानग्या भावांना पाहून मन कळवळतं तिचं. मला म्हणते, 'बाबा भोळे आहेत. त्यांना काही सांगू नको. ते तरी बिचारे काय करणार?' मुलांना ताप आला की स्वतः त्यांना वैद्याकडे घेऊन जाते. घरात तिला नेहमी दुःखच दिसतं. माझ्याकडे आणि या स्मशानासारख्या घराकडे पाहून फार कष्टी होते. म्हणून मग इकडे-तिकडे फिरून येते. काय करू सांगा. मला कुठं स्वैपाकाचं कामही नाही मिळालं."

ती हुंदके देत रडते आहे. धारदार सुरीने कोणीतरी सफाईने आपले पोट कापते आहे, असे त्याला वाटले. जीव द्यायचा आपला निश्चय त्याला बायकोला सांगायचा होता. पण पुन्हा वाटले, जर ती 'पीडा टळेल' असे म्हणाली, तर मरतानादेखील सुखाने प्राण जायचा नाही.

तो चटईवर पडला आहे. दोन्ही मुली घरी आल्या आहेत. ती रडणे थांबवून आत निघून गेली. तो अंधारात बसून विचार करतो आहे, बरोबर आहे. जयाचे लग्न झाले तर निदान ती तरी सुखात राहील. पण तिच्याशी लग्न कोण करील ? लग्न कसे होईल ? जया फार सुंदर नसली, तरी कुरूप पण नाही. इतकी गरीबी आणि कष्ट सोसूनही तिच्यात यौवन पुरेपूर फुलून आले आहे. उंचीमुळे ती आकर्षकही दिसते. पण गरिबाच्या मुलीशी कोण लग्न करणार ? बिजवर-तिजवरही चालेल. . . पण मूठभर तांदूळदेखील कमावण्याची माझी लायकी नाही, तो मी माझ्या मुलीसाठी वर कुठून आणू ? मला काही प्रतिष्ठा असेल तर एखादा म्हातारा का होईना इथे पाऊल टाकायला तयार होईल. . .

आपल्याजवळून उंदीर जात असल्याचे त्याला कळते. तरी तो झोपी गेला.

: २ :

दोन दिवसांपासून वेंकटेश्वर्लूंने घरी जाणे सोडून दिले आहे. याच काळात त्याचा धाकटा मुलगा आजारी पडला, अतिशय आजारी पडला. उलट्या-जुलाब होऊ लागले. . . .इकडे-तिकडे फिरून तो घरी गेला, तोपर्यंत त्याला याचा पत्ता नव्हता. मुलाचे हात-पाय गार पडले, तेव्हा जया त्याला इस्पितळात घेऊन गेली होती. बायको घरात पडली होती. ती रडत असावी. पण वेंकटेश्वर्लूच्या ते लक्षात आले नाही. घरांत शिरताच तो बायकोला म्हणाला, "भूक लागलीय, कुठं तांदूळ मिळाले असले, तर थोडं जेवायला घाल."

गेले काही दिवस त्याने कधीही जेवायला मागितलेले नव्हते. कोणी जेवायला बोलावले तर जाऊन जेवून घेतो. नाहीतर आज कोणाला जेवायला मिळणार नाही, असे समजून गुपचूप पडून राहातो. पण आज त्याला काय झाले, कुणास ठाऊक. जीवनमरणाच्या सीमेवर तडफडणाऱ्या मुलाच्या चिन्तेत पडलेल्या आपल्या बायकोला त्याने विचारले, "जेवू घालणार ?"

ती एकदम भडकली. विस्कटलेले केस आणि लाल झालेले डोळे. . . ती एकदम ओरडली ? "शी : ! पशू आहात अगदी !" आणि असे म्हणत जवळचा तांब्या तिने नळ एकवटून त्याच्यावर भिरकावला. पण नेम चुकून तो तांब्या जवळच्या दारावर आपटला आणि जोरात आवाज झाला. तो चकित झाला. त्याच्या काही लक्षात येईना. बायको जमिनीवर गडबड लोळत "बेटा. . .बेटा" म्हणून रडते आहे. मेला की काय ? त्याला भय वाटले. घरातले सगळे लोक आपल्या भोवती जमून "तुम्ही खुनी आहात" असे म्हणताहेत, आणि पोलिस येऊन आपल्याला फरफटत नेताहेत, असे त्याला भासले. तो लगबगीने घराबाहेर पडला.

त्याला सगळ्या – सगळ्यापासून दूर पळून जायचे होते. रात्रभर त्याने रस्त्यांवर भटकत, इथे-तिथे बसत वेळ काढला. मन म्हणत होते : कुठे पळून जाऊ ? कोणापासून पळून जाऊ ? अचानक डोक्यात लखकन् उत्तर चमकले– स्वतःपासून, स्वतःच्या आयुष्यापासून. दुसरा मार्गच नाही. आता मरणाचाच आसरा आहे. मरण्यात सुख आहे. सगळ्या समस्या मृत्यूच सोडवू शकेल. धर्मशाळेच्या ओट्यावर त्याने अंग टाकले. कसे मरायचे, कधी मरायचे, सगळे त्याने पक्के करून टाकले. आता आपण जगू शकणार नाही, आपले कुटुंबही

जगू शकणार नाही. जगण्याचा काही मार्गच सुचत नाही. आपण काही करू शकत नाही, हे तर याच्यापूर्वीच सिद्ध झाले आहे. या निरुपयोगी आयुष्याचा कोणालाही फायदा नाही. उद्या रेल्वेगाडीखाली डोके ठेवणे हाच एकमेव उपाय आहे. मरण्याच्या मार्गाचा विचार करता करता त्याला झोप लागली.

सकाळी उन्हे पडली तेव्हा वेंकटेश्वर्लूची झोप उडाली. सगळे भिकारी निघून गेले होते. त्यांची मातीची भांडी उन्हात चमकताहेत. वेंकटेश्वर्लूला एकवार आपल्या बायकोला आणि मुलांना पाहायचे होते. आपल्या मोहल्ल्याच्या कोपऱ्यापर्यंत तो गेला. पुढे जाण्याचा त्याला धीर होईना. बायकोने घरात येऊ दिले नाही तर ? समोरून शेजारचा मुलगा चालला होता, त्याला थांबवून विचारले, "अरे बाळ, आमचा लहान मुलगा आजारी आहे. आता तो जिवंत आहे की मेला आहे, तुला माहीत आहे का ?"

"वाचला तो. काल संध्याकाळी इस्पितळातून परत आला," एवढे सांगून तो मुलगा निघून गेला.

"असू दे," असे म्हणून वेंकटेश्वर्लू मागे फिरला. पुन्हा धर्मशाळेच्या ओटयावर तो जाऊन बसला. त्याला लहानपण आठवले. त्याला थोडेसे लागले तरी आई मोठ्या मायेने, काळजीने त्याची शुश्रूषा करायची. आता तसे कोण करणार ? "वेंकू बेटा, तुझा चेहरा असा का झाला आहे ? काय झालं बेटा ? घे, हे दूध पी !" आता असे म्हणणारे कोणी नाही. त्याला रडू कोसळले. मरायला निघालेल्या वेंकटेश्वर्लूला स्वतःचीच दया आली. खूप वेळ तो रडत राहिला. दुपारच्या वेळी धर्मशाळेचा मुनीम बाहेर जाताना त्याला दोन केळी देऊन गेला होता. दोन्ही केळी खाऊन तो पाणी प्याला आणि भिंतीला टेकून बसून राहिला.

संध्याकाळ होऊ लागली, तसे त्याला भय वाटू लागले. आता त्याने मरणे अपरिहार्य आहे. हा निर्णय आता बदलणार नाही. पण मनातल्या मनात कोणती तरी वेदना, ममता त्याला त्रस्त करते आहे. दात घट्ट दाबून आणि डोळे मिटून तो बसून राहिला. बालपण, कुटुंब, मुले, शाळा, ती इन्स्पेक्ट्रेस . . . त्याच्या मनःचक्षूपुढून सगळा चित्रपट सरकू लागला. रस्त्यावरून काही माणसं एक प्रेत नेत होती. ते त्याला पाहावेना. त्याने तोंड फिरवले. त्याला पुन्हा भूक लागू लागली.

भुकेने आणि अशक्तपणामुळे सगळे शरीर आखडल्यासारखे वाटते आहे. त्याने पुन्हा मरण्याचा निश्चय केला.

अंधार पडताच तो उठून उभा राहिला. आता रेल्वेगाडी यायला आणि त्याने मरायला फक्त एकच तास बाकी आहे. तो भरभर चालू लागला. पूल ओलांडून तो शेतांतून जाऊ लागला. तेथे रूळाजवळून जाणारे-येणारे लोक कमी असतात. स्टेशनपासून ती जागा सुमारे मैलभर लांब असेल. दोन्ही बाजूला घनदाट वृक्ष उभे आहेत. आगगाडी तेथे वळण घेते. तेथे डोके ठेवले तर गाडी आल्याचे जाणवणारही नाही. अचानक वळून गाडी त्याच्या अंगावरून कधी निघून जाईल, ते कळणारसुद्धा नाही. मन घट्ट करून वेंकटेश्वर्लू शेतांतून चालला आहे.

संध्याकाळचे लाल ढग आता काळे होत आहेत. ते ढग, काळी काळी बाभळीची मोठाली झाडे, कण्हणारा वारा, रानकिड्यांचे आणि पक्ष्यांचे आवाज--सगळे जणू त्याला "मरून जा, मरून जा," असे सांगताहेत. सगळा निसर्ग त्याच्या मरणावर टपला आहे, त्याला मरायला भाग पाडतो आहे, असे वाटू लागले.

"अरे वेंकटेश्वर्लू, जरा थांब नं," मागून आवाज आला.

मागे पाहिले. सूर्यनारायण सायकलवरून चालला आहे. वेंकटेश्वर्लू थांबला. शाळा सुटल्यावर सूर्यनारायण याच शेतांतून मधल्या वाटेने सासुरवाडीला जातो, हे वेंकटेश्वर्लूला माहीत आहे.

"इकडं कुठं निघालास, वेंकटेश्वर्लू ?" सूर्यनारायणाने विचारले. वेंकटेश्वर्लूने काहीच उत्तर दिले नाही. वेंकटेश्वर्लू पूर्वी ज्या शाळेत होता, तेथेच सूर्यनारायण शिक्षक आहे.

"तुला काही अक्कल आहे का? माणूस आहेस का तू?" सूर्यनारायणाने रागाने विचारले.

वेंकटेश्वर्लू सुन्नपणे पाहात राहिला. त्याला सूर्यनारायणाचा राग आला नाही. खरे म्हणजे, तो काय बोलतोय हेच वेंकटेश्वर्लूला समजलेले नाही.

"आपल्या जातीची, प्रतिष्ठेची तुला अजिबात पर्वा नाही. तुझ्यामुळे आमची अब्रू जाते आहे. ताठ मानेने आम्हाला रस्त्यावरून फिरता येईनासं झालंय. शी: ! लाज वाटली पाहिजे तुला. आपल्या मुलीला खुशाल रस्त्यावर सोडून

देतोस ? कुत्र्यासारखी ती धारोदार फिरते आहे. आज सूर्य लॉजमधून तिला बाहेर पडताना पाहून मी थक्क झालो. तो श्रीधर आहे नं–वेंकाण्णा ! त्याला विचारले, तर म्हणाला, पंधरा रुपयांवर त्या एजंटबरोबर तिचा सौदा झालाय म्हणून. माझी मुलगी असती नं, तर तिथं रस्त्यावरच तिचे तुकडे करून टाकले असते. या वयातसुद्धा तुला आपल्या घरातल्या लोकांना कह्यात ठेवता येत नाही, तर त्यात काय अर्थ आहे ? यापेक्षा मरून जाणं चांगलं. तू मात्र अजूनही स्वतःला जगायला लायक समजून जगतो आहेस. मी तुझ्या जागी असतो, तर गाडीखाली डोकं ठेवून केव्हाच जीव दिला असता. थीः ! बेशरम. हे काय आयुष्य आहे ?" असे म्हणून सूर्यनारायण जमिनीवर थुंकला आणि त्याने सायकलवर टांग मारली.

वेंकटेश्वर्लू स्तंभित होऊन सूर्यनारायणाच्या दिशेने पाच मिनिटे वेड्यासारखा पाहात राहिला. मग हळूहळू त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नता पसरली. त्या निर्जन शेतांत तो एकदम हसत सुटला. तो मनाशीच म्हणाला, "आता मला मरायची गरज नाही." समुद्रात बुडणाऱ्याला नावेचा आधार मिळावा, तसे त्याला वाटले. वेड्यासारखा तो मनातल्या मनात आनंदून गेला होता. कोणाला तरी हृदयाशी धरून त्याला आपल्या नशिबाची कहाणी सांगावीशी त्याला वाटत होती. इतक्या दिवसांनी त्याच्या आयुष्याला रस्ता सापडला आहे, जगण्यासाठी आधार मिळाला आहे. आता त्याला मरायची गरज नाही.

वेंकटेश्वर्लू मागे वळून आनंदाने चालू लागला. आता तो दुर्बळ नाही. अंधारात शेते पार करीत तो घरी पोचला. वाटेत कोणी नाही. खोलीत जाऊन पाहिले, तर बायको–मुले झोपली आहेत. अरे, या कोणाला माझी आठवणसुद्धा नाही काय ? माझे अस्तित्वदेखील ही विसरली ? त्याला राग आला. तो मागच्या ओट्यावर जाऊन बसला. बदामाच्या झाडाच्या फांद्यांत अंधार साकाळला आहे. फांद्यांतून दोन चांदण्या चमकताना दिसताहेत.

"बाप्पा, चला जेवायला," हा आवाज ऐकून वेंकटेश्वर्लूने मान वर करून पाहिले. त्याची बारा वर्षांची मुलगी त्याला बोलावत होती. तो उठून तिच्या मागोमाग स्वयंपाकघरात गेला. ताटात भात वाढला आहे–भाजी, चटणी आणि रसम. वाः ! किती स्वादिष्ट जेवण आहे ? पोटभर जेवून वेंकटेश्वर्लूने ढेकर दिला.

अर्ध्या रात्री वेंकटेश्वर्लूला अचानक जाग आली. कसल्या तरी अभूतपूर्व सुखाचा आणि समाधानाचा त्याला अनुभव आला होता. सगळ्यांना उठवून त्यांच्याशी खुषीत गप्पा माराव्यात असे त्याला वाटत होते. लहानपणी शिकलेले जयदेवाचे गीत गावेसे वाटत होते. एकदम त्याच्या लक्षात आले की, आपल्याकडून एक चूक झाली आहे. या सुखासमाधानास कारणीभूत असलेल्या मोठ्या मुलीचे आपण अजून आभार मानलेले नाहीत. तिला सांगितले पाहिजे, 'बेटा, मी तुझ्यावर फार खूष आहे.'

तो इतका कृतघ्नपणा कसा करील? त्याने खोलीत जाऊन पाहिले–जया तिथे नाही. चहूकडे पाहिले–जया नाही. मागचा दरवाजा उघडून पाहिले–मागे बदामाच्या झाडाखाली जया बसली आहे. चवथीच्या चन्द्राच्या मंद प्रकाशात तिचा चेहरा अंधुक दिसतो आहे. ती गुडघ्यांत तोंड घालून बसली आहे.

वेंकटेश्वर्लूने तिच्या दिशेने पाऊल उचलले. पण तितक्यात तिच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. त्याला काही कळेना. मिनीटभर तिच्याकडे पाहून हलक्या पावलांनी तो माघारी फिरला आणि घरातल्या जमिनीवर त्याने अंग टाकले–"आता नको, नंतर कधीतरी मी माझी कृतज्ञता व्यक्त करीन."

असा संकल्प करून त्याने डोळे मिटून घेतले.

***

व्हायोलिन

—चागंटि सोमयाजुलु

राज्यम एकदम बेभान होऊन पडली आहे. जगाचे तिला भानच नाही. वेंकटप्पय्याचा जीव कासावीस होतो आहे. त्याने आपल्या पत्नीजवळ जाऊन तिच्याकडे लक्षपूर्वक पाहिले.

राज्यमचे ओठ हलताहेत. ती काही बोलते आहे. तिचे बोलणे ऐकू येत नाही, पण ती मनातल्या मनात काहीतरी म्हणते आहे.

"राज्यम !" त्याने घाबऱ्या स्वरात हाक मारली. पण ती काही बोलली नाही. ती या जगातच नाही. मन मुग्ध करणाऱ्या तोडी रागिणीबरोबर ती आकाशात संचार करते आहे.

अंगणात मुले गडबड करताहेत.

"अरे कार्ट्यांनो ! किती ओरडताय !" वेंकटप्पय्याने मुलांना दटावले. ती त्याच्या जवळपास असती, तर त्याने त्यांना मारलेच असते.

"अग बाई, किती दचकल्ये मी ! मुलांवर असे काय तुटून पडता ?" राज्यम् भानावर येत म्हणाली, आणि भुवया वर चढवून पतीकडे रागाने पाहू लागली.

"तुझी प्रकृती कशी आहे ?" त्याने व्याकुळ स्वरात विचारले.

"तुम्ही मुलांना का रागावलात ?"

"रागावलो म्हणून काय झालं ? तुझी प्रकृती कशी आहे, ते आधी सांग."

"चांगली आहे प्रकृती. ती बिघडली होतीच कधी ?"

"मग मी कितीतरी हाका मारल्या, तरी बोलली नाहीस ती ?"

"तुम्ही हाका मारल्या ?"

"नाहीतर काय ?"

"अस्सं !" म्हणून राज्यम् हसली. तिला हसताना पाहून भीती वाटते. बुबडाप्रमाणे बाहेर आलेले डोळे आणि समोर आलेले मोठेमोठे दात यामुळे तिचा चेहरा आणखीनच भयंकर दिसतो आहे.

"मी जरा बेहोष झाल्ये होत्ये," राज्यम पुन्हा हसली.

"बस, एवढंच नं ?" असे म्हणून वेंकटप्पय्याने सुटकेचा श्वास सोडला. राज्यम बऱ्याच दिवसाच्या टायफॉइडनंतर बरी होऊन नुकतीच कुठे हिंडू-फिरू लागली होती. खाणे-पिणे सुरू करून अजून आठवडादेखील झाला नव्हता. त्यामुळे वेंकटप्पय्याचे मन अजूनही स्वस्थ नाही. राज्यमचा टायफॉइड तीन आठवड्यांनी उतरला आणि पुन्हा उलटला तो आणखी तीन आठवडे त्याने तिला हैराण केले. इस्पितळातून घरी आल्यावर आणि खाणे-पिणे सुरू झाल्यावरदेखील वेंकटप्पय्याच्या मनात अजून भय आहे.

"आता माझी प्रकृती एकदम ठीक आहे. जे खात्ये ते पचते. रात्रभर छान झोप लागते. इतक्या दिवसांच्या आजारानंतर एका दिवसात कसं बरं वाटेल ?" राज्यमने विचारले.

राज्यमला पाहाणाऱ्याला ती जगलीच कशी याचे आश्चर्य वाटते. ती पार वाळून गेली आहे. हाडांना कातडे तेवढे चिकटून राहिलेले दिसते.

"तू बेहोष पडली होतीस, तेव्हा मी घाबरलो." वेंकटप्पय्या आपल्या झोपलेल्या पत्नीकडे जेव्हा जेव्हा पाहातो, तेव्हा तेव्हा ती जिवंत आहे की नाही, अशी त्याला शंका येते. श्वासोच्छ्वास करताना तिचे पोट वरखाली होत असते, ते पाहून ती जिवंत असल्याचे मनाला सांगून तो स्वतःचे समाधान करून घेतो. तशी त्याला सवय झाली आहे.

"मी जरा थकल्ये आहे इतकंच. प्रकृती अगदी ठीक आहे. खरं म्हणजे या घरात आपण राहायला आलो तेव्हापासून मला अगदी आराम वाटतोय."

"मलादेखील या घरात आल्यापासून बरं वाटतंय. मनातल्या मनात आनंद वाटतो. भाडं थोडं वाढलं एवढंच."

"हो. भाडं जरा जास्त आहे."

"जिवापुढं भाड्याचं काय ? काही काळजी करू नकोस."

या घरात येण्यापूर्वी ते एका लहानशा गल्लीत प्राचीन काळच्या एका अंधाऱ्या घरात कमी भाड्याने राहात होते. तेथे ते राहात होते, तोवर घरात कोणी ना कोणी नेहमी आजारी असे. शेवटी राज्यमच्या प्राणावरच बेतले. घरात मदतीला दुसरे कोणी नव्हते. ती इस्पितळात असताना खूप त्रास सोसावा लागला. नवरा आणि मुले यांच्या सुदैवाने तिचा पुनर्जन्म झाला.

आताचे घर नव्याने बांधलेले आहे. दोन छोटया खोल्या आणि व्हरांडा असलेले हे घर आहे. भोवती मोकळी जागा आहे. बाग आहे.

"आपण उगीच पैशाचा हिशेब करतो. तू वाचली, यात सगळं आलं," वेंकटप्पय्या म्हणाला.

"असं म्हणू नका. माझ्या आजारावर किती खर्च झाला आणि तो कशातून केला हे तुम्ही मला सांगितलेलं नाही."

"हे बघ, तो विचारदेखील करू नकोस. आधी आपल्या प्रकृतीची काळजी घे. कशातही काटकसर करू नकोस. हवं तेव्हा ओव्हलटिन पी. जी फळं आणतो ती खा. मुलांनादेखील देऊ नकोस."

"खातये तर काय? दुसरं काय करतये? हातपाय ताणून बसलेली असतये, तुम्हाला काम करायला लावतये आणि तुमच्या हातचं जेवतये. काहीही म्हटलं तरी कर्ज ते कर्जच. आपल्याला दुसरं काही उत्पन्नही नाही."

"तो विचार अजिबात करू नकोस." पैशाची गोष्ट निघाली की वेंकटप्पय्याचा जीव घाबरतो. दोन महिन्यांचा पगार आणि वर शंभर रुपये या आजारपणासाठी लागले. डॉक्टर देवमाणूस आहे. त्याने एक पैसादेखील घेतला नाही. तरी औषधपाण्यावर बराच खर्च झाला. धर्मार्थ इस्पितळात इलाज करूनही पुष्कळ खर्च झाला.

"ठीक आहे. नाही करत विचार. सावकाश फेडू पैसे. हिशेब करायला कितीसा वेळ लागतो? ते माझ्या हातात आहे?"

"ठीक आहे. ते बघू नंतर," असे म्हणून वेंकटप्पय्या घरामागे निघून गेला त्याला या विषयावर जास्त चर्चा करायला आवडत नाही. तोंड धुवून तो आत आला आणि केस विंचरून, कपडे बदलून बाहेर पडला.

राज्यम पुन्हा बेभान होते आहे, अंधाऱ्या कोठडीत प्रवेश करते आहे. संध्याकाळचे उन्ह खिडकीतून राज्यमच्या चेहऱ्यावर पडते आहे, त्याला सोनेरी शोभा आणते आहे.

राज्यमच्या चेहऱ्याकडे लक्षपूर्वक पाहात वेंकटप्पय्या तेथेच उभा राहिला. आता त्याला भय वाटले नाही. बालपणच्या एखाद्या मधुर प्रसंगाच्या आठवणीत ती तल्लीन झाली असावी, असे त्याला वाटले. तिच्या चेहऱ्यावर प्रसन्नता पसरली आहे.

राज्यमला इतके प्रसन्न वेंकटप्पय्याने अनेक वर्षांत पाहिलेले नाही. ती सासरी आली तेव्हा आरंभीच्या काळात अपार आनंदात ती चोवीस तास विहरत होती. एका वर्षाच्या आतच ती माता झाली. जीवनाने तिला संसारसागरात ढकलले. तो सागर पार करणे तिचे कर्तव्य झाले. आता सहा वर्षांत ती तीन मुलांची आई बनून या सागरात पोहते आहे.

अचानक राज्यमने तोंड उघडले. ती डोळे घुसळून काहीतरी करते आहे. तिचा चेहरा पाहून वेंकटप्पय्याला हसू आले. त्या हसण्याचे पर्यवसान हळूहळू खोकल्यात झाले आणि बराच वेळ तो खोकत राहिला. शेवटी, आकाशात तरंगू लागलेल्या राज्यमला त्या हसण्याने जमिनीवर आणले.

"इतकं हसायला काय झालं ?" तिने पतीला विचारले.

"पुन्हा तसं तोंड करून डोकं हलव, मजा येईल !" तो म्हणाला.

"असं आहे होय ? समोरच्या घरातली मुलगी गातेय. ऐका तरी," राज्यमने सांगितल्यावर, समोरच्या घरात कोणीतरी गात आहे हे वेंकटप्पय्याच्या लक्षात आले. कानावर काहीतरी पडत होते पण तिकडे लक्ष देण्याची आवश्यकता त्याला तोपर्यंत वाटली नव्हती.

"अरे वा ! म्हणजे इथं संगीताचा कार्यक्रम चालू आहे तर. समजलो. लहानपणी तू व्हायोलिन फार छान वाजवायचीस नाही का ? मी विसरलोच."

कामवर्धिनी नावाच्या मधुर रागिणीने शहारलेला, फुलांच्या मादक सुगंधाने घमघमलेला वारा खोलीत प्रवेश करतो आहे.

"अरे पोरांनो, इथं संगीत सभा चालू आहे, या ऐका," वेंकटप्पय्या म्हणाला. त्याची दोन्ही मुले बाहेर रस्त्यावर उभी राहून गाणे लक्षपूर्वक ऐकताहेत.

वेंकटप्पय्या म्हणाला, "मला वाटलं होतं, या घरात सुखानं राहाता येईल. पण इथं या अर्धशीशीवर काही उपाय दिसत नाही."

"सुंठ ठेवा जवळ," राज्यमने म्हटले. तिचे मन दुखावले. संबंध अंगावर सुंठीचा लेप दिल्यासारखी शरीराची आग झाली.

"अंधार होतोय. आता बाहेर कशाला जाता ? लवकर जेवून घ्या नं."
राज्यम बोलली.

"मी रोज ठरवतो, पण उशीर होतोच. लवकर जाऊन पापाचं प्रायश्चित्त म्हणून काहीतरी चांगलं काम करायला हवंय."

"काय ? पाप करताय ?"

"पाप केल्याशिवाय जगता येत नाही."

दोन्ही मुले गाणे लक्ष लावून ऐकताय. त्यांच्या कानांना तो आवाज गोड वाटत असावा. मुलांची मने मुळातच निर्मळ असतात, त्यामुळे संगीत त्यांना आकर्षून घेते. बालपणापासूनच राग आणि तालाचे साधारण ज्ञान मुलांना दिले, तर आयुष्यात संगीत हे आनंदाचा अक्षय झरा बनून जाते.

"वा ! वा ! तुम्ही तर आईला शोभेशी पोरं निघालात ! सारेगमची बाधा तुम्हालाही झालेली दिसते," असे म्हणत वेंकटप्पय्या बाहेर निघून गेला

राज्यमने सावकाश उठून दिवा लावला. कडीच्या मधोमध टांगलेल्या ट्यूबने हळूहळू पेटून खोली प्रकाशाने भरून टाकली—मोती चमकावा तशी ! विजेचे दिवे नव्या घरांत जितके छान झगझगतात, तसे जुन्या मोठाल्या घरांत लखलखत नाहीत. बुरशी आलेल्या भिंतीवरील जुन्या बल्बप्रमाणे राज्यमचे संगीत दोन दिवस चमकले आणि नंतर त्याचा फ्यूज उडाला. तिचे व्हायोलिन कोपऱ्यात पडून राहिले. त्याची धनुकली अडगळीच्या सामानात जाऊन पडली. अशा प्रकारे संगीत आयुष्यातून निघून गेले तरीदेखील समोरच्या घरातली मुलगी गाऊ लागली तशी राज्यमला जुने हरवलेले ते सुख आणि आनंद पुन्हा गवसला.

राज्यमच्या जीवनात प्रत्येक गोष्ट नियमितपणे झाली. कुठे काही अव्यवस्था म्हणून झाली नाही.

सहा वर्षांपूर्वी राज्यमला पाहायला मुलाकडचे लोक आले. वेंकटप्पय्या-देखील त्यांच्याबरोबर होता. सगळ्यांनी मुलीला गाण्याचा आग्रह केला. राज्यमचे वडील चार वर्षांपासून तिला संगीताचे शिक्षण देत होते. गायन-कलेतले आपले कौशल्य दाखवण्याची सुसंधी तिला मिळाली.

तिने लाजत लाजत तोडीमधले गाणे सुरू केले. आरंभीच अपस्वर लागला. ताल देण्यात चूक झाली. राज्यम घाबरली. गाणे नीट जमले नाही. गाणे संपताच तिला रडावेसे वाटले.

पण पाहुणे तिच्या गाण्याची प्रशंसा करू लागले. बिचाऱ्या सौभाग्यकांक्षिणी मुलींना काय कल्पना की, लग्नासाठी मुलगी पाहायला येणाऱ्यांना गाण्यात गती नसते, संगीत समजत नाही म्हणून ?

कोणीतरी म्हणाले, "आता आपल्या जामातांना नोकरी करायची गरज नाही." त्या लोकांच्या अज्ञानाचे राज्यमला हसू आले.

वेंकटप्पय्याने राज्यमला मनापासून पसंत केले. दोघांचे लग्न झाले. त्याचे नाव वेंकटप्पय्या असले, तरी असातसा माणूस नाही; तो ! लग्नानंतर लवकरच राज्यम स्वतःच्या भाग्यावर खूष होऊन गेली. लग्नाच्या वेळी वेंकटप्पय्या आंध्र विश्वविद्यालयाच्या आदरणीय स्नातकांपैकी एक होता. मद्रास राज्य सरकारचा बहात्तर रुपये मिळवणारा तो महत्त्वाचा एल. डी. क्लार्क होता.

लग्नानंतर आरंभी आरंभी राज्यम जेव्हा गावातल्या ओळखीच्या लोकांकडे अथवा समारंभांना जाई तेव्हा लोक तिला गाण्याचा खूप आग्रह करीत. पण घरी तिच्या पतिराजांनी कधीही तिचे गाणे ऐकण्याची इच्छा दर्शविली नाही आणि राज्यमही कधी आपण होऊन गायली नाही.

निर्लज्ज होऊन सासरी स्वतः होऊन गाण्याची वेळ येण्यापूर्वीच तिला डोहाळे लागले आणि ती बाळंतपणासाठी आईच्या घरी निघून गेली. अशा प्रकारे तिच्या स्त्रीजन्माचे सार्थक झाले.

व्हरांड्यात मुले आरडाओरडा करू लागली. "का भांडता मुलांनो ? इकडे येऊन बसा," असे म्हणताच आपसात भांडणारी मुले आईजवळ येऊन बसली. त्यांतला एक पाच वर्षांचा आहे आणि दुसरा चार वर्षांचा.

"बाळ झोपलंय नं ?" तिने विचारले.

"चांगलं घोरतंय" मोठा मुलगा म्हणाला.

"मग तुम्ही गडबड केलीत तर ते उठेल नं ?" आईचे बोलणे ऐकून मोठ्या मुलाला हसू आले. दोघांना आपापली चूक समजली आणि ते एक-मेकांकडे पाहू लागले.

"समोरची मुलगी गोड गाणं गातेय. बसा आणि ऐका." आईच्या सांगण्या-प्रमाणे ती शहाणी बनून बसली. मुलांना सांभाळणे, गोड बोलून त्यांना योग्य वळण लावणे आणि धुराने त्रासून न जाता शेगडी पेटवणे—या सगळ्या गोष्टी राज्यम सहजपणे शिकली आहे.

समोरच्या मुलीने स्वररचनेस प्रारंभ केला. निर्झराप्रमाणे तिच्या मुखातून शब्द स्रवू लागले. तिचा आवाज तारसप्तकात जाऊन गांधारात स्थिर होऊन स्वररचना करतो आहे.

राज्यमला हत्तीचे बळ आले. दैनंदिन जीवनात स्वास्थ्य आणि आनंद यासाठी संगीत आवश्यक आहे. स्वतःला गाणे येत नसले तरी ते ऐकून त्याचा आस्वाद घेण्यातही सुख आहे.

या रसग्रहणात मध्येच, सरबतात किडा पडावा, तसा त्या मुलीचा धाकटा भाऊ येऊन टपकला.

"गिम पदनि...सरि सनि पदनि..." असे म्हणत तो अपस्वर काढू लागला. मुलीने कंटाळून गाणे थांबवले.

"मूर्खा ! गाणं शिकायला बोलावले तर येत नाहीस. आरडाओरडा करायला सगळ्यात आधी येतोस."

"का ? माझी स्वररचना बरोबर नाही ?"

"बाबांना येऊ दे, सगळं सांगेन."

"दानि पनि सरि सानि दानि पदनि..." त्या मुलाने स्वरांचे आणखी एक भेंडोळे सोडून दिले. अपस्वर असूनही त्या मुलाच्या स्वररचनेत एक विशिष्ट श्रम आहे. वातावरणात संगीत असले की निर्जीव वस्तूदेखील गाऊ शकते. त्यात नवल काही नाही.

"बाबांना येऊ दे, मूर्खा !" असे म्हणून मुलीने गाणे थांबवले. राज्यमला फार राग आला. ती मुलगी जे गीत गात होती, त्याच्या रागरागिण्या राज्यमच्या पूर्ण परिचयाच्या आहेत.

"थोडा वेळ का होईना, बरे वाटले. आता कसलं संगीत ?" राज्यमने म्हटले.

"आता ती का गात नाही ?" मोठ्या मुलाने विचारले.

"पाहिलं नाही ? तुझ्यासारख्या खोडकर मुलानं मध्येच गडबड केली, त्यामुळे नाराज होऊन तिनं गाणं बंद केलं."

"ती कशी गाते ?"

"शिकून गाते."

"तू गाशील ?"

"खूप गाईन. तुम्हाला शिकवीन."

"शी : ! पुरुष गात नाहीत."

"पुरुषसुद्धा गातात, बाळ. तुलासुद्धा शिकवू ?'

"शिकव."

"मग शिकवीन", असे म्हणून राज्यमने अंग टाकले.

"जरा पाय दाब."

मुलगा आईचे पाय दाबू लागला.

"मी तुझे हात दाबू, आई ?" असे म्हणून धाकटा मुलगा आईचे हात दाबू लागला.

राज्यम पडल्या पडल्या कल्याण रागात गाणे गाते आहे. आता ती बरेच विसरली आहे. मूर्च्छना आणि विस्तार विस्कटलेल्या केसाप्रमाणे विखुरले.

"ती मुलगी तुझ्यापेक्षा चांगली गात्येय," मोठ्या मुलाने म्हटले.

"मी तर सगळं विसरून गेल्ये, बाळ."

मागच्या खोलीत झाकण पडल्याचा आवाज आला आणि घरभर त्याचा आवाज घुमला.

"कुत्रा आला असेल. हाकून दे त्याला. तिथं भाताचं भांडं ठेवलंय." राज्यमने असे म्हणताच दोन्ही मुलगे मागे धावले.

"कुत्रा नाही, मांजर होतं, आई. भाताच्या पातेल्यावरचं झाकण पाडलं त्यानं." मोठ्या मुलाने सांगितले.

चला, बरं झालं. पुन्हा स्वयंपाक करायला नको. आजकाल कुत्र्यांचं उष्टं खायचेही दिवस आलेत. दार बंद करून कडी लावून यायला नको होतं का तुम्ही ?" राज्यम म्हणाली.

"तूच गाणं ऐकायला या, म्हणाली होतीस नं ?" मोठ्या मुलाने विचारले.

"होय बाळ, मी तुम्हाला बोलावलं होतं. पण येताना दार लावून यायला हवं. समजलं ?" राज्यमने समजावले.

वेंकटप्पय्या परत आला.

"मागे चांदणं आणि सुगंध बेफाम आहे," त्याने म्हटले.

"इतक्या लवकर कसे आलात ?" राज्यमने विचारले.

"काय झालं."

"पापाचं प्रायश्चित्त घेऊन झालं ?"

"थोडं झालं."

"मध्ये कुठंतरी गेला असाल !"

"राम, राम !"

"तुमचा चेहरा न् बोलणंच तसं आहे."

"शी: शी:"

"मग आता मी कसं बोलूं ?"

वेंकटप्पय्याच्या काखेत रुमालात काहीतरी वस्तू आहे. ती गोलाकार कागदात गुंडाळलेली आहे.

"हे काय आहे ?" राज्यमने विचारले.

"उघडून दाखवतो."

त्या पुडयात रुंद जरीच्या काठाची साडी आहे. तिच्याशी मॅचिंग ब्लाउझ-पीसही आहे. महाराणीपासून सामान्य स्त्रीपर्यंत प्रत्येक स्त्रीला आवडेल, अशी मनपसंत जरीची साडी आहे ती.

"विकत आणलीत तुम्ही ?"

"अर्थात. सगळे पैसे संपून जायच्या आत आणली."

"पैसे कुठून मिळाले ?"

"मी खरं सांगितलं तर, तू कदाचित् मला क्षमा करणार नाहीस."

"काय केलंत, सांगा नं."

"आधी वचन दे, वाईट वाटून घेणार नाहीस म्हणून," असे म्हणून त्याने हात पुढे केला. त्याचा हात कापत होता. राज्यमने त्या हातावर आपला हात ठेवला.

"असे कापता का ? काय केलं तुम्ही ? चोरी तर नाही नं केली ?"

"त्यापेक्षा वाईट गोष्ट केली. टायफॉइड उलटला तेव्हा मी हताश झालो होतो. एका मित्राने घरी येऊन ते पाहिलं, अन् देऊन टाकायचा सल्ला दिला. शेवटी धीर करून मी देऊन टाकलं."

"काय दिलं ?"

"अजून तुला माहीत नाही. तेच घेऊन गेला. अडीचशे रुपयात कोणाला तरी त्यानं ते विकलं. इतके पैसे मिळतील, असं मला स्वप्नातदेखील वाटलं नव्हतं. वाटलं होतं, जुनं आहे. पण ते लोक म्हणतात, जुन्यालाच जास्त भाव येतो."

आता राज्यम समजली. तिने खोलीत चहूकडे पाहिले.

"आता पाहून काय उपयोग ?"

"ते गेलं ?" तिने दीर्घ निःश्वास टाकला.

"मला माहीत होतं तुला वाईट वाटेल म्हणून. मी चूक केली आहे." अपराध्यासारखा तो उभा राहिला. पतीचे मन दुखावले आहे हे राज्यमच्या लक्षात आले. त्यामुळे तिने स्वतःचे दुःख प्रकट होऊ दिले नाही.

"तुमचं काही चुकलं नाही. कोणीही असंच केलं असतं. नाइलाजानं तुम्ही असं केलंत. तुम्ही ते पैसे खाल्ले तर नाहीत नं !"

"मला वाटलं, आपले तिन्ही मुलगेच आहेत, मुलगी नाही. म्हणून मी हे धाडस केलं."

"जाऊ द्या. मी गाणं पूर्वीच थांबवलं होतं आता त्या व्हायोलिनचा मला काय उपयोग होता ? वाणीमातेचं एवढंच वरदान मला मिळालंय. आई निघून गेली, पण जाता जाता आपल्या आईपणाची ओळख देऊन गेली. मला प्राण-दान करून गेली. साडीचोळीसुद्धा देऊन गेली." बोलता बोलता राज्यमच्या डोळ्यांत अश्रू भरून आले. समोर ठेवलेली साडी तिने उघडूनदेखील पाहिली नाही.

"चार पिढ्या राहील, असाच विचार करून मी ही साडी घेतली," असे म्हणून वेंकटप्प्याने साडीची घडी मोडून ती राज्यमच्या खांद्यावर टाकली.

राज्यम म्हणाली, "चांगलीच आठवण राहील."

* * *

पूर्णाहुती

– पेद्दिभोटल सुब्बरामय्या

'किती वेळा सांगितलं की हे होऊ शकणार नाही म्हणून ? तू तर माझ्या मागे शनीसारखा लागलाहेस. तुलाच बोलतोय मी. सोड सायकल. . .मला उशीर होतोय,' पेरिशास्त्री कडाडला.

. . .मी चकित होऊन उभा राहिलो आणि पेरिशास्त्री झटकन् सायकल-वर चढून निघून गेला.

ऊन्ह रणरणते आहे. सकाळ होताच सूर्य तप्त किरण फेकीत निघतो. संध्याकाळपर्यंत वारा कुठे दडून बसतो ते कळत नाही. सूर्यास्त होईपर्यंत झाडाचे पानदेखील हलत नाही.

एक सुस्कारा सोडून मी नेहमीप्रमाणे मंदिराच्या ओटयावर पंचा पसरला आणि अंग टाकून दिले. वरून थोडी सावली पडली आहे. चार-पाच चिमण्या चिवचिवत इकडे-तिकडे नाचताहेत. मंदिरासमोरच्या पावाच्या दुकानात दहा वर्षाचा एक मुलगा सोडा पीत उभा आहे. दहा दिवसापूर्वी या बिचाऱ्याचा हत्तीसारखा मस्त हिंडताफिरता बाप अचानक वारला. मुलगा लहान असल्यामुळे तो अंत्यसंस्कार करू शकत नव्हता. त्यामुळे पेरिशास्त्रीने माझ्याकडूनच सगळे कार्य करवले. त्यात मला पंचवीस रुपयांपेक्षा थोडे जास्तच पैसे मिळाले.

असो, पण आज खायचे काय ? काल दुपारपासून जेवण मिळालेले नाही . . .त्या लेबर इन्स्पेक्टरने पाच-सहा दिवसांपासून ग्रहशान्ती चालवली होती, आणि काल तिची पूर्णाहुती होती. त्यांची ग्रहस्थिती चांगली नाही म्हणूनच त्यांच्या हातून सगळ्या संधी निसटून चालल्या आहेत, असे कदाचित पेरिशास्त्रीनेच त्यांना सांगितले असावे आणि ग्रहशान्ती करायला लावली असावी त्याने त्यांच्याकडून नवधान्यांचे ,आणि रोख रकमेचे दान करवले. काल अकरा वाजताच मी त्यांच्या घरी गेलो होतो. सगळा विधी संपायला दोन वाजून गेले होते. पेरिशास्त्रीचे वैशिष्टय हेच की अशा वेळी खूप उशीर लावून सगळे कर्मकाण्ड व्यवस्थित झाल्याबद्दल तो यजमानांची खात्री करून देतो. पेरि-

शास्त्री तसा फार हुषार माणूस आहे.

कालची घटना आठवली की मला अजूनही हसू येते. काल नवधान्याचे दान घेताना गव्हाच्या दानाच्या वेळी एक प्रश्न निर्माण झाला. गहू बाजारात मिळत नाही नं ? त्यामुळे पेरिशास्त्री आणि नरसिंहम यांच्यात चकमक उडाली. मी गप्प बसायला हवे होते. मी कधी तोंड उघडत नाही. पण काल मला काय झाले होते कोण जाणे, मी त्या भांडणात पडलो आणि काहीतरी बडबडू लागलो. पेरिशास्त्रीचा चेहरा त्यावेळी पाहाण्यासारखा झाला होता. . . आपले मोठे डोळे माझ्यावर वटारीत तो ओरडला, "तू का मध्ये पडतोस ? गप्प बसवत नाही का ? सगळेच बोलतात. लहान-मोठं काही पाहात नाहीत."

मी खरोखरंच फार घाबरलो. त्यानंतर माझी पाळी आली. मला शनिदान आणि मृत्युंजयदान घ्यायचे होते. या बाबतीत मला कोणीही प्रतिस्पर्धी नाही. आजच नाही, तर गेली सात-आठ वर्षे या गावात हे दान ग्रहण करणारा माझ्याशिवाय दुसरा कोणी नाही. माझी पाळी येताच मी पंचा झटकून खांद्यावर टाकला आणि आसनावर जाऊन बसलो. त्या दाम्पत्याने माझे पाय धुतले आणि आधी मला शनिदान केले. थोडेसे तांदूळ, तीळ, एक रुपया . . . पत्रावळीवर ठेवून मला दिले. ते ग्रहण करीत मी संकल्प बोललो, "आपण मुलाबाळांसह सुखी राहा, आपल्याला सर्व प्रकारे संपत्ती प्राप्त होवो. शनिदेव आपल्या मार्गात न येवोत. शनिदेवाच्या वक्र दृष्टीमुळे काही वाईट घडायचे असेल तर या दानामार्फत ते माझ्याबाबतीत घडो. . . . मी ते मस्तकी धारण करतो."

यानंतर लगेच मला मृत्युंजय दानही मिळाले–थोडेसे तांदूळ, थोडा कापूस, तेलात भिजवलेला लोखंडी खिळा, एक रुपया. . . .दान ग्रहण करीत–मी पुन्हा संकल्प केला, "आपल्या परिवारात कोणाच्या ललाटी अपमृत्यू लिहिला असेल, तर या दानामार्फत तो मला मिळू दे. आपण सगळे सुखी असा."
"यानंतर थोडा वेळ मी व्हरांड्याच्या एका कोपऱ्यात बसून राहिलो. पेरि-शास्त्री माझ्याकडे रागारागाने पाहात होता. कदाचित, मी मघा बोललो ते त्याच्या लक्षात असावे. नाहीतर अशी चीडचीड करायचे कारण काय ? वाटते, शनिमहाराजांनी माझ्यात संचार करून मला या गोष्टी बोलायला लावल्या असाव्यात. पेरिशास्त्रीचे शत्रुत्व पत्करून जगणे कठीण होते.

मी कुशी बदलून पडलो. सिनेमाची जाहिरात करणारी गाडी मंदिरासमोरून जाते आहे. ताशा, गडबड, आरडाओरड...मग थोड्या वेळाने सगळा गोंधळ बंद...मघासारख्या चिमण्या चिवचिवताहेत. समोरच्या औषधाच्या दुकानात एक बाई औषधे घेते आहे. मागून पाहिले तर वाटले, ती गंगी असावी. मग लक्षात आले की, ती गंगी नाही. मग मी उताणे पडून छातीवर हात ठेवले. गंगीचे रंग-रूप मला आठवले. रंग तर एकदम काळा आहे. तरीदेखील तिचा बांधेसूद देह, चालण्याचा डौल, आनंदी वृत्ती, बोलायची पद्धत—हे सगळे मिळून ती एक विलक्षण स्त्री आहे. प्रथमदर्शनीच पाहाणाऱ्याला मंत्रमुग्ध करण्याची शक्ती तिच्यात आहे. तसे नसते तर, बाहेर गोड्या ताडीचा बोर्ड लावून आत दारू विकण्याची हिंमत तिला कशी झाली असती ? काल रात्री अंधार पडल्यावर मी तांदळाचे गाठोडे आणि रोख दोन रुपये तिच्या हातात ठेवले. हसत हसत ती म्हणाली, "पंडितजी, तुम्ही आपल्या कष्टांची कमाई मला का देऊन टाकता ? त्याच्या बदल्यात मी तुम्हाला काय देऊ शकतये ? तुम्ही तर कशालाच... तयार नाही ! एक ग्लास प्यायला सांगितलं, तरी विचारात पडता. माझ्या हातचं जेवण घ्यायचं नाव काढलं की तुम्ही पळून जाता..." असे बोलत तिने गाठोडे उचलून ठेवले आणि दोन रुपये पदरात बांधून घेतले. मग तिने शरीराला आळोखेपिळोखे दिले. त्यात तिचा पदर ढळला. माझे रक्त गरम झाले. लहानपणी शाळेत मी 'मनुचरित्र' काव्य वाचले होते. त्यातल्या वरूथिनी या नायिकेच्या वर्णनातली एक ओळ मला अजून आठवते—'प्रांचद्भूषण बाहुमूलरूचितो'... गंगीने आळस दिला तशी ती ओळ मला अचानक आठवली. मग मी मुकाट्याने तेथून निघून गेलो.

असो. जाऊ द्या हे सगळे. आता माझे काय होईल ? मध्यान्ह होतो आहे. अजून कोणी यजमान मिळाला नाही. आज उपवास पडणार असे दिसते. म्हणूनच वडील माणसे काहीतरी राखून ठेवा असे सांगत असत. पण बचत करता येईल, अशी माझी मुळी कमाईच नाही ! या जगात शनिदान, मृत्युदान इ. घेऊन आणि और्ध्वदेहिके करून कोणी एक पैसाहि वाचवला नसेल !

मी हे पैजेवर सांगतो. असा माणूस औषधालासुद्धा सापडायचा नाही. खरे म्हणजे तो पैसाच असा आहे. डोळ्यासमोर येतो तोच नाहीसा होतो.

मग माझे लक्ष स्वत:कडे गेले...

हनुवटीवर हात ठेवून मी समोर पाहात पडून राहिलो. सात आठ वर्षांपूर्वी आपण कसे दिसत होतो, ते आठवायचा मी खूप प्रयत्न केला. तेव्हा मी सावळ्या रंगाचा होतो, एवढे मला अजून आठवते. डोळ्यात तेव्हा एक खास तेज होते. मनात उल्हास होता. आताच्याप्रमाणे तेव्हा डोळ्यांखाली काळी वर्तुळे नव्हती. आणि डोळ्यांतले तेज...जाऊ द्या...ही दाने ग्रहण करू लागल्यावर एका वर्षातच ते नाहीसे झाले. आता माझ्या शरीराचा रंग काळा नव्हे, तर काहीतरी वेगळाच आहे. कधीकधी स्वत:कडे पाहून मी चकित होऊन जातो. ओले लाकूड जाळल्यावर त्याला जो रंग येईल, तसा माझ्या शरीराचा रंग आहे.....

या पेरिशास्त्रीचा स्वभाव मला कळतच नाही. तो माझ्यावर फारच रागावला आहे, असे वाटते. अशा प्रकारे कडाडून तो मला कधीही बोललेला नाही. तरीसुद्धा मी केली ती चूकच होती...खरे म्हणजे गव्हाचे दान नरसिंहमला मिळो नाहीतर पेरिशास्त्रीला, त्यात माझे काय जाणार होते ? माझ्या जिभेत शनिमहाराजांचा संचार झाला होता म्हणून तर माझ्या तोंडून तसे शब्द निघाले. मी कधी कोणत्याही प्रकरणांत पडत नाही. त्या दिवशी असे अचानक कसे झाले, तेच माझ्या लक्षात येत नाही. यापूर्वी मी कितीतरी विचित्र गोष्टी पाहिल्या-ऐकल्या होत्या. त्या दिवशी अंधारात राममूर्ती पागोटे बांधून ताडीच्या दुकानात चोरून जाऊन दारू प्याला हे काय मला माहीत नाही ? एक दिवस मागच्या गल्लीत विश्वनाथमला गंगीचा हात पकडून प्रेमचाळे करताना मी पाहिले नव्हते काय ? इतकेच कशाला ? पेरिशास्त्री स्वत: कधीकधी सकाळी इडली मागवून खातो, हेदेखील मला माहीत आहे. त्या वेंकटेशमला मागे जाऊन बिडी पिताना मी कितीतरी वेळा पाहिले आहे. पण या सगळ्याशी माझा काय संबंध ? खरोखर शनिमहाराजच त्या दिवशी माझे बोलविते धनी होते. मी तसे बोलायला नको होते.

असो. झाले ते झाले. आता पोटपूजेचा विचार केला पाहिजे. या चिमण्या कुठून तरी भाताचे दाणे आणून खाताहेत. मी अनिमिष नेत्रांनी त्यांच्याकडे पाहात पडलो आहे. मोठी चिमणी मध्येच उडून जाते आणि चोचीत दाणा घेऊन परत येते. चिमण्यांची पिले आपली चिमणी तोंडे उघडून ते दाणे

आईच्या तोंडातून घेत आहेत. भिंतीवर एक मोठी पाल स्वस्थ पडली आहे. तिच्याजवळ एखादा कीडा पोहोचला, की ती चोर पावलांनी जाऊन, त्याच्या-वर झडप घालते आणि त्याला खाऊन टाकते.

रणरणते ऊन्ह माझ्या पायांवर पडले आहे. मी डोळे मिटून घेतले. तरी-देखील उकाडा आणि झळा जाणवतातच. मग डोळे उघडून मी जवळून जाणाऱ्याला वेळ विचारली. अकरा वाजून गेले आहेत. अशक्तपणामुळे माझ्या पापण्या मिटताहेत. झोप येते आहे, चला, हेही बरेच आहे. उद्या सकाळपर्यंत अशी गाढ झोप लागली, तर किती बरे होईल! उद्या एका अधिकाऱ्याच्या घरी पूर्णाहुती आहे. कमीत कमी शेरभर तांदूळ, दोन रुपये आणि जेवण... तोपर्यंत उपाशीच राहावे लागणार असे दिसते. पण मला हे नवीन नाही यापूर्वी किती तरी दिवस मला अशी उपासमार सहन करावी लागली आहे!

मला जाग आली, तेव्हा सूर्य मावळत होता. मी झटकन् उठून बसलो. जांभई दिली, चुटक्या वाजवून पंचा झटकून खांद्यावर टाकला आणि मंदि-राच्या पायऱ्या उतरून रस्त्यावर आलो.

थंड वारा वाहू लागला. समुद्रावरून येणारी ही हवा मोठी प्रसन्न वाटते. भगवान सूर्यनारायण अस्तंगत होताहेत. मी तिकडे पाहात म्हटले, "भगवन्! उद्या पुन्हा लवकर या!"

मग मी कालव्यावर गेलो. पाण्यात दोन पावले पुढे जाऊन उभा राहिलो आणि आकाशाकडे पाहू लागलो. मावळत्या सूर्यकिरणांमुळे पाण्याचा पृष्ठभाग लाल कागदासारखा दिसतो आहे. कालव्याच्या काठच्या झाडावर चिमण्या किलबिल करताहेत. माझ्या जवळचे पाणी स्थिर झाले, तशी मी पाण्यात स्वतःच्या प्रतिबिंबाकडे पाहिले. दाढी खूप वाढली आहे. मला माझ्या प्रति-बिंबाकडे जास्त वेळ पाहावेना. पाणी पुढे वाहात गेले. थंड पाणी लागताच बरे वाटले. अंधार पडेपर्यंत मी पाण्यात डुंबत राहिलो.

त्यानंतर पंचाने अंग पुसून कालव्याच्या काठी मी बराच वेळ बसून राहिलो. मग उठून चालू लागलो, तेव्हा बरीच रात्र झाली होती. बाहेर सामसूम होते.

चालता चालता मी ताडीच्या दुकानाजवळ अचानक थांबलो. जणु कोणी माझ्या पायांत बेडी अडकवली होती. गंगी दारात उभी आहे. राहून राहून ती आळोखेपिळोखे देते आहे. मला पाहाताच तिने मला ओळखले आणि

म्हटले, "पंडितजी, इकडे या नं." मी हळूहळू चालत तिच्याजवळ गेलो. कंदिलाच्या प्रकाशात मी तिच्याकडे पाहिले. ती तलम पांढरी साडी नेसली आहे. ब्लाऊझ पांढरेच आहे. त्यातून तिची चोळी स्पष्ट दिसते आहे. ती हसली की तिचे शुभ्र दात चमकतात. स्मित करीत तिने विचारले, "आंघोळ करून घरी चाललांत काय ? चेहऱ्यावरून आज जेवलेले दिसत नाही आहात. माझ्याकडे स्वैंपाक झालाय. जेवणार ?"

मी आत पाय ठेवीत म्हटले, "नाही. मी जेवणार नाही. तू जेवून घे. मी 'मम' म्हणून संकल्प सांगतो."

"पंडितजी, तुमचं बोलणंच मला समजत नाही . . .तरी पण बसा हो, थोडा वेळ. . .गिऱ्हाइकं आता यायची नाहीत. . .तोपर्यंत बरीच रात्र होईल," असे म्हणत गंगीने चिनीमातीच्या बशीत जेवण वाढून घेतले व ती माझ्यासमोर जेवू लागली. मी पुनः पुन्हा तिच्याकडे पाहातो आहे.

अचानक गंगी हसली : "इतक्या वेळा मला तांदूळ आणून दिलात, पण माझ्याकडे काही घेतलं नाहीत. ग्लासाला स्पर्शसुद्धा केला नाहीत. चुकून माझा हात तुम्हाला लागला, तर विंचू चावल्यासारखे लांब पळून जाता ! . . .आज माझं ऐका . . .मला माहीत आहे, तुम्हाला भूक लागली आहे. . . इथं दुसरं कोणी नाही . . .घासभर जेवून घ्या . . .मासळीचं कालवण खायचं नसेल तर सोडून द्या. . .नुसती लसणाची चटणी छान लागेल."

मी चमकलो आणि तिथून उठून चालू लागलो. मागून गंगीचे खो खो हसणे दूरपर्यंत मला ऐकू येत राहिले.

दुसऱ्या दिवशी मी त्या अधिकाऱ्याच्या घरी गेलो. घर खूप मोठे आहे. व्हरांड्यात लोक जमले. आत पूर्णाहुती सुरू आहे. पेरिशास्त्री जोरजोराने मंत्र म्हणतोय. यजमान तुपाच्या वाटीतून पानाने तूप काढून 'स्वाहा' म्हटल्याबरोबर हवनकुंडात टाकत आहे.

तिथे माझ्याशी कोणी बोलले नाही. व्हरांड्यात एका खांबाला टेकून मी बसलो. विश्वनाथ जानव्याने पाठ खाजवीत समोर बसला आहे. नरसिंहम दारात बसून पेरिशास्त्राच्या आवाजात आवाज मिळवतो आहे. राममूर्ती वगैरे लोक भिंतीजवळ ओळीने आरामात बसले आहेत. पाणी घातलेली कडुनिंबाची झाडेच जणु !

त्यांच्याजवळ बसलेल्या माणसावर माझी दृष्टी पडली. तो पंचविशीतला असावा. रंग सावळा, दाढी वाढलेली, रोज धुतल्याने जुनाट झालेले धोतर. . . डोळे मिटून तो काही विचार करतो आहे.

मला थोडी शंका आली. तरीदेखील मी त्याच्यासंबंधी जास्त विचार केला नाही; आढ्याकडे पाहात बसून राहिलो.

बराच वेळ गेला. पूर्णाहुतीचा विधी संपला. दानांना सुरूवात झाली. विश्वनाथम, नरसिंहम, राममूर्ती आणि इतर लोक ओळीने आत जाऊन दान ग्रहण करून गाठोडी बांधीत बाहेर येऊन बसताहेत.

माझा अंदाज बरोबर ठरला. "रामेशम, लवकर या," पेरिशास्त्रीने हाक मारली. तो नवा माणूस चटकन उठून आत गेला. मीदेखील जाऊन पाहिले. तो ताम्हणात पाय ठेवून बसला आहे. पाय धुण्याची तयारी चालू आहे.

"पेरिशास्त्री, हे तुम्हाला शोभत नाही. परवाच तुम्ही मला सांगून ठेवलं होतंत . . ." मी ओरडून म्हटले.

पेरिशास्त्रीने डोळे वटारून माझ्याकडे पाहिले आणि म्हटले, "काय शोभतं, काय शोभत नाही ते आता तुझ्यापासून शिकायचंय. . . उद्यापासून शिकवणी सुरू कर. . . आता बाहेर जा."

मी त्या अधिकाऱ्याला म्हटले, "पाहा साहेब, या भल्या गृहस्थानं परवाच मला सांगून ठेवलं होतं. आणि आज दुसऱ्या नव्या माणसाला बसवून दान देववतोय. आपणच निर्णय करा."

त्याने गोंधळून पेरिशास्त्र्याकडे पाहिले आणि विचारले, "हे काय त्रांगडं आहे ?" त्यावर पेरिशास्त्रीने काहीही उत्तर दिले नाही. "ताईसाहेब, चला लवकर, पादप्रक्षालन सुरू करा, वेळ होतो आहे," असे म्हणून त्याने घाई केली. यजमान काही बोलू शकले नाहीत. पत्नीने पाणी दिले, त्याने मात्र पाय धुऊन ते पाणी स्वतःच्या मस्तकावर शिंपडून घेतले. दानाचा विधी पूर्ण झाला. मी असहाय्यपणे उभा राहून सगळे पाहात राहिलो. तांदूळ, तीळ, रुपया, झाले. . . त्यानंतर मृत्युंजय दानही पेरिशास्त्रीने त्यालाच देवविले. माझ्या पोटात कालवाकालव झाली. "एवढा अन्याय करण्यासारखं मी तुमचं काय वाईट केलंय ?" मी ओरडू लागलो. पण काही उपयोग झाला नाही. तांदूळ, कापूस, लोखंडी खिळा, रुपया. . . मृत्युंजयदानही व्यवस्थित झाले. "झालं ते झालं.

आता कमीत कमी आजचं जेवण मिळालं तरी पुरे. . ." या आशेने खांबाला टेकून मी तिथेच बसून राहिलो. त्यानंतर तांदळाचे गाठोडे बांधणाऱ्या त्या नव्या माणसाकडे मी पुनः पुन्हा पाहात राहिलो. त्यालादेखील माझ्या डोळ्यांतला हेवा, द्वेष आणि अंगार जाणवला असावा. त्यामुळे त्याने एकदादेखील माझ्याकडे पाहिले नाही.

मी मनात विचार करीत राहिलो, "हा लेकाचा कुठून इथं कडमडला? असली क्षुद्रदानं घेण्याची याला काय गरज? दिसायला शिकला–सवरलेला दिसतो."

इतक्यात पेरिशास्त्री व्हरांड्यात येऊन खेकसला, "अरे, तू अजून इथंच? मी निघून जायला सांगितलं होतं नं? तुला समजत नाही का? चालता हो इथून. . ."

मी क्षीण आवाजात, "आजचं जेवण तरी. . ." असे म्हणू लागलो.

तो रागाने लाल होऊन ओरडू लागला, "नाही नाही. ते काही चालणार नाही. इथून निघून जा."

"मी अपराध काय केलाय्?"

"एक शब्द बोलू नकोस. पुन्हा माझ्यापुढे येऊ नकोस. समजलास?"

मी अधिकाऱ्याकडे करुण दृष्टीने पाहिले. पेरिशास्त्रीच्या ते लक्षात आले, आणि तो त्याला म्हणाला, "साहेब, माझं ऐका. आपल्याला आशा गोष्टींचा अनुभव नाही. आपण थोडं सैल सोडलं की हे लोक आपल्याला माशांसारखं सतावतील, आपल्याला जीव नकोसा करतील!" यावर अधिकारी घाबरले आणि निरुपाय होऊन आत निघून गेले.

आता मला राहावले नाही. "ठीक आहे. . .हा माझा तळतळाट फुकट नाही जाणार! पेरिशास्त्री, तुम्हाला वाटत असेल की एका गरीब ब्राह्मणाचा जीव घेऊन तुम्ही सुखात राहू शकाल म्हणून. नाही. या पापाचं फळ तुम्हाला जरूर मिळेल. तुम्हालादेखील मुलंबाळं आहेत. जरा संभाळून राहा!" असे तळतळाटाचे शब्द बोलत मी पायऱ्या उतरत होतो. मागून पेरिशास्त्रीचा आवाज ऐकू येतो, "तूदेखील मोठा ब्राह्मण बनला आहेस. रात्र होताच ताडीच्या दुकानात घुसणारा स्वतःला मोठा माणूस समजून बोलतो आहेस. जा–जा!"

तव्यासारख्या तापलेल्या सडकेवरून मी चालू लागलो. सूर्य अगदी डोक्या-

वर येऊन आग ओकतोय. वारा अजिबात पडलाय, पोटात जठराग्नी भडक-लाय. वळणावर पायाला काटा लागल्यासारखे वाटले. ती कळ असह्य होऊन भिंतीचा आधार घेऊन पायात टोकलेली वस्तू दुसऱ्या हाताने उपसून काढली जुना खिळा, खूप गंजलेला. खिळा काढताच बरेच रक्तही बाहेर आले. खिळा हातात घेऊन कसाबसा लंगडत मंदिराच्या ओटयावर पोचलो आणि तिथे बसून खिळयाकडे पाहू लागलो. इतके दिवस अशी क्षुद्र दाने घेऊन जे शेकडो खिळे मी स्वीकारले होते, ते लोखंडी खिळे माझ्या डोळयापुढे फिरू लागले.

संध्याकाळी जाग आली, तेव्हा सगळे अंग दुखत होते. पायऱ्या उतरून खाली आलो आणि क्षणभर रस्त्यावर उभा राहिलो. ताप येईल अशी भीती वाटली. एवढयात मला कधी ताप आलेला नव्हता. तापाचे नाव ऐकले की मला धडकी भरते.

रेल्वेच्या फाटकापाशी मी कधी तरी एक बोर्ड पाहिला होता. त्यावर अनेक औषधांची नावे लिहिलेली होती. भिंतींवर लांबलचक यादी होती. तिथे खुर्चीवर एक म्हातारा नेहमी निश्चल मुद्रेने बसलेला असतो.

मी तिथे गेलो. वाटेत अनेकदा मला शरीराला आळोखेपिळोखे द्यावे लागले. जरा विचित्र वाटले.

दारात उभे राहून मी आत पाहिले. टेबलामागे खुर्चीत तो म्हातारा माणूस चित्रासारखा तटस्थ बसला आहे. मला पाहिल्यावरही त्याने कसलीही हालचाल केली नाही. मी आत गेलो. तेथे दुसरे कोणीही नाही. मला पाहून त्याचे डोळे विस्फारले. जाड चष्मा त्याने दोऱ्याने कानांना बांधला आहे.

मी नमस्कार करून माझी तक्रार सांगितली, 'डॉक्टरसाहेब, या पायाला खिळा लागला आहे. गंजलेला खिळा."

तो थोडासा हलला. मग त्याने आश्चर्य व्यक्त केले. सावकाशपणे तो बोलला, "अस्सं. खिळा लागलाय ? गंजलेला खिळा ? . . . फार वाईट !" पुनः पुन्हा तो हेच बोलत राहिला. मग आतल्या बाजूकडे वळून त्याने हाक मारली, "बेटी, थोडं गरम पाणी घेऊन ये बरं." मग माझ्याकडे पाहून कसलीशी औषधाची पुडी उघडीत तो म्हणाला, "बापरे ! गंजलेला खिळा पायाला लागला ! फार भयानक ! . . . आधी पाय सुजतो, मग ताप येतो, मग सेप्टिक होतं आणि कधीकधी पाय कापावा लागतो. उशीर झाला, तर जीव-

देखील. . .हुण्. . ." असे म्हणत त्याने पक्षी उडून जाण्याचा अभिनय केला.

आतून एक मुलगी गरम पाणी घेऊन आली. त्याने पाण्याचा पेला हातात घेतला. पुडीतले औषध तोंडात टाकून त्याने गरम पाणी पिऊन टाकले आणि तोंड पुसले. मला वाटले होते, ते औषध आणि गरम पाणी माझ्यासाठीच होते म्हणून. मी अस्वस्थ झालो. त्याने थोडा वेळ डोळे मिटून घेतले, मग माझ्याकडे पाहून तो म्हणाला, "अरे, तुम्ही अजून इथंच ? जुना खिळा पायाला लागणं फार धोक्याचं, मी सांगितलं नं, सेप्टिक व्हायची भीती असते. आधी खूप ताप येतो, मग पाय सुजतो. . ." तो आणखी काही बोलणार होता, तेवढ्यात आतून ती मुलगी बाहेर आली आणि म्हणाली, "तुम्ही गप्प बसा, बाबा. तुम्हाला इथं कुणी बसायला सांगितलं ? . . .साहेब, माझे वडील गावात नाहीत. आपण नंतर या. यांना काही माहीत नाही."

"तू वाचवलंस पोरी मला ! दीर्घायुषी हो," असे म्हणून मी तिथून निघून आलो.

बराच वेळ मंदिराबाहेरच्या ओटयावर मी बसून राहिलो. रस्त्यावर बरीच गर्दी आहे. त्या गर्दीतदेखील मी त्याला ओळखू शकलो. मी एकदम उठून त्याच्याकडे गेलो आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवला. तो चकित झाला.

पापणी न लवता मी थोडा वेळ त्याच्याकडे पाहिले आणि त्याला विचारले, "आपलं नाव ?"

"रामेशम," त्याने उत्तर दिले.

त्याच्याकडे भेदक दृष्टीने पाहात मी म्हणालो, "तुम्ही वयानं लहान आहात. या गोष्टींची तुम्हाला कल्पना नाही. पेरिशास्त्रीनं उगीच या भानगडीत तुम्हाला ओढलंय. सुखानं जगायची इच्छा असणारा कोणताही माणूस जाणून-बुजून असली दानं स्वीकारणार नाही. तुम्हालाही क्षुल्लक गोष्ट वाटत असेल. पण माझ्याकडे पाहा. काय दशा झाली आहे माझी ! हे काम किती वाईट आहे, ते सांगता नाही यायचं. आपला जीव खाणारं काम आहे हे. हे शनि-महाराज आणि मृत्युदेवता आपल्या डोक्यावर बसतात. मनात क्षुद्र विचार निर्माण होतात. जुगार, दारु, बाहेरख्यालीपणा. . .सगळी व्यसनं लागतात. . . डोळ्यांतलं तेज. . ." तो काहीसा वैतागून चालू लागला. पण मी त्याला जाऊ दिले नाही, "डोळ्यांतलं तेज संपून जातं. दोन्ही डोळे म्हणजे काचेच्या

गोट्या बनून जातात. माणसाचा स्वतःवर ताबा राहात नाही. शनिदेव चालवील तसा तो चालतो. आपण काय करतो आहोत, काय बडबडतो आहोत, याचे त्याला भान नसते. सगळीकडून त्याची दुर्दशा होते. ही क्षुद्र दानं किती वाईट असतात, हे तुम्हाला माहीत नाही."

"मी रोज गायत्री मंत्राचा जप करतो," तो हळूच बोलला.

मी जोरात म्हणालो, "शनिदेव आणि मृत्युदेवता या तुम्ही सामान्य शक्ती मानता काय ? त्यांच्यापुढे गायत्री कः पदार्थ आहे ! शिवाय आज तुम्ही माझ्या तोंडचा घास हिरावला आहे. या पापाचे तुम्हीदेखील वाटेकरी आहात. मी दोन दिवसांचा उपाशी आहे."

थोड्या वेळाने मी विचारले, "तुमचे कोणी नातेवाईक आहेत ?"

"माझा धाकटा भाऊ आहे. शिकतोय तो. त्याला दर महिन्याला पैसे पाठवावे लागतात."

"हे पैसे पाठवणार ? छान ! म्हणजे झालंच त्याचं शिक्षण ! हिंडताफिरता राहिला तो तरी नशीब."

त्याचे डोळे लाल झाले, ओठ कापू लागले. तो म्हणाला, "माझ्या लहान भावाबद्दल एक शब्द बोलू नका."

मी आणखी जोरात म्हणालो, "बोलणार. . .आणखी बोलणार ! माझ्या तोंडचा घास काढून घेतलाय् तुम्ही ! ते पाप. . .तुला सोडणार नाही. ही दानं घेऊन तू धाकट्या भावाला शिकवू पाहतोस काय ? भोळा आहेस बेटा ! तुझा लहान भाऊदेखील तुझ्यासारखा, लाकडासारखा निर्जीव बनून वाईट सवयींच्या आधीन होईल, नालायक निघेल. माझी गोष्ट वेगळी. या जगात माझं कोणी नाहीय. जे लोक अशी दानं घेतात, त्यांचं संसारात 'आपलं' असं कोणी उरत नाही, सावधान !"

त्याने रागाने जळजळीत नजरेने माझ्याकडे पाहिले, काहीतरी पुटपुटला. मग असहायपणे हलके हलके पावले टाकीत तो निघून गेला. मी विजयी स्वरात म्हणालो, "आपल्या ब्राह्मण बांधवावर तू जो अन्याय केला आहेस, त्याचं फळ तुला, तुझ्या धाकट्या भावाला आणि माझ्याविरुद्ध तुला उभं करणाऱ्या त्या परिशास्त्र्याला जरूर भोगावं लागेल." मी असा, जोरजोरात ओरडत राहिलो आणि तो पुनः पुन्हा वळून माझ्याकडे पाहात पुढे जात राहिला. मग

मी देवळाच्या ओटयावर ऐटीत जाऊन बसलो. त्याच्याशी आपण अशा प्रकारे बोलू शकलो, याचा मला आधी अभिमान वाटला. मग थोड्या वेळाने वाटू लागले की, त्याच्याशी असे कठोरपणे बोलण्यात आपली चूक झाली. पण आज मला उपाशी राहावे लागले आहे हा विचार दुसऱ्या क्षणी मनात येताच मी मनाला सावरले. रात्र होताच मी नेहमीप्रमाणे त्याच जागेवर अंग टाकून दिले. शरीरात वेदना सुरू झाल्या. डोके दुखू लागले. . ,पायाला खिळा लागला होता त्या जागी असह्य आग होऊ लागली. कण्हत कण्हत मी डोळे बंद करून घेतले. एकाएकी भयंकर थंडी वाजू लागली. शेकडो, हजारो लोखंडी खिळे माझ्या डोक्याभोवती गरगरताना दिसू लागले.

तीन दिवस खूप ताप होता. मधून मधून मी शुद्धीवर येई तेव्हा, कोणीतरी माणूस माझ्याजवळ उभा आहे, मला पांघरूण घालतो आहे, कधी माझ्या तोंडात औषध घालतो आहे, तर दुसरा कोणी दंडात सुई टोचतो आहे असे मला भासे. या तीन दिवसांत मी त्या माणसाला नीट ओळखू शकलो नाही.

ताप उतरल्यावर मी डोळे उघडून पाहिले. मंदिराच्या कोपऱ्यात एका लहानशा झोपडीत मी चटईवर पडलो आहे. डोक्याला उशी. . .जवळच औषधाच्या दोन बाटल्या. . .पायांना पट्टी . . .बाहेर दाराशी कोणाची तरी सावली. . . .

मी धापा टाकीत बसण्याचा प्रयत्न करीत होतो. इतक्यात बाहेर बसलेल्या व्यक्तीने आत येऊन म्हटले, "काय पाहिजे आपल्याला ? आपण उठू नका."

"रामेशाम ?" मी पुन्हा डोळे मिटून पडलो. माझ्याजवळ बसून माझ्या कपाळावर हात ठेवीत तो म्हणाला, "ठीक. आपल्याला घाम आल्यानं मी निश्चित झालो आहे. आता ताप उतरलाच म्हणून समजा. तीन दिवस आपली अवस्था पाहून मी घाबरून गेलो होतो. डॉक्टरनं इंजेक्शन दिलं, तरी आपल्याला समजत नव्हतं."

माझ्या डोळ्यांतून पाणी वाहू लागले. मिटल्या पापण्यांच्या कोपऱ्यातून पाण्याची अखंड धार लागली. त्या दिवशी सडकेवर उभे करून मी ज्याचा वाईट-साईट बोलून अपमान केला, तो माणूस तूच काय ?

डोळे उघडून पाहिले तर ग्लासात औषध ओतणारा तो माणूस मला योग्यासारखा वाटला. "हा शेवटचा डोस आहे. हा पिऊन आपण पडून राहा.

मी डॉक्टरांकडे जाऊन येतो. गरज वाटली, तर औषध घेऊन येईन," असे म्हणून त्याने माझ्या तोंडात औषध घातले. मग सांगू लागला, "आजच धाकट्या भावाचं पत्र आलंय. लिहिलंय, अभ्यास चांगला चाललाय. आणखी एक वर्षानं त्याचा 'कोर्स संपेल...मग तो बडा अधिकारी बनेल. परवाच मी त्याला तीस रुपये पाठवले. ही पाहा पावतीवर त्याची सही...इंग्रजी किती छान लिहितो..." असे बोलत बोलत तो निघून गेला.

..जगावर अंधार पसरलाय, अज्ञानासारखा. देवळाच्या आवारात पक्ष्यांचा गलबला चाललाय. एकाएकी माझे मन व्याकुळ झाले. हळूहळू चालत मी बाहेरच्या ओटचावर जाऊन बसलो. मग हृदयात खळबळ...एक पक्षी आर्त स्वरात ओरडत उडून जातो.

बऱ्याच वेळाने काही लोकांचा घोळका दिसला. त्यांनी आणलेली बातमी ऐकताच मी थरथर कापत उठून उभा राहिलो. हृदय धडधडू लागले.

"कुठं ?"

"मेन रोडवर."

लटपटत्या पायांनी मी धावत निघालो. मी तिथे पोचलो तेव्हा सगळा ग्रंथ आटोपला होता. सडकेच्या मधोमध रामेशम रक्ताचं थारोळं बनून पडला आहे. लॉरी चालवणारा तो राक्षस असावा, थांबलासुद्धा नाही. लोक जमले आहेत.

मी त्याच्यावर झुकलो आणि भिजल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिले. उजव्या हाताच्या मुठीकडे त्याचे डोळे लागले आहेत. त्या मुठीत त्याच्या धाकट्या भावाचे पत्र आहे. मी रडत रडत ते पत्र घेतले. विजेच्या मंद प्रकाशात त्यावरची अक्षरे दिसली.— "माझा अभ्यास ठीक चालला आहे, मी आणखी चांगला अभ्यास करीन. आणखी एक वर्ष...त्यानंतर दादा, मी तुझी फुलांनी पूजा करीन !"

मी डोळे मिटून घेतले, "जरूर बेटा, चांगला शीक...मी आहे तुझा..."

डोळे उघडून पाहिले तर पोलिस अपघाताचा पंचनामा करण्याच्या घाईत दिसले.

❀❀❀

ठाकुराची पालखी

—अवसराल रामकृष्णा राव

कामरूपधारी देवता आणि दुसऱ्याच्या मनात प्रवेश करण्याच्या कलेत निपुण असणाऱ्या माणसांनी कल्पनेने रचलेल्या 'काशी मजली'च्या गोष्टींतील चित्रविचित्र दृश्ये साकार करणाऱ्या सनईचे सूर श्रोत्यांना खूप लांब कुठेतरी घेऊन जात आहेत. गोष्टीच्या शेवटच्या उपसंहाराप्रमाणे ढोल वाजतो आहे. ठाकुराची पालखी काढली जाते आहे. प्रत्येक घरासमोर थांबून घरातल्या माणसांनी वाहिलेले नारळ, आरती, धूपदीप इत्यादींचा स्वीकार करीत ठाकूर हलके हलके पुढे जात आहे. मिरवणुकीचा आवाज ऐकून जगन्नाथम बाहेरच्या ओट्यापर्यंत आला आणि तेथूनच त्याने मनोभावे ठाकुराला नमस्कार केला.

रस्त्याच्या मध्ये पालखी उभी राहिली.

"अरे, जग्गू ! ये ये ! या पालखीखालून इकडून तिकडे धावू या. त्यामुळे पुण्य मिळतं म्हणे." असे म्हणत एक मुलगा धावत जगन्नाथमच्या घरी आला आणि त्याच्या नातवाला ओढत घेऊन गेला. ते दोघेही पुढे पळाले.

इतर मुलांसारखेच तेही डोळे बंद करून एकीकडून दुसरीकडे धावत गेले. भक्तीचा अर्थ या मुलांना समजत नव्हता. पण पालखीखालून पळताना त्यांना मजा वाटत होती. पुनःपुन्हा असे पळण्यात किती गंमत आहे ते त्यांच्या लक्षात आले होते. चालणाऱ्या पालखीखालून धावण्यात तर आणखी मजा येते.

घरोघर, मनामनांतून क्षणोक्षणी लपंडाव खेळणाऱ्या कन्हैय्याला हा खेळ माहीत असता, तर तोदेखील पालखीतून उतरून या खेळात इतर मुलां-बरोबर हट्टाने सामील झाला असता. पुजारी मंडळी मुलांना रागे भरली. जग्गूच्या आईने त्याच्या पाठीत एक धपाटा घातला, तेव्हा हा आनंद किती क्षणभंगुर आहे, हे त्याच्या लक्षात आले.

जगन्नाथमने त्याला जवळ बसवून त्याचे सांत्वन केले. त्याच्या गालांवरून आसवे ओघळत आहेत. 'बाबा, माझं काही चुकलं का?' असे जणु त्याचे डोळे विचारताहेत. काशीला जाताना प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी कथा

सांगण्याची प्रथा होती. यामुळे वेळही जात असे व मनोरंजनही होत असे. या कथा अतिशय लोकप्रिय होत्या. अंग चोरून मांडीवर बसलेल्या नातवाला छातीशी घट्ट धरीत जगन्नाथमने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. जगन्नाथमला ठाकूर आणखी जवळ दिसला.

असे सांगतात की, यशोदा एकदा थट्टेने म्हणाली होती – "चौदा लोकांना खाऊन बसलाय. . .आणि दिसतो तर लहान मुलगा असं म्हणून प्रत्येकजण कन्हैय्याची स्तुती करतो– या लोकांना कसं धारण केलंय कोण जाणे ! किती महान आहे, वगैरे. . . इतक्या महान व्यक्तीला मी सहज भावाने कडेवर घेऊन भरवते. . .पण माझी स्तुती कोणी करीत नाही–ज्याचं त्याचं नशीब !"

पण यशोदेचे जे भाग्य होते, ते आता या पालखी वाहाणाऱ्यांना प्राप्त झाले आहे.

"प्रतिदिनी परमेश्वराची आराधना करणारे जर भाग्यशाली, तर ठाकुराची पालखी नेहमी वाहाणाऱ्यांनी हे भाग्य प्राप्त व्हावे म्हणून कोणत्या सुवर्णपुष्पांनी ठाकुराची पूजा केली असेल कोण जाणे ! . . ." मग दुसरे–कोणीतरी म्हणाले होते, "त्या बाहूंनी आणि त्या हातांनी कोणतं व्रत केलं असेल, कोणास माहीत !"

हे अखेरचे वाक्य ऐकून जगन्नाथम पुलकित झाला. "त्या बाहूंनी आणि त्या हातांनी कोणतं व्रत केलं असेल, कोणास माहीत !"

ठाकुरबरोबर चालणाऱ्या माणसाच्या हातातील मशालीप्रमाणे आजपासून ठीक पन्नास वर्षांपूर्वी जगन्नाथमचा आत्मा एकदा झगमगून निघाला होता.

जगन्नाथमचे डोळे विशाल आहेत. त्याच्या मामीसारखे त्याचे डोळे आहेत, असे म्हणतात. डोळेच काय, पण त्या डोळ्यांत ओथंबलेले कारुण्यदेखील त्याने आपल्या मामीकडूनच घेतले आहे, असे काही लोक म्हणतात. बालपणी स्त्रियांनीच त्याचे संगोपन केले. तो तीन वर्षांचा झाला नाही तोच त्याचे वडील वारले. आईचे सांत्वन करण्यासाठी तिची आई आली तर तेथेच राहिली. त्या आजीबरोबर नेहमी असणारी तिची धाकटी बहीण–धाकटी आजी– तीदेखील तेथेच राहिली.

संध्याकाळच्या वेळी खिडकीजवळ आजीच्या मांडीवर बसून जग्गू नाना प्रकारची दृश्ये पाहातो.

त्याला रस्त्यावर जाण्याची परवानगी नाही. संध्याकाळी खेळण्यासाठी बाहेर जायला मिळावे, म्हणून जग्गू नाना बहाणे करतो, पण ते त्याच्या आज्यांजवळ चालत नाहीत. एकदा शाळेतून परतताना तो सरळ खेळाच्या मैदानावर गेला आणि दुखावलेली करंगळी घेऊन घरी गेला, तेव्हा त्याच्या आजीने फुटबॉलची एक नवी व्याख्या सांगितली.

कामकाज नसलेले वीस-बावीस निरुद्योगी लोक संध्याकाळी स्मशाना-सारख्या जागी एकत्र जमतात. मोठ्या नारळासारखी एक वस्तू मध्ये टाकून सगळे ती पायाने ढकलत बसतात. एवढेच नाही, तर आश्चर्य म्हणजे हे अद्‌भुत आणि अभूतपूर्व कार्य पाहून त्याचा आनंद लुटण्यासाठी हजारो लोकांची गर्दी तेथे जमते. त्यांना लाजही वाटत नाही.

जग्गूला अशा प्रकारे घराबाहेरच जर पड् दिले नाही, तर त्याला जगाची ओळख कशी व्हावी ? त्यामुळेच एक दिवस जग्गू पंधरा वर्षाचा असताना आणि नववीत दुसऱ्यांदा शिकत असताना—त्याच्या शिक्षकांनी त्याला पैसे देऊन पोस्टात मनिऑर्डर करण्यासाठी पाठवले—तेव्हा मनिऑर्डर कशी करा-यची, पोस्टात पैसे कोणाकडे द्यायचे हे त्याला कळेना—शेवटी शाळेच्या आवारात कण्हेरीच्या एका झाडाखाली तो उदास होऊन बसून राहिला.

शर्टाच्या खाली पुस्तके लपवून वर्गातून घरी पळून जाणारा सुंदरम त्याची ती दशा पाहून "घरी जाऊन धाकट्या भावाला पाठवतो," असे सांगून हसत सुटला. पण हसण्याचे काय ? शेवटी त्याने आपल्या छोट्या भावाला पाठवले. लहान असला तरी त्याने व्यवस्थित मनिऑर्डर केली.

जगन्नाथमला यात अपमान वाटला नाही, असे नाही. पण 'त्या तिघीं'नी त्या वाटण्याला त्याच्या मनात पक्के होऊ दिले नाही.

"ती गरीबांची मुलं आहेत....काही मार्गच नाही, म्हणून प्रत्येक काम स्वतः करतात. तू तर श्रीमंताचा मुलगा आहेस. बाहेर पाऊल टाकल्यावाचून देखील तुझं चालू शकतं," आई म्हणाली.

"आता...गोष्टच वेगळी आहे. कलियुग आलंय नं ? म्हणून तर दिवस बदलले, जुन्या चालीरीती नष्ट झाल्या. त्या काळची आठवण झाली म्हणजे वाटतं आपण स्वतःला आज माणूस समजतो, हेच पुष्कळ झालं. माझ्या सासूबाई सांगायच्या की तुझ्या आजोबांना फायनलपर्यंत घरात फिरवून जेवू

घालायला, शाळेत नेऊन सोडायला आणि शाळेतून कडेवरून परत आणण्यासाठी नोकर असायचे," आजीने सांगितले.

"आणखी एक आहे राजम्मा. . .त्यांची मुलं असतात नं. . .त्यांना पोटभर खायला मिळत नाही, म्हणून ती अशक्त रोडकी होतात. त्यामुळे आपल्या पोराचं गुटगुटीत शरीर, गोल-गोल गाल आणि घोड्यासारखी चाल पाहून ते जळफळतात. चला, मी बाळाची दृष्ट काढते," धाकटी आजी बोलली.

"कुलदीपक आहे हा!" असे म्हणत तिघींनी त्या पोराचे मोठ्या प्रेमाने पालन पोषण केले. पण त्याच्या 'विकासा'साठी सडलेला तांदूळ, दूधतूप अशा त्याला खाऊ घातलेल्या गोष्टीच त्याच्या दृष्टीने बाधक ठरू लागल्या. त्यामुळेच त्याला एका जागी डांबून ठेवून देखील तो पोपटासारख्या चहूकडे घिरट्या मारू लागला. पिकल्या पेरूची चव घेऊन सुद्धा तो संतुष्ट झाला नाही. पंख नसलेल्या पोपटांना उडायला मदत केली पाहिजे, त्यांना खाऊ घातले. पाहिजे, घरटे नसले तर घरटे बांधून दिले पाहिजे. . .अशा समस्यांची उत्तरे शोधता शोधता त्याचे टपोरे डोळे आणखीनच मोठे झाले.

"अरे बापरे! किती तांदूळ दिलाय. . .या नालायक नागम्माला तरी अक्कल पाहिजे की नाही? मुलाला काय कळंतय्? . . . दिला तितका सगळा तांदूळ दिला टाकून आपल्या झोळीत. . .थांब, पोलिसांना बोलावून तुला धडा शिकवते. . ." शेवटी ती भिकारीण निघून गेली आणि आजीदेखील दुसऱ्या कामाला लागली. . .पण तो प्रसंग छोट्या जगन्नाथमच्या मनात कायमचे घर करून राहिला.

बिचारी भिकारीण. . .म्हातारी आहे. आजारी आहे, तिला कोणी नाही . . .डोळ्यांनी दिसत नाही. . .पाय चालत नाहीत. . .तिला दोन मुठी तांदूळ दिले, तर काय झाले? परवाच तर घरात पोतंभर तांदूळ सडून ठेवले आहेत.

एक दिवस धाकट्या आजीने म्हटले, "हे बघ राजम्मा. . .आता आम्ही तुझ्या पोराला काही सांभाळू शकत नाही. . .आम्ही मोठ्यांचं म्हणणं डोळे मिटून ऐकत होतो, श्रद्धेनं आणि भक्तीनं वागण्यात आमचं आयुष्य गेलं. घरात काम करणाऱ्या नोकरांना घरात कोणते पदार्थ होतात हे कळू नये, म्हणून आपण नोकरांना खायला काहीही देत नव्हतो. आपल्याला देता येत नव्हतं म्हणून नाही. . .नोकरांची नजर चांगली नसते. . .दृष्ट लागली तर

माणूस लगेच आडवा होतो. असे मी कितीतरी लोक पाहिले आहेत. आणि तुझ्या चिरंजिवांनी काय केलंय, पाहा."

त्याने केले होते ते एवढेच:

आजी तुरीच्या डाळीची चटणी वाटत होती.

"आजी, आजी मला थोडी दे," असे म्हणत जगन्नाथमने हात पुढे केला. तिने ती अर्धवट वाटलेली थोडी चटणी त्याच्या हातावर ठेवली. ती चाखत चाखत तो दुसऱ्या खोलीत गेला. चिट्टम्मा मोलकरीण खोली झाडत होती. तिच्या लुगड्याचा पदर धरून चालणारी गौरी जग्गूकडे पाहून हसली. तिचे हसणे जग्गूला आवडले. थोडीशी चटणी गौरीच्या हातावर ठेवीत तो म्हणाला, "बघ, चटणी किती छान झालीय... आणखी थोडी आणू ?" दोघे बरोबर खाऊ लागली तेव्हा त्याला जास्तच गंमत वाटली.

"थांबा, धाकले धनी ! आईसाहेबांनी पाह्यलं तर ?" चिट्टम्मा असे म्हणाली आणि त्याचवेळी नेमकी आईसाहेबांची नजर त्यांच्यावर पडली.

"का ? यात काय चुकलं ?.. जेवताना त्याने त्या लोकांना आपल्या पानात ढीगभर चटणी वाढताना पाहिले आहे. थोडीशी चटणी त्या मुलीच्या हातावर ठेवण्यात काय चूक आहे."

हा प्रश्न त्याच्या डोळ्यांनी केला होता, तोंडाने नाही. त्यामुळेच कोणी त्याचे उत्तर दिले नाही.

तो सातवीत होता, तेव्हाची एक घटना तो कधीही विसरू शकला नाही. त्याला एकाएकी ताप आला. त्यावर त्या तिघींनी जे कष्ट केले त्याला सीमा नव्हती. अनेक वस्तूंचे काढे बनवून दिले, कपाळावर अंगारा लावला, मंत्रतंत्र करवले आणि ताईत बांधला. पण या सर्वांपेक्षा त्याला ज्याच्यामुळे आराम पडला होता तो होता समोर राहाणारा सत्यम–त्याच्याच वर्गात शिकणारा. तो काही करीत नव्हता, फक्त थोडा वेळ त्याच्याजवळ येऊन बसे. प्रकृती कशी आहे, औषध कोणाचे आहे, काय खातो, कोणतेही प्रश्न तो विचारीत नसे. त्याऐवजी तो इकडच्या-तिकडच्या गप्पा मारी...शाळेत नवे शिक्षक आले, त्याच दिवशी त्यांच्या सायकलीतली हवा कोणातरी मुलाने काढून टाकली... शाळेतून येताना त्याला एक अधेली सापडली...त्याच्या मोठ्या भावाला हे खरे वाटले नाही आणि त्याने त्याला थप्पड मारली...शेजारच्या

राधाच्या घरी नवा रेडिओ आला आणि तो दुसऱ्याच दिवशी बिघडला. . . त्याच्या घरी कुठून तरी भुऱ्या रंगाची एक मांजरी आली आहे आणि तिला तीन पिल्ले झाली आहेत. . . अशा अनेक बातम्या तो ऐकवी. त्यातल्या किती खऱ्या–किती खोट्या कोण जाणे. . . पण त्या ऐकताना जग्गू ताप, वेदना सगळे विसरून जाई. स्नेह ही किती मधुर गोष्ट आहे हे त्यावेळी जग्गूला कळले. तो बरा होऊन हिंडू-फिरू लागल्यावर दोघेही शाळेत बरोबर जाऊ-येऊ लागले.

एकदा लागोपाठ तीन दिवस सत्यम दिसला नाही. तो तिसऱ्याही दिवशी आला नाही, तेव्हा तो का आला नाही ते पाहाण्यासाठी जग्गू त्याच्या घरी जायला निघाला. त्याबरोबर आजी त्याचा हात धरून त्याला घरात घेऊन आली आणि तिने झटकन दार लावून घेतले. "अरे बाळा, आम्ही घरात कशाला आहोत? आम्हाला सांगितल्याशिवाय स्वत:च्या मनानं असं बाहेर जाणं बरं नाही. लहान-मोठं, बरं-वाईट समजून घेऊन राहिलं पाहिजे. तुला काही झालं, तर तुझ्या भरवशावर जगणाऱ्या आमचं काय होईल ? न विचारता-सवरता देवीच्या घरात जातोस ?" जग्गूच्या काहीच लक्षात आले नाही. त्याने जाऊन आपल्या आईला विचारले.

"होय बेटा, सत्यनारायणाला देवी आल्या आहेत. हा रोग फार लवकर पसरतो. जिथं असा रोग असेल, त्या घरात जाऊ नये."

जग्गूच्या मनाचा थरकाप झाला. त्याचे डोळे भरून आले. "म्हणजे मी जाऊन त्याला पाहू शकत नाही, आई ?"

"पाहू का शकत नाही ? स्नान झाल्यावर जरूर पहा. पण तोपर्यंत त्याच्याकडे जायचं नाही. समजलं ? माझी शपथ आहे. खूप निघाल्यात देवी म्हणून ऐकलंय."

यानंतर आठ-दहा दिवस जगन्नाथमला धड अन्न पाणी गेले नाही. त्याला शांत झोपसुद्धा लागली नाही. सतत तो सत्यमचाच विचार करी. एकदा का होईना, खिडकीपाशी जाऊन, किमान देवडीवर उभे राहून त्याला सत्यमला विचारायचे होते, "काय बाबा सत्यम ! मी जगन्नाथम. माझ्याकडे पहा. प्रकृती कशी आहे. स्नान कधी करणार. आपण दोघं हातात हात घालून शाळेत पुन्हा कधी जाणार ?"

त्यामुळेच आईच्या सांगण्यावर त्याचा विश्वास बसला नाही, तेव्हा त्याने आपल्या सायन्स शिक्षकाना विचारले; "अगदी बरोबर आहे जगन्नाथम. देवी हा फारच भयंकर रोग आहे. आपल्या आईचं तुला ऐकलंच पाहिजे. त्यातच तुझं हित आहे."

तीही आशा आता राहिली नाही. दाराशी उभा राहून सत्यमच्या घरातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक माणसाला तो विचारी, "काय हो, आमच्या सत्यमचं कसं आहे? आता त्याला भेटता येईल का?"

पण जगन्नाथमला असे फार दिवस विचारावे लागले नाही. "जन्माला येणारा माणूस मरणारच" हे सत्य सत्यमने बालपणीच सिद्ध करून दाखवले.

आपण फार मोठी चूक केली आहे, असे जगन्नाथमला वाटू लागले. या चुकीला आता कोणतेही प्रायश्चित्त नव्हते. या विचाराने तो अनेक दिवस झुरत राहिला. आई काय, शिक्षक काय किंवा प्रत्यक्ष ब्रह्मदेवानेदेखील जाऊ नको म्हणून सांगितले असते तरी आजारी सत्यमला भेटायला न जाण्यात त्याने फार मोठा अपराध केला होता. "सत्यम, मला क्षमा करशील?" असे म्हणत तो स्फुंदू लागे. हळव्या मनाच्या लोकांना असे विचार अधिकच व्याकुळ करतात. पूर्वी आश्चर्याने विस्फारलेले जगन्नाथमचे डोळे आता अकर्मण्य भावनेने संकुचित होऊ लागले. बालपणापासून त्याला आपल्याला हवी असलेली वस्तू मागणे माहीत नव्हते, कोणाच्या बोलण्याचे खंडण करणे अथवा त्याला सरळ उत्तर देणे त्याला अजिबात माहीत नव्हते. या सगळ्यामुळे त्याच्या मनात बंडखोरीची भावना हळूहळू निर्माण झाली, आणि त्याचे मन बेचैन राहू लागले.

फायनलच्या वर्गात जाईपर्यंत जगन्नाथम अशी काही लहान-मोठी कामे करू लागला की जी त्याच्या घरच्या लोकांना पसंत नव्हती आणि ती केल्याशिवाय त्याला चैन पडत नव्हते. शाळेत आपली फी भरण्यासाठी नेलेल्या पैशांतून त्याने गोपालम नावाच्या गरीब मुलाची फी भरून टाकली. बाजारातून सामान आणण्यासाठी ठेवलेल्या खास नोकराला रजा दिली. संध्याकाळी तो नियमितपणे खेळायला जाऊ लागला. आई, आजी आणि बहीण हे सारे पाहून कपाळावर हात मारून घेऊ लागल्या. जगन्नाथमला विचारायची हिंमत त्यांच्यात नव्हती. ते मौनच त्याचे संरक्षक कवच बनले.

वृथाभिमानाची भयकारी बंधने तोडून बाहेर पडल्यावर अनेक विचित्र दृश्ये त्याला दिसू लागली. जग किती विशाल आहे, हे त्याच्या लक्षात आले. मग त्याचे डोळे आणखी विशाल बनले. शाळेत असताना त्याचे सर्वात मोठे आकर्षण होते त्याचा वर्गमित्र कामेशम. या कामेशमकडे जगन्नाथम मोठ्या विचित्र प्रसंगाने आकृष्ट झाला.

एकदा कामेशम वर्गात आपल्या मित्रांपुढे घसा खरवडून काहीतरी व्याख्यान देत होता. इतक्यात जगन्नाथमला वर्गात येताना पाहून त्याने आपले व्याख्यान एकदम थांबवले.

"ही गोष्ट या अठरा वर्षांच्या बाळाला सांगू नका बरं, नाहीतर ते भीतीनं आजारी पडेल," कामेशम म्हणाला आणि सगळी मुले जगन्नाथमकडे पाहून खदखदून हसली. अकारण झालेल्या या उपहासाचे त्याला वाईट वाटले. कारण विचारायचा त्याला धीर झाला नाही. उदास होऊन तो गप्प बसला. मग कोणीतरी त्याला सगळी हकीकत सांगितली.

आदल्या रात्री कामेशमच्या घरासमोरच्या घरी चोरी झाली होती. कामेशमला जाग आली, तशी चोराचा पाठलाग करून त्याने चोराला पकडले. हे ऐकून त्याची आई घाबरून एकच आक्रोश करू लागली, "बेटा, आपलं घर नव्हतं, आपले लोक नव्हते. . . तू असा लहान. . . चोराजवळ सुरा असतो. अशा धोक्यात तू का जीव घालतोस?"

"पुरुष आहे म्हणून !" कामेशमने उत्तर दिले.

"काय म्हणालास ? पुन्हा बोल !" मागून त्याच्या वडिलांनी दटावले.

"एकदा नाही. शंभरदा म्हणेन ! ते देखील मी पुरुष आहे म्हणून."

त्याच्या तोंडात भडकावीत वडिलांनी म्हटले, "पुन्हा म्हणशील ?" पण कामेशमने शब्द मागे घेतला नाही. शेवटी त्याला मारून मारून वडील थकले. त्याची आई बोलली, "किती हट्टी आहेस रे ! इतका मार खाल्लास, पण डोळ्यातून पाण्याचा टिपूस नाही आला."

"कारण की मी पुरुष आहे !" कामेशम पुन्हा बोलला.

"अगदी बरोबर आहे." जगन्नाथम मनातल्या मनात म्हणाला.

बापजाद्यांच्या कमाईवर स्वस्थ बसून मौज करणारे, विनासायास प्राप्त झालेल्या भाग्यामुळे स्वतःलाही विसरलेले, दुसऱ्याच्या मरणाचे स्वतःच्या

डोकेदुखी इतके देखील दु:ख न होणारे, स्वत:चे जीवन हेच जीवनाचे सर्वस्व मानून आज जगणारे आणि उद्या मरणारे लोकच जगात खूप असतात. वास्तविक खराखुरा पुरुष असल्यामुळेच कामेशम शेजारच्या उपाशी मुलाकडे पाहून व्याकुळ होई, समोरच्या घरात चोरी होताच तो धावला होता.

कामेशमच्या शरीरावर माराचे वळ पाहून सगळे चकित झाले.

"कामेशम, तुझ्या वडिलांना एवढं समजत नाही ? मुलाला असं मारतात?"

कामेशम मुक्तपणे आणि अभिमानाने हसला.

"हूं : ! मार खाल्ल्यानं काय झालं ? आज वळ पडले, उद्या मावळून जातील. . .चार दिवस टिकेल असं काम केलं पाहिजे मित्रांनो ! . . . . . समोरच्यावर अन्याय होत असलेला दिसूनही आपण गप्प बसलो तर आपल्यात आणि जनावरांत काय अंतर राहिलं ? आपल्याला माणूस बनवतील, अशी कामं आपण केली पाहिजेत. . ."

जगन्नाथमच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

"कामेशम, मलादेखील तुझ्या टोळीत घे नं," म्हणण्याचे धाडस आपल्याला झाले, यामुळे त्या दिवशी दिवसभर जगन्नाथम खूष होता. या उत्साहाची कसोटी लागण्याची संधीही लवकरच मिळाली.

त्याचे असे झाले ——

गावात सगळ्यांकडे पाणी भरणारा सुब्बय्या अचानक वारला. मिळेल त्यावर समाधानात राहून, केव्हाही आणि कोणत्याही प्रकारची मदत करण्यासाठी हजर राहाणाऱ्या सुब्बय्याचे चार दिवसांच्या आजाराने प्राणोत्क्रमण झाले.

प्रत्येक ब्राह्मण कुटुंबात सुब्बय्या पोचला होता याचे आणखी एक कारण होते. त्याच्या ओळखीच्या कुटुंबात कोणी कधी आजारी पडले, की तो आठही प्रहर त्याची सेवा-शुश्रूषा करी. आई-बहीणदेखील जिथे रोग्याजवळ बसायला भीत, अशा संसर्गजन्य आजारात देखील तो निर्भयपणे रोग्याची शुश्रूषा करी. पाणीवाला सुब्बय्या हळूहळू परोपकारी सुब्बय्या म्हणून प्रसिद्ध झाला. शेवटी त्याचा परोपकार उरला आणि तो निघून गेला.

हा सुब्बय्या कामेशमच्या घरीदेखील पाणी भरी.

त्या दिवशी सुब्बय्याची आई वेंकम्मा आपल्या आईला भेटायला आलेली

पाहून कामेशमला आश्चर्य वाटले. काल दुपारीच तर वेंकम्माने आपला मुलगा गमावला होता. अशा परिस्थितीत लोकांनी तिच्या घरी जाऊन तिचे सांत्वन करणे स्वाभाविक होते. पण हे काय ? आईला पाहाताच वेंकम्मा रडू लागली. आई तिचे सांत्वन करीत म्हणाली, "पुरे, वेंकम्मा. आता तू तरी काय करणार? म्हातारपणी तुझ्या कपाळी हे लिहिलं होतं... आपल्या हातात काय आहे ?"

"ते म्हणत नाही मी, अन्नपूर्णम्माआई ! गावात कोणी वारलं की तो पुढे होऊन क्रियाकर्मांची सगळी व्यवस्था करायचा. ...मुलांना गमावून रडणाऱ्या आई–बापांना धीर देऊन छोटया छोटया मुलांचे मृतदेह कपडयात गुंडाळून तो स्मशानात घेऊन जाई. ते दृश्य आजसुद्धा मला दिसतं. किती अनाथांना त्यानं अग्नि दिला असेल...माझं दुर्दैव असं की मी जिवंत राहिले आणि तो निघून गेला..त्याची सगळयांना जरूर होती.. आज त्याची कोणाला जरुर नाही. मी एकटी म्हतारी काय करू शकणार, ताई ?"

वेंकम्मा पुन्हा मुसमुसून रडू लागली. आईने तिला दोन रुपये दिले. वेंकम्मा जात असताना बाहेरच तिला कामेशम भेटला.

"बाबांनी मला पेन घेण्यासाठी दोन रुपये दिलेत. मला पेनची गरज नाही. पेन्सिलीने लिहीन...मास्तर मारतील...तर मारू दे...तेवढयानं मी मरणार नाही !...हे घ्या आजी, हे दोन रुपयेही ठेवून घ्या. उपयोगी पडतील.

वेंकम्माचे डोळे पाणावले.

"नको बेटा ! आईने दिले म्हणून हे घेतले. मला त्याची काय जरूर आहे ? काल दोन वाजता प्राण गेला...अजून त्याला अग्नि देणारं कुणी मिळालं नाही...या गावात ब्राह्मणांची दोनशे घरं आहेत...दुरून अश्रू गाळून सगळे निघून गेले... पुढच्या व्यवस्थेचा कोणी विचार केला नाही..

मी एकटी म्हातारी...माझ्याच्यानं काय होणार, बेटा कामेशम ?"

कामेशमला आईचे शब्द आठवले :

"आपल्या हातात काय आहे ?"

त्याने आपले दोन्ही हात पसरून पाहिले. शर्टच्या बाह्यावर वर करून आपल्या दंडाकडे पाहिले. त्याचे रक्त उसळून आले.

"आपल्या मनात काही असलं, तर हातात सगळं आहे," त्याचे डोळे चमकले.

"आजी, ऋषिमुनींसारख्या तुमच्या मुलाचं प्रेत म्युनिसिपालिटीच्या लोकांनी घेऊन जावं, हा कलंक या गावाला लागता कामा नये. . .चला, मी येतो तुमच्याबरोबर !". . .

कामेशमची त्यावेळची मुद्रा आणि चालण्याचा त्याचा आवेश पाहून जगाची नाना रूपे पाहाणारे अनुभवी लोकदेखील प्रभावित झाल्याशिवाय राहिले नसते. पुढे वेंकाम्मा आणि मागे कामेशम असे जाताना पाहून कामेशमचे सगळे मित्र काहीही विचारपूस न करताच त्याच्यामागून चालू लागले. थंड हवेपासून बचाव करण्यासाठी कानांना स्कार्फ गुंडाळलेला जगन्नाथम हे खिडकीतून पाहातो आहे. कामेशमला पाहाताच त्याने स्कार्फ काढून फेकून दिला; केवळ स्कार्फच नाही, तर आपली अकर्मण्यता आणि भेकडपणाही त्याने फेकून दिला. त्याच-क्षणी घनदाट अंधारात झोपलेला सुरवंट आपल्याभोवतीचे आवरण फाडून रंगीबेरंगी फुलपाखराच्या रूपात बाहेर पडला होता. त्याचवेळी. . .होय, त्याच वेळी . . .अमावास्येच्या अंधःकारात दिवाळी झगमगली.

आपण मागे राहू नये म्हणून जगन्नाथम स्वतःलाच चकित करणाऱ्या वेगाने धावत त्या घोळक्यातच सामील झाला असे नव्हे, तर सरळ कामेशमजवळ जाऊन त्याच्या हातात हात घालून उभा राहिला.

मोठी माणसे काय म्हणतील, याचा मुलांनी त्यावेळी मुळीच विचार केला नाही. त्याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुलांवर रागावण्याचा विचारही मोठ्यांच्या मनात आला नाही. खरे म्हणजे असे झाले की –

"आमचे आईवडील जिवंत आहेत. . .आम्ही स्मशानात जायला नको. . ."

"काल-परवापर्यंत मी आजारी होतो. . .मला भीती वाटते."

"आमच्या घरात सुतक आहे, नाहीतर मी जरूर आलो असतो. . ."

"माझ्या बायकोला दिवस गलेत. अशावेळी मी स्मशानात जाऊ नये असं म्हणतात."

अशा नाना सबबी सांगून टाळाटाळ करणारे लोक "आम्ही उचलणार, आम्ही उचलणार" असे म्हणू लागले.

सुब्बय्याची शवयात्रा . . .ठाकुराच्या शोभायात्रेसारखी थाटात निघाली.

शव खांद्यावर घेऊन कामेशमने ज्या गोष्टी सांगितल्या त्या जगन्नाथमच्या आयुष्यभर लक्षात राहातील :

"चांगली कामे करण्याच्या गप्पा आपण मारतो. . .पण गरज पडली तर पार मागे हटतो. . . हे जीवन जीवन नाही, मरण आहे. आमच्या शुभसंकल्पांचा श्रीगणेशा इथंच करायचा आहे. . .आपण सगळे भाऊ हे प्रेत एकवार आपल्या खांद्यावर ठेवून घेऊ या," एवढे बोलून त्याने सगळ्यांच्या खांद्यावर प्रेत ठेवले. लहान मुले प्रेताखालून इकडून तिकडे पळू लागली.

जगन्नाथमने जग्गूला आणखी जवळ घेतले. हात उचलून नमस्कार केला.

"ठाकुराची पालखी निघून गेली, आजोबा !" नातवाने आश्चर्याने म्हटले.

"नाही ! . .नाही. . ." आजोबा पुटपुटले. ते भावपूर्ण विशाल डोळे आणि डोळ्यांतली ती ज्योत पाहून जग्गूला काही कळेना. त्याने आजोबांना घट्ट मिठी मारली.

* * *

यंत्रजीवी

—कोम्मूरि वेणू गोपाळ राव

जनरल हॉस्पिटलच्या मॉर्च्युअरी रूममध्ये शवचिकित्सा चालू आहे. पॅथॉलॉजीचे प्राध्यापक श्रीधर झपझप शरीराचे विच्छेदन करीत त्यांना आढळणाऱ्या गोष्टी उत्साहाने विद्यार्थ्यांना समजावून सांगत आहेत. त्या दिवशी असिस्टंटचे काम करणारी विद्यार्थिनी भराभर नोटस् घेते आहे.

"हे पाहा, अँटिबायोटिक युगात सिफिलिअसने इतकं मूळ धरण्याचे प्रकार फार थोडे असतात. यापूर्वी अशी केस कधी पाहायला मिळाली नव्हती. इथं किडनीवर पाहा, कसे पॅसेज तयार झालेत. इथं कन्सिस्टन्सी किती फर्म आहे हे तुम्ही फील करायला पाहिजे:...आय से इट इज वूड हार्ट...ही पहा लिव्हर...ब्रेन...युटेरस ...यू फील द लिंक ग्लॅण्ड्स हिअर...टिपिकल हीट अँपिअरन्स...व्हॉट ए वण्डरफुल टरशियरी स्टेज इट इज..."

आणखी एका तासाने शवचिकित्सा आटोपली. शरीरातून काळजीपूर्वक काढलेले भाग पेटीत सुरक्षित ठेवून म्युझियममध्ये ठेवण्यास असिस्टंटला सांगून श्रीधर हात धुवून बाहेर निघून गेला.

मॉर्च्युअरीबाहेर, बहुधा त्या बाईचे नातेवाईक—पाच सहा माणसे झाडाखाली बसलेली दिसली. श्रीधरच्या मनात आले, ही माणसे बहुधा मृत शरीरासाठी थांबली असावीत. आता हे तुकडे नेऊन जमिनीत पुरल्यावरच या भोळ्या लोकांना आणि त्या मृतस्त्रीच्या आत्म्याला शांती मिळेल. काय अजब लोक आहेत! पण त्या शरीराचे सार तर त्याने काढून घेतले आहे. मुख्य अवयव तर इथेच संग्रहालयात राहातील. सारहीन शरीरच हे लोक क्रिया-कर्मासाठी घेऊन जातील.

श्रीधरचा ईश्वरावर विश्वास नाही. अंधश्रद्धा तो आपल्या आसपासही फिरकू देत नाही. जुन्या रूढी आणि निरर्थक परिपाठ यांचा त्याच्यावर लेशभरही परिणाम होत नाही. आपण ज्याला 'अटॅचमेंट' म्हणतो, त्या सगळ्याच्या पलीकडे आहे तो.

आपल्या खोलीत जाऊन हात-तोंड धुवून तो जेवणासाठी डबा उघडणार इतक्यात टेबलावरच्या फोनची घंटी वाजली. जाऊन रिसीव्हर हातात घेतला.

तिकडून डॉक्टर रमांचा आवाज आहे. 'डॉक्टर. काँग्रॅच्युलेशन्स.'

"काय झालं ?"

"मी श्रीदेवीला तपासलंय. शी इज प्रेग्नन्ट. प्राउम आहे नं ? ती फार वीक आहे. चांगला आहार देऊन तिची काळजी घेतली पाहिजे. तुम्हाला माहीत नसेल—श्रीदेवी माझ्याकडे आली आहे. तिला शंका आली, तशी माझ्याकडे एक्झामिन करायला आली. . . थर्ड मन्थ आहे."

त्याचे कान ऐकेनासे झाले. एका पळात हजारो गोष्टींनी त्याला भयभीत करून टाकले. रिसीव्हर धरलेला हात थरथरतो आहे. 'माय गॉड', आतल्या-आत खचून जात तो बोलला.

पोर्टिकोत गाडी उभी करून, स्वागतासाठी सामोऱ्या आलेल्या श्रीदेवीकडे न बघता तो सरळ दिवाणखान्यात जाऊन सोफ्यावर बसला.

तो असे करील, असा श्रीदेवीचा अंदाज होताच. मिनिटभर ती स्तब्ध राहिली. मग हलकेच ती सोफ्याच्या मागे येऊन उभी राहिली.

"या बातमीनं आपण घाबरला असाल ?"

त्यानं मागे वळून शून्यपणे तिच्याकडे पाहिले. त्याची दृष्टी बहुधा अशीच असते. भावपूर्ण दृष्टीने तो क्वचितच पाहातो.

"बस, सांगतो." आरंभी पत्नीला प्रसन्न करण्यासाठी तो म्हणाला—

"ठीक आहे, बोला," ती उभ्याउभ्याच बोलली.

"असं नाही, बस."

श्रीदेवी समोरच्या सोफ्यावर बसून त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागली.

"असं पहा, श्रीदेवी," समजावणीच्या स्वरात तिचा पती मेडिकल कॉलेजातील प्राध्यापक, श्रीधर बोलू लागला, "माझं बोलणं ऐकून अस्वस्थ होऊ नकोस. पाच वर्षं झाली आपल्या लग्नाला. त्यात दोन वर्षं मी विलायतेत राहिलो. आमचं जीवनच असं आहे की, व्यवसायाच्या दृष्टीने लवकर आणि दांपत्यजीवनाच्या दृष्टीने उशीरा ते शोभतं. आणखी दोन वर्षांत मला पुन्हा स्टेट्समध्ये जावं लागेल. यावेळी तुलाही बरोबर नेण्याचा माझा विचार होता. अजून माझ्या मनात संततीची इच्छा निर्माण झालेली नाही. केवळ

संततीमुळेच आपल्याला आयुष्यातला अनिर्वचनीय आनंद प्राप्त होईल आणि आपल्या जन्माचं सार्थक होईल अशी चुकीची समजूत माझ्या मनात मुळीच नाही. हा सगळा गोंधळ मला पसंत नाही. हे त्रांगडं आपल्या मार्गात अडथळे निर्माण करील. आपण अजून काही म्हातारे झालो नाही मी एक प्रश्न विचारतो. हा आनंद संपावा, असं तुला वाटतं काय ?"

श्रीदेवीने मोठ्या कष्टाने श्वास रोखून धरला. त्याचे बोलणे ऐकून तिच्या मनात दोन प्रश्न निर्माण झाले. पहिला असा की–"आनंद म्हणजे काय ?"

दुसरा : "आता हे सारं कशासाठी बोललं जातंय ? . . .प्रकरण हाताबाहेर गेलेलं असताना ?"

"सगळं ऐकलंस ना ?" असा प्रश्न विचारणाऱ्या दृष्टीने तिच्याकडे पाहात प्राध्यापक म्हणाले, "आता सांग–काय विचार आहे ?"

कसंनुसं हसत ती म्हणाली, "इश्श! तुम्ही विचित्रच दिसता. त्यात सांगण्यासारखं काय आहे ?"

"सांगण्यासारखं काही नाही ?" त्याने निराशेने विचारले.

"नाही."

"इतक्या लवकर एवढं मोठं संकट येईल, असं माझ्या मनातदेखील आलं नव्हतं," हात चोळीत तो स्वतःशीच पुटपुटू लागला. तशाही परिस्थितीत आपले हसू दाबीत ती हलकेच उठून श्रीधरच्याजवळ जाऊन बसली. थोडा अनुनय करण्यासाठी त्याच्या खांद्यावर हात ठेवीत ती म्हणाली, "ऐकलं का ?"

श्रीधरने पत्नीकडे पाहिले–पुन्हा तीच भावशून्य दृष्टी आणि निश्चल आवाज: "श्रीदेवी ! ही ममता–मोह, ही मेहनत–धडपड हे सगळं माझ्या पिंडाला न मानवणारं आहे. मला माझ्या स्वभावाला अनुकूल असं जीवन हवंय. मला जे काही हवंय, जसं राहायला हवंय. . .तसंच झालं पाहिजे. आकस्मिक घटना आणि नको असणारी बंधनं मला नको आहेत. तू मला ओळखलेस --विरह-मीलन, परस्परांसाठी प्राण देणं; प्रणयाचा आकस्मिक विस्फोट, अणूत अणू, रक्तात रक्त आणि मांस इत्यादी भावनांबरोबर दुर्बलतेनं मूळ धरणं वाढणं आणि जीवनाच्या विकासात अडथळे आणणं या सर्व गोष्टी मला पसंत नाहीत. या जगात सगळ्यात मोठी दुर्बलता हीच आहे. हे यंत्रयुग आहे. विज्ञान क्रांतिकारक रूप धारण करीत आहे. मानवी बुद्धी रबरासारखी लवचिक

बनली पाहिजे, दोरीसारखी ती तुटता कामा नये, श्रीदेवी !"

खूप प्रयत्न करूनही तिला अश्रू आवरेनात. युगानुयुगे अक्षरांकित करून ठेवण्यास योग्य असं ते बहुमोल अश्रुबिंदू कोमल कपोलांवरून तिच्या निष्कलंक कंठभागास कलंकित करीत आहेत.

"रडणारी माणसं मला मोठी अजब वाटतात."

"आपण कठोर आहात अगदी," दाटलेल्या गळ्याने ती नाराज होऊन म्हणाली.

"बरोबर असेल," असे म्हणत तो उठून उभा राहिला. घरी आल्यावर त्याने कपडेदेखील बदलले नाहीत. सवयीप्रमाणे कॉफीदेखील घेतली नाही. सावकाश कॉरिडॉरमध्ये जाऊन बाहेर पाहात त्याने सिगरेट शिलगावली.

"या कठोरतेमुळंच माझं कल्याण झालं आहे. इतक्या लहान वयात प्राध्यापक होण्याची संधी त्यामुळंच मला लाभली आहे. प्रेमाच्या उन्मादाशी मी निष्ठुरतेनं सामना देऊ शकलो नसतो तर कदाचित मी सामान्य पदवीधरच राहिलो असतो. वस्तुस्थिती तुला माहीत आहे." तिने काहीही उत्तर दिले नाही. त्या नीरवतेच्या नदीत तिचे रडणे मंद लहरींप्रमाणे भासले.

हिवाळ्याचे दिवस होते. दक्षिणेकडून सारखा गार वारा वाहात होता. धरित्री आणि आकाश आधीच थंड झाले होते. हळूहळू अंधार पसरतो आहे. प्राध्यापक महाशयांच्या बंगल्यासमोरच्या उद्यानातील रातराणी, लिली, मधुमालती, सोनजुईच्या लता कुंजांतून सुगंधलहरी चहूकडे पसरताहेत. तो उभा आहे तिथून जवळच असलेले निलगिरी आणि कापराचे वृक्ष मंद सुगंध उधळताहेत. हैद्राबादच्या मोरेडपल्ली भागात एकान्त ठिकाणी आपल्या आवडीप्रमाणे त्याने हा बंगला बांधला आहे. बंगल्याभोवतीचे रमणीय उद्यान आणि त्यात फुललेले रंगीबेरंगी पुष्पगुच्छ हे सगळे भावनाप्रधान श्रीदेवीच्या संतत परिश्रमांचे फळ आहे. प्राध्यापक श्रीधर प्रेतांशी, प्रेतांच्या शरीरातील मासखंडांशी आणि सूक्ष्मदर्शक यंत्रांशी जेवढ्या आत्मीयतेने संवाद करू शकतो, तितका फुलझाडांशी नाही. त्याचे सौंदर्य आणि सुगंध त्याचे डोळे आणि पंचेंद्रिये यांना अजिबात आकर्षू शकत नाहीत. सिमेंट व विटांनी बनलेला आणि गुळगुळीत फरशांनी चकाकणारा बंगला लखलखीत ठेवण्यात तर तो फारच कुशल आहे.

थोड्या वेळाने सिगरेट फेकून मागे न पाहाताच तो बोलू लागला: "साधना हे माझ्या जीवनाचं अंतिम ध्येय आहे. त्या ध्येयापाशी पोचण्याच्या मार्गात येणारे छोटे छोटे अडथळे टघूमरसारखे आहेत. माझं ऐकशील तर या अडचणींवर तू मात करू शकशील. अजून कुठं उशीर झालाय ?—महिना-दोन महिनेच झालेत, इतकंच नं ? तुझी प्रकृती मुळात बरी नसतेच. तू मुलाला जन्म देऊ शकशील की नाही याचीच मला शंका आहे. एका छोटया जिवासाठी आपला प्राण धोक्यात घालणं, 'मिअर फूलिशनेस. . . माझं ऐक. या परिस्थितीत मला हे पसंत नाही. अजून वेळ आहे—मी स्वतः डॉक्टर आहे. हे रोखणं मला अशक्य नाही."

एक मिनिट. . . नाही. . . एकच क्षणभर आग बरसणारी नीरवता. भूकंपापूर्वी, लहानशा धरित्रीला समुद्राने गिळण्यापूर्वी, ज्वालामुखीच्या उद्रेकाआधी जी भीषण नीरवता पसरते तशी. . . आज बरसणारी नीरवता आणि त्यानंतर प्रचंड भीषण आवाज !

तो चमकला; मागे वळून पाहिले. श्रीदेवी जमिनीवर बेशुद्ध पडली आहे. रात्रीचा मिणमिणता दिवा खोलीभर प्रकाश पसरतो आहे. भिंतीवरचे घड्याळ टिकटिकते आहे. बारा वाजून गेले आहेत.

श्रीदेवीला झोप येत नाही आहे. गळ्यापर्यंत चादर घेऊन पडल्या पडल्या डोळे मिटून ती विचार करते आहे. संध्याकाळी ही घटना घडली तेव्हापासून पतीची आठवण येताच तिच्या मनाचा थरकाप होतो. तिच्या मनाच्या कणाकणात तो पती म्हणून नव्हे, तर प्राध्यापक म्हणून, यंत्रजीवी म्हणून साकार होतो आहे. आज तिला झोप यायची नाही.

तिच्या अश्रूंनी उशी भिजते आहे. आज ते सुकणार नाही.

अर्धमिटल्या डोळ्यांनी तिने पतीच्या पलंगाकडे पाहिले. नेहमीप्रमाणे तो तिकडे तोंड करून झोपला आहे, बहुधा गाढ झोपेत आहे.

नेहमी असेच होते. हेच याचे व्यक्तित्व आहे. कधी कधी त्या व्यक्तित्त्वाशी समरस होण्याचा, त्या पातळीवर जाण्याचा ती विचार करते, पण इच्छा होत नाही. खाली कोसळणेच बरे, असे तिला वाटते.

आता तो पस्तीस–छत्तीस वर्षाचा असेल. सडपातळ, उंच, सुदृढ शरीर आहे त्याचे. त्याचे सजग डोळे नेहमी शांत असतात. त्याच्या निर्मळ चेहऱ्यावर

थकवा कधीही दिसत नाही त्याचे केस मुलायम आहेत, एकही केस गळलेला नाही की पिकलेला नाही या वयात त्याने प्राध्यापक होणे ही सोपी गोष्ट नाही.

त्याच्यावरची नजर काढून घेऊन श्रीदेवीने डोळे घट्ट मिटून घेतले. त्याची आई शारदम्मा लग्नापूर्वी तिला म्हणाली होती : "आपली आवडती वस्तू संभाळून ठेवणं त्याला माहीत नाही. तिची किंमतही त्याला समजत नाही. तो एकाकी पडेल की काय अशी मला नेहमी भीती वाटते. तू असं होऊ देऊ नकोस. बघ बेटी. त्या पाषाणाबद्दल तुला तिरस्कार तर वाटत नाही नं ?"

तिने म्हाताऱ्या आईला दिलासा दिला आणि तिचे म्हणणे मान्य केले.

पाप आणि पुण्य याबद्दल चर्चा होई, तेव्हा श्रीधर म्हणे: "पाप आणि पुण्य—मी यांना खास महत्व देत नाही. जन्म आणि मृत्यू एवढंच काही जीवन नव्हे. मला जीवन पाहिजे ते लोखंडी भांड्यासारखं—न फुटलेलं. मला कळू लागलं तेव्हापासून मी भौतिकवादी आहे. पण याचा अर्थ माझं व्यक्तित्व शून्य वा भयंकर आहे, असा नाही. माझीही काही आवड-निवड, इच्छा -अनिच्छा आहे. पण ते अंधविश्वास नाहीत, माझ्या मानसिक विकासाचे ते सहाय्यक आहेत."

"ते कोणते ?" श्रीदेवीने थट्टेने विचारले.

"एक कोणते ते—तुझ्यावर मी प्रेम करतो. हे सत्य मी नाकारू शकत नाही. हा विचार मला आवडतो—बस्, असंच आहे."

हे तिला थोडे कळले, थोडे कळले नाही. तिला तो जेवढा समजू शकला त्यामुळे तिला मनात त्याच्याबद्दल कसलीही सहानुभूती निर्माण झाली नाही. जे समजले नाही त्याबद्दल तिच्या मनात घृणाही निर्माण झाली नाही. त्याच्या जीवनात कुठल्याही वस्तूबद्दल उत्कट प्रेम या गोष्टीला थारा नाही. तो प्रेमाची स्तुतिस्तोत्रे गात नाही. कल्पनेच्या विश्वात रममाण होत नाही. जे मिळवायची त्याची आकांक्षा असते त्यासाठी तो जिवापाड मेहनत करतो. आळस त्याला माहीतच नाही. आपल्या आवडत्या वस्तूंबद्दल त्याला आदर आहे. पण तो 'अति'—मानव नाही, 'मित'—मानव आहे. तो कधी दुःखात चूर होत नाही की उत्साहाने फुलून जात नाही. भावनांची भरती-ओहोटी त्याला हास्यास्पद वाटते. तो जीवनाचे मंथन करू शकतो. त्याच्या आतापर्यंत जाऊ शकतो. आपले ध्येय तो स्वतंत्रपणे प्राप्त करू शकतो. माधुर्याचा आस्वाद घेऊ

शकतो. पण यांना तो भूतकाळाची चलच्चित्रे मानत नाही.

श्रीदेवीने कधीही त्याच्यासमोर आपले मन मोकळे केले नाही. पण आजच्या रात्री तिला फार दुःख होते आहे, आपली व्यथा ती प्रकट होऊ देते आहे. शिवाय हा दोघांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. त्यात प्रदर्शन वा प्रतिष्ठा यांचा प्रश्न नाही.

पण श्रीदेवीला वाटले, तसा श्रीधर झोपलेला नाही. तोदेखील विचार करतो आहे. बराच वेळ विचार करून त्याने शेवटी निर्णय घेतला:

"ठीक आहे, जशी तिची इच्छा."

"आय ॲम सॉरी डॉक्टर. धिस इज ए केस ऑफ हायड्रोसिफालस--" मिडवाइफरीच्या प्राध्यापिका रमादेवींनी सातव्या महिन्यानंतर तपासणी करून म्हटले.

श्रीधर थोडा अस्वस्थ झाला.

"पेल्व्हिमेट्री फाइंडिंग्ज तर फेवरेबल आहेत. फीटस अजून हेल्दी आहेत. रेअर केस आहे. ट्रायल लेबर देऊन फायदा झाला नाही तर क्रेनियाटमी करून टाकू. तुम्हाला काय वाटतं ?"

श्रीधरने मान हलवली. क्षणभर विचार करून म्हटले, "ट्रायल लेबरचं रिस्क कशाला घ्यायचं डॉक्टर? सरळ क्रेनियाटमी सुरू केली तर. . ."

"का कोण जाणे बाळंतपण व्यवस्थित होईल, असं मला वाटतंय. श्रीदेवीला काही धोका नाही. तुम्ही काळजी करू नका," रमादेवीने विश्वासपूर्वक म्हटले.

कसेही करून क्रेनियाटमीने गर्भ नष्ट करण्यास तो सांगू इच्छीत होता. पण ती ऐकणार नाही. त्यामुळे 'गुडबाय' म्हणून तो बाहेर निघून गेला.

सिगरेटीमागून सिगरेटी जळताहेत. प्रत्येक मिनिट मोठे निर्दयपणे जळते आहे.

वेळ असा मुश्किलीने जाणे आयुष्यात प्रथमच तो अनुभवतो आहे. श्रीदेवीची किंमत किती आहे आणि माणूस यंत्र का नाही, हे त्याला आता समजते आहे.

"आनंदानं दुःख ज्याला भोगता येत नाही, तो खरोखरच फार दुःखी आहे."

फोनची घंटी वाजली. त्याने रिसीव्हर उचलला.

"नॉर्मल डिलिव्हरी, मेल चाइल्ड, दोघांची प्रकृती ठीक आहे," रमादेवीने शांतपणे सांगितले. तिने श्रीधरचे अभिनंदन केले नाही. त्याच्या आवाजात आनंद नाही, कारण तिला माहीत आहे.

"थँक्यू डॉक्टर" म्हणून त्याने फोन हलकेच खाली ठेवून दिला. मूल लाल रंगाचे आहे. हातपाय क्षीण–बारीक आहेत. लाकडासारखे. हवा नसलेल्या पिशवीसारखे शरीर सैल आहे. त्याचे डोके ताडफळाएवढे मोठे आहे. डोक्या-सारखेच मोठमोठे डोळे, नाक आणि तोंड . . .ते मूल त्या घरात वाढते आहे.

श्रीधर जेव्हा जेव्हा मुलाकडे पाहातो तेव्हा तेव्हा त्याच्या मनात विचार येतो, पॅथॉलॉजी म्युझियममध्ये असा स्पेसिमेन नाही.

त्या मुलाचे वाढणे हे श्रीधरच्या लेखी आश्चर्यच आहे. सहसा असे मूल आईच्या पोटातच मरून जाते. गर्भ बाहेर काढण्यासाठी त्याचे डोके फोडावे लागते. जन्माच्या वेळी या मुलाचे डोके एवढे मोठे नव्हते, म्हणूनच त्याचा जन्म होऊ शकला. तो जन्मला, वाढतो आहे, हसतो आहे.

अशी मुले जगली तर मोठे अजब प्राणी बनतात, हे श्रीधरला माहीत आहे.

प्रयोगशाळेतल्या एखाद्या वस्तूकडे लक्षपूर्वक पाहावे तसे तो त्या मुलाकडे दोन-तीनदा पाहातो. त्याने कधीही मुलाला प्रेमाने उचलून घेतले नाही, कधीही तो त्याच्याशी बोलला नाही. श्रीदेवीशी कधीही त्याने त्या मुलाच्या परिस्थितीची, त्याच्या भवितव्याची चर्चा केली नाही.

श्रीदेवीने त्याचे नाव ठेवले – करुण.

त्या मुलाबद्दल तिला थोडेफार माहीत आहे. डॉक्टर रमाने तिला ही एक प्रकारची कन्जेनिटल ॲनामली असल्याचे सांगितले होते. मेंदूत द्राव जमल्याने अशी स्थिती होते.

. श्रीदेवीचा देवावर विश्वास आहे. पाप-पुण्य-प्रारब्ध ती मानते म्हणूनच 'आपल्या पापाचे फळ' असे मानून तिने ती वेदनेची आग मनात दडवून ठेवली.

पळभरही ती त्याला मांडीवरून खाली ठेवत नाही. त्याच्यावर खूप माया करते, त्याच्याशी प्रेमाने गोष्टी करते. त्याच्या ओठांचे घेतले जाणारे चुंबन म्हणजे किती अश्रुकणांचा समुदाय आहे, हे कोणाला कसे कळणार?

ती पतीशी मुलासंबंधी कधीही बोलत नाही. त्याला जवळ घ्यायला सांगत नाही. त्याच्यासमोर ती मुलाचे लाडही करीत नाही. मुलाशी खेळताना आपण पतीला दिसावे, असे तिला वाटत नाही. पतीबरोबर तिचे संबंध पूर्वी-पेक्षा गहिरे झालेले नसले, तरी कमीही झालेले नाहीत.

करुणसाठी तिने अनेक खेळणी घेतली. स्वत: लहान होऊन ती त्या खेळण्यांशी खेळे.

घरी पाहुणे येतात. त्यांच्यासमोर ती मुलाला नेत नाही. त्यांना पाहाताच ती मुलाला घेऊन आत जाते, लपवून ठेवते. कोणी सांत्वनपर बोलले वा टीका केली, तर तो क्रोधाविष्ट होऊ नये म्हणून.

एकदा करुणला ताप आला. तो कण्हू लागला. श्रीदेवी घाबरली आणि लगेच पतीकडे गेली.

"बाळाला ताप आलाय. त्याला एकदा बघाल ?" तिने कांपत विचारले.

"चल," असे म्हणून तो निघाला. अंथरूणावर बसून त्याला तपासून तो म्हणाला "श्रीदेवी, घाबरायचं कारण नाही. माइल्ड ब्राँकायटिस आहे. आताच औषध मागवतो."

कोणताही डॉक्टर आपल्या रोग्यांची करील, तशीच त्याने त्या दिवशी आपल्या मुलाची शुश्रुषा केली.

रात्री आवाज झाला म्हणून त्याने वळून पाहिले. मंद प्रकाशात श्रीदेवी मुलाला बाटलीतून दूध पाजते आहे. श्रीधरने घड्याळाकडे पाहिले—बारा वाजून गेले आहेत.

"श्रीदेवी तू चुकते आहेस. रात्री दहानंतर सकाळी सहापर्यंत मुलाला 'फीड' करू नये. बंद कर."

श्रीदेवीने ताबडतोब दूध पाजणे थांबवले, आणि ती मुलाला झोपवण्याचा प्रयत्न करू लागली. पण मुलगा रडतो आहे मोठमोठ्यांदा. त्याचे रडणे तिला थांबवता येईना तशी दीनपणे ती म्हणाली, "हा गप्प बसणार नाही. दूध पाजत्ये."

"रोज असंच चाललंय ?"

"रडतो तेव्हा दूध पाजत्ये."

"शिकली-सवरलेली असून तू इतकी मूर्ख होत चालली आहेस, श्रीदेवी."

तिने उत्तर दिले नाही. मुलाने रडणे थांबवले नाही, तेव्हा ती त्याला कॉरिडॉरमध्ये घेऊन गेली आणि इकडे तिकडे फिरवू लागली. पतीची झोपमोड होऊ नये म्हणून.

दोन दिवसांनी मुलाचा ताप उतरला..

एक दिवस ती आतून दिवाणखान्यात येत होती, तेव्हा श्रीधर लक्षपूर्वक मुलाकडे पाहात असल्याचे तिला दिसले. इतके निरखून तो काय पाहातो आहे, ते तिच्या लक्षात येईना. तो बहुतेक आपल्या विषयाशी संबंधित स्पेसिमेनचा "ग्रॉस ॲपिअरन्स" पाहात असावा. तिच्या अंगावर भीतीचा शहारा आला. मागून हळूच येऊन "फार थंडी वाजते आहे." असे म्हणत तिने मुलाला डोक्यापर्यन्त पांघरुण घालून झाकून टाकले.

प्राध्यापक महाशयांना भेटायला कधीकधी त्याचे मित्र येत. सगळे म्हणत: "व्हॉट इज धिस, श्रीधर? तू आपला मुलगा आम्हाला का दाखवत नाहीस?"

"ते हेल्दी चाइल्ड नाही. हायड्रोसिफालस नावाचा विकार आहे त्याला. अमेरिकेत दर पाचशे मुलांमागे असं एक मूल जन्माला येतं. तुम्ही कधी पाह्यलं असेल—मोठं डोकं, मोठंमोठे डोळे, डिसप्रपोर्शनेट हातपाय..." तो असे लेक्चर देऊ लागे.

"या, पाहून घ्या", असे म्हणून एकदा तो मित्रांना आत घेऊन जायलाही निघाला.

"राहू द्या, त्यात काय पाहायचंय?" असे म्हणताना मित्राचीच पंचाईत झाली.

"नो नो, तसं काही नाही," असे म्हणत श्रीधर त्याला आत घेऊन गेलाच.

श्रीदेवी हे ऐकत होती. हा कसला सुसंस्कृतपणा? आपल्या छातीवर कोणी घणाचे घाव घालते आहे, असे तिला वाटले. मुलाला घेऊन ती घाईघाईने आतल्या खोलीत गेली, आणि तिने आतून दार लावून घेतले.

"श्रीदेवी, दार उघड. माझे मित्र आलेत. मुलाला पाहायला," दार वाजवीत श्रीधर म्हणाला.

"राहू द्या, पुन्हा कधी पाहू," मित्र संकोचाने म्हणू लागला.

खोलीत मुलाला कपड्यात गुंडाळून मूर्तिमंत वेदना होऊन बसलेल्या श्रीदेवीच्या कानावर दुरून शब्द आले : "शी इज ॲन एज्युकेटेड लेडी, बट ए सेंटिमेंटल फूल."

मुलगा थोडा मोठा झाला. पालथा पडू लागला. जड डोके घेऊन तो पालथा होई, तेव्हा एखाद्या अनुबोधपटासारखे ते दृश्य सजेने पाहात श्रीधर उभा राही.

एकदा मुलगा अंथरुणावरून खाली पडला. डोक्याला लागले. रक्तही आले. ती दिवसभर चिंतेत होती. हे सगळे पाहून श्रीदेवीला सावध करीत श्रीधर म्हणाला, "श्रीदेवी, तुला हे पुन:पुन्हा सांगावं लागतंय, याचं मला वाईट वाटतं. ममतेचे पाश इतके वाढवणं तुझ्या दृष्टीनं फायद्याचं नाही."

नायलेकांचे नाते फायद्या-तोटयाच्या तराजूत मोजणे श्रीदेवीला कळत नव्हते. पण तिने वाद घातला नाही. ती गप्प बसली.

एक दिवस अंथरुणावर पडल्या-पडल्या खेळणाऱ्या मुलाकडे श्रीदेवीचे लक्ष वेधीत श्रीधर म्हणाला, "बघ, श्रीदेवी, याचं डोकं दिवसेंदिवस मोठं होत चाललंय की नाही?"

श्रीदेवीने मान वर करून त्याच्या डोळ्यात पाहिले. त्यांत लाल रेषा दिसली. "हे पहा, मला तुम्हाला एक गोष्ट विचारायची होती–फार दिवसां-पासून."

श्रीदेवीच्या आवाजात असा करडेपणा त्याने कधी ऐकला नव्हता. तो निष्प्रभ होऊन तिच्याकडे पाहू लागला.

"आपण या मुलाचे बाप आहोत, हे तुमच्या कधी लक्षात येणार आहे?"

तिने उत्तराची वाट पाहिली नाही. उत्तराची गरजही नव्हती. मुलाला उचलून ती आत निघून गेली.

सुन्न होऊन श्रीधर तिथेच उभा राहिला.

शेवटी व्हायचे तेच झाले. नशिबाने श्रीदेवीची पुन्हा थट्टा केली. मुलगा हळूहळू क्षीण होऊ लागला. दृष्टीतली स्थिरता कमी झाली. वेडे हसू बंद झाले, पोटात, गळयात आणि डोक्यात नाना गुंतागुंती निर्माण झाल्या. एका अशुभ क्षणी डोके उडू लागले. तीन दिवस तसे चालले. शेवटी एका अशुभ क्षणी या विकृत रूपाला तिलांजली देऊन तो दुसऱ्या आकृतीच्या शोधासाठी निघून गेला.

त्याचे मृत शरीर मांडीवर घेऊन श्रीदेवी रडत बसली. तोंड उघडून तिने एक शब्दही उच्चारला नाही, किंवा कोणाची निंदा केली नाही.

बऱ्याच वेळाने श्रीधर तिच्याजवळ जाऊन बसला आणि म्हणाला, "किती वेळ रडशील, श्रीदेवी ? आता मी याला घेऊन जातो आणि अंत्यविधी करतो." श्रीदेवीने एकदा त्याच्याकडे पाहिले आणि मुलाचे शव त्याच्याकडे देत

ती म्हणाली, "घेऊन, जा."

मुलाचे प्रेत श्रीधरने मोटारीत मागच्या सीटवर ठेवले आणि तो समोर मोटार चालवायला बसला. मोटार निघून गेली. त्या बंगल्यापासून दूर दूर गेली.

तीन दिवसांपासून श्रीदेवी या जगात नाही. तिने खाणे-पिणे सोडले. झोपही नाहीशी झाली. ती कोणाशी बोलत नाही. एखाद्या निरपराध्यावर घोर अन्याय व्हावा, तशी तिची व्यथा आहे. ती अशक्त होत चालली आहे.

आपल्या स्वभावाविरुद्ध श्रीधरने तास न् तास तिच्याजवळ बसून तिचे सांत्वन केले. तिचे मन प्रसन्न करण्यासाठी त्याने खूप प्रयत्न केले. शेवटी तो म्हणाला, "दुःखच आपला सर्वात मोठा शत्रू आहे, हे सत्य ओळख."

, घरात तिला सगळीकडे आपल्या मुलाचे रूप दिसते. मोठे डोके, बारीक हातपाय, स्पष्ट न बोलता येणारे तोंड ....

त्या तोंडातून "आई. . .आई" अशी अस्पष्ट हाकही तिला ऐकू येते.

तिच्या हृदयाच्या चिंधड्या होतात.

"माझ्या नशिबी नव्हतं. माझ्या नशिबी नव्हतं. . . ."असे म्हणून ती विलाप करते.

ते भोळेभाबडे तोंड बोलते, "आई , यात माझी काय चूक ? मग मला ही शिक्षा का ?"

"बाळा रे, ही शिक्षा तुला नाही, मला मिळाली आहे. खरं तर ही शिक्षा नाही, हे नशीब आहे माझं !"

तो म्हणतो, "जाऊ दे आई, मी मरणंच योग्य होतं. जिवंत राहिलो असतो, तर सगळ्यांच्या कुत्सित नजरा माझ्यावर पडल्या असत्या, त्यांनी मला सतावलं असतं."

"त्यांचं भस्म करीन, शाप देईन . . ."

"नको आई, माझ्यासाठी तू तुझं आयुष्य का नासून टाकत्येस ?"

"किती मी चांडाळीण ! मी स्वतःच अशी जन्मल्ये असत्ये, तर माझी काय दशा झाली असती ?"

अशा विचारांनी, संघर्षांनी, दारुण विषादाच्या ज्वालांनी धुमसत ती पडून राहाते.

"माय गॉड ! मोठ्या माणसांनी नरकाची गोष्ट सांगितली, ते खोटं नाही. नरक आहेच !" सिगरेट पेटवीत श्रीधर विचार करी.

पॅथॉलॉजी म्युझियममध्ये सर्व स्पेसिमेन्सचे मिळून जेवढे आकर्षण नसेल तेवढे श्रीधरने ठेवलेल्या नव्या स्पेसिमेन हायड्रोसिफालसचे आहे.

"कन्जनिटर हायड्रोसिफालस–सहसा इंट्रा युटेराइन लाइफ–बरोबरच फीटस मरतो. धिस इज ए रेअर कंडिशन–हा पाच महिने जिवंत राहिला," असे म्हणून प्राध्यापक श्रीधर विद्यार्थ्यांना तो नमुना दाखवी.

तो भावना जाणीत नाही. अंधविश्वासास त्याच्या आसपास तो फिरकू देत नाही. तरीदेखील त्या स्पेसिमेनबद्दल त्याच्या मनात एक विशेष आकर्षण निर्माण झाले. तो रोज एक तास म्युझियममध्ये घालवी. फिरत फिरत तो तेथे आल्यावर आपोआप थांबे आणि पाच मिनिटे तेथेच उभा राहून पाहात राही. अनिमिष नेत्रांनी तो त्याच्याकडे पाही. दिवस जाऊ लागले, तसे फार्मेलिनमध्ये तरंगणाऱ्या मोठ्या डोक्याच्या त्या छोट्या शरीराने त्याच्या मनात कायमचे घर केले.

त्याच्याजवळ उभे राहाताच त्याच्या हृदयात धडधड होई, शरीर घामाघूम होई. तेथे प्रदर्शनासाठी ठेवलेली ती वस्तू, विज्ञानाचे ज्ञान देणारा तो पदार्थ त्याच्या हाडामांसाचा तुकडा आहे, त्याच्या रक्ताचा एक कण आहे. त्याच्या शरीराचे अंग आहे.

असे कोमल विचार आपल्या मनात प्रवेश करीत आहेत, हे आरंभी त्याला कळलेच नाही. सगळे यंत्रवत् चालत राहाते, असे त्याला वाटले. पण त्याच्या हृदयाचे स्पंदन, मनात निर्माण होणारा आवेग, हे सगळे पाहून तो समजून चुकला की, आता तो कोणत्या तरी अज्ञात शक्तीच्या हातात गेला आहे आणि कोणी तरी त्याच्यावर विजय मिळवते आहे. तो ओशाळला. . . . यापुढे त्या जागी थांबता कामा नये, असे त्याला वाटले. तो तिथून घाईने पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागला. पण त्याचे पाय त्याचे ऐकेनात. तिथे पोचताच ते अचानक थांबत. डोळे अनिमिषपणे त्याच्याकडे पाहू लागत. प्रयत्नपूर्वक तो पुढे झाला, तरी ते पाय त्याला पुन्हा त्या जागी परत आणीत. मनाला हा त्रास होऊ नये, म्हणून आता म्युझियममध्ये पाऊल टाकायचे नाही, असे त्याने ठरवले. तसा त्याने प्रयत्नही केला. पण एक दिवसदेखील

त्याचा तो प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही. तो तेथून मन दुसरीकडे वळवण्याचा जेवढा प्रयत्न करी, तेवढेच ते बळाने त्याला तेथे ओढून नेई. तो म्युझियम हॉल आपल्या हृदयाला लगामाने ओढतोय असे त्याला वाटे. या ओढाताणीत शेवटी तो दुर्बल होऊ लागला. थकून डोळे मिटून तो 'बापरे' म्हणे. त्याला सूचना दिल्याशिवायच त्याचे डोळे आणि पाय आपले काम बजावीत.

आयुष्यात त्याला असा अनुभव कधी आला नव्हता. त्याच्या मनात तुंबळ युद्ध सुरू झाले. तो स्वतःशीच लढतो आहे, स्वतःवरच दातओठ खाऊन रागावतो आहे. . .

विज्ञानलालसा, संघर्ष, मानमरातब आकर्षण. . .मग ममता, मोह अखेरीस समरसता. . .अशा क्रमाने नाना भाव त्याच्या मनावर आक्रमण करताहेत, त्याला गदगदा हलवताहेत, रडवताहेत. ती आकृती कधी कधी झोपतानाही डोळ्यांपुढे येऊ लागली. स्वप्नांत अस्पष्टसे काही सांगू लागली.

स्वतः मधून बाहेर पडून त्याच्यात झालेला बदल लक्षात यायला श्रीदेवीला बराच वेळ लागला.

एक दिवस तो अंथरुणात पडल्या पडल्या वर पाहात होता. जवळ काही आवाज झाला. पण त्याचे तिकडे लक्ष नव्हते. श्रीदेवीने त्याच्याजवळ बसून त्याच्या अंगावरून हात फिरवीपर्यंत त्याचे तिकडे लक्ष नव्हते.

तो चमकून तिच्याकडे पाहू लागला, तशी ती म्हणाली, "बोला."

"काय बोलू ?"

"तुमच्यात काहीतरी बदल झालाय. तुम्ही कशानं तरी अस्वस्थ झालेले दिसता. अशक्त होत चाललात. चेहऱ्यावरचं तेज नाहीसं होतंय. नेहमी उदास असता, स्वप्नात काहीतरी बोलता. हे सगळं काय चाललंय ?" श्रीदेवीने आपला हात त्याच्या छातीवर ठेवून प्रेमाने विचारले.

तो चकित झाला. 'खरं ? माझ्यात इतका बदल झालाय ?'

"माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नाही, एवढा मोठा बदल झालाय."

"कारण मलाही नीट कळत नाही, श्रीदेवी."

"मी कारण सांगायची जरूर नाही. पण आपण सामान्य माणूस बना. माझ्या विश्वासाला धक्का लावणारी दुर्बलता वाढू देऊ नका."

तो बराच वेळ तिच्या डोळयांत पाहात राहिला. मग त्याने विचारले, "श्रीदेवी ! मला तुला एक गोष्ट विचारायचीय्."

"विचारा."

"मी वेगळा वाटू लागलो आहे काय ?"

तिने चकित होऊन त्याच्या डोळयांत पाहिले. त्याची छाती कुरवाळणारा त्याचा हात एकदम थांबला.

"माझ्याबद्दल तुला तिरस्कार, घृणा वाटावी असे प्रसंग कधी आले होते ?"

ती एकदम उठून उभी राहिली, "हा प्रश्न नाही, धनुष्यातून सुटलेला बाण आहे."

पण स्वतःला सावरीत ती नम्रपणे म्हणाली, "मला वाटलं होतं, तुम्ही मला कधीही असा प्रश्न विचारणार नाही, म्हणून अशी पाळी येईल, असं वाटलं नव्हतं. आपलं वर्तन, आपली शिस्त सगळं मी सहन करू शकले, पण हा प्रश्न नाही सहन करू शकत. आताच काय, पण मी मरेपर्यंत पुन्हा कधी हा प्रश्न मला विचारू नका. क्षमा करा. मनाला जखम झाली---" असे म्हणत उठून ती निघून गेली.

त्याने सुस्कारा सोडला. त्याने काय केले होते, याची श्रीदेवीला कल्पना नाही. कळले तर काय होईल ? ज्वालामुखीचा स्फोट होईल ?

महाप्रलय होणार आहे. जमीन दुभंगते आहे. ज्वालामुखीतून अग्निशिखा वर झेपावताहेत. भग्न खडक वितळून उसळताहेत. समुद्र सीमा ओलांडून पृथ्वीला गिळू पाहातो आहे. वादळे घोंघावताहेत. कडाक्याचे ऊन्ह, मुसळधार पाऊस, धरित्रीला पाताळात ढकलणारा भूकंप--

"आई ग", तो कण्हला.

खिडकीतून आकाशाकडे पाहाणारी श्रीदेवी धावत आली.

"काय हो ? काय झालं ?" त्याच्या चेहऱ्यावर झुकत तिने अधीरपणे विचारले.

त्याचे सगळे शरीर घामाघूम झाले होते. तो थरथर कापत होता. श्रीदेवी जणु दुसऱ्या जगातून बोलते आहे, असे त्याला वाटले. मोठ्या कष्टाने त्याने डोळे उघडले.

"काय ? कसं वाटतं आता ?" त्याच्या ओठांवर ओठ ठेवीत श्रीदेवी

विचारीत होती.

"सर्वनाश झाल्याचं मला स्वप्नात दिसलं," क्षीण आवाजात तो बोलला.

त्याचा चेहरा काळवंडला होता.

"तुम्ही जास्त विचार करताय, म्हणून. . . ."

काही क्षण स्तब्धतेत गेले.

"मला वाटतं. मला आजारी पडून आठवडा झालाय्."

तिने मान हलवली.

"बापरे ! इतके दिवस मी कधी आजारी पडलो नव्हतो. म्हणूनच . ."

"ऊं ?"

"म्हणूनच हे सगळे विचार. . ."

"तुम्ही असं निराश होऊ नका. आणखी दोन दिवस आराम करा. मग तुम्ही चारचौघांसारखे व्हाल."

"चारचौघांसारखा ?" त्याला हसू आले.

"तुम्ही का हसताय ?"

"शंका आली, म्हणून !"

"शंका कसली ?"

त्याला उत्तर सुचेना. उगीचच बोलला, "पुन्हा मी चारचौघांसारखा होईन की नाही, याची शंका आली."

श्रीदेवीला पायाखालची जमीन सरकल्यासारखे वाटले.

"असं म्हणू नका, ती भरल्या कंठाने म्हणाली.

"श्रीदेवी."

"काय ?"

"तिकडे बाहेर पाहा."

बाहेर काय पाहायचे ते तिला समजेना. म्हणाली. "काय आहे तिथं ?"

"खूप आहे. —मावळणाऱ्या सूर्यबिंबास ढकलणारे ढग, मला पाहून हसणारा वारा आणि माझा उपहास करणाऱ्या झाडांचा घोळका."

श्रीदेवीचे मन जड जड झाले. तिच्या मनातले दुःख उफाळून आले.

"अहो, असं बोलू नका. पाया पडत्ये," तिचा गळा दाटून आला

मग शांतता पसरली. मान झुकवून काहीशा संकोचाने श्रीदेवी म्हणाली,

"आज शनिवार आहे नं ? संध्याकाळी मी थोडा वेळ देवळात जाऊन येणार होते. जाऊन येऊ ?"

"जाऊन ये. त्यात संकोच कसला ?"

"तुम्ही घरात एकटे राहाल नं ?"

"काही हरकत नाही, श्रीदेवी. आता मला बरं वाटतंय."

"पण पलंगावरून उठू नका...अजूनही तुम्हाला खूप अशक्तपणा आहे. मी आलेच." पुनः पुन्हा बजावीत श्रीदेवी गेली.

मिनिटांमागून मिनिटे चाललीत. श्रीधरला आता पलंगावर पडून राहावेसे वाटत नाही. तो सावकाश उठून बसला. त्याला वाटले, आपण ठीक आहोत. उभा राहिला तेव्हाही त्याला तसेच वाटले. हळूहळू चालत तो कॉरिडॉर-मध्य भिंतीशी उभा राहिला.

आभाळात ढगांची दाटी झाली आहे. पश्चिमेकडे सूर्यबिंब डोंगराआड नाहीसे झाले. पाऊस पडणारसे वाटते.

श्रीदेवी पायीच गेली आहे, वाटेत पावसाने भिजली तर ? तो व्याकुळ झाला.

तेथेच, त्याच वेळी, तशाच वातावरणात त्याने श्रीदेवीला "मी मूल होऊ देणार नाही," अशा आशयाचे वाक्य ऐकवले होते.

मूल झाले, थोडे वाढले आणि नाहीसेही होऊन गेले.

"नाही—ते नाहीसे झाले नाही !" कर्कश आवाज झाला. आपल्या व्यावसायिक उद्देशासाठी त्याने ते स्वतः समोर ठेवले आहे. पण या व्यवसायाची परिभाषाच वेगळी आहे ! इथे हृदयाचा काय संबंध ?

"मी नाहीसा झालो नाही, बाबा ! मी नाहीसा झालो नाही. मला बांधून ठेवलंय, लोशनमध्ये मला बुडवलंय. बरणीत सगळे लोक मला पाहातात. माझ्या मोठ्या डोक्याच्या त्यांच्या नजरांनी चिंधड्या उडताहेत."

"एक आठवडा...सात दिवस ! बापरे ! इतके दिवस या जीवनानं आपल्या शरीराला बांधून ठेवलंय. इतके दिवस...तो हे कसं सहन करू शकतोय ? कसं जगतोय ?"

"त्यात आश्चर्य नाही..." त्याच्या डोळ्यांतून रक्ताच्या थबाप्रमाणे पाणी ओघळले.

"तू दगड आहेस. . . .तू पाषाण आहेस. . ."

"मन चालण्याचा आदेश देते आहे.

"शक्ती नाही. शक्ती नाही."

"म्हणून तर म्हटलं, तू दगड आहेस, तू पाषाण आहेस."

"ताप आहे. ताक़द नाही."

"मरणार नाही, दगड मरणार नाही !"

"हो. दगड मरत नाहीत."

पायांनी डोळ्यांना साथ दिली आणि मेंदू काम करीनासा झाला. इतक्या थंडीत घाम येतो आहे. "जाईन. जरूर जाईन !"

बंगल्याच्या पोर्टिकोतून अँबॅसेडर मोटर निघाली.

म्युझियममध्ये त्याने पाऊल टाकले आणि भिंतीवरचा स्विच दाबला हॉलमध्ये प्रकाश पसरला.

"तो पाहा. . .आपला. . . ." तो दोन पावले पुढे सरकला. वीज बंद पडली. सर्वत्र अंधार—घनदाट अंधार. काही दिसेनासे झाले आहे.

"बाळा, तू कुठं आहेस ?" हृदयाने साद घातली.

"इकडे आहे बाबा, इकडं. इथं मला बांधून ठेवलंय. श्वास घेता येत नाहीय्."

"एक मिनिट. मी आलो, बाळा." भावनाप्रधानतेची टिंगल करणारा प्राध्यापक श्रीधर लटपटत पुढे चाललाय.

त्या गहिऱ्या अंधारात चहूकडे नाना रोगांच्या निशाण्या-स्त्रियांच्या मुलांच्या म्हाताऱ्यांच्या—हृद्रोगाच्या, कर्करोगाच्या, क्षयाच्या, सिफिलिसच्या, प्रॉयगरीजच्या शेकडो . . .शेकडो निशाण्या. . .त्यांचा संग्रह. . .

"बाबा ! बाबा ! इकडे बाबा ! !"

चहूकडून आवाज ऐकू येतोय. सगळीकडून हाका येताहेत. वाट दिसत नाही. कधी या बाजूला तो चाललाय, कधी समोर. . .

टक्. . .टक्. . .टक्. . . पायांचा आवाज.

"कोण आहे तिकडं ?" त्याने थांबून विचारले. आपल्याच पावलांचा आवाज त्याला भिववतोय. सर्वत्र शांत झाले. तो पुन्हा चालू लागला.

"बाबा ! बाबा !"

त्या हाकेत कारुण्य आहे, दीनता आहे, रक्त काढणारी शक्ती आहे.

कोणी तरी हसते आहे.

"कोण आहे ?" त्याने पुन्हा विचारले.

"इकडे बाबा ! इकडे बाबा !"

पोहोचला. हात लांबवून तिथे ठेवलेली बरणी चाचपली. हीच ती वस्तू.

"तूच आहेस, बाळा ?"

"होय बाबा !"

त्याने त्याला हातात घेऊन वर उचलले. तो बराच जड लागतोय. त्याला जवळ घेऊन छातीशी धरण्याची त्याची धडपड आहे. हात थरथरताहेत.

तो आणखी जड होत चाललाय. हात क्षीण होत चालले आहेत. तो त्याला आपल्या छातीशी धरतो आहे...हातांनी उत्तर दिले. त्यांना तहान लागली.

धडाम..,आवाज झाला आणि "बाळा" असे म्हणून तो वेड्यासारखा किंचाळू लागला.

दिवे आले. कापत उभ्या राहिलेल्या श्रीधरसमोर पडले होते... तुकडे तुकडे होऊन पडलेले काचेचे भांडे, चहूकडे सांडलेले फार्मलीन, त्यांत, नुकताच प्राण गेला आहे असे वाटणारा विचित्र मांसाचा गोळा !

श्रीधरने वाकून आपल्या मुलाला हातावर घेतले. क्षणभर त्याने अनिमिष नेत्रांनी त्याच्याकडे पाहिले. "मी तुला न्याय देईन," असे म्हणत त्याने लहान मुलाप्रमाणे त्याला खांद्यावर टाकले आणि तो बाहेर पडला.

म्युझियममधला एका नमुना वेड्यासारखा गाडीत ठेवणाऱ्या प्राध्यापकाकडे दूर उभे असलेले अटेंडंट आणि वॉचमन चकित होऊन पाहात राहिले. कार स्मशानाकडे रवाना झाली.

आपल्या वेदनांचा सारा भार हलका करीत पत्नीच्या कुशीत तोंड खुपसून श्रीधर रडत रडत सगळे सांगतो आहे. त्या रडण्यात किती सुख आहे ! श्रीदेवी त्याच्या केसांतून हात फिरवीत अवाक् होऊन अश्रू गाळते आहे.

काहीही न लपवता, दुरावा न ठेवता त्याने तिला सगळे सांगून टाकले.

"श्रीदेवी, मला योग्य पिता बनायचंय्. योग्य पिता !"

आज हे असे न घडते, त्याच्यात हे परिवर्तन न होते तर तिने कदाचित् म्हटले असते :

"माझं अॅबॉर्शन करून टाका."

पण आज परिस्थिती वेगळी आहे. नवीन पालवी फुटते आहे.

"जशी आपली इच्छा. . .आणखी सात महिन्यांनी. . ."

ते शब्द त्याच्या कानात मधुर मंजुळ नाद होऊन घुमत राहिले.

* * *

कावळे

–पुराणम सूर्यप्रकाश राव

शाळामास्तरची नोकरी करणारे पण छोट्या गावात राहून कसेतरी दिवस काढणारे रामनाथम अचानक वारले. त्यांचे कुटुंब उघडे पडले.

रामनाथमना दोन मुलगे आहेत आणि दोन मुली. मोठा मुलगा सोडून बाकीचे तिघे वयाने त्याच्यापेक्षा लहान असले तरी बुद्धीने त्याच्यापेक्षा मोठे मानता येतील. वयाच्या मानाने ती समजूतदार आहेत, मोठ्या मुलात मात्र या समंजसपणाचा अभाव आहे. दिवसामासी त्याचे शरीर वाढत गेले पण बुद्धीची वाढ खुंटली. तो एकदम अजाण आणि मूर्ख आहे.

बिचाऱ्या रामनाथमला आयुष्यभर याच एका चिंतेने हैराण केले होते. मोठा मुलगा लवकर हाताशी येईल आणि आपल्याला स्वास्थ्य मिळेल, अशी आशा नव्हती. ही आशा सोडून तो भविष्याचा विचार करू लागेल तेव्हा दारिद्र्य भुतासारखे समोर नाचताना दिसे. स्वतःची अशी चार हात जमीनसुद्धा त्याच्या मालकीची नव्हती. त्याच्याजवळ जी काय संपत्ती होती, ती म्हणजे पत्नी, मुले आणि पाखरासारखे हलणारे दोन हात. हीच तो आपली संपत्ती मानी.

आपल्यामागे या परिवाराची काय दशा होईल या विचाराने तो विलक्षण चिन्तेत पडे, पण मनात ही चिंता असूनही तो बाहेरून मोठा धीरगंभीर दिसे. कोणापुढेही तो आपल्या दुःखाचे रडगाणे गात नसे. तो म्हणे, "मला काय कमी आहे ? माझी मुलं हीच माझी संपत्ती !" या मुलांसह आजवर हे कुटुंब मानाने राहिले.

अचानक मंगळवारी तो बायकोला म्हणाला, "ताप आल्यासारखा वाटतो." घरगुती औषधपाणी करण्यात आले. त्यांच्या घरात गेली पंचवीस वर्षे घरगुती किंवा बाजारातून आणलेली औषधेच वापरली जात. डॉक्टरनामक प्राण्याला बोलावून त्याच्याकडून घर लुटवणे त्यांना पसंत नव्हते.

साध्या तापासारखा हा ताप लवकर उतरेल, असे वाटले होते, पण

दुपारपर्यंत त्याने या माणसाला खाऊन टाकले.

"किती अनर्थ झाला आहे," सगळ्यांनी दुःख व्यक्त केले.

दुपारी अकरापासून पडलेले प्रेत अंत्यसंस्कारासाठी न्यायला बरीच रात्र झाली. याला कारण महालक्ष्मीच होती. तिने मोठी करुण मुद्रा करून सांगितले, "बऱ्याच नातेवाइकांना तारा केल्या आहेत, आता ते येतच असतील." रात्रीच्या शेवटच्या बसनेदेखील कोणी आले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत वाट पाहाण्याचा तिने हट्ट धरला, पण मग गावातल्या मोठ्या लोकांनी ते ऐकले नाही.

अशा प्रकारच्या घटना घडतात, तेव्हा खेड्यांतले लोक आजही जुन्या परंपरा आणि समजुती मोठ्या कटाक्षाने पाळतात. एखाद्या घरात असे कोणी वारले तर शहरात त्याच घराच्या दुसऱ्या भागात राहाणारे नागरिक दार बंद करून गुपचूप जेवून घेतात. पण खेड्यांत तसे होत नाही. प्रेत स्मशानात नेले जाईपर्यंत त्या मोहल्ल्यात कोणी स्वयंपाकाचे नावही काढत नाही. कोणा-कडेही चूल पेटत नाही.

त्याच रात्री दहनसंस्कार झाला. थंडी कडाक्याची होती. उत्तरेकडचा वारा जोराने वाहात होता. त्या दिवशी रात्री आपापल्या घराच्या अंगणात बसून बराच वेळपर्यंत लोक रामनाथमच्या गुणांच्या आठवणी काढीत होते.

बाहेरच्या खोलीत भिंतीला टेकून बसलेली महालक्ष्मी आतल्या आत मुस-मुसून रडत होती. रात्री एकपर्यंत बाहेरच्या लोकांचे खिन्न सुस्कारे आणि त्यांनी चालवलेली रामनाथमच्या गुणांची चर्चा तिला स्पष्ट ऐकू येत होती. मग अर्ध्या तासाने सगळा गाव झोपी गेला आणि चहूकडे शांतता पसरली.

वर कोनाड्यात ठेवलेला दिवा मिणमिणत होता. मुले रडून रडून झोपी गेली होती. ती तर पतीच्या नाना आठवणी येऊन पुनः पुन्हा येणारे दुःखाचे उसाळे दाबण्याचा प्रयत्न करीत होती. "हाय रे देवा ! त्यांना ठेवून मला घेऊन जातास तर बरं झालं असतं !" असे म्हणून ती आपल्या दैवाला दोष देत होती. अशावेळी सहसा लोक असेच बोलतात.

मधून मधून डुलकी येऊन डोळे बंद झाले, तरी तऱ्हेतऱ्हेची स्वप्ने पडत आणि झोप निघून जाई. अनेक विचार मनात येऊन तिला बेचैन करू लागले. सगळे जीवन म्हणजे तिला आता एक प्रचंड पोकळी भासत होते. ज्या भवि-

ज्याच्या कल्पनेनेदेखील काल ती भीत होती, ते आज वस्तुस्थिती बनून तिच्यापुढे भयंकर आ वासून उभे आहे. आता प्रत्येक गोष्ट समस्या बनली आहे.

एकाएकी वारा उलटा वाहू लागला. लहान मुलांकडे तिने मोठ्या दुःखाने पाहिले–थंडीमुळे हातपाय आखडून ती झोपली होती. बापाच्या मृत्यूमुळे सगळे रडले त्यांच्याबरोबर तीही रडली होती. यापेक्षा त्यांना आणखी काही माहीत नव्हते. एक प्रकारे ते बरेच झाले. बोलता बोलता वडिलांचा विषय निघाला की थोडे समजावल्यावर ती सगळे विसरून जात. पण तिला तर आयुष्यभर हीच व्यथा घेऊन जगायचे होते.

बराच वेळ पतीच्या आठवणी काढून ती आतल्या आत स्फुंदत रडत राहिली. मग ती आपल्या भविष्याचा विचार करू लागली. टक्कल पडलेले डोके, धोतर-शर्ट, वर कोट, कपाळावर तीळ, खोल गेलेले डोळे, पातळ जोडे, डोळ्यांवर चष्मा, हातात छत्री–हे चित्र राहून राहून तिच्या स्मृतिपटलावर उभे राहू लागले. भविष्याकडे नजर टाकली की अपार अनंत खाडी दिसत होती. तिच्या काठावर ती उभी होती. डोळ्यांसमोर काही दिसत नव्हते. डोक्यावर छप्परही दिसत नव्हते. एका अव्यक्त वेदनेने मन जळून त्याची राख होत होती. चार मुले आणि ती स्वतः–पाच जणांचे पोट भरायचे आहे–कसे जमणार हे ? मानसन्मानाचे आयुष्य संपले होते. कधी एखाद्या वस्तूसाठी कोणापुढे हात पसरण्याची पाळी आली नव्हती. आता काय करावे ?

काय करावे यासाठी ती अनेक गोष्टींचा विचार करू लागली. मानाने उपजीविका करता येईल असे काही करायचे तर पैसा पाहिजे. पैशाशिवाय असे काहीही शक्य होणार नाही, याची तिला चांगली कल्पना आहे. तरीही सन्मानाने जगता येईल, असे तिला वाटते.

भद्रम्माचेच पाहा. पंचविसाव्या वर्षी तिचा नवरा वारला. तीन मुले होती. तिने काय केले ?...काय...केले ? महालक्ष्मीला दुःख आवरेना. तशीच आपलीही दशा होणार काय ? आतापर्यंत प्रतिष्ठेने जगल्यावर आज असहाय बनून ती लोकांच्या मर्जीवर जगू लागली, तर तिच्याकडे कोणी लक्ष देईल काय ? तिच्याशी कोणाचा काही संबंध नाही ? भद्रम्माप्रमाणे घरोघर जाऊन तिने डाळ-तांदूळ निवडले नाहीत, तर तिचा उदरनिर्वाह होणार नाही काय ? एक काळ असा होता की, तेव्हा भद्रम्मा सगळ्यांपेक्षा अधिक

मानाने राहात होती. पण आज? आता लोक त्यांच्याबद्दल फार कमी बोलतात, आणि प्रसंगोपात्त बोलणे निघालेच तर, पूर्वीसारखे बोलत नाहीत.

दरम्यान ती फार हळवी झाली आहे. कशातच तिचे मन नसते. कोणतेही काम ती नीट करू शकत नाही. एकदा नव्हे, तर दहादा सांगितल्यावरच तिला एखादी गोष्ट कळते, पण बिचारी बड्या घराण्यातली होती, म्हणूनच तिच्या मुलांकडे पाहून तिच्यावर दया केली पाहिजे–असेच काहीतरी लोक तिच्याबद्दल बोलतात. पूर्वीची प्रतिष्ठा आणि मान तिने गमावला आहे. पण याला जबाबदार ती नाही. ज्या दोन मजबूत हातांनी तो परिवार भक्कमपणे सांभाळला होता. ते हात आता नाहीत. पहाडावर साठलेले बर्फ वितळून गेले. मूठ ढिली पडली.

महालक्ष्मीच्या मनात आले, लोक माझ्याबद्दलही असाच विचार करतील. त्यासरशी तिच्या मनात विचार आला, आपण भाड्याच्या घरात राहातो आहोत आणि एवढे मोठे हे घर आपल्याला लवकरच सोडावे लागेल. तिच्या मनःचक्षुंसमोर आले समोरच्या झाडाखाली ऊनपाऊस सहन करीत तृणवत राहाणारे ते असहाय दीन-दरिद्री, पाठीला पोट लागलेले, डोळे खोल गेलेले, कोरडे आणि विस्कटलेले केस असलेले लोक.

भिंतीला टेकून बसत आपले दुःख आवरीत तिने डोळे मिटून घेतले.

तिचे गाल आसवांनी भिजून गेले. मनात समुद्राप्रमाणे खळबळ उडाली होती. डोळे उघडताच तिची नजर मोठ्या मुलावर पडली. तोदेखील लहान मुलांसारखा पायांत हात घेऊन झोपला होता. झोपल्यावर त्याच्या तोंडातून लाळ गळताना तिने अनेकदा पाहिली होती. शी ! लहान मुलांसारखी. त्याच्याकडे पाहाता पाहाता तिचे मन विलक्षण उद्विग्न झाले. वयाने तो वाढत होता, पण कुटुंबाला त्याचा काही फायदा होत नव्हता. तिचे पती जिवंत होते, तेव्हा याच चिन्तेने ते व्याकुळ होत. आता महालक्ष्मीला ज्या संकटांना तोंड द्यायचे आहे, त्यांचेही कारण हा मुलगाच आहे.

आपल्या साऱ्या पीडा आणि यातना यांचे दायित्व त्या मुलावर टाकून त्याच्याकडे तिरस्काराने पाहाणाऱ्या महालक्ष्मीला अर्ध्या तासाने त्याची दया आली. "याला मी उगीच दोष दिला. देवानं त्याला बुद्धी दिली नाही त्याला तो तरी काय करणार ? त्याचा तिरस्कार करण्यात माझीच चूक होते आहे.

यात त्याचा काही दोष नाही. त्या तीन लहान मुलांसारखा तोदेखील लहान आहे." ती आपल्या मनाची समजूत घालू लागली.

पोटभर खायला मिळो वा न मिळो, मुलांचे शिक्षण काही बंद करायचे नाही ! त्यासाठी वाटेल ते काम करावं लागलं तरी हरकत नाही. त्याचं शिक्षण तर चालू ठेवायचंच !"

तिच्या मनात एक विचार आला. शिवणयंत्र घेऊन कपडे शिवून उपजीविका करता येईल. मशीनवर कपडे शिवायचा तिला चांगला सराव आहे. हा विचार तिला फार बरा वाटला. पण त्यासाठी बराच पैसा हवा—किमान दोन-तीनशे रुपये हवेत. इतके पैसे कुठून मिळणार ? तिच्या अंगावर गुंजभरदेखील सोनं नाही. अनेक लोकांचे कर्जही आहे.

इतकी वर्षं या गावात असल्यामुळे कोणी मदत करू शकेल.

सकाळ होत होती. तिने डोळे उघडले. सौम्य किरण तिच्या पायांवर पडले होते. मुले पेंगुळलेल्या डोळ्यांनी झोपून उठली आहेत.

सकाळी बराच वेळ वाट पाहिल्यावर शेवटच्या बसनेही कोणीच आले नाही तेव्हा अस्थी गोळा करायला सांगून, त्यासाठी आलेल्या लोकांना महालक्ष्मीने आवश्यक ते पैसे देऊन टाकले.

महालक्ष्मीने जमिनीवर अंग टाकले आणि ती विचार करू लागली : "जेव्हा घर सुखसमृद्धीने नांदत होतं तेव्हा येणाऱ्याजाणाऱ्यांची वाण नव्हती. पण यावेळी कोणी नाही आलं ? का ? या लोकांत इतका बदल कसा झाला ? या अनाथांचा भार आपल्यावर पडेल, अशी प्रत्येकाला भीती वाटली असेल." संतापाने तिच्या मनात आले, "या लोकांची मनं बर्फासारखी गोठून गेली आहेत. बरं झालं, असे निर्दय लोक इथं आले नाहीत !"

"आई, पत्रं आलीत," असे म्हणत मोठा मुलगा आला, तशी विचारसागरातून बाहेर पडून महालक्ष्मी पत्रे वाचू लागली.

सगळ्या पत्रांतला मजकूर एकसारखाच आहे : "रामनाथम आजारी आहेत, हे ऐकून फार दुःख झाले. ईश्वर करो आणि त्यांची प्रकृती लवकर सुधारो, आम्हाला आशा आहे की त्यांची प्रकृती लवकरच सुधारेल. स्वतः येऊन भेटण्याचे लाख प्रयत्न केले, पण अपरिहार्य परिस्थितीमुळे येता येत नाही, याचे फार वाईट वाटते." महालक्ष्मीने रागाने सगळी पत्रे फाडून फेकून दिली.

या जगात असे अनेक लोक आहेत, तसेच हेही. नुसते बोलणे गोड–आला त्यांचा विचारही करायची तिची इच्छा नाही. मनात काहीतरी असह्य पीडा होत होती. रात्री ज्याचा विचार केला, तोच विषय पुन्हा मनात आला. पण त्यासंबंधी कोणाशी विचारविनिमय करावा त्याचाच ती विचार करीत होती. वेंकटय्याशी बोलून काही फायदा होणार नाही. त्याचा जीव सतत पैशात गुंतलेला असतो. त्याने रिकाम्या हाताने परत पाठवले, तर फार लाजिरवाणे होईल. मग राजय्यांशी बोलावे काय ? ही कल्पना बरी वाटली.

राजय्या घरी आहेत की नाही हे पाहाण्यासाठी तिने मोठ्या मुलाला त्यांच्या घरी पाठवले.

थोड्या वेळाने परत येऊन त्याने ते शहरात गेल्याचे सांगितले.

"कधी येतील ?" तिने दबल्या स्वरात विचारले.

"पंधरा दिवस यायचे नाहीत," उत्तर मिळाले.

जरा वेळ विचार करून महालक्ष्मीने म्हटले :

"जा, रामय्याजींना एकदा मला भेटायला सांग. म्हणावं, फार जरूरीचं काम आहे, आईनं आग्रहानं बोलावलंय."

मोठा मुलगा निघून गेला. उन्हे वर आली आणि गार वारे वाहू लागले. बाहेर सगळे स्तब्ध होते.

"मुलं सगळी कुठं गेली ? बिट्टू, बिट्टी !" उत्तर आले नाही. लांबून शाळेची घंटा ऐकू आली. सडकेवरून येणाऱ्या-जाणाऱ्यांचा आवाज कमी झाला. गोदावरीत नाव चालवणाऱ्यांचा आवाज ऐकू येत होता. मागच्या अंगणात कावळे काव काव करीत होते. महालक्ष्मी बेचैन होती. विचार करीत होती की, रामय्याजींना हे कसे सांगावे ? ते काय म्हणतील कुणास ठाऊक !

"आई, रामय्याजी आलेत," मोठ्या मुलाने घसरणारी चड्डी वर ओढीत सांगितले.

महालक्ष्मी विचारप्रवाहांतून बाहेर येऊन आणि दुःखाने गलूल झालेला चेहरा पुसत दाराजवळ येऊन उभी राहिली. मनातली गोष्ट सांगायला संकोच वाटत होता. शेवटी ती बोलली : "आपला एका गहस्वाच्या गोष्टीवर सल्ला पाहिजे होता, म्हणून आपल्याला त्रास दिला. आमची परिस्थिती तर आपल्याला माहीतच आहे. आता या कुटुंबाचा सगळा भार माझ्यावर पडलाय.

हा भार कसा सावरता येईल, हे माझं मलाच कळेनासं झालंय?" महालक्ष्मीचा स्वर कापरा झाला.

रामय्या करुणार्द्र स्वरात म्हणाला, "तोच विचार मी करीत होतो, ताई! माझही मुलाबाळांचं मोठं कुटुंब आहे. हातपाय चालताहेत, तोपर्यंत पोट भरत राहाणार. तरीदेखील माझ्याकडून जे काही होऊ शकेल, तं जरूर करीन. त्यात मागपुढं पाहाणार नाही."

"आपला स्वभाव मला माहीत आहे. म्हणूनच आपल्याला इथं बोलावून त्रास दिला. आपल्यासारख्या मोठ्या लोकांना घरी बोलावण्याचा आमचा अधिकार किंवा लायकी नाही. यांचा व आपला स्नेह लक्षात घेऊन आपल्याला कष्ट दिले. गैर मानू नका." महालक्ष्मीचा गळा भरून आला.

रामय्या समजावणीच्या स्वरात बोलले, "काही हरकत नाही, ताई. आपण आपल्या मनातली गोष्ट निःसंकोचपणे मला सांगा."

कपडे शिवून निर्वाह करण्याचा विचार आहे. शिवण्याचं यंत्र घ्यायचं म्हणतये. कमीत कमी दोन-तीनशे रुपये लागतील. एवढं कर्ज कुठून मिळालं, तर. . . ."

रामय्या मध्येच म्हणाले, "तेंच मी सांगणार होतो, तेवढ्यात आपल्याच तोंडून ते निघालं."

"आपलं मन तसं उदार आहेच."

"रामनाथन या गावात पंचवीस वर्षं नोकरी करीत होता. त्याला कोणाचा आधार नाही, हे सर्व लोकांना माहीत आहे. आता अशा संकटाच्या वेळी आपली गरज लक्षात घेऊन आपल्याला काही मदत करणं गाववाल्यांचं कर्तव्य आहे. सगळ्यांना हे सांगून आपल्यासाठी काही पैसे जमवण्याची व्यवस्था करावी, असं मला वाटलं. ईश्वरकृपेनं माझा प्रयत्न सफल होईल, असा विश्वास वाटतो. पण आपल्या विचाराशिवाय हे काम सुरू करणं योग्य नव्हे, म्हणूनच मी जरा संकोचत होतो."

दुःखाचा कढ दाबीत आणि अभिमानही विसरत महालक्ष्मी बोलली, "जशी आपली मर्जी."

"मग मी येतो तर," असे म्हणून रामय्या निघून गेले.

महालक्ष्मीच्या मनाला जरा बरे वाटले. या धर्मात्म्याला सहस्र प्रणाम करावेत, असे तिला वाटले. त्या रात्री ती शांतपणे झोपी गेली. सकाळी

उठली, तेव्हा सूर्य उगवत होता. ती परसात गेली. मुले अजून झोपली होती. झाडझूड करून चूल पेटवली आणि बाहेरच्या खोलीत येऊन पाहिले, तर चारही मुले बाहेरच्या ओटथावर बसून दात घासत होती.

थोड्या वेळाने मोठ्या मुलीने आईजवळ जाऊन तिला विचारले, "आई, आम्ही शाळेत नाही जायचं का ग ?"

"दोन दिवसांनी जायचं," महालक्ष्मीने तिला समजावले.

मुले सडकेवर खेळू लागली.

दहाव्या दिवशी और्ध्वदेहिक सुरू झाले. ओळखीचे लोक जमले. महालक्ष्मी मागील दारी बाजूला बसून राहिली. और्ध्वदेहिकाच्या विधीचे दृश्य तिथून दिसते आहे. हवनाचा धूर चक्राकार फिरत आकाशात जाऊन विलीन होतो आहे. महालक्ष्मीचे लक्ष दुसरीकडेच आहे. लोकांची बोलणी आणि वैदिक मंत्रांचा मिश्र घोष अस्पष्टसा तिला ऐकू येतो आहे—खूप दूर काहीतरी चालल्या-प्रमाणे.

सूर्य मध्यान्हीला आला. हिवाळ्यातल्या उन्हाने लोकांच्या पाठी तापल्या आहेत. कुंपणावर मोठेमोठे पिंड ठेवून लोक आसपास उभे आहेत.

दोन कावळे तेथपर्यंत येतात आणि उडून जातात. बराच वेळ असे चालते. डोक्यावरचे ऊन्ह कडक होऊन सर्वांना संत्रस्त करते आहे.

काही सद्गृहस्थ जरा दूर उभे राहून बोलत होते, "प्रेतात्मा कशानं तरी असंतुष्ट आहे. त्यांच्या इच्छेविरुद्ध काही तरी झालं असेल, किंवा त्यांची काही इच्छा राहून गेली असेल."

"बरोबर आहे. असंच असणार," दुसरा म्हणाला. हळूहळू कुजबूज, सल्ला-मसलत सुरू झाली.

मनात काही संकल्प करून नमस्कार करायला मुलाला सांगण्यात आले.

मोठ्या मुलाने हात जोडून म्हटले, "मी मन लावून शिकेन."

"छेः ! त्याची गरज नाही," सगळे म्हणाले.

शेवटी ही गोष्ट महालक्ष्मीपर्यंत पोचली. आसूभरल्या डोळ्यांनी ती म्हणाली, "आमच्याकडून काही अपराध तर झाला नाही ?"

"काहीतरी अपराध झाला असणार," कोणीतरी म्हणाले.

महालक्ष्मीला रामय्याशी झालेले बोलणे आठवले. पण सगळ्यापुढे ते

सांगायला तिला संकोच वाटला. लोकांच्या दयेवर जगणे तिच्या पतीला पसंत नसेल काय ? असे गरीबीतच उपासमारीने मरावे, असे त्यांना वाटत असेल काय ? ही गोष्ट सिद्ध करण्यासाठीच तर या लोकांनी हे प्रयत्न चालवले नसतील ना ?

"रामय्याजी काही लोकांशी बोलून आपल्यासाठी काही पैशांची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असं ऐकलंय. खरं आहे का हे ?" कोणीतरी विचारले.

"खरं आहे." महालक्ष्मीने शांत स्वरात सांगितले.

"बस्. तेच ते. आधीच का नाही सांगितलं ? रामनाथम किती प्रतिष्ठेनं राहात होते. कधी कोणापुढं हात पसरायची वेळ आली नाही. अशा प्रकारे वर्गणी गोळा करण्यानं त्यांचा किती अपमान होईल ? त्यांचा आत्मा किती रागावेल ! ही कल्पना ताबडतोब मागं घेतली तर कदाचित् मृतात्म्याला शांती लाभेल. . ."

महालक्ष्मीचे मन विषण्ण झाले. "जर ही कल्पना मागे घेण्याचं तिनं जाहीर केलं आणि योगायोगानं त्याच वेळी कावळे येऊन पिंडाला शिवले, तर हा एकमेव आधार ती गमावून बसेल. पण त्यांना हे का आवडणार नाही ? या मुलांच्या भवितव्याची त्यांना नेहमी किती चिंता वाटे ? असं असूनही मी सांगितल्याबरोबर कावळे येऊन टपकतील, अशी शंका मला का यावी ? माझा यावर विश्वास नाही.", तरीही तिचे हृदय धडधडत होते. ते कावळे ताबडतोब आले तर . . .? काय होईल ?

शेवटी लोकांमध्ये कुजबूज, टीका, एकनिष्ठेचा अभाव वगैरे गोष्टी सुरू झाल्या. या परक्या लोकांच्या दबावाखाली येऊन तिने शेवटी सांगून टाकले, "मी आता तो विचार सोडून दिला आहे !" तिचे हृदय जोराने धडधडू लागले.

पाच मिनिटे लोटली. सगळे लोक तिथून दूर होऊन व्हरांड्यात जाऊन उभे राहिले. सगळे लोक दूर गेले तशी, इतका वेळ त्यांच्या भीतीने तेथे न येणारे कावळे भराभर येऊन एका मिनिटात सारे अन्न खाऊन उडून गेले.

सगळे आपापल्या पद्धतीने या घटनेचा अर्थ लावू लागले.

"मी म्हटलं होतं न ? रामनाथम किती अब्रूदार माणूस होता...अशा गोष्टी त्यांना कशा पटल्या असत्या." एकाने म्हटले.

दुसऱ्याच क्षणी ही गोष्ट सगळ्या मोहल्ल्यात पसरली.

रामय्या निराश होऊन दारात बसले. त्यांनी मनात म्हटले, "ही मोठी दुर्दैवी स्त्री आहे." आपला प्रयत्न त्यांनी त्याच क्षणी सोडून दिला.

मागच्या दाराशी उभी असलेली महालक्ष्मी केव्हाच बेशुद्ध होऊन पडली होती ! तिला आपल्या शरीराची काहीही शुद्ध नव्हती.

सगळे लोक आपापल्या घरी निघून गेले. चारही मुले एकमेकांकडे सुन्नपणे पाहात बेशुद्ध पडलेल्या आईच्या चारी बाजूंना बसून राहिली.

* * *

उपहार

– मुल्लपूडि वेंकट रमण

दिवस ढळल्यावर वडाच्या पारंब्यावरून अंधार खाली उतरला आणि हळू-हळू तलाव, समुद्र आणि नंतर सगळ्या पृथ्वीवर पसरला. बघता बघता राधेच्या डोळ्यातील काजळरेखेप्रमाणे कृष्णाच्या श्यामवर्णाप्रमाणे आणि त्या नंदलालाच्या घरच्या ताकाप्रमाणे तो अंधार दाट झाला.

त्या अंधारात झाडाखाली जळणाऱ्या लाकडांच्या ज्वाला कृष्णाच्या लाल रेशमी शेल्याप्रमाणे उडत आहेत, अंधाराच्या या सौंदर्याचे मुक्त कंठाने गुणगान करीत आहेत. आणि त्या शेकोटीवर बांबू शेकणाऱ्या गोपन्नाच्या चेहऱ्यावर, त्याच्या आसपास पसरलेल्या बासऱ्यांवर आणि पलिकडे पडलेल्या बांबूच्या तुकड्यांवर त्या ज्वाळा छाया प्रकाशाच्या भाषेत जणू कविता लिहीत आहेत.

तीन प्रहरानंतर सप्तमी संपणार आहे आणि कृष्णाचा जन्मदिवस उगवणार आहे. गोपन्ना जी बासरी तयार करण्यासाठी पंचवीस वर्षे धडपडतो आहे ती अजून तयार झालेली नाही. निदान उद्या तरी ती तयार करून कृष्णाला अर्पण करण्याची इच्छा आहे. ती उद्या तयार झाली नाही तर आता आयुष्यात कधी होणार नाही––फार उशीर झाला आहे.

"बाबा जेवून घ्या ना." लहानग्या गोपन्नाची हाक गोपन्नाच्या कानात शिरत नाही.

त्याचे लक्ष वृंदावनाकडे लागले होते. कान्हा तेथे पोहोचेल, पोहोचण्याची वेळ होऊन गेली होती. गोपींच्या नूपुरांचा झंकार ऐकू येतो आहे. कंकणांची किणकिण आणि थट्टा-मस्करीची किलबिल ऐकू येते आहे. जवळच्या वेळूच्या बनातून कोमल वेणूनाद ऐकू येतो आहे. या सगळ्या पार्श्वसंगीताबरोबर काही क्षणातच मोहनची मुरली वाजू लागेल.

गोपन्ना किती युगांपासून या झाडाझुडपामागे बसला आहे. ते त्याचे त्यालाच कळत नाही. पानांबरोबर पान बनून, फुलामध्ये फुलांप्रमाणे फुलून, वाळवंटात

याळूचा कण बनून, यमुनेच्या पाण्यातला एक थेंब बनून कृष्णाची मुरली त्याने आपल्या हृदयसंपुटात साठविली आहे. विशुद्ध स्वरलहरीमधील एक विशिष्ट स्वर अंत:करणात धारण करून त्यातल्या विश्वरुपाचा साक्षात्कार घडविण्यासाठी त्याने तपश्चर्या केली. तेच रुप मनात जतन करीत तो आपल्या झोपडीत आला. नवा वेळू कापून त्यात स्वरांची छिद्रे पाडली आणि आपल्या मनात जतन केलेली स्वरमाधुरी त्यातून निर्माण करण्याचा त्याने प्रयत्न केला. तो स्वर या बासरीतून निघाला तर ती त्याला कृष्णाला अर्पण करायची होती, पण तो स्वर निघालाच नाही. तो निर्माण करण्यासाठी त्याने हजारो बासऱ्या बनवल्या. आयुष्याचा क्षण न् क्षण ही बासरी तयार करण्यासाठी त्याने व्यतीत केला. पण आयुष्यच थोडे आहे. यमुना तटावर झाडांच्या मागे बसून कृष्णाचे वेणूगान तो श्वास रोखून ऐकत असे. असे करताना जे श्वास साठतील ते तो आपल्या बासऱ्या तयार करण्यासाठी खर्च करी. पण श्वास भरताच बासरी बेसूर बनत असे, काही ना काही कमी पडत असे. बासरी तयार करून ती घेऊन जाण्यासाठी तो निघाला की तिचा आवाज बिघडत असे.

गोपन्नाने पूर्वी अनेक बासऱ्या बनवल्या होत्या, त्या वाजवून तो खूपही झाला होता. पण एका अवस्थेप्रत पोचल्यावर त्याच्या मनात एक विचार आला. बासरी खाली ठेवून तो संगीताची कल्पना करू लागला. कल्पनेतल्या संगीताला भावनेचे रुप देऊन त्या भावनेची अनुभूति बासरीतून प्रकट करण्याचा प्रयत्न तो करू लागला. आणि एक दिवस त्याला सत्याची जाणीव झाली. संगीताची अनुभूति प्राप्त करण्यासाठी वाद्यस्वरांचा आश्रय घेणे वेडेपणाचे आहे. वेळूच्या नळीत धबधब्याला कोंडू पाहाणे व्यर्थ आहे, घागरीमध्ये सागर भरणे मूर्खपणाचे आहे. गायनामध्ये संगीताची जी अनुभूति शक्य आहे ती कल्पनेतल्या संगीताच्या शतसहस्रांश देखील असू शकत नाही.

कल्पनेबरोबरच स्वरलता देखील दिगंतापर्यंत जाऊ लागली, ती आभाळाला भिडली, साऱ्या अंतरिक्षात गुंजू लागली. हळूहळू प्रणवाक्षरातून निर्माण झालेला स्वरसागर प्रणवरूप धारण करून संबंध जगाला मुग्ध करणाऱ्या भयंकर परंतु अद्‌भुत आकारात दिसू लागला. श्राव्य संगीताप्रमाणे त्यात विसंवादी स्वर नाहीत, मेळ न साधणारे ध्वनी नाहीत. सगळी तत्वे आणि सत्ये अर्धसत्ये बनून ज्याप्रमाणे अद्वैत सत्यात विलीन होतात, त्याच-

प्रमाणे या संगीतातील विसंवादी स्वरदेखील पूर्ण स्वरांच्या संसर्गाने त्यांचे सौंदर्य आत्मसात करून रमणीय रूप धारण करू लागते. 'कणाकणात ईश्वर आहे, स्वरास्वरात संगीत आहे.' या सिद्धांताचा अर्थ आता त्याच्या लक्षात येऊ लागला. गोपन्नाच्या लहानशा देहात ही भावना मावेना. जे संगीत त्याने कल्पिले होते ते तो हृदयंगम बनवू शकत नव्हता...' तो गलितगात्र होई, हृदय फुटायची वेळ येई. सौंदर्य आणि आनंद यांच्या जवळ जाणे किती असह्य असू शकते याची त्याला कल्पनाही नव्हती. आता ती त्याला आली आहे पण यातून बचावण्याचा कोणताही उपाय उरलेला नाही.

त्या दशेतून त्याला लौकिक जगात आणून वाचविले होते, ते कृष्णाच्या मुरलीने. मुरलीचा स्वर ऐकताच तो मुग्ध होऊन गेला..आणि भानावर येऊन त्याच अवस्थेत रमला. आपल्या कल्पनेपेक्षाही महान सूर त्या दिवशी त्याला ऐकू आले. त्यानंतर प्रतिदिनी कृष्णाबरोबर जाऊन तो त्याचे वेणूगान ऐकू लागला. आरंभी काही दिवस गोपबाला त्याला काहीशा घाबरत, नंतर त्या त्याला एखाद्या गाईच्या वा वृक्षाच्या रूपात पाहू लागल्या.

इतके मनोहर संगीत कृष्णाने आपल्या छोट्याशा बासरीत कसे साठवले असेल याचे गोपन्नाला कोडे पडले. एकदा तो त्याच्या घरी जाऊन त्याची बासरी चोरून घेऊन आला. यमुना किनारी पोहोचल्यावर लपवून ठेवलेली ती बासरी वाजविण्यासाठी तो बाहेर काढू लागला, तर ती तेथे नव्हती.

"मायावी कृष्ण...चोरांच्या या राजापुढे आमच्या चोरीचा काय निभाव लागणार ?" गोपन्ना काय ते समजून गेला.

पण संध्याकाळी तो चोरांचा राजा गोपन्नाकडे येऊन म्हणू लागला, "गोपन्ना ! तू माझी मुरली घेऊन आला आहेस ना ? हरकत नाही. मला दुसरी बनवून दे."

कृष्णाच्या मुद्रेवरील हास्य पाहून गोपन्नाचा धीरच सुटला.

दुसऱ्या दिवसापासून गोपन्नाने बासरी तयार करायला सुरुवात केली. हे काम सुरू झाले तेव्हापासून त्याच्यात एक नवी स्फूर्ति आणि चेतना निर्माण झाली. आपल्या हातांनी तयार झालेली बासरी उद्या परवा कृष्णाच्या हातात शोभू लागेल आणि ती वाजवून कृष्ण तिच्यात प्राण निर्माण करील. या आशेने आणि आनंदाने तो बासरी तयार करू लागला. कृष्णाच्या ओठांचा

स्पर्श बासरीच्या ज्या भागांना होईल आणि त्याची बोटे बासरीवर जेथे जेथे फिरतील ते भाग गोपन्ना विशेष काळजीपूर्वक मुलायम करू लागला.

बासरी तयार होताच अधीरपणे त्याने ती वाजवून पाहिली. तिचा स्वर बरोबर निघाला नाही, कुठे तरी भेग पडली होती. जणू दोन तीन बासऱ्या एकत्र वाजताहेत असे वाटले. कृष्णाच्या हातून वाजण्याच्या कल्पनेने त्या बासरीचे शरीर शहारले तर नव्हते ना ? . . . .

गोपन्नाने ती फेकून दिली आणि दुसरी तयार केली. ती ही तशीच निघाली.

दुसऱ्या दिवशी बरेच वेळू मागवले. दहा बारा बासऱ्या बनवल्या. एक एक तयार करून वाजवणे आणि फेकून देणे . . . .

"जोपर्यंत तुझी बासरी तयार होणार नाही तोपर्यंत तुझ्याकडे पाहाणार नाही कन्हैया !" मनातल्या मनात गोपन्नाने निश्चय केला. तेव्हापासून त्याचा हा नित्याचा कार्यक्रम झाला. संध्याकाळी वृंदावनात जाऊन वेणूगान ऐकायचे आणि सकाळपासून संध्याकाळपर्यंत बासऱ्या बनवायच्या !

गावकऱ्यांमध्ये या गोष्टीची चर्चा होऊ लागली. ते आश्चर्य व्यक्त करू लागले. आरंभी लोक त्याची प्रशंसा करीत, पण नंतर या गोष्टीची थट्टा होऊ लागली. लोक म्हणत, गोपन्ना संगीताचा जुना ढंग विसरला. म्हणून आता तो बासऱ्या बनवू लागला आहे.

ज्या बासऱ्या गोपन्ना निरुपयोगी समजून फेकन देत होता त्या गोपबालक उचलून घेऊन जात होते. पण त्यातली एखादी बासरी कृष्णाच्या हातात पोहोचेल की काय ? या भीतीने गोपन्ना तयार झालेल्या बासऱ्या झोपडीच्या माळ्यावर ठेवू लागला.

यमुना तटावरील गोपन्नाची झोपडी, झोपडीजवळचा वेळूच्या तुकड्यांचा ढीग आणि झाडाखालची चूल पाहून लोक गोपन्नाला चेष्टेने म्हणू लागले, "लाकडाचं एक छोटंसं दुकान उघड की ! व्यापारही होत राहील !"

या थट्टामस्करीकडे लक्ष द्यायला गोपन्नाजवळ वेळ नव्हता, तशी इच्छा नव्हती आणि धैर्यही नव्हते.

पंचवीस वर्षे लोटली. कन्हैया मोठा झाला. आता त्याने वृंदावनात जाणे सोडून दिले. तो आता प्रतिष्ठित नागरिक झाला होता. राज्यकारभाराकडे तो

जास्त लक्ष देत होता. तरी देखील दर जन्माष्टमी नंतरच्या नवमीला गोपन्ना नव्या उत्साहाने बासरी तयार करी. मनोमन म्हणे, "येत्या जन्मदिनापर्यंत का होईना, ही बासरी तयार झाली पाहिजे." जन्मदिन येत असे. आणि निघून जात असे. पण बासरी तयार होतच नसे. ती भेग कुठून निर्माण होत असे कोण जाणे ! जणू कोणी उपहास करीत होतं किंवा तो शापच होता

"बाबा उठा, जेवून घ्या ना." लहानग्या गोपन्नाने हाक मारली. वडिलांनी त्याच्याकडे पाहिले, त्याची दया आली. आई तर नाहीच, पण बाप असूनही तो नसल्यासारखाच आहे. त्या वयात तोच रोज स्वयंपाक करून आपल्या वडिलांना जेवू घालीत होता. तो स्वतःच स्वतःची काळजी घेत आहे आणि आपले मन रमवतो आहे. एक प्रकारे हे देखील चांगलेच होते.

उद्याच्या अष्टमी नंतरच्या नवमीपासून पित्याच्या वियोगाचे दुःख त्याला अधिक जाणवणार नाही.

"उद्या कन्हैयाचा वाढदिवस आहे. तू नंदबाबाच्या वाड्यावर जाऊन एकांतात कन्हैयाला ही बासरी दे आणि माझ्या बाबांनी दिली आहे म्हणून सांग." गोपन्ना म्हणाला.

"देईन. पण आता जेवून घ्या ना." मुलाने पुन्हा आग्रह केला.

या मुलाला पाहाता पाहाता गोपन्नाला का कोण जाणे बालकृष्णाची आठवण झाली. इकडे तिकडे पाहून त्याने त्याला पोटाशी धरले आणि त्याचा पापा घेतला.

बाळाला हे विचित्र वाटले. गाल पुसत तो म्हणाला, "बाबा जेवून घ्या ना."

"बासरी नेशील ना ?"

"तुम्ही नेहमी असंच म्हणता. मग सकाळी म्हणाल की चांगली नाही, राहू दे."

"आता नाही म्हणणार. यावेळी मी बासरी बनवीन ती चांगलीच बनवीन." मंद हास्य करीत गोपन्ना म्हणाला.

"मग चला जेवून घ्या." छोटा गोपन्ना बोलला.

दुसरे दिवशी सकाळी उठून गोपन्नाने आपल्या मुलाला अभ्यंगस्नान घातले, त्याच्या केसांना सुगंधी द्रव्य लावले, ते विंचरले आणि बांधून त्यात फुले घातली.

त्याला पितांबर नेसवला. कमरेला शेला बांधला. कपाळावर कस्तुरीचा टिळा लावला. डोळ्यात काजळ घातले आणि गालबोट लावले. एक मोरपीसही त्याने त्याच्या केसात अडकून दिले.

लहानग्या गोपन्नाला हे बरे वाटले नाही. त्याच्या वडिलांनी पूर्वी असे केले नव्हते. त्यामुळे त्याला ते काहीसे विचित्र वाटले. त्याच्या डोळ्यात पाणी आले. करुणाभरल्या डोळ्यांनी त्याने वडिलांकडे पाहिले. मुलाला सजवून झाल्यावर गोपन्नाने एकवार त्याच्याकडे डोळे भरून पाहिले.

तो चकित झाला...हे काय ? हा तर बालकृष्ण...गोपालकृष्ण...हा येथे कसा आला ? खूप दिवसांपूर्वी तो जी बासरी घेऊन आला होता ती परत नेण्यासाठी आला की काय ?

गोपन्नाने पुन्हा लक्षपूर्वक पाहिले. शंकाच नाही...हा कृष्ण आहे. त्याचे हात आपोआप जोडले गेले. डोळ्यातून अश्रू वाहू लागले...ही भावना दुःखाची की आनंदाची, काहीच कळत नव्हते.

"काय झाले बाबा ?" असे म्हणत मुलाने अतिशय अस्वस्थ होऊन वडिलांना मिठी मारली. त्यांना आपल्याला नमस्कार करताना पाहून तो घाबरला होता.

गोपन्ना चमकला आणि आपले अश्रू पुसीत म्हणाला, "मी ईश्वराला प्रणाम केला आहे बाळ."

"माझी बासरी कुठं आहे बाळ ?" असे म्हणत त्याने इकडे तिकडे पाहिले. पण बासरी दिसली नाही.

"वर माळ्यावर ठेवली आहे. रात्री उंदीर येतात ना, म्हणून" छोटा गोपन्ना घाबरत बोलला.

"असं ? अनर्थ झाला. तू फार मोठा अनर्थ केलास बाळ ?" गोपन्ना म्हणाला. माळ्यावर उंदरांचे राज्य असतांना तेथे बासरी कशी ठेवलीस असे त्याला विचारायचे होते. पण तो बोलू शकला नाही.

माळ्यावर चढून पाहिले. तिथे निरुपयोगी समजून फेकलेल्या बासऱ्यांचा ढीग पडला होता. त्यातली कोणती नवी आणि कोणती जुनी ?

गोपन्नाने त्या सगळ्या बासऱ्या खाली काढल्या. एक एक उचलून वाजवून पाहिल्या.

"ही नाही."...

"ही देखील नाही."

"ही देखील नाही."

एकीकडचा ढीग कमी होत होता आणि दुसरीकडचा वाढता होता. वेळ संपत होती.

दुपारच्या जेवणाची वेळही होऊन गेली. पण गोपन्ना "नेति नेति"चा जप करीत बासऱ्या तपासून पाहात राहिला.

छोटया गोपन्नाला मधेच आपल्या वडिलांशी बोलण्याची हिंमत झाली नाही. तो देखील तेथेच बसून राहिला. घामाने कस्तुरीचा टिळा कपाळावरून ओघळला, काजळ विसकटले, फुले कोमेजली, त्याचा सगळा आनंद आणि उत्साह नाहीसा होऊ लागला. भुकेमुळे तो कोमेजल्यासारखा दिसू लागला. पण गोपन्नाचे या कशाकडेही लक्ष नव्हते.

"ही नाही."

"ही देखील नाही."

बासऱ्यांच्या एवढ्या मोठ्या ढिगात नवीन खरी बासरी कुठे तरी लपली आहे. खरोखरच ती खरी आहे का?

काही कळत नाही...गोपन्नाला काही समजत नाही. ती वाजवून देखील पाहिली नव्हती...ती खरीच असणार, असायला पाहिजे...

दिवस मावळला, अंधार पसरला. गोपन्नाने दिवा लावला.

"बाबा, रात्र होते आहे. उत्सव संपून जाईल," लहानगा चाचरत म्हणाला. गोपन्नाने मान हलवली. आता दोनच बासऱ्या वाजवून पाहायला राहिल्या आहेत. त्यातली एक वाजवून पाहिली.

ती देखील नाही.

आता एकच राहिली आहे. तीच ती असेल काय?...कोण जाणे... सकाळपासून जी बासरी तो शोधतो आहे ती खरी नसेल आणि म्हणूनच या ढिगात ती मिसळून गेली असेल...आता जी उरली आहे ती कदाचित त्याने निरुपयोगी समजून पूर्वीच फेकून दिलेली बासरी असेल.

शेवटची मुरली वाजवून पाहायचे धाडस गोपन्नाला झाले नाही. सत्य समजून घेऊन मरण्याचे सामर्थ्य त्याच्यात नाही. आणि दुसरा प्रयत्न करण्याचे धैर्यही त्याच्यात नाही. तेवढा आता वेळही नाही.

"हीच आहे!" तो आत्मविश्वासाने म्हणाला, "जा बेटा . . .पळत जा कन्हैयाच्या हातात दे ही बासरी. . .तोच ती वाजवून सांगेल."

वडिलांचे मन बदलण्यापूर्वीच मुलाला पळून जायचे होते. तो तावडतोब निघाला. अंधारात धावू लागला.

पंचवीस वर्षाचे वादळ शांत झाले.

गोपन्नाला क्षीण वाटत होते. आपल्या कल्पनेचे संगीत त्याने प्रथम ऐकले तेव्हा असाच क्षीणपणा त्याने अनुभवला होता. आजही तसेच वाटत आहे. . .

त्याचे काम पूर्ण झाले होते काय ?. . .कृष्णाला त्याने त्याची शुद्ध स्वरांची बासरी परत केली होती काय ? . . .

इतकी वर्षे साधना करून अनेकदा परीक्षा घेऊन शेवटी ही बासरी देवाकडे पाठविली तो तपासून पाहिलीच नाही. ते काम कन्हैयावरच सोपवले. तिचा आवाज नीट निघाला नाही तर तोच ती सुधारून घेईल.

खरे तर तिचा आवाज बरोबर आहे की नाही हे ठरविण्याची शक्ती त्याच्यात आहे कुठे ? तो आवाज बरोबर करून घेण्याची शक्ती कन्हैयामध्ये नाही असे त्याला का वाटले ?

गोपन्नाला हसू आले.

केवढी मोठी चूक झाली आहे. . .पंचवीस वर्षांची चूक. . .आयुष्यभराची चूक ! तो रागावेल काय ? नाही, हसेल "गोपन्ना किती वेडा आहे." असे समजून बासरी ओठांना लावील. सगळ्या श्रुति स्वतःमध्ये सामावून घेणाऱ्या त्याच्या उदरातून, प्रणवाचे मूल उद्‌गमस्थान बनलेल्या त्याच्या नाभीतून, त्याच्या मंगल मधूर अधरातून. . .

दूधलोण्याच्या सेवनाने मधूर झालेले तेच ते ओठ, ज्यांनी राधेच्या अधरांना पवित्र केले आहे. तेच ते ओठ. . .त्या बासरीमध्ये प्राण प्रवेश करतील.

गोपन्नाजवळ जी बासरी पडली होती तिच्यातून मंद मधुर स्वरलहरी बाहेर पडत होत्या. त्यांचा कोमल स्पर्श गोपन्नाला जाणवला.

हे काय ? ही बासरी त्याने निरुपयोगी समजून फेकून दिली होती.

दुसऱ्याच क्षणी त्याच्या जवळची बासरी आणि तिच्या सुरेल आवाजामुळे तिच्याजवळची आणखी एक बासरी वाजू लागली. काही क्षणातच त्या झोपडीत पडलेल्या हजारो बासऱ्यांमधून जगाला मोहून टाकणारे संगीत प्रकट

होऊ लागले. गोपन्ना उठून बसला. तो चहूकडे भिरभिर फिरू लागला. सगळ्या बासऱ्या वाजत होत्या. सगळ्यातून वृंदावनात कृष्णाने वाजवलेले त्या दिवशीचेच मनोहर संगीत ऐकू येत होते. सगळे सूर शुद्ध होते. एकीतूनही अपस्वर निघत नव्हता. देवाला आवडणार नाही अशी एकही बासरी त्यात नव्हती...

गोपन्ना चकित झाला. आनंदाने पुलकीत झालेले त्याचे शरीर शिथिल होऊ लागले. हजारो बासऱ्यांच्या स्वरसागरात...भगवान विष्णु स्वतः तल्लीन होऊन विराजमान झाले होते.

वेणूगान समाप्त होताच काही क्षणातच त्याहूनही मधुर अशी पावलांची चाहूल ऐकू आली. लहानगा गोपन्ना परत आला असेल. आपण पाठविलेली बासरी चांगली निघाली की नाही हे तो सांगू शकेल. खरे तर हे जाणून घेण्याला आता काही महत्त्व नाही. त्याहूनही सत्याचा साक्षात्कार गोपन्नाला झाला आहे.

गोपन्नाने हलकेच डोळे उघडून पाहिले...समोर दारात बालकृष्ण उभे!

पितांबर, कमरेला शेला, कपाळी कस्तुरीचा टिळा, गालावर गालबोट, केसामध्ये मोरपीस...

"तू स्वतः आलास कन्हैया?" असे म्हणत उठून गोपन्नाने हात जोडले.

"बाबा बाबा, कन्हैयाने तुमची बासरी वाजवली. मला जेवायला घातलं. माझा इथे पापा घेतला...आणि बाबा...कन्हैया तुमची बासरी वाजवणारच होता... पण...त्याने खूप प्रयत्न केला...पण ती ऐकूच आली नाही...तिच्यातून गाणं निघालंच नाही...पण कन्हैया फार चांगला आहे... माझा इथें पापा..."

गोपन्नाने तिरप्या नजरेने झोपडीवर पसरलेल्या बासऱ्यांकडे पाहिले.

आतापर्यंत गाऊन गाऊन थकून पडलेल्या त्या बासऱ्यांकडे गोपन्नाने अतिशय प्रेमाने पाहिले आणि त्यातली एक बासरी उचलून तिच्यावर ओठ टेकले.

आल्हाददायक हवा

–मधुरांतकम् राजाराम

एकीकडे सनईच्या साथीवर विनता–सुताच्या वाहनावर बसून कांची वरदायक भगवान सूर्यनारायण वर येत होता, तर दुसरीकडे रिकिबीत पाय ठेवून लगाम घट्ट धरीत शेषाद्री उडी मारून घोड्यावर बसला होता. असा अनुभव त्याला पूर्वी आलेला नव्हता. त्यामुळे तो थोडा घाबरला खरा, पण आपले भय दाखवण्याची ही वेळ नाही, हे त्याला माहीत होते. हजारो डोळे त्याच्याकडे पाहात होते. त्याच्या प्रत्येक हालचालीला महत्त्व होते. तेव्हा तो जेवढ्या काळजीपूर्वक हालचाली करील, तेवढे बरेच होते . . .

शेषाद्री सावरून बसला. आपण व्यवस्थित ऐटीत बसलो आहोत याची खात्री झाल्यावर त्याने चहूकडे पाहिले. समोर वाजंत्री वाजत होती. त्यात ढोल मुख्य होता. तो ढोलदेखील काय होता! तो ढोल नव्हे–शिवाचे तांडवनृत्य पाहून तल्लीन होणाऱ्या नंदिकेश्वराच्या मानेची ती पोळीच होती. गळ्यात सोन्याचा हार झगमगत होता. डोक्यावरचे केस कधी वर उडत, कधी त्यांचे वेगवेगळे भाग पडत तर कधी पौर्णिमेच्या दिवशी भरती आलेल्या समुद्रातल्या भोवऱ्यांप्रमाणे इकडे तिकडे उडत. या मस्तीत ढोल वाजवणारा कलाकार मनापासून ढोल वाजवीत होता. प्रेमाचे विविध हावभाव करीत, गालांचे चुंबन आदि वेगवेगळे भाव दाखविणाऱ्या मुद्रा करीत, ओठ हलवीत, भुवया नाचवीत, मान वेळावीत आणि शेवटी "दासो ऽ हम" म्हणून हार मान्य करीत मान झुकवून ढोलाच्या माध्यमातून तो पतीपत्नीच्या दाम्पत्य जीवनातील हजारो हावभाव रंगवीत होता. वराकडे आकृष्ट होणाऱ्या नजरा स्वत:कडे जबरीने खेचणाऱ्या ढोल वादकावर नाराज होऊन सनईवाले सनईचे टोक वराकडे रोखीत जोरजोरात सनई वाजवीत होते. जणु आजची उत्सवमूर्ती शेषाद्री आहे, त्याच्याकडे पाहा, असेच त्यांना सुचवायचे होते. वाजंत्रीवाल्यांच्या जवळ उभे राहून काही कलाप्रेमी लोक संगीताच्या आस्वाद मोठे रंगवून घेत होते आणि चुटक्या वाजवून व माना हलवून त्याला साथ देत आपल्या जवळची

ढोल-सनईची उणीव जणु भरून काढीत होते. वरामागून रेशमी साड्या परिधान केलेल्या सुवासिनी आणि परकर-पोलके व ओढणी नेसलेल्या कुमारिका आपापल्या वयास अनुरूप वेषभूषा करून वरातीची शोभा वाढवीत चालल्या होत्या. ही वरातच काय, पण सगळ्या जगाचा इतिहासच जणु आपल्यामुळेच पुढे सरकतो आहे, असे त्यांना वाटत असावे. या उल्हासपूर्ण भावनेने त्या तन्वंगी मदमस्त हत्तीशी पैजा मारीत मंदगतीने चालणाऱ्या हंसाना चकित करीत पुढे जात होत्या.

शेषाद्रीने पुन्हा एकदा स्वत:कडे गुपचुप पाहून घेतले. आपला नवरदेवाचा डौल कुठेही उणा नाही याबद्दल त्याने स्वत:ची खात्री करून घेतली. पायघोळ धोतर, झगझगता रेशमी कुडता आणि गळयात पुष्पहार! काय कमी होते? मोठ्या ऐटीत तो बसला आहे. त्या थाटात त्याचे छायाचित्र काढले, तर शहरातल्या बाजारातील मिरवणुकीत चालणाऱ्या गाढवाच्या पिल्लासारखा दिसेल तो!

शेषाद्रीने पुन्हा मान ताठ केली. ओळीने उभ्या असलेल्या मातीच्या महालामधून पेट्रोमॅक्सच्या हलत्या प्रकाशात वरात फुलांच्या नौकेसारखी पुढे सरकते आहे. शेषाद्रीच्या ओठावर मंद हास्याची लकेर विजेसारखी क्षणभर चमकून गेली. हे सगळे त्याला आकस्मिक प्राप्त झालेल्या वैभवासारखे भासले.

हे औट घटकेचे राज्यच म्हणा ना! लग्नगाठ बांधली जाईपर्यन्त हे बादशाही सोहळे चालतील. धूपदीपादी षोडषोपचार होतील. "शेषाद्रीभाऊ!" "बेटा शेषू!" "अरे शेषदादा!" अशा आपापल्या नात्यानुसार अनेक संबोधनांनी. त्याला विवाहमंडपात बसवून आणि संसार साम्राज्याचा अधिकारी बनवून सगळे लोक आपापल्या वाटेने निघून जातील.

यथपर्यन्त ठीक आहे. पण नंतर?

सहचरी साध्वी असेल आणि त्याला आवडणारी असेल, तर त्यांचे दाम्पत्य-जीवन स्वर्गतुल्य सुखाचे होईल. पण विपरीतही घडू शकते.

म्हणून तर कोणा अनुभवी माणसाने लग्नाला लॉटरी म्हटले आहे.

शेषाद्रीच्या बाबतीत तर ही गोष्ट अगदी बरोबर वाटते. कारण विवाहा-पूर्वी आपल्या भावी सहचारिणीला निदान एकदा पाहाण्याची संधीदेखील त्याने गमावली होती, बाहेरच्या रंगीबेरंगी आवरणावरून पुडक्यातल्या मालाची

कल्पना करणे म्हणजे निव्वळ मर्खपणा, असे त्याचे मत होते. त्यामुळे त्याने झटकन् निर्णय जाहीर केला की, मुलगी पाहाण्याची गरज नाही. मुलगी त्याला मान्य आहे.

"किती हुषार झालास बेटा तू ! माझ्या मर्जीप्रमाणेच सगळ ठरलं की, पुढे सासू-सुनेच्या भांडणाला थाराच राहाणार नाही, असंच तुझ्या मनात होतं ना ?" पार्वतम्याने चकित होऊन विचारले.

"शेवटी मी मुलगा कुणाचा आहे, आई ?" शेषाद्रीने हसत उत्तर दिले.

सनईच्या सुरात आपली स्वप्ने साकार होताना पाहून प्रसन्न मनाने शेषाद्री काळजीपूर्वक घोड्यावरून उतरून दोन-चार पावले पुढे गेला तोच अचानक मागून "उजवा पाय, उजवा पाय" असा कोणाचा तरी आवाज आला, आणि शेषाद्री थबकला.

शेषाद्रीने थांबून आपल्या उजव्या पायाची हालचाल करून तो सही-सलामत असल्याची खात्री करून घेतली.

"तसं नव्हे शेषाद्री ! आधी उजवा पाय ठेवला पाहिजे !—" असे म्हणत एक म्हातारा पुढे आला.

"असं होय ? पण तुमच्या आवाजानं माझ्यावर वज्राघातच झाला, काका ?" शेषाद्री बोलला.

"विवाहाच्या शुभ वेळी असं अमंगल बोलू नये, बेटा. अमंगलापासून वाचवलत, काका, असं म्हटलं पाहिजे." शेषाद्रीच्या चुलत्याने सल्ला दिला.

चुलत्याचे म्हणणे अगदी योग्य आहे, असे शेषाद्रीला दोन–तीन सेकंद वाटले. योग्य वेळी येऊन काकांनी सल्ला दिला म्हणून तर संकट टळले. कोणता तरी पाय पुढे टाकायचाच होता, तर उजवा पायही पुढे टाकता आला असता. असे झाले असते, तर काय झाले असते ? या प्रश्नाला उत्तर नाही. अधिक विचार करून एका शंकेचे निरसन करू गेले की, अनेक शंका उद्भवतात.

आचार विचाराबाबतच्या अंधश्रद्धांवर शेषाद्रीचा विश्वास नाही. सकाळी अंथरूणावरून उठल्यापासून रात्री झोपेपर्यन्त प्रत्येक कार्यात पावलोपावली अडथळे आणणाऱ्या या अंधश्रद्धा राष्ट्र जीवनातून उखडून फेकण्याची स्वप्ने शेषाद्री पाहात होता. या विषयावर संधी मिळेल तेव्हा मोठमोठ्या सभातूनही तो व्याख्याने देत असतो

शेषाद्रीच्या पावलांनी सहजपणे देवडी पार केली. यावेळी त्याने आपोआप अथवा मुद्दामच आपल्या उजव्या पावलाने सासुरवाडीचे घर पावन केले.

नारळाच्या हिरव्यागार झावळ्यांच्या हिरव्या सुगंधाने दरवळणाऱ्या मंडपातून शेषाद्रीने घरात प्रवेश केला आणि खास त्याच्यासाठी अंथरलेल्या चटईवर जाऊन बसला. कामांमुळे शेषाद्रीला पाहायला वेळ न झालेल्या स्त्रिया आता त्याच्या भोवती गोळा झाल्या. बाहेर वाजणाऱ्या वाजंत्र्यांचा आवाज मंडपापर्यंत पोचला, तशी तेथे चटयांवर झोपलेली लहान मुले दचकून उठून बसली, आणि वाजंत्र्यांच्या आवाजात त्यांनी स्वत:चेही आवाज मिसळले. शेषाद्री जेथे बसला होता, तेथपर्यंत हवा पोहोचत नव्हती. आजूबाजूला अनोळखी व्यक्ती होत्या या दोन्ही कारणांमुळे शेषाद्रीची तगमग होऊ लागली.

क्षणामागून क्षण जात होते. तेथे आपल्याला त्या अवस्थेत किती वेळ स्वस्थ बसून राहावे लागणार आहे, हे शेषाद्रीला समजत नव्हते. त्याने निर्विकारपणे बसण्याचा कितीही प्रयत्न केला तरी, लग्नाचा मुहूर्त जवळ येऊ लागला, तशी आपण काटेरी आसनावर बसलो आहोत, असे त्याला वाटू लागले. वधू समोर येईपर्यंत बहुतेक त्याची हीच अवस्था राहाणार ! पण घाई करून काय उपयोग ? सगळे विधी यथासांग झाले तरच आराध्य देवता प्रकट होणार.

शेषाद्रीने घड्याळाकडे पाहिले. दहा वाजताहेत. साडेदहापर्यंत वाढायला सुरुवात झाली. शेवटची पंगत उठायला अकरा वाजून गेले.

भोजनानंतर शेषाद्रीने थोडी विश्रांती घेतली न घेतली तोच त्याला उटणे लावण्यासाठी घेऊन गेले.

त्याच्या गालावर आणि हातावर चंदन लावून सर्व अंगावर गुलाबपाणी शिंपडण्यात आले. मध्यरात्री थंड वारे वाहात असताना ही द्रव्ये अंगाला लावण्याचा कार्यक्रम शेषाद्रीला आवडला नाही. तरीदेखील ओठांवर मंदहास्याची लकेर कायम ठेवून त्याने तो प्रसंग निभावून नेला.

शेवटी अभ्यंगस्नानाचा कार्यक्रमही संपला. पितांबर नेसून, कंबर कसून भटजीबुवांनी तिपाईवर कलशाची स्थापना केली आणि स्वस्तिवाचन सुरू केले. रात्रभर जागे राहिल्याने शेषाद्रीचे डोळे लालसर झाले होते. कसातरी तो बोहल्यावर जाऊन बसला. गडबड करणारी सगळी मुले झोपी गेली होती. त्यामुळे मंडपातले वातावरण शांत होते. प्रतीक्षा-काव्यातला अंतिम सर्ग आता चालू

होता आणि शेषाद्रीला जाणारा प्रत्येक क्षण त्याच्या सहनशक्तीची परीक्षा पाहणाऱ्या युगा-युगासारखा वाटत होता.

शेषाद्री मान खाली घालून बसला होता. मंडपाच्या एका भागात माणसे उठून कोणाला तरी वाट करून देत असल्याची शेषाद्रीला चाहूल लागली. त्याने मान वर करून पाहिले. एक सुवासिनी वाट दाखवीत होती, एक कुमारिका हात धरून पुढे चालत होती, आणि त्या दोघींच्या आधाराने नववधू हलके हलके बोहल्याकडे येत होती.

एक. . .दोन. . .तीन. . .त्या तीन क्षणात शेषाद्रीचे डोळे अनिमिष झाले.

ती फार उंच नव्हती किंवा तशी ठेंगणी वा स्थूलही नव्हती. झगमगत्या रेशमी साडीत ती मिरवणुकीतल्या देवीच्या प्रतिमेसारखी वाटत होती. तिचा रंग एकदम गोरा म्हणता आला नसता, गुलाबाच्या पाकळ्यांप्रमाणे ती थोडी गोरी, थोडी पिवळी अथवा या दोन्ही रंगाच्या मिश्रणासारखी वाटत होती. काजळ रेषांच्या मध्ये अर्धवट उमललेल्या कळीसारखे तिचे डोळे फुलत होते. डोळे इतके निरागस दिसत होते की जणू त्यांनी अजून जग पाहिलेच नव्हते. शेषाद्रीला आश्चर्य वाटले–व्यवहारज्ञानात स्वतःला सर्वांत जास्त शहाण्या समजणाऱ्या आपल्या आईने या मुलीत काय पाहून तिला सून करायचे ठरवले असेल ?

शेषाद्रीला स्वतःचीच कीव आली. या मुलीला त्याने आधी पाहिले असते, तर तो या लग्नाला तयारच झाला नसता ! तिच्या सौंदर्यात कसलीहि उणीव नव्हती. पण जी वस्तू काचेच्या कपाटात शोभेसाठी ठेवायची आणि तिचे सौंदर्य पाहून मुग्ध व्हायचे ती अशी जमीनीवर खेचून आणणे त्याला बरे वाटले नाही. बाहुलीच्या लग्नातदेखील लाजणारी ही शालीन बाला कुठे आणि संसाराचे समरांगण कुठे ? हे स्निग्ध लावण्य संसाराच्या रगाड्यात पिचून जावे असे त्याला वाटेना. आपल्या आईप्रमाणेच त्यानेही याच मुलीशी लग्न करण्याचा निश्चय केला असता, तरी त्याने कदाचित् घाई केली नसती. त्या मुलीने चार वर्षे थांबावे आणि या काळात गृहस्थजीवनाचा श्रद्धापूर्वक अभ्यास करावा असे त्याने समजावून सांगितले असते.

पानांनी सजलेल्या पुष्पकुंजासारखी वधू बोहल्यावर बसली. शेषाद्री नजरेने लोभावून त्या कोमलांगीच्या चेहऱ्याकडे पाहात होता. त्याला मनातल्या मनात हसू आले–वडील माणसे बरेच काही सांगतात. म्हणतात–बाह्य सौंदर्यापेक्षा

आतले गुण अधिक महत्त्वाचे. पण डोळ्यांना प्रत्यक्ष दिसणाऱ्या रूपाची उपेक्षा करणे मानवी स्वभावाला सोडून होईल. हसणे, गाणे, बोलणे, चालणे, लाजणे, कधी मधुर कधी कृतक कोप दाखवणे अशी या रूपाची हजारो अंगे आहेत. या बहुरंगी सूत्रांच्या गाठींनी शृंगाराच्या झोपाळ्यात झोके घेणारी वस्तू आहे—मानवी रूपाची माधुरी.

पण या जगात प्रत्येक सुंदर वस्तू कमनीय नसते. दिसायला सुंदर, पण खाण्यासाठी निरुपयोगी असे किती तरी दात नसतात का? अनेक फुले दिसायला सुंदर असतात पण त्यांचा वास घेताच नाक बंद करावे लागते. शतदलापुढे चमेलीचे सौंदर्य काहीच नाही. पण चमेली सुगंधाची खाण आहे. दिसायला अद्वितीय सौंदर्य लाभलेले मंदारचे फूल कोणी डोक्यात घालीत नाही, देवपूजेसाठीही त्याचा उपयोग होत नाही. स्त्रियांच्या डोक्यावर आणि देवाच्या चरणी नोकझोक नसणाऱ्या मोगऱ्याच्या फुलांनाच गौरवाचे स्थान मिळते. म्हणूनच हे लोक सौंदर्यापेक्षा गुण महत्त्वाचे असे म्हणतात.

शेषाद्रीच्या मनातल्या विचारांच्या साखळीने मग एका घटनेपाशी जाऊन नवे वळण घेतले. त्याचे लग्न लावून त्याला निरोप देणारी आईची साश्रु मुद्रा त्याच्या मनःचक्षुपुढे आली. मुलाच्या लग्नाने तर आईला आनंद व्हायला पाहिजे. मग गाण्यातल्या विसंवादी स्वराप्रमाणे हे अश्रू कसे? एक शक्यता आहे—मुलाच्या लग्नाला अर्थ आईने आपल्या अनेक जबाबदाऱ्या सुनेवर सोपवणे हा आहे. या जबाबदाऱ्या सून कितपत पार पाडू शकेल, याचे उत्तर भविष्यकाळच देईल. यासंबंधी लोक नेहमी म्हणतात की, पती घरी परतल्यावर पत्नी त्याच्या पाठीकडे पाहाते, तर आई त्याच्या पोटाकडे पाहाते. म्हणजे पत्नीची दृष्टी नेहमी पतीच्या कमाईवर असते आणि आई नेहमी मुलाला काय हवे-नको, त्याचा विचार करते. आपला मुलगा सर्व दृष्टींनी सुखी असावा असे तिला वाटते. उलट पतीपासून आपल्याला किती सुख मिळते आहे, याचा पत्नी नेहमी विचार करते. भर्तृहरीनेदेखील सहधर्मचारिणीच्या गुणांचे वर्णन करताना म्हटले होते, 'कार्येषु दासी, करणेषु मंत्री' या सगळ्या गोष्टींचा विचार केल्यावर सुखी वैवाहिक जीवन हे ईश्वरी वरदानच वाटते.

शेषाद्री अशा विचारप्रवाहात वाहात चालला होता, इतक्यात भटजींनी सगळे विधी संपवून वाजंत्री वाजवण्याचा आदेश दिला.

विसंगत बडबड, अप्रासंगिक थट्टा आणि कृत्रिम मानपान यांनी शेषाद्रीचे मन उडून गेले. त्याच दिवशी संध्याकाळी मोकळी हवा खाण्यासाठी तो गावापासून दूर फिरायला गेला. धावपळ आणि गडबड यांची सवय असलेल्या शब्दविश्वात शेषाद्री जितका गुंतत चालला होता, तितकेच त्याचे मन अशांत होत चालले होते. त्यागराजाने म्हटले आहे की, शांतीविना सुख लाभत नाही. कदाचित् एकांतात आपल्याला शांती मिळेल, असे शेषाद्रीला वाटले. चालता चालता शेषाद्रीचे मन पुन्हा विचारप्रवाहात वाहू लागले. या लौकिक जगात का कोण जाणे, आनंदाच्या प्रत्येक गोष्टीला वेदनेचे अस्तर असतेच असते. जगात सर्वात अधिक आनंद देणारी गोष्ट म्हणजे—विवाह. जगाच्या आरंभापासून क्रमाने विकास पावणाऱ्या संस्कृतीचा मुख्य सोपान म्हणजे—विवाह. तीन महिन्यापूर्वी त्याचे लग्न ठरले. त्या दिवसापासून पावसाळ्यात काठोकाठ भरणाऱ्या तलावाप्रमाणे त्याचे हृदय एका अनिर्वचनीय आनंदाने ओसंडून चालले होते. आधी त्याच्या मनात येई की त्याच्या स्वप्नातली सुंदरी त्याच्या मनाच्या आकाशात विजेप्रमाणे क्षणभर लकाकून अदृश्य होते आहे. तीच कल्पना आता साकार होऊन त्याची प्रतीक्षा करते आहे आणि त्याची हृदयवीणा आनंदमय रागिणी छेडते आहे आणि तो स्वतःला विसरून जातो आहे. अशा प्रकारे मन आनंदात असतानाच त्याच्या मनापुढे अनेक प्रश्न उभे राहात—आपली जीवनसाथी बनणारी ती मुलगी कशी असेल ? कशी दिसेल ? आई म्हणते—ती मुलगी म्हणजे मोती आहे, पोवळा आहे—दीपज्योतीसारखी प्रकाशमान आहे. त्या वर्णनांनी रूप तर समोर दिसत नाही, पण सणासुदीला होणाऱ्या पक्वान्नाप्रमाणे त्यामुळे जिभेला पाणी मात्र सुटते.

खरे तर, प्रतीक्षा करण्यातच सुख आणि दुःख दूध आणि पाण्याप्रमाणे एकत्र झालेली असतात. मीलनाच्या कल्पनेतच सुख आहे, आणि ते होण्यास विलंब लागला की दुःख होते.

तीन महिने कसेबसे संपले.

पण आता त्याचे ग्रह फिरले आहेत.

आता परिस्थिती अशी आहे की, ती हसते खरी, पण त्या हास्यातून सांडणारे मोती तो वेचू शकत नाही. तिचे ओठ हलल्याने निर्माण होणारा मधु तो चाखू शकत नाही. त्या शुभघडीसाठी त्याने आणखी चार दिवस वाट पाहावी, असे वडील मंडळींनी बजावले आहे.

नदीकाठच्या वाळवटात संध्याकाळचे सौंदर्य पाहात शेषाद्री बसून राहिला. आभाळात ढग, हवेत पक्षी आणि पाण्यात मासोळ्या जोडीजोडीने तरंगताहेत. शेषाद्रीने डोळे मिटून घेतले. नदीकिनारी वृक्षांच्या पर्णसंभारात बसलेला आणि नवा साथी लाभलेला एक कोकिळ आंब्याचा मोहर खाऊन पंचम स्वरात आपल्या प्रियेला साद घालतो आहे. शेषाद्रीने आपले कान झाकून घेतले.

थोडया वेळाने शेषाद्रीने डोळे उघडले तेव्हा, पर्वतशिखरावर विहरणाऱ्या धूसर मेघांप्रमाणे चांदण्याचे सौंदर्य संध्याकाळच्या अंधारात झिळमिळत होते.

गावाकडे परतताना शेषाद्री वाट चुकला. चांदण्याच्या मंद प्रकाशात शेतांच्या बांधावरून काही खाणाखुणा शोधीत तो घरी पोहोचला, तेव्हा रात्रीचे नऊ वाजून गेले होते. वऱ्हाडी मंडळी जेवणे उरकून जानोशात परतली होती. संध्याकाळी पाचपासून वराचा पत्ता नसल्याने मुलीकडची मंडळी अस्वस्थ होऊन गावाचा कानाकोपरा शोधीत होती. आता नवरदेवाचे पुनर्दर्शन झाल्याने त्यांच्या जिवात जीव आला. त्यांना वाटले, आपल्याकडून मानपानात काही उणे पडले म्हणूनच नवरदेव अदृश्य झाले असावेत. त्यामुळे शेषाद्री येताच त्यांनी दुप्पट उत्साहाने त्याचा आदरसत्कार सुरू केला. या नव्या जादा अनुनयाने शेषाद्री आणखीनच गोंधळला. त्यामुळे त्याला नीट जेवणही गेले नाही. जावई-बापू रुसल्याच्या घरच्या मंडळींच्या कल्पनेस त्याचे जेवण पाहून पुष्टीच मिळाली.

"झोपायची व्यवस्था कुठे करू ?" शेषाद्रीच्या मेव्हण्याने विचारले.

"कुठेही. पण काही अटी आहेत. आसपास लोक बोलत असले, तर मला झोप येणार नाही. मुंगीच्या चालण्याच्या आवाजाने सुद्धा माझी झोपमोड होते. वारा चांगला येणारी जागा हवी. मला वाटतं, व्हरांडा बरा पडेल."

"छे हो. आमच्या गावात थंडी जरा जास्त पडते. कदाचित तुम्हाला सोसायची नाही. दुसरं म्हणजे . . ."

मेव्हण्याला मध्येच थांबवीत शेषाद्री जरासा त्रासून बोलला, "काही हरकत नाही. तुम्ही त्याची काळजी करू नका. मी पाहून घेईन."

दोन-तीन दिवसांपासून त्याला झोप नव्हती. त्यामुळे अंथरुणावर अंग टाकताच झोप येईल, असे त्याला वाटले होते. पण त्याची निराशा झाली. मेव्हण्याचे बोलणे सिद्ध करण्यासाठी गार वारे जोरात वाहू लागले. त्याबरोबरच डासांच्या झुंडी प्रचंड प्रमाणात घोंगावू लागल्या. अंथरुणावर पांघरुण नव्हते. शेषाद्रीने उशी

उचलून पाहिले, पण छे. . .पांघरुणाचे नाव नाही.

पायापासून डोक्यापर्यंत चादर पांघरून झोपायची त्याला सवय होती. त्याशिवाय त्याला झोप येत नसे. बहुतेक त्या दिवशी त्याच्या नशिबात झोप नव्हती. नाहीतर बारकाईने त्याची सगळी व्यवस्था करणारी मंडळी चादर ठेवायलाच कशी विसरली असती ?

अंगावरचा पंचा काढून तोच पांघरण्याचा शेषाद्रीने प्रयत्न केला, पण तो डोक्यापासून पायापर्यंत पुरेना. पायापर्यंत तो ओढला की तोंड उघडे पडे आणि डोक्यापर्यंत घेतला की पाय उघडे पडत.

शेवटी पाय पोटाशी घेऊन हात छातीवर बांधून मातेच्या गर्भातील बालका-प्रमाणे शेषाद्री पलंगावर अंग दुमडून झोपी गेला.

वेळ संथपणे चालला होता.

शेषाद्रीचे डोळे मिटत होते.

अचानक अर्धवट झोपेतून तो जागा झाला. आपल्या अंगावर काहीतरी मुलायम पांघरुण घातले जात आहे, असे त्याला वाटले. त्याने डोळे उघडून पाहिले तर पंचाच्या पडद्यातून पलंगाजवळ एक आकृती उभी असलेली दिसली. तोंडावरचे पांघरून काढण्यासाठी त्याने हालचाल करताच त्या हालचालीची जाणीव होऊन हातातली शाल त्याच्या अंगावर तशीच टाकून ती व्यक्ती अंधारात लपण्यासाठी पुढे जाऊ लागली. शेषाद्रीने झटकन हात पुढे करून त्या व्यक्तीला स्वतःकडे ओढण्याचा प्रयत्न केला.

पण तोपर्यंत ती व्यक्ती हातातून निसटून गेली. फक्त तिची वेणी त्याच्या हातात आली — क्षणभराच्या झटापटीनंतर तीदेखील त्याच्या हातातून निसटून गेली. वेणीत गुंफलेली निशिगंधाची चार फुले तेवढी शेषाद्रीच्या हातात आली

हातात हसणाऱ्या त्या फुलांकडे शेषाद्री पाहात राहिला. ही फुले नाहीत— नव्या आनंदमय जीवनाची ती चिन्हे आहेत, पवित्र प्रेमाचे प्रतीक आहेत. हृदय देऊन हृदय घेण्यास समर्थ असणाऱ्या अर्धांगिनीसाठी त्याने केलेल्या तपस्येचे हे फळ, ईश्वरी वरदान आहे.

निशिगंधाच्या प्रसन्न सुगंधात स्वतःला विसरून जात, शालीच्या उबेत शेषाद्री झोपी गेला.

सुखान्त

—श्रीमती अब्बूरि छाया देवी

झोपेची गोळी घेऊन एक तास होऊन गेला आहे. पण अजून तिचा काहीही परिणाम झालेला दिसत नाही. बारा वाजेपर्यंत अंथरूणावर कुशी बदलत पडून शेवटी नाइलाज होऊन गोळी घेतली होती., कमीत कमी दोन तीन तास झोपले नाही, तर अन्न पचायचे नाही. अन्न पचले नाही तर उद्या दिवसभर त्रास होइल आणि त्यासाठी औषध घ्यावेच लागेल, म्हणूनच मी आता झोपेची गोळी घेतली.

घरात कुणीच नव्हते, तेव्हां वाटले की एकटीला खूप झोप घेता येईल. दुपारी डोळा लागला नाही तोच पोस्टमनच्या आवाजाने झोप उडाली. पत्र उघडून पाहिले तर ती महिला मंडळाकडून आलेली वर्गणीची पावती होती. रागाने तो कागद कचऱ्याच्या टोपलीत फेकून मी पुन्हा अंथरुणावर पडले. अजूनही हृदय धडधडत होते. पाणी प्यावेसे वाटले, पण घरात पाणी देणार कोण ? सुस्तपणे मी पलंगावर पडून राहिले. थोड्या वेळाने हृदयाची धडधड थोडी कमी झाली. जवळच्या टेबलावरून वर्तमानपत्र उचलून वाचू लागले. अपोलो अकरा पृथ्वीवर सुरक्षित पोहोचल्याचे वाचून मनाला जरा बरे वाटले. चंद्राच्या दिशेने जेव्हांपासून या लोकांचा प्रवास चालू झाला होता तेव्हांपासून अनेक विचार मन व्याकुळ करीत होते. हे लोक पृथ्वीच्या वातावरणाबाहेर गेले की नाही, चंद्राभोवती त्यांची प्रदक्षिणा सुरू झाली की नाही, चांद्रयानाचे सगळे भाग व्यवस्थित आहेत की नाहीत, चांद्रयान चंद्रावर उतरू लागले की नाही, हेच विचार क्षणोक्षणी त्रस्त करीत होते. सकाळी वर्तमानपत्राची आणि संध्याकाळी रेडिओवरील बातम्यांची प्रतीक्षा — रात्रभर तोच विचार — आणि वीस तारखेला तर झोप पार उडाली. चांद्रयान चंद्रावरून निघाले की नाही, कोलंबियाशी जोडले गेले की नाही, हा विचार अस्वस्थ करीत होता. शेवटी अर्ध्या रात्री अधीर होऊन वर्तमानपत्राच्या कार्यालयात फोन केला तेव्हां कळले की आताच ते कोलंबियाशी जोडले जाणार आहे. हे ऐकल्यावर थोडा दिलासा वाटला.

मग विचार येऊ लागले. परत येऊन पृथ्वीवर पोहोचण्याची शक्ती त्याच्यात आहे की नाही हाच विचार मनाला त्रास देऊ लागला. शेवटी ही व्याकुळता का ? या सगळ्यांशी माझा काय संबंध ? मनाला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण जगाच्या सगळ्या समस्या माझ्याच समस्या झाल्या आहेत. त्यामुळे झोप येत नाही. अपोलो प्रकरण संपले नाही तोच राष्ट्रपतींची समस्या उभी राहिली. रात्रभर मी इंदिरा गांधी आणि निजलिंगप्पा यांचाच विचार करीत राहिले.

दिवसभर मुलाकडून यावयाच्या पत्राची वाट पाहात वेळ निघून जातो. स्वयंपाक करताना आणि आरामखुर्चीवर बसले असताना प्रत्येक क्षणी त्याचाच विचार मी करीत असते. तो तर नेहमी स्वतःच्याच कुटुंबात बुडालेला असतो. आईबापांचा विचार करण्यासाठी त्याला वेळ कोठे आहे ? कधीकधी वाटते की मुलाजवळ जाऊन राहावे, पण ह्यांना ते पसंत नाही. त्यांच्या मोकळेपणात आपण दखल देता कामा नये. त्यांचे आचार विचार वेगळे आहेत, त्यांचे आमचे जमणार नाही, आपण येथेच राहिले पाहिजे— असे लांबलचक व्याख्यान हे देऊ लागतात. ह्यांना कसलीच काळजी नाही. हे आता रिटायर्ड झाले आहेत. घराचे भाडे मिळते आहे. मुलगा कधीकधी पैसे पाठवतो. मनात आले तर कधी काही लिहू लागतात—मासिकांसाठी लेख लिहिण्यात किंवा एखाद्या सभा समारंभासाठी व्याख्यान तयार करण्यात गर्क होऊन जातात. दिवसा कोणाला भेटायला जातात किंवा घरी बसल्या बसल्या काहीतरी लिहिण्यात तल्लीन होऊन जातात. पण मी मात्र कंटाळून जाते. मी स्वयंपाकही करू शकत नाही आणि रिकामे बसायलाही आवडत नाही. मग कसल्यातरी गोष्टींनी मी नेहमी त्रस्त होऊन जाते.

जेव्हा मी सुखाने झोपू शकत होते, तेव्हा माझ्या घरात मला कोणी झोपू दिले नाही. एकही दिवस सुखाने झोपू शकले नाही. अगदी छोटी होते तेव्हाचे तर काही आठवत नाही. पण जेव्हापासून थोडे फार समजू लागले तेव्हापासून पाहाते आहे. पहिलीत होते तेव्हा गाढ झोपेतून उठवून आई मला म्हणत असे, "ऊठ, ऊठ, शाळेत जायचं आहे, लवकर तयार व्हायचं आहे." माझी आई फार धार्मिक विचारांची होती. त्यामुळे स्वयंपाकपाणी सुरू करण्यापूर्वीच ती माझे स्नान, वेणीफणी सगळे संपवू पाही. त्यामुळे पहाट उजाडण्याआधीच ती मला

उठवत असे. उन्हाळ्याच्या दिवसांत रात्री झोप लवकर येत नसे आणि सकाळी जाग लवकर येत नसे. पण आईला कसली घाई असे कोण जाणे, तोंडावर पाणी शिंपडून ती मला उठवित असे. रविवारी न्हाण्याचा जो सोहळा चाले त्यामुळे त्या दिवशीदेखील उशिरा उठायची सवलत मिळत नसे. उन्हाळ्याच्या सुट्टयांपूर्वी जेव्हा सकाळीच शाळेत जावे लागे तेव्हा झोपभरल्या डोळ्यांनीच जणू मी शाळेत जाऊन बसत असे. परीक्षेच्या दिवसांत पुस्तक हातात घेताच मला झोप येई. अभ्यास करता करता मी झोपून जाऊ नये म्हणून वडील माझ्याजवळ बसून मला शिकवित असत. कडकडून येणाऱ्या जांभया आतल्या आत दाबत मला अभ्यास करावा लागे. मग सकाळ होताच किंवा सकाळ उजाडण्याआधीच मला अभ्यासासाठी उठवत. सुट्टयांमध्ये सुखाने झोपण्याच्या आशेने परीक्षेचे दिवस मी कसेतरी घालवी. पण काय होई कोण जाणे, सुट्टयांमध्ये लाख प्रयत्न करूनही झोप येत नसे. परीक्षेच्या दिवसात पुस्तक वाचायला सुरुवात केली की झोप येत असे. पण सुट्टयांमध्ये मासिके आणि कादंबऱ्या वाचण्यात वेळ कसा जाई ते कळत नसे. आई सारखी म्हणे, "आता झोप बेटा. अर्ध्या रात्रीनंतर कसलं वाचन चाललंय ?" कॉलेजात शेवटच्या वर्षी, जन्मात परीक्षेचे नाव घ्यायचे नाही अशी मी शपथ घेतली. आता रोज मी पाहिजे तेवढी झोपेन. घरी दादा आणि वहिनींचे उदाहरण मी पाहात होते. नऊ वाजले नाहीत की दार बंद करून ती झोपी जात. त्यावेळी त्यांच्या आनंदाची कल्पना नसल्याने माझ्या मनात विलक्षण खळबळ उडत असे. याच क्षणी लग्न करावे आणि रोज आरामात झोपावे असे मला वाटे. परीक्षेचे संकट आणि झोपेत व्यत्यय नसणारे जीवन आपणही मिळवायचे असा मी तेव्हाच निश्चय केला.

लग्न झाले, पण मला वाटले होते तसे आयुष्य मला लाभले नाही. पहाटेच उठावे लागे. अर्ध्या रात्रीपर्यंत प्रणयाच्या संसारात विहार करून मी थकून पडलेली असे तोच सकाळच्या दूधवाल्याचा आवाज यमराजासारखा वाटे. पेंगुळलेल्या डोळ्यांनी उठून प्रातर्विधी उरकून नंतर कॉफीपान, मोलकरणीचे येणे जाणे, स्वयंपाक करून ह्यांना ऑफिसात पाठवणे, स्वयंपाकघरातले सगळे आवरून आरामखुर्चीत पडायला अकरा वाजून जात. सकाळपासून माझी वाट पाहणारे वर्तमानपत्र वाचायला सुरुवात करताच पापण्या जड होत. डोळा

लागला न लागला तोच पोस्टमनची हाक किंवा भाजीपाल्याचा आवाज झोप उडवी. काहीच नसले तर शेजारची मुले उगीचच घंटी वाजवून पळून जात. कुणी तरी आले समजून दार उघडावे तर कुणीच दिसत नसे! दुरून फक्त मुलांचे खदखदून हसणे ऐकू येई.

मग दुपारी हे जेवायला येत. हे परत गेल्यावर एखादे मासिक किंवा कादंबरी हातात घेताच मघाशी उडालेली झोप मोठ्या आशेने परत येई. इतक्यांत 'आईसाहेब' असा मोलकरणीचा म्हशीसारखा आवाज ऐकू येई. जणू तिला माझे झोपणे पसंत नव्हते. मग संध्याकाळच्या चहाफराळाची व्यवस्था, पुन्हा स्वयंपाक, पुन्हा रात्रीचा प्रणय आणि अर्धवट झोप. आमच्या प्रणयाची लाट जरा ओसरली की बाळ जागा होई. तो दिवसभर आरामात झोपतो. रात्री आमच्याबरोबर खेळून दूध प्याल्याबरोबर लगेच झोपी जातो. पहाटे कोंबडा आरवण्याआधीच त्याची झोप संपते, आणि "ऊंऊं" करीत तो आपला आनंद व्यक्त करू लागतो. त्याच्या आनंदात मी सहभागी झाले नाही तर तो एकदम आरडाओरडा करून घर डोक्यावर घेतो. त्यामुळे चार वाजताच दिवा लावून त्याला अंगाई गीते म्हणत त्याचे मन रमवणे आवश्यक असायचे. सकाळी त्याला न्हाऊ घालून, दूध पाजून, तीट-पावडर करून पाळण्यात झोपवले की तो आरामात झोपून दहा-साडेदहा वाजता उठत असे. त्यावेळी घरातले कामधाम आटोपून थोडा आराम करण्याचा माझा प्रयत्न असे. त्याला खेळवावे असे खूप वाटे पण झोप मला काहीच सुचू देत नसे. त्याला जवळ घेऊन झोपण्याचा प्रयत्न मी करीत असे. पण तो साडीचा पदर ओढी, माझे केस पकडी, आपल्या चिमुकल्या पायांनी माझ्या पोटाला गुदगुल्या करी आणि माझ्या झोपेचे खोबरे करण्यासाठी जे जे शक्य असेल ते सगळे करीत असे. तो जरा मोठा झाला तरी सुखाने झोपायची संधी मला मिळाली नाही, कारण आता त्याचे शिक्षण सुरू झाले. सकाळी त्याला उठवून त्याला शाळेत पाठविण्याची तयारी करण्यासाठी मलादेखील सकाळी उठावे लागे. त्याचवेळी मला पुन्हा दिवस गेले. अशा प्रकारे दिवसेदिवस वाढत जाणाऱ्या कामांमध्ये झोपायला अजिबात वेळ मिळत नसे.

मुले मोठी झाल्यावर त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी वाढू लागली, बाळपणातल्या परीक्षेपेक्षाही कठिण वाटे. नेहमी मुलांची चिंता असे—कधी

त्यांना कॉलेजातून परत यायला उशीर झाला म्हणून काळजी तर कधी त्यांची प्रकृती बरी नाही म्हणून काळजी. मुलगा पहिल्या वर्गात उत्तीर्ण व्हावा, मुलगी चांगल्या घरी पडावी, मुलाला चांगली नोकरी मिळावी, लग्नासाठी पैसा कोठून आणायचा, मुलगी सासरी कशी राहील–अशी काही ना काही काळजी नेहमी असे. आता लग्नानंतर माझा मुलगा पहिल्यासारखा राहिलेला नाही. तो माझ्यापासून दूर जातो आहे. म्हणून मी व्याकुळ झाले. सूनबाईला अजून मूलबाळ नाही, ही चिंता आहेच. मी आजारी पडलेच तर माझी शुश्रूषा कोण करणार ? या वयातदेखील हे माझ्या सुखदुःखांचा कधीही विचार करीत नाहीत. इतक्या चिंता असल्यावर झोप कशी येणार ?

आता सगळी मुले मोठी होऊन त्यांनी आपापले संसार थाटले आहेत. त्यांना मुले असोत वा नसोत ती कोणावर अवलंबून नाहीत. इथे तर आम्ही दोघेच आहोत. हे नेहमी म्हणतात, "आता आपल्याला कसलीही काळजी नाही. वेळच्यावेळी जेवून सुखाने झोपत जा, नाहीतर रामनाम घेत आनंदात राहा." रामनाम मी किती वेळ घेऊ ? मी मोठमोठ्यांदा रामनाम घेऊ लागले तर ऐकणारे मला वेडी समजतील. मनातल्या मनात मी रामनाम घेतले तर रामापर्यंत माझा आवाज पोहोचेल की नाही याची शंका आहे. हा आवाज त्याच्यापर्यंत पोहोचला नाही तर मग हे सगळे श्रम कशासाठी ? शिवाय मला जिची नितांत आवश्यकता होती ती झोप त्यामुळे मला मिळाली नसती.

मग वेळ घालवण्यासाठी वर्तमानपत्रात छापलेल्या बातम्यांचा मी थोडा वेळ विचार करू लागते. मग तेच अपोलो अकरा, राष्ट्रपती, तेलंगण, वगैरे वगैरे–आणि झोप येत नाही. कधीकधी वाटते, आता सगळी मुले मोठी झाली आहेत, सगळ्यांचे स्वतःचे संसार आहेत, मी आता निश्चित होईन. पण ममता आणि मोह यांचे बंधन सुटत नाही. मनाला नेहमी त्यांचीच आठवण येते आणि ते त्यांचाच विचार करू लागते.

पण झोप तर येतच नाही.

कधी मी सुखाने झोपले आहे असे मला आठवत नाही. आयुष्यभर मी झोपेसाठी तडफडत राहिले. देव मला एकदाही सुखाने झोपण्याचे वरदान देऊ शकत नाही काय ? 'मला उठवू नका' असा बोर्ड लावून झोपायचा प्रयत्न करू म्हटले तर फोनची घंटी वाजेल किंवा शेजाऱ्यांचा मुलगा वर्तमानपत्र

नेण्यासाठी येईल नाहीतर भाजीवाला किंवा वर्तमानपत्रवाला येईल, रात्रीच्या वेळी शेजारच्या लहान मुलाचे रडणे ऐकू येईल किंवा कुत्र्यांच्या भुंकण्याने झोप नाहीशी होईल.

आता दोन तासांनी पहाटेचा कोंबडा आरवेल. कमीतकमी दोन तासही झोप झाली नाही तर सकाळी उठून घरातले काम करता येणार नाही. एक दिवस जरी आजारी पडले तरी सगळा हाहाकार उडेल. म्हणूनच आणखी एक गोळी घेणे बरे. आजच्या विचारांनी मला इतके अस्वस्थ केले आहे की दोनापेक्षा कमी गोळ्यांनी भागणार नाही.

अंथरूणावरून उठून कपाटाजवळ गेले आणि झोपेच्या गोळ्यांची बाटली आणि पाण्याचा पेला घेऊन आले. सावकाश बसून बाटलीतून एक गोळी काढायचा प्रयत्न केला तसे हात कापू लागले आणि सगळ्या गोळ्या उजव्या हातावर आल्या. झोपेच्या गोळ्या आहेत या !—यांच्यात झोप आहे, ती झोप मला हवी आहे. एकदा तरी सगळे भान विसरून झोपण्याची इच्छा झाली. पक्ष्यांप्रमाणे अर्धवट उघड्या डोळ्यांनी अर्धवट झोपून माझे समाधान होणार नाही. मला माणसासारखी झोप हवी आहे. जन्मभर मला कधी झोपच मिळाली नाही. आज ती मला मिळाली तर....

या कल्पनेनेच माझे मन उल्हासाने भरून गेले. या जगात झोपेपेक्षा अधिक सुख देणारी दुसरी कोणती गोष्ट नाही. आतापर्यंत हे सुख मी मिळवू शकले नाही. एकदाच का होईना मनसोक्त झोपले पाहिजे.

मग मनात एक विचार आला. उठून जवळच्याच टेबलावर ठेवलेला कागद घेतला, एका पुस्तकावर कागद ठेवून कापऱ्या हातांनी पेन्सिलीने त्या कागदावर लिहू लागले—

'अहो, घाबरू नका, मी झोपले आहे, दुसरे काही नाही. मी आत्महत्या केली आहे असे समजू नका. मी फक्त झोपण्यासाठी झोपले आहे.'

रिकाम्या बाटल्या

—स्माइल

के. जी. इस्पितळाच्या व्हरांड्यातून तो चालला आहे – बाहेरच्या फाटकाकडे. त्याचा चेहरा जुन्या ब्राऊनपेपरासारखा आहे. त्याच्या अंगावरचे फिकट निळे शर्ट त्याचे वाटत नाही. त्याची पँट पायजम्यासारखी सैल आहे, गुडघ्यांवर फुगे आलेली आणि मागच्या बाजूस खूप सुरकुत्या पडलेली. त्या पोषाखात पंचवीस वर्षांचा तो तरुण चाळीस वर्षांच्या अशक्त दुर्बल पुरुषासारखा वाटतो आहे.

अतिशय उदास होऊन हलके हलके तो बाहेर पडतो आहे. इस्पितळात त्याची आई आजारी आहे. हा आजार कोणता ते त्यालाही माहीत नाही आणि त्याच्या आईलाही माहीत नाही.

इस्पितळातून बाहेर पडून तो फाटकाशी उभा राहिला आहे. मागे इस्पितळ निस्तेज रोग्यासारखे दिसते आहे.

त्याने उजव्या हाताने खिशात चाचपडून पाहिले. त्याच्या हातांना दहा पैशांचे एक आणि पाच पैशांचे एक अशी दोनच नाणी लागली. गढूळ पाण्यात बेडकाची पिले पडून राहावीत, तसे हे पैसे खिशात दडून बसले आहेत.

मी पंधरा पैशांचा धनी आहे. आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या किमती असणाऱ्या या विशाखापट्टणमध्ये माझी किंमत फक्त पंधरा पैसे आहे. या पंधरा पैशातून मला फक्त एक रिकामी बाटली खरेदी करायची आहे. छातीवर उजवीकडे खाजगीत ती नर्स म्हणाली, "बाटली आणली नाही ? घेऊन या. औषध घालून देते." "तुमच्याजवळ असेल तर. . ." मी हसून बोलू लागलो, तशी ती उसळून म्हणाली, "मला बाटल्या विकणारी समजलात काय ?"

अरे, तंग तुमानीतल्या डॉक्टरच्या पोरा ! तू बघताबघता आरामात डॉक्टर झालास. तुझ्याजवळ पैसा आहे, माझ्या जवळ नाही. तुला सुखे मिळाली आहेत आणि मला दुःखे ! मी गरीब आहे. मला समजू लागले तेव्हांपासून, गेली वीस वर्षे मी गरीब आहे. माझे वडील गरीब होते. आजोबादेखील गरीब असतील

आणि त्यांचे आजोबासुद्धा.

ए, कुत्र्याबरोबर मोटारीतून फिरणाऱ्या नखरेल पोरी ! तुझा कुत्रा मोटारीतून बाहेरच्या लोकांकडे काय रुबाबात पाहातो आहे ! जा ! जा! तुझ्या कुत्र्याला रस्त्यावरची कुत्री कुत्र्यांसारखी दिसतच नसतील मुळी.

जा, पोरी, चालती हो !

त्या लीला थिएटरमध्ये जा.

इंग्रजी चित्रपट पाहा !

भवानीमाते ! तू कोण आहेस ? कुठल्या मोहल्यात राहातेस ? कोणत्या गलिच्छ वस्तीत कुठल्या झोपडीत राहातेस तू ? काटेरी झाडाप्रमाणे तुझे केस असे पिंजारलेले का ? धुराने भरलेले हे डोळे काय पाहाताहेत ? माते, तुला कसले दुःख आहे ? तू तुझी कहाणी सांग. तुला आई-वडील नाहीत काय ? पती नाही ? मुलाबाळांची चिंता आहे की नाही ? अशी जाऊ नकोस. अर्धभरल्या घड्यासारखी जाऊ नकोस. बेसूर संगीतासारखी रडू नकोस.

अग डुकरिणी ! इस्पितळात फेरा मारून येते आहेस काय ? कुठल्या कोनाकोपऱ्यात जाऊन आलीस ? कुठले उकिरडे फुंकून आलीस ? त्या उकिरड्यांची सुद्धा गोष्ट सांग ना. अपचन कोणाला झाले? पटकी कोणाला झाली ? अतिसार कोणाला झाले ?

बोल, डुकरिणीच्या पोरी ! बोल !

तुझ्या गोष्टी कोणतेही मासिक छापणार नाही ?

अग डुकरिणीच्या पोरी, कॉलेज गर्ल ! मारू नकोस. शिरा ताणू नकोस. काल परवाच तुझ्यासारखी एक पोरगी, तिकडे लक्ष्मी टॉकीजवळ एक रुपया घेऊन, गाल रंगवून, मान वेळावीत, सांगत होती—रोग नसणाऱ्या रेवतीचा पत्ता प्रत्येक रिक्षावाल्याला माहीत आहे.

शीः ! रांडे ! रोगांचे माहेरघर आहेस तू! त्या दिवशी कंपाउंडर म्हणत होता, "इंजेक्शन टोचताना ओरडतोस, त्या दिवशी कुठं गेली होती अक्कल?" "अरे रोगांच्या राज्यात फिरणाऱ्या माणसा ! काय करू ? दुखणं विकत घ्यावं लागतंय."

तो इस्पितळाच्या फाटकाजवळच उभा आहे.

फाटकाजवळ कुष्ठरोग्याच्या कातडीसारखं आकसलेलं टेबल आहे. त्यावर

रंगीबेरंगी रिकाम्या बाटल्या ठेवल्या आहेत–विक्रीसाठी ! या टेबलाजवळच लहान भजी, शिळी इडली, सुकलेल्या मोसंब्या या सगळ्यांवर घोंगावणाऱ्या माशा आहेत.

या मेजामागे इस्पितळाच्या भिंतीला लागून वाहाणारे गटार आहे. त्यातून सडकेपासून वारभर खाली काळ्या शाईसारखे घाणेरडे पाणी वाहाते आहे–कचऱ्याचा दुर्गंध असणारे पाणी ! या नाल्याजवळ सात-आठ वर्षांच्या दोन मुली आणि दहा वर्षांचा एक मुलगा आरामात प्रातर्विधी उरकताहेत. आपसांत ते एकमेकांच्या लघवीच्या धारेची काटकाटी खेळताहेत. त्यांच्याजवळच एक म्हातारे कुत्रे आणि डुकराची चार पोरे कचराघाण खाताहेत.

इस्पितळाच्या फाटकासमोर पलिकडच्या बाजूस हॉटेल, बेकरी, दुकाने, रस्त्यावर थांबलेल्या मोटरी, स्कूटर्स, सायकली, स्थानिक बसेस वगैरे दृश्य दिसते आहे. जाणाऱ्या लोकांपैकी कांही जण ऐटीत न अडखळता जात आहेत, तर काही लोक घाबरत घाबरत पावले टाकीत आहेत.

रिकाम्या बाटल्यांकडे नजर जाण्यापूर्वीचे हे सगळे दिसले. "रस्त्यावर घाण टाकू नका, घाणच सगळ्या रोगांचे मूळ आहे !" कोण म्हणाले होते हे ? गांधी ? नेहरू ? की इंदिरा गांधी नेहरू ? कोण म्हणाले ?

घाणीला रस्ता बनवू नका, रस्ताच सगळ्या रोगांचे मूळ आहे–किंवा रोगच] सडकेचे मूळ आहे !

यासाठी–सडकेपासून घाण तयार करा आणि घाणीतून सडक तयार करा !

बोला, लोकहो, बोला] !

'काय साहेब, बाटली पाहिजे ? या, साहेब, या. फक्त सहा आणे !

फाटकाच्या उजव्या बाजूला एक स्त्री–ब्लाउझ न घातलेली, फक्त साडीच नेसलेली तीस वर्षांची युवती–लोकांना प्रेमाने बोलावीत उभी आहे.

आणि तो–

पदराआड दोन वर्षांच्या वैधव्यात, दहा-पंधरा वा त्याहूनही जास्त माणसांच्या वीस पंचवीस हातांच्या शेदीडशे बोटांनी सक्तीने मजेत दाबलेल्या, कुरवाळलेल्या, कुस्करलेल्या आणि आणखी काय काय केल्या गेलेल्या वक्षस्थळांना जरा ओघळलेले असूनही] सुंदर आणि टंच दिसणाऱ्या उरोजांना–

नजरेने कुरवाळीत, न्हाऊ घालीत त्या महिलेकडे जातो आहे.

"राम राम !" सकाळपासून बसले आहे, पण कोणी बाटल्या घ्यायला आलंच नाही. सहा आणे सांगितल्यावर कमीत कमी चार आण्यांत हा साहेब एखादी तरी बाटली घेईलच. चार आण्यातून धाकट्या बहिणीसाठी कॉफी विकत घेता येईल, तो रांडलेक रंगन्ना रात्रभर छाती ओरबाडून कुत्र्यासारखा चाटून चाटून फक्त दोन रुपये देऊन गेला. पुन्हा अर्ध्या तासानं येऊन सांगू लागला. "पॅडी, पोलिस आलेत. ते दोन रुपये दे. मग बघू." झालं. पैसे घेऊन निघून गेला. वाटलं होतं, दोन रुपयांत बहिणीसाठी एक ब्लाउझ आणि एक रिब्बन घेईन. तीसुद्धा दिसायला किती छान आहे. ती मोठी होऊन शिकून ...शी ....हे काय आयुष्य आहे...राणीसारखी राहील. सिनेमातल्या नटाशी लग्न करून जमुनासारखी राहील. आता कुठं ती अकरा वर्षांची आहे. पण कधी कधी विचारते "ते रंगन्नासारखे लोक रात्री कशाला येतात ताई ? तिच्या कल्याणासाठी, जगातली कुत्री आणि डुकरं यापासून तिला वाचण्यासाठी मी रोज ही मरणं मरते आहे, हे तिला काय माहीत ? दारुचं दुकान उघडायचं म्हटलं, तरी त्यासाठी आधी पैसा पाहिजे. दुकान चालवण्यासाठी अक्कल पाहिजे. पोलिस तर कुत्र्यासारखे पहारा करीत असतात. संकट टाळायचं, तर पैसा फेकायला हवा ! त्या कटकटींच्या नरकापेक्षा हे शरीर विकून जगणं बरं ! कोणीतरी भेटेलच भेटेल !...संधी साधून कोणाला तरी गुंतवायचंय्. शरीरातला जोम निघून गेला की कोणी मग जवळ येणार नाही.

"या साहेब, या. ही बाटली पुरे ? की यापेक्षा मोठी पाहिजे ? येऊन पाहा."

"सहा आणे...ही रिकामी बाटली...अग बिनब्लाउझवाल्या बये—हिचे सहा आणे ? तू दिसायला सुंदर म्हणून तुझ्याकडे आलो, तर सहा आणे मागतेस ? माझ्याजवळ पंधरा पैसे आहेत...मी पंधरा पैशांचा राजा आहे. ...पंधरा..."

"पंधरा पैशात देणार ? एवढी मोठी नको. याहून छोटी चालेल."

"चार आणे पडतील, साहेब. एक पैसा कमी नाही."

"साहेब, इकडे या. माझ्याजवळ आहे, दोन आण्यात मिळेल. मोठी बाटलीच घ्या." फाटकाच्या डाव्या बाजूने आणखी एका बाईचा आवाज...जुनी पुराणी साडी...अंगावर ब्लाउझ नाही...काळी, हाडकुळी बाई !..

"चवली, मला चवली पाहिजे. सकाळपासून चहा प्यायले नाही. घरात फक्त बारा आणे होते ते तो रात्री घेऊन गेला. कुठं गेला, अजून पत्ता नाही. पोरगा-पोरगी कुठल्या तरी बस स्टँडवर भीक मागून खात असतील. ती गाणं म्हणते आणि तो डफ वाजवतो. खेळायच्या दिवसांत भीक मागून जगताहेत, साहेब. ती लहानी पोरगी दगडाधोंड्यात जमिनीवर झोपली आहे. तिच्याकडे बघा—आकाशाकडे काहीतरी मागितल्यासारखे ती हातपाय उडवते आहे—तळमळते आहे. साहेब, या लेकराला दूध पाजायला माझ्या अंगावर दूधसुद्धा नाही. छाती अगदी सुकून गेली आहे. ही रबरासारखी छाती चोखते. या छातीतून आता काय निघणार ?...फक्त आईचं दुःख निघेल !...मला एक चवली पुरे...चहा पिण्यासाठी...तेवढाच आधार होईल...साहेब, जगणं मोठं कठीण झालंय. एखाद्या घरी मोलमजुरी करीन म्हणते, पण कोणी कामावर ठेवीतच नाही. जीव तर सगळ्यांनाच प्यारा आहे, साहेब. जगण्यासाठी माणूस वाटेल ते करील. तिकडे पॅंडीकडे पाहा, ती शरीर विकून जगते. पण माझ्याजवळ तेही नाही. तिचा नखरा माझ्याकडे नाही. दुसरा काही रस्ता नाही. म्हणून मी बाटल्या विकते. तो आहे नं ?...माझा घरवाला... पितो आणि मारतो ! रिक्षावर त्याला काय मिळतं ते त्याला माहीत, देवाला माहीत किंवा त्या दारुवाल्याला माहीत ! पोरं भुकेनं तडफडताहेत, साहेब!"

नूकालम्मा या विचारांच्या पुरात वाहात चालली आहे.

चवली सांगतो. बाकीचे तीन पैसे कशाला वाचवायचे ? पंधरा पैसे देऊन घेऊन टाकू बाटली !

"बरं, दाखव बाटली," असे म्हणत तो फाटकाच्या उजवीकडे वळला.

"हीच आहे साहेब, हीच."

"साहेबांनी बाटली घेतली—पंधरा पैसे देऊन तीन पैसे आणखी दिले."

"औषध आणण्यासाठी ही रिकामी बाटली आणि अंगावर हे मळके कपडे...हाचमी आहे."

"आई मोसंबी किंवा द्राक्षं आणायला सांगेल की काय, कोण जाणे !"

नाही, नाही सांगणार !

आईला माहीत आहे, हे सगळं विकत आणण्यासाठी माझ्याकडे पैसे नाहीत म्हणून. तेव्हा ती असल्या काही वस्तू मागणार नाही. मग त्याशिवाय प्राण

गेला तरी ती मरायला तयार होईल !

आई, तू मरून जा !

समृद्ध भारतात मरून एखाद्या स्वर्गात वा नरकात जाऊन मुक्तपणे गा–

जाऊ कुठेही दुसऱ्या देशी
मातृभूमीचा मान उंचवू ।

गा, आई, गा.

इस्पितळाचे अंगण त्याला एखाद्या राक्षसाच्या विशाल जबड्यासारखे भासले. नर्सेस, रोगी, डॉक्टर हे सारे किड्यांसारखे दिसले.

त्याच्यामागे – फाटकाजवळ–

पॅडी: नूकालम्मा, तू हे काय केलंस, रांडे! माझी बाटली विकली नाही आणि तू निघाली मोठी विकायला. चवलीला दिलीस, मोठी अन्नपूर्णा बनून. तो माझ्याकडे येत होता. चवलीचं आमीष दाखवून बाटली विकलीस. नालायक !

नूकालम्मा : काय बकतेस पॅडी ? पुन्हा म्हणशील तर थोबाड रंगवीन दात पाडीन. . .तू भाव कमी केलास, तर जमीनदारसुद्धा ढिला पडेल. मला रांड म्हणते. . .सगळी दुनिया तुला रांड म्हणते !

पॅडी : काय म्हणालीस ? मी रांड आहे ? रांड तू आहेस. तुझी आई रांड आहे, तिची आईसुद्धा रांड आहे आणि तुझी पोरटीसुद्धा रांड निघेल !

(पॅडी संतापून नागीण बनली. नूकालम्माजवळ जाऊन तिने तिच्या गालावर एक लगावून दिली.)

नूकालम्मा : अग सटवे ! साडी ओढतेस ? अग सोड ना, थांब ना ! पॅडी ! पॅडी! तुला लाज वाटत नाही. . .साडी . . .फेडू नकोस. हाय रे हाय ! साहेब लोक मुकाट्यानं बघताहेत. पाहा साहेब ! माझी साडी फेडते आहे. . .साडी !

(नूकालम्मा खाली पडली आहे, आणि हातांनी साडी सावरीत सगळ्यांना विनवते आहे.)

साहेब ! साहेब !

(आता ती साडी सोडून दोन हात टेकून उभे राहाण्याच्या प्रयत्नात आहे. इतक्यात पॅडीने तिला धाडकन खाली पाडले आणि पुन्हा साडी ओढायला सुरुवात केली. . .सर सर सर . . .)

साहेब ! . . .सा . . .साडी . . .अग डाकिणी ! किती हलकटपणा केलास, पॅडी . . .हे काय . . .हे काय . . .

अरे, माझी साडी गटारात फेकते आहे. पॅडी, हात जोडत्ये . . . . . .!

(हाय, माझी साडी गटारात फेकून दिली. आता माझ्या अंगावर साडी नाही. हाय . . .इतके लोक . . .पुरुष . . .बायका . . .सगळे माझं नागवं शरीर पाहाताहेत.)

थांब रांडे ! आता बघ मी काय करते ते !

(नूकालम्माने पॅडीच्या हाताला आपल्या दातांनी चावून जखम केली.)

पॅडी : अग डाकिणी, केवढी चावलीस !

नूकालम्मा : तू माझी साडी फेडलीस नं !

(नुकालम्माने पॅडीची वेणी डाव्या हाताने पकडून उजवा हात तिच्या पोटात खुपसून जरा खाली वाकून तिची साडी वर उचलली, आणि ओढायला सुरुवात केली. साडी पूर्ण फिटली नाही, तशी तिने पॅडीवर झडप घालून तिचा पदर खेचायला सुरुवात केली आणि दंडाला कडकडून चावून भरंकन साडी फेडून फेकून दिली—रवी घुसळून लोणी काढावे तसे.)

'आता बोल, कसं वाटतं, रांडे ?'

पॅडी : बापरे ! वेड्या कुत्र्यासारखं चावली ही. किती रक्त येतंय. पॅडीची साडी नूकालम्माने गटारात फेकून दिली, पण ती तिथे पडली नाही, बाजूला डुकरांच्या घाणीवर जाऊन पडली

पॅडी तशीच नागव्या शरीराने नुकालम्मावर तुटून पडली.

दोघींची झटापट सुरू झाली, धक्काबुक्की झाली. मध्ये जरा उठून पुन्हा त्या खाली पडल्या . . .वरखाली . . .खालीवर . . .गडगडू लागल्या.

नूकालम्मा एकदम उठली आणि हात सोडवून घेऊन पळून गेली

गटारात न पडलेली पॅडीची साडी, कावळा साबणाचा तुकडा उडवून नेतो तशी तिने उचलली.

"मर, पॅडी, मर. माझी साडी तू गटारात फेकलीस नं ! बघ, आता तुझी घेऊन जाते. तू अशीच नागव्यानं इथंच मर. रांड !"

नूकालम्मा धावू लागली. मांड्यांमध्ये साडी धरून ती पळत सुटली.

हा सगळा प्रकार पाच मिनिटांत घडला.

खाली पडलेली पॅंडी एकदम उठून बसली. आपली साडी घेऊन पळणाऱ्या नूकालम्माला पकडण्याचा तिने प्रयत्न केला, पण ती विजेच्या वेगाने अदृश्य झाली

त्या स्थितीत–

तसे उघड्या देहाने तिथे उभे राहाणे पॅंडीला भयंकर वाटले. तिला अतिशय वाईट वाटले. डोळ्यांतून अश्रूंचा सागर उसळून बाहेर आला. तशीच ती पडून राहिली. असती, तर बरे झाले असते. तिने उठून फार मोठी चूक केली. तशीच जमिनीवर पोटावर पडून राहिली असती, तर बरे झाले असते. कोंबडी पंखाखाली आपल्या पिल्लांना लपवते, तसे तिने हातांनी छाती झाकून घेतली. मग तेच हात मांड्यांवर, आणि मग मांड्यांमध्ये ठेवून वक्षस्थळांना तिने वाऱ्याशी झुंजायला मोकळे सोडून दिले. मग एका हाताने छाती व दुसऱ्या हाताने मांड्यामधला भाग झाकण्याचा प्रयत्न करीत ती इकडे तिकडे पाहू लागली. तर . . .

माणसे, माणसे, माणसेच माणसे तिला दिसली–जिकडे पाहावे, तिकडे माणसे.

आणि त्यांची डोकी डोकी डोकी डोकी

डोक्यांचा समुद्र . . . डोक्यांचा समुद्र . . .

त्यांच्या डोळ्यात लालसेचे काटे–

बेफाम झालेले काटे !

तिने फेकून दिलेली नूकालम्माची साडी, गटाराची लाज झाकण्यासाठी गटारावर पसरली आहे–काळेकुट्ट, मंद आणि घाणेरडे हास्य करीत.–

ती साडी बाहेर काढायची, तर बरेच खाली उतरावे लागल . . . गटारात वारभर आत . . . असंख्य डोळे तिला तेव्हा पाहातील . . . दया करणारे, प्रेम करणारे, आग भडकवणारे, पाया पडणारे, विकत घेणारे, टोचणारे, कुरवाळणारे, चुंबन घेणारे . . . असे नाना डोळे–

मला–

स्त्रीला–

नखरा करणाऱ्या स्त्रीला पाहातील. भांडणाच्या भरात मी स्त्री आहे, हे मी पार विसरून गेले . . . ही अक्कल तेव्हा सुचली असती–किंवा या लोकांनी

माझ्या उघड्या शरीरावर छड्या मारल्या असत्या तर...

हाय हाय ! बापरे ! मी बाई आहे आणि माझ्या शरीरावर कपडा नाही. पावसातल्या गाईसारखी या सडकेच्या मधोमध उभी आहे मी ! इतक्या लोकांदेखत मी नाना प्रकारांनी बदलून चुकल्ये आहे. अरे देवा ! तू मेला आहेस की कुठं मसणात भटकतो आहेस. आभाळ फाडून ये आणि माझी लाज राख ! तुझ्या कृपेसाठी मला पांडवांची बायकोच व्हायला पाहिजे काय रे ? देवा रे ! माझी छाती झाक. हे सगळे पुरुष माझ्या काखांकडे पाहून वाटेल ते बेंकताहेत, बेंबीखाली, मांड्यांच्या मध्ये न जाणे किती डोळे घुसलेत—चिखलात पाय घुसावा तसे ! अरे कारट्या ! तुझी बहीण अशी नागवी उभी राहिली तर तू असाच बघत राहाशील काय ? तुझी आई अशी तडफडली, तर तू उभा राहू शकशील का ? ए माई, तू अशी पुरुषांमध्ये उभी राहू शकशील ? पावलीसाठी, फक्त एका पावलीसाठी मी आणि चवलीसाठी नूकालम्मा आम्ही दोघी आपल्या साड्या गमावून बसलो.

साहेब, आम्ही स्त्रिया आहोत, हे आम्ही विसरूनच गेलो—अहो रूबाबदार साहेब ! ऐटबाज बूट घातलेले साहेब ! तुमच्या बायका सदा रेशमी नायलॉनच्या साड्यात गुंडाळलेल्या असतात, चवली-पावली फेकली किंवा हरवली, तरी त्याचे त्यांना काही वाटत नाही. हसण्यावारी नेतात. साहेब ! आईसाहेब ! अरे, हे तर पोलिस उभे आहेत. पैशासाठी प्राण टाकणाऱ्या समजून आमच्याकडे पाहात हे खुशाल बिडी पीत उभे आहेत. वाईट काम अडवून चांगलं काम करायला लावणं हे तुमचं काम आहे ना ? न्यायाचे रक्षण करणारे आपण सगळे लोक ना ? मग हे सगळे पाहून आपण गप्प कसे ? साहेब, मी वेसवा आहे, शरीर विकून जगणारी आहे, भाड्याची सायकल आहे, अंधारात लाजलज्जा, साडी सोडणारी रांड आहे, सगळ्या रोगांच्या जंतूना शरीरात साठवून ठेवणारी बाई आहे मी !

तरीदेखील मी स्त्री आहे.

साहेब ! मी स्त्री आहे !

आपण सर्वांनी माझे शरीर पुरेपूर पाहून घेतले आहे. डोळ्यांना दारूची मडकी बनवून आपण माझी लाज आणि अब्रू पिऊन टाकली आहे. आता जगण्यात काय अर्थ आहे ? "होय, जगण्यात काय अर्थ आहे ?"

पॅडीला हे सगळे भडभडून बोलावेसे वाटत होते. आकाश कोसळेल आणि धरणी दुभंगेल असा आक्रोश तिला करावासा वाटत होता. पण बाटलीचे तोंड बुचाने बंद करावे, तसा तिचा आवाज लज्जा आणि अब्रू यांनी बंद करून टाकला होता. पॅडी ओरडू शकली नाही. पण—

इस्पितळासमोरच्या उताराच्या रस्त्यावरून स्थानिक बस येत होती, इतक्यात—

किनाऱ्यावर बराच वेळ तडफडून, तळमळून शेवटी अचानक पाण्यात उडी घेणाऱ्या मासोळीप्रमाणे—

बसच्या समोरच्या चाकांपुढे तिने झेप घेतली—

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भयाने आणि आश्चर्याने हाहा:कार उडाला—

पाण्याने भरलेला ग्लास फुटल्यावर पाणी सगळीकडे सांडते, तसे पॅडीच्या शरीरात वाहाणारे जिवंत रक्त विनाकारण आणि कोणत्याही हेतूशिवाय रस्त्यावर सरकन पसरले.

त्यावेळी त्या रक्ताने धरित्रीला कोणती करूण कहाणी सांगितली, डोक्याबाहेर आलेल्या कवटीने मातीत लोळण घेत कसला विचार केला, ढोपराबाहेर आलेल्या हाडाने बसच्या समोरच्या चाकाला कोणती दिशा दाखवली, आणि निष्प्राण डोळ्यांनी कोणाकोणाला मृत्यूशाप दिला—

संथपणे वाहाणाऱ्या वाऱ्याला, धूलिकणांना, हिरव्या वृक्षांना, रखरखत्या उन्हाला, दूरवर गरजणाऱ्या सागराला आणि पॅडीवरच्या आकाशरूपी समाधीला हे सगळे माहीत असले पाहिजे, किंवा माहीत नसण्याचीही शक्यता आहे.

एक लाख

—वीराजी

एक वाजायला आला आहे....

बाहेर ऊन भाजून काढते आहे आणि चक्रपाणी ज्या कचेरीत काम करतो आहे तिथला उकाडा हैराण करतो आहे.

आणि चक्रपाणीच्या पोटात अर्धा तासापासून कावळे कोकलत आहेत.

जेवणाची सुटी होती, सगळ्या कचेऱ्यात...

लहान मोठ्या डब्यातून, पुड्यातून आणि रंगीबेरंगी ग्लासमधून घरून खाण्या-पिण्याच्या वस्तू आणणारी मंडळी डबे उघडून भराभर जेवत आहेत. मधूनच बाहेरच्या उन्हाचा विचार येताच उष्ण श्वास टाकून ते आपला थकवा व्यक्त करीत आहेत.

समोरचे हे दृश्य पाहात... वीस वर्षांची नोकरी आणि चव्वेचाळीस वर्षांचे वय असणारा चक्रपाणी...दोन तीन मिनिटांपेक्षा जास्त वेळ आपल्या जागेवर बसू शकला नाही.

"बसून चालणार नाही. बाहेर जाऊन पोटात काही तरी घातले पाहिजे." असे म्हणून तो बाहेर निघून गेला.

कचेरीतल्या उकाड्यातून निघून चक्रपाणीने बाहेरच्या उन्हात पाऊल टाकले.

रस्त्याच्या पलीकडे कॉफीपानगृह आहे आणि त्याच्या जवळच नागय्या अँड सन्सचे पानाचे दुकान आहे.

उन्हात भराभर पावले टाकीत चक्रपाणी पलीकडच्या फूटपाथवर गेला.

कॉफी हाऊसला नवीन रंग दिला आहे, काचेच्या भिंती आहेत आणि दाराशी गरम पदार्थांचा बोर्ड लागला आहे.

नागय्या अँड सन्सच्या पानाच्या दुकानात टबमध्ये गरम पाण्यात "शीत पेये" ठेवलेली आहेत. त्यांचे सेवन करण्याइतपत ज्यांचे खिसे गरम आहेत ते लोक ती पेये गरम असल्याचे कळूनही पीत आहेत.

बाहेरच्या उन्हाइतकीच चक्रपाणीच्या पोटाची भूकही कडक झाली आहे.

गरम पदार्थांचे बोर्डावर...काळ्या बोर्डावरील पांढरी अक्षरे...इडली-सारखी अक्षरे ... कॉंक्रीटच्या रस्त्यावरील उन्हाप्रमाणे झगमगत आहेत.

इडली...चार आणे

(चटणीदेखील देत नाही आणि सांबाराचे दहा पैसे वेगळे मागतो. या विचाराने चक्रपाणी खिन्न झाला.)

कॉफीदेखील...चार आणे

साधा डोसा...तो देखील चार आणे

सिंगल वडा...पंधरा पैसे

बाकीचे पदार्थ चक्रपाणीला अनावश्यक वाटले.

नागय्या घामाघूम होऊन काम करीत आहे. अन्नछत्रात मांडलेल्या पत्रावळीं-प्रमाणे विड्याची पानें वेगवेगळी ठेवून रंगीत बाटल्यातून तो त्यांचेवर काही पदार्थ शिंपडीत आहे.

चौधरीजी, सिगरेट द्या ...नागय्याजी पान... नागय्याजी, पान... लोक ओरडत आहेत....नागय्या सावकाश सगळ्यांचे ऐकतो आहे आणि सावधपणे हिशेब करीत पैसे घेतो आहे.

"मीठा पान दहा पैसे"

"सिगरेटचे आणखी पंधरा पैसे"

चक्रपाणीच्या अमेरिकन टेरिलीनच्या शर्टला दोन खिसे आहेत आणि पांढऱ्या ड्रिलच्या पॅंटला तीन.

टेरिलीनच्या शर्टची कॉलर घामाने खराब होऊन लवकर फाटून जाऊ नये म्हणून चक्रपाणीने कॉलरच्या आत ठेवलेला हातरुमालदेखील ओलाचिंब झाला आहे.

सगळ्या खिशातले पैसे एकत्र करून चक्रपाणीने मोजले तेव्हा आपल्याजवळ त्रेपन्न पैसे असल्याचे त्याच्या लक्षात आले.

पुन्हा मोजले ... तरीदेखील त्रेपन्नच.

इडली, कॉफी, पान आणि सिगरेटी यांचाही हिशेब केला.

कसाही हिशेब केला तरी एका पैशाचाही फरक पडत नव्हता. मग अकाऊंटंट चक्रपाणीने बेरजेऐवजी वजाबाकी सुरू केली.

त्याचवेळी कामात गर्क असलेल्या नागय्याने चक्रपाणीकडे पाहून विचारले,

"काय साहेब आज कॉफी नाही घेतली ?"

"नाही. आज पोट जरा बरं नाही." बेरीज वजाबाकीत गुंतलेल्या चक्रपाणीने उत्तर दिले.

नागय्या अँड सन्सच्या पानाच्या दुकानावर तोरणाप्रमाणे बांधलेल्या दोरीवर टांगलेली अर्धनग्न फिल्मी चित्रे पानडाप्रमाणे वाळलेली वाटतात. चक्रपाणीने त्या चित्रांकडे दयार्द्र दृष्टीने पाहून आपल्या यादीतून कठोरपणे इडली वजा केली.

कॉफी प्यायलाच हवी, त्याशिवाय काम होणार नाही. नाही तर दुपारी साहेबापुढे प्रत्येक अक्षर चुकीचे लिहिले जाईल आणि ३+२=४ अशी अवस्था होईल.

शिवाय सिगरेटही आवश्यक आहे. प्रत्यक्ष ब्रह्मदेवही ती या यादीतून काढू शकणार नाही. आणि मीठा पान ?

नागय्या मोठ्या आदराने बोलला. पान घेतले नाही तर त्याला फार दु:ख होईल. आपण कंजूषपणा करतो आहो असे त्याला वाटेल. तेव्हा सिगरेट आणि पान तर घ्यावेच लागेल असा चक्रपाणीने निर्णय घेतला.

गळयातला भिजलेला रुमाल काढून त्याने तोंडावरचा घाम पुसला. त्रेपन्न-पैशांत लहान, भूक, सन्मान, अभिमान आणि अधिकार खरेदी करण्याचा निश्चय करून चक्रपाणीने शेवटच्या झुरक्यापर्यंत सिगरेट ओढली. आणि ती जळत ओठांपर्यंत आल्यावर फेकून दिली. मग तो कॉफी क्लबमध्ये शिरला.

पाचही खिशांतले पैसे त्याने एकत्र केले.

आता अशाने भागणार नाही. असे किती दिवस चालेल ? काही तरी केलेच पाहिजे. नोकरी सोडून प्रॉव्हिडंटफंडाच्या पैशांतून मीठ मिरचीचे दुकानच उघडले पाहिजे.

चारेक माणसं. . .ओळखीचे लोक. . . अलिकडेच दुसऱ्या विभागात कारकून म्हणून आलेले दोन चार ओळखीचे लोक चक्रपाणीला पाहाताच अर्धवट खाल्लेला डोसा तोंडातून काढून त्याला नमस्कार करू लागले. सर्वर रंगय्या मोठ्या नम्रपणे विचारतो आहे. . . "साहेब, गरम गरम इडली आणू का ?"

चक्रपाणी रुबाबात हसला. रंगय्या वयाने लहान आणि गरीब मुलगा आहे. स्टेटसच्या दृष्टीने त्याचे स्थान फार हलके आहे हा त्या हसण्याचा अर्थ

होता. जिभेचे चोचले रंगय्यासारख्या मुलांना ठीक आहेत. नव्याने पदवी घेत-लेल्या ... ज्यांना अद्याप पत्नी नामक जीवन सहचारिणी लाभलेली नाही अशा नव्या कारकुनांच्या दृष्टीने ते स्वाभाविक आहे. पण जीवनाच्या मंथनात सक्रीय भाग घेणाऱ्या माझ्यासारख्या अनुभवी व्यक्तींच्या बाबतीत हे अशक्य आहे, प्रतिष्ठापूर्णही नाही. हा होता त्या हसण्याचा अर्थ.

"नाही रंगय्या, आज घरात वाजवीपेक्षा जास्त खावं लागलं आहे... बरीच पक्वान्नं झाली होती. तू जाऊन गरम गरम स्ट्राँग कॉफी घेऊन ये, साखर जरा कमी टाक." चक्रपाणीने म्हटले.

"ऑल राईट" असे म्हणून रंगय्या निघून गेला.

काही क्षणापूर्वीच चक्रपाणीच्या मनात मीठ मिरचीचे दुकान काढण्याचा जो विचार आला होता त्याबद्दल त्याची त्यालाच लाज वाटू लागली. आणखी कमीत कमी पंधरा वर्षे तरी राहील अशा अकाऊंटंटच्या स्टेटसवर केवळ इडली खाण्याच्या मोहापायी त्याने पाणी सोडावे काय ?

शिपाई, टाईपिस्ट, कनिष्ठ कारकून यांच्यापासून मॅनेजर रमाकांतपर्यंत सगळे लोक त्याच्याशी मोठ्या आदराने वागतात.

चक्रपाणीने मान वर करून पाहिले. समोर प्रोपायटर पकोडीराव आपल्या खुर्चीत बसून हिरवे पिवळे दात दाखवीत हसतो आहे. याचा अर्थ समोर बसलेल्या चक्रपाणीचे तो स्वागत करीत आहे.

चक्रपाणीने देखील रुबाबत हसून त्याला उत्तर दिले. पकोडीराव त्याच्या-कडे इतक्या आदराने का पाहातो ? आता मनातदेखील स्वतःला पकोडी-रावच्या रुपात पाहायचे नाही असे त्याच्या मनात आले. पण पकोडीरावचे पूर्वीचे नाव कुबेरन आहे, ही गोष्ट कोणाच्या लक्षात राहात नाही.

रंगय्या कॉफी घेऊन आला... जवळच दुसऱ्या ग्लासात थोडे डिकॉक्शनही त्याने ठेवले. खिशात त्रेपन्न पैसे, पोटात सोळा इडल्यांची भूक आणि घरी चार मुले असणाऱ्या अकाऊंटंट चक्रपाणीचे हे स्टेटस होते.

आज पकोडीरावजवळ दहा लाखांची मालमत्ता आहे. काचेची दारे असणारी तीन तीन हॉटेले आहेत. परंतु याच चौकात एके काळी हाच कुबेरन रस्त्याच्या कडेला बसून मिरचीची भजी विकत होता. फार थोड्या लोकांनी त्या चौकात ही गोष्ट स्वतः पाहिली असेल, पण ती सगळ्यांना माहीत आहे.

लहानशी शेगडी, एक-कढई, ॲल्युमिनियमच्या भांड्यात पीठ, एका वाडग्यात मिरची... लुंगी आणि हातविणीचे बनीयन घातलेला, काळ्या मूर्तीसारखा कुबेरन आरंभी रोज शेरभर मिरच्यांची भजी करून विकीत असे. महिन्याभरात तो पोतेभर मिरच्यांची भजी करून विकणारा व्यापारी बनला

पूर्वी तो एक आण्यात सहा भजी देत असे. पुढे तीनापेक्षा जास्त देण्यास तो नकार देऊ लागला. कोणी कसेही मागो, फुकट मागो, की उधार मागो... कुबेरनच्या तोंडून सरळ एकच उत्तर येईल...: मिळणार नाही, मिळणार नाही. अशा प्रकारे लोकांच्या दृष्टीने स्वतः कुबेरनच मिरचीच्या भज्याप्रमाणे तिखट झाला. त्यामुळे लोकांनी त्याला पकोडीराव नाव ठेवले.

अशा प्रकारे कुबेरन त्रिवेंद्रम सोडून या शहरात येऊन पकोडीरावच्या रुपात प्रसिद्ध झाला आणि आज तो खरोखरच कुबेर बनला आहे. पण...

चक्रपाणीच्या पेल्यातली कॉफी संपली आहे आणि त्याचे विचारही थांबले आहेत.

उद्या मी मीठ मिरचीचे दुकान काढले तर लोक काय म्हणतील ? हा प्रश्न त्याच्या मनाला पुन्हा पुन्हा सतावू लागला. "मिरची चक्रपाणी" म्हणतील. आज त्याच्या मुलांना लोक धनम अँड कंपनीच्या अकाऊंटंटची मुले म्हणूनच ओळखतात ना ? मग ?

चक्रपाणी तिथून बाहेर पडला.

नागय्याकडून स्पेशल पान करून घेतले. पान खाता खाता चक्रपाणीच्या मनात विचार आला बाहेर ऊन जसे कडक आहे तसे बाजारभावही कडाडत चालले आहेत.

सारखा घाम येत आहे. टेरिलिन शर्ट हैराण करीत आहे. उदास चेहऱ्याने चक्रपाणी वर टांगलेल्या शर्मिला टागोरच्या चित्राकडे पाहातो आहे... तिरप्या नजरेने (स्टेटस मोठे आहे ना !)

"आता आपल्याला अशा प्रकारे कडक उन्हात कचेरीत जाण्याचा त्रास होणार नाही." मागून आलेल्या आवाजाने चक्रपाणी चमकला. मग त्याला वाटले की हे आपल्याला उद्देशून नसेल.

पण ते बोलणारा अय्याराव चक्रपाणीशीच बोलत होता.

"एक मसाला बनवा, नागय्याजी. आज या साहेबांचे नशीब उजळायचे

आहे. झंकारत्या पावलांनी लक्ष्मी आली पाहिजे." अय्याराव बोलला.

चक्रपाणीकडे अय्यारावने इतक्या आपुलकीने पाहिले की, जणू त्याचा कोणी जुना मित्रच त्याला भेटला होता. आग बरसणाऱ्या त्या उन्हात पोटातील आग शांत करण्यासाठी कॉफी पिऊन तेथे उभ्या असलेल्या चक्रपाणीकडे पाहात अय्यारावने आदरपूर्वक प्रसन्न हास्य केले.

"नमस्कार साहेब. एवढ्या कडक उन्हात पायी चालून इतके भारी शर्ट ओलेचिंब करून घ्यायची आपल्याला काय गरज ? एक महिना धीर धरा आणि पाहा, आपण प्लायमथ कारमधून इथे याल. मोटारचा आवाज ऐकताच नागय्या उत्तम पान बनवून आपल्याला आणून देईल. आपण गाडीत बसल्याबसल्याच पान खाल अणि निघून जाल." आपल्या खिशातून चेकबुकासारखे एक पुस्तक काढीत अय्याराव व्याख्यान देऊ लागला.

वेग मर्यादा धुडकावून धावत जाणाऱ्या मोटारीप्रमाणे व्याख्यान झोडणाऱ्या अय्यारावकडे चक्रपाणीने पाहिले. . . .

चेहरा कोठेतरी पाहिल्यासारखा वाटतो.

आवाजही ओळखीचा वाटतो.

अय्यारावचे नाव माहीत नसलेल्या चक्रपाणीने त्याच्याकडे बारकाईने पाहिले.

चक्रपाणीचे नाव माहीत नसलेल्या अय्यारावने मोठ्या आशेने त्याच्याकडे पाहिले.

नागय्याने पान बनवून चक्रपाणीच्या हातात ठेवीत म्हटले, "या अय्या-रावच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. पुरेपूर फसवतो हा. गेली पाच वर्षे मी घेतो आहे. पण एकदादेखील त्याच्या लक्ष्मीची झंकारणारी पावले मला ऐकू आली नाहीत."

चक्रपाणीच्या लक्षात आले. अय्याराव कोण आहे हे त्याच्या नीट लक्षात आले.

अय्यारावने अतिशय उंची कपडे परिधान केले आहेत. दिनांक आणि वार दाखवणारे मोठे घड्याळ त्याच्या हातात आहे. सगळ्या बोटांत आंगठ्या आहेत. त्या अंगठीवाल्या बोटांनी चेकबुकाप्रमाणे दिसणारे लॉटरीच्या तिकिटाचे पुस्तक धरले आहे. अशा प्रकारे अय्याराव त्या चौकात दररोज लोकांना झंकारत्या पाऊलांनी येणाऱ्या लक्ष्मीच्या गोष्टी ऐकवीत. . . मुलांपासून म्हाताऱ्यां-पर्यंत सर्वांना आपल्या गोड आवाजाने आणि बोलण्याने भारून टाकीत असतो.

एक स्मित करून याच्यापासून सुटका करून घेतली पाहिजे, असा विचार चक्रपाणीच्या मनात आला.

अशा प्रकारचा मोह पडणारा माणूस मी नव्हे. हे अय्यारावला समजावून सांगण्याचा त्याने प्रयत्न केला.

अय्याराव निराश झाला नाही. उलट ता अधिकच आत्मविश्वासाने बोलू लागला.

मते मागायला येणाऱ्या भाजी आमदाराप्रमाणे हास्य करीत अय्याराव म्हणाला, "असं साफ नाही म्हणू नका साहेब. आपल्या सारख्या लोकांच्या भाग्यात लक्ष्मीची कृपा मुळी लिहिलेलीच आहे. नाही तर आपणच सांगा, इतक्या कडक उन्हात यावेळी मी आपल्याचकडे कसा आलो असतो? माझे अंतर्मन कनकदुर्गामातेची भविष्यवाणी बोलते आहे. . .यावेळी माझ्या हातून विकल्या जाणाऱ्या तिकिटावर लाख रुपये खणखणत येतील." खणखण या शब्दाचा उच्चार अय्याराव असा करतो की, तो खणखणाट लोकांना जणू खरोखरीच ऐकू येतो.

पेनचे टोपण काढीत ते पेनच्या मागे लावीत अय्यारावने म्हटले, "बोला साहेब. आपण सांगाल त्याचं नाव लिहितो. . .आपली पत्नी, आपली मुलं, मेव्हणे. . .कोणाचंही नाव लिहिता येईल."

"आमच्या कुत्र्याचे नावदेखील लिहिता येईल का?" चक्रपाणीने मनातल्या मनात विचारले, प्रत्यक्षात तो काही बोलला नाही. खरे म्हणजे त्याच्या घरात असा पाळीव कुत्रा नाही आणि त्याच्या खिशात जास्त पैसेही नाहीत.

"जाऊ द्या." असे म्हणून त्याला तिकीट घ्यायचे टाळायचे होते. पण तो म्हणाला, "बरं तर, असं सांगा, तुम्ही जोरात सांगता आहात की, मला लाख रुपये जरूर मिळतील म्हणून. त्यात तुमचा फायदा काय? फक्त दहा पैशांचं कमिशन?" तो हसू लागला.

"इनसल्ट" अय्याराव खो खो हसत म्हणाला, "साहेब, आपल्याला दहा लाख मिळतील तर दहा हजार या राजश्रींना मिळतील." राजश्री म्हणताना त्याने पेन स्वतःवर रोखले होते. लगेच "हे घ्या, आता हा नंबर आपला झाला आहे. लकी नंबर वन सर बक्षिसाची गॅरंटी." . . .असे म्हणत त्याने नागय्याला विचारले, "साहेबांचे नाव काय आहे? बोला गुरु."

चक्रपाणीने शेवटचा प्रयत्न म्हणून म्हटले, "तो लकी नंबर तुम्हीच घेऊन टाका ना."

"नो नो सर. मला लाखांचा मोह नाही, दहा हजार मला पुरेत." अय्यारावने प्रचंड हास्य केले.

चक्रपाणी आता अय्यारावच्या हातून सुटत नाही याबद्दल नागय्याची छात्री झाली.

"घ्या साहेब ! पकोडीरावप्रमाणे आपणदेखील एका मिनिटात एखादी कंपनी उघडू शकाल."

चक्रपाणीच्या मनात आशा अंकुरली आणि हळू हळू जादूच्या आंब्याच्या झाडाप्रमाणे वाढत वाढत ती वडाच्या झाडाएवढी झाली.

पण खिशात रुपया नाही.

तो असता तर चार चार इडल्या सहज उडवल्या असत्या.

"आज नको. उद्या घेईन. आज पैसे आणले नाहीत." असे म्हणत त्याने तिकीट घ्यायचे टाळले.

अय्यारावचे तोंड लहान झाले.

चक्रपाणीसारख्या व्यक्तीच्या तोंडून इतक्या दीनवाण्या गोष्टी ऐकायची आपली इच्छा नाही हे जणू त्याचा चेहरा सांगत होता.

"विलंब केल्याने होणारे कामदेखील होत नाही. उद्या पुन्हा हाच नंबर, ही वेळ, हा क्षण, हे नशीब . . . कसे मिळेल ? नो यूज सर . . . आज याच वेळी खणखणाट करीत . . .लक्ष्मीची कृपा आपल्यावर व्हायलाच पाहिजे . . .आपण मोटारीतून कचेरीत जायलाच पाहिजे."

"बस बस. पुरे तुमचं बोलणं . . . लिहून टाका त्यांच्या नावावर एक तिकीट . . .एका रुपयासाठी विचार कसला करायचा . . .उद्या मी यांच्याकडून घेऊन टाकीन . . . हा घ्या . . ." असे म्हणत नागय्याने उदारपणे एक रुपया काढून दिला.

इतक्या कडक उन्हातदेखील क्षणभर चक्रपाणीला गारवा भासला. हसत हसत तो म्हणाला, "एका रुपयात लाख. इतकी हाव मला नाही."

अय्यारावने नागय्याच्या हातून रुपया घेतला, चक्रपाणीचे नाव विचारून लिहिले. इष्ट देवतेचे नाव न विचारताच 'बजरंगबली' लिहून टाकले आणि

फर्रकन तिकीट फाडले.

नागय्याच्या हातात तिकीट देऊन तो म्हणाला, "हे घ्या, आपण आपल्या हातांनी साहेबांना द्या. लक. . .एक लाख आपल्याला शोधत येतील. चक्रपाणीच्या हातात हे सुदर्शन चक्र बनेल असं समजा. . . .

"–लक्की चान्स. सुवर्णसंधी. वा वा !" चक्रपाणी हसला.

"असं बोलताय की जणू लाख रुपयेच देत आहा."

"आपण भाग्यवान असाल तर ह्याचेच लाख रुपये होतील. आपल्या लाख समस्या सोडवणारे एक लाख आपल्या मधुर कामना पूर्ण करणारा कल्पवृक्ष. वनात असा किंवा तुरुंगात असा. . .आपल्याला शोधत येणारी लक्ष्मी या लाख रुपयांत आहे. बरं आहे नागय्याजी, आपल्या नावानंही एक तिकीट देऊ काय ?" अय्याराव बोलत होता.

"अरे जा जा ! त्यांना लाख रुपये देण्याचा वायदा करून चुकलात. आता मला कुठून देणार ? तुम्हीदेखील फार. . ." नागय्या बोलला.

चक्रपाणीने तिकीट घेतले. रुपया लगेच परत करून टाकण्याची आपली असमर्थतता लपवणारे हास्य करीत बाहेरच्या कडक उन्हातून कचेरीतल्या उकाड्यात जाऊन पोहोचला.

लॉटरीचे तिकीट त्याने पँटच्या खिशात ठेवले.

"हूं : . . . सुदर्शन चक्र ! . . . एक लाख रुपये . . . कागदाच्या या तुकड्यात ? मलाच मिळतील याची काय खात्री ?" असे मनाशी म्हणत तो आपल्या जागेवर जाऊन बसला. अय्याराव मोठा चतुर आहे. काहीही असो, माझ्यापेक्षा तोच चांगल्या परिस्थितीत आहे. किती रुबाबात आहे . . .

चक्रपाणी काम सुरू करण्याचा प्रयत्न करीत होता. पण मन अस्वस्थ होते.

खिशातून लॉटरीचे तिकीट काढून पुन्हा एकदा पाहावेसे त्याला वाटले.

कॅशिअर आपल्या जागेवर बसल्या बसल्या तपकीर ओढीत म्हणत होता, "काय साहेब, आज फार खूष दिसता ? काय विशेष ?"

चक्रपाणीला आश्चर्य वाटले. आपण लॉटरीचे तिकीट घेतल्याचे या लोकांना कसे समजले हे त्याच्या लक्षात येईना.

"छे छे. विशेष काही नाही." तो गडबडून म्हणाला.

कॅशिअर भंगमतीने जोरदार शिंक दिली आणि म्हटले, "आज घरात अडचण

आहे. मी स्वतःच स्वयंपाक करून थोडंसं खाऊन घेतलं आहे. लंच वगैरे काहीही आणलं नाही. बाहेर ऊन आणि पोटात भूक, हैराण झालोय." भंगसतीने आपले दुःख ऐकविले.

"अरेरे, फारच वाईट," त्याला सहानुभूति दाखवीत चक्रपाणी म्हणाला, "माझीही जवळ जवळ अशीच स्थिती आहे. घरी मी एकट्यानं खाऊन कसं चालेल ? उपमा करायचा झाला तर चारीही मुलांना तो थोडा थोडा द्यावा लागतो, इतका कुठून करणार ?" मनातल्या मनात चक्रपाणी म्हणाला.

प्रत्यक्षात तो फक्त इतकंच बोलला, "हा पंखा किती खराब आहे ! गरम हवा येते आहे. शी शी फार उन्हाळा आहे."

इतक्यात सुदर्शन चक्राची गोष्ट आठवली.

"एक लाख रुपये. जर मिळाले तर हे लोक खरच देतील का ? का नाही देणार ? लहानपणी तेलवाल्या सुब्बय्याबद्दल मी अशीच एक गोष्ट ऐकली होती. त्याच पैशातून त्याने बर्माशेल कंपनी उघडली होती . . . जर मला मिळाले तर मी आधी खोली एअर कंडिशंड करीन . . . पण माझ्यासारख्या माणसाला लाख रुपये . . . नाही . . . नाही मिळणार . . . नाही मिळणार . . ."

"का ? त्यात काय झालं ? त्या गंजाभाईप्रमाणे मी तिकिटाच्या मागे वणवण फिरत नाही तेच माझ्याकडे आलं आहे. अय्याराव म्हणाला तसं लक्ष्मी झंकारत्या पावलांनी स्वतः येऊ शकते. लहानपणी मी कोणत्या तरी पोथीत वाचलंदेखील होतं की, लक्ष्मीला यायचं असेल तर नारळात पाणी यावं तशी ती आपसूक अचानक येते."

एक लाख रुपये मिळाले तर काय करावे, हा प्रश्नच चक्रपाणीसमोर नाही.

आधी तो ज्या गॅरेजमध्ये राहातो आहे ते घरमालक रामप्रसादच्या तोंडावर फेकून मारील. अडीच खणांची जुनी खोली . . . त्यात नळ नाही. मोरी नाही. कोळी, उंदीर, झुरळे . . . सगळे घाणेरडे... गलिच्छ . . .

ताबडतोब तीस हजारांचे एक छोटेसे घर विकत घ्यायचे . . . कसे घर घ्यायचे, याचा चक्रपाणीला लगेच निर्णय घेता येईना .

"अलिकडेच राजारावने वीस वर्षे अर्धपोटी राहून एक घर बांधले आहे. खूप सुंदर घर आहे आणि आता आरामात राहातो आहे. असेच घर घेतले पाहिजे." चक्रपाणीने ठरवून टाकले.

तो हिशेब तपासतो आहे, शेवटचा ताळेबंद पाहून खूण करतो आहे.

मोठा मुलगा गणितात फार हुशार आहे (त्याच्यासारखाच). त्याला इंजिनिअरिंगला पाठवायचे आहे. . . माझ्यासारखा कारकुनी करू लागला तर दहा पंधरा वर्षांनी कधी तरी अकाऊंटंट होईल. मुलाच्या भविष्याबद्दलही चक्रपाणी विचार करू लागला.

बिचारी शारदा, ती कधीही बोलत नाही . . . लग्नात जी रेशमी साडी मिळाली त्यानंतर आयुष्यात तिला रेशमी साडी खरेदी करता आली नाही. त्याला पत्नीची दया आली. दरम्यान नायलॉनचे कपडे आले. नायलेक्स, टेरिलिन आले, टेरिकॉट आले आणखी किती तरी प्रकार निघाले. मोठ्या मुलाला अठरावे वर्ष पूर्ण होते आहे. याच्यापेक्षा माझी पत्नी सोळा वर्षांनी मोठी असेल. तरीसुद्धा आज बोफान एम्ब्रॉयडरीची साडी ती नेसली तर जाहिरातीतल्या मुलींच्या चित्रावर ती मात करील. तेव्हां तिच्यासाठी दोन. . . छे छे ! इतका पैसा मिळत असताना इतका चिकूपणा नको. . . तर तिच्यासाठी दोन डझन साड्या घेऊन टाकीन. बस. चक्रपणीने निर्धार केला.

सगळ्यांना वाटते की मी चैन म्हणून टेरिलिनचा शर्ट घालतो. रात्री धुऊन वाळवला म्हणजे सकाळी घामाने वाईट झालेला कपडा घालून जाण्या-ऐवजी स्वच्छ धुतलेला कपडा घालून जाण्यात जास्त सोय आहे. म्हणूनच कर्ज काढून मी हा शर्ट शिवला. पण हे कोणी समजू शकत नाही.

चक्रपाणीने मान वर करून सगळ्यांकडे पाहिले. आपले विचार जणू सगळ्या लोकांना समजले असा संशय त्याच्या दृष्टीत होता. पण दूर बसून फिल्मफेअर वाचणाऱ्या कनिष्ठ कारकुनाने त्याचे लक्ष जाताच तो अंक ताबडतोब खणात टाकला. चक्रपाणीला हसू आले.

अय्यारावने अगदी बरोबर सांगितले असे त्याला वाटले. पण प्लायमथ कार मोठी वस्तू झाली. मोठ्या मुलाचा जन्म झाला तेव्हापासून त्याची सायकल पडून राहिली आहे. ती दुरुस्त करण्याऐवजी एक मोटर सायकल किंवा लँब्रेटा घेऊन काम चालविता येईल.

इतक्यात गणेश शिपायाने येऊन साहेब बोलावत असल्याचे सांगितले.

मग चक्रपाणी स्कूटरवरून सरळ मॅनेजिंग डायरेक्टरच्या खोलीत गेला.

चक्रपाणी त्या खोलीतून बाहेर पडला तेव्हा सव्वातीन वाजले होते.

जोवर चक्रपाणी मॅनेजरच्या खोलीत होता तोवर त्याच्या तोंडून फक्त तीनच वाक्ये निघाली होती... "यस् सर", "ठीक आहे, साहेब;" "जरूर करीन साहेब."

नागय्याकडून एक रुपया उसना घेऊन अय्यारावकडून निरुपायाने घेतलेले लाख रुपयांचे लॉटरीचे तिकीट खिशात हात घालून एकदा चाचपून पाहिले, पण ते बाहेर काढले नाही.

त्याच्या मनात आले, 'आता यस् सरचा हा जप मी काही दिवसांतच सोडून देऊ शकेन.' लवकर घरी जाऊन शारदेला ही बातमी त्याला सांगायची होती. त्याचा मुलगा पार्थसारथी आता मॅनेजिंग डायरेक्टरचा मुलगा बनेल. तोपर्यन्त अमेरिकेला जाण्याची संधीही मिळेल. का नाही मिळणार ? पैशांनी ही सगळी कामे आपोआप होतील.

त्याने भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहिले. ते हंसगतीने चालले आहे. तीन वाजून पस्तीस मिनिटे झाली आहेत. अय्यारावकडून घेतलेले हे तिकीट नकली तर नसेल ना असा त्याला संशय आला.

कॅशिअरने पुन्हा तपकीर ओढली आणि शिंकही दिली.

रुपयाच्या नोटांची बंडले बांधीत तो झरझर मोजत चालला आहे. त्यातली एक नोट काढून लगेच नागय्याला देऊन टाकली तर किती बरे होईल असा विचार चक्रपाणीच्या मनात चमकून गेला. अगदी जिवावर बेतले तरी कोणाकडून एखादी वस्तू उसनी घेणे त्याला अप्रतिष्ठेचे वाटते. पण काय करणार ? अय्यारावने त्याला मोहात टाकले.

चक्रपाणी काम करण्याचा बहाणा करतो आहे. त्याचे विचार आणि शंका त्याला काम करू देत नाहीत. लाख समस्या सोडविणारे ते लाख रुपये त्याला मिळतील काय ? हिशेब तपासून जिथे टिक मार्क करायचा होता. तिथे चक्रपाणीने प्रश्नचिन्ह टाकले.

'का नाही मिळणार ?... पकोडीराव, डबी सुबय्या, हलवाई सोमय्या, पापडवाला पापय्या... ही सगळी मंडळी जन्मतः थोडीच सोनेचांदी बरोबर घेऊन आली होती ? मग ?

अशाच प्रकारे लक्ष्मी त्याच्यावरदेखील कृपावंत होऊन त्याच्याकडे येऊ शकेल. मग त्याचे मुलगे डॉक्टर, इंजिनिअर यांच्यासारखो पैसे मिळवणारी

कामे करू शकतील.

तेव्हा लोक त्याला काय म्हणतील ? अकाऊंटंट?—नाही,—लक्षाधीश चक्रपाणी म्हणतील—खरेच म्हणतील ?— चक्रपाणीला शंका वाटू लागली. आतापर्यन्त कोणाही लक्षाधीशाला लक्षाधीश म्हटल्याचे त्याने ऐकलेले नाही. कुबेरनला कोणीही लक्षाधीश म्हणत नाहीत. लोक त्याला पकोडीरावच म्हणतात.

मग तेलवाल्या सुब्बय्याला ? चक्रपाणीच्या हृदयाचा ठोका चुकला.

हाय रे देवा ! मग उद्या मला काय म्हणतील ? लॉटरी चक्रपाणी तर नाही म्हणणार ? लॉ–ट–री–चक्रपाणी ?

चक्रपाणी घामाघूम झाला. गेली पंचवीस वर्षे उपाशी पोटी राहून मुलांना आनंद देऊ न शकता, पत्नीच्या इच्छांची उपेक्षा करीत जिवापाड मेहनत करून त्यांनी मिळविलेली अकाऊंटंटची प्रतिष्ठा लॉटरीमुळे भस्मसात होणार काय? नो–नो–

त्याच्या घराण्याचे नांव बरेच प्रसिद्ध आहे. श्रीमुखम – चक्रपाणी नेहमी आपल्या मित्रांमध्ये आपल्या नांवापेक्षाही आपल्या कुळाच्या नावाचा विशेष अभिमानाने उल्लेख करतो. ती जागा आता लॉटरी घेणार काय ? छे छे असे होऊ शकत नाही. नाही होऊ शकत. चक्रपाणी मनातल्या मनातच पुटपुटू लागला.

कॅशिअर पुन्हा तपकीर ओढतो आहे. तपकीर ओढता ओढता मध्येच तो चक्रपाणीकडे पाहातो.

चक्रपाणी संतापला. हा अकारण क्रोध लपविण्याचा प्रयत्न न करताच तो जोरात म्हणाला, "कॅशिअर साहेब, जरा इकडे याल का? कॅश चेक करून टाकू."

"होय साहेब," असे म्हणत कॅशिअर भंगमती दोनदा शिंकून आपल्या जागेवरून उठला.

संत्रस्तपणे चक्रपाणी कसेतरी काम करीत आहे. पण त्याला चैन पडत नाही. पकोडीराव, तेलवाला सुब्बय्या, दारुवाला रत्तय्या अशीच नांवे त्याला आठवत आहेत. नागय्या आणि अय्याराव यांचा विलक्षण राग येत आहे. लॉटरीत आपल्याला बक्षिस न लागले तर, अशी भीती त्याला वाटू लागली. चुकून तसे झाले तर–ते शब्द त्याला अस्वस्थ करीत आहेत.

या लाख रुपयांचा काय उपयोग ? आपल्या प्रतिष्ठेपुढे या कागदाच्या तुकड्यांची काय किंमत ? ते शब्द अनवधानाने चक्रपाणीच्या तोंडून बाहेर पडलेच.

"तीन हजार नऊशे चौसष्ट रुपये आणि चौवीस पैसे रिटर्न" असे म्हणणाऱ्या भंगसतीने एकदम चमकून विचारले, "असं काय म्हणता साहेब ? लाख रुपयांपेक्षा आणखी प्रतिष्ठा ती काय असू शकते ?"

"तुमच्याशी मी बोलत नाही. लेट्स प्रोसीड." चक्रपाणीने अकाऊंटंटच्या तोऱ्यात म्हटले.

पाच वाजेपर्यंत चक्रपाणी थकून गेला. बह्या खणामध्ये टाकीत त्याने विचार केला, आता दुकान बंद केले पाहिजे. सूर्यप्रकाश मला भेटले पाहिजे. त्याने पंचवीस रुपये उसने द्यायचे कबूल केले होते. क्लबमध्ये येऊन घेऊन जाण्याचे सांगितले होते. आज गेलो नाही तर उद्या तो म्हणेल, पैसे परत खेळण्यात गेले, ब्रदर ?

सूर्यप्रकाशम कलेक्टर कचेरीत सामान्य कारकून आहे. पण रोज क्लबमध्ये खेळण्याची कुवत त्याच्यात कशी आली हे चक्रपाणीला समजत नाही.

"जाऊ द्या. तो माझा वर्गमित्र आहे. दीनानाथाप्रमाणे कधीतरी उसने देतो." चक्रपाणीने स्वतःची समजूत घातली. उठून पंखा बंद करून तो बाहेर जायला निघाला.

पँटच्या खिशात ठेवलेले लॉटरीचे तिकीट आता त्याला जड वाटू लागले. कचेरी-बाहेर पडून रस्त्यावर संध्याकाळच्या उतरत्या उन्हात चक्रपाणीने पाय ठेवले.

समोरच्या फळांच्या दुकानाजवळ एक मोटार येऊन उभी राहिली. तिचा काळा रंग उन्हात चमकतो आहे. त्या मोटारीतून एक स्त्री मोठ्या ऐटीत. उतरली. किंमत न विचारताच तिने सफरचंदांची आणि केळ्यांची खरेदी केली आणि मोटारीत बसून ती निघून गेली.

चक्रपाणीच्या मनात आले, माझ्याजवळ अशी मोटार असेल तर शारदा-देखील ती अशीच चालवील.

ती स्त्री कोण असेल ? कोण असू शकेल ? तिला मुले नक्की असतील, नाही तर डझनभर सफरचंदे घेऊन ती काय करणार ?

फळाच्या दुकानात काही लोक बोलत होते, ही त्या टक्कलवालीची मुलगी. हिचा नवरा चित्रपट काढतो.

चक्रपाणीला त्या लोकांचे बोलणे आवडले नाही. मनातल्या मनात तो त्यांच्यावर नाराज झाला.

ती कोण आहे हे त्याच्या आता लक्षात आले.

नलिमीकांत या लाकडाच्या व्यापाऱ्याची ती पत्नी आहे. नलिमीकांताच्या आईने लाकडाचे दुकान काढले होते. तिला टक्कल होते. म्हणून लोक त्याला टक्कलवालीचे दुकान म्हणत. [पुढे तिचा मुलगा मोठा झाला आणि लाखो रुपयांचा लाकडाचा व्यापार करू लागला. आता देशभर टिम्बर मर्चन्ट म्हणून प्रसिद्ध आहे. पण काय उपयोग] ? लोक तर त्याला टक्कलवालीचा मुलगाच म्हणतात नं ? आणि ही त्याची बायको आहे. चक्रपाणी उदास झाला.

"नमस्ते चक्रपाणीजी," मागून आवाज आला. पण हा आवाज चक्रपाणीच्या कानात वेगळ्याच रुपात शिरला. त्याने ऐकले, "लॉटरी चक्रपाणीजी." हा आवाज बाहेरून आलेला नव्हता, त्याच्या मनातूनच आला होता.

"हे लाख रुपये न मिळाले तर बरं," पुन्हा तोच आवाज आला.

आता तो बसस्टॉपवर उभा आहे. ऊन सुईसारखे शरीरभर टोचते आहे. खिसा चाचपून पाहिले—क्लबपर्यंत जाण्याइतके पैसे आहेत. पैशांबरोबरच लॉटरीचे तिकीटदेखील आहे. ते एकदा बाहेर काढून पाहावे अशी इच्छा झाली. पण संध्याकाळची वेळ—गर्दी, ऊन, गरम हवा, धूळ, धूर—त्याला स्वतःचीच लाज वाटली. वाटले की तिथे तिकीट काढून पाहाणे आपल्याला शोभणार नाही.

एक लाख रुपये ! लाख इच्छांची पूर्ती करणारे लाख रुपये ! तो लकी नंबर पाहाण्याची इच्छा झाली.

बसचा अजून पत्ता नाही.

चक्रपाणी आता आपल्या मुलाच्या अमेरिका वारीची कल्पना करतो आहे. त्याचा मोठा मुलगा पार्थसारथी 'अमेरिका रिटर्न्ड' झाल्यावरही असाच उन्हामध्ये बसची वाट पाहात उभा राहाणार काय ? असाच सूर्यप्रकाशमकडे पैसे उसने मागायला जाणार काय ?

नाही जाणार—त्याने मनाशी निश्चय केला.

कोणीतरी परिचित व्यक्तीने त्याला नमस्कार केला.

उद्या पार्थसारथीला नमस्कार करणारे शेकडो हजारो लोक असतील. का नसतील ?

तरीही त्याचे मन साशंक झाले लोक पार्थसारथीचा हेवा करू लागण्याची

शक्यता आहे. मग लोक त्याला पाहून काय म्हणतील ? कदाचित ते एक-मेकांना म्हणतील–'तुम्हाला जर त्याच्या बापासारखा लॉटरीचा पैसा मिळाला तर अमेरिकाच काय पण चंद्रापर्यंत सुद्धा तुम्ही जाऊन येऊ शकाल, ब्रदर.' (छे छे, काय वाईट परिस्थिती आहे या देशाची !)

माणूस अचानक श्रीमंत झाला की असाच आंधळा होतो–जवळ उभा राहून कोणी तरी कोणाशी तरी बोलतो आहे.

ते ऐकून चक्रपाणी चमकला.

एक मुलगी आपली मोटार त्याच्या पायावरून पुढे घेऊन गेली होती. त्याचा धक्का बसलेला तो माणूस हे बोलत होता. ती मोटार चालविणारी मुलगी कोण होती हे समजून घेण्याचे केवळ कुतूहलच चक्रपाणीला वाटले नाही तर ही माहिती समजण्याची आवश्यकता त्याला वाटू लागली. कारण या मुली-प्रमाणेच आणखी दहा वर्षांनी (त्याला लॉटरी लागली तर) त्याची मुलगीदेखील मोटार चालविण्याची शक्यता आहे...

आपल्या मुलीला मेडिकलला पाठविलेच पाहिजे असा विचार एकीकडे चक्रपाणी करतो आहे तर दुसरीकडे अपघातातून थोडक्यात बचावलेल्या त्या माणसाला ती मुलगी कोण होती म्हणून विचारतो आहे.

"कोणी का असेना. कलियुग आहे हे. डोळे आकाशाकडे लावून चालतात ह्या मुली. माझ्या लहानपणी गुन्नय्या नावाचा एक फकीर होता. अचानक त्याचे एका लॉटरीत नशीब उघडले. बघता बघता तो नबाब झाला. त्याच्या दुसऱ्या बायकोच्या मुलाची ही मुलगी आहे. मेडिकलच्या शिक्षणाच्या नावाखाली गुण उधळले आहे!" असे बोलून त्याने तोंड वाकडे केले.

–गुन्नय्या. चक्रपाणीला हे नाव ओळखीचे वाटले. बरोबर आहे. त्यांच्या कंपनीशी गुन्नय्याचे व्यवहार आहेत. लक्षाधीश आहे तो. खत कंपनीचा गुन्नय्या तो हाच.

चक्रपाणीला फार वाईट वाटले. जवळ उभ्या असलेल्या त्या म्हाताऱ्या माण-साचा त्याला फार राग आला. या क्षुद्र माणसाला दुसऱ्यांच्या भरभराटीचा हेवा वाटतो. वाटले, हा मोटारीखाली सापडून मेला असता तर बरे झाले असते.

लॉटरीच्या तिकीटांची एक गाडी त्या रस्त्याने जाते आहे. म्हाताऱ्याने म्हटले, "किती वाईट दिवस आले आहेत बघा. हे लॉटरीवाले सगळ्या जगाला

लुटताहेत."

आपल्याला लॉटरीचे लाख रुपये मिळतील आणि त्यानंतर आपण बायको मुलांबरोबर कसे राहू याचे चक्रपाणीच्या मनातील कल्पनाचित्र नाहीसे झाले. आता त्याला लॉटरी, चक्रपाणी आणि त्याचे कुटुंब यांच्यावरील टीका आणि लोकांकडून होणारा त्यांचा उपहासपूर्ण उल्लेखच ऐकू येऊ लागला.

त्याने खिशात हात घालून पाहिले-लक्ष इच्छा पूर्ण करणारी झंकारत्या पावलांनी येणारी लक्ष्मी – अय्यारावचे बोलणे त्याच्या कानांत घुमू लागले. पण चक्रपाणीला वाटते. . .लाख इच्छांऐवजी ही लॉटरी लाख समस्या घेऊन येणार आहे. . .

तो अस्वस्थ झाला. विचार बदलण्यासाठी, निर्लज्ज मेव्हण्याने लिहिलेल्या अंतर्देशीय पत्रात जपून ठेवलेले लॉटरीचे तिकीट त्याने दोन्ही बाजूंनी लक्षपूर्वक पाहिले . . .

बस अजूनही दिसत नाही. पत्राच्या आतच लॉटरीचे तिकीट ठेवून तो गुपचूप ते वाचू लागला.

लाख रुपयांचे पहिले बक्षिसच नाही तर दोन दुसरी बक्षिसे आहेत. . . तीस हजारांची. तीन तिसरी बक्षिसे आहेत. . . .दहा हजारांची. बारीक अक्षरात हे सगळे त्यावर छापले आहे. नंबर. . . . ३२४५६७० . . . .

चक्रपाणीने विचार केला, लाख रुपये पाहिजेत कशाला ? दहा हजार मिळाले तरी पुरे. कर्ज फेडून आरामात राहाता येईल. शिवाय उगीच प्रसिद्धीचा त्रासही राहाणार नाही. . .पण अय्यारावने किंवा नागय्याने याचा उल्लेख अजिबात केला नाही.

लाख ! लाख ! असे सांगून मला बेचैन केले. माझ्या डोक्यावर एक रुपयाचे कर्जही लादले.

लाख रुपये मिळाले तर सुख मिळेल पण प्रतिष्ठा मातीत जाईल. आयुष्यभर अपमान सहन करावा लागेल.

संख्याशास्त्राप्रमाणे त्याने तिकिटाच्या आकड्यांची बेरीज करून पाहिली . . . नऊ होते ती.

त्याला धस्स झाले. नवाचा आकडा त्याला अजिबात अनुकूल नाही. म्हणजे अपमान, अपयश, अपकार, हे निश्चित.

आता चक्रपाणीला लाख रुपयांची एकदम भीती वाटू लागली.

तेवढ्यात एक बस आली.

ती त्याची नाही.

सूर्यप्रकाशमने सहाच्या आधी यायला सांगितले होते. पाच वाजून पन्नास मिनिटे होऊन गेली आहेत. सूर्यप्रकाशमला चांगला ओळखणाऱ्या चक्रपाणीला तो सहानंतर पत्त्यांचा खेळ सोडून मुळीच येणार नाही हे पक्के माहीत आहे.

लॉटरीचा पैसा मिळाला तर उद्यापासून तोदेखील पत्ते खेळेल. पत्ते तो अतिशय चांगले खेळतो. ब्रिजमधला तर तो अजिंक्य खेळाडू आहे. पण आज त्याने मन आवरले आहे. (पैसे नसल्यामुळे).

नवाच्या आकड्याचा अनिष्ट परिणाम चक्रपाणीला आतापासूनच जाणवू लागला आहे.

आपले राहू देत. . .,पण मुले या गोष्टींच्या मोहात पडली तर त्यांची काय अवस्था होईल ? लॉटरीचे तिकीट फेकून द्यावे असे त्याला वाटू लागले.

पण मन तयार झाले नाही.

लाख नकोत, दहा हजार पुरेत. तो मनातल्या मनात पुटपुटू लागला. . . एक हजाराचे एखादे बक्षिस असेल तर तेदेखील पुरे आहे. . . .

अरे बस आली. लोक धक्काबुक्की करीत आहेत. . .

चक्रपाणी बसमध्ये चढला. क्लबच्या आधीच्या स्टॉपचे तिकीट घेतले. . .

'लॉटरी चक्रपाणीदेखील असा कंजूषपणा दाखवू लागला तर कसे होणार ?' असा आशय व्यक्त करणाऱ्या दृष्टीने कंडक्टरने त्याच्याकडे पाहिले. मनातल्या मनात चक्रपाणीने उत्तर दिले, "दहा यार्ड पुढच्या स्टॉपचे पाच पैसे जास्त मागतात."

बसमध्ये खूप गर्दी आहे. घामाचा दर्प गुदमरून टाकीत आहे. बस कसली . . . नरकच हा.

गर्दीने त्रस्त झालेल्या चक्रपाणीने मनात म्हटले, बक्षिसाचा पैसा मिळाला म्हणजे पाहून घेऊ.

पोत्यात कापूस भरावा तसे कंडक्टर लोकांना बसमध्ये ठासून भरतो आहे.

चक्रपाणीला सूर्यप्रकाशमकडे जाणे आवश्यक आहे. त्याशिवाय भागणार नाही.

'उद्या नागय्याचा रुपयाही परत करावयाचा आहे.'

लाख रुपयांचे बक्षिस मिळाले नाही तर बरेच होईल. दहा हजारांचे बक्षिसच चांगले. पुन्हा पुन्हा तो हाच विचार करतो आहे.

किंवा पत्ते खेळणाऱ्या सूर्यप्रकाशमलाच हे तिकीट दिले तर . . .? तो खूष होईल. आवश्यक असेल तर या तिकिटाबाबत मला काहीही हक्क सांगायचा नाही असे सूर्यप्रकाशमला लिहून देता येईल. गेला तर एक रुपयाच जाईल. जाऊ दे. त्याबरोबर लाख समस्याही निघून जातील. मान राहील, शान राहील.

एवढ्या त्या गर्दीतही दोन पुरुषांच्या मध्ये रिकाम्या जागेत लेडीज सीट जवळ उभ्या असलेल्या एका नायलॉन सुंदरीवर चक्रपाणीची दृष्टी पडली.

लाल लिप्स्टिक लावलेले ओठ, काजळ घातलेले डोळे, रिबन न बांधता वक्षस्थळावर सोडलेले मोकळे केस . . .पोस्टरवरच्या माला सिन्हा प्रमाणे ती उभी आहे. तेवढ्या गर्दीतही चक्रपाणीचे मन मोहून गेले.

मग काय ? कंडक्टरने बसस्टॉप आल्याचे सांगेपर्यंत चक्रपाणीचे लक्ष दुसरीकडे कुठे गेलेच नाही !

कोणाचे कोपर, कोणाचा गुडघा, म्हाताऱ्याची काठी, मास्तरसाहेबांची छत्री, शाळेतल्या मुलांचा खाण्याचा डबा आणि शेवटी त्या माला सिन्हाच्या साडीचा पदर हे सगळे पार करीत चक्रपाणी बसमधून कसाबसा उतरला.

दिवे लागले आहेत. सहा वाजून गेले आहेत. तो धावतच क्लबमध्ये गेला.

प्रकाशमला पाहाताच चक्रपाणी म्हणाला, "देवासारखा भेटलास मित्रा." लॉटरीचे पैसे मिळाल्यासारखा त्याला त्यावेळी आनंद झाला आहे.

आत पत्त्यांच्या डावाची तयारी चालू असावी. प्रकाशम घाईघाईत बाहेर आला.

"सॉरी, पाणी. पंचवीस ऐवजी वीसच मिळाले आहेत. . .तिकडे लोक हैराण करतील. . .मी चलतो. बाय् बाय्."

दहा दहाच्या दोन नोटा चक्रपाणीच्या ओल्या हातात ठेवून प्रकाशम ताबडतोब आत निघून गेला. जणू कोणी त्याचा पाठलाग करीत होते.

चक्रपाणीला विसाच्या जागी एकोणीसच रुपये दिसू लागले. . .त्यातला एक रुपया नागय्याला द्यायचा होता.

"अरेच्या, मी विसरलोच की. याला लॉटरीचं तिकीट द्यायचं होतं." खिशात हात घालीत चक्रपाणीने प्रकाशमला पुन्हा बोलावले, "प्रकाशम, एक सांगायचंय."

प्रकाशम त्रासून मागे वळून बघतो आहे. त्याचे डोळे विचारत आहेत, आता आणखी काय आहे ?

चक्रपाणीचा विचार पुन्हा बदलला. एक लाख रुपयांची गोष्ट आहे. एक दोन नव्हे. ते याला देऊन काय फायदा ?" काही नाही, सहज बोलावलं होतं. अच्छा ! गुडनाइट." असे म्हणून तो परत फिरला.

खिशातून हात बाहेर काढला त्याबरोबर फक्त हातरुमालच बाहेर निघाला. मेव्हण्याचे ते पत्र तिथे नाही. (आणि त्यातच ठेवलेले लॉटरीचे ते तिकीटही.)

दुसऱ्या खिशातही पाहिलं. 'तिथेही नाही. पत्रही नाही आणि तिकीटही नाही.' चक्रपाणीच्या पोटात गोळा आला.

"अरे तिकीट कुठं गेलं ?" असे म्हणत दिव्याच्या प्रकाशात सगळे खिसे धुंडाळून पाहिले.

"अरेरे, किती दुर्दैवी आहे मी ! माझ्या नशिबात भीक मागणंच लिहिलं आहे. फकीरासारखं आयुष्य. काचेच्या परीसारखी ती कोण होती कोण जाणे. तिला पाहून मी मोहात पडलो आणि लाख रुपयांचं तिकीट घालवून बसलो. आता माझ्या आयुष्यात चांगले दिवस कधीही येणार नाहीत. लाख रुपये माझ्या नशिबातच नाहीत." चक्रपाणीच्या डोळ्यात अश्रू नव्हते, पण सागरा एवढे होते त्याचे दुःख. अंतर्देशीय पत्राप्रमाणे दिसेल तो कागद उचलून दिव्याजवळ नेऊन चक्रपाणी तो पाहू लागला.

असे कागद पाहात पाहात तो पुन्हा कचेरीजवळच्या बसस्टॉपवर जाऊन पोहोचला.

एक रुपया हरवल्याचे त्याला दुःख नव्हते. पण ती होती चालून आलेली लक्ष्मी. एक लाख रुपयांचे तिकीट. ते गेले.

चक्रपाणी जीवनात इतका निराश कधीही झाला नव्हता. त्याची बढती तीस वर्षांपर्यंत खोळंबली तेव्हाही तो इतका दुःखी झाला नव्हता.

कोणातरी भाग्यवंताच्या हाती लागले असेल ते तिकीट. कोणत्याही गोष्टीसाठी नशीब पाहिजे.

"नाही तर या गरीब माणसाला ते बक्षिस कोठून मिळणार ?" कदाचित् बसमध्ये हरवले असेल. काय नंबर होता त्याचा ? कंडक्टरला विचारावं काय ? काय विचारावं ? (लाज वाटली पाहिजे.) की असं सांगावं. . .माझं एक पत्र हरवलं आहे, "महत्वाचं पत्र. . .म्हणून ?" पण चक्रपाणीला त्या बसचा पत्ता लागला नाही. कदाचित ते बसमध्येच हरवले असेल असे त्याला वाटले.

"बरं झालं. कटकट टळली." त्याच्या मनात पुन्हा पुन्हा हाच विचार येतो आहे. पण त्याला बसस्टॉप सोडवत नाही. आठ वाजून गेले. जुने घड्याळ कानाशी त्याने नेऊन पाहिले. घड्याळ बंद पडले आहे. आठ वाजता तेदेखील बंद झाले.

अनेक बसेस आल्या आणि निघून गेल्या. पण त्याची ती बस आली नाही.

किती वाजले आहेत कोण जाणे. नऊ वाजून गेले असावेत. घड्याळदेखील आताच का बंद पडले.

चक्रपाणी संतापाने तळमळतो आहे. मनात वैराग्यभावना निर्माण होते आहे.

अय्याराव, नागय्या, बस, माला सिंव्हासारखी ती मुलगी . . . सगळ्या सगळ्यांचा, स्वतःचा आणि या जगाचा त्याला राग आला आहे. त्याला वाईटही वाटले आहे.

हिशेब तपासण्याचा वीस वर्षांचा अनुभव असल्याने तिकिटाचा नंबर (आशा मोठी वाईट गोष्ट आहे. . .त्यात नुकसान तरी काय आहे ?) ३४५६७० मनात घोळवीत अकाऊंटंट चक्रपाणीने दुःख, संताप, करुणा आणि वेदना मनात घेऊन पायीपायी घराची वाट धरली.

मुंगसाची गोष्ट

—बलिवाड कांता राव

वंशधारा नदीच्या किनारी मंडपाम नावाच्या गावात डॉक्टर अय्यारावांचे घर आहे. नदीच्या पूर्व किनाऱ्यावर एक उंच टेकडी आहे. त्याच टेकडीवर डॉक्टर साहेबांचे घर आहे. तिथे दोन घरे आहेत. एका पक्क्या बांधणीचा बंगला आणि दुसरे कौलारू कच्चे घर. दर वर्षी पुरापासून नदीच्या काठाचे रक्षण करण्यासाठी सरकारकडून डोंगरातून दगड आणून बांध घातला जातो. बांध घातल्यानंतर दोनदा पूर आला पण बांध थोडक्यात बचावला.

त्या नदी किनारी उन्हाळ्यात नीलगिरीसारखी थंड हवा असते. हिवाळ्यात तिथे जास्त थंडी असते अंगणात उभे राहून दक्षिणेकडे वाहाणाऱ्या नदीकडे पाहिल्यावर शरीर पुलकित करणारे रमणीय निसर्ग दृश्य दिसते. जरा पलीकडे सालिहुंडाम हा ऐतिहासिक पर्वतही दिसतो. उंच उंच वृक्ष, केळीच्या बागा आणि रंगांतर रंग उधळणारी सूर्यास्ताची शोभा डोळ्यांना सुखावते. फेब्रुवारी महिन्यात संध्याकाळी पश्चिम दिशेला प्रकाशित करणारी शुक्राची ज्योती खळखळत्या नदीत प्रतिबिंबीत होते तेव्हा ते दृश्य विलक्षण नाट्यपूर्ण दिसते.

नदीकाठच्या या घरामध्ये अनेक सुखसोयी असल्या तरी काही त्रासही आहे. पावसाळ्यात नदीला पूर येतो तेव्हा स्मशानातली प्रेते सरणासह तिथे येऊ लागतात आणि कधी कधी सजीव सर्पराजही दर्शन देतात. कधी कधी रात्री हे साप घरातदेखील शिरतात. एक दिवस घरातील माणसे झोपली होती तेव्हा वरून एक साप खाली पडला होता. आयुर्वेदिक वैद्यकीबरोबर अय्याराव शेतीवाडीही सांभाळतो. कापणीच्या दिवसात आणखी एका गोष्टीचा त्याला त्रास असतो. अगदी जपून ठेवलेल्या धान्याचे कमीत कमी दहा टक्के तरी धान्य उंदीर आणि घुशी खाऊन टाकतात. या दगडामध्ये राहाणारे उंदीर आणि घुशी रात्री स्वैर फिरू लागतात. दिवसेदिवस माळ्यावर ठेवलेले खाद्यपदार्थ आणि मिरच्यांची पोती ते कुरतडतात. अय्यारावने उंदीर पकडण्याची व्यवस्थाही केली. पण पकडलेले उंदीर मारायला त्याचे मन होत नसे.

तो ते दूर सोडून येई. पण रात्री मूषक महाशय पुन्हा आपल्या जागी परत येत. एकदा उंदरांना मारण्याच्या औषधाचाही प्रयोग केला. पण मेलेल्या उंदरांच्या दुर्गंधीमुळे जीव नकोसा होई. त्यामुळे घरात राहाणे कठीण होई. एकदा ते जेवत असताना वरून मेलेल्या उंदराच्या शरीराला लागलेले पांढरे किडे खाली पडले. अय्याराव यामुळे घाबरून गेला. एक मांजर पाळले तर ते या मूषकसेनेला भिऊन मालकीणीबरोबर बंगल्यात जाऊन झोपत असे. त्या घरात कधीही राहात नसे.

डॉक्टर साहेबांना दोन अपत्ये आहेत. मुलगा हजारो मैल दूर लष्करात अधिकारी आहे. मुलीचे सासर इथून आठ मैलावरच आहे. कधी कंटाळा आला तर घराला कुलूप लावून उत्तरेकडे जवळच असलेल्या एका वडाच्या झाडाखाली उभे राहून ते गप्पा करू लागतात. इतक्यात एखादी बस येते आणि तिच्यातून ते मुलीच्या सासरी जातात. तेथे दिवसभर राहून ते परत येतात. त्यांचा हा नेहमीचा कार्यक्रम झाला आहे.

डॉक्टरांनी अनेक लोकांना रोगातून बरे केले. पण उंदीर आणि सापांच्या या पीडेपासून ते स्वत: काही मुक्त होऊ शकले नाहीत.

एक दिवस सकाळी त्यांच्याकडे एक पारधी आला. गरीबांवर दया कर-णाऱ्या डॉक्टर साहेबांसाठी त्याने मुंगसाचे एक पिल्लू आणले होते. त्याच्या बायकोला उलटया होत होत्या तेव्हा डॉक्टरांनी तिला बरे केले होते. त्याचीच ही परतफेड आहे.

"हे घेऊन मी काय करू ?" डॉक्टरांनी विचारले.

"आपल्या घरात साप आणि उंदीर फार आहेत साहेब. सध्या हे पिल्लू पालीएवढे आहे. पण सहा महिन्यांनी ते खूप मोठे होईल. मग त्याचा आप-ल्याला किती उपयोग होतो ते आपल्या लक्षात येईल."

"हे काय पाळीव जनावर आहे ?"

"ते आमच्यावर सोडा साहेब. पंधरा दिवस याला एखाद्या सुरक्षित जागी दोराने बांधून ठेवा. कुत्र्या मांजराला त्याच्या जवळ जाऊ देऊ नका. ते दूधभात खाईल मासळी खाईल कोणतीही गोड वस्तू खाईल. मग त्याच्या गळ्यात तीन घुंगरू बांधून टाका."

"घुंगरू बांधल्यावर ते उंदरांना आणि सापांना कसे पकडील ? मांजराच्या

गळयात घंटी बांधल्यासारखं आहे हे !"

"असा नाही साहेब. घुंगराचा आवाज ऐकून इतर मुंगसं त्याला स्वत: जवळ येऊ देणार नाहीत व असहाय्य होऊन त्याला इथंच राहवं लागेल."

मुंगसाचे पिल्लू हातात घ्यायला डॉक्टर घाबरत होते. पारध्यानेच त्याच्या गळयात दोरी बांधली. त्याच्या हिंडण्या फिरण्याचीदेखील त्याच वेळी व्यवस्था करून टाकली. दूधभात कालवून त्याच्यापुढे ठेवला तर त्याने तो खाल्ला नाही. ते कुरकुरु लागले.

"अरे, हे तर किरकिरते आहे. हे कसं इथं राहाणार ?"

"आईला सोडून आले आहे ना ? दोन दिवस आईसाठी रडेल साहेब."

"तुला हे कुठं मिळालं ?"

"त्या तिकडे साहेब. रस्त्याच्या पलीकडच्या वडाच्या झाडावर ?"

"चल बघू." असे म्हणत डॉक्टर तेथून उठले दोघेही झाडाजवळ पोहोचले तेव्हा दोन मोठी मुंगसे वर-खाली धावत ओरडताना दिसली.

"बिचारी आपल्या पिलाला शोधताहेत. नको, ते पिल्लू आणून इथे सोडून दे. मला ते नको."

"नाही साहेब. यांना आणखी पिले होतील. आपल्याला राग येणार नसेल तर एक गोष्ट सांगतो. . .आता आपल्याला तर मुल होणार नाहीत. हेच पोर मोठं होऊन आपल्याला पुष्कळ मदत करील. आता तर ते दत्तक दिलं गेलं आहे. आता आपणच त्याचे आईबाप."

डॉक्टर एकटेच परत आले. त्यांच्या पत्नीने. . .अम्मायम्माने. . .साखर-पोळी खाऊ घालून त्या पिलाला गप्प केले. अऐडन्ना पारधी दोनतीन दिवसांआड येऊन डॉक्टरांना पिलाच्या संगोपनाबद्दल सल्ला देत असे.

अम्मायम्मा स्वयंपाक झाल्यावर मुंगसाजवळ राहात असे. हळू हळू ते आंगठ्याएवढे झाले. पंधरा दिवसांनी त्याला बांधून ठेवण्याची गरज राहिली नाही. गळयात दोरी बांधून जिकडे न्यावे तिकडे ते फिरून येई. लहानसे तोंड, तोंडाच्या समोरच्या भागावर हलका लाल रंग, जांभळया रंगाचे शरीर, केरसुणीसारखी शेपटी, चिमुकले डोळे, चिमुकले कान. . . ते नाचू बागडू लागले की घुंगराचा होणारा रुणझुण आवाज. . ,अम्मायम्माने त्याचे नाव ठेवले बय्यन्ना. . .बय्यन्ना. . .

एक महिन्याने दोरीचीही गरज राहिली नाही. नाव घेऊन हाक मारली की ते धावत येई. व्यवस्थित खाणे खाऊन ते दिवसेदिवस झपाट्याने मोठे होऊ लागले. आता ते घरात राहात नाही. पिंजऱ्यातही राहात नाही. नदीकाठच्या खडकामध्ये एक लहानसे बीळ तयार करून तिथे ते राहाते. सकाळी कॉफी पिण्याची वेळ झाली की ते बिळातून बाहेर येते, गच्चीवर चढून भिंतीच्या काठाकाठाने रुणझुण आवाज करीत चालत खाली उतरते. त्याची रुणझुण ऐकताच "बय्यन्ना, ये...." असे म्हणून अम्मायम्मा त्याला बोलावते. त्याच्यासाठी भिंतीजवळ एक जुनी सतरंजी पडलेली असते. आल्याबरोबर तिथे बसून ते समोरचे पाय वर उचलते. इडलीमध्ये साखर नसली तर ते रुसते. पण साखर टाकताच सगळ्या वस्तू पाच मिनिटांत संपवून टाकते. मग परत जाताना घराच्या चारी बाजूंना गस्त घालून ते आपल्या बिळात निघून जाते.

मध्येच कधी अम्मायम्मा नदीकाठी जाऊन बयन्ना म्हणून हाक मारते तेव्हा एका हाकेतच ते रुमझुम करीत बाहेर येते. अम्मायम्माच्या हातात मासा आहे का ते बघते. मासा असला तर तिच्या पायावर उभे राहून वर चढण्याचा प्रयत्न करते. अम्मायम्मा त्याला वर उचलून "तुझ्यासाठी आणला आहे" असे म्हणून मासा खाली टाकून देते. मग ते अम्मायम्माच्या हातातून उतरून मासा घेऊन निघून जाते.

आता बय्यन्ना घरातला लाडका मुलगा बनला आहे. पोटभर खायला मिळाले नाही तर तो आरडाओरडा करतो, अम्मायम्माच्या पायावर पडतो, कोणतेही काम करू देत नाही. सारखा ओरडतो आणि तिच्या खांद्यावर चढून कानात काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करतो. आपल्या चिमण्या हातातोंडाने ते लाडके पोर आईला गुदगुल्या करते.

त्या लोकांच्या दृष्टिने बय्यन्ना आता सहा महिन्यांचा मुलगा आहे. पण आता तो घरमालक बनला आहे. घरमालकाच्या हातून ज्या गोष्टी झाल्या नाहीत त्या सगळ्या हा मुलगा करून दाखवतो आहे. आता घरात उंदीर नाहीत. घुशी बेपत्ता झाल्या आहेत. सापाचे पिल्लूदेखील दिसत नाही. नदीकाठी सापाची कातदेखील नजरेला पडत नाही. यावर्षी घरात वस्तू जिथल्या तिथे राहातात. भाजीची टोपली पेटीवरच राहाते. धान्य कधी जमिनीवर किंवा एखाद्या सतरंजीवर पडून राहाते. नदीवरून येणाऱ्या थंड हवेचा आनंद लुटीत चांदण्या-

मध्ये, नदीच्या लहरींचे सौंदर्य पाहात दोघे आता सुखात राहात आहेत. कधी कधी त्यांना तरुणपणातले दिवस आठवतात. पूर्वीप्रमाणे आता पायावर साप चढण्याची भीति राहिलेली नाही.

रात्रीच्या वेळी कधी मुलाला बोलवावे त्याप्रमाणे "बय्यन्ना, ये"... अशी हाक मारताच रुणझुण ऐकू येते. तो जवळ येऊन त्यांना प्रदक्षिणा घालून नमस्कार केल्यासारखा फिरू लागतो. मग डोके उचलून तो अम्मायम्माकडे पाहातो आणि तिच्या पायावर जाऊन बसतो. ती बय्यन्नाला उचलून खांद्यावर बसवते. तो आपले तोंड तिच्या गालांवर टेकवतो. "चल पळ आपल्या बिळात" असे म्हणताच रुणझुण करीत तो निघून जातो.

एक दिवस सकाळीच डॉक्टर साहेबांच्या घरासमोर हातात छडी घेऊन भैरवय्या उभा राहीला. तो त्यांचा लांबचा नातेवाईक आहे. आपल्यापेक्षा या लोकांची परिस्थिती चांगली आहे हे त्याला पाहावत नाही. नेहमी काही तरी कारण काढून त्यांना त्रास देण्याचा त्याचा प्रयत्न असतो. आपल्या झुपकेदार मिशांवर आपण लिंबू ठेवू शकतो, अशी ऐट तो मिरवतो. लांब लांब केस उलटे फिरवून तो मानेवर सोडून देतो.

पाच मेलेल्या कोंबड्या दारात फेकून त्याने आरोळी ठोकली.

"काय झालं?" डॉक्टरांनी विचारले.

"काय सांगणार? रात्री बय्यन्नानं या कोंबड्यांना मारून टाकलं."

"कोणी पाहिलंय?"

"याचाही पुरावा पाहिजे?"

"डोळे लाल करून काम चालणार नाही. आमच्या बय्यन्नांवर खोटा आरोप करू नकोस. तो असं वाईट काम करणार नाही. त्याला बोलावून जे द्यावं तेवढंच तो खातो. बस!"

"तुम्हाला साक्षीदारच पाहिजे तर आता घेऊन येतो."

भैरवय्याने शेजाऱ्याची साक्ष काढली. बय्यन्नानेच कोंबड्या मारल्याचे त्याने सांगितले. डॉक्टर ओरडून म्हणाले, "ही साक्ष खोटी आहे?"

"याची किंमत दहा रुपये आहे, की टाका?"

"उगीचच देणार नाही. आमचा बय्यन्ना असा पापी नाही. मी एक पैसा-देखील देणार नाही. नाही देणार!"

"बडे आहात म्हणून असं बोलता काय? नुकसान माझं झालंय, तुमचं नाही. ठीक आहे. या कोंबड्या माझ्या नशिबातच नव्हत्या असं मी समजेन." असे म्हणत त्याने त्या कोंबड्या नदीत फेकून दिल्या. उडणाऱ्या गिधाडांनी त्या मधल्यामधे पकडल्या आणि त्यांची आपसात झटापट सुरू झाली

संतापून डॉक्टर घरात आले तशी त्यांच्या पत्नीने म्हटले, 'तो बदमाश माणूस आहे. त्याच्याशी कशाला भांडता. अर्धी किंमत देऊन मिटवून टाकायचं होतं.'

डॉक्टर आणखी भडकले, "नालायक! निरपराध बय्यण्णावर आरोप करतोय. मग आम्ही गप्प कसे राहू? बय्यण्णा तिथे गेला असता तर घुंगुरांचा आवाज झाला नसता? कोंबड्यांचा आवाज ऐकू आला नसता? ते लोकदेखील जागे झाले नसते?"

भैरवय्याने घरी येऊन सगळ्यांना सांगितले, "आपण खोटे ठरलो आणि तो खरा! आता आपली आपणच काळजी घेतली पाहिजे. राहिलेल्या कोंबड्या सांभाळा. त्या घरात ठेवा, आपण बाहेर झोपू.

दहा दिवस होऊन गेले. भैरवय्या डॉक्टरांकडे औषधासाठी आला. एकही पैसा न घेता डॉक्टरांनी औषध दिले. कोंबड्यांचे प्रकरण ते विसरून गेले होते.

आपल्या मुलीला भेटायला जाण्यासाठी तयार होऊन डॉक्टर आणि त्यांची पत्नी बाहेर पडले. घराला कुलूप लावल्यावर मागच्या अंगणात दूधभाताचा वाडगा ठेवीत अम्मायम्माने म्हटले, "बय्यण्णा, दुपारी खाऊन घे. गावाला जाऊन संध्याकाळपर्यंत आम्ही परत येऊ. घरी नीट राहा." आणि ती चालू लागली.

पुन्हा पुन्हा सांगूनही बय्यण्णा त्यांच्या मागे चालू लागला. दोघे वडाच्या झाडाखाली बसची वाट पाहात उभे होते, तोच मागून मुंगसांचे ओरडणे ऐकू आले. पाहिले तर बय्यण्णाजवळ आणखी दोन मोठी मुंगसे उभी होती. आणि ओरडून ती बय्यण्णाला पुढे येऊ देत नव्हती.

"हे पाहा बय्यण्णाचे आईबाप." डॉक्टरांनी सांगितले. "दोघे बय्यण्णावर हल्ला करायला बघताहेत. बय्यण्णाला त्यांनी वाळीत टाकलेलं दिसतंय."

"ते त्याला मारतील सुद्धा, त्यांना हाकला नं!" अम्मायम्मा म्हणाली.

"ये, बय्यण्णा असे म्हणून मोठ्या मुंगसांना पळवून लावल्यावर बय्यण्णा अम्मायम्माजवळ आला आणि तिच्या पायावर पडला. तिने जवळ घेतले

तसा तोंडाला तोंड लावून काही आवाज करू लागला.

"तुझे आईबाप तुला रोखत होते म्हणून तू रडतोस का? इकडे बघ. मी तुझी आई आहे आणि ते तुझे वडील. . . जा घरी जा. तू घरात राहिला नाहीस तर शत्रू पुन्हा हल्ला करतील. जा बेटा जा." अम्मायम्माने त्याचा पापा घेतला आणि थोडे मागे जाऊन ती त्याला सोडून आली. तेवढ्यात बस आली. आणि दोघे निघून गेली. इकडे बय्यन्ना परत येऊन घराच्या चारी बाजूस एकवार गस्त घालून पुन्हा बिळात जाऊन बसला.

दहा वाजले. अजून दूधभात खाण्याची वेळ झालेली नाही. बय्यन्ना बरोबर वेळवर त्यासाठी बाहेर पडे. "बय्यन्ना, ये" असा बाहेरून आवाज आला. बय्यन्नाने बाहेर येऊन पाहिले. पुन्हा हाक आली. भैरवय्या किनाऱ्यावर उभा आहे. बाहेर दुसरे कोणी नाही. नदीतही जवळपास कोणी नाही.

"ये बय्यन्ना . . . हा घे मासा . . . ये ये !"

"रुणझुण आवाज आला. बय्यन्ना तुरुतुरु वरखाली धावू लागला. भैरवय्याच्या हातात मासा दिसला." भैरवय्या पुढे होत म्हणाला, "मासा आणला आहे. बय्यन्ना, ये . . . ."

मागेपुढे होत लपून छपून इकडे तिकडे पाहात बय्यन्ना मंदार वृक्षामागे लपला होता. शेवटी त्याला त्या माशाचा मोह पडला.

मासा घेण्यासाठी रुणझुण आवाज करीत तो पुढे आला. समोरच हातात अणकुचीदार काठी घेऊन मिशा पिळीत भैरवय्या उभा होता. त्याने अचानक काठी उचलून बय्यन्नाच्या शरीरावर प्रहार केला. बय्यन्ना ओरडत तोंड वर करून उभा होता. जणू तो म्हणत होता, "मारू नका, मारू नका, माझा काही अपराध नाही." समोरचे दोन पाय वर उचलले गेले. जणू तो म्हणत होता, "मी तुम्हाला नमस्कार करतो. मला निरपराध्याला मारू नका." भैरवय्याने आणखी एक प्रहार केला आणि बय्यन्ना तडफडू लागला आणखी दोन तीन घावांमध्ये तो शांत झाला.

भैरवय्याने शेपूट धरून त्याला वर उचलले. तोंडातून रक्त येत होते. छोटे छोटे दात दिसत होते. माणसाचा प्राण घेणाऱ्या विषारी सापांचे तुकडे करून चावून चावून टाकणारे हेच ते दात. सापाला बघताच शूरपणाने त्याच्यावर तुटून पडणारे हेच ते पाय. ते आता निष्प्राण झाले आहेत. डोळे अगदी छोटे,

पण उंदीर आणि घुशींच्या कळपांना घाबरवण्याचे त्यांच्यात सामर्थ्य असे. आता ते डोळेही बंद झाले आहेत. ज्या कानांनी "बय्यन्ना, ये" हाकेमध्ये माणसाचे सौहार्द, प्रेम आणि वात्सल्य पाहिले आणि अशा या लोकांच्या दयेने आपल्यासारख्या अनेक लोकांचे पालन पोषण होईल, अशी आशा केली, ते कान कायमचे बंद झाले आहेत.

भैरवय्याने मोठ्या उत्साहाने त्याचे शेपूट पकडून तो मृत देह जोराने वाहात्या नदीत फेकला. आणि जणू आपण त्या गावचेच नाही अशा आविर्भावात त्याने नदीवर जाऊन हातपाय धुतले.

बय्यन्नाचा देह नदीतून वाहून गेला. तो सडला नाही. कुठेतरी किनाऱ्यावर लागला आणि कोण्या भुकेल्या गिधाडाची भूक त्याने भागवली.

संध्याकाळी सूर्यास्तापूर्वी गुरांना सकाळीच घेऊन गेलेला नोकर परत आला. अम्मायम्मा आणि डॉक्टरदेखील गावाहून परतले. बय्यन्नाला मिठाई फार आवडते, सुक्या मासळीवर तर तो जीव टाकतो. अम्मायम्माने या सगळ्या वस्तू आणल्या आहेत. घरी जाताच बय्यन्नाने त्याच्यासाठी ठेवलेले दूधभात खाल्ला की नाही हे पाहाण्यासाठी ती मागे गेली. दूधभात जसाच्या तसा पडला आहे.

"बघा हो, आपला बय्यन्ना किती मानी आहे. आपण त्याला समजावून गेलो होतो तरीदेखील त्याने खाल्ले नाही."

"तू भरवशील तर तो खाईल."

पिशवीतून एक सुकी मासळी काढून अम्मायम्मा नदीकिनारी गेली : "बय्यन्ना ये . . . तुझे आवडते पदार्थ घेऊन आले आहे. . .ये बेटा ये."

एकदा नाही अनेकदा हाका मारल्या. रात्र पडेपर्यंत बागेत अंगणात, घराच्या कानाकोपऱ्यात जाऊन अशाच हाका मारल्या.

"कुठं गेला आहे कुणास ठाऊक. घरापर्यंत नेऊन सोडलं नाही ते चुकलंच. अर्ध्या वाटेतच त्याला सोडून आले होते. मेली बसही नेमकी तेव्हाच आली. इतका वेळ झाला होता, आणखी जरा उशीरा आली असती तर ? वाटेत एखादा कुत्रा त्याला चावला की काय ? की मांजरानं त्याला पकडलं असेल ? की ती दोन मुंगसं त्याच्यावर तुटून पडली असतील?"

रात्रीदेखील ते पत्नीबरोबर वडाच्या झाडापर्यंत बय्यन्नाला हाका मारीत

गेले. येतानादेखील अनेक हाका मारल्या.

अम्मायम्मा घरी आली. पण तिने स्वयंपाक केला नाही. पाणीदेखील प्यायली नाही. रात्रभर जागी राहिली. मधून मधून नदी किनारी जाऊन ती हाका मारी, "बेटा बय्यना? तुझी आवडती मिठाई घेऊन आले आहे. छान छान मासळी घेऊन आले आहे. ये बेटा ये..."

सकाळ झाली पण ती रुणझुण ऐकू आली नाही. स्नान झाल्यावर देवाची पूजा करून हात जोडून म्हटले, "देवा, आमचा बय्यन्ना आम्हाला आणून दे." पाच माणसे शोधायला पाठवली. देवाला नवसदेखील केला.

दोन रात्री गेल्या बय्यन्नाचा शोध लागला नाही. तिसऱ्या दिवशी रात्री वरून आवाज ऐकू आला. अम्मायम्मा मोठ्या आशेने उठली. पण रुणझुण ऐकू आली नाही. खटखट आवाज ऐकू आला. दिवा उचलून पाहिले तर उंदीर आरामात धान्य खात होते. त्यांना हाकलण्याचीदेखील इच्छा झाली नाही.

अजूनदेखील ती जेव्हा मासळी विकत घेते तेव्हा त्यातली एक बय्यन्नासाठी काढून ठेवते. कागदावर बय्यन्नाचे चित्र काढून ते कापून घेते आणि त्याच्या गळ्यात घुंगरू बांधून ते पिंजऱ्यात ठेवून देते. वाऱ्याने ते हलते तेव्हा मोठ्या आशेने जाऊन ती पाहाते. दूधभात कालवून तिथे ठेवले. एखादे मांजर येऊन ते पिते तेव्हा तिला वाटते की, बय्यन्नाच येऊन पिऊन गेला असावा.

अजूनही अम्मायम्मा मनाशी आशा धरून बसली आहे की, बय्यन्ना कुठे तरी जिवंत आहे. कोणी तरी त्याला लोखंडी साखळीने बांधून ठेवले आहे. आणि ती साखळी चावून चावून तोडून एक दिवस तो परत येईल.

एक दिवस सकाळः ऊन थोडेसे वर सरल्यावर भैरवय्याने कोंबडीची पिल्ले घराबाहेर काढली. कोंबडीबरोबर ती पिल्लेही नदी किनाऱ्यावर पोहोचली. डॉक्टरांच्या घरापुढून ही वाट जाते. चिंचेच्या झाडाखाली नदी किनाऱ्यावर पडलेले धान्याचे दाणे कोंबडीची पिल्ले टिपून खात आहेत. भैरवय्याला वाटले होते की, आता बय्यन्नाची पीडा नसल्याने कोंबडीच्या पिलांना बाहेर सोडण्यात काहीच धोका नाही. मोठ्या मेहनतीने पाळलेल्या... पोसलेल्या या पिल्लांची रंगीबेरंगी शोभा पाहून तो खूष होतो आहे. त्यात रोज अंडे देणाऱ्या कोंबड्या आहेत. कोंबड्यांच्या झुंजीत सहज जिंकणारे कोंबडे आहेत. भैरवय्या मनातल्या मनात खूष आहे.

एवढयात आपल्या डोळयांवरही विश्वास बसणार नाही, असे दृश्य त्याला दिसले. बय्यन्नापेक्षा मोठे, दिसायला भयंकर आणि काहीसे काळ्या रंगाचे एक खूप मोठे मुंगूस अचानक तेथे आले आणि कोंबडीच्या पिल्लांवर झडप घालून त्याने त्यातले एक पकडले. भैरवय्याने त्या मुंगसाचा पाठलाग केला. पण त्या खडकात ते कोठे जाऊन बसले कोण जाणे! खूप शोधले, पण सापडले नाही. शेवटी निराश होऊन बाकीच्या कोंबडया घेऊन तो हळू हळू घरी परतला. कोंबडयांना परत बंदोबस्तात ठेवले पाहिजे असे त्याने बायकोला बजावले.

भैरवय्या आजारी पडला. तो काठीने मारीत असता भोळया भाबडया निष्पाप बय्यन्नाचे तोंड वर करून हात जोडणे आणि माणसाप्रमाणे "माझा काही अपराध नाही. मला मारू नका...मारू नका..." असे म्हणत विनंती करणे, प्राण भयाने ओरडणे हे सगळे पुन्हा पुन्हा आठवून तो उदास होत चालला. त्यातून तो पुन्हा उठलाच नाही.

थँक्स फॉर द पी. एम्.

—श्रीमती बीना देवी

त्या रांगेतली सगळी घरे सिमेंटच्या केकसारखी आहेत. त्यांच्या समोर रुबाबात पसरलेली सडक त्या घरांमध्ये राहाणाऱ्यांपाशी दारिद्र्याने जाऊ नये म्हणून ईश्वराने आखलेल्या निषेध रेषेप्रमाणे आहे. त्या सडकेसमोर पसरलेले समुद्राकाठचे वाळवंट चांदण्याच्या ढिगाप्रमाणे आहे. समुद्रावर पसरलेले चांदणे चांदीच्या वाफेसारखे आहे. त्या रांगेतल्या तेरा नंबरच्या इमारतीचे आवार सहा एकरांच्या आसपास असेल.

हिवाळ्याच्या रात्री घरापुढील स्तब्ध वृक्ष दगडासारखे उभे आहेत.

घराच्या फाटकाजवळचे गॅरेज नव्या साबणासारखे आहे. पोर्टिकोमध्ये उभ्या असलेल्या तीन मोटारी पंख मिटून बसलेल्या लोखंडाच्या पक्ष्यांप्रमाणे आहेत.

घरासमोरच्या उद्यानातील दोन पायवाटा शेलाट्या बांध्याच्या मुलीच्या वेण्यांप्रमाणे आहेत. त्या पायवाटांच्या बाजूला ठेवलेल्या छोट्या लाल कुंड्या मुलांच्या ओंजळीप्रमाणे आहेत. त्यांच्यातली पुष्पभाराने झुकलेली रोपे सफल मनोरथासारखी आहेत.

घरासमोरच्या संगमरवरी पायऱ्या खव्याच्या तुकड्यासारख्या आहेत.

वरच्या पायरीवर अंथरलेला पायपोस स्पंज केकसारखा आहे.

व्हरांड्यात ठेवलेले गोल टेबल एखाद्या मोठ्या फुलाच्या कोशाप्रमाणे आहे आणि त्याच्या बाजूला मांडलेल्या खुर्च्या फुलांच्या पाकळ्यांप्रमाणे आहेत. त्यावर सजवून ठेवलेले काळे काचेचे पुष्पपात्र गलेलठ्ठ भुंग्याप्रमाणे आहे.

त्या व्हरांड्याच्या कोपऱ्यात झोपलेला चपराशी घरातल्या गुलामासारखा आहे.

व्हरांड्याच्या मागच्या हॉलमध्ये छताला टांगलेला हिरवा विजेचा दिवा वाघाच्या डोळ्यासारखा आहे.

फरशीवर पसरलेला लाल गालिचा रक्ताच्या थारोळ्यासारखा आहे.

त्या इमारतीसमोर काळ्या रंगाची एक मोटार आवाज न करता गुपचूप

येऊन उभी राहिली. त्यातून एक उंचेला तरुण उतरला. त्याने काळा सूट आणि फेल्ट हॅट परिधान केली आहे. त्याच्या बुटाला रबरी तळ आहेत. त्याच्या हातात काळी बॅग आहे आणि डोळ्यांवर जाड चश्मा आहे. वाचकहो, चला, आपण या माणसाच्या मागे जाऊ या.

हलकेच दार उघडून त्याने आत प्रवेश केला. दबल्या पावलांनी व्हरांड्यात जाऊन विजेरीच्या प्रकाशात त्याने झोपलेल्या चपराशाकडे पाहिले आणि तो खुष झाला. त्याने कोटाची कॉलर वर केली आणि हॅट डोळ्यांवर ओढून घेऊन हलकेच दार आत लोटले.

दार आतून बंद नव्हते.

हॉलमध्ये पोहोचल्यावर जिन्यावरील दिवा त्याने विझवला. त्या घराच्या खालच्या भागात काहीही हालचाल दिसत नाही.

त्याने हॅंडबॅग उघडून पाहिली आणि गुपचूप पायऱ्या चढायला सुरुवात केली. तो जिन्याच्या वळणापर्यंत पोहोचला. इतक्यात वरून उतरणाऱ्या एका युवकाने त्याला घट्ट पकडले आणि तो ओरडला, "मॅथ्यू ! चोर आला."

त्याचे ओरडणे ऐकताच वरच्या हॉलमधील पाचही तरुणांनी येऊन त्याला घेरले.

"सॉरी बदर्स, उशीर झाला." काळा सूटवाला बोलला.

"अरे रेग्गी, कोणत्या पार्टीला कधी वेळेवर पोहोचला होतास, ते सांग तरी!" प्रश्नाबरोबरच चलपतीने उत्तरही देऊन टाकले.

"तुझ्यासाठी लग्न राहिलेलं नाही." सुंदरम् म्हणाला.

"बर केलंत तुम्ही." रेग्गी म्हणाला.

"आता दुसरी फेरी चालू आहे." डॉक्टर जगन्नाथमने सांगितले.

"तिन्ही फेऱ्या पूर्ण झाल्या म्हणजे हे पाणी नसून औषध आहे हे आमच्या लक्षात येईल." सुंदरम्ने जाहीर केले.

"ठीक आहे, पण दुसऱ्यांना सांगण्याची घाई करू नकोस." असे म्हणून रेग्गी हसला.

सगळे लोक वरच्या हॉलमध्ये गेले.

पडद्यामागे लपलेल्या चंद्राप्रमाणे हॉलमध्ये छुपी प्रकाश योजना आहे.

हॉलच्या मधोमध जेवणाचे महॉगनी टेबल डोंगरातल्या सरोवराप्रमाणे

पसरले आहे.

त्यावर सजवून ठेवलेल्या बशा त्या सरोवरात उमललेल्या फुलांसारख्या आहेत.

बशांजवळ ठेवलेल्या बाटल्या उंची "औषधांच्या" बाटल्यांप्रमाणे आहेत. त्यातली एक बाटली रक्ताच्या बाटलीसारखी लाल आहे. हॉलच्या भिंतीवर उभार वक्षस्थळांच्या मुलीचे एक चित्र आहे तिच्या ब्लाऊजची खालची बटणे सुटलेली आहेत. वरचे बटण ती सोडते आहे की लावते आहे हे सांगणे कठीण आहे.

पार्टी मोठ्या उत्साहात सुरू आहे. पार्टीत एकूण सात माणसे आहेत. त्यातले पाच मॅथ्यू (मधू), रेग्गी (रघू), सुंदरम्, जगन्नाथम आणि जगन्मोहन हे डॉक्टर आहेत. शिवाय कॉन्ट्रॅक्टर चलपती आणि व्यंकटराव वकील हेही आहेत.

अनेक लोक अनेक कारणांसाठी डॉक्टरांशी मैत्री करतात. काही जण स्टेटससाठी, काही जण फुकट उपचारासाठी आणि काही लोक नमुन्याच्या औषधांसाठी डॉक्टरांशी मैत्री करतात.

व्यंकटराव "औषधा"साठी मैत्री करतो.

चलपती "नर्सेस"साठी मैत्री करतो.

चपलतीला या "औषधात" काही रस नाही. पण तो कोणतीही पार्टी चकवीत नाही. पहिल्याच फेरीत त्याची भूक नष्ट होते. दुसऱ्या फेरीत कामवासना नष्ट होते आणि तिसऱ्या फेरीत झोप येते. आता त्याची तिसरी फेरी झाली आहे. त्यामुळे जांभई देत तो विचारतो, "ही पार्टी कशासाठी दिली जात आहे ?"

"त्याच्याशी तुला काय करायचंय ? मॅथ्यू देतो आहे आणि आम्ही घेतो आहोत. कशाची का पार्टी असेना." कोणीतरी वैतागून म्हणाले.

"मेमसाहेब जरा विरघळलेल्या दिसतात" चलपतीच्या आवाजात संशय आहे.

"तुला या गोष्टीची शंका वाटते की हेवा ?"

"फुकट मिळाल्यास दोन. नाही का ? या हिशेबाने कदाचित दोन्ही वाटत असतील."

"तुला विचारलं हा मूर्खपणा झाला."

"ठीक आहे. पुन्हा असं करू नकोस. खरं म्हणजे अशा पार्ट्यांना तू येतोसच का ?"

"तू स्वतःही पीत नाहीस आणि आम्हालाही पिऊ देत नाहीस."

"अरे चलपती, मागच्या खोलीत अंथरुण आहे."

"त्यावर धुतलेली चादर आहे."

"दोन उशा आहेत."

"जाऊन झोप जा."

"अरे बाबा, मी विचारतोय ही पार्टी कशासाठी दिली आहे, आणि तुम्ही मला म्हणताय झोपी जा."

"पार्टी . . . कशासाठी का असेना ? त्याच्याशी काय करायचंय ?" मॅथ्यूने विचारले.

"मॅथ्यू उद्या अश्वमेध यज्ञ करणार आहे. कदाचित त्यासाठीच ही पार्टी असेल."

"त्यात तुलाच घोडा बनायचं आहे. सकाळी बरंच धावावं लागणार आहे. लवकर जाऊन झोप."

"कोणाला धावावं लागणार आहे ?"

"तुलाच बेटा, आता झोप जा."

"पार्टी कशासाठी ते आधी सांगा. मगच मी झोपेन." चलपतीने हट्ट धरला.

"पार्टीचं कारण विचारतोस?" सिगरेट शिलगावीत मॅथ्यूने म्हटले," एक गंमत झाली."

"कसली गंमत ?"

"कधी ?"

"काल रात्री . . ."

कालची चांदणी रात्र चांदीची पावडर लावल्यासारखी होती.

जे लोक आतून उष्णता निर्माण करू शकतात त्यांच्या दृष्टीने बाहेर बरीच थंडी होती.

चित्रपट गृहात दुसरा खेळ सुरू झाला आणि रस्त्यांवर सामसूम होऊ लागली.

इमर्जन्सी वॉर्डमधून दुरून पाहिल्यावर इस्पितळ काचेच्या महालासारखे

दिसते. पण इनर्जन्सी वॉर्डमध्ये शांतता आहे. व्हरांड्यात सिंहाचलम चिकार पिऊन धुंद होऊन झोपला आहे.

वॉर्डच्या भिंतीवरील घड्याळ लोखंडी पट्टीने काळावर प्रहार करते आहे.

त्या खोलीच्या मध्ये एक टेबल आहे. त्यावर खादीचे कापड पसरले आहे. कापडावर एक पुस्तक आहे. ते पुस्तक दोन डोळे वाचीत आहेत.

हे पुस्तक "विद्वानांसाठी पुद्दुचेरी येथून खास प्रकाशित" केलेले आहे.

ते डोळे नर्स सरोजाचे आहेत. सरोजाला आता पुस्तक वाचावेसे वाटत नाही. त्या क्षणी तिच्या मनात जे होते ते लिहिले तर कोणीही सभ्य माणूस ते वाचणार नाही. परंतु असे पुस्तक वाचल्यावर साठ वर्षाच्या व्यक्तीच्या देखील मनात उत्पन्न होणारी ती इच्छा आहे.

तिच्या हाडांतून असह्य कळा निघू लागल्या. छातीवर दडपण आल्यासारखे वाटले आणि समोरच्या भिंतीवर जाऊन आपटावे असे वाटले.

समोर पडलेले टेबल तोडून टाकण्याची इच्छा झाली.

विचार बदलण्यासाठी फ्लास्कमधून कॉफी घेऊन ती प्यायली.

कॉफी पिऊन झाल्यावर जणू आपण आग प्यायलो आहोत असे तिला वाटले. श्वास टाकताना असे वाटले की आगीच्या ठिणग्याच बाहेर पडत आहेत. हा आवेग शांत व्हावा म्हणून...

कप खाली आपटला पाहिजे.

टेबल भिंतीवर आदळले पाहिजे !

किंवा झोपेची गोळी !

अशा गोळ्या घेऊन किती दिवस राहाता येईल ?

बिन गोळ्यांची रात्र, बिन औषधांची रात्र, बिन रोग्यांची रात्र... विरंगुळ्यासाठी तिला छेडून रात्रभर थांबणाऱ्या डॉक्टरविना जाणारी रात्र...

आता या महिन्यात येणार नाही.

बापरे एक महिना ! एक संपूर्ण महिना !

तीस रात्री ! !

त्याच रात्री...

कमला खुर्चीवर बसली आहे. समोरच्या आरशातला आपला चेहरा पाहून एखादा नवा चेहरा पाहिल्यासारखी ती चमकते.

आरशासमोर बसलेली कमला वधूसारखी सजली आहे.

त्या खोलीचा रंग हिरवा आहे. हिरव्या दिव्याच्या प्रकाशात ती खोली मगरींनी भरलेल्या शेवाळलेल्या तलावासारखी वाटते.

त्या खोलीच्या खिडक्या आणि दारे बंद होती. त्यामुळे काहीसे उकडत होते.

त्या उकाड्याने कमलेचे शरीरही गरम झाले आणि तिला ताप आल्या-सारखे वाटू लागले. कमलेचा चेहरा पाहाताच, आपल्या इच्छेविरुद्ध ती काही तरी करीत आहे आणि ते चुकीचे आहे, हे लक्षांत येते. ती भयभीत आणि व्याकुळ झालेली आहे. भीतीमुळे तिचे मोठे डोळे आणखीनच मोठे झाल्याने त्यांचे मूळ सौंदर्य नाहीसे झाले आहे.

तिच्या रेशमी साडीवरील जरीची फुले आणि अंगावरील दागिने यावर पडलेला विजेचा प्रकाश तिचे सौंदर्य वाढवीत आहे.

तिच्या खांद्यावरचा नायलॉनचा दुपट्टा चांदण्याच्या थरासारखा आहे.

तिची वेणी गुलाबपुष्पांनी ओथंबलेल्या झाडासारखी आहे.

तिच्य अंगावरचे दागिने सहा सात शेर वजनाचे असावेत. त्यांचा तिला तिरस्कार वाटत असल्याचे तिच्याकडे पाहिल्यावर जाणवते.

या दागिन्यांत जडवलेले खडे तिला रंगीबेरंगी किड्यांसारखे वाटत आहेत. तिचा कमरपट्टा सोन्याच्या सापासारखा आहे.

तिच्या रेशमी साडीवरील फुले तिच्याभोवती पसरलेल्या विषवृक्षाच्या जरीच्या फुलांसारखी आहे.

आरशात तिने आपल्या चेहऱ्याकडे पाहिले. भयाने तिचे ओठ थरथरताना स्पष्ट दिसतात.

तिची तयारी आणि दागिने पाहिल्यावर पळून जाण्यासाठी तयार झालेली बड्या घरची ती मुलगी आहे असे वाटते. परंतु बाहेर वाजणारा बँड ऐकल्यावर आपल्या इच्छेविरूद्ध लग्न करण्यास भाग पाडलेली ती वधू आहे असे वाटते.

इतक्यात हलकेच दरवाजा उघडून एका व्यक्तीने खोलीत प्रवेश केला आणि दार लावून घेतले. तो पुरुष तीस-पस्तीस वर्षांचा असावा. त्याचे शरीर पस्तीस वर्षांच्या व्यायामाने कमावल्यासारखे सुदृढ आणि बलदंड दिसते. लठ्ठ भुंग्यासारख्या त्याच्या भुवया आहेत. त्याने चोपून बसवलेले केस विसकटले

तर दोन तीन हात लांब होतील. त्याच्या दाढीमिशा छोटचा कात्रीसारख्या आहेत. त्याचा टेरिलिनचा शर्ट सापाच्या कातडीसारखा आहे. त्याने खांद्यावर टाकलेला स्कार्फ सापाच्या वरील पट्ट्यांसारखा आहे.

केव्हाही वाकून स्वतःचे सौंदर्य पाहाता यावे यासाठी जणू त्याच्या बुटांना खूप पॉलिश केलेले दिसते.

त्याच्या उजव्या गालावर क्रॉससारखी खूण आहे. कुठे तरी गुंडांशी मारामारी झाल्यावर झालेल्या जखमेचा तो व्रण असावा असे वाटते.

त्याच्या शर्टची डावी बाही दंडातील बेटकुळी दाखवण्यासाठी जणू मुडपली आहे असे वाटते. त्याच्या डाव्या कोपरावर चामडचाचा दहा इंची पट्टा आहे. त्या पट्ट्यावर मधून मधून पितळी खिळे आहेत. या पट्ट्याने कोणाला मारले तर तीन शेर रक्त येईल.

त्याच्या तोंडातील बिडी अजून संपलेली नाही.

नायिकेशी लग्न करायला निघालेल्या एखाद्या खलनायकासारखा तो माणूस वाटतो.

त्याला पाहून कमला उठून पळू लागली.

तिला रोखण्यासाठी त्या व्यक्तीने आपले हात पसरले.

तीन पावले पुढे गेल्यावर कमला त्याच्या बाहुपाशात जाऊन पडली.

त्याने प्रेमाने तिच्या डोक्यावरून हात फिरवीत विचारले, "आता कसे वाटते ?"

"भीती वाटते आहे. . . ."

"मध्येच घाबरून कसं चालेल ?"

एवढचात दारावर हलकी टकटक झाली. कमला खुर्चीत जाऊन बसली आणि केस सारखे करण्याचा बहाणा करू लागली. स्कार्फ संभाळीत त्या युवकाने दार उघडले.

दोन तरुणांनी पुष्पहार घेऊन खोलीत प्रवेश केला. त्यातल्या लहान्याने "खलनायका"च्या गळचात हार घातला. दुसऱ्याने "कमलाबाई, आपलं अभिनंदन कसं करावं तेच मला समजत नाही," असे म्हणत फुलांची माळ तिच्या हातात दिली.

माळ हातात घेत कमला म्हणाली, "मला भीती वाटते आहे."

"पहिल्या रात्री अशीच भीती वाटते. पण आपल्याला घाबरण्याची काही गरज नाही." लहान्याने मिस्किलपणे म्हटले.

मोठ्या तरुणाने खलनायकाकडे पाहून म्हटले, "शाबास ! आपलं दोघांचं अभिनय कौशल्य अद्भुत आहे. सगळ्या आंध्रभर आपण विजय पताका फडकवाल. पतीपत्नी असूनही आपण दोघांनी नायिकेची आणि खलनायकाची भूमिका करणं हे खास आकर्षण आहे."

"आपल्याला रंगभूमीचा अनुभव नाही असं कोणी म्हटलं तर त्यावर विश्वास बसणार नाही." लहान तरुण म्हणाला.

"दुसरा अंक सुरू होत आहे. हा अंक आपल्यावरच सुरू होईल. आपण तयार व्हा." मोठ्या तरुणाने कमलेला सांगितले.

कमलेने उत्तर देण्यापूर्वीच बाहेर एकाएकी आरडाओरडा झाला. "हॉलला आग लागली," असे लोक ओरडू लागले.

ते ऐकताच पुष्पहार घेतलेले दिग्दर्शक आणि त्यांचे सहाय्यक खोलीबाहेर निघून गेले आणि खोलीची दारे वाऱ्याने बंद झाली.

कमला घाबरली. तिने घाईघाईने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. पण दरवाजा उघडला नाही. "अग बाई ! दार उघडत नाही." कापऱ्या स्वरात कमला म्हणाली.

"मी उघडतो." असे म्हणत त्या युवकाने दार उघडण्याचा प्रयत्न केला पण ते उघडले नाही.

बाहेर अग्नीरूपी सर्पांच्या जिभा लळलळू लागल्या. लोकांच्या ओरडण्यामध्ये जळणाऱ्या लाकडांचे आवाज मिसळून गेले.

"दार उघडा, दार उघडा" असे दीनवाणे ओरडत कमला दार जोरजोरात ठोठाऊ लागली. तिच्या करंगळीला जखम झाली आणि दारावर रक्त वाहू लागले.

हिरव्या प्रकाशात ते रक्त काजळभरल्या डोळ्यातून निघालेल्या अश्रूंप्रमाणे दिसत होते.

"भिऊ नकोस कमला," त्याने तिला धीर दिला.

"भिऊ नको म्हणता ? अरे देवा ! आता काय करायचं ? लवकर विचार करा. नाहीतर आपण मरून जाऊ. जळून मरून जाऊ. . . . खिडकी उघडा

हो आपण मेलो तर बिट्टू . . ." ती एकदम थांबली. एखादे पिशाच्च दिसल्याप्रमाणे.

ती बोलत असतानाच त्याने खिडकी उघडली आणि "अरे देवा" असे म्हणत डोळे मिटून घेतले.

खिडकी उघडताच आगीच्या ज्वाळा ढगांसारख्या खोलीत पसरल्या. त्या ज्वाळांनी त्याचा विग, स्कार्फ, खोट्या भिवया आणि शर्ट यांनी पेट घेतला.

"कमला !" असे म्हणत तो कमलाकडे वळला.

त्याच्या चेहऱ्यावरील घामाचे थेंब ज्वाळांच्या लाल प्रकाशात रक्ताच्या थेंबासारखे दिसू लागले.

जगण्याची आशा अजिबात सोडून देऊन शब्दांपलीकडची एक भयानक किंकाळी मारून तो धावू लागला.

"अहो थांबा तरी !" असे म्हणत ती त्याच्यामागे धावली.

ती दोघे विषारी अंधारात पळत आहेत, पण आग हजारो जिव्हांनी त्यांचा पाठलाग करते आहे.

खडर्यांसारख्या सुऱ्या, पायांना बोचणारे काटे, विषारी अंधार, आगीचा वर्षाव . . . जळणारा जिवंत पुरुष आणि त्याच्या मागे जीवन आणि मृत्यू यांच्या मध्ये संभ्रमित अवस्थेत पडलेली ती स्त्री . . .

ती थकून गेली. तिला पुढे धाववेना. ती तेथेच थांबली.

आपण जणू एखादे दुःस्वप्न पाहात आहोत असे तिला वाटले. . . . जणू ती मरण पावली आहे . . . तिला पुरण्यात आले आहे . . . आणि मृत्यूनंतर ती स्वप्न पाहात आहे !

पण हे स्वप्न नाही. पायातून निघणारे रक्त खोटे नाही.

सगळे खरे आहे ! सगळे खरे आहे !

डोळे बंद करून ती पडून राहिली, तशी तिला पुन्हा ढगाचा आवाज जवळून ऐकू लागला आणि ती पुन्हा धावू लागली.

पायाखाली काही तरी मुलायम वस्तू . . . अंधारात झाडामागे ते हिरवे हिरवे डोळे कोणाचे आहेत ?

जंगलातल्या अंधारात . . . जहरी सापांच्या दाटीत तो वेडा ढग त्यांचा सतत पाठलाग करतो आहे.

कमलेला श्वास घेता येईना. "मला जाळून टाका, मी पुढे धावू शकत नाही." असे ओरडत एका धारदार खडकावर ती कोसळली.

झोपेत धावणारी कमला पलंगाला अडखळून आपल्या बिट्टूवर जाऊन पडली. उठून डोळे उघडून पाहिले तर मुलाच्या जागी तिला एक प्रेत दिसले.

मुलाचा श्वास बंद आहे. डोळे निष्प्राण झाले आहेत.

"बिट्टू, बाळा, काय झालं बाळा, बोलत का नाहीस ?" त्याचे खांदे गदगदा हलवत ती किंचाळली.

"आई !" असे म्हणण्याचा बिट्टूने प्रयत्न केला. पण विलग झालेले त्याचे ओठ पुन्हा मिटले तोंडातून शब्द फुटलाच नाही. त्याची मंद हाक तिला ऐकू आली नाही. ती हाक ऐकण्यासाठी तिचे आतडे तुटू लागले.

त्या दिवशी आणि त्याच्या आदल्याच दिवशी बिट्टूला जरा बरे नव्हते. तेवढ्यात वीष बरसणाऱ्या त्या अंधाऱ्या रात्री कोणत्या कृष्ण सर्पाने त्याला दंश केला ? कोणत्या महामारीने जिव्हा पसरली ?

"काय झाले बिट्टू ? बोल ना बेटा... कसं आहे ? ... एकदाच म्हण बाळा की मला बरं वाटतंय ...एकदाच... माझ्या राजा ! फक्त एकदाच म्हण...जन्मभर मी इथंच राहीन. आता तुला सोडून कधीही जाणार नाही. बाळा ! माझ्या पायांना मिठी मारून तू म्हणाला होतास आज तू माझ्याजवळ राहा ... तरीदेखील मी निघून गेले ... चुकले बेटा, चुकले ... पण तुला माहीत नाही बेटा की मी का गेले होते ते... तू लहान आहेस... तुला माहीत नाही ... मी स्वतःसाठी नव्हते गेले ! मी तर कधीच मेले आहे. मी तुझ्यासाठीच गेले होते... नाइलाजाने गेले होते. ... आता नाही जाणार बाळ ... आता नेहमी तुझ्याजवळ राहीन. पण एकदाच म्हण बाळ, मला बरं आहे म्हणून ... असाच तुझा हात धरून मी राहीन ... अशीच मरून जाईन ... पण एकदाच बोल, बेटा !" कमला वेड्यासारखी ओरडत राहिली.

पण बिट्टूच्या डोळ्यांमधील घबराट नाहीसा झाला नाही.

आता ती रिक्षातून चालली आहे...मांडीवर मोठ्या मुश्किलीने श्वासोच्छ्वास करणारा मुलगा पोटाबाहेर पडलेल्या आतड्याप्रमाणे शिथिल होऊन पडलेला आहे.

"देवा रे ! हा प्रवास तिकडच्याच दिशेने आहे की काय ?" रिक्षाची

साखळी तुटणार असल्यासारखा आवाज झाला.

"गेल्या वर्षी अगदी असंच . . ." रिक्षावाल्याच्या काळ्या पाठीवर ठिबकणारे चांदणे जस्ताच्या खिळ्यांसारखे दिसते आहे.

घरट्यात कबूतर अंग दुमडून बसावे तशी ती बसली आहे. "पुन्हा तिथं औषधासाठी . . . ." घरट्यातल्या पिलांना खाण्यासाठी येणाऱ्या घुबडांना पाहून घाबरणाऱ्या कबुतरासारखी ती रिक्षामध्ये थरथर कापू लागली.

"देवा, या आगीच्या समुद्रात मी आता पोहू शकत नाही. सुरीसारख्या या खडकांवर मी आता चढू शकणार नाही. पाहिजे तर मला मारून टाक. मारून तुकडे तुकडे करून टाक. शरिरातल्या शिरान्शिरा तोडून टाक. पाहिजे तर सावकाश मला खाऊन टाक. मला मारून टाक. हे जीवन हाच माझा चिरंतन मृत्यू आहे. आणि मृत्यू हेच मला सुखाचं वरदान ठरणार आहे." मरण येण्यासाठी ती अशी प्रार्थना करीत राहिली.

पण मृत्यूने तिची प्रार्थना ऐकली नाही.

रात्रीच्या पावणेअकरा वाजता . . . .

नर्स सरोजा झोपली आहे . . . .

तिच्या शेजारी सिंहाचलम झोपला आहे.

"आईसाहेब ! साहेब !"

आईसाहेबांची किंवा साहेबांची झोप उडाली नाही.

"आईसाहेब !"

आईसाहेब उठल्या नाहीत.

"भाऊसाहेब !"

आईसाहेबांनी एक डोळा उघडला.

"आईसाहेब !"

भाऊसाहेबांनी दुसरा डोळा उघडला.

"भाऊसाहेब ! आईसाहेब !"

भाईसाहेब आणि आईसाहेब दोघांनीही डोळे मिटून घेतले.

तिला झोपेतून उठायला पाच मिनिटे लागली आणि आपले म्हणणे समजावून द्यायला कमलेला पाच मिनिटे लागली.

"कधी सुरूवात झाली ?"

"फार दिवस नाही झाले. कालच त्याला जरा बरे नव्हते. आज थोडासा ताप वाटलो. रात्री नेहमीसारखा झोपी गेला. तेवढ्यात हा चमत्कारिक आजार सुरू झाला." नर्सने कमलेकडे लक्षपूर्वक पाहिले, तिच्या शरिरावर तोळाभरही मांस नाही. आता वेड लागणार असा चेहरा दिसतो आहे. जणू देवाने तिला चेहरा हसण्यासाठी नाही, फक्त रडण्यासाठीच दिला आहे.

तिला एखादी भूमिका द्यायची असेल तर ती केवळ दासीच्या भूमिकेत शोभली असती.

एखाद्या दुःस्वप्नासारखे तिचे रूप आहे.

"दुसरीकडे कुठे नेलं असतं तर बरं झालं असतं."

दुसरीकडं कुठं नेणार... स्मशानाशिवाय ? कमला काही न बोलता उभी राहिली.

"सिंहाचलम !"... चित्रपटातल्या नायिकेसारखी नर्सने हाक मारली. सिंहाचलमला जाग आली नाही. मग तिने खलनायकासारखी हाक मारली. तरीही तो उठला नाही. तिने वाघिणीसारखी डरकाळी फोडली तेव्हा तो उठला.

"ड्युटी डॉक्टरांना घेऊन ये."

सिंहाचलम निघून गेला.

"आईसाहेब जरा लवकर ..."

"मी काय करू शकणार ? मी फक्त नर्स आहे. डॉक्टर... डॉक्टर आले पाहिजेत."

पण डॉक्टर आले नाहीत.

"ड्यूटीरूममध्ये नाहीत," सिंहाचलमने सांगितले.

"का नाहीत ? हा मेमो घेऊन जा."

मेमोमुळे ड्युटीरूममध्ये डॉक्टर निर्माण होऊ शकला नाही.

"सिनेमा पाहायला गेलेत." सिंहाचलमने परत येऊन सांगितले.

"आईसाहेब ! मुलगा कसा करतो बघा हो."

"तसं व्हायचंच... धीर धरा. थिएटरमध्ये हा मेमो घेऊन जा. तुम्ही नाही... सिंहाचलम तू."

डॉक्टर सिनेमा पाहायला गेला तेव्हा तेथे त्याला फर्स्ट इयरमधले एक पाखरू भेटले. डॉक्टरांना पाहून ते पाखरू त्याच्या खांद्यावर येऊन बसले.

पाखराला घेऊन डॉक्टर मध्येच निघून गेला.

थोड्या तासानंतर सिंहाचलमने येऊन सांगितले–"थिएटरमध्ये नाहीत आणि घरीदेखील नाहीत."

"ड्युटी डॉक्टर कोण आहे ?"

"मॅथ्यू साहेब आहेत."

"सगळीकडे बघ. लायब्ररीत असले तर तिथून घेऊन ये."

लायब्ररीतही मॅथ्यू साहेब सापडले नाहीत. एक वाजता रेग्गी साहेब आले.

त्यांनी खादीची पँट आणि खादीचा शर्ट घातला आहे. चेहऱ्यावर सौजन्य, दया आणि बुद्धिमत्ता यांची चमक आहे. आपल्या वयापेक्षा तो पाच वर्षांनी मोठा दिसतो. त्याच्या नाकाजवळच्या सुरकुत्या आतापासूनच स्पष्ट दिसू लागल्या आहेत.

त्याचे नाकडोळे तरतरीत आहेत; रंग गोरा आहे, शरीर उंच आहे. केस काळे आहेत. सुंदर व्यक्तींमध्ये त्याची गणना करावी लागेल. त्याच्या मुद्रेवर अहंकाराची एक प्रकारची झाक आहे. त्याचा चष्मा परदेशी आहे. बूटदेखील उंची आहेत.

तरीदेखील त्याच्या चेहऱ्यावर "चांगला माणूस आहे," असा जणू बोर्ड लागला आहे. अधिकाऱ्याच्या खुर्चीत तो बसलेला असला तरी सरळ जाऊन भेटायला कोणालाही संकोच वाटणार नाही. कितीही मोठ्या कारमध्ये तो बसलेला असला तरी त्याला वेळ विचारायला कोणालाही भीती वाटणार नाही. तो कधीही रस्त्यावर उभा असला तरी त्याच्याकडे पैसा मागायला कोणीही भिकारी मागेपुढे पाहाणार नाही. त्याच्याकडे पाहिल्यावर आपल्यालादेखील असाच भाऊ पाहिजे होता असे कोणत्याही स्त्रीला वाटेल.

त्याच्याकडे पाहाणाऱ्याला वाटते की हा कधीही खोटे बोलणार नाही. कधीही कोणतेहि वाईट काम करणार नाही, कोणाला त्याची मदत पाहिजे असेल तर त्याला तो नकार देणार नाही.

तो वॉर्डमध्ये पोहोचताच त्याला बाकावर बसलेली कमला दिसली.

पतीचे प्रेत पाहाण्याची तयारी नसणाऱ्या वधूप्रमाणे तिने हाताच्या ओंजळीत तोंड लपवले आहे.

तुम्ही मरण पावलात तर तुमच्या पत्नीचीही अशीच अवस्था होईल असे

वाटायला लावणारा चेहरा होता तिचा.

ती तीस वर्षांची असावी. पण तिच्या चेहऱ्यावर तिला शंभर वर्षे झाल्याची कळा उमटली होती. तिने परिधान केलेली भाड्याची साडी अजून मळालेली नाही.

डॉक्टराला बघताच ती नम्रपणे खाली मान घालून उभी राहिली. जणू तिने काही अपराध केला होता. अशा प्रकारे लज्जेपेक्षाही जास्त भय प्रदर्शित करीत ती उभी राहिली.

बालपणीच्या ओळखीवर एखाद्या श्रीमंत घरच्या लग्नात जाऊन आपल्या चुकीबद्दल पश्चात्ताप होणाऱ्या व्यक्तीप्रमाणे ती सखेद उभी होती. बाकावर पांघरुणाखाली ठेवलेले मूल लहानशा पिशवीसारखे वाटते आहे.

रोग्याची नाडी पाहाताच डॉक्टर रेग्गीने नर्स सरोजाला रागाने विचारले की, "अजून थिअेटर तयार कसे ठेवले नाही." सगळी माणसं सारखी आहेत हे तुम्हा लोकांना कसं कळणार ? काही वाईट झालं तर जबाबदार कोण ?" तो रागारागाने म्हणाला.

ताबडतोब रोग्याला तो ऑपरेशन थिएटर शेजारच्या खोलीत घेऊन गेला.

थांबलेले युद्ध पुन्हा सुरू व्हावे तसे सगळे थिएटर जागे झाले. विजेचे दिवे पावसात धुवून निघालेल्या ताऱ्यांप्रमाणे प्रकाशू लागले.

कमलेच्या डोक्यांत आशा निराशेचा लपंडाव चालू आहे.

गेल्या वर्षी—याच इस्पितळात अगदी याच वेळी—असेच डॉक्टर. . .आपले भरल्या घरात रडणं बरं नाही ही गोष्ट माहीत असल्याप्रमाणे—सभ्यपणे अश्रू रोखून धरण्याचा तिचा प्रयत्न चालू आहे. नाकातून वाहाणारे रक्त थांबवण्या-साठी रुमाल दाबून धरावा तसे तिने आपल्या लाल साडीचा पदर नाकावर दाबून धरला आहे.

दहा मिनिटे झाली.

गळयांत स्टेथास्कोप आणि हातात नोटबुक घेऊन सचिंत नजरेने रेग्गी खोलीबाहेर आला.

कमला एकदम पुढे झाली. "साहेब कसं" एवढंच म्हणून ती थांबली. "आहे" हा शब्द तिच्या तोंडून बाहेर पडू शकला नाही.

"काळजीचं काही कारण नाही." रेग्गीने सांगितले. आपल्या चिंतेचा अर्थ

ही बाई वेगळा समजते आहे.... आणि आपण जणू एखादी वाईट बातमी देण्यासाठी मनाची तयारी करतो आहो असे त्याला वाटले.

"ताई ! ही औषधं समोरच्या दुकानातून ..." मेलेल्या मुलाचा कर मागणाऱ्या हरिश्चंद्राची कठोरता त्याच्यात नाही.

"साहेब !" ... मला जिवंत जाळले तरीदेखील माझ्याजवळ पैसा मिळणार नाही, हा होता त्या "साहेब !" चा आशय.

"काही हरकत नाही. ताई. चूक माझी आहे. आपल्याला सांगायला नको होतं. पण वाटलं, स्टॉकमधून आणायला उशीर होईल." डॉक्टरने हे अशा स्वरात म्हटले की पुन्हा कधी असे अनुचित काम करणार नाही. अशी जणू तो ईश्वरापुढे उभे राहून शपथ घेत होता.

डॉक्टरने सांगितलेली औषधे आणण्यासाठी सिंहाचलम पळत गेला. रेग्गी कमलेकडे रोखून पाहात आहे. तरीही त्याला काळजी करण्यासारखे काही वाटले नाही.

"ताई ! आपल्याला वाईट वाटणार नसेल तर..."

"विचारा साहेब," अशा नजरेने तिने त्याच्याकडे पाहिले.

"या... मुलाचे वडील..." पुढे तो काही बोलू शकला नाही.

"भाजले आहेत." असे ती म्हणाली, पण "मेले आहेत" असे आपण का म्हणालो नाही याचा तिला पश्चात्ताप होत राहिला.

"आय अॅम सॉरी ! एक्स्ट्रीमली सॉरी !"

मग त्याच्या मनात विचार आला की तिला कदाचित इंग्रजी येत नसेल. हे आपल्या लक्षात यायला पाहिजे होतं.

"मग तुम्ही ..."

"रेकॉर्ड डान्स ..." कधी नाचत असे.

आता ती दगडी पायरस्त्यावरचे फूल आहे !

म्हणजे पुरुषांचे मन रमवणारी कापडाची बाहुली !

"आय अॅम सॉरी" असे रेग्गी म्हणाला नाही खरा. पण हा प्रश्न आपण विचारायला नको होता असे त्याला वाटले.

पण आपला व्यवसाय त्याला सांगून टाकल्यावर कमलेचे मन मात्र आपली असहायता आपल्या भावाला सांगून टाकावी तसे हलके झाले.

नंतर वेळ भराभर गेला, कमलेचाही.

सिंहाचमल औषधं घेऊन आला.

"प्रभो !"

थिएटरची सज्जता झाली.

"देवा !"

ऑपरेशनचे कपडे घालून अंतरिक्ष प्रवाशाप्रमाणे रेग्गी खोलीबाहेर पडला.

"माझ्या मुलाचे प्राण वाचवा साहेब." तिची मूक प्रार्थना.

स्ट्रेचरवरून मुलाला थिएटरमध्ये नेण्यात आले.

"मला घेऊन जा देवा !"

ऑपरेशन सुरू करण्यापूर्वी नर्सने मुलाची नाडी पाहिली. आणि जणू एखादे प्रेत पाहावे तशी ती चमकून ओरडली, "डॉक्टर !"

"शटप् ! तुला काम करता येत नसेल तर बाहेर राहा." रेग्गीने चिडून म्हटले.

फर्स्ट इन्सिशन–गळ्यावर पहिला छेद–पुस्तकात लिहिले आहे–तसेच झाले. माणसातल्या चांगुलपणामुळे पुन्हा आशावादी बनलेली कमला धीर धरून तेथेच बसून राहिली. काही दिवस ती आस्था नाहीशी झाल्यामुळे मनातून तिला पश्चात्ताप होत होता.

बाबागाडीसारख्या ट्रालीवरून ऑक्सिजनची दोन सिलिंडर्स थिएटरमध्ये गेलेली तिने पाहिली.

"माझ्यासारख्या नाचणाऱ्या...हलक्या...बाईच्या मुलांना देवच पाठीराखा आहे."

उंची मद्यांच्या बाटल्याप्रमाणे दिसणाऱ्या रक्ताच्या बाटल्याही थिएटरमध्ये पोहोचल्या आणि दुसरी एक नर्स...

"इतकी माणसं... नर्स...डॉक्टर... औषध... आता काय होणार देवा ?... मनात अशुभ विचार का येतात ? "

ऑपरेशन संपले. ऑपरेशनचे कपडे उतरून डॉक्टर रेग्गी थिएटर बाहेर आला आणि सरळ कमलेजवळ जाऊन त्याने तिच्या खांद्यावर हात ठेवला. आपल्या मुलीला वैधव्य आल्याची बातमी सांगण्याची पाळी आलेल्या पित्याप्रमाणे त्याचे मन कातर झाले आहे.

"आय हॅव डन माय बेस्ट. पण काही उपयोग झाला नाही."

त्यानंतर रेगीने स्वत: रिक्षाची व्यवस्था करून सिंहाचलमला सोबत देऊन मायलेकांना पाठवून दिले.

या साहेबांनी एवढी दया दाखवली नसती तर जवळचे दोन रुपये रिक्षासाठीच खर्च झाले असते.

या सोनेरी कळीला,

या माणकांच्या खाणीला,

ज्या हातांनी तिचे संगोपन केले त्याच हातांनी तिला आता पुरायचे आहे, देवा !

"आपल्या सारख्या श्रीमंत माणसांमध्ये आपल्या सारखी एक जरी माणूस असेल तर त्याच्या पायांशी मी सगळा जन्म घालवीन –" असे मनातल्या मनात डॉक्टरला दुवा देत मुलाला हातात घेऊन ती उभी राहिली.

मृत यशूला हातात घेऊन रडणाऱ्या मेरीसारखी ती दिसते आहे !

"येते, साहेब !" कृतज्ञतेने भरलेले हृदय आणखी काहीही बोलू शकले नाही.

"पराचा कावळा करणाऱ्या वर्तमानपत्रवाल्यांनी खराच कावळा बघितला तर ते गप्प थोडेच बसणार आहेत ? रेगीनं मला वाचवलं नसतं, तर या लोकांनी माझी अब्रू वेशीवर टांकली असती," मॅथ्यू म्हणाला.

"त्यात काय विशेष आहे ?" आपल्या टेरीवूल पँटवर पडलेले चिप्सचे तुकडे बोटांनी उडवीत डॉक्टर रेगी बोलला.

"पण या पार्टीचं कारण काय ?"

"रेगीसाठी–ए मिलियन थँक्स फार द पी. एम्.–" मॅथ्यूने कृतज्ञतेने जाहीर केले.

"म्हणजे ?" कॉंट्रॅक्टरच्या काहीच लक्षात येत नव्हते.

"पी. एम. म्हणजे पोस्ट मार्टेम."

"म्हणजे ?" कॉंट्रॅक्टरचे आश्चर्य आणखी वाढले.

"म्हणजे, ते पोर वाकावरच खलास झालेलं होतं !"

मृगजळ

—श्रीमती आचंट शारदा देवी

पहाडातल्या खडकांवरून पाणी उसळत उड्या मारीत खाली वाहाते आहे. पहाड खूप उंच आहे. त्या जलधारेजवळ उभे राहून वर पाहिले म्हणजे हिरव्यागार वृक्षांनी भरलेला तो पहाड खूप सुंदर दिसतो. जणू तो आकाशाला गवसणी घालतो आहे असे वाटते. त्याचे शिखर खूप उंच आहे. वाटते, तेथवर क्वचितच कोणी पोहोचू शकेल.

नीला दररोज त्या धबधब्यापाशी पाण्यात पाय हालवीत बसते. पाण्याचे तुषार कधी कधी डोक्यावर पडतात तेव्हा त्या शीतल स्पर्शाने नीलेचे शरीर पुलकित होते, ती प्रसन्न होऊन जाते.

पाण्याची ही धार डोंगरातल्या कुठल्या तरी शिखरावरून वाहात येते. त्या खडकापर्यंत येते. त्या खडकापर्यंत लहानशा ओढ्याप्रमाणे ती वाहाते. आणि मग तिथल्या कड्यावरून एकदम खाली कोसळते. कधी कधी नीला वरच्या कड्यापाशी जाऊन झऱ्यासारखा वाहाणाऱ्या त्या जलाशयापाशी बसते, झोपी जाते. काही वेळ ती डोंगराच्या शिखराकडे मोठ्या आशेने पाहात राहाते. तिच्या मनात येते, मी इतके उंच चढू शकले, इथपर्यंत पोहोचू शकले तर किती छान होईल. पण एकटे चढण्याची हिंमत तिच्यात नाही. तरी देखील ती तिकडे आशेने पाहातच राहाते. तिची ही इच्छा अशी आहे की, ती कधीच पूर्ण होणार नाही. त्या पहाडावर कोणी महात्मा राहातो असे म्हणतात. नीलाने कधीही त्याला पाहिलेले नाही. किंवा तो ही कधी खाली आलेला नाही. वरपर्यंत आजवर कोणीही पोहोचू शकलेले नाही. दररोज रात्री पहाडावर एक दिवा जळताना दिसतो. आणि बराच वेळ तो मिणमिणत राहातो. म्हणूनच तिथे कोणी योगी राहात असावा असे लोक म्हणतात.

त्या पहाडाच्या पायथ्याशी नीलाची झोपडी आहे. तिच्यात नीला आणि तिची आजी या दोघींशिवाय कोणीही राहात नाही. पहाडा पलीकडे काही अंतरावर एक लहानसे गाव आहे. नीलाची आई जिवंत होती तेव्हा

नीलाची आजी तेथेच राहात असे. आजी कधी कधी म्हणते–"पोरी ! तुझी आई तुझ्याएवढी होती तेव्हा आम्ही तिथंच राहात होतो. तुझी आई रोज या झऱ्याजवळ येत असे. आणि गुरांना चारीत तिथेच फिरत असे. एक दिवस इथेच तिची कोणाशी तरी गाठ पडली. आणि तीच चिंता तिला लागून राहिली. त्यानं परत यण्याचं वचन दिलं होतं पण तो आला नाही. तुला जन्म दिल्यावर आजारी पडून तुझी आई वारली. समोरच ते आंब्याचं झाड आहे ना, तिथंच तिची उत्तरक्रिया झाली. आपण नेहमी याच झऱ्याजवळ राहावं असं तुझ्या आईला वाटे. ते आंब्याचं झाड मीच लावलं होतं. त्याच्याकडे पाहाते, तेव्हा जणू तुझ्या आईलाच मी पाहाते. त्याला मोहोर येतो तेव्हा तुझ्या आईचं हसणं मला आठवतं. म्हणूनच मी गाव सोडून इथं येऊन राहिले." यावर आईचे सगळे जीवन तिच्यापुढे चित्रासारखे उभे राहाते. त्या आंब्याच्या झाडाकडे पाहिल्यावर आपण देखील आपल्या आईला पाहातो आहेत असे तिला वाटू लागते.

आजीजवळ दोन म्हशी आणि काही बकऱ्या सोडल्यास दुसरी काहीही संपत्ती नाही. त्यांना सांभाळण्याचे काम फारसे कठिण नाही. त्या स्वतःच डोंगरावर चढून जातात आणि संध्याकाळपर्यंत घरी परत येतात. त्यांची कसलीही काळजी करावी लागत नाही. ती स्वतः आरामात झऱ्याजवळ आणि वृक्षांच्या छायेत फिरत राहते. फुले, पशू आणि पक्षी हेच तिचे मित्र झाले आहेत. पानांची सळसळ आणि पक्ष्यांची किलबिल ती ऐकत राहाते. पक्ष्यांचे थवे एकीकडून दुसरीकडे एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर आणि कधीकधी एकेकटे फिरतात तेव्हां तिला जणू दुसऱ्या जगात गेल्यासारखे वाटते. नित्य काही नवे अनोखे वाटत राहाते. एकलेपणाची जाणीव कधी होतच नाही.

डोंगरावर आणखी उंचावर दोन झोपड्या आहेत. त्यातल्या एकीत कोकिळा आणि गणपती राहातात. दुसरी रिकामी असते. कोणी प्रवासी पहाड पाहायला येतो तेव्हां तो तिथे दिवसभर राहून जातो. कोकिळा त्याला जेवूखावू घालते आणि गणपती पहाड दाखवितो. आजीला कोकिळेची सोबत होते. दुपारच्या वेळी दोघी एकमेकांशी गप्पा करीत बसतात. खालच्या झोपडीतून आजी जोराने काहीतरी सांगते आणि वरून कोकिळा तिला उत्तर देते.

गुरांबद्दल, ढगांबद्दल किंवा गळणाऱ्या पानांबद्दल सहसा त्यांचे बोलणे चालते. कधीकधी दोघी मिळून जवळच्या गावात जातात. तेथील लोकांच्या भेटीगाठी घेऊन, काही सामान घेऊन संध्याकाळपर्यंत त्या परत येतात. पहाडाच्या कड्यावर उभे राहून बाजूला पाहिल्यावर एक नदी दिसते. तिच्या दोन्ही बाजूंना हिरव्यागार वृक्षांनी भरलेले उंच उंच डोंगर आहेत. त्यामधून लहानसा रस्ता पांढऱ्या सापाप्रमाणे वळणे घेत गेलेला दिसतोय. हा रस्ता पायथ्याशी येऊन संपतो. दुरून येणाऱ्या गाड्या वगैरे तिथेच येऊन थांबतात. तेथून कोणाला वर जायचे असेल तर डोंगराळ रस्त्यातून पायी जावे लागते.

एके दिवशी दुपारी नीला झऱ्याजवळ गवतावर झोपली होती. तिची झोप संपली तेव्हां संध्याकाळ होत होती. संध्येची लाली पाण्यावर तरंगत होती. झाडांच्या पानांवर कोवळी किरणे नाचत होती. आळोखेपिळोखे देत, डोळे चोळीत नीला इकडे तिकडे पाहू लागली तेव्हा झऱ्याच्या पलीकडे कोणीतरी बसलेले तिला दिसले. ती व्यक्ती गवताच्या काड्यांशी खेळत नीलाकडे संथ नजरेने पाहात होती. नीला चमकली. कोण आहे कोणास माहीत. चेहरा नवा दिसतो, पूर्वी कधी पाहिलेला नाही. केव्हापासून आला आहे कोणाला माहीत? ती झोपली होती तेव्हापासूनही तो बसला असेल. केव्हापासून माझ्याकडे असा पाहात असेल कोण जाणे. ती लाजून चूर चूर झाली. झोपेने मलूल झालेला आपला चेहरा लपवावा असे तिला वाटले. पण पदर देखील तेवढा मोठा नाही. तिच्याकडे पाहाणारा तो पुरुष गोरापान आहे खूप सुंदर आहे. त्याने पेहेरलेले कपडे मोत्यासारखे शुभ्र आणि स्वच्छ आहेत. नीलाचा चेहरा लाल झाला.

या डोंगराळ भागात इतका नीटनेटका माणूस सहसा दिसत नाही, इतके स्वच्छ कपडे कोणी घालीत नाही. नीलाला तो माणूस देवलोकातून आल्यासारखा वाटला. चकित होऊन ती त्याच्याकडे पाहात राहिली. पाण्याच्या काठावर दोन खारी इकडून तिकडे बागडत आहेत. झाडांच्या फांद्यांवरून पांढरे पक्षी भर्रकन उडून गेले. नीला भानावर आली. डोंगर उतरून ती झोपडीकडे धावत गेली आणि तिने आजीला कोणीतरी नवा माणूस आल्याचे सांगितले. आजी म्हणाली, "माहीत आहे मला. आज दुपारी आला आहे तो. वरच्या झोपडीत राहातो आहे! कोकिळेने सांगितले — तो उद्या देखील येथे राहा-

णार आहे." नीला आनंदली. उद्या दिवसभर तो तिच्याबरोबर असेल. दिवसभर ती त्याला पाहू शकेल. त्याच्याशी बोलू शकेल. त्या पहाडावरील सर्व रमणीय चेहरे ती त्याला दाखवू शकेल. त्या डोंगरात जितके वृक्ष आहेत त्या सगळ्यांची नावे तिला माहीत आहेत, पण त्याला माहीत नाहीत. ती ते सांगेल तेव्हां तो आश्चर्याने ऐकत राहील. याच विचारात ती हरवून गेली. झाडेझुडपे, पक्षी, सरोवर यांच्याशिवाय तिला कोणाचीही सोबत नव्हती. पण त्या दिवशी त्या पुरुषाच्या सहवासाच्या कल्पनेनेच ती प्रसन्न होऊन गेली. एका क्षणात ती त्याच्यावर इतकी लुब्ध झाली की जणू त्यांचा जन्मोजन्मीचा संबंध होता. उद्याची वाट पाहात ती झोपी गेली.

सकाळी उठताच ती सरोवराकडे धावत गेली. पाण्याने तोंड धुतले, ओल्या हातांनी वेणी घातली. आयुष्यात प्रथमच तिला आपल्या सौंदर्याबद्दल शंका आली. पाण्यात झुकून तिने स्वतःचे प्रतिबिंब पाहिले. ती निराश झाली. आपले रूप तिला सुंदर भासले नाही. काळा सावळा चेहरा, खोल गेलेले डोळे. केस व्यवस्थित बांधण्याचा तिने खूप प्रयत्न केला. पण ते विखुरलेलेच राहिले. इतके दिवस आपल्या रूपाचा विचारही तिच्या मनात आलेला नव्हता. आता हे रूप तिला आवडेना. ती धावत घरी गेली. पेटीमध्ये अगदी तळाशी ठेवलेली रंगीत साडी काढून ती नेसली. तेव्हा कुठे तिचे थोडे समाधान झाले. काळ्या साडीवरचे लाल ठिपके तिला फार आवडले.

दिवस वर येऊ लागला तसा तो पुरुष धबधब्याजवळ आला. त्याच्या दोन्ही हातात शुभ्र फुलांचे गुच्छ आहेत. डोंगरावर फिरताना त्याने ते जमविले असावेत. नीलाने त्याच्याकडे पाहून स्मित केले. त्यानेही स्मित केले. आज तो नवा माणूस वाटत नाही. खूप दिवसांचा परिचित वाटतो आहे.

नीला बोलू लागली – "डोंगर बघायला आलात ?" त्याने म्हटले – "होय,' नीला पुन्हा उत्साहाने म्हणाली – "माझं नाव नीला आहे. आम्ही इथंच राहातो. या डोंगराचा कोनाकोपरा मला माहीत आहे. मी आपल्याला वाट दाखवू शकेन." त्याने उत्साह दाखवला नाही. विलक्षण निर्विकारपणे तो म्हणाला– "काल मी बरंच पाहिलं. गणपती माझ्याबरोबर होता." सरोवराच्या काठी गवतावर तो पाय पसरून बसला. त्याच्या हातातल्या फुलांशी तो खेळतो आहे. कधी तो ती अलग करतो तर कधी त्यांच्या जोड्या बनवतो.

नीला जवळच बसली आहे. त्याला विचारण्यासाठी अनेक प्रश्न तिच्या मनात निर्माण होत आहेत. आधी त्याचे नाव विचारले. "मैत्रेय," त्याने नाव सांगितले. तिला ते नाव काहीसे विचित्र वाटले. मनातल्या मनात "मैत्रेय, मैत्रेय" असे ती पुन्हा पुन्हा म्हणाली. मग ते नाव चांगले वाटले. मग त्याच्या गावाचे नाव विचारले. त्याने सांगितले. ते गाव कुठे आहे ते तिला माहीत नाही. डोंगर सोडून ती कधी बाहेर गेलेलीच नाही. ते गाव कदाचित खूप दूर असेल असे तिला वाटले. बाजूला नदीकडे जाणारा नागमोडी रस्ता दिसला. तिच्या मनात आले, कदाचित याच रस्त्याने गेल्यावर त्याचे गाव येईल. तिकडे बोट दाखवीत तिने त्या तरुणाला विचारले,... "आपण याच रस्त्यानं आलात का ?" त्याने म्हटले... "होय." मग तिने विचारले... "आपले गाव इथून खूप दूर आहे ?" तो हसून बोलला... "होय, दूरच." यानंतर काय विचारायला पाहिजे ते तिला कळेना. तो पाण्यात हात घालून झुकून खेळू लागला. हातातले एकेक फूल तो पाण्यात सोडू लागला. तिने पुढे झुकून पाण्यात पडणाऱ्या फुलांपैकी एक गुच्छ पकडला. तो गुच्छ मिळाल्यावर एखादी अपूर्व वस्तू हाती मिळाल्यासारखी ती खूष झाली. त्याच खुषीत तिने त्या तरुणाकडे पाहिले. त्याचे तिकडे लक्ष नव्हते. स्वतःच्याच धुंदीत पाण्यात हातपाय नाचवीत तो खेळत बसला. तो काहीतरी गाणे गुणगुणत होता. तिचे कुतूहल जागे झाले. गाणे तिला फार आवडे. आजीने शिकवलेली गाणी ती एकटी नेहमी गात असे. दुसरी कोणतीही गाणी तिला येत नव्हती. तिला राहावले नाही. त्या तरुणाला तिने विचारले... "आपल्याला गाणं येतं?" त्याने हसून म्हटले..."मला गाणं येत नाही. मी गाणं लिहितो, गात नाही." हे उत्तर तिला समजले नाही. त्याची गाणी ऐकण्याची नीलाला इच्छा झाली. न राहावून तिने त्याला गाण्याचा पुन्हा पुन्हा आग्रह केला. त्याने तिकडे लक्ष दिले नाही आणि उत्तरही दिले नाही. गाणे गुणगुणणे देखील त्याने बंद केले. नीला निराश झाली. थोड्या वेळाने त्याने विचारले..." "डोंगराच्या त्या शिखरावर कधी कोणी पोहोचलं आहे काय?" ती पुन्हा उत्साहाने सांगू लागली..."नाही, खूप दिवसांपासून मी स्वतःच तिथे जायला पाहातेय. पण एकटीनं जायला भीती वाटते. तिथं कोणी योगी राहातात असे लोक म्हणतात पण ते खरं की खोटं हे कोणालाही माहीत नाही." आता

युवकाचे कुतूहल जागे झाले.

"आज मी वर जाऊन येईन". निग्रही आवाजात तो म्हणाला, नीला लगेच उत्साहाने म्हणाली . . ."मी देखील येईन बरोबर" या युवकाशी गप्पा करीत इतका उंच डोंगर चढून जाण्यात खूप मजा येईल असा विचार तिच्या मनात आला. पण त्याने उत्तर दिले नाही. हो किंवा नाही असे तो काहीही म्हणाला नाही. जलधारेच्या काठाकाठाने दोघे वर जाऊ लागली. सावली प्रमाणे अधीर होऊन ती त्याच्या मागेमागे चालली होती. परंतु ती येते आहे किंवा नाही इकडे त्याने मागे वळून पाहिले देखील नाही. तो भराभर वर जात राहिला. ती हळूहळू त्याच्या मागून चालत होती.

त्याच्याबरोबर तिला चालता येईना. तो थोड्याच वेळात दिसेनासा झाला. नीला निराश झाली. तिला धाप लागली. रडतरडत ती तेथेच बसली. तिच्या मनात आले. . .त्या युवकाबरोबर तिला डोंगर चढायचा होता. पण ती आपल्याबरोबर यावी अशी त्याची इच्छा नाही. डोंगराचे शिखर पाहाण्याची इच्छा आता पूर्ण होणार नाही. तिला फार वाईट वाटले. सगळा पहाड सुना सुना वाटू लागला. कुठून तरी त्याच्या गाण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. ती चमकली. आनंदाने बेहोष झाली. कदाचित त्यानेच लिहिलेले गीत असेल ते. गाण्याचे सूर ऐकू येत होते पण त्यातले शब्द स्पष्ट एकू येत नव्हते. ती विचार करू लागली, काय अर्थ असेल या गाण्याचा ? मन पुन्हा उदास झाले. थोड्या वेळाने खाली उतरून ती घरी परत गेली.

दुपारी तिला पुन्हा तो तरुण दिसला. जलधारेपाशी त्याला पाहाताच ती सगळे दु:ख विसरली. मोठ्या उत्साहाने तिने विचारले. . ."आपण वर जाऊन आलात ? आपल्याला योगी दिसला ? तो आपल्याशी बोलला ?" सकाळच्या प्रमाणेच तरुणाने उदासपणे उत्तर दिले. . . "नाही, मी वरपर्यंत जाऊ शकलो नाही. थोडे दूर जाऊन परत आलो." ती पुन्हा निराश झाली. विमनस्क होऊन तिने दरीकडे पाहिले. तेथून जाणारा रस्ता दिसताच ती अस्वस्थ झाली. "आज निघून जाणार ?" तिने दीनवाण्या स्वरात विचारले.

"होय, आता थोड्या वेळाने जाणार," तरुणाने उत्तर दिले. तिचा चेहरा कोमेजला. पूर्वी एकदा ती त्या दरीतल्या रस्त्याने गेली होती. त्या रस्त्याने खूप दूर जायची तिची इच्छा होती. पण थोड्याच अंतरावर एक तलाव

चमचमताना दिसला. त्या पाण्याजवळ तिला जायचे होते, पण धीर झाला नाही. भय आणि संकोचामुळे ती एक पाऊलदेखील पुढे न जाता परत आली. अचानक तिला ही गोष्ट आठवली. ती म्हणाली... "त्या रस्त्यानं काही अंतरावर एक मोठं सरोवर आहे ना? त्यातलं पाणी खूप लखलखत असतं." तो हसला आणि म्हणाला... "सरोवर नाही, काही नाही." नीलाचा विश्वास बसेना. साशंक स्वरात ती म्हणाली... "एकदा मी त्या रस्त्यानं गेले होते. दूरवर चमकणारं पाणी खूप सुंदर दिसत होतं. एकटी असल्यामुळे मी त्याच्याजवळ जाऊ शकले नाही." यावर तो तरुण म्हणाला... "उन्हांत असंच दिसतं, ते पाणी नाही, मृगजळ आहे, दुरुन ते पाण्यासारखं दिसतं. आपण जसजसे त्याच्याजवळ जाऊ तसंतसं ते तितकंच दूर जात राहतं." नीलाचे मन उदास झाले. पाण्याने भरलेले दिसते पण पाणी नाही, हे तिला बरे वाटले नाही. कोमेजलेल्या जीवनाप्रमाणे तिला ते भासू लागले.

थोड्याच वेळाने गणपती आला. त्याच्या हातात पिशवी आहे. त्या तरुणाकडे पाहून गणपती म्हणाला... "संध्याकाळ होण्याआधीच आपल्याला इथून निघायला पाहिजे. चला, मी आपणाला थोडा वेळ पोचवायला येतो." एवढे बोलून गणपती डोंगर उतरू लागला. तो तरुण आळोखेपिळोखे देत उभा राहिला, नीलाकडे पाहून हसला आणि गणपतीच्या मागून चालू लागला. त्याला पाहात नीला तिथेच उभी राहिली. तिला सुनेसुने वाटू लागले. जसजसा तो तरुण पुढे जात राहिला तसतसे तिचे मन उदास होत गेले. त्याने एकदादेखील मागे वळून पाहिले नाही आणि एकदाही तिने त्याच्यावरची नजर काढली नाही. काही वेळाने तो दिसेनासा झाला. निराश होऊन नीलाने मान खाली घातली. अंधार पडेपर्यंत ती तेथेच बसून राहिली. प्रकाश आणि अंधाराच्या संधीकालात सगळा पर्वत भयंकर भासू लागला. सकाळी त्या तरुणाने गायिलेले गीत तिच्या कानांत घुमत आहे. त्या गीताचे शब्द, त्या शब्दांचा अर्थ काही समजत नाही. शब्दाविना गीत, पाण्याविना सरोवर, प्रीतिविना मन... हे सगळे तिला उदास करीत आहे. तो आता परत येणारही नाही. ती मात्र त्याला कधीही विसरू शकणार नाही. ही वेदना कदाचित कधीही दूर होणार नाही. एका क्षणी येऊन दुसऱ्या क्षणीच निघून जाणाऱ्याबद्दल हे प्रेम का? आपली ही व्यथा तिला व्यक्त करता येत नाही.

अंधारात तिच्याच्याने तेथे बसवेना. ती घरी निघून गेली.

आजी दिवा लावीत होती. नीला तिच्या जवळ जाऊन बसली. उदासपणे ती आजीकडे पाहू लागली. तिच्या मनात आले. . .काही दिवसांनी ती देखील आजी होईल, केस पांढरे होतील, तोंडावर सुरकुत्या पडतील, हात कापू लागतील. त्याही वेळी त्या युवकाचाच विचार तिच्या मनात असेल काय ? त्याचे सौंदर्य तेव्हाही तिच्या डोळयांत तरळत राहील काय ? ती भिऊन गेली, आणि आजीच्या गळयात पडून मुसमुसू लागली. वेदनेचा आवेग शांत होत नव्हता. ही वेदना कित्येक जन्मांपासून आपल्या आत्म्यात लपून राहिली होती असे तिला वाटले. आता त्या वेदनेला जणू वाट मिळाली होती. आजीने मायेने नीलाच्या डोक्यावरून हात फिरवीत विचारले. . ."काय झालं बाळ ?" आजीच्या बोटांच्या स्पर्शातून वाहाणारी ममता नीलाच्या मनास आणि शरीरास आनंदित करू लागली. त्या भावनेने तिला जरा बरे वाटले. मोठ्या प्रेमाने तिने आजीला म्हटले, "आजी ! तू आईसाठी आंब्याचं झाड लावलं होतंस ना ? मी गेल्यावर त्या पहाडावर पांढऱ्या फुलांचं झाड लाव. त्यावर नेहमी पांढरी फुलं फुलतील. जोपर्यंत फुलं फुलत राहातील तोपर्यंत मी देखील राहीन." आजीचे मन चरकले. तिच्या मानात आले. . ."मी काय नेहमी इथंच राहाणार ?" तरीही ती काही बोलली नाही.

नीलाने अश्रू पुसले. आजीने नीलाला जेवायला बोलावले. नीला बोलली . . . "नको." आजीचे दोन्ही हात मोठ्या प्रेमाने उचलून तिने आपल्या गळयात टाकले. तिच्या डोळयांत झोप उतरली. एका क्षणात तिला झोप लागली.

सकाळी उठून ती आंब्याच्या झाडाजवळ जाऊन बसली. . . झाडाच्या फांद्यांतून पोपट बोलत होता. प्रेमाच्या भाराने नीलाचे मस्तक झुकले. . . . जणू तिने काही चूकच केली होती.

नो रूम

कालो पट्नम रामा राव

चांदणे पिठासारखे पडलेले नाही. शहर काहीसे विचित्र आहे—सासुरवाडी-सारखे.

"खोली पाहिजे."

"सिंगल की डबल ?"

लगेच उत्तर मिळाले नाही, तशी एकाक्ष कारकुनाने मान वर करून पाहिले.

त्याच्या धूसर दृष्टीस नूकराजूची वेषभूषा मधुचन्द्रासाठी आलेल्या नवविवाहित वरासारखी वाटली नाही. त्याच्याजवळ उभी असलेली ग्रामबाला कुमारिकेसारखी वाटली. बरेच निरखून पाहूनही त्यांच्याबरोबर पेटी, बिछाना किंवा कमीतकमी हँडबॅग देखील दिसली नाही.

त्यामुळे त्याने सांगितले—

'नाही.'

'काय नाही ?'

'खोली नाही.'

घरभेद्या समजून अंतःपुरात धाकट्या घरातल्या वीर पुरुषास जाऊ न देणाऱ्या राजाच्या शालकाची आठवण होते आहे. . . . त्या कारकुनाला पाहून.

आपण कोणते गुपित फोडणार आहोत ते नूकराजूच्या लक्षात येईना. क्षणभर तो दिङ्मूढ होऊन उभा राहिला. थोड्या वेळाने, 'मध्येच अडवणारा हा फालतू माणूस कोण ?' हा विचार मनात येताच त्याला राग आला.

पण तोपर्यंत कारकून टेबलावर वाकून आकडेमोड करण्यात गर्क झाला होता. आपली तीक्ष्ण नजर कारकुनाच्या गुळगुळीत डोक्यावरून घसरते आहे असे पाहाताच नूकराजूने शेजारी असलेल्या देवुडूवर नजर वळवली.

देवुडूच्या डोळ्यांत या नजरेशी टक्करावणारा जळजळीतपणा त्याला दिसला नाही. त्याने घातलेले खाकी कपडे त्याच्यासारखेच फाटके वाटताहेत. आयुष्य-भर जूं ओढून मानेवर पडलेल्या घट्ट्यांच्या खुणा विसरू पाहाणाऱ्या म्हाताऱ्या

बैलाच्या वशिंडासारखे त्याचे खांदे आहेत. कारकुनावर आलेल्या रागाचे देवुडू-कडे बघता बघता तिरस्कारात रूपांतर झाले.

टक टक टक करीत बूट पायऱ्यांवर आपटू लागले आणि नूकराजू बाहेर पडला. त्याच्या मागोमाग त्याची अम्मडूही सावलीसारखी चालू लागली.

"कारट्यांनी नवे चाळे चालवले आहेत."

कारकुनाला कोणाविरुद्ध बोलायचे असले की त्याची पाठ वळताच तो ते सुरू करी. देवुडूला, ते परतून मारायला धावत येतील की काय, अशी भीती वाटते.

"तो पोरगा कोण असेल ?"

देवुडूला माहीत नाही. पण कारकुनाच्या प्रश्नाला काही ना काही उत्तर देण्याची सवय त्याला लागली आहे.

"तो पोरगा कोण आहे, सांगता येत नाही. पण त्याच्याबरोबर आलेली मुलगी त्याची बायको आहे."

'तू त्यांना ओळखतोस ?'

"ओळखत नाही. पण त्या मुलीच्या गळ्यात मंगळसूत्र आहे, म्हणून म्हटलं," तो चाचरत बोलला.

"मंगळसूत्र प्रत्येक बाईच्या गळ्यात असतं. पण ते त्याच्याच नावानं बांध-लेलं आहे कशावरून ? त्याच्यावर लिहिलंय थोडंच ?"

"तू बायकोला घातलेल्या मंगळसूत्रावर तरी असं नाव लिहिलेलं आहे काय ?" देवुडूचे मन विचारू पाहात होते. पण काहीच न बोलता त्याने खांद्यावर टॉवेल टाकला.

देवुडू जेवण्यासाठी पायऱ्या उतरून बाहेर पडला तेव्हा चित्रपटाचा पहिला खेळ सुटला होता. पहिला खेळ पाहून घरी जाणाऱ्या आणि दुसरा खेळ पाहाण्यासाठी घरून येणाऱ्या रिक्षा, मोटारी आणि बसगाड्या यांची रस्त्यावर झुंबड उडाली होती. पलीकडच्या पानाच्या दुकानाजवळ लोक किड्यांसारखे गोळा झाले आहेत. काळ्या सावल्यांप्रमाणे जमलेले ते लोक आणि शुभ्र, चांदण्याहूनही शुभ्र विजेसारख्या कांतीची ती पोरगा-पोरगी अजून तिथेच आहेत. त्या गर्दीकडे अम्मडू आश्चर्याने पाहाते आहे. नूकराजूची नजर अजूनही लॉजिंग हाऊसकडे जाते आहे. देवुडूला त्यांची दया आली.

देवुडू जेवण करून तोंडात चिरूट, काखेत चादर आणि डोक्यावर टॉवेल ठेवून आपल्या झोपडीकडे निघाला. त्याच्या आधी दीड प्रहरापासून चांदणे बरसत होते. देवुडूने चहूकडे पाहून साडेदहा वाजले असावेत असा तर्क केला.

बाराही महिने दिवसातून तीनदा बाहेर पडताना प्रत्येक वेळी तो वेळेचा अंदाज करतो आणि एखादे घड्याळ दिसले, तेव्हा त्याच्याशी आपले अनुमान ताडून पाहातो. त्याचा अंदाज सहसा बरोबर निघतो.

टेकडीवरून खाली दिसणाऱ्या चमचमणाऱ्या शहराकडे एक नजर टाकून त्याने आपला अंदाज पुन्हा पक्का केला. ही टेकडी गावाच्या उत्तरेला आहे. तिच्यावर काही झोपड्यांनंतर बंगलेच बंगले आहेत. त्यापलीकडे वस्ती नाही. पश्चिमेला एक मैलावर एक खूप मोठा कारखाना आणि त्याची लहानशी वसाहत आहे. कारखान्यापासून शहराकडे आणि पश्चिम व उत्तर यांच्यामधील रेल्वे जंक्शनकडे जाणाऱ्या वाकड्यातिकड्या रस्त्यावरून एक स्टेशनकडे आणि दुसरी शहराकडे अशा दोन लॉऱ्या शर्यतीतल्या सारख्या वेगाने धावताहेत. कधी त्या जवळ येतात, कधी दूर जातात. घरात दिवे दिसत नाहीत. शहर अंधाराची टिकली आणि प्रकाशाच्या दोरीसारखे दिसत आहे.

हळू हळू पावले टाकीत देवुडू लॉजिंग हाऊसवर पोहोचला, तेव्हा अकरा–सव्वाअकरा झालेले असतील.

चालता चालता देवुडूला समोरून एक जोडपे येताना दिसले. दक्षिणेकडे राहाणारे ते जोडपे सिनेमा-गृहाकडून येत असावे, असा त्याने अंदाज केला. बाईच्या हातात लहान मूल आहे आणि पुरुषाच्या खांद्यावर तीन वर्षांचा मुलगा आहे. ती बाई सिनेमातल्या विनोदी प्रसंगाची पुन्हा पुन्हा आठवण करीत उत्साहाने त्यांचे वर्णन करते आहे. एकीकडे भरभर चालण्याने येणारा थकवा आणि दुसरीकडे गप्पा करण्याचा उत्साह यात ती स्त्री दमलेली दिसते.

"तो मुलगा आणि मुलगी कोठे गेली असतील कोण जाणे," देवुडूच्या मनात आले.

दुसऱ्या लॉजमध्ये कदाचित खोली मिळाली असेल, नाही तर याच शहरातली ती असतील, तर दुसरा खेळ पाहून रिक्षा पकडतील. किंवा बाहेरून आली असतील तर बिचारी एखाद्या धर्मशाळेच्या ओट्यावर सगळी रात्र काढतील.

देवडूच्या मनात आले, आजकालची मुले पूर्वीच्या काळातल्या आमच्या-सारखी नालायक नाहीत.

आजकालच्या मुलांमधील उत्साह आणि तरतरीतपणा पाहून देवुडू खूष होतो. आठवडाभर ऑइल इंजिनवर काम केले किंवा कुठे मजुरी केली असली, तरी रविवारी ही मुले मळके कपडे काढून स्वच्छ परीटघडीचे कपडे घालतात. त्यादिवशी ते एखाद्या मारवाड्याच्या मुलाप्रमाणे किंवा राजाप्रमाणे भासतात. दिवसभर क्लबात गप्पागोष्टी, खेळ आणि संध्याकाळ झाली की फिल्मी दुनियेत ती रमून जातात. चवली पावलीचे तिकिट मिळाले नाही तर चटकन् सांगतात, वरचे तिकिट द्या. उद्याची त्यांना काही काळजी नाहीच.

पोतराजूचे म्हणणे आता देवुडूच्या ध्यानात येऊ लागले आहे.

मजूर पैसा जमवून महाल बांधतील, असे कधीच व्हायचे नाही. म्हणच आहे – पेळू शेकडो बनले, तरी पिंजाऱ्याजी बायको लक्तरातच राहाणार! तेव्हा जे काही मिळते आहे त्यात मौज करणेच चांगले. हे सगळे कळूनही त्याच्यासारखे लोक तसे करू शकत नाहीत. पोतराजूसारखी मुलेच ते करू शकतील. तेवढे काळीज आहे त्यांच्यापाशी.

देवुडू सध्या जेथे काम करतो आहे ते लॉजिंग हाऊस बनवणाऱ्या सुतारा-पैकीच पोतराजू एक आहे.

सगळ्यात म्हाताऱ्या मिस्त्रीला नावापुरतेच सर्वजण मोठा मिस्त्री म्हणत, पण काम व्यवस्थित करून घेण्याची आणि त्यावर देखरेख करण्याची संपूर्ण जबाबदारी पोतराजूच सांभाळी.

तो पूर्ण तीस वर्षाचा देखील नसेल, पण स्वत: काम करण्यात तो जितका तरबेज आहे, तितकाच दुसऱ्याकडून काम करून घेण्यातही तो हुषार आहे. वेळ पडली तर, तो मजुरांना जिवापाड मेहनत करायला लावी आणि गरज पडली, तर त्यांना पाठीशी घालून त्यांची बाजूही घेई. मोठा मिस्त्रीच काय, पण ठेकेदारदेखील त्याला भीत असत, पण तो कुणाला घाबरत नसे. त्याचे मुळी ते ब्रीदच होते–यांना आम्ही कशाला भ्यायचे? हे लोक आमचे पोट भरताहेत की आम्ही त्यांचे दोंद वाढवतो आहोत? हा बंगला बघा, तुम्ही, आम्ही आणि कुत्र्याची अवलाद असणारा हा ठेकेदार–सगळे मिळून बांधताहेत. बंगला तयार झाल्यावर तुम्हा-आम्हाला काय मिळणार आहे? ठेकेदाराला

इतका पैसा कमवायचा आहे, तर सांगा कुणाला कुणाची गरज आहे ?

तुमच्या आमच्यासारखे मजूर आहेत, म्हणून ठेकेदार आहेत. ते नसले, तरी ज्या गाढवांना काम पाहिजे आहे त्यांना काम समजणाऱ्या व घाम गाळून काम करू शकणाऱ्या आमच्या सारख्या लोकांकडेच यावे लागेल.

म्हणूनच ती कुत्र्याची अवलाद आम्हाला भिऊन राहील. हाच नव्हे तर, पोतराजूचे सर्व युक्तिवाद नेहमी असेच असतात.

पण त्याच्या मालकाने त्याच्यापेक्षा जास्त जग पाहिले आहे. त्याची चौकशी करून आता त्याच्या तैनातीला मालकाने एक माणूस दिला आहे. चहा, फराळ, सिगरेट, हवे ते हवे तेव्हा ताबडतोब तो याला आणून देतो. केव्हाही आला तरी छोट्या-मोठ्यांसमोर त्याची आणि त्याच्या कारागिरीची तो प्रशंसा करतो.

एकदा घराची वरची खिडकी नक्षीदार करण्याच्या नादात त्याने खाणे-पिणेही सोडून दिले. पोतराजूची एक रखेली आहे. ती मोठी हुषार आहे. एकदा तिने विचारले, "बरं मिस्त्री, तुम्हाला हा चहा, नाश्ता, सिगरेट– हे सगळं कसं मिळतं सांगा बघू. तुम्हाला माहीत आहे ?"

"या चहा-नाश्त्यासाठी मी हे सगळं काम थोडंच करतोय ? असा विचार करणारा जेवढा वेडा, तेवढीच तू नालायक आणि अडाणी रांड आहेस." असे म्हणून सिगरेट शिलगावून तो धुराचे लोट सोडू लागला.

"मिस्त्रीला तो भाव सांगतो. त्या भावाप्रमाणे मी कामही दाखवू शकतो. मनात आणलं तर त्याहीपेक्षा उत्तम काम करून दाखवू शकतो. खरं म्हणजे माझ्या कामाची किंमत करून पैसे देणारा गधडा कोणी नाहीच. मग मी काय करू–माझी कारागिरी मी लपवू शकतो, पण उद्या इमारत पाहाणाऱ्यांना त्या कुत्र्याची कंजुषी कळणार नाही, फक्त माझी कारागिरी तेवढी दिसेल."

काम करणाऱ्यात आणि करवणाऱ्यात हाच फरक आहे.

आता हीच इमारत पाहा. उद्या इथे लॉजिंग होईल. तू म्हणशील, मी इतरांपेक्षा आठ आणे जास्त देईन. एक रात्र इथे झोपू द्या, तर स्वतःच्या भारंभार पैसा दिला तरी, जोपर्यंत तू मजुरी करत आहेस, तोपर्यंत तुला इथे पाऊल टाकू दिले, जाणार नाही.

तो आपली वस्तू तुझ्यापासून लपवून ठेवू शकतो, पण तुला आपली वस्तू त्याच्यापासून लपवता येणार नाही. काम करणाऱ्यांच्या बाबतीत हीच अडचण

असते.

अशा प्रकारे रक्ताचे पाणी करून पोतराजूने काम लवकर पूर्ण केले. ठेकेदाराला धावपळ करायला लावून, मिस्त्रीमंडळींना चुचकारून वारंवार त्यांची स्तुती करून रात्रंदिवस जीव तोडून त्याने मेहनत केली. वसंत ऋतूपर्यंत काम पूर्ण होईल की नाही, याची वानवा होती पण संपूर्ण लॉज संक्रांतीपर्यंत तयार करून उघडूनही दिला.

शहरभर त्या इमारतीचे कौतुक झाले.

गुळगुळीत फरशी, वॉर्निश पेंट, एनॅमल कोटिंग, भिंतींचा रंग, संगमरवरी चित्रे, कुंड्यांत तऱ्हेतऱ्हेची फुलझाडे, गोदरेज फर्निचर, युफोम गाद्या, चिनीमातीची पुष्पपात्रे, रंगीबेरंगी दिवे, गच्चीवर उद्यान–कांही दिवस या विलक्षण सौंदर्याची सर्वत्र वाहवा होत राहिली.

मग प्रत्येक मोहल्ल्यात एक लॉजिंग उघडले. अलिकडेच मालक वारला तेव्हा या लॉजिंगची देखरेख कारकुनाच्या हातात आणि व्यवस्था त्याच्या मेव्हण्याच्या हातात आली. तरीदेखील जुना थाट लगेच संपला नाही. धंदा लगेच नरम झाला नाही.

देवुडूचे मन पुन्हा त्या जोडप्याचा विचार करू लागले. धंदा अजून चालू आहे म्हणूनच कारकून रूबाब करतो आहे. बिचारा तो मुलगा जमेल तेवढ्या ऐटीत आला होता. काळी पँट, तिच्याहून काळे कुळकुळीत बूट, पांढरा टेरिलिन शर्ट आणि शर्टवर घड्याळही बांधले होते. भांगही मोठा झोकात पाडला होता. नटण्यात त्याने काही कसर राहू दिली नव्हती. तरीदेखील काहीतरी उणीव राहिलीच असावी. फक्त एकच डोळा असूनही कारकुनाने एका मिनिटात हे हेरले.

बरोबरची ती मुलगीदेखील फार तर ती सोळा वर्षाची असावी. पण तिची साडी, कुंकू, दागिने यातले एकही सध्याच्या काळातले नाही.

तिने कदाचित पूर्वी कधी असा झोकदार पोषाख केला नसावा. देवुडूला आठवले, पेद्दम्मी आणि अप्पायम्मा लग्नाच्या वेळी आणि सासरी जाताना अशाच नटत.

पेद्दम्मी आता कोणावर हुकूमत गाजवते आहे कोण जाणे ? अप्पायम्मा तर या जगातच नाही.

दृष्टीआड गेल्यामुळे या दोघींच्या आठवणीने देवुडूच्या काळजात गलबलले ....लोखंडाचे दोन हात आपल्याला आवळीत आहेत असे त्याला वाटले.

आपण कोणत्या मुहूर्तावर जन्मलो, कुणाला माहीत...आपले घर सोडून दुसऱ्यांच्या घरी येणाऱ्या स्त्रियांना तिळमात्रही सुख देण्यास आपण नालायक आहोत. अप्पायम्माला त्याने खूप त्रास दिला होता.

लहानपणी तो तिला कधी अजाणता तर कधी अहंपणापायी मारी—उठता लाथ, बसता बुक्की, असे चाले.

वय जरा वाढल्यावर घरखर्च वाढला. उत्पन्न थोडे, चार पैसे कमावून तो ते पिण्यात उडवी, कधी नातेवाईक, कधी पाहुणे, कधी रस्त्यावर भांडणे, तर कधी आणखी काही कटकट, कधी तो स्वतः आजारी, कधी आनंद, कधी दुःख, कधी सण, कधी...सगळे सहन करणाऱ्या त्या बिचारीला हातात येईल, त्याने तो मारायला धावे.

त्याचे आई-बाप मध्ये पडले नसते, तर त्याचा मार खाऊन ती कधीच मेली असती.

पुढे, खूप दिवसांनी त्याच्यात बदल झाला...कधी झाला, कसा झाला, हे त्याचे त्यालाही कळले नाही.

आई-बाप एक–एक वर्षाच्या अंतराने वारले. ते वारण्यापूर्वी एकदा तो आजारी पडला होता. पुढच्या वर्षी लोकांनी सांगितले, पेद्दमी विहिरीत पडून मेली. सासरच्या लोकांनी आणि कांही हितशत्रूंनी असे पसरवले की तिला कोणीतरी पळवून नेले. त्यानंतर अप्पायम्माही आजारी पडली. हे सगळे चार पाच वर्षांत झाले.

या सगळ्या घटनांनंतर खूप राग आल्यावर तो रागावला असेल, पण त्याने कधी हात उचलला नाही.

ती पस्तीस वर्षांची झाल्यावर आणि त्याने स्वतः चाळिशी ओलांडल्यावर त्यांना थोडेफार सुख लाभले. आयुष्यभरात त्यांना मिळालेले सुख तेवढेच. तीही इच्छा अपुरीच राहिली.

दुसऱ्यांदा आजारी पडण्यापूर्वी आणि मरण्यापूर्वी एकदाच त्यांचे मीलन झाले. त्यानंतर अप्पायम्मा म्हणाली, "माझी एकच इच्छा आहे. ती पूर्ण झाल्यावर मला मरण आले, तरी चालेल." ती हलक्या आवाजात पुटपुटली. झोपडीत

पडद्यापलीकडे लहानसा दिवा मिणमिणत आहे. तो दिवा मुळातच लहान आहे. सोयीसाठी अप्पायम्माने तो आणखी बारीक केला होता. त्यामुळे देवुडूला तिचा चेहरा दिसला नाही. तिचे डोळे लकाकत होते.

"काय म्हणतेस ? " असे म्हणत देवुडूने कुशी बदलली, तशी खाली ठेवलेली भांडी वाजू लागली.

अशा वेळी खुट् जरी वाजले, तरी अप्पायम्मा फार घाबरायची. झटकन उठून फाटक्या पडद्याच्या एका भोकातून ती पलीकडे पाहू लागली. सुदैवाने कोणतेही मूल उठले नव्हते.

"उद्या सांगेन," असे म्हणून ती निघून गेली.

केस विस्कटले होते, पण वेणी सुटली नव्हती. घामाघूम होऊनदेखील कपाळावरचे कुंकू फरकटले नव्हते. तोंड पुसल्याने डोळ्यातले काजळ मात्र थोडे फिकटले होते.

दातांत पदर धरून ती चोळी घालीत होती, तर देवुडूने तिचा डावा हात धरून तिला स्वतःकडे ओढले. "हे काय ?" असे म्हणत ती धाडकन खाली पडली. तिने कबूल केले नसले, तरी तिची कंबर दुखावली असणार. आणखी थोडा वेळ पुनः विचारल्यावर, "बाहेर चला, सांगत्ये" असे म्हणत त्याच्या बाहुपाशांतून निसटून ती बाहेर गेली.

त्या दिवशीचे चांदणे आजच्यासारखे प्रसन्न नव्हते. सर्वत्र जग गाढ झोपले होते. अप्पायम्माने झोपडीतला दिवा मोठा केला. कामचलाऊ पडदा बाजूला केला आणि बाहेर देवडूसाठी व आत स्वतःसाठी अंथरूण टाकले. मुलांच्या अंगावर टाकलेली फाटकी पांघरुणे नीट करून ती दारात येऊन बसली.

त्यांना संसाराला लागून वीस वर्षे झाली. आई-बाप एकापाठोपाठ एक वारले. म्हातारा बाप ज्या कोपऱ्यात अंथरूण घालून झोपे तो आता रिकामा आहे. तो कोपरा एका पलंगास पुरेल इतकाच होता. पण बापाचा पलंग बापाबरोबर गेला. आता देवुडू जमिनीवरच झोपतो.

बिछान्यावर आरामात पाय ताणून जुनीपुराणी साडी पांघरून देवुडू झोपला आहे आणि त्याच्या उशाला दाराशी टेकून अप्पायम्मा त्याच्याशी बोलत आहे. गोड झोपेच्या लाटांवर देवुडूचे मन मजेत तरंगते आहे. पण असा सुखाचा दिवस त्याच्या आयुष्यात कधीतरी येतो.

ढकणांनी बेजार होऊन अप्पायम्मा पाठ चोळते आहे. देवुडू म्हणाला, "आता सांग." आणि तो तिच्याकडे वळला.

थोडावेळ तिने टाळाटाळ केली, मग ती उदास होऊन म्हणू लागली, "एक रात्रभर तुमच्यापासून मिनिटभरही दूर न होता तुमच्याजवळ झोपावं, असं फार वाटतं."

अर्धे वाक्य देवुडूने लक्षपूर्वक ऐकले, त्याचा दुसरा भाग आपोआप त्याच्या लक्षात आला. अप्पायम्मा बोलत असता त्याच्या शरीरभर वीज सळसळत गेली. धूसर प्रकाशात अनेक चित्रे त्याच्या डोळ्यासमोर फिरू लागली

अप्पायम्मा देवुडूच्या घरी आली तेव्हापासून ते सगळे लोक एकाच खोलीच्या झोपडीत राहात. पहिल्या तीन रात्रींच्या त्या नवलाईनंतर एकांत ही काय वस्तू आहे, हे त्यांना कळलेच नाही.

आरंभी भावंडे वगैरे मिळून दहा माणसे घरात राहात. त्यानंतर त्या सर्वांची मुले मिळून आणखी दहा माणसे वाढली.

त्या छोटयाशा झोपडीत तीन–चार जोडपी आळीपाळीने वेळ भागवून घेत. कधी कधी पलंगाच्या खाली, वर, आजूबाजूला माणसेच माणसे झोपत. कारण घरी सतत कोणाचा जन्म, कोणाचे आजारपण, मुलांचा आरडाओरडा हे चालूच असे.

अनेकांचे आजार, घरभर पाणी आणि चिखल, बसायला देखील कुठे जागा नाही किंवा बदलायला दुसरे कपडे नाहीत, असेही अनेक दिवस आणि रात्री गेल्या.

अंगावरच्या कपड्यांचेही भान न ठेवता, मध्येच उठून बराच वेळ जागून दिवा विझवून किंवा अगदी बारीक करून तट्टयाच्या आडोशाला, पलंगाजवळ, भीतीने मन धडधडत असता...परक्याशी काहीतरी अनैतिक कृत्य करीत असल्याप्रमाणे–सगळी घृणा गिळून टाकीत–अर्धवट वासनापूर्ती आणि अर्धवट आनंद मिळवीत डास, ढेकूण आणि माशांचा त्रास याकडे लक्ष न देता, दुर्गंधीच्या परिसरातच इतके दिवस त्यांची जीवनयात्रा चालू राहिली.

अप्पायम्मालाही मन आहे, आकांक्षा आहेत, याचा देवुडूने कधी विचारही केला नाही.

तयार होणाऱ्या इमारतींकडे पाहात अप्पायम्मा उभी राही. ती प्रचंड घरे

पाहून ती स्तंभित होई. एकदा एका मोठ्या इमारतीला रंग द्यायला ती गेली होती, तर दहापंधरा दिवस त्या इमारतीच्या वर्णनाशिवाय तिच्या बोलण्यात दुसरा कोणताही विषय नव्हता. त्या इमारतीतल्या खूप मोठ्या खोल्या, त्यांची सजावट, रेशमी अतिमुलायम गाद्या, अत्यंत नाजूक सोफासेट, त्यांच्या स्वच्छते-कडे लक्ष ठेवीत त्यांचा काळजीपूर्वक वापर करणारे स्वच्छ नीटनेटके लोक यांची ती पुनः पुन्हा भलामण करीत राहिली.

आणखी एका मोठ्या घराबद्दल बोलताना ती म्हणाली, एवढ्या मोठ्या घरात नवरा-बायको आणि दोन मुळे यांच्याशिवाय कोणीही राहात नाही.

ज्या घरात कोणी राहात नाही, आणि ज्यांना सदैव कुलूप लागलेले असते, त्यांच्याबद्दल ती कधी काही बोलली नव्हती. दोन खोल्यांचे घर घेण्याची आकांक्षा बाळगणे आपल्या आवाक्यापलीकडचे आहे, असे तिला वाटले असावे, त्यामुळे तो विचार तिने सोडून दिला असावा. सध्या तिची एवढी एकच मनीषा आहे.

तिची इच्छा पूर्ण करण्याचा मार्ग देवुडू शोधू लागला. पण खूप शोधूनही त्याला तसा मार्ग सापडेना. एकदा तरी तशी संधी निश्चित मिळेल अशी आशा त्याला होती. तेवढ्यात एक दिवस अप्पायम्माने अखेरचा श्वास घेतला आणि ती सगळ्या इच्छांच्या पलीकडे गेली.

देवुडूने अप्पायम्माच्या आठवणीने एक दीर्घ सुस्कारा टाकला. "गरीबी-सारखी वाईट गोष्ट या जगात दुसरी नाही," त्याच्या मनात आले... अप्पायम्माच्या आठवणीने. "गरीबीसारखी वाईट गोष्ट या जगात दुसरी नाही," त्याच्या मनात आले...त्या जोडप्याच्या आठवणीने.

एव्हाना पायी चालत चालत देवुडू मेन रोड वर आला होता.

बाजारपेठेतल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंची घरे खूप खाऊनपिऊन सुस्त झालेल्या भुतांसारखी दिसताहेत. चांदणे वाळायला घातलेल्या रव्यासारखे दिसते आहे. निरभ्र आकाशात चंद्र डौलात झगमगतो आहे.

नेहमीप्रमाणे शहरातल्या तिन्ही चित्रपटगृहांतली गर्दी चौकातल्या विश्रांती-गृहांत जमते आहे. त्या दुकानांतल्या गॅसबत्त्यांच्या प्रकाशात चांदणे आणि विजेचा प्रकाश फिक्का पडतो आहे. या गर्दीत प्रकाशाच्या सावल्यांप्रमाणे लोक फिरताहेत. थकून-भागून आलेल्या रिक्षा इकडे तिकडे भटकून रांग लाव-

ण्याच्या जागी पोहोचताहेत.

बराच वेळ प्रयत्न करूनही नूकराजूला काहीही आशा दिसेना तेव्हा तो दक्षिणेकडे चालू लागला. निघण्यापूर्वी त्याच्या मनात कोणते विचार चालू होते. कोणास ठाऊक, पण चालू लागल्यावर हे जग आणि मानवी जगाला घेरून टाकणारे दु:ख आणि तक्रार त्याच्या मनात ठसठसून भरली होती.

आधीही दोनदा असाच अनुभव आला होता.

एकदा नेहरूजयंतीच्या दिवशी खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तो तेव्हा सातवीत होता. त्याचे चित्रकलेचे शिक्षक फारच सुस्वभावी होते. नूकराजू आणि आणखी दोन विद्यार्थ्यांना ते चित्रकला–स्पर्धेसाठी घेऊन गेले. स्पर्धेत भाग घेणाऱ्यांत बहुतेक अधिकाऱ्यांची, श्रीमंतांची मुले होती. नूकराजूला चित्रकलेत पहिले पारितोषिक मिळाले.

समारंभ सुरू होण्यापूर्वी पारितोषिके घेणाऱ्या मुलांना पुढच्या रांगेत उभे करण्यात आले होते. टेरिलीन शर्ट्स, नायलॉन सॉक्स परिधान केलेल्या खव्या-सारख्या मुलायम रबरी बाहुल्यांत तो काळी मळकी चड्डी आणि विटक्या रंगाचे रेघांचे जुने शर्ट घालून उभा राहिला. त्याला स्वतःला आपण त्या रांगेत गालबोटासारखे उभे आहोत, असे वाटत होते. रांगेबाहेर जावेसे त्याला वाटत होते, पण गुरुजींनी त्याला जाऊ दिले नाही.

बक्षिस समारंभ सुरू झाला. त्यादिवशी अध्यक्ष कोण होते ते आता त्याला आठवत नाही. कोणीतरी मोठा माणूस होता, एवढेच लक्षात आहे.

बक्षिसे घेणाऱ्या मुलांबरोबर ते फोटोसाठी उभे राहात होते. बक्षिस देण्या-पूर्वी आणि दिल्यानंतर मुलांशी हस्तांदोलन करीत होते.

नूकराजूची पाळी आली. तो व्यासपीठावर पोचण्यापूर्वी अध्यक्षांशी कोणी-तरी बोलत होते व ते त्याला उत्तर देत होते. बक्षिस हातात घेऊन हसऱ्या चेहऱ्याने त्याने अध्यक्षांकडे पाहिले. अध्यक्षांची मुद्रा चमत्कारिक झाली होती.

नूकराजू हस्तांदोलनासाठी पुढे केलेला हात, आपली चूक झाल्याप्रमाणे मागे घेऊ लागला; मग धीर करून त्याने हात पुढे केलाच. त्याचा गोंधळ मोठ्या सहानुभूतीने पाहात उदार पुरुषाप्रमाणे ते उभे होते. नमस्काराची शिक्षा देणाऱ्याप्रमाणे त्यांनी नमस्ते करून प्रतिनमस्काराचा स्वीकार केला आणि दुसरे बक्षिस देण्यासाठी हात पुढे केला.

दुसरी अशीच घटना एका मित्राकडे घडली.

त्या वेळी तो फुटबॉल टीमचा गोलकीपर होता आणि एक ब्राह्मण मुलगा कॅप्टन होता. एक दिवस खेळ संपल्यावर दोघे गप्पा करीत घराकडे निघाले. बाहेर दाराशी उभा राहून तो काहीतरी बोलत होता. नूकराजूला फार तहान लागली होती. जवळ उभ्या असलेल्या त्या मुलाच्या धाकट्या भावाला त्यानं पाणी मागितलं.

एक मिनिटानं आतून त्यांच्या आईचा आवाज ऐकू आला—"पाणी कोणाला पाहिजे, बाळ?" नूकराजूला पाणी पाहिजे असे कळताच ती जोरात म्हणाली, "पेला तिथेच ठेव आणि तांब्यात पाणी घेऊन जा."

त्याचा मित्र बोलत होता. "पुन्हा भेटू या" असे म्हणत तो निघून गेला. मागून 'पाणी, पाणी' असे बराच वेळ ऐकू आले, पण त्याने मागे वळूनदेखील पाहिले नाही.

पहिली घटना अगदी लहान वयात घडल्याने तिने तो फारसा दुखावला नव्हता. थोडे मोठे झाल्यावर घडलेल्या दुसऱ्या घटनेचे त्याने विशेष वाटून घेतले नाही. पण आता जे घडले ते बराच प्रयत्न करूनही त्याला सहन होईना.

झोपडीत जन्मणाऱ्या आणि कौलारू घरांत अथवा बंगल्यात राहाणाऱ्या सर्वांशी नूकराजूचा परिचय आणि संपर्क सारखाच होता. शिक्षण मध्येच थांबले, तरी या वर्षी किंवा पुढल्या वर्षी तो मॅट्रिकची परीक्षा देणार आहे. त्याच्या मित्रांमध्ये प्रतिष्ठित गृहस्थांच्या मुलांव्यतिरिक्त गुंडांची, स्थानिक राजकारणी मंडळींची, हॉटेल व सिनेमा मालकांची मुलेही आहेत. एका फॅक्टरीत लहानशी पण चांगली नोकरी लागली आहे.

स्त्रियांबद्दल त्याला फार आदर आहे. भारतमातेचे नाव ऐकताच त्याचे शरीर पुलकित होते. गांधी-नेहरूंना तो देवतुल्य मानतो. जवाहरलाल नेहरू, जॉन केनेडी आणि निकिता ख्रुश्चेव हे तिघे सहा हातांनी तीन जोड्या करून वेगवेगळे फिरत असल्याचे दृश्य तो विसरू शकत नाही.

नूकराजूला संगीत अत्यंत प्रिय आहे. आपल्या हातखर्चाच्या पैशांपैकी तीन-चतुर्थांश तो चित्रपटांवर खर्च करतो

नूकराजूचा हा स्वभाव पाहून शेजाऱ्यांना जेवढे बरे वाटे, तेवढीच त्याच्या

आईला भीती वाटे. त्याचा बाप, त्याच वयाचा असताना खूप पीत असे. त्यामुळे पन्नासाव्या वर्षीच त्याला जगाचा निरोप घ्यावा लागला. त्याचे दोन्ही मोठे भाऊ वडिलांएवढे 'मोठे' नव्हते, पण थोडेफार पीत. पण नूकराजूने तिकडे अजिबात लक्ष न देणे त्याच्या आईला विचित्र वाटे.

एवढ्यात पाकिस्तानने भारतावर हल्ला केला. नूकराजूला वेड्यासारखे झाले. श्रमदान, रक्तदान आणि शेवटी प्राणदान करायला तो तयार झाला.

आई व्यथित झाली. आत्महत्या करण्याची भीती तिने घातली, शेवटी होमगार्डमध्ये त्याला जाऊ देण्यास ती तयार झाली. नंतर तिने आपल्या तिसऱ्या मामाला कळवून त्याची मुलगी मुन्यालू हिच्याशी त्याचे लग्न लावून टाकले, आणि सुटकेचा निःश्वास टाकला.

खेड्यातल्या मुलीशी लग्न करायला नूकराजू आधी तयार नव्हता, पण तिला पाहिल्यावर, विशेषतः तिचे विशाल नेत्र पाहिल्यावर तो काहीही बोलला नाही. लग्नानंतर सहा महिन्यांनी अम्मडू वयात आली. त्यानंतर गर्भादानासाठी आणखी सहा महिने वाट पाहावी लागली.

दरम्यान पाकिस्तानचा धोका नाहीसा झाला. होमगार्ड बनल्यानंतर देश-प्रेमाची त्याची कल्पना बदलली. आता ड्यूटीवर जाणे, घरी परत येणे, आणि फावल्या वेळात मासिके वाचणे असा त्याचा नित्यक्रम झाला. आता क्लबात जाणेही बंद झाले. रात्रीच्या कॉलेजात शिकण्याची त्याची योजनाही पैशा-अभावी बारगळली.

तीन महिने झाले. गर्भादानविधी झाला. त्या रात्रीपासून, खरे म्हणजे त्याही आधी कितीतरी दिवस आणि रात्री त्याने एकाच सुखाची कल्पना करीत घालवल्या—ती म्हणजे अप्सरा हॉटेलाच्या सहाव्या मजल्यावर नाही तर निदान एका सामान्य लॉजिंग हाउसच्या कोपऱ्यातल्या खोलीत का होईना अम्मडूबरोबर एक रात्र घालवायची.

त्यासाठी त्याने तीन महिने आपल्या छोट्यामोठ्या इच्छा मारून पैसे जमवले. तीन दिवस अम्मडूला शंभर वेळा समजावून सांगून तयार केले. घरातल्या वडील मंडळींना नाना थापा मारून आपल्या दोघांच्या गैरहजेरीस माफी मिळवली. आणि एवढे सगळे केल्यावर फळ हे मिळाले.

गावाच्या अगदी एका टोकाला असलेल्या वडाच्या झाडाखालच्या म्युनि-

सिपल इस्पितळापाशी पोचल्यावर नूकराजू भानावर आला. त्याने चमकून मागे पाहिले तर अम्मडू त्याच्याजवळच होती.

अशा वेळी अशा जागी स्त्रीपुरुषांना एकत्र पाहून कोणताही रिक्षावाला घंटी वाजवतो. आधी घंटी वाजवणाऱ्याचा त्याला राग आला. मग त्याची चूक नाही हे नूकराजूच्या लक्षात आले आणि तो त्या रिक्षात बसला.

अम्मडूला खेटून बसल्यावर नूकराजू पुरताच भानावर आला. पाठीवर रेलत तो रिक्षावाल्याला म्हणाला, 'वेंकटेश्वर टॉकिजकडे चल.'

वेंकटेश्वर टॉकिजच काय, पण कनकदुर्गा पॅलेसही 'हाउस फुल्ल' आहे.

क्षणभर नूकराजूच्या संतापास पारावार राहिला नाही. पण रागावणार कोणावर ?

"भूक लागलीय", अम्मडूला तो म्हणाला.

त्याचे बोलणे ऐकण्यासाठी जिवाचा कान आणि त्याला पाहाण्यासाठी कानांचे डोळे करून बसलेल्या-अम्मडूने 'बरे' म्हटले आणि ती बोलली, "तुम्ही हवं तर खाऊन घ्या."

त्या मुलीच्या डोळ्यातील करुणा आणि तिच्या बोलण्यातील व डोळ्यांतील व्यग्रता यामुळे नुकराजूचे मन हेलावले.

"चला" असे म्हणत गॅसच्या बत्त्यांचा झगमगाट असलेल्या खुल्या उपाहार-गृहाकडे ते चालू लागले.

उडिपी श्रीकृष्ण विलासमध्ये . . .शक्यतर एअर कण्डिशण्ड खोलीत बसून पतिपत्नी एकान्तात जे खाऊ इच्छीत होती त्याचे आता असे रूपान्तर झाले. . . कनकदुर्गा टी स्टॉलमध्ये, गलिच्छ गटाराच्या काठी, डगमगत्या एकमेव बाका-वर, पाण्यात भिजून-सुकून भेगा पडलेल्या टेबलावर, पहिल्या खेळाच्या गर्दीने झालेल्या पाण्या-चिखलात, फुटक्या तुटक्या बशांतून ती आता फराळ करीत आहेत.

जरा पलीकडे तीन कप चहा सहा कपातून पिणारी उनाड मंडळी यांच्याकडे पाहून खदखदून हसताहेत. त्यांच्याशी भांडण काढून त्यातल्या दोघातिघांना थपडा माराव्यात असे नूकराजूला वाटले.

बिल चुकवून ती दोघे बाहेर पडली. जाता-जाता नूकराजू मुद्दाम त्या लोकांजवळून गेला. "येऊ दे नीचांना. . .एक दोघांना खतम करतो. . . ." असे मनात म्हणत तो पुढे गेला. हे लोक का कोण जाणे, या जोडीच्या मागे

लागले नाहीत.

चांदणे रूपेरी आणि प्रसन्न आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूची घरे झोपली आहेत. रस्त्यावरून नूकराजूच्या मागून अस्पष्ट छायेसारखी जाते आहे.

एका जागी पदपथावर लोकांच्या झुंडीच्या झुंडी झोपल्या आहेत. दुसरीकडे असेच लोक ओळीनें झोपले आहेत. समोरच्या बंगल्यात अजून दिवा जळतो आहे. पुलावर बसून एक भिकारी आणि भिकारीण बोलत होते–ते आता गप्प झाले.

"यांना घर नाही. कसे जगतात कुणास ठाऊक !"

"असेच कुत्र्यासारखे."

नूकराजू मनातल्या मनात दचकला.

हजारो लोक या शहरात जगताहेत--झाडांखाली सबंध कुटुंब राहाते, रस्त्याच्या कडेला ते स्वयंपाक करतात – पाऊस आला की जवळच्या ओटयावर आसऱ्यासाठी जातात. कडाक्याची थंडी, मुसळधार पाऊस, धगधगते ऊन्ह. . . सर्वत्र आसऱ्याविना तडफडणारे प्राणी !

"चला चला ! उठा ! दूर व्हा !" असे म्हणून लोक त्यांना कुत्र्यासारखे हाकलून लावतात. चिखलात, दलदलीत, अंधारात जगणारे प्राणी ! पांघरायची चादर आणि शेजाऱ्याच्या पापण्यांचा आडोसा सोडून अन्य कसलाही आडपडदा न ठेवता यांचे संसार वाढत जातात.

नूकराजूला दया नाही आली, संताप आला. घाण, हिंसा आणि अत्याचार याविरुद्ध बंड करणारी माणसे त्याने कुठल्यातरी चित्रपटात पाहिली होती. पण ही जनता अशीच पडून राहील. डुक्कर चिखलातून कधी बाहेर पडेल काय ? नूकराजू विचार करीत होता.

एक लॉरी वेगात त्या रस्त्याने निघून गेली. एक झोकदार मोटार सावकाश चालली आहे. तिच्यात पांढरी साडी आणि लाल ब्लाऊज नेसलेली एक गोरी तरुणी मांडीवर हात घेऊन बसली आहे. तिच्या काळ्याभोर केसात पांढराशुभ्र गजरा आहे. निश्चितच ती लॉजमध्ये जात असावी किंवा लॉजकडून येत असावी.

दुरून तिन्ही चित्रपटगृहांच्या मधली जागा एका मोठ्या शेगडीसारखी दिसते. नूकराजू तेथे पोचला तेव्हा चंद्र आभाळात मधोमध आला होता आणि चांदण्याची वृष्टी करीत होता.

नूकराजू त्या गावातला नसला तरी ती चित्रपटगृहे त्याला नवी नाहीत. या तिन्ही चित्रपटगृहात लोकांची सतत गर्दी असते. ते आपल्या मळक्या कपड्यांचा विचार करीत नाहीत; शरीरातून वाहाणाऱ्या घामाच्या धारांकडे पाहात नाहीत त्यांना चावणाऱ्या ढेकणांची त्यांना तमा नसते. श्वास घेतांना येणाऱ्या दुर्गंधीचा त्यांना त्रास होत नाही.

समोरच्या पडद्यावरील बड्या बड्या हवेल्या—समोर दिसणाऱ्या चित्रांसारख्या पोकळ — त्यातील सुंदर छबेल्यांचे हावभाव—चेहऱ्यावरची रंगरंगोष्टी उतरवली तर त्या त्यांच्या बायकांच्या आज्यासारख्या दिसतील—त्यांच्या ओठांवर मधुर संगीत—त्या गाणाऱ्या नाहीत हे सर्वांना माहीत असूनही त्यांचे गाणे खरे वाटते, अवास्तव कथानक, खोटे खोटे प्रेम—

पडद्यावर दिसणाऱ्या या सगळ्या गोष्टी खोट्या आहेत. खोट्या वस्तू हे खोटे लोक आणखीनच खोट्या करून दाखवतात.

जनतेला वास्तवाची अनुभूती मिळू शकत नाही. मिळवण्याची अभिलाषा कल्पनेच्या रूपात का होईना मोठी धोक्याची असते.

म्हणूनच मोठी माणसे गोड गोड बोलून मुलांचे मन रमवतात आणि अधिकारी जनतेला खोटी आश्वासने देऊन फसवतात, तसेच काही लबाड लोक सरळ माणसांना फसवतात. आणि जनता फसवून घ्यायला तयारच आहे—ती या लोकांना नैवेद्यही दाखवते. गरज पडली, तर काळ्या बाजाराच्या दरात. मग फसवण्याऱ्यांची त्यात काय चूक ?

लोकांना हृदय नसते—असते तर, लुटुपुटीचे पति-पत्नी, लुटुपुटीचे मीलन, एकमेकांकडे फेकलेले लुटुपुटीचे प्रेमकटाक्ष हे पाहाणाऱ्यांचे मन कशाला चळले असते, आणि शिट्या कशाला वाजल्या असत्या ?

नूकराजूचा राग अशा प्रकारे चित्रपट पाहाणारे, काढणारे आणि दाखवणारे यांच्यावर क्रमशः बदलत आणि वाढत चालला होता. त्याच वेळी तो चौकात पोहोचला.

देवुडूही त्याच वेळी तिथे पोहोचला.

"काय ग मुली ? कुठून आलीस ?" देवुडूने विचारले.

नूकराजचा चेहरा पाहिल्यावर देवुडूला त्याच्यापेक्षा ती मुलगीच जास्त मनमिळाऊ वाटली.

अम्गाडू देवुडूला ओळखू शकली नाही.

"कोण ?" तिने विचारले.

"तू. . . कुठल्या गावची ?"

नूकराजूकडे पाहाण्याचा प्रयत्न करूनही देवुडूने त्याच्याकडे पाहिले नाही.

"आमचं गाव अनकापल्ली," असें सांगून तिने साशंकपणे विचारले, "आपलं ?"

तेवढ्यात नूकराजूने तिकडे पाहिले. तो भानावर आला होता, पण देवुडूला ओळखू शकला नाही.

"आपण त्या लॉजिंगमध्ये आला होता ना ? मी तिथंच काम करतो."

आपल्याकडे पाहाणाऱ्या नूकराजूला त्याला विचारायचे होते, "तुम्हांला रूम मिळाली नसेल." पण सवयीने तो बोलून गेला, "ही मुलगी तुमची कोण?"

नूकराजूला तो जिव्हाळ्याने विचारलेला प्रश्न वाटला नाही, तर त्यात त्याला संशयाची छाया आढळली. त्यामागून एका डोळ्याच्या कारकुनाने तोंडाने नव्हे, तर डोळ्यांनी विचारलेला प्रश्न हजारो कंठांतून विचारल्यासारखा त्याला भासला.

"काय ग मुली. . ." देवुडूचे वाक्य पुरे व्हायच्या आत त्याच्या गालावर फाडकन आवाज झाला.

"रांडलेका, माझ्या बायकोशी बोलायची तुला काय गरज ?" असे म्हणताना नूकराजूला आणखी जोर चढला.

तो बेभानपणे देवुडूला बुटाने मारीत सुटला. दूर जाऊन धाडकन पडलेल्या त्या माणसावर तो तुटून पडला.

"रांडेच्या, काय समजलास तू ?" असे म्हणत तो धापा टाकू लागला.

थोडा वेळ दुकानदार आणि रिक्षावाले चकित होऊन हे पाहात राहिले. मग ते सगळे तिथे जमले.

ती मुलगी थरथरत्या आवाजात, 'बापरे, माझा नवरा मारील, त्या म्हाताऱ्याचा जीव जाईल', असे म्हणत कापू लागली आणि रडू लागली.

एवढ्यात जमलेल्या लोकांनी म्हाताऱ्या देवुडूला तरुण नूकराजूच्या तावडीतून सोडवले.

नूकराजूचे चोपून बसवलेले केस विस्कटले, शर्ट फाटले, घड्याळ मनगटावरून घसरले. स्वतःला सावरीत तो ओरडत होता—

"रांडलेका, तुझ्या नरडीचा घोट घेईन मी ! जीव घेईन. बाई रस्त्यावर उभी राहिली तर वेसवा बनते काय ? तुझ्या लॉजवर सगळ्या रांडा येतात काय ? मोठ्या घराण्यातला माणूस रांड बरोबर नेतो तरी तो भला. आणि गरीब बायको नवऱ्याबरोबर गेली तर ती वेसवा काय ? तुझा लॉज रांडांचा लॉज आहे—तुझा, तुझ्या त्या जकण्या कारकुनाला आणि त्या रंडी लॉजच्या मालकाला एकाच वेळी खलास करून टाकीन. एका झोकात."

नूकराजू भोवती जमलेल्या लोकांना नूकराजूचा काही दोष नसल्याची खात्री झाली. पिंपळपानासारखी थरथरत अम्मडू दुरूनच किंचाळत होती, "अहो, माझं ऐका. परत या. त्या म्हाताऱ्याशी काय मारामारी करता ? चला, आपण आपल्या वाटेनं जाऊ." अम्मडूचे हे बोलणे ऐकल्यावर त्यांची खात्री पक्की झाली.

तिथे देवुडूला ओळखणारे कोणी नव्हते. शिवाय, तो काहीही बोलत नव्हता. त्यामुळे देवुडूचीच चूक झाली असावी, असे लोकांना वाटले.

"जाऊ दे बाबा, म्हाताऱ्याला तर अर्धमेला केलाच आहेस. जा आता," कोणी पोक्त माणूस बोलला.

"कोण म्हातारा ? तो म्हातारा आहे ? तो रांडांचा पाठलाग करणारा आहे—बिनबापाचा बेटा," असे म्हणतात नूकराजू पुन्हा जोशात येत होता. आता अम्मडूने धीर करून त्याचा हात पकडला.

तेवढ्यात मध्यान्तराची घंटी झाली आणि चारी बाजूंनी गर्दी जमली. क्षणात त्यांच्या भोवती प्रचंड गर्दी त्यांना दिसली.

तिन्ही चित्रपटगृहात पाच-दहा मिनिटांच्या अंतराने मध्यान्तराची घंटी वाजते. कधी कधी एवढंही अंतर नसले तर सगळी दुकाने एकदम भरतात. अशा वेळी सोडा बाटल्यांचे आवाज, चायवाले-भजीवाले यांचा ओरडा, सगळीकडे एकच गोंधळ उठतो. लोक लाज सोडून रस्ते खराब करतात आणि खाऊन पिऊन मस्त होऊन गलिच्छ चित्रांकडे कधी माणसांच्या, तर कधी वख-वखलेल्या नजरांनी पाहू लागतात आणि स्वतःचीच त्यांना कीव येऊ लागते.

अशा वेळी लोकांच्या गर्दी पासून दूर एका ओट्यावर बसलेल्या देवुडूचे डोके गरगरत होते, अंगातला रक्तप्रवाह गोठला होता आणि शरीराची आग आग होत होती.

गर्दी कमी झाली तेव्हा कोणीतरी त्याला सोडव्याची बाटली आणून दिली. तो ती प्याला. दुसऱ्या कोणीतरी इकडे तिकडे पडलेले कपडे आणून दिले. यामुळे वा दुसऱ्या काही का[illegible]ने येणारे दुःखाचे उमाळे दाबीत, मारानें दुखणारे लाकडासारखे शरीर ओढीत तो लॉजिंगकडे निघाला.

दुसरीकडे गर्दीपासून दूर एक रिकामी रिक्षा पाहून तें जोडपे तिच्यात जाऊन बसले. अम्मंडूला दुःखाचे कढ येत आहेत. नूकराजू तिचे सांत्वन करीत नाही. एका हाताने तिला [illegible]वरील दुसऱ्या हाताने [illegible] जवळी ओढ दाबून धरला आहे. चांदण्यात रिक्षा दूर [illegible]

हातांची खुर्ची

—श्रीपति

"असं ते आहेत काय ?" कुणीतरी आश्चर्याने विचारले.

"होय तेच ते" दुसऱ्याने म्हटले.

"तेच ते. तेच ते." आणखी दोघे म्हणाले.

गावाच्या पूर्वेकडील तलावाच्या काठी जुन्या पिंपळाच्या झाडाखाली उभ्या असणाऱ्या मोटारीतून अधिकाराच्या रुबाबात उतरत असलेल्या एका मोठ्या माणसाबद्दल लोक बोलत होते. तिथे जमलेल्या गर्दीतले कोणीतरी म्हणाले–"तेच आहेत चेअरमन !" ज्यांनी त्यांना पूर्वी पाहिलेले नव्हते, ते त्यांना पाहिल्यावर बऱ्याच दिवसांनी भेट झाल्यावर वाटणाऱ्या खुशीने आणि आदराने त्यांच्या-बद्दल आपसात बोलू लागले.

"माणूस तर चांगला दिसतो." चेअरमनच्या धष्टपुष्ट आणि बलवान शरीराकडे पाहात कोणी तरी प्रशंसा केली.

ज्या गाडीतून ते उतरले त्याच गाडीतून पांढऱ्या पोशाखातील काही अधिकारीही खाली उतरले. सरपंच, त्या गावातील काही प्रसिद्ध लोक आणि त्यांचे नोकरचाकर ही सगळी मंडळी सकाळपासून त्या मोटारीची वाट पाहात होती. शेवटी दुपारी एक वाजता मोटार येऊन पोहोचली. तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावर राहिला नाही.

चेअरमनबरोबर काही अधिकारीही होते. ते कोण होते हे गावकऱ्यांना माहीत नव्हते. कोणीतरी म्हटले–"कलेक्टर असतील," दुसरा बोलला–"छे ! कलेक्टर कसले," तर तिसरा म्हणाला–"तहसीलदार असतील." ते बोलणे खोडून काढीत कोणी तरी म्हणाला–"नाही, तो तहसीलदार नाही. तहसीलदाराच्या कपाळावर डाग आहे. तो तर गेल्या वेळेला रेव्हेन्यू इन्स्पेक्टर-बरोबर आला होता." बाकीची मंडळी कोण ते कोणालाच समजत नव्हते. सगळेजण आपापल्या परीने तर्क करू लागले.

त्या गावातल्या एकमेव शाळेतील एकमेव शिक्षक, प्रकाशम यांनी सांगितले

की, त्या पांढऱ्या डागवाल्याच्या जागी हा नाकेला माणूस आदल्याच दिवशी आला आहे आणि तो पांढरा पोषाखवाला बी. डी. ओ. असून तिसरा सरपंच आहे.

त्यांच्या मागे गर्दी जमा झाली. सगळ्यात पुढे पांढरे कपडेवाले, त्यांच्या मागे मळके व रंगीत कपडेवाले, त्यांच्या मागे कमरेपर्यंत कपडे नेसलेले काही लोक, त्यांच्या मागे मुंडाशी बांधलेले आणखी काही लोक—असा तो जमाव चालू लागला. मुले कुतूहलाने त्यांच्या मागे मागे जात होती आणि येवढ्या मोठ्या आपत्तीतून ही अधिकारी मंडळी आपली सुटका कशी करणार या आशेने वयस्क मंडळी त्या अधिकाऱ्यांकडे पाहात होती.

हजारावर घरे असणाऱ्या त्या गावात कालच आगीचे तांडव झाले होते. अर्ध्या घरांची राखरांगोळी झाली होती. रस्त्यांवर अर्धवट जळलेल्या भिंतींचे अवशेष, राखेच्या ढिगांबरोबर अर्धवट मोडलेली आणि जळलेली आणि आगीच्या बंबांनी ओढलेली इमारती लाकडे हे सगळे दृश्य भयाण दिसत होते.

राममूर्ती या गर्दीपासून थोड्या अंतरावरून चालला होता. सगळ्यांबरोबर जायला त्याचे मन घेत नव्हते. सगळा प्रसंग मनाला सुन्न करीत होता. समोर चाललेल्या गर्दीत लोकांच्या डोक्यामधून वर आलेले खुर्चीचे पाय दिसत आहेत. कोणी तरी ती खुर्ची डोक्यावरून घेऊन चालला आहे—कदाचित चेअरमन साहेबांना तिच्यावर बसायचे असेल! रिकाम्या भिंतीआड मृतांसाठी रडणाऱ्यांना, आगीमध्ये खाक झालेल्या प्राण्यांसाठी तडफडणाऱ्या दुःखितांना—सगळ्यांना त्या खुर्चीचे पाय दिसत आहेत. शेतात ठेवल्या जाणाऱ्या बुजगावण्यांप्रमाणे ती खुर्ची जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि रेव्हेन्यू अधिकारी तहसीलदार या सगळ्यापेक्षांही लोकांचे लक्ष आपल्याकडे अधिक आकर्षित करीत आहे.

ज्येष्ठ महिना होता. तळ्यातल्या पाण्याची वाफ होऊन चालली होती. निसर्गाच्या जळत्या जिभा वळवळत होत्या. अशा स्थितीत ही दुर्घटना झाली. त्यामुळे सर्वस्व जळालेले गावातले लोक निस्तेज दिसत होते.

जी घरे जळाली होती त्या प्रत्येक घरातील एक दोन व्यक्ती राख बाजूला करण्यात किंवा गमावलेल्या वस्तू शोधण्यात मग्न झाले होते. हताशपणे डोळ्यात आलेल्या अश्रूंमुळे काही पाहू न शकणाऱ्या त्यांच्या डोळ्यातून त्यांची निराशा

दिसत होती. या दुर्घटनेने व्यथित होऊन ते अवाक् झाले होते आणि त्यांचे संत्रस्त डोळे शून्यपणे इकडेतिकडे भिरभिरत होते.

राममूर्तीच्या मनात आले, आगीचे बंब यायला पाच मिनिटांचा देखील उशीर झाला असता तर त्याच्याही घराची राखरांगोळी झाली असती. ते आल्यानंतर देखील शेकडो घरे जळाली. देवाच्या कृपेने संकट टळले. आगीच्या ज्वाळा झेपावू लागल्या आणि बंबवाले पाण्याचे फवारे सोडून आग विझवू लागले तशी एकीकडे हृदयाची धडधड आणि दुसरीकडे तलावाचे पाणी पाहून मनाला मिळणारा दिलासा यांच्यामध्ये हेलकावे खाणारे राममूर्तींचे मन ईश्वराला शरण गेले. जे लोक वाचले होते त्या सर्वांबरोबर राममूर्तीनेही सुटकेचा निःश्वास टाकीत म्हटले–"देवाने वाचवले."

राममूर्तीचे मन अतिशय व्याकुळ झाले आहे. एका क्षणात पाचशे सहाशे कुटुंबे बेघर झाली आहेत. असंख्य घारींप्रमाणे आगीने घरांवर हल्ला केला आणि शेवटी हाडांचा ढीग सोडून ती विझून गेली.

रखरखत्या उन्हात राख गोळ्या करणाऱ्या लोकांच्या दीनवाण्या मुद्रा जेव्हा राममूर्तीने पाहिल्या तेव्हा आपले घर वाचले हे सुदैव की दुर्दैव हे त्याला समजेना. दहा माणसांबरोबर नरकात गेल्यावर देखील स्वर्गसुख लाभते उलट एकट्याने स्वर्गात गेल्यावर तिथे नरक यातनेपेक्षा कमी पीडा होणार नाही.

एका कौलारू घरात तीन मुले-दोन मुलगे आणि एक मुलगी-घराचे छप्पर कोसळून जळून मेले. दहा, तेरा आणि चौदा वर्षांची वये होती त्यांची. आगी-मुळे कौले जळू शकणार नाहीत. अशा कल्पनेने ती मुले त्या घराच्या आत जाऊन लपली. एवढ्यात आगीने त्या घराला घेरले. ती मुले तिथून बाहेर पडू शकली नाहीत आणि कोणी आत जाऊ शकले नाही. धुराने गुदमरूनच ती मुले मेली असतील. शेवटी छपरालाही आग लागली आणि ते जळून खाली पडले. दुसऱ्या दिवशी सकाळी मुलांना बाहेर काढता आले. त्या भीषण अग्नीकांडातील अशी एक एक करुण कहाणी चेअरमन साहेबांना ऐकवली जात होती.

दुःखाच्या पुन्हा पुन्हा येणाऱ्या उमाळ्यामुळे होणारा आक्रोश आसपास ऐकू येत आहे. अनेक वळणे असलेली ती सडक एका वेळी दृष्टीक्षेपात येत नव्हती. परंतु आता या अर्धवट जळलेल्या भिंतीमुळे केवळ हीच सडक नव्हे तर

आसपासच्या सडकादेखील स्पष्ट दिसू लागल्या आहेत. एरवी राममूर्तींच्या घरातून मुष्किलीने पाच पंचवीस घरे दिसत. पण आता लिलाव केले जाणारे सामान घराबाहेर काढले जाते तशी सगळी घरे रस्त्यावर आली आहेत. काही झाडे जळून गेली आहेत आणि काही आपली असी वेदना आतल्या आत दाबीत आभाळाकडे तोंड करून उभी आहेत.

"पावसाळ्याची तयारी म्हणून लोकांनी धान्य साफ करून ठेवले होते. आगीने भाजलेल्या तांदळांवर पाणी पडले तेव्हा ते उकळून कसे शिजले आहेत ते बघा." अध्यक्ष सांगत होते.

खरे होते. तांदूळ जास्त शिजल्यावर निघणारा उग्र वास चहूकडे पसरला आहे.

त्या गर्दीबरोबर चालणाऱ्या एका अधिकाऱ्याच्या मनात आले आता देश सुधारण्याची आशा नाही. ही घरे अशी एकमेकांना लागून का असावीत ? ही संपत्ती अशा प्रकारे घरात का पडून राहावी ? पंचवीस हजार रुपयांच्या नोटा जळून गेल्याने एकाला धक्का बसला, त्याची हृदयक्रिया बंद पडली आणि तो मरण पावला असे का व्हावे ? ते पैसे त्यांनी बँकेत टाकले असते तर बरे झाले असते ? त्या पैशांचा किती उपयोग झाला असता ? स्वतःच्या गरजेपुरते धान्य ठेवून बाकीचे ते सर्व विकून टाकले असते तर किती सोयीचे झाले असते ? नंदीबैलाप्रमाणे गळ्यात सोन्याच्या साखळ्या अडकवण्याऐवजी या लोकांनी आपले आरोग्य आणि ज्ञानविज्ञानाचा प्रसार याकडे अधिक लक्ष दिले असते तर देशाचा किती विकास झाला असता ? हे सगळे प्रश्न त्याच्या अज्ञानाचेच निदर्शक असण्याची शक्यता आहे, कदाचित या प्रश्नांचे उत्तर त्यालाही माहीत नसेल. परंतु त्या दीनदुःखी लोकांची केविलवाणी परिस्थिती आणि मूर्खपणा पाहून त्याच्या मनात जी वेदना उत्पन्न झाली तिने या प्रश्नांच्या रूपाने त्याचे मन अस्वस्थ करून टाकले.

मजेत गप्पागोष्टी करणाऱ्या फुलासारख्या बालिका भुकेने व्याकूळ झालेल्या डोळ्यांनी जळक्या दगड विटांच्या टोपल्या डोक्यावरून वाहून नेत आहेत. त्यांनी स्नान केलेले नसेल. काही खावेसे वाटत नसेल. या आपत्तीने लोकांमधील उरली सुरली आशा आणि हिंमत नष्ट केली आहे. सगळा गाव जुन्या रंग उडालेल्या चित्राप्रमाणे दिसतो आहे.

"साहेब, इथं गुरांचा गोठा होता. त्यात दोन बैल होते ते जळून गेले.

चारशेवर सौदा चालला होता काल परवाच. पण आम्ही दिले नाहीत. बैल देखील फार उत्तम होते."

चेअरमनजवळ जाऊन एक मोठा पुढारी सांगत होता–

"त्या घरात तीस वर्षाची स्त्री जळून गेली. बिचारीला दोन मुले आहेत. वडीलही नाहीत." आणखी तपशील सांगण्याच्या हेतूने तो म्हणाला–"घरात पैसा ठेवला होता. तो आणण्यासाठी ती आत गेली. पैशाने तिलाही जाळून टाकले. आधी ज्वाळा इतक्या मोठ्या नव्हत्या. पण एकदम वारा सुटला तशी त्या ज्वालांनी तिला गिळून टाकले."

परिस्थितीची शोचनीयता आता तिथल्या लोकांच्या लक्षात येऊ लागली होती. कोणी काही सांगण्याची गरज नव्हती. डोळ्यासमोर प्रत्यक्ष दिसणारी दृश्ये अश्रू ढाळीत आपली करुण कथा ऐकवीत आहेत.

गावात आग काल लागली होती. पण शहरातल्या अधिकाऱ्यांना इथे यायला आज वेळ मिळाला आहे. गजेंद्राच्या रक्षणासाठी वैकुंठाहून निःशस्त्र आलेल्या भगवान विष्णू प्रमाणे चेअरमन साहेब कसलेही साधन न घेता निघून आले होते. हे रस्ते त्यांना हिरोशिमा, नागासाकी सारखे दिसत आहेत.

राममूर्तीची दृष्टी त्या खुर्चीवर आहे. चेअरमन साहेब कुठेही थांबले नाहीत. आणि खुर्ची खाली आली नाही. वरच्या वरच ती डोक्यावरून नेली जात आहे.

दोन वर्षांपूर्वीची ती गोष्ट. एक दिवस रेव्हेन्यू इन्स्पेक्टर राममूर्तीच्या घरी आले होते. त्यांना बसण्यासाठी राममूर्तीने चटई टाकून त्यावर गादी अंथरली होती पण पँटची इस्त्री बिघडेल या भीतीने इन्स्पेक्टर साहेब बसलेच नाहीत. समोरच्या ओट्यावर दिसलेल्या एका खुर्चीत जाऊन ते बसले. त्या दिवशी खुर्चीचे महत्व राममूर्तीच्या लक्षात आले. गावात अनेक लोक येतात जातात, त्यांचा आदरसत्कार करणे आवश्यक आहे. त्यासाठी घरात एक खुर्ची असणे फारच आवश्यक आहे. घराची अब्रू राखण्यासाठी खुर्ची पाहिजेच. तो आपल्या मुलीसाठी दागिने का घडवितो आहे ? लोकांपुढे आपला मोठेपणा मिरवून समाजात प्रतिष्ठा मिळविण्यासाठी ! आज त्याच्या घरात खुर्ची नाही म्हणून इन्स्पेक्टरसाहेब समोरच्या प्रकाशमच्या घराच्या ओट्यावरील हाताच्या खुर्चीवर जाऊन बसले. राममूर्तीला तेथे जावे लागले, हात चोळीत उभे राहावे लागले. सगळ्यांनी त्याला पाहिले. चार टक्क्यांच्या कर्ज योजनेत त्याचा वाटा पाचशे

रुपये असण्याचे सांगण्यात आले. कमीत कमी पाचशे रुपये द्यावेच लागतील नाहीतर व्याज म्हणून वीस रुपये द्यावे लागतील. हा हिशेब त्याच्या लक्षात आला नाही. सरकारी हुकूमाचा हवाला देण्यात आला. सगळ्यांकडून पैसा वसूल करण्यात आला. राममूर्तीलाही पैसे द्यावे लागले. त्या दिवशीची ही घटना इन्स्पेक्टर साहेब त्याच्या घरी बसले असते तर सगळे लोक त्याच्याच घरी येऊन उभे राहिले असते...........

पंधरा दिवसांच्या आत शहरातून खुर्ची मागविण्यात आली, हाताची खुर्ची. कोणी तरी मोठे लोक, अधिकारी येण्याची राममूर्ती वाट पाहात होता. ते आले पण राममूर्तीच्या घरी आले नाहीत. एकदा गावात मंडलविकास कार्यातर्फे ग्रामसेवकांसाठी प्रशिक्षण शिबीर भरले होते. त्यावेळी ही खुर्ची तेथे नेण्यात आली होती. राममूर्तीने खुर्ची मागितल्यावर आनंदाने दिली. पण थोड्या वेळाने त्याच्या मनात आले की मत्सराने कोणी ती मोडणार नाही ना? तो काळजी करू लागला. पण दैवाच्या कृपेने खुर्ची सुखरूप घरी आली.

नंतर कोणी योग्य व्यक्ती आलीच नाही. त्यामुळे राममूर्तीने दोन्ही दारांच्या मध्ये खुर्ची टाकून त्यावर स्वतःच बसण्याची स्वतःला सवय लावून घेतली. खुर्चीवर बसल्यावर तो स्वतःला बडा समजत असे आणि घरातले नोकर चाकर आणि आपली बायको यांच्यावर तो थोडाफार अधिकारही गाजवीत असे. अशा प्रकारे मोठेपणाची बीजे त्याला खुर्चीतच आढळली. खुर्चीमुळेच कलेक्टरचा अधिकार मानला जातो. खुर्चीमुळेच लोक प्रेसिडेंटचे ऐकतात.

कधी कधी तो प्रेमात येऊन बायकोला जबरदस्तीने खुर्चीत बसवीत असे. ती फार लाजायची. इतकी लाजायची की मध्येच उठून ती निघून जात असे." लक्ष्मी ! खुर्चीवर बसायची देखील लायकी पाहिजे, "असे म्हणून आपल्या पत्नीवर लायकपणाचा जो आरोप तो करी त्यामुळे तिला मोठा अभिमान वाटे. खरे म्हणजे या अभिमान भावनेपेक्षा दुसरी कोणती योग्यता असू शकते ? म्हणूनच ती लाजून म्हणत असे–"

"खुर्चीवर बसणं आणि नोकरी करणं पुरुषांनाच शोभतं, स्त्रियांना नाही."

खुर्चीचा प्रायः हाच उद्देश होता. राममूर्तीच्या घरी दुसरे कोणी आले नाही आणि त्या खुर्चीवर बसलेही नाही.

एक वर्षापूर्वी त्याचे आईबाप वारले. थोडेसे व्याज आणि मर्यादित उत्पन्न

असणारी मालमत्ता मिळाली. कर्ज वा दुसरी कोणतीही जबाबदारी नव्हती शेतीचे काम पाहाणे आणि दोन वर्षांच्या जुन्या, तरीही नवीन भासणाऱ्या पत्नीबरोबर आनंदाने राहाणे एवढीच राममूर्तींची दीनचर्या होती. पत्ते खेळणे किंवा इकडे तिकडे जाऊन लोकांशी भांडणे अशी कोणतीही वाईट सवय त्याला नव्हती. याबाबतीत त्याची पत्नी फारच खूष असे. जेव्हा जेव्हा ती माहेरी जाई तेव्हा आपल्या आईजवळ या गोष्टीचे देखील हमखास कौतुक करी.

त्या खुर्चीची आज गरज पडली.

चेअरमन साहेब थांबलेले नाहीत. त्यामुळे खुर्चीदेखील उतरवली गेली नाही असे दिसते. ती डोक्यावरून घेऊन जाणाऱ्यांचे हात दुखत आहेत असेही वाटत नाही. गर्दीच्या मधोमध अगदी स्पष्ट दिसते आहे. रस्ते स्पष्ट दिसत आहेत. अर्धे गाव नजरेत स्पष्टपणे येते आहे. दक्षिणेकडील रस्ते जरा उताराचे आहेत. त्यामुळे उभ्या भिंतीवरून काळ्या डोक्यांवरील मुंडाशांचे रंग थोडे थोडे दिसत आहेत. परंतु ती हाताची खुर्ची उताण्या पडलेल्या पशूप्रमाणे अगदी स्पष्ट दिसते आहे.

राममूर्ती मनातल्या मनात वैतागून गेला. किती वेळापासून चेअरमनसाहेब खुर्चीवर बसण्याचे नावच घेत नाहीत. तो माणूस बिचारा किती वेळ खुर्ची घेऊन फिरतो आहे. बसायचे नव्हते तर खुर्ची बरोबर घेऊन जाण्याची काय गरज होती ? आता नको एवढे म्हणण्याने काही बिघडत नाही. छे, खरे म्हणजे मागितल्याबरोबर खुर्ची देऊन त्याने मोठीच चूक केली आहे. कोणतीही वस्तू पुन्हा पुन्हा मागितल्यावरच द्यायला पाहिजे तरच त्या वस्तूची किंमत राहाते आणि मागणाऱ्यालाही तिची किंमत कळते. देणारा देखील खूष राहातो. दोन चार मधुमाशांचा दंश झाल्याशिवाय मधाची खरी चव कळत नाही. परंतु राममूर्तीने असे केले नाही. चेअरमन साहेब आल्यावर खुर्ची मागितल्यावर त्याने देऊन टाकली आणि आता दहा लोकांसमोर त्याची बेअब्रू होते आहे.

जवळ जवळ अर्धा तास फिरून पूर्वेकडच्या तलावाच्या बाजूने सगळे लोक पिंपळाच्या झाडाजवळ पोहोचले. खुर्चीवाल्याने खुर्ची उतरवली. कदाचित दीर्घ नि:श्वास टाकला असावा. इतक्यात अध्यक्ष, नायडू, प्रकाशम आणि इतर लोक चेअरमन साहेबांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मेजवानीसाठी घेऊन गेले. फार दिवसांनी आलेल्या चेअरमनसाहेबाना उचित आदर सत्काराशिवाय कसे पाठवणार ? शिवाय त्यांच्याकडे नेहमीच काहीना काही काम पडते. एवढ्या

मोठ्या अधिकाऱ्याचा मानसन्मान तर केला पाहिजे. आता सगळी गर्दी पिंपळाच्या झाडाजवळ थांबली. गावचे पुढारी आणि चेअरमन मेजवानीला निघून गेले.

"सगळा गाव जळून खाक झाला आहे आणि गावकरी अन्नपाण्याविना तडफडत आहेत तरी या लोकांना मेजवानी कशी सुचते?" राममूर्तीच्या मनात आले. अधिकारी मंडळी येऊन आपल्याला मदत करतील या आशेने सगळी जनता बसली आहे. चेअरमन साहेबांनी निवडणुकीत एक लाखाहून अधिक रुपये खर्च केले होते असे लोक म्हणतात. अशा माणसाने या गावात पाय ठेवल्यावर गावकऱ्यांचे जीवन निश्चितच सुधारले. शिवाय या चेअरमनसाहेबांचे सौजन्य आणि औदार्य याचाही लोकांमध्ये बराच उल्लेख होत होता. अधिकार पदावर येऊन एक वर्षदेखील झाले नाही, पण कारभाराची पद्धत फारच उत्साहजनक आहे. त्यामुळे मेजवानी होऊन परतल्यावर ते काय सांगतील, काय देतील याकडे गावकऱ्यांचे डोळे मोठ्या आशेने लागले होते.

प्रेसिडेंटच्या हातातच काही देऊन ते निघून जातील की काय अशी शंका तिथल्या काही लोकांना आली. असे झाले तर विरोधकांवर अन्याय होईल. "ठीक आहे, बघूया काय होते ते," असे म्हणून काही लोकांनी आपला संशय प्रकटही केला.

राममूर्तीने पाहिले—

पिंपळाच्या झाडाच्या सावलीत खुर्ची आहे कोणीही तिच्याकडे लक्ष दिले नाही. कोणी तरी बोलावल्याबरोबर मेजवानीला गेले आणि आमचे तोंडदेखील पाहिले नाही असे जणु खुर्ची म्हणत होती !

पिंपळाखालील मोटारीजवळून सहा पोती लादलेली एक बैलगाडी आली आणि राममूर्तीच्या घरासमोर थांबली.

राममूर्तीने गाडीवानास विचारले, "हे काय आहे ?"

"ठेकेदारसाहेबांनी तांदूळ पाठविला आहे. साहेब म्हणाले, मी मागून सायकलवर येतो आहे."

प्रेसिडेंटचा आवाज, कोणाचे तरी हसणे, कोणाचे ढेकर, कोणाचे खाकरणे कोणाच्या पायातल्या जोड्यांची करकर तर कोणाचे शिंकणे—बाहेर राममूर्ती ऐकत होता.

"गाडी उन्हात उभी कशाला करतोस? त्या लिंबाच्या झाडाखाली घेऊन जा. बैलही आराम करतील." राममूर्ती म्हणाला.

चेअरमन साहेब लोकांच्या जमावाबरोबर तिकडून येत होते आणि इकडून बैलगाडी जात होती. बैलगाडी पाहून लोकांनी चवकशी केली. मिळालेले उत्तर ऐकून ते खूष झाले आणि काही लोक चकित झाले.

पिंपळांच्या सावलीत

एकीकडे मोटार–

दुसरीकडे खुर्ची–

निरोपापूर्वीचे आश्वासन–

एवढ्यात प्रेसिडेंटचा धाकटा भाऊ एका कागदावर चेअरमन साहेबांची सही घेण्यासाठी येऊन उभा राहिला. तो नोकरीच्या शोधात आहे. सही करण्यासाठी त्याच्या अर्जाखाली ठेवण्यासारखी कोणतीच वस्तू तिथे नव्हती. त्यामुळे जवळच पडलेल्या खुर्चीवर उजवा पाय ठेवून आणि गुडघ्यावर अर्ज ठेवून चेअरमन साहेबांनी आवश्यक तिथे सह्या करून टाकल्या. आपल्या या उपकारामुळे स्वतःवर संतुष्ट होऊन ते हसले आणि त्या मुलाच्या चेहऱ्यावरील आनंदाची लक्षणे पाहात गाडीच्या मागच्या सीटवर जाऊन बसले.

बाकीचे लोकही गाडीत जाऊन बसले.

इंजिन सुरू झाले. शिंग वाजले. गाडी निघाली आहे, गाडी गेली.

"मग काय झालं? पैसे पाठवणार!" कोणी तरी विचारले.

"होय बाबा. आता ते अंदाज घेण्यासाठी आले होते. सगळं पाहून घेतलंय. तिकडं जाऊन काम पूर्ण करून पाठवून देतील." सगळे काही माहीत असल्यासारखे दिसणारा एकजण बोलला.

"चेअरमन काही देणार नाहीत काय?" एकाने विचारले.

"त्यांच्याही जवळ पैसा आहे?"

"नाही तर सरकारचा पैसा देण्यासाठी ते स्वतः कशाला इतक्या दूर येतील? हे पाहून जाण्यासाठी तहसीलदार पुरेसा नाही काय?" एकजण कायद्याच्या भाषेत बोलला.

"निवडणुकीसाठी हे लोक लाखो रुपये उडवितात. पण दानधर्मासाठी एक पैसा देखील देत नाहीत. त्यांच्याकडून काही अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे.

ज्याच्या त्याच्या नशिबाचा प्रश्न आहे. त्यानं दिल्यानं तरी माझं पोट भरणार आहे का ? जगात दानधर्माची भावना असेल तर आणखी काय पाहिजे ? महिन्यात चार चार वेळा पाऊस पडेल. हे कलियुग आहे बेटा कलियुग ! सगळेजण तेच विसरत आहेत. ते लक्षांत ठेवा.

"जी गोष्ट आमच्यासमोर आहे तीच आम्हाला मिळत नाही. नाही तर अग्नी· देवतेने आमच्यावर इतकी गैर मर्जी का केली असती ? इतकी घरं का जाळली असती ? समोरची वस्तू देव घेऊन गेला आता पुन्हा कोण देणार आणि कुठून देणार ?" निराशेने दमलेल्या स्वरात एक वयस्क माणूस बोलला.

चेअरमनला एक अतिशय असभ्य अशी शिवी देत एकजण म्हणाला--" हे लोक आमचा जीव खायला येतात, आम्हाला मदत करायला नाही. आजच पाहा, या मेजवानीसाठी मला सव्वीस रुपये खर्च करावे लागले." इतका पैसा खर्च झाल्यामुळे तो दुःखी दिसत होता.

अधिकारी बरोबर असतात तोपर्यंत त्यांची हांजी हांजी करण्याच्या आणि नंतर जनतेचा अनुनय करण्याच्या कलेत हे प्रेसिडेंट पटाईत असतात. प्रेसिडेंट पुढे म्हणाला– "ते सव्वीस रुपये राहिले असते तर दहा गाड्या लाकडं मिळाली असती. आणि उध्वस्त झालेली दहा घरे उभी राहिली असती. पण सगळा शिष्टाचार सांभाळावा लागतो. हे काही केले नाही तर. . ." अशा शद्बात त्याने जनतेबद्दलची सहानुभूती व्यक्त केली. त्याचे घर जळाले नव्हते त्यामुळे निदान एवढे बोलण्याचे धाडस त्याला झाले.

राममूर्तीला हे शद्ब ऐकू आले नाहीत. त्याच्या घरापासून ते पिंपळाचे झाड वीस-पंचवीस यार्ड दूर आहे. सगळे तेथून निघून गेले. पण ती खुर्ची पराजित शत्रूच्या शरीराप्रमाणे तेथेच उपेक्षित होऊन पडून राहिली.

ती खुर्ची राममूर्तीजवळ होती तेव्हा त्याला इतका आनंद समाधान आणि गर्व वाटे त्याच्या लेशमात्र आता वाटत नाही. अंधार पडल्यावर प्रकाशात झगमगणारे रंग आणि निसर्ग यांचे सौंदर्य जसे फिकटते तसेच राममूर्तीमधले चैतन्य मरगळले होते. बाहेरून मार खाऊन आलेल्या मुलाला घरात आणखी मारणाऱ्या बापासारखे त्याचे मन झाले होते. एखाद्या स्वाभिमानी व्यक्तीचा समाजात जेव्हा अपमान होतो तेव्हा तिला मरण अधिक बरे वाटते, त्या प्रमाणे ती खुर्ची या अग्निकांडात जळून गेली असती तर बरे झाले असते, मग त्यासाठी

त्याचे घर जळाले असते तरी चालले असते, असे त्याला वाटले.

आता ती खुर्ची त्याला कुठून तरी आणलेल्या मानाच्या पदाप्रमाणे, परिश्रमाने मिळविलेल्या पदवीप्रमाणे, यश प्राप्तीप्रमाणे किंवा आत्म्याच्या सौंदर्याप्रमाणे भासत नव्हती. आता तो निष्ठुर अधिकार, अहंपणातील अज्ञान आणि क्षुद्र स्वार्थाची धुंदी व लालसा यांचे प्रतीक बनली होती.

त्याच्या मनात आले ती खुर्ची घरी नेऊ नये. ती आपोआप घरी आली तर तिचे तुकडे तुकडे करून टाकण्याचा त्याने निश्चय केला. नंतर त्याचे विचार आणखी कठोर होऊ लागले. आता त्याला बाहेर उभे राहावेना.

तो आत गेला. तसे पत्नीने विचारले—"आपण इतके उदास का ?" नेहमी निर्मळ आणि प्रसन्न दिसणारा त्याचा चेहरा आज एकदम बदलून गेला आहे हे तिच्या लक्षात आले. त्यामुळे ती थोडीशी घाबरलीही. एखादे भूत, प्रेत वा असुर यांचा अभास होताच अनेक लोकांमध्ये भीतीची भावना निर्माण होते. पतीमधला हा बदल पाहून ती काहीशी चकित झाली.

आपले दुःख राममूर्तीला शब्दात सांगता येईना. त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता.

त्या दिवशी संध्याकाळी कोणी तरी ती खुर्ची ओटयावर ठेवून म्हटले— "ही घ्या आपली खुर्ची." बाहेरच्या जगाकडे लक्ष न देता राममूर्तीने ती खुर्ची ओटयावर आपटली. खुर्ची मोडली नाही. मग दुप्पट आवेशाने, संतापाने आणि जोराने त्याने ती खाली जमिनीवर आपटली. तरीदेखील ती फुटली नाही. त्याला अपमानीत झाल्यासारखे वाटले. तिसऱ्यांदा त्याने आणखी जोराने आपटली. आता तिचा एक तुकडा मोडला आणि पायाच्या हाडाला लागला. बरीच वेदना झाली. दुसऱ्यांदा आवाज ऐकून आत स्वयंपाकात गुंत- लेल्या बायकोला वाटले की घरात काही तरी होते आहे. बाहेर येऊन तिने पाहिले तर एकीकडे खुनी माणसाप्रमाणे तिचा पती उभा होता आणि दुसरीकडे खुर्ची तुटून पडली होती, पण तिची सावली तर आहे. ती सावली देखील संध्याकाळच्या सावल्यांप्रमाणे सुरू झाली आणि हळू हळू अंधाराचे रूप धारण करू लागली.

खुर्चीचे सगळे तुकडे गोळा करून त्याने चुलीत टाकून दिले.

राममूर्तीच्या विचाराला केवळ पश्चात्ताप म्हणता येणार नाही. पश्चात्ता-

पाने भरलेली वेदना म्हटली पाहिजे ती. ती वेदना नीट समजून घेण्यासाठी त्या दिवशी घडलेल्या सगळ्या घटनांच विश्लेषण केले पाहिजे.

झालेली जखम हळू हळू भरून येईल. काळांचे मलम सगळे काही बरे करतो.

काही दिवसांनी राममूर्तीने स्वत:लाच एक प्रश्न विचारला.– "त्या दिवशी मला आलेल्या आवेशाचा खुर्ची मोडण्याशी काय संबंध होता. त्या अधिकाऱ्यांचा मला राग आला. त्या बिचाऱ्या खुर्चीची काय चूक होती." अधिकाऱ्यांविरुद्ध काही बोलण्याची हिंमत नसतें तेंव्हा छोट्या लोकांवर आपल्या शक्तीचा प्रयोग करणे फोल आहे. तेंव्हा त्याच्या लक्षात आले की मोठ्या लोकांच्या चुकीचे फळ छोट्या लोकांना का भोगावे लागते.

रंगभूमीवर येणाऱ्या नाटकातील पात्राप्रमाणे खुर्चीला मन नसते. माणसाला असते, पण त्या मनात विवेक, सहिष्णुता किंवा क्षमा यासारखे गुण असत नाहीत.

खुर्ची निर्जीव होती, तोदेखील तिला निर्जीवच समजला.

पण आता त्याला वाटले आहे की, खुर्ची रडते आहे.

कामाच्या शोधात

—आदिविष्णु

ते निघून गेले.

मी सुस्कारा टाकला; हृदय जड झाले. डोळ्यात अश्रू जमा झाले. फाटकाजवळ मी दगडासारखा उभा राहिलो. जाता जाता त्यांनी उच्चारलेले शब्द माझ्या कानात घुमताहेत.

"आई, तुला बोलावते आहे"—बिट्टूने येऊन सांगितले.

मला अश्रू पुसताना पाहून त्याने विचारले.

"का रडतोस तू ?"

जीवनात मी कधी हसू पाहिलेच नाही. मला माझे वडिल तर माहीतच नाहीत, पण आईच्या कुशीतही मी कधी विसावलो नाही. ते कसे राहात होते याचीही मला कल्पना नाही.

कधी कधी मला वाटते की ज्याने देवतेप्रमाणे असणाऱ्या आईची ममता अनुभवली आणि परमेश्वराप्रमाणे असणाऱ्या पित्याचे प्रेम पाहिले आहे तोच आपल्या जीवनात हसू शकतो. सुख मिळवू शकतो. माझ्या नशिबात यापैकी काहीच लिहिलेले नाही.

मोठा भाऊ आहे — पण त्याने मला कधी हसायची संधीच दिली नाही. वहिनी आहे पण ती माझी "आई" कधीच होऊ शकली नाही आणि कधी होणारही नाही. ह्या दोघांनी माझे संगोपन केले आहे.

माझे पालनपोषण करणाऱ्या भावाचे समाजाला फार कौतुक आहे. वहिनी-कडेही लोक मोठ्या आदराने पाहातात. ती दोघेही समाजाच्या डोळ्यांत धूळ फेकण्यात वस्ताद आहेत. हृदयात प्रेम नसताना जगापुढे प्रेमाचे नाटक करण्यात ती दोघेही पटाईत आहेत.

मला पुष्कळ गोष्टी आठवतात. भावाजवळ आमची एक बहीणही राहात होती — अत्यंत केविलवाण्या स्थितीत राहात होती ती. मी तर पुरुष आहे, सहनशील आहे, त्यामुळे आदर नसूनही मी त्यांच्या आश्रयाला राहात होतो.

त्या बहिणीनंतर आईने आणखी चार मुलांना जन्म दिला होता. पण ते मोठे सुदैवी होते, त्यामुळे ते परलोकवासी झाले. सगळ्यात शेवटी मी जन्मलो, आणि आईला व थोड्याच दिवसात वडिलांना जगातून निरोप दिला. त्यामुळेच भाऊ माझ्यावर नाराज आहे.

परंतु बहिणीला ते इतके तिरस्काराने का वागवीत होते ते मात्र मला कळत नव्हते.

ज्या माणसावर तिचे प्रेम होते त्याच्याबरोबर लग्न करण्याचा आपला विचार निर्भयपणाने व्यक्त करते, ही काय तिची चूक झाली, माझ्या डोळ्यां-देखत भावाने बहिणीची मान धरून तिला घराबाहेर काढून दरवाजा बंद केला. मी रडू लागलो. तशी माझे तोंड बंद करून ओढत मला घरात नेले.

माझे तोंड नेहमीच बंद असते. माझे मनोरथ नेहमी उधळून लावले जातात. मी अगदी नालायक आणि कुचकामी आहे. नाहीतर बहिणीचा तो घोर अपमान पाहूनही गप्प कसा बसलो असतो ?

माझी बहीण या नरकातून बाहेर पडली तेव्हांपासून माझ्यावरच्या जबाब-दाऱ्या दुप्पट झाल्या. घरातले सर्व काम मला एकट्यालाच करावे लागे. वहिनी सतत आजारी असे आणि भाऊसाहेब वहिनीला आपला बहिश्चर प्राणच समजत असत. ज्या दिवशी वहिनीसाहेबांचे डोके दुखू लागे त्या दिवशी मला श्वास घ्यायलाही फुरसत मिळत नसे. औषधाला जाणे भाऊसाहेबांना ऑफि-सला पाठवणे, पण त्या आधी तासभर इतर किती तरी कामे मला उरकावी लागत असत.

भाऊ आणि वहिनी मला नेहमी दुर्दैवी समजत. म्हणून माझ्या हातचे जेवणही त्यांना गोड लागत नसे परंतु महिन्यातून वीस दिवस तरी त्यांना माझ्याच हातचे अन्न खावे लागे. त्या दोघांसाठी केलेल्या स्वयंपाकातून मीही चार घास खाऊन शाळेला जात असे. शाळेतून परत आल्यावर पुन: तीच तऱ्हा, हुकूम आणि शिव्या-शाप !

माझ्या इच्छा मारून टाकणारे हे दोघे माझ्या अर्धमेल्या जीवनाला जबाबदार आहेत.

शिकून सवरून आपले भवितव्य बदलण्यासाठी व्याकुळ होणारा मी स्वत:ला कसा खलास करीन ? ही गोष्ट खरी की परिस्थितीने मला योग्य साथ न

दिल्यामुळे मी अभ्यासात हवे तेवढे लक्ष घालू शकलो नाही. या सर्व परि-स्थितीच्या मागे कोणते तत्व असावे बरे ? थोरल्या बंधूंनी या गोष्टींकडे अजिबात लक्ष दिले नाही आणि मी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकलो नाही असे सांगून त्यांनी माझे शिक्षण बंद केले. हायस्कूलातील शिक्षणाबरोबरच माझ्यातील आशावादी मनुष्याचाही शेवट झाला.

शाळा पुन: उघडेपर्यंत मीही तोंड उघडले नाही. भावाची आणि वहिनीची रागाची बोलणी ऐकत राहिलो. त्यांच्या तोंडातून बरसणारा क्रोधाग्नी मी हृदयात साठवून ठेवला. परंतु शाळा उघडण्याच्या एकच दिवस अगोदर माझ्या मनात आशा उत्पन्न झाली आणि मी बंधुराजांना म्हटले, "दादा, मला शिकायचं आहे !"

बंधुराज रागाने लाल झाले.

"अशा प्रकारे दरवर्षी नापास होत राहिलास, तर तुझं पालनपोषण करायला आमच्याकडे काही सोन्याची खाण नाही लागून गेली ! या घरातल्या मुलीनं आमचा जो काही उद्धार केला आहे त्याच्याही पुढे आणखी काही करण्याची तुझी तयारी दिसते." वहिनीबाई पलंगावर उठून बसत म्हणाल्या.

त्यावेळी मला खरोखरच फार राग आला होता. पण बंधूराजांनी आधीच माझ्यावर मी बेपर्वाईने बोलतो असा आरोप केला होता. मी फक्त एवढेच म्हटले होते की, "परीक्षेत मी पास होऊ शकलो नाही याचं कारण या घरातलं सर्व काम मला करावं लागलं, आणि तुम्ही मला घरातला नोकर बनवलंत."

बंधुराजांनी मला बेदम मारले. वहिनीसाहेब रडल्या—त्या भावाने मला मारले म्हणून नव्हे, तर मी तोंड उघडून काही गोष्टी स्पष्ट सांगितल्या म्हणून. दुःखाचा उमाळा, राग, लाचारी हे सर्व त्यावेळी मी माझ्या हृदयाच्या कप्प्यात बंद करून ठेवले.

पण त्या दिवसापासून माझे जिणे आणखीनच कठीण झाले. पावलोपावली मला कुचके बोलणे ऐकून घ्यावे लागे. मी विचार केला, यापेक्षा भीक मागून जगणे बरे ! रात्रीच्या वेळी रिक्षा चालवून दिवसा शिक्षण घेता येईल. असे एक ना दोन अनेक विचार मनात येऊन गेले पण त्यापैकी मी एकही कृतीत उतरवू शकलो नाही.

एके दिवशी वहिनीचे ऐकून भाऊ म्हणाले, "अशा तऱ्हेने घरात माशा मारीत

किती दिवस बसणार? काही काम धंदा शोधा."

काम? मला कोण काम देणार? कोणते काम देणार? मला कलेक्टर बनायचे नव्हते, पंख्याखाली बसून हाताखालच्या दहा पंधरा नोकरांवर हुकूम सोडण्याची महत्त्वाकांक्षा मी कधी बाळगळी नव्हती. एखादी अगदी सामान्य नोकरी करून आपल्या भावासारखे राहावे एवढेच मला वाटत होते.

परंतु ही गोष्ट त्या परिस्थितीत एक स्वप्नच बनून राहिली होती. बंधूराजानी सहजपणे सांगितले, "काम धंदा शोधा . . ." पण त्यांना हे माहीत होते की कोणताही कामधंदा शोधण्यालायक मी नव्हतो.

यमदूताप्रमाणे भयंकर दिसणारा काळ माझ्यासाठी थांबणार नव्हता. बरेच दिवस वाट पाहिल्यावर अखेर परमेश्वराने माझी विनंती ऐकली. वणवण करणाऱ्या मला एखाद्या पहाडाप्रमाणे आधार देणाऱ्या मामांकडून हे पत्र आले होते. या पत्राने मला एकदम हजार हत्तींचे बळ आणि हुरूप आला.

त्या पत्रात त्यांनी लिहिले होते की हैद्राबादसारख्या मोठ्या शहरात कुठे ना कुठे नोकरी मिळवून देण्याची जबाबदारी त्यांनी आपल्यावर घेतली होती. आणि मला ताबडतोब पाठवण्याविषयी भावालाही लिहिले होते. त्याच क्षणी माझ्यातला मरून गेलेला स्वप्नातला माणूस पुन: जिवंत झाला. एक अनंत सुरंगी स्वप्न सुरू झाले.

आता मला कामही मिळाले आहे. काम करीत असताना उच्च शिक्षण घ्यायला मला वेळही मिळतो. शिकून सवरून पुढे पुढे जाणारा मीच माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिलो.

सफेत शर्ट, सफेत पँट, उजव्या हातात घड्याळ, कुरळे काळे केस, केसातून येणारा उंची तेलाचा सुवास मनाला एकप्रकारचा आनंद देत आहे. बंधुराजांपेक्षाही जास्त ऐटीत मी रस्त्यावरून चाललो आहे आणि हातात ऑफिसची फाईल जणू मला आधार म्हणून घेतली आहे. एकाएकी मी एका गलिच्छ जागी अचानक येऊन उभा राहिलो. समोर कोण दिसतंय? कोण आहे ते?

माझी बहीण?

बहिणीच्या आठवणीसरशी माझे स्वप्न भंगले. नोकरी मिळाल्यावर आधी आपण बहिणीचा शोध लावून त्या तपस्विनीचे पाय धरले पाहिजेत. मी जिवंत आहे ताई! मी तुझ्या पाठीशी आहे. मी लहान होतो, अजाण होतो, क्रिया-

हीन होतो तेव्हा माझ्या नालायकपणामुळे तुला घर सोडावे लागले, तुला घरातून घालवून देण्यात आले. आता सर्व प्रकारे मी मोठा झालो आहे. मामांच्या कृपेने मला आता नोकरी मिळाली आहे. मी आता माझ्या पायावर उभा आहे. खूप शिकून- उच्च पदावर मी चढलो आहे आणि एखाद्या मेरू पर्वताप्रमाणे मी तुझ्या पाठीशी आहे ! काय . . . तू मला ओळखले नाहीस ? अग मी तुझा धाकटा भाऊ चिट्टी . . . (छोटू) !

माझे मन जड झाले. मामांचे पत्र मी हृदयाशी धरले. हेच पत्र माझे नशिब उघडील. इतक्यात आमचे बंधू आले आणि म्हणाले, "अरे कसला विचार करतोस ? दिवसाढवळ्या स्वप्नं कसली बघतोस ? इथे तुझे हाल होताहेत नं, मग तिथं जाऊन बघ."

भाऊ आणि वहिनीची माझ्यापासून सुटका झाली तर ते खूप होतील. एखादा नोकर जर गरीब असेल तर तो सर्व मालकांना आवडतो पण ज्या नोकराला आपला अधिकार, कर्तव्य आणि कायदा समजतो अशाला मालक सहन नाही करू शकत. यासाठीच त्या दोघांना माझ्या जाण्याने आनंद वाटत असावा. अगदी गाडीच्या डब्यात बसल्यावरसुद्धा भावाच्या डोळयात ममतेची झाक दिसली नाही.

मी हैद्राबादला पोहोचलो, 'अमरावती सारख्या भव्य बंगल्यात पाय ठेवत असताना मला भीती वाटत होती. इतक्या मान-प्रतिष्ठेने राहाणाऱ्या मामांच्या घरी मला कसे वागले पाहिजे याचा मी विचार करीत होतो.'

मामा म्हणजे अगदी देवमाणूस ! मला भीतीने थरथर कापताना पाहून, ते हसून म्हणाले, "अरे हे घर तुमचंच आहे !" त्यावेळी त्यांच्या हसण्यात आणि आवाजात मी खरोखरच त्यांच्या कुटुंबाचा एक भाग झालो आहे असे मला जाणवले.

मामा माझ्याशी फारसे बोलत नसे परंतु वेणूदादा आणि सुगुणम्मा माझ्याशी मिळून मिसळून वागत. वेणूदादाने डॉक्टरीचा अभ्यास संपवला होता आणि सुगुणम्मा कॉलेजात शिकत होती.

ती दोघेही बाहुल्यांप्रमाणे नाजूक आणि सुंदर दिसत. त्याची शरीरे आणि मन दोन्ही उंची वाटत. त्यांच्या मानाने माझी अवस्था काय होती ? परंतु त्यांच्या प्रेमामुळे मला आमच्यात असलेल्या अंतराचा विसर पडला. या वाता-

वरणात मन प्रसन्न करणाऱ्या अदृश्य शक्तीचे स्मरण करून मी हजारो देवतांना हात जोडून प्रणाम करीत असे.

हैद्राबादला येऊन मला दोन महिने झाले. मामा अष्टौप्रहर कोणत्या ना कोणत्या कामात गर्क असत. स्वत: होऊन मामांच्यापुढे जाऊन आपल्या नोकरीचा विषय काढण्याचे मला धैर्य झाले नाही.

एक दिवस वेणूदादा म्हणाला,

"तू कॉफी फार छान बनवतोस."

मला लाज वाटली.

"खरोखर स्वयंपाकपाणी इतका उत्तम करायला शिकायला किती वेळ लागला असेल ? कोणी शिकवलं हे सारं तुला ? परवा तू जी वांग्याची भाजी केली होतीस नं, ती काय मस्त झाली होती ! तुला हे सांगायचं मी अनेक वेळा ठरवलं. . .पण विसरलोच. खरंच अशी भाजी माझ्या आईलासुद्धा करता येत नाही." तो माझ्या डोळ्यात पाहात म्हणाला.

"आमच्या बंधुराजांकडे मी नेहमी स्वयंपाक करीत असे पण कधी कोणी अशी स्तुती केली नव्हती."

"पदार्थाचा स्वाद ही काय गोष्ट आहे हे त्या बिचाऱ्यांना काय माहीत."

वेणूदादा मला हरबऱ्याच्या झाडावर चढवीत होता. मी ही संधी साधून त्याला म्हटले . . .

"मामांनी मला अजून कुठे नोकरीला लावून दिले नाही. निदान माझी ही गोष्ट तू मामांच्या कानावर घातलीस तर फार उपकार होतील. खरं तर मीच ही गोष्ट त्यांना विचारणार होतो पण मला जरा भीती वाटते."

वेणू माझ्या पाठीवर थाप मारून मोठ्याने हसत म्हणाला, "अरे भ्यायचं काय कारण ? ते काय वाघ सिंह तर नाहीत की लगेच तुला खाऊन टाकतील. ठीक आहे. मी घालतो त्यांच्या कानावर."

मी वेणूदादाकडून स्वयंपाक घराकडे चाललो होतो तेव्हां सुगुणाच्या खोलीतून हसण्याचा आवाज आला. तिच्या मैत्रिणी तिच्याशी गप्पा गोष्टी करीत होत्या. मी आपल्या वाटेने स्वयंपाकघराच्या दिशेने जात असताना सुगुणाने मला हाक मारली. येवढ्या सगळ्या मुलींच्यात कसे जावे म्हणून मला संकोच वाटला.

"हाच आमचा नलराजा आहे. आपण ज्या कॉफीचे आता कौतुक करीत होतात ती ह्याच महाशयांनी बनविली. हा आमचा आतेभाऊ आहे. शिक्षण आणि वय या दोन्ही बाबतीत हा कमी आहे नाहीतर मी ह्याच्याशीच लग्न केलं असतं. बावा, त्या दोघी माझ्या मैत्रिणी आहेत."

सुगुणाने माझी त्या दोघी मैत्रिणींशी ओळख करून दिली. सुगुणा चेष्टेने काही बोलली, त्या मैत्रिणी खळखळून हसल्या. मी खोलीबाहेर आलो. सुगुणाचे ते शब्द अजूनही माझ्या कानात घुमत आहेत—"वय आणि शिक्षण यातच मी कमी आहे, बाकी कशात नाही." बस्स हे पुरेसे आहे, सुगुणाच्या मनात माझ्याबद्दल काही हीन भावना नाही. या ठिकाणी माझ्यात जीवनशक्ती भरणारे लोक आहेत. बस्स !

दुसऱ्या दिवशी वेणूचा वाढदिवस होता. मोठ्या थाटात हा दिवस साजरा होणार होता. त्या दिवशी सकाळपासून रात्रीपर्यंत कामात व्यग्र होतो. श्वास घ्यायलाही वेळ नव्हता.

सायंकाळी वेणूचे सर्व दोस्त आले, त्यात अर्ध्याच्यावर मुलीच होत्या. मी बनविलेले सर्व खाद्यपदार्थ त्यांच्यापुढे ठेवले. त्या सर्वांचे हास्यविनोद, खाणे-पिणे चालू असताना त्यांच्यामधून फिरण्यात मला काय गंमत वाटत होती, मनातल्या मनात मी का सुखावत होतो ते मलाही कळत नव्हते. संबंध घर काही वेगळ्याच आनंदाच्या वातावरणाने भरलेले होते. त्या वातावरणात मलाही उत्साह वाटत होता.

कोणी एक चष्मेवाला माझ्या संबंधात वेणूशी बोलत होता, "अरे वेणू तुमचा तो नायर कुठे दिसत नाही तो ? हा कोणी नवीन मुलगा ठेवलेला दिसतोय !"

"तो तर रुसून आपल्या गावी गेलाय. ह्याला आम्ही आमच्या गावाहून बोलावला" वेणूने त्याला उत्तर दिले.

"काही बिघडलं नाही, हा तर त्याच्यापेक्षा जास्त चांगला दिसतो."

चष्मेवाल्याच्या स्तुतीने मला आनंद वाटला नाही. परंतु वेणूदादाने सर्वांच्या देखत आपल्याबद्दल काढलेले उद्गार ऐकून मला फार दुःख झाले. म्हणजे, मी ह्याच्या घरी स्वयंपाकाचे काम करायला म्हणूनच आलो आहे की काय ? या शहरात मला मिळणारी सर्वांत मोठी नोकरी हीच की काय ? झटकन

मी एका कोपऱ्यात जाऊन डोळ्यातील अश्रू पुसले. खांद्यावर कोणाच्या तरी हाताचा स्पर्श झाल्यामुळे मी दचकून पाहिले.

तो भास्कर होता.

भास्कर हा वेणूदादाचा मित्र ! दोघेही बरोबरच शिक्षण घेत होते. त्यांचे शिक्षण बरोबरच संपले. तो नेहमी आमच्या घरी येत असे. जेव्हा जेव्हा तो येई, तेव्हा तो माझ्याशी जरूर बोलत असे. आता तो माझ्याशी काही बोलायला फक्त आला नव्हता, तर मला काही शिकवायला आला होता. त्याने स्वतःच मला ही गोष्ट सांगितली.

"मला माहीत होतं, तुझी गत हीच होणार आहे म्हणून. श्रीमंत लोकांपुढे तू क्षुद्र बनून जातोस. खरं म्हणजे तू इथं येण्यात फार मोठी चूक केलीस. आज इथं तुझा जो अपमान झाला आहे त्याचं वाईट वाटून घेऊ नकोस. अशा परिस्थितीला धैर्यानं तोंड दिलं पाहिजे. इथे राहूनच आपल्या हितासाठी प्रयत्न केला पाहिजे. जर तुला कसल्याही मदतीची जरूर वाटली, तर माझ्याकडे ये- संकोच करू नकोस."

एवढे दोन शब्द बोलून तो निघून गेला.

माझे मन पुन: दुःखाने भरून आले. त्याच दिवशी रात्री धाडस करून मामांना म्हटले, "मला नोकरी हवीय."

त्यांनी माझ्याकडे मोठ्या आश्चर्याने पाहात म्हटले, "नोकरी नाही म्हणून तुला कोणत्या गोष्टीची कमतरता आहे का ? सांग."

"कोणत्याही गोष्टीच्या कमतरतेबद्दल मी काही म्हणत नाही पण मी नोकरीबद्दल बोलतो आहे कारण मी नोकरी करण्यासाठी इकडे आलो."

"ठीक आहे, पण सर्व लोक नोकरी कशासाठी करतात ? पोट भरण्यासाठी ! हे खरं ना ? आता नोकरी न करता आरामात तुझं खाणं-पिणं चालू आहे ना ? मग एवढी कशाला काळजी करतोस ? इथंच राहा आमच्या बरोबर. आम्ही सर्वजण जे खातो तेच तूही खा ! आणखी काय पाहिजे ?"

मामांच्या बोलण्याचा अर्थ माझ्या लक्षात आला. मी असहाय झालो. त्यांना काय सांगावे, मला समजेना.

"एवढ्याशा गोष्टीसाठी मला भावाचं घर सोडून इथं येण्याची काय जरूर होती ? पोट तर तिथंही भरत होतं. परंतु मामासाहेब माझं उद्दिष्ट आपल्या-

सर्वांचा नोकर बनून राहण्याचं नव्हतं. माझीही काही स्वप्नं आहेत. ती स्वप्नं उराशी बाळगून मी जगतो आहे. मला जगू द्या. मामा, मला जगू द्या !"

पण मामांचा पारा माझे बोलणे ऐकून एकदम चढला.

"लहान-मोठं काहीही विचार न करता काय बडबडतो आहेस ? त्या दिवशी तुझ्या बहिणीनंसुद्धा अशीच बडबड करून आपल्यावर मोठं संकट ओढवून घेतलं. तिचा नवरा मृत्यूच्या दारात उभा आहे–पैसा हवा–औषधं हवी इ. अनेक गोष्टी पत्रात लिहिते. त्या दिवशी तिला तिचा मामा दिसत नव्हता, भाऊ दिसत नव्हता. आज तिला आमची मदत पाहिजे. घे हे पत्र ! वाच !! तिच्यावर आलेल्या परिस्थितीची कल्पना येऊन तुला काही अक्कल आली तर पाहा. . .नाहीतर तूही तिच्या मार्गाने जाऊन नाश पावशील. जा, उद्या यावेळेपर्यंत मला तुझा निर्णय कळव."

कपट ! फसवणूक ! अन्याय !

एव्हाना मामांना माझा निर्णय कळला असेल.

एकीकडे मेव्हण्याची हालहवाल पाहाण्यासाठी मन तळमळते आहे. बिछान्याला त्यांचे शरीर खिळून आहे. दिवसे दिवस त्यांची प्रकृती गंभीर होते आहे. ताईच्या डोळ्यांत आता ते तेज नाही. तिच्या बोलण्यात आनंद नाही, उत्साह नाही. तडफ नाही. या सर्व परिणामाला आमच्या मेव्हण्यांचे आजारपण कारण ! सारा वेळ बिचारी त्यांच्याकडे पाहात राहाते आणि त्याच्याबरोबर छोटूचा आरडाओरडा !

हा आहे माझ्या बहिणीचा संसार.

मी या घरात पाऊल ठेवले तेव्हापासून मला माहीत आहे की एका क्षणाचीही मला फुरसत नाही. स्वयंपाक करणे, मुलाला सांभाळणे, औषधपाणी विकत आणणे हे सर्व मलाच करावे लागते. परंतु एक गोष्ट खरी. आतापर्यंत मी दोन घरी काबाडकष्ट केले, आपला अभिमान गुंडाळून, काही वेळा भीतीमुळे, तर काही वेळा आपल्या अपूर्ण जीवनाला पूर्णत्व मिळेल या अभिलाषेने त्या दोन्ही घरी नोकर बनून मी काम केले परंतु येथील परिस्थिती वेगळी आहे.

हे तर माझ्या प्राणापेक्षा प्रिय अशा बहिणीचे घर आहे. माझ्या सेवेमुळे मेव्हण्यांना आराम वाटेल या आशेवर मी माझ्या सर्वस्वावर निखारा ठेवायला

तयार आहे. शिक्षण घेऊन आणि मोठी नोकरी मिळवून मी कोणाला खूष करू शकणार आहे, मी माझ्या बहिणीच्या सुखासाठी कितीही सेवा केली, कष्ट केले तरी माझे शरीर झिजणार नाही. माझ्या स्वाभिमानाला धक्का लागणार नाही. उलट त्यामुळे माझ्या मनाला उदात्त आनंदाचाच प्रत्यय येईल.

देवीसारख्या माझ्या बहिणीला जेव्हा माझी गरज होती, तेव्हा मी काहीतरी करू शकलो या गोष्टीचे समाधान मला सतत वाटेल.

परंतु भास्कररावांना या सर्व गोष्टी इतक्या सहजपणे समजल्या नाहीत. त्यांनी मला वात्सल्य दाखवले खरे, परंतु त्याचवेळी माझ्या मनावर त्यांच्या बोलण्याने झालेल्या कठोर प्रहाराची त्यांना कल्पना नसावी.

याच गावात त्यांची पुन: भेट झाली. मेव्हण्याचे औषध आणण्यासाठी बाजारात चाललो असता त्यांनी मला पाहिले आणि झटकन माझ्याजवळ येत ते म्हणाले.

तू तिथून निघून जाण्यापूर्वी निदान मला कळवायचं तरी होतंस."

मी गप्प होतो.

"ठीक आहे. इथं कोणती नोकरी मिळाली ? बहिणीच्या घरचा गडीच ना ?"

"डॉक्टर. . .साहेब !"

मी जोराने ओरडलो. माझ्या डोळ्यांतली आग पाहून त्यांनी स्वत:ला आवरले. पण नंतर मलाही लाज वाटली.

"माफ करा, आपण एकदा माझ्या मेव्हण्यांना पाहा आमचं घर इथून अगदी जवळ आहे. आणि माझ्या बहिणीलाही पाहा. सर्व पाहून आपणाला जे वाटेल ते सांगा. तेव्हा मला दु:ख नाही होणार. चला डॉक्टरसाहेब."

त्यांच्याजागी दुसरे कोणी असते, तर मी आपली कहाणी इतक्या सविस्तर-पणे त्यांना सांगितली नसती, आणि तसे सांगण्याची गरजही पडली नसती परंतु डॉक्टर एक सहृदय, सज्जन आहेत: त्यांनी चांगल्या लोकांबद्दल गैरसमज बाळगावा असे मला वाटत नव्हते. यासाठीच मी त्यांना घरी आणले, जवळ बसवले आणि सर्व काही समजावले.

शेवटी कोणाला ठाऊक ते काय समजले, मला तर काहीच म्हणाले नाहीत. मेव्हण्यांना तपासले. छोटूच्या गालावर टिचकी मारली आणि हात पसरून बाहेर आले. मी त्यांच्या मागोमाग बाहेर आलो.

"तू किती तरी वेळा सांगितलं होतंस की तुझी पुढे शिकायची खूप इच्छा आहे. तुझ्यावर दया दाखवायला अनेक कारणं आहेत. पण ती मी सांगू शकत नाही. परंतु तुझ्या शिक्षणाची मी सोय केली आहे. ही गोष्ट मी तुला सांगणारच होतो, तेवढ्यात तू इकडे निघून आलास. आणि..."ते आणखी काही सांगणार होते पण मी मध्येच म्हणालो,

"नाही, डॉक्टरसाहेब, आता मला शिकायची इच्छाच राहिली नाही. आता मला फक्त माझ्या बहिणीचं सुखी जीवन बघायचं आहे. माझ्या मेव्हण्यांची परिस्थिती आपण पाहिली आहे. आपण कसंही करून त्यांचे प्राण वाचवा. बस्स. मला आता फक्त तेवढंच हवं आहे, दुसरं काही नको."

माझ्या पाठीवर हळूवारपणे थोपटीत, जाता जाता ते म्हणाले, "या पृथ्वीच्या पाठीवर असे काही अभागी लोक जन्मतात की त्यांना सुखी करणं कोणाच्याच हातात नसतं. कोणीच त्यांना सुखी करू शकत नाही.'

त्यांचे शेवटचे शब्द कोणाला उद्देशून होते ? माझ्या कमनशिबावर त्यांचा रोख होता की मेव्हण्यांच्या दुर्दशेकडे ?

हे परमेश्वरा, त्यांच्या ह्या शब्दांचा रोख माझ्याच कमनशिबाकडे असू दे. मी दुर्दैवी आहे. मी......

घर

—श्रीमती मालती चंदूर

"हाय बरसातमे.....

"अरे बाबा तेलुगू गाणं लाव."

"अग तू चूप राहा. बालम्मा..."

"चूप कशी राहू? सगळा पैसा त्या नालायकाला देऊन आलात. तेलुगू गाणं लाव रे बाबा!"

राजय्याने रेकॉर्ड बदलून तेलुगू गाणे लावले..."रादे चेली स नम्म रादे चेली..." गाणे वाजू लागले.

तेथे येऊन एक आठवडा झाला आहे. संध्याकाळचे सहा वाजले की या रेकॉर्डस वाजायला सुरूवात होते. आमच्या बंगल्यासमोर एक कौलारू घर आहे. घरासमोर मातीचे लहान लहान ओटे आहेत. शेणाने सारवलेल्या नीटनेटक्या अंगणात फाटकी तुटकी घोंगडी अंथरून राजय्या रेकॉर्ड वाजवीत असतो. बालम्मा ओटयावर बसून तांदूळ निवडीत असते. सकाळपासून कोंडून ठेवलेल्या कोंबडयांना संध्याकाळी मोकळे सोडण्यात येते. आणि त्या राजय्याच्या आणि बालम्माच्या भोवती फिरू लागतात.

हा कार्यक्रम एक आठवडयापासून मी रोज पाहाते आहे. ताई खाली स्वयंपाक करू लागते तेव्हा गच्चीत जाऊन अभ्यास करण्याचा प्रयत्न करू लागते. पुस्तकाचे एक पान उलटले नाही तोच राजय्याची नेहमीची रेकॉर्ड "हाय बरसातमे" वाजू लागते.

गाणे कितीही सुंदर असले तरी ते पुन्हा-पुन्हा किती वेळ ऐकणार?

अशा प्रकारे राजय्याने लावलेली रेकॉर्ड, त्या रेकॉर्ड बरोबर चालणारा कोंबडयांचा कलकलाट आणि दोन्हीहून जास्त जोरात ऐकू येणारी बालम्माची शिवीगाळ यामुळे मला अजिबात अभ्यास करता येत नसे. कधी राजय्याला तर कधी दुसऱ्या कुणाला बालम्मा राहून राहून शिव्या-शाप देत असे.

बंगल्याच्या गच्चीवर उभे राहिल्यावर बंजारा हिल्स वरील मोठमोठ्या

इमारतींवर दिव्यांची तोरणे दिसत. आमच्या बंगल्याजवळ एकमेकांच्या टेकून असलेले तरी थोडे दूर असलेले प्रस्तर होते. त्यांना पाहून मी भिऊन जात असे. त्यातला एकही पाषाण इकडेतिकडे झाला तर आमच्या घरावर येऊन पडेल. लोक म्हणतात, हे पाषाण तेथे असेच्या असे पन्नास वर्षांपासून पडले आहेत. एकीकडे हे भुतासारखे पाषाण आणि दुसरीकडे कानठळ्या बसविणारे "हाय बरसातमें" चे आवाज – मग अभ्यास कसा होणार? ही शिवीगाळ आणि धावपळ यांत त्या पहाडामागे लपून राहाणाऱ्या सूर्याचे नीट दर्शन घेता येत नसे.

माझ्या मेव्हण्यांची हैद्राबादला बदली झाली तेव्हापासून ते मला निमंत्रणा-वर निमंत्रणे पाठवीत होते. सहा महिने त्यांनी निमंत्रणे पाठविली तेव्हा गेल्या डिसेंबरमध्ये मी आले. त्यांचे घर स्वैरताबाद भागात एका लहानशा गल्लीत आहे. तो बंगला आहे आणि त्या गल्लीतले शेवटचे घर तेच. त्या लहानशा गल्लीत तेच घर मोठे आहे. आसपास लहानलहान झोपड्या असूनही माझ्या बहिणीचे घर आतून बरेच सोईस्कर आहे.

घरातली झाडलोट, भांडी घासणे यासारखी कामे समोरच्या झोपडीत राहाणारे राजय्या व बालम्मा करीत. बालम्मा पहाटे पाच वाजता उठून समोरचे अंगण शेणाने फरशीसारखे गुळगुळी सारवून काढी आणि रांगोळी काढून ते सजवी. रोजच्या रोज सकाळी सगळ्या खोल्या सावकाश. . .अगदी काळजीपूर्वक झाडून काढी. इतक्याप्रेमाने तो जमिनीला केरसुणीचा स्पर्श करी की तो झाडतो असे वाटत नसे. घरात साफसफाईची कामें करणारे राजय्या व बालम्मा यांना माझे ताई व भाऊजी फार आदराने वागवीत. ताई व भाऊजी त्यांना काहीसे भीत देखील. एक दिवस सकाळी घडलेल्या एका प्रसंगाने ही गोष्ट माझ्या लक्षात आली.

सकाळी कॉफी झाल्यावर मी आदल्या दिवशी प्रदर्शनात खरेदी केलेली रवींद्रांची तसबीर दिवाणखान्याच्या भिंतीत लावण्यासाठी खिळा ठोकत होते. ते चित्र आपल्या घराची शोभा वाढवील असे मी भाऊजींना सांगत होते. इतक्यात राजय्या वादळासारखा अंगणात येऊन उभा राहिला.

"आवाज कसला होतो आहे, ताई!" माझ्याकडे पाहात त्याने विचारले.

"काही नाही." त्याच्याकडे न पाहाता मी बोलले वाटले. मला विचारणारा

हा कोण ?

"हे काय करता आहात? भिंत खराब करू नका. थांबा" हुकमतीच्या आवाजात तो बोलला.

"तुला काय करायचंय ? जा इथून; असे मीरा गावून म्हणणार होते इतक्यात स्वयंपाक टाकून ताई आणि बाथरुममधून भाऊजी दोघेही काय गडबड झाली हे पाहाण्यासाठी बाहेर आले.

"काय झालं ?" ताईने मला विचारले.

"काही नाही. मी भिंतीत खिळा ठोकीत होते. हा कोण मला मनाई करणारा ?"

"ताईसाहेबांना मी सांगतो आहे खिळा ठोकून नका म्हणून. पण त्या माझे ऐकत नाहीत. घर खराब होऊन जाईल साहेब." राजय्याने भाऊजींना सांगितले.

"मी सांगतो तिला. तू जा राजय्या" असे म्हणून भाऊजींनी मला खिळा ठोकू दिला नाही.

खूप विचार करूनही माझ्या लक्षात येईना, ताई आणि भाऊजी राजय्याच्या बोलण्याकडे इतके गंभीरपणे लक्ष का देतात. ते भिंतीत खिळा ठोकला जातो तेव्हा घर मालकाने भांडणे आणि भाडेकरूंनी घाबरणे असे प्रकार पाहायला मिळतात. पण नोकराला इतके घाबरणे मी कोठेही पाहिले नव्हते.

चौथ्या दिवशी संध्याकाळी मी गच्चीवर उभी होते. ताई स्वयंपाकघरात काम करीत होती. भाऊजी कचेरीतून आले नव्हते. समोर नेहमीचे दृश्य दिसत होते. पण ग्रामोफोनचा आवाज ऐकू येत नव्हता. राजय्या ओट्यावर चिरूट ओढत बसला होता. बालम्मा कुणाला तरी शिव्या देत मधून मधून रडत तांदूळ निवडीत होती.

दुरून म्हणजे गच्चीवरून भाऊजींची हॅट मला दिसली. हात हलवून त्यांचे स्वागत करीत मी गच्चीच्या कठड्याला टेकून उभी राहिले. राजय्या चिरूट फेकून हात बांधून नम्रपणे उभा राहिला. राजय्या फार अशक्त आहे... एखाद्या छडीसारखे त्याचे शरीर आहे. त्याने पन्नाशी ओलांडली असावी. धोतर नेहमी गुडघ्यांवर असते. डोक्यावर रेघारेघांचे पागोटे बांधून आणि निळ्या रंगाचा कुडता घालून राजय्या उभा आहे.

बालम्माचा आवाज तिच्या शरीराप्रमाणे ऐसपैस आहे. तिचा रंग सावळा

आहे. ती काहीशी स्थूल आणि ठेंगणी आहे. चौकटीची साडी ती नेसते. हातात चमकदार बांगड्या आणि डोक्यावर पावलीच्या आकाराचे कुंकू. वय चाळीशीच्यावर असावे. पदर डोक्यावर घेऊन तांदळाचे सूप दाराशीच सोडून बालम्मा उंबरठ्याशी उभी राहिली.

भाऊजी फाटकाशी येताच राजय्याने त्यांना विचारले... "साहेब, पैसे दिले त्यांना ?"

"होय राजू, दिले."

"किती दिले ?" राजय्याने पुन्हा विचारले.

"नेहमी प्रमाणे पंचाहत्तर दिले." असे म्हणत भाऊजी पायऱ्या चढून घरात आले.

राजय्या चिरूट फेकून घराकडे आसुसल्या डोळ्यांनी पाहू लागला. मागून बालम्मा बोलू लागली, 'पैसेही त्याच्याकडे चालले आहेत, घरही त्याचंच झालं आहे, तुमच्या बरोबर राहून माझा सत्यानाश झाला . . . माझं सोनंदेखील मातीत गेलं." एवढे बोलून बालम्मा मोठमोठ्याने रडू लागली. थोडावेळ राजय्याने तिला समजावण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी दोन थपडा लगावल्या. त्यावर बालम्मा आणखी जोराने रडू लागली.

आमच्या घराशेजारच्या पाषाणांवर मंद चांदणे पडले होते. त्या पाषाणांवर थापलेल्या गवऱ्या गमतीदार दिसत होत्या. त्या तरल चांदण्यात भाऊजी कसल्यातरी विचारात बुडून आकाशाकडे पाहात होते.

ताई दुसऱ्या दिवसासाठी भाजी निवडीत होती. बाहेर बालम्माचे मुसमुसणे आता बंद झाले होते. 'हाय बरसातमें'ची रेकॉर्ड पुन्हा वाजत होती. ते गाणे ऐकून मला कंटाळा येऊ लागला. मी म्हणाले, "माझं ऐका आणि राजय्याला आणखी दोन रेकॉर्ड्स आणून द्या. काहीतरी व्हरायटी ऐकायला मिळेल."

भाऊजी गालातल्या गालात हसले. पण काही बोलले नाही.

"राजय्या पैशासंबंधी काही बोलत होता काय ?" भाऊजींशी काही तरी बोलायचे म्हणून मी विचारले.

"आज दुसरी तारीख आहे. मी विसरले होते. माझ्यापेक्षा राजय्या जास्त लक्षात ठेवतो." ताईने भाऊजींना म्हटले.

"यात कसलं रहस्य आहे ? मला सांगा की," मी भाऊजींना म्हटले.

"राजय्यासारख्या रक्ताचे पाणी करून कष्ट करणाऱ्यांच्या दुसरी तारीख लक्षात राहाते. आपल्यासारख्या आरामात बसून खाणाऱ्यांना जशी दोन तारीख तशी वीसही." भाऊजी ताईला म्हणाले.

"रक्ताचे पाणी करून मेहनत केली, पण हाती काय लागलं? सगळं मातीत गेलं. आता घराचा विचार करण्यात काय अर्थ आहे?" शेंगाचे काढलेले दाणे वाटीत टाकीत ताई बोलली.

"अर्थ काही नाही. पण असं समज की दहा वर्षाचा मुलगा कुठंतरी नाहीसा झाला आहे आणि तो परत येण्याचीआशा नाही तरी देखील आईबाप अश्रू गाळायचं सोडतील काय? आई तर दुःखी राहाणारच. बिचाऱ्या राजय्याचे दुःख देखील असेच आहे. प्राणाहून प्रिय असलेलं घर दुसऱ्याचं झालं तर दुःख कसं नाही होणार? दर महिन्याला पाचशे रुपये मिळविणाऱ्या तुम्हाला काय कल्पना येणार?" भाऊजी ताईला उद्देशून म्हणाले.

"हा काय प्रकार आहे?" मी ताईला विचारले.

"त्यांनाच विचार. ते सगळं सांगतील." भाऊजी सांगू लागले: "या घासलेल्या रेकॉर्डच्या मागे असलेले हृदय आम्हाला दिसत नाही. दुसऱ्यांची वेदना समजून घेण्याचे धैर्य आमच्यात नाही. आज राजय्या झाडलोट करणारा नोकर आहे आणि बालम्मा शिवीगाळ करताना दिसते. पण ज्या घरात आज आपण राहात आहोत त्याच्या पायामध्ये त्यांच्या आयुष्यातले मोलाचे दिवस गाडले गेले आहेत. त्यांच्या घामातून या घरांच्या भिंती उभ्या राहिल्या आहेत". भाऊजी व्याकुळ होऊन पुढे म्हणाले...

"ताजमहाल बांधण्यासाठी देखील मजुरांची गरज पडली. ते काम राजे लोकांचं नव्हतं. तसंच हे घर तुम्ही आम्ही बांधलेलं नाही. राजय्यासारख्या मजुरांनी पैशासाठी घाम विकून ते बांधलं असेल. मजुरांच्या घामाने ज्यांचा पाया घातला गेला नाही असं कोणतं घर असू शकेल?" मी तर्क करीत म्हटले.

"राजय्याने मजुरीसाठी जर हे घर बांधलं असतं तर त्याचं कुणाला इतकं वाईट वाटलं नसतं आणि तो देखील इतका रडला असता असं मला वाटत नाही. खरं म्हणजे त्यानं जिवापाड मेहनत करून आपल्या कमाईचा पैसा आणि घाम एकत्र करून हे घर बांधलं होतं. प्रत्येक वीट त्यानं स्वतः लावली. तू विश्वास ठेव, दहा हजार रुपयांचं हे घर वर्षापूर्वी राजय्याचं स्वतःचं होतं.

मालती, आज तोच राजय्या समोरच्या झोपडीत राहात आहे आता तीच त्याची एकमेव मालमत्ता आहे." भाऊजी हळू आवाजात सांगत होते.

मला आश्चर्य वाटले. झाडलोट करणारा नोकर राजय्या एवढे मोठे घर कसे बांधू शकला ? जर ते त्याने स्वतःच्या मेहनतीतून बांधले होते तर त्याने कसे गमावले ? मग पुन्हा राजय्याच्या घरातून "रादे चेली नम्म रादे चेली" हे तेलुगू गाणे एकू येऊ लागले.

भाऊजी सांगताहेत :

"राजय्या मिस्त्री होता. त्याचं स्वतःचं कुटुंब होतं. बालम्माला नवरा होता. पण मुलं नव्हती. बालम्माच्या घरासमोरच्या रस्त्याची दुरुस्ती चालू असताना राजय्याशी तिचा परिचय झाला. परिचयाचं प्रेमात रूपांतर झालं. शेवटी बालम्मा पंचवीस तोळे सोनं घेऊन राजय्याकडे निघून आली. दोघं दोन वर्षपर्यंत दरमहा तीन रुपये भाड्याच्या छोट्याशा झोपडीत राहिली. बालम्मा मोलमजुरी करी आणि राजय्या मिस्त्रीचं काम करी. दोघांनी आपल्या कमाईतून आठशे रुपये साठवले. त्यातून पाचशे रुपयांची जमीन त्यांनी ह्या घरासाठी खरेदी केली. बालम्माचे दागिने विकून जवळजवळ तीन हजार रुपये मिळाले. त्यांतून दारा-खिडक्यांसाठी लागणारं लाकूड, लोखंड, चुना दगड यासारखं सामान आणून घर बांधायला सुरूवात केली.

"रोज रात्री राजय्या आणि बालम्मा स्वतः खोदकाम करीत. दिवसभर दुसरीकडे काम करीत. राजय्याला महिन्याला पन्नास रुपये मिळत आणि बालम्माला तीस मिळत. त्यातल्या वीस रुपयांत खाण्यापिण्याचा खर्च करून बाकीचे साठ रुपये ती घरासाठी खर्च करीत.

"रेतीच्या दुकानदारांशी मैत्री करून राजय्या स्वतःच रेती घेऊन येई आणि अशा प्रकारे ती वाहून आणण्याचे पैसे वाचत. अर्धा रुपया वाचविण्यासाठी अर्ध्या रात्री राजय्या आणि बालम्मा गल्लीतल्या कोपऱ्यावरून दगड वाहून आणीत.

"अशाप्रकारे अर्धे घर बांधून झाल्यावर पैसे संपले. भिंती अर्ध्या उभ्या झाल्या होत्या परंतु तुळया, दारे आदी कामे राहिली होती. त्यासाठी मारवाड्याकडून कर्ज घ्यावं लागलं. दरमहा वाचविलेले साठ रुपये ते घरावर खर्च करीत होते व शक्य तिथे मजुरीचे पैसे वाचवीत होते. शेवटी एका वर्षात चार हजार रुपयांच्या कर्जातून घराचे काम पूर्ण झाले. स्वयंपाक घरात एक नळ,

बाथरूममध्ये दुसरा नळ, मागच्या बाजूला आणखी एक नळ, झोपण्यासाठी वेगळी खोली, समोर हॉल, स्टोअर रूम, सगळ्या खोल्यांत मोठमोठी कपाटे, वीज . . . अशा प्रकारे घर तयार झाले. दोन महिने राजय्या आणि बालम्माने दुसऱ्या कुणाची मदत न घेता रात्र रात्र मेहनत घेऊन घर रंगविलं आणि सजविलं.

"घर तयार झालं तेव्हा चार हजारांचं कर्ज होतं. कर्ज देखील घर गहाण टाकून मिळालं होतं. शेटजींनी कर्ज फेडण्याचे दोन मार्ग सांगितले होते. एक म्हणजे व्याजाच्या दरानं बाजारभावानं परतफेडीचा. दुसरा मार्ग होता गहाण-जप्तीचा. दुसऱ्या पद्धतीत व्याज फार कमी पडणार होतं. चार वर्षांत चार हजारांवर फक्त आठशे रुपये व्याज, म्हणजे मुद्दलाच्या पाचवा हिस्सा. एकूण चार हजार आठशे रुपये देणं होतं. याचा अर्थ दरमहा दर सहामाहीला राजय्याला सहाशे रुपयांच्या हिशेबाने कर्जाची फेड करावी लागत असे. ते एकदा जरी चुकले तरी घर जप्त झाले असते. जगाचा व्यवहार कमी समजणाऱ्या राजय्याने कमी व्याजाचा मार्ग मान्य केला. इतक्या मेहनतीने घर बनवू शकलो तर सहा महिन्यांत सहाशे रुपये देणे अवघड नाही असे त्याला वाटले.

"राजय्याने पाऊणशे रुपये मासिक भाड्याने घर भाडेकरूंना दिले. भाडेकरू घराचे भाडे शेटजीकडे जमा करीत त्याशिवाय वरच्या दीडशे रुपयांची जमवाजमव करण्यासाठी राजय्या आणि बालम्मा उपाशी राहून पै पैची बचत करून कसेतरी कर्ज चुकवीत राहिले कमीत कमी खाण्यापिण्याचा खर्च निघावा या उद्देशाने बालम्मा झाडलोट करायला तयार झाली आणि राजय्या शेजारच्या गल्लीतल्या एका बंगल्यात माळी काम करू लागला. अशा प्रकारे ते घरावरचे कर्ज फेडू लागले.

"पहाटे तीन वाजता उठून स्वयंपाक करून आमच्या घरी झाडलोट करून, जेवण तयार करून आणि दुपारचे जेवण बरोबर घेऊन दोघे कामाला जात असत. संध्याकाळी घरी येताच राजय्या बागेत जाई आणि बालम्मा आमच्या घरी काम करू लागे. कुठे चुना निघाला असेल तो लाव. दारावर मुलांनी लिहिले असेल ते पूस, मागच्या लहानशा परसात रोपे लाव . . . . अशा कामात रात्री दहापर्यन्त ती व्यग्र राहात.

"पहिली दोन वर्षे शेटजींचे कर्ज चुकविण्यास काही त्रास झाला नाही. सहाशे रुपयांचा पाचवा हप्ताही त्यांनी फेडून टाकला. आणखी तीन हप्ते दिले

म्हणजे घर आपले होणार, नंतरचे दिवस सुखात जाणार अशी गोड स्वप्ने ती दोघे पाहू लागली. एक दिवस सडक फोडणाऱ्या एका मजुराजवळ राजय्या उभा होता. चुकून कुदळ राजय्याच्या पायावर पडली आणि त्याचा पाय सुजला. बिचारा तीन महिने आजारी पडला. त्याचे औषध-पाणी सेवाशुश्रूषा करण्यासाठी बालम्माला काम सोडावे लागले. त्याचवेळी भाडेकरूची बदली होऊन तो निघून गेला. दोन महिने घर रिकामे राहिले. सगळी संकटे एकावेळी महापुरासारखी राजय्यावर येऊन कोसळली. सहावा हप्ता त्यामुळे त्याला वेळेवर देता आला नाही. याच संधीसाठी टपून बसलेल्या शेटजींनी पंधरा दिवसांची नोटीस देऊन घर जप्त केले आणि राजय्याला दया दाखवून त्याला बाराशे रुपये देऊन टाकले.

"राजय्यावर वज्राघात झाला. बालम्मा हाय खाऊन रडू लागली. भलंबुरं बोलू लागली. राजय्याच्या हातचा करारनामा शेटजींनी दहा लोकांना दाखविला तो वाचून सगळे म्हणाले," शेटजी फार दयाळू आहेत त्यामुळे त्यांनी स्वत: राजय्याला बाराशे रुपये देऊन टाकले.

"परंतु राजय्याच्या हृदयात पेटलेल्या आगीची कुणाला कल्पना करता येईल ? प्रत्येक दगड आणि प्रत्येक खिळा निवडून त्याने घर बांधले होते. अठराशे रुपये कमी पडल्यामुळे त्याचे घर त्याच्या हातातून गेले होते. हा काय न्याय झाला ? त्या बाराशे रुपयांतून त्यांनी आमच्या घरासमोरची झोपडी खरेदी केली. राजय्याने पुन्हा मिस्त्रीचे काम केले नाही. दोघे मिळून तीस तीस रुपये कमवितात. ते घर . . . ती जागा सोडून दुसरीकडे कुठंही ती जाऊ शकत नाहीत. ते घर आपलं नाही. याची त्याला कल्पना आहे. या घरात राहणाऱ्यांना भिंतीत खिळा ठोकायला मनाई करण्याचा अधिकार आपल्याला नाही हे तो जाणतो, तरी भिंतीवर खिळा ठोकला जात होता तेव्हा त्याला राहावले नाही. त्याच्या मनाची तळमळ झाली. हे घर आणि इथला आसमंत यांना राजय्यानं आपला आत्मा वाहिला आहे.

दसऱ्याच्या वेळी ह्या घराला रंग द्यायचा होता. राजय्या आणि बालम्मानं दुसऱ्या कुणाला बोलावू दिलं नाही. या घराची रंगरंगोटी त्यांनी स्वत: केली. बाहेरचे लोक काम नीट करीत नाही म्हणून त्यांनी स्वत: ते काम केलं.

"दर दुसऱ्या तारखेला भाडं चुकविलं की नाही हे राजय्या न चुकता

विचारतो. स्वतःचा पगार मागतही नाही. शेटजींना मिळणाऱ्या भाड्याची त्याला जास्त काळजी आहे. कधी कधी या घराबद्दलचे त्याचे ममत्व पाहून मला घृणा वाटू लागते. परंतु जेव्हा विलक्षण केविलवाणी मुद्रा करून राजय्या, "भाडं दिलं का साहेब" म्हणून मला विचारतो तेव्हा मी त्याच्यावर नाराज कसा होऊ?

"ज्या घरानं त्यांचं रक्त शोषलं त्यावर त्यांचं एवढं प्रेम पाहून मला वाईट वाटतं. बाहेर बघा, बालम्मानं अंगण किती स्वच्छ केलं आहे. इतकं की त्यात आपल्याला आपलं प्रतिबिंब दिसेल. आयुष्यात आता त्यांना कसलीही आशा नाही. त्या छोट्याशा झोपडीशिवाय जगात त्यांची दुसरी काहीही मालमत्ता नाही. ज्या घराची स्वप्नं त्यांनी पाहिली ते त्यांच्या हातून निघून गेलं. पण या घराच्या छायेतही त्या बिचाऱ्यांना बाकीचं आयुष्य काढता आलं तर... प्रत्येक जीवन ही एक दीर्घ कहाणी असते.

"मी राजय्याला म्हटलं, की खिळा ठोकल्यानं तुझं काय बिघडत, आपला ग्रामोफोन घेऊन चालू लाग – तर तो किती दुःखी होईल! ह्या घराची छाया आणि ग्रामोफोनचा आवाज-आता आयुष्यात त्याला एवढाच दिलासा आहे."

भाऊजी आणखी काही बोलू शकले नाहीत. माझे डोळे भरून आले. राजय्या आणि बालम्माचे नशिब खोटे आहे. त्यांच्या जीवनात "बरसात" नाही, ती "बरसात" आता ग्रामोफोनच्या आवाजात आहे.

तुम्हाला ही कल्पित कथा वाटते काय? नाही ही खरी घटना आहे. खैरताबाद स्टेशनापासून आकाशवाणीकडे जाणाऱ्या रस्त्यावर तिसऱ्या गल्लीत वळलात की आजदेखील "हाय बरसातमे" हे गाणे आणि बालम्माचे शिव्याशाप एकू येतील. माझ्या या गोष्टीवर विश्वास नसेल तर एकदा स्वतः जाऊन ते घर पाहून या.

लग्नाला जाते मी

—श्रीमती तुरगा जानकी राणी

"चला ऊठा . . . . आपण जाईपर्यन्त पहाट होईल," कुणी तरी म्हणाले. माझी अर्धवट झोप उडाली. ज्या ओटयावर आम्ही अंथरूणे टाकली होती. त्याच्या जवळच्या मंडपात झोपलेल्या दोघांपैकी एक दोघे कुशी बदलत होते. आरामखुर्चीत बसलेली एक व्यक्ती जागी होत होती. शंकरम् होता तो! तो उठून आळोखे – पिळोखे देत होता. जवळच ठेवलेल्या दिव्याच्या प्रकाशात त्याचा चेहरा अंधुक दिसत होता. थकवा जाण्यासाठी तो हात झटकीत होता. कोणी तरी आपल्या मुठीत गळा घट्ट धरले असावे अशी वेदना माझ्या मनाला झाली.

सगळे लोक उठले. एका तासात तयारी करून आम्ही सगळे दोन गाड्यांतून निघालो. सुमित्रेच्या आजोबांच्या त्या लहानशा गावात लग्न होणार आहे. सुमित्रेचे पत्र आणि शंकरमची चार ओळींची चिठी यामुळे मला या लग्नाला हजर राहाणे भाग पडले. चादर जवळ ओढीत मी बाहेर पाहिले. पुढच्या गाडीत तीन व्यक्ती होत्या. शंकरम् त्याच गाडीत होता.

हे मंद चांदणे किती विचित्र आहे! माझ्या डोक्यातील मोतियाचा गजरा आणि जवळच्या टोपलीत ठेवलेली उगललेली फुले-दोन्ही राहून राहून माझ्या मनात एक विचित्र वेदना निर्माण करीत आहेत. दुरून एका कावळ्याचे आर्त ओरडणे ऐकू येते. पीक नसलेली जमीन मैदानासारखी पसरलेली आहे. रस्त्याच्या बाजूचे पर्णहीन वृक्ष अस्पष्ट रेखाकृतींसारखे दिसत आहेत. मनातल्या वेदनेमुळे मी डोळे झाकून घेतले.

चार वर्षांपूर्वी—हेच चांदणे किती प्रसन्न वाटायचे! आपल्या स्निग्ध सौंदर्याने सगळ्या जगाला आनंदित करणारे चांदणे होते ते! त्यदिवशी रात्री तो रस्ता, ही जमीन आणि तो कालवा माझ्याकडे चमकदार रेशमी वस्त्राच्या जरीच्या झालरीआडून जणु बघत होते. चांदणे चांदीसारखे लखलखत होते. सगळे वृक्ष स्तब्ध होते.

त्या दिवशी समोरच्या गाडीतून शंकरमची गाणी ऐकू येत होती. माझ्या

पापण्या मिटू लागल्या. चालणाऱ्या बैलांच्या पायांचा आवाज, कोरड्या जमिनी-तील ढेकळे फोडीत पुढे जाणाऱ्या चाकांचा खडखडाट आणि या दोन्हीपेक्षा मोठी अशी बैलांच्या गळ्यातील मोठमोठ्या घुंगरांच्या माळांची रुणझुण–हे सगळे आवाज त्या स्निग्धशीतल रमणीय चांदण्याच्या वातावरणात विलीन होत होते. याच आवाजांतून शंकरमचा आवाज ऐकू येत होता.

त्या पूर्वी एक महिना त्याने सगळ्या गोष्टी मला का सांगून टाकल्या होत्या कोणास ठाऊक ! खरोखरच त्याला माझा सल्ला पाहिजे होता की काय ? कॉलेज सोडल्यावर आपल्या मनातल्या गोष्टी सांगण्यासाठी कदाचित त्याला माझ्या शिवाय दुसरा कोणी मित्र मिळाला नसावा किंवा त्याने मनोमन सुशीलेशी लग्न करण्याचा निश्चय केला असावा आणि दुसऱ्यांचे औपचारिक अनुमोदन त्याला त्यासाठी हवे असावे. शक्य आहे. कारण बैलांच्या गळ्यातील घुंगरू जणू याच गोष्टीचे समर्थन करीत वाजत आहेत.

त्या दिवशी शंकरमने मला टेलिफोन केला, "आज दुपारी मी इथं आलोय्, उद्यां इंटरव्ह्यू आहे." मी त्याला हॉस्टेलमध्ये येऊन भेटायला सांगितले.

"आज मी येऊ शकणार नाही. आजच परीक्षा आहे. उद्या संध्याकाळी येईन. कुठंतरी बाहेर जाऊ. परवानगी घेऊन ठेव."

"बराय्" असे म्हणून मी फोन ठेवून दिला. लहानपणी त्याचा माझा विशेष परिचय नव्हता. परंतु बनारसहून परत आल्यावर आमचा परिचय वाढला. गेल्या उन्हाळ्याच्या सुट्यांत मी गावी आले तेव्हा शंकरम्च्या घरी दहा पंधरा दिवस राहावे लागले. त्यावेळी आमच्या परिचयाने स्नेहाचे रूप धारण केले.

"परीक्षा झाली ?" मी हसत त्याला विचारले . . . दुसऱ्या दिवशी संध्याकाळी.

"झाली परीक्षा. बाहेर जाऊया ? या चार भिंतींमध्ये मला गुदमरल्या-सारखं वाटतं," तो म्हणाला.

पंधरा मिनिटांनी आम्ही समुद्राकाठी गेलो. वाळूतून तो हळूहळू चालत होता. थोडा वेळ थांबून त्याने खिशातून रूमाल काढला आणि तो त्याने चष्मा पुसू लागला. मग रूमाल गळयात कॉलरच्या आतून ठेवीत माझ्याकडे पाहात तो म्हणाला, "बसूया की फिरत फिरत गप्पा करूया ?"

"तुला वाटेल तसं !" मी म्हणाले. तो तिथेच बसला. मुले उडणाऱ्या फुग्यांमागे धावत होती.

"मला तुला एक विशेष गोष्ट विचारायची होती." त्याचा आवाज गंभीर होता. का कोण जाणे मला हे सगळे विचित्र वाटत होते. काल मी टेलिफोनवर त्याचा आवाज ऐकला तेव्हापासूनच मला विचित्र वाटू लागले.

"विचार," मी म्हणाले. तो थोडावेळ स्तब्ध राहिला. मग म्हणाला . . .

"तुला कदाचित माहीत असेल, आईवडील लवकरच माझं लग्न करणार आहेत."

मी मान हलवली आणि खाली पाहात वाळूवर बोटाने रेघोट्या काढू लागले. तो पुन्हा गप्प झाला. त्याला मला काय विचारायचे होते हा प्रश्न मला पडला होता. उत्तर ऐकण्याचे धाडस मला नव्हते.

"आपल्या सुशीलेबद्दल तुझं काय मत आहे ?" त्याने विचारले.

किनाऱ्यावर येऊन फुटलेल्या लाटेप्रमाणे क्षणभर मला वाटले. त्यानंतर पसरणाऱ्या फेसाळ पाण्याप्रमाणे माझे विचारही पसरू लागले.

गेल्याच आठवड्यात तुझ्या मामांनी माझ्यापुढे ही कल्पना मांडली. सुशीला साधीभोळी आहे असं लोकांना म्हणताना मी ऐकलं आहे. माझ्यासारख्या कठोर माणसाशी तिचं कसं जमेल याचाच मला विचार पडलाय्," असे म्हणत तो मंदपणे हसला. मीही नाइलाजाने हसले. म्हणाले, ...

"तसं काही नाही, जोडी चांगली जमेल."

अंधार पडेपर्यन्त आम्ही तेथेच बसून राहिलो. त्याने पुष्कळ गोष्टी सांगितल्या. आपले मन कशाप्रकारे किती दिशांनी भटकते आहे हे सगळे त्याने सांगून टाकले. सगळ्यांचे उत्तर 'अस्सं', 'होय', 'हं.' अशा शब्दात मी त्रोटक-पणे देत होते. ही गोष्ट त्या दिवशीची.

त्यावेळी सुशीला आणि शंकरम्च्या लग्नाला आम्ही सगळे गेलो होतो. मी देखील गेले. शंकरम् संसारी बनला.

. . . . . चार वर्षे स्वप्नासारखी निघून गेली. या काळात बऱ्याच घटना घडल्या. मग एक दिवस सुमित्रेचा आवाज टेलिफोनवर ऐकू आला, "संध्याकाळी घरी येशील ? पिक्चर पाहायला जाऊ." तिने विचारले. मी हो म्हटले.

थिएटरमध्ये बसल्यावर दहा मिनिटांनी माझ्याकडे वळून ती बोलली, "तुला एक खास गोष्ट विचारायची होती, म्हणून मी हा कार्यक्रम आखला."

"असं ? थिएटरमध्ये ?"

"होय, या अंधारातच मी नीट बोलू शकेन," ती म्हणाली.

वृत्तपटाचा कार्यक्रम सुरू झाला. माझा हात आपल्या हातात दाबीत ती म्हणाली, सुशीलेचे भाऊ आणि वहिनी आमच्या घरी आले होते. सुशीला वारल्यापासून तिचा मुलगा त्यांच्याकडे राहातो आहे.

तिचे हे बोलणे मला विचित्र वाटू लागले. परंतु ती जे सांगणार होती ते त्या अंधारात देखील काजव्याप्रमाणे माझ्यापुढे चमकू लागले. बराच वेळ आम्ही स्तब्ध होतो. पडद्यावर दिसणारे दृश्य मला काहीही समजत नव्हते. शंकरम् कोण आहे आणि मी कोण आहे ? मी इथपर्यंत कशी आले ?

"तिच्या वहिनीनं मला विचारलं होतं ...." तेव्हा मी म्हणाले, "सुशीला जाऊन अजून एक वर्षही झालेलं नाही, इतकी घाई कसली ?" बोलत बोलत सुमित्रा थांबली. मान खाली घालून हातांनी तिने डोळे झाकून घेतले.

"पण... हे एकाकीपण त्याला जास्त खटकत असेल असं वाटतं. खरोखर ... तो संकटातच आहे. तुझं त्याच्याबद्दल काय मत आहे ?" तिने विचारले.

मी लगेच काहीही उत्तर दिले नाही. मग म्हणाले ..... "तू देखील त्याला ओळखतेस ना ? मी काय सांगणार ?"

"तसं नाही. माझी त्याची फक्त तोंडओळख आहे. तुमचं नातंही आहे आणि मैत्रीदेखील. माझं मन तू समजू शकतेस." तिचा आवाज कापरा झाला होता.

"चांगला माणूस आहे तो सुमित्रा. तो प्रेम करू शकेल," मी म्हणाले. तेच मला सांगायचे होते आणि मी सांगून टाकले.

.... शेवटी आता .... शंकरम् आणि सुमित्रेच्या लग्नासाठी आम्ही पुन्हा एकदा निघालो आहोत. भरात येऊन चांदणे शिंपडणारी स्निग्ध रात्र नाही ही. रात्रभर बरसून पहाटेच्या पिवळ्या अंधारात वेदनेचे निश्वास सोडणारे निष्प्रभ चांदणे आहे हे !

..... मी डोळे मिटून घेतले. डोंगरातून आणि झाडांमधून खळखळणाऱ्या झऱ्यांचे आवाज मागून ऐकू येत आहेत. तो झरा माझ्या मागून येऊन मला स्पर्श करीत माझ्यावर तुषार उडवीत गुपचूप पुढे वाहात चालला आहे. माझ्या शेजारून एक लहानसा कालवा मंद वाहात पुढे जात दृष्टीपर्ल्याकडे जाऊन त्या झऱ्याला मिळू पाहातो आहे.

आणि मी .... मी इथेच या धूसर चांदण्यात एकटी राहिले आहे.

फाटकी चादर

—बोम्मिरेड्डी पल्लि सूर्याराव

खेड्याने पांघरलेल्या अंधाराच्या फाटक्या चादरीच्या भोकातून मिणमिणणारे दिवे दिसत आहेत. रात्रीचे नऊ देखील वाजले नसतील. सगळ्या गावात सामसूम झाले. मध्येच कुठेतरी चार/पाच माणसे ओटयांवर बसून धूम्रपान करीत गप्पा मारीत आहेत. चिरूटांची जळती टोके उडू न शकणाऱ्या काजव्या-प्रमाणे चमकत आहेत.

झोपडीच्या अंगणातील ओटयावर बसून बैरागी रामस्वामी एकतारीबर भक्त रामदासाचे गीत गातो आहे. बैराग्याचा आवाज भीषण आहे. परंतु तो म्हणत असलेले गीत रामदासाचे असल्यामुळे शेजारी ते ऐकून घेत आहेत. रात्रीच्या वेळी कुत्र्यांच्या भुंकण्याबरोबरच हे गाणेही ऐकण्याची संवय गांवकऱ्यांना झाली आहे. रामस्वामीचा भाचा सत्यम जेवण करून ढेकर देत बाहेर आला.

"मामा, व्हरांड्यात चटई अंथरुन कंदील ठेवू का ?" असे म्हणत त्याने बैराग्याच्या गाण्यात अडथळा आणला. बैराग्याने एकतारी खाली ठेवून वैतागून म्हटलें, "ठेवून दे रे ! रोज रोज काय विचारतोस ?"

"त्याचं असं आहे मामा ! दोन दिवसांपासून पोलिसांचा पहारा वाढल्याचं कलेक्टरचा चपराशी सांगत होता. म्हणून विचारलं मामा !"

"तो लेकाचा बरा भेटलाय् तुला. स्वतःला कलेक्टरच समजतो तो. असे सत्यम, पोलिसांची गोष्ट माझ्यापुढे कशाला करतोस ? मला काय माहीत नाही ? सहा वेळा तुरुंगाची हवा खाऊन आलोय मी. हे लोक उगाच अफवा पसरवतात आणि लोकांना घाबरवतात. दुसरं काय ?"

मामाची सगळी कहाणी सत्यमला माहीत आहे. वेळीअवेळी बैरागी आपल्या आयुष्यातल्या गोष्टी मोठ्या गर्वाने सांगत असतो. बैराग्याला लिहिता येत नाही ; नाहीतर त्याने आत्मचरित्र नक्की लिहिले असते.

आत्मविश्वास आणि गर्व हे रामूचे जन्मसिद्ध गुण आहेत. लहानपणापासून भरपूर व्यायाम केल्यामुळे तारुण्यात प्रवेश करताच त्याचे शरीर अधिकच

धष्टपुष्ट बनले आणि गोटीबंद शरीरामुळे तो एखाद्या पुष्ट घोड्यासारखा दिसू लागला. नेहमी शरीराच्या विकासाकडे लक्ष दिल्यामुळे कष्ट करून आयुष्य घालवण्याचा विचारही त्याने कधी केला नाही. ज्या मुलीशी त्याला लग्न करायचे होते तिच्याशी त्याने वडिलांशी भांडून लग्न केले आणि सासुरवाडीतच कायमचा मुक्काम ठोकला. सासू-सासऱ्यांच्या सांगण्यामुळे नाइलाज होऊन त्याला पत्ते खेळून अथवा कोणाचा तरी खिसा कापून दोन-चार पैसे तरी घरात द्यावे लागत. एकदा तो पकडला गेला आणि सहा महिने तुरुंगात पडला. तुरुंगातून सुटून तो घरी आला तेव्हा त्याची बायको एका मुलीला जन्म देऊन जगातून निघून गेली होती. मुलीच्या संगोपनासाठी लागणारा पैसा तो चोऱ्या करून मिळवू लागला. अशा प्रकारे गावोगाव तुरुंगाच्या वाऱ्या करीत तो पंधरा वर्षे गावाबाहेर राहिला. पंधरा वर्षांनी तो घरी परतला तेव्हा सासू-सासरेही हे जग सोडून गेले होते. आता मुलीच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावरच येऊन पडली. मुलगी मोठी झाली होती, त्यामुळे तिला घरी एकटे सोडून बाहेर जाणे शक्य नव्हते. त्यामुळे त्याने गावातच एक झोपडी बांधली आणि तो तिथे राहू लागला. तो उतार वयाकडे झुकू लागला होता आणि आता शरीरही दुर्बल होऊ लागले होते. पूर्वीचे आयुष्य विसरून एकदम नवे जीवन सुरू करण्याच्या विचाराने तो भगवे कपडे नेसून संन्यासी बनला. एकतारी हा त्याचा आधार बनला. रामूचा रामस्वामी तर झाला; पण उदरनिर्वाह कसा करायचा? घरात राहाणारा भाचा अतिशय आळशी आहे; एक पैसाही तो कमावू शकत नाही. त्यामुळेच तो घराच्या अंगणात पत्ते खेळणाऱ्या लोकांना एकत्र करून त्यांच्यासाठी चटई-दिव्याची व्यवस्था करतो आणि त्यांच्याकडून त्याचे भाडे घेतो. चटई अंथरणे, दिवा लावणे आणि बाहेर उभे राहून पोलीसांना पाहाताच आत खबर पाठविणे ही या भाच्याची ड्युटी आहे. खबर मिळताच बैरागी दिवा विझवतो आणि सगळे लोक आपापल्या वाटेने निघून जातात.

भाचा एकदम मामाचीच आवृत्ती आहे. घोटीव बलदंड शरीर आणि कुरळे केस यामुळे तो फारच सुंदर दिसतो. मामापेक्षा तो जास्त समजदार आहे. आणि थोडा शिकलेलाही. परंतु अंग मोडून काम तो करीत नाही. त्यामुळे बैरागी आपल्या भाच्यावर नाराज असतो.

बैराग्याची मुलगी गौरम्मा आतून चिलीम आणि आगपेटी घेऊन आली. चिलीम भरून ती शिलगावीत बैरागी म्हणाला, "बेटी ! आज तुझ्या मामाचं पत्रं आलंय्. लिहिलंय्, त्याच्या मुलाला मुन्सीफ कोर्टात चपराशाची नोकरी मिळाली आहे."

गौरम्मा सत्यम्‌कडे पाहून हसली. त्या हसण्याने सत्यमचे शरीर पुलकित झाले. अंधारातल्या दिव्यासारखे तिचे सौंदर्य आहे. कोणालाही तिचा मोह पडतो. गौरम्माच्या हास्याचे रहस्य सत्यमला माहीत आहे. या आधीच गौरम्माने ते पत्र चोरून त्याच्याकडून वाचून घेतले आहे. आपल्या मुलाशी गौरम्माचे लग्न व्हावे अशी मामाची इच्छा आहे. बैराग्यालाही तसे वाटते.

"पण एक अडचण आहे. जर तुझं त्याच्याशी लग्न झालं तर मी एकटा राहीन. नाहीतर मला देखील तुझ्याबरोबर तिकडंच यावं लागेल." बैराग्याचे मन त्या दिशेने विचार करू लागले. खरे आहे. बैरागी आपल्या मुलीला सोडून एक क्षणभरही राहू शकत नाही. तिच्यावर त्याची अतिशय माया आहे.

"ठीक आहे. तसंच करू या. इतकं चांगलं स्थळ पुन्हा मिळणार नाही. इथल्या जागेशी नातं तोडून तिथंच जाऊन राहू.", बैरागी निश्चयी स्वरात बोलला.

"जाऊ द्या बाबा ! आताच काय घाई आहे ?" गौरम्मा म्हणाली.

"घाई का नाही बेटी ?"

"पण मी त्याच्याशी लग्न करणार नाही बाबा ! अगदी कसायाचं मन आहे त्याचं. त्याला हृदयच नाही."

"तू बरोबर बोललीस बेटा ! म्हणूनच तो शभर रुपये दरमहा कमावतो. पगाराशिवाय वरचं उत्पन्नही आहे. हृदय असणारा माणूस एक पैसाही कमावू शकत नाही, वेडे ! हृदय पाहिजे माझ्यासारख्या बैराग्याला, कमावणाऱ्याला नव्हे. काहीही असो. ही संधी सोडता कामा नये. मी तर वचनदेखील दिलंय्."

मुलगी मोठी झाली तरी बैराग्याला ती अजून लहानच वाटते. तिच्या बोलण्याकडे लक्ष देण्याची जरूरी त्याला वाटत नाही. एखाद्या चांगल्या घरात ती पडली म्हणजे तिचे आयुष्य सुखात जाईल. त्यालाही कमावण्याची चिंता राहाणार नाही. देवाचे नाव घेत त्याला आरामात, आयुष्य घालवता येईल. पित्याचे विचार गौरम्माला समजले. ती काही बोलली नाही.

सत्यमने बैराग्याला व्हरांड्यात बोलावले. बाहेर व्हरांड्यात दहा माणसे

बसली आहेत. एका कोपऱ्यात कंदील जळतो आहे. एक माणूस पत्ते वाटीत आहे. बैरागी एका कोपऱ्यात उभा राहिला.

"काय बैरागीबुवा ! दिवा असा का मिणमिणतो आहे ? तेल नाही का ?"

"तेल का नाही ? आताच तर चार आण्याचं तेल आणून त्याच्यात भरलंय्. वाऱ्यामुळे असं होतंय्. पाऊस देखील पडण्याची शक्यता दिसते. लौकर खेळ संपवा." बैरागी म्हणाला.

"पाऊस पडला म्हणून काय झालं ? आमचा खेळ अडणार नाही. उलट पोलिसांचा त्रास वाचेल."

"ठीक आहे. प्रभू रामचंद्राचं नाव घेऊन खेळ सुरू करा म्हणजे जरूर जिंकाल. परंतु एक डाव संपल्याबरोबर जिंकणाऱ्याला प्रत्येक रुपयाला एक आणा भाडं मला ताबडतोब द्यावं लागेल. लोक आपणहून देतील असं समजून काल मी झोपलो तर माझं एक रुपयाचं नुकसान झालं," बैरागी म्हणाला.

"बिचाऱ्याचं नुकसान झालं ! बैरागीबुवा, एकदा तरी खरं बोला. खेळ रंगात येतो तेव्हा तुम्ही 'पोलीस पोलीस' म्हणून दिवा विझवता. आणि त्यावेळच्या धावपळीत आमचे पैसे गायब करता. कितीतरी वेळा केलंय् तुम्ही हे ?"

"राम राम ! असा नीचपणा मी कधी करीत नाही. अंधारात कोण कोणाचे पैसे हडप करतो कोण जाणे. मी बैरागी आहे. मी पैसे घेऊन काय करू ?"

"ठीक आहे, बैरागी बुवा. बरोबर बोललात. म्हणूनच आम्ही तुम्हाला हात जोडून म्हणतो की तुम्ही इथे राहू नका. पाहिजे तर आपल्या भाच्याला इथं पाठवून द्या. तुम्ही जाऊन एकतारी वाजवीत बसा."

"बरं आहे. माणूस प्रामाणिक असेल तर दुसरं काही नको. भाड्याचे पैसे वेगळे ठेवून द्या, म्हणजे झालं."

"प्रामाणिकपणे आपल्या भाड्याचे पैसे तुम्ही घ्या. आम्ही नाही म्हणत नाही. पण मध्येच पोलिसांची भीती दाखवून, दिवा विझवून पैसे पळवाल तर लक्षात ठेवा, मार खाल. आधीच सांगून ठेवतो." एका खेळाडूने ताकीद दिली.

डाव सुरू झाला. आरंभीच लोक जरा रंगात आले. खेळ पाहात बैरागी तिथंच बसून राहिला.

बाहेर रस्त्यावर सत्यम आणि गौरम्मा बोलत होती.

"अग वेडे ! इतकी उदास का होतेस? दोन-तीन दिवसांत तुझ्या वडिलांचा राग थंड होईल. मग पुन्हा येथेच येशील. मारवाडी मला फार मानतो. पाहिजे तेव्हा तो मला नोकरी मिळवून देईल. मग आपण ऐटीत राहू" सत्यम सांगत होता.

भाचा बाहेर आपल्या मुलीशी बोलतो आहे हे बैराग्याने पाहिले. ताबडतोब बाहेर जाऊन त्याने भाच्याला व्हरांड्यात पाठवून दिले. मग मुलीला आत जाऊन झोपायला सांगितले आणि तो रस्त्याच्या कडेला ओट्यावर बसून चिलीम पिऊ लागला.

बैराग्याच्या मनात आपल्या मुलीच्या लग्नाचाच विचार होता. या लग्नासाठी त्याने पाचशे रुपये जमवून ठेवले होते. दागदागिन्यांसाठी दोनशे रुपये आणखी ठेवले होते. मुलीचे लग्न थाटात व्हावे अशी त्याची इच्छा होती. हा कंगाल बैरागी आपल्या मुलीचे लग्न कसले करणार असे लोकांनी म्हणताना त्याने ऐकले होते. तो मनाशी म्हणत असे की, लग्नाचा थाट पाहून सगळे लोक थक्क होतील आणि बैरागी विलक्षण माणूस आहे असे म्हणतील. कोणालाही कुठेही बोट देखील ठेवायला उणे तो राहू देणार नव्हता.

बैराग्याने अंग टाकले. झोपेत त्याला स्वप्न देखील पडले. आपला जावई आपल्याला फार मान देत असून स्वतःकडे बोलावून घेत आहे असे त्याला स्वप्नात दिसले.

किती रात्र झाली कोण जाणे. व्हरांड्यातले सगळे लोक आरडाओरडा करून उठून गेले. बैरागी चमकून उठून बसला. व्हरांड्यात दिवा नाही. सगळे लोक आपापल्या वाटेने जात आहेत.

"काय झालं रे ?" बैराग्याने डोळे चोळीत विचारले.

"खरंच पोलिसांची शिट्टी ऐकू आली. जवळच आलेले दिसतात," असे म्हणत एक खेळाडू पळून गेला.

बैरागी चिलीम घेऊन आत गेला. सगळीकडे अंधार होता. काडी ओढून दिवा पेटवला. चटईवर एक पैसाही नव्हता.

"काय रे सत्यम् ! पैसे कुठे आहेत ?" असे म्हणून तो ओरडू लागला. दिवा मोठा करून आत पाहिले. सत्यम् कुठेही नव्हता. हा नीच माणूस दिवा विझवून पैसे उचलून पळालेला दिसतो असे म्हणत त्याने गौरीला हाक मारली.

पण गौरीही कोठें दिसली नाही.

"गौरम्मा मला सोडून गेली ?" या विचाराने बैराग्याचे डोके गरगरू लागले. तो मटकन् जमिनीवर बसला. अंधार आणि प्रकाशाचे डोळे झाकून लपंडाव खळणाऱ्या बैराग्याच्या डोळ्यांना आता काहीही दिसेनासे झाले आहे. कंदील कोठही असला तरी या अंधाराच्या गुहेतून बाहेर पडण्याचा रस्ता त्याला सापडेना. आता त्याला आयुष्य खरोखरच कडू वाटू लागले.

वडाची सावली आणि मोतियाचा वेल

—नार्ल चिरंजीवी

सुवासिनीच्या कपाळावरील कुंकवाप्रमाणे असणारे सूर्यबिंब पश्चिमेकडे सरकले. देवस्थानच्या जमिनीचा पट्टेदार रामसामी मोटेने शेतीला पाणी देत आहे. गली दोन वर्षे ओसाड पडलेले हे शेत आता त्याच्या हातात आले आहे. दोन वर्षांत त्याने तेथे अनेक पिके काढून भाजीपाला पिकवून ते सचेतन करून टाकले आहे. हिरवेगार शेत आता वाऱ्यावर लहरत होते आणि पहिले पीक काढण्याची तयारी चालू होती. पिकाकडे बघताच नुकत्याच काढलेल्या दुधाने काठोकाठ भरलेले भांडे पाहून व्हावे तसा आनंद त्याच्या डोळ्यातून ओसंडत होता. पाणी शिंपून होताच भाजी काढायची आहे आणि सकाळ होताच ती मंडईत नेऊन पैसे आणायचे आहेत. मनात असे विचार चालू असतानाच रामसामीला विहिरीजवळच केळीचा घड दिसला. घड पिकून तयार झाला होता.

"बाबा, मला एक केळ देणार नाही का ?" त्याच्या पाच वर्षांच्या मुलीने– हेमाने – विचारले.

"होय तर बेटा ! हे सगळं तुझंच आहे. उद्या आणखी पिकेल मग खा." बाबाने तिला समजावून सांगितले.

"चला बाबा ! तुम्ही नेहमी उद्याच सांगता, "असे म्हणत हेमाने जमिनीतून मोतियाचा वेल उपटला आणि तो घेऊन ती वडाच्या झाडाकडे पळत गेली. आपल्या मुलीकडे पाहाता पाहाता रामसामीला तीन वर्षांपूर्वी त्याला सोडून गलेल्या पत्नीची आठवण आली. आयुष्यात इतक्या दिवसांनी तिचे नशीब उघडले होते पण ते पाहाण्याचे भाग्य तिच्या कपाळी नव्हते. विहिरीवर लाकडाच्या पट्टीचा आवाज येतो आहे आणि काठावर पसरलेल्या वेलातून वारं फिरते आहे. सोंडेतून आत जाणाऱ्या पाण्याप्रमाणे त्याचे विचारही खळबळत

पुढे जात आहेत.

धर्माधिकाऱ्यांच्या कृपेने त्याला शेतीचा हा तुकडा मिळाला आहे. त्यांनीच त्याच्या मुलीचे नाव हेमा ठेवले आहे. त्यांना त्याच्या बद्दल आणि त्याच्या मुलीबद्दल अपार ममता वाटते. हेमा हे रामसामीच्या पोटी निर्माण झालेले सोने आहे तर तिथला भाजीपाला हे त्याच्या घामातून निर्माण झालेले सोने आहे. हे सगळे त्या थोर पुरुषाच्या दयेचे फळ आहे. त्यांचे नाव रामसामीला वंदनीय वाटते. गावात त्यांची आणि देवळात ईश्वराची कृपा असली की त्याला पुरे. हेमाच्या शिक्षणाची व्यवस्थाही तेच करणार आहेत. शिकल्या सवरलल्या मुलाशी तिचे लग्नही तेच करून देतील. हे विचार मनात येता येता रामसामीच्या कानात सनई वाजू लागली, डोळे भरून आले आणि त्यात तरल चांदणे चमकू लागले. नारळाच्या झावळचा वाऱ्याने हलल्यासारखा आवाज झाला तसे रामसामीने चमकून पाहिले—तेच धर्माधिकारी समोर उभे होते. हेमाची पाठ थोपटीत ते हसत होते. एवढा मोठा माणूस पण एखाद्या रोपट्यासारखा हलतो आहे.

त्यांना अभिवादन करीत रामसामी मोट तशीच सोडून वडाकडे धावला.

"पाहा रामसामी, हेमाला किती चिंता पडली आहे. वडाच्या सावलीत गवताचं पात दखील उगवू शकत नाही तिथं मोतियाचा वेल कसा वाढेल ?" धर्माधिकाऱ्यांनी म्हटले.

"ती लहान आहे साहेब. तिला काय कल्पना ?" रामसामी हात चोळीत म्हणाला. हेमाचा हात धरून धर्माधिकारी विहिरीकडे चालू लागले. रामसामीच्या काहीच लक्षात येत नव्हते.

"रामसामी मळा किती सुंदर दिसतो आहे ! वांगी भेंडी दोडकी भोपळा खूप चांगलं पीक आलेलं दिसतंय."

"होय साहेब सगळी आपली कृपा."

"हे पाहा रामसामी, यात माझी कसली. कृपा. सगळी त्या वेणू गोपालाची कृपा आहे. मी फक्त निमित्तमात्र आहे."

"असं म्हणू नका साहेब. या गावात मी आलो तेव्हा अगदी अनोळखी होतो. गावात इतके लोक असूनही शेती मलाच देववलीत. आपली कृपा नसती तर माझं काय झालं असतं कुणाला ठाऊक ?"

नम्रतेने रामसामी धनुष्यासारखा वाकला.

"माझी उगीच स्तुती करू नकोस, रामसामी. मला एक गोष्ट सांगायची होती. गावकरी आपल्याबद्दल काय बोलताहेत हे तू ऐकलंस का? तुला तिकडे जायला वेळच कुठे आहे म्हणा."

"होय. गावाकडे जाऊन बरेच दिवस झाले."

"लोक म्हणतात, आपण दोघे एकाच ताटात जेवतो आणि एकाच पलंगावर झोपतो. लोक आपल्याला इतके जिवश्च कंठश्च मित्र समजत आहेत. कळलं?"

"साहेब आपण कुठं, मी कुठं?"

"तेच मला ऐकायचं नाही. लहान–मोठेपणाचा विचार आपण करू नये. दुसऱ्यांच्या बोलण्याची काय गरज? आपण दोघे खरोखरच दोस्त आहोत. तुला असं वाटत नाही? सांग."

"असं कसं म्हणता साहेब?"

"रामसामी मी कुणाच्याही घरात पाय ठेवत नाही. देवळात जातो किंवा तुझ्याकडे येतो. बस. अरे वा! कळी देखील तयार झाली का? शाबास!"

"होय साहेब."

"आता आठवलं, काल रात्री माझं आणि बायकोचं खूप भांडण झालं."

"असं काय झालं साहेब?"

"तिची तक्रार आहे की मी तुझ्याकडे आणि हेमाकडे बिल्कुल लक्ष देत नाही म्हणून."

"साहेब, आईसाहेब साक्षात देवी आहेत!"

"खरी गोष्ट मी आतापर्यंत सांगितलेली नाही. घरातल्या गोष्टी मी लोकांना कधी सांगत नाही. ती आता आई होणार आहे. तिसरा महिना चालू आहे."

"फार चांगली बातमी सांगितलीत साहेब, आपल्याला पेरूसारखा मुलगा होईल असं माझं मन म्हणतंय!"

"माझ्या मनचंच तू बोललास. आपलं दोघांचंही एकच मन आहे. एकच विचार आहे."

"होय साहेब."

"उद्या पहाटेच आम्हाला गावाला जायचंय. माझ्याबरोबर ती देखील येईल. तू भाग्यवान आहेस. रामसामी. तुझ्यावर जबाबदारी कसलीही नाही. आमच्या

सहाव्या मेव्हणीचं लग्न आहे. आम्ही रिकाम्या हातांनी गेलो तर लोक हसतील. सोनं – नाणं तर आम्ही देऊ शकत नाही. आहेर सगळेच लोक आणणार हिच्या मनात एक विचार आला. ती म्हणाली की, लग्नासाठी काही फळभाजी घेऊन जाऊ या. मी म्हणालो, की चांगली कल्पना आहे. मी बोलून तर चुकलो. पण फळभाजी कुठं ? कोणाला विचारावं ? तुला विचारायला पाहिजे किंवा दुसऱ्या कोणाकडे जावं लागेल. मी म्हणतो हे काम माझ्याकडून होणार नाही. पण रामसामी–तिनं फारच हट्ट धरला – एक प्रकारचे हे डोहाळेच म्हटले पाहिजेत."

धर्माधिकारी महाशयांवरील या "संकटामुळे" रामसामीचे मन विरघळले.

"असं कसं बोलता साहेब. आईसाहेबांचं म्हणणं ऐकलंच पाहिजे. शेवटी हा मळा आहे कुणाचा ? आपल्याला कोण रोखू शकणार आहे ?" रामसामी बोलला.

"तू असं म्हणशील हे मला माहीत होतं. त्याच विश्वासानं मी आलो. मला माहीत आहे रामसामी, मी पैसे देणं बरोबर होणार नाही आणि न घेणंही बरोबर ठरणार नाही. मग आता काय करायचं ?"

"आपण असं बोलायला नको, साहेब."

रामसामी नको नको म्हणत असताही धर्माधिकारी भाजी तोडायला मदत करू लागले. बोलत बोलत आपल्या बरोबर स्वतः काम करणाऱ्या धर्माधिकाऱ्यांना पाहून रामसामी मनातल्या मनात खूष होत होता. झोपडीतून तो एक पोतं घेऊन आला. पावसाळ्यात डोक्यावर घेण्याचे पोते होते ते. त्या पोत्यात त्याने भाजी भरून ते बांधून टाकले.

"वा ! माझ्या शब्दावर पोतंभर भाजी दिलीस. माझी चिंता दूर झाली रामसामी. आईसाहेब फार खूष होतील. शिवाय आता त्यांना–माझं म्हणणंही कळी–"

"थांबा साहेब. केळी देखील घेऊन चला."

धर्माधिकाऱ्यांनी थोडेसे संकोचल्यासारखे दाखवले. त्यांच्या तोंडून आणखी शब्द निघायच्या आतच रामसामीने केळ्यांचा घड उतरून त्यांना प्रसन्न केले. धर्माधिकाऱ्यांनी म्हटले, खऱ्या स्नेहाचे हेच लक्षण आहे. रामसामीने पोते डोक्यावर उचलून घेतले आणि केळ्यांचा घड काखेत धरला. मग तो धर्मा-

धिकाऱ्यांच्या मागून चालू लागला. धर्मराजाच्या स्वर्गारोहणाच्या वेळी त्यांच्यामागे मागे चालणाऱ्या कुत्र्याची गोष्ट धर्माधिकाऱ्यांना आठवली. पण ते काही बोलले नाहीत.

अर्ध्या तासापूर्वी मजेत डुलणारा तो मळा आता म्हातारीच्या तोंडाप्रमाणे रिकामा दिसू लागला. संध्याकाळ झाल्यानंतर रामसामीच्या झोपडीत हळू हळू अंधार पसरला.

धर्माधिकाऱ्यांच्या वाड्यात दिवे पेटले होते. रामसामीने ओझे उतरून घाम पुसला. धर्माधिकाऱ्यांना फारच दया आली. घाईघाईने रामसामीला तांब्याभर पाणी आणून दिले. पाणी पिऊन रामसामीने थकवा दूर केला. दिव्याच्या मंद प्रकाशात दोघांचे चेहरे प्रसन्न दिसू लागले.

"इतका अंधार पडला तरी ती अजून मागच्या खोलीतच आहे असं दिसतं. जरा जाऊन पाहा बरं, रामसामी !"

रामसामीने मागच्या खोलीकडे जाण्यापूर्वी केळ्याच्या घडाकडे पाहिले. केळ्यासारख्याच सुंदर असलेल्या आपल्या मुलीची त्याला आठवण आली. मग त्यावरील नजर उचलून तो मागे गेला. धर्माधिकाऱ्यांनी घडातली चार पाच केळी तोडून चाखून पाहिली. तेवढ्यात त्यांची पत्नी मंगम्मा देखील आली.

"हे फळ इतकं गोड असेल अशी मला कल्पना नव्हती. कदाचित् ते नवं खत न घालताच त्यानं ही पिकवली असावीत. किती चवदार आहेत ही !" पतीचे बोलणे ऐकून मंगम्मानेही दोन केळी तोडून चाखून पाहिली.

"रामसामी कुठे आहे ?"

"मागे बराच केरकचरा पडला आहे. मी त्याला तो स्वच्छ करून टाकायला सांगितलं."

"तो दिसला की तू त्याला काम सांगतस. तोही आपल्यासाठी जिवापाड काम करतो. पोटाची पर्वा न करता राबतो. ते जाऊ दे—ही भाजी पाहा. तुझ्या बहिणीच्या लग्नाचा थाट वाढेल."

"बरोबर. भावजींचं आपल्यावर किती प्रेम आहे हे मेव्हणीला कळेल. आणखी काय ?"

पतीपत्नी खूष झाली. रामसामी आल्याबरोबर धर्माधिकाऱ्यांच्या खोट्या रागाची फुलबाजी त्याच्यावर झडली—"हे पाहा रामसामी, तुझं आमच्यावर

प्रेम असेल, पण तू स्वतःकडेही दुर्लक्ष करता कामा नये." मालकाला रागावलेले पाहून बिचारा रामसामी घाबरून गेला. त्याला घाबरलेला पाहून धर्माधिकारी त्याची पाठ थोपटीत मोठ्या प्रेमाने म्हणू लागले–"अरे इतका वेळ तू इथं राहिलास, तर तिकडे हेमाचं आणि मळ्याचं काय होईल ? लवकर घरी गेलं पाहिजे. हेमानं तर आमच्या सारख्या लोकांच्या घरीच राहायला पाहिजे. ठीक आहे. आता तू जा. कामाचं नाव ऐकलं की तू जीव टाकतोस. दिवस-रात्र विसरून मेहनत करतोस." मालकाच्या या गोड कानउघाडणीने रामसामीच्या हृदयावर जणु प्रसन्नतेची बरसात झाली. मुलीचे नाव ऐकून तर तो अतिशय खूष झाला.

"ती नावापुरतीच माझी मुलगी आहे. आपल्या छायेतच तिचं पालन पोषण झालं पाहिजे, साहेब. आपल्या कृपेनंच ती शिकून सवरून पुढे जाईल. मालक !"

"रामसामी, हेमा मोठी भाग्याची आहे. ती मळ्यात जन्मली असली तरी किल्ल्यात राहील. बरं, आता तू जा. आपण बोलत बसलो तर पहाट होईपर्यंत गप्पा संपणार नाहीत. आणि असं बघ–जाता जाता टांगेवाल्याला उद्या सूर्योदया-पूर्वीच इथं टांगा घेऊन यायला सांगून जा," असे म्हणून धर्माधिकाऱ्यांनी रामसामीला निरोप दिला.

"आताच मला म्हणालात की मी याला काम सांगते म्हणून. आता तुम्ही देखील तेच केलतं!" मंगम्मा तक्रारीच्या स्वरात म्हणाली.

"हे बघ, तू त्याला काही काम सांगितलंस तर मला दया आली पाहिजे. मी काही सांगितलं तर तुला दया आली पाहिजे. दुसऱ्यांना समजून घेण्यातच माणसाचं मोठेपण आहे, समजलीस ? जग बघताबघता माझे काळयाचे पांढरे झाले आहेत."

"आपण किती छान समजावून सांगता–केळं सोलून तोंडात टाकावं तसं." मंगम्मा मनातल्या मनात खूष होऊन गोडगोड बोलू लागली." बिचारा राम-सामी फार सरळ माणूस आहे," एखादी गोष्ट अचानक आठवल्यासारखी ती मोठ्या आपुलकीच्या स्वरात म्हणाली. .

"आता समजलं ? सगळे मोती एकाच जागी एकत्र होत असतात. म्हणजे असं की चांगली माणसं नेहमीच एकत्र येत असतात. हे रहस्य तुला समजायला हवं.

बरं ते जाऊं दे. जास्त विचार केल्यानं तुला त्रास होईल. तुझी अवस्था ही अशी!" धर्माधिकारी बोलले.

रातराणीसारखी मंगम्मा लाजली.

मेव्हणीच्या लग्नाहून आल्यानंतर धर्माधिकारी दररोज रामसामीच्या घरी जाऊ लागले. रामसामीकडची भाजी वऱ्हाडी मंडळींना किती आवडली आणि किती चवीने त्यांनी ती खाल्ली, याची तपशीलवार वर्णने धर्माधिकारी दहा दिवसपर्यंत वेगवेगळ्या प्रकारे करीत राहीले, तेव्हा रामसामीचा आनंद गगनात मावेनासा झाला. टपोऱ्या दाण्यांची ज्वारीची कणसे भाजून रामसामी आपल्या मालकांना खाऊ घाली तेव्हा ते ती मोठ्या आनंदाने खात असत. भाजीची टोपली रोज न चुकता धर्माधिकाऱ्यांच्या घरी पोचे. आणि बाहेरच्या अंगणातील केर-कचरा रामसामी रोज स्वच्छ करी. असे अनेक दिवस गेले, महिने लोटले. हळूहळू धर्माधिकारी रामसामीला बाभळीच्या गोंदाप्रमाणे, चिकण मातीप्रमाणे आणि भिंतीवरच्या पालीप्रमाणे चिकटले. दोघांमधील स्नेह इतका दृढ झाला की दोघांना वेगळे करणे मुश्किल झाले.

मळा आता काहीही पिकवण्याच्या परिस्थितीत नाही. गळ्याप्रमाणेच हेमाचे मनोरथही सुकून गेले आहेत.

रामसामीच्या बुद्धीप्रमाणेच कालचक्रही सुरू झाले. उन्हाळा आला. त्याच्या हृदयात आणि शेतातल्या विहिरीत पाण्याचा एक थेंबही नाही. मागच्या वेळचे पीकही त्याच्या हाती लागले नाही. या वर्षीचे शेतीच्या ठेक्याचे पैसे मृत पत्नीच्या उरलेल्या एकमेव दागिन्याची विक्री करून धर्माधिकाऱ्यांच्या हाती ठेवले. ठेक्याचा पैसा प्रामाणिकपणे वेळेच्या पूर्वीच दिल्याबद्दल धर्माधिकाऱ्यांनी चार लोकांपुढे रामसामीची मोठी प्रशंसा केली.

रामसामीपुरते बोलायचे तर मिरची बरोबर पाटाचे पाणी पिऊनही तो दिवस काढू शकतो. पण मुलीसाठी एक झगादेखील घेता आला नाही, या विचाराने दोन तीन वेळा त्याने अश्रू गाळले. त्याची कोणतीच इच्छा पूर्ण झाली नाही. यावेळी पिकाचा पुरेपूर पैसा वसूल करण्याचा त्याने दृढनिश्चय केला. आता मळा सोडून कुठेही जायचे नाही. आणि मातीतून सोने पिकवायचे असे त्याने ठरवले. त्याने जमीन नांगरली, झोपडी शाकारली, मोटेची दुरुस्ती केली आणि तो पावसाची वाट पाहू लागला.

एक दिवस कावळ्यांच्या थव्याप्रमाणे ढग भरून आले. रामसामीच्या डोळ्यात पाणी आले, रात्रभर त्याला झोप आली नाही. जमिनीसाठी खत नाही आणि हातात पैसा नाही, खताशिवाय शेती कशी होणार? अर्ध्या रात्री धर्माधिकाऱ्यांची आठवण आली. आपल्या हातांनी साफ केलेले कचऱ्याचे ढीग रामसामीला आठवले—पन्नास साठ तरी गाड्या कचरा असेल तो. आपण पैसे मागताच, साहेब पैसे देऊन टाकतील अशी रामसामीची खात्री होती. पीक हाती येताच कर्ज फेडून टाकू. हा विचार मनात आल्यावर रामसामी निश्चिंतपणे झोपी गेला.

गंगम्मा देवपूजेत गुंतली आहे. कॉफी पिऊन धर्माधिकारी बाहेरच्या व्हरांड्यात आले आणि रामसामीला पाहून चमकून म्हणाले—"अरे! किती वेळ उभा आहेस? आत यायचं नाही का? इथं असा का उभा आहेस? बरं, काय म्हणतोस?"

"एका लहानशा कामासाठी आपल्याकडे यावं लागलं."

"माझ्याकडे? बरं हेमा काय म्हणतेय? महिनाभर माझं तिकडे येणंच झालं नाही. हिला दिवस असल्यानं बाहेर पडणं फार कठीण झालंय!"

"शेत नांगरून झालं आहे—ढग आले आहेत."

"होय—ठेक्याचे पैसे तू पूर्ण देऊन टाकले आहेस."

"होय—आता आपली मदत पाहिजे."

"रामसामी! मी अनेकदा म्हटलंय की असं बोलायचं नाही. आपण दोघ दोस्त आहोत. आपापल्या परीने दोघंही मोठे आहोत."

रामसामीच्या मनात खळबळणाऱ्या गोष्टी त्याच्या तोंडून बाहेर पडल्या. "त्याचं असं आहे साहेब, दहा गाड्या खताची व्यवस्था करावी लागेल. पीक हातात आलं की आपल्याला पैसे देऊन टाकीन. आता बाहेरून विकत आणण्यासाठी माझ्या हातात एक देखील पैसा नाही. आता खत टाकलं नाही तर आपल्याला माती खावी लागेल. या संकटात आपण काही मदत केली तर मी आणि हेमा आपले उपकार कधीही विसरणार नाही." मन मोकळे केल्याने रामसामीला हलके वाटले आणि त्याने एक दीर्घ सुस्कारा टाकला.

एवढ्यात तेथे येऊन उभ्या राहिलेल्या मंगम्मानेही हे बोलणे ऐकले.

मर्मस्थानी ठेच लागावी तसे धर्माधिकारी मिनिटभर तडफडले. त्यांच्या

तोंडून शब्द फुटेना. अतिशय दुःखाने रामसामीची पाठ थोपटीत धर्माधिकारी बोलले–"रामसामी ! एखादी वस्तू मागण्याची वेळ आली तशी आपण दोघं किती संकटात सापडलो. आपण कितीही मोठे असलो, कितीही चांगले असलो, तरी देण्याघेण्याच्या व्यवहारात सगळे लहान असतात. माझ्याजवळ ती वस्तू नाही किंवा मी ती तुला देऊ इच्छित नाही असं नाही. वडील माणसांनी काय म्हटलं आहे ते माहीत आहे ना ? त्यांचं म्हणणं आहे, कुणाला एखादी वस्तू देणं म्हणजे त्याचं शत्रुत्व विकत घेणं आहे. आपली मैत्री नष्ट व्हावी असं मला वाटत नाही. कर्ज देणंघेणं आपल्या मैत्रीला बाधक ठरेल. तेव्हा ते चांगलं नाही. एक गोष्ट सांगतो–तू देखील विचार कर–तो आहे नं–मंदिरामधला स्वामी वेणूगोपाल–तोच तुला काही तरी मार्ग दाखवू शकेल–तुला काय वाटतं ?"

"बरोबर आहे–आज्ञा असावी. मी निघतो," असे म्हणून रामसामी निघून गेला. वाटेत त्याला सर्वत्र अंधारच अंधार दिसत होता. "धर्माधिकाऱ्यांनी बरोबर सांगितलं–पण त्यांनी खत उसनं दिलं असतं तर ते मी जरूर फेडलं असतं. माझं नशीबच खोटं !" जड पावलांनी रामसामी पुढे चालला होता.

धर्माधिकारी तेथेच स्तब्ध होऊन उभा राहिला. मंगम्माच्या मनाच्या कोपऱ्यात कोठेतरी वाटत होते की, बिचाऱ्याला खत दिले असते तर बरे झाले असते.

"अग वेडे ! तू आता आई होणार आहेस. असे विचार करून तू उदास होऊ नकोस. खरं म्हणजे आपल्याजवळ बरंच काही आहे असं समजणंच चुकीचं आहे. नुसती चूकच नाही तर हा अहंकार आहे. भगवान कृष्णानं काय म्हटलं होतं ? 'देणारा कोण ? घेणारा कोण ? मरणारा कोण ? मारणारा कोण ? सर्व काही मी आहे.' आम्ही तर सच्चे मित्र आहोत. ही मैत्री अशीच टिकवायची की लहान गोठ्या वस्तू देऊन ती संपवायची ? अग्नीहोत्राप्रमाणे आपलं पवित्र जीवन तसंच व्यतीत होत राहील. कर्ज दिल्यानं किंवा घेतल्यान ते फेडण्यासाठी कुत्र्याचा किंवा कोल्ह्याचा जन्म घ्यावा लागतो. आता या जन्मानंतर मी परमात्म्यात विलीन व्हायला पाहिजे. पुनर्जन्माची गोष्ट देखील माझ्यापुढे काढू नकोस." ते धबधब्यासारखा अखंड बोलत राहिले.

"तुम्ही किनई, पराचा कावळा करता !" मंगम्मा म्हणाली.

"बरं बरं, आता चल, अशा परिस्थितीत तू बाहेर उभं राहणं बरं नव्हे," धर्माधिकाऱ्यांनी मोठ्या प्रेमाने म्हटले.

अमावास्येचा दिवस होता. मध्यरात्रीची वेळ होती. आकाशपाताळ एक करणारा मुसळधार पाऊस कोसळत होता. विजांचा लखलखाट आणि ढगांचा गडगडाट हृदयांत धडकी भरवीत होता. रामसामी झोपडीत खिन्नपणे बसला होता. भुकने आणि चिंतेने त्याला अशक्तपणा आला होता. खताची उणीव आणि उद्यांची चिंता यामध्ये त्याच्या मनाच्या चिंधड्या उडत होत्या. दुरून "रामसामी ! रामसामी !" अशी कोणीतरी हांक मारीत होते. तो आवाज ऐकून रामसामी चमकला...धर्माधिकाऱ्यांचा आवाज त्याने ओळखला. धडपडत त्याने दरवाजा उघडला. छत्री मिटून धर्माधिकारी आत आले.

'साहेब, इतक्या रात्री आपण इथं कसे !'

'आकाश माझ्यावर कोसळलं आहे, रामसामी ! या संकटात तूच मला मदत करशील याची मला खात्री होती. म्हणूनच मी धावत तुझ्याकडे आलो.'

'काय झालं साहेब ?'

धर्माधिकाऱ्यांचा आवाज कापरा येत होता. ते रडत रडत सांगू लागले, "तुझ्या आईसाहेबांची परिस्थिती फारच नाजूक झाली आहे. प्रसूतीवेदना तिला असह्य झाल्या आहेत. आत्ताच्या आत्ता तुला मानापुरमला जाऊन वैद्याला आणावं लागेल. नाहीतर ती वाचणार नाही. रामसामी ! तू अजून इथंच उभा ? माझ्या घरी वंशाचा दिवा लागू दे रे," असे म्हणत धर्माधिकारीने रामसामीचे दोन्ही हात धरले.

रामसामी मिनिटभर विचार करीत राहीला. मानापुरम इथून तीन मैल दूर आहे. वैद्याला आणले नाही तर आईसाहेब वाचणार नाहीत...आणि ......त्याला पुढे कल्पनाच करवेना. धर्माधिकाऱ्यांना देखील राहावत नव्हते.

"रामसामी ! विचार करण्याने आणि उशीर केल्याने ती वाचणार नाही. आणि तिच्यानंतर मी देखील जगू शकणार नाही."

"साहेब !"

"काय पाहिजे ?"

"तो टॉर्च मला द्या. मी आता निघतो."

क्षणभर धर्माधिकाऱ्यांच्या तोंडून शब्दच फुटेना. छत्री आणि टॉर्च

अधिकच घट्ट धरीत त्यांनी म्हटले. 'तू तर तरूण आहेस. चित्त्यासारखा अंधारात जाऊ शकशील. ही छत्री आणि टॉर्च तर माझे पाय आणि डोळे आहेत. त्यांच्याविना मी एक पाऊल देखील चालू शकणार नाही.'

रामसामीने डोक्यावरून घेण्यासाठी कुठे पोते दिसते का ते पाहिले. घरातले एकुलते एक पोते धर्माधिकाऱ्यांकडे राहिले होते. हेमा एक चादर पांघरून झोपली होती. ती चादर ओढून डोक्यावर घेत रामसामी अंधारात तीरासारखा घुसला. धर्माधिकारी मिनिटभर तेथे थांबले आणि मग दार बंद करून घरी गेले. छोटी हेमा थंडीमुळे हातापायांची अधिकच घट्ट जुडी करून झोपी गेली.

मानापुरमचा वैद्य रामसामीचा निरोप ऐकून उल्हसित झाला. इतकी चांगली संधी सोडता कामा नये. या प्रकरणात तो यशस्वी झाला तर आसपासच्या दहा गावांत आपले नाव पसरेल असा विचार त्याने केला. पाऊसही थांबला होता. सायकलवर टांग मारीत वैद्यराज बोलले ...... 'रामसामी, मी आत्ताच्या आत्ता साहेबांच्या घरी जातो. तू मागून सावकाश ये.' तो वाऱ्यासारखा निघून गेला.

रामसामी घराकडे निघाला. त्याचे मन शून्य झाले होते. मनात कसलाही विचार उरला नव्हता. शरीर क्षीण झाले होते. विलक्षण अशक्तपणा वाटत होता. त्याच्या मनात अशी एक वैराग्य भावना निर्माण होऊ लागली की त्याची त्यालाही ती कळेना.

पाऊस थांबला. पण विजा चमकत होत्या. सगळीकडे पाणीच पाणी पसरले होते. समुद्रातून चालल्यासारखे वाटत होते. रामसामी शेतामधून परत जाऊ लागला. तो आपल्या मळ्याजवळ आला. एवढ्यात वीज पडली. रामसामीला वाटले की, ती वीज आपल्या झोपडीवरच पडली असावी. तो धावत सुटला.

"हेमा, हेमा" असे ओरडत तो पळत होता. धर्माधिकाऱ्यांच्या स्वतःच्या शेतापलीकडेच देवस्थानाची शेती होती. धर्माधिकाऱ्यांच्या शेतातून तो चालला होता. वाटेत दगड धोंड्यांची, काट्याकुट्यांची पर्वा न करता तो धावत होता. त्याला रस्ता देखील आठवेना. त्याच शेतात एक विहीर आहे हे देखील त्याच्या लक्षात राहिले नाही. "हेमा, हेमा" असे ओरडत धावताना तो त्या विहिरीत जाऊन पडला. त्याची शेवटची हाक आणि श्वास त्याच विहिरीत

निघून गेले.

दुसऱ्या दिवशी प्रात:काळी धर्माधिकाऱ्यांस पुत्ररत्न झाले. त्याच दिवशी संध्याकाळी रामसामीच्या मृत्यूचा पंचनामा झाला. गाववाल्यांबरोबर धर्माधिकारी देखील रामसामीच्या प्रेतयात्रेत सामील झाले. स्वत: उपस्थित राहून त्यांनी उत्तरक्रिया करविली. हेमा दिवसभर रडत राहिली. रडून रडून ती धर्माधिकाऱ्यांच्या खांद्यावर झोपी गेली. धर्माधिकाऱ्यांना झालेल्या अपार दु:खाची लोकांमध्ये चर्चा झाली.

"साहेब, त्याचं आयुष्य संपलं आणि तो निघून गेला. त्याचा आपला फार स्नेह होता. आता ही पोर आपल्याकडे आली आहे. आपल्याशिवाय तिला कोणाचाही आधार नाही." स्मशानात कोणीतरी असे बोलले होते.

"रामसामी जिवाला जीव देणारा सच्चा मित्र होता. पण ती सगळी बंधने त्याच्याबरोबरच संपून गेली. ममतेचे बंधन वाढले तर नंतर त्यातून सुटका होणं कठीण. जीवन नश्वर आहे. तशात हे बंधन आणि संबंध मी स्वीकारू शकत नाही." धर्माधिकाऱ्यांनी प्रवचन केले.

शेवटी एका सद्गृहस्थाच्या मदतीने हेमा अनाथालयात जाऊन पोहोचली. गावातले लोक रामसामी आणि धर्माधिकारी यांच्या दृढ स्नेहाची अजूनही आठवण काढतात. रामसामीच्या शोचनीय मृत्यूची मात्र कोणालाही आठवण राहिलेली नाही.

परिचय

1. कै. त्रिपुरनेनी गोपीचंद

आंध्र प्रांतात ध्येयवादाचा प्रचार करण्यासाठी प्रसिद्ध असलेले रामस्वामी चौधरी यांचे गोपीचंद हे चिरंजीव. शेतकरी घराण्यात त्यांचा जन्म झाला. "असमर्थुनी जीवयात्र" ही त्यांची प्रसिद्ध कादंबरी म्हणजे एका ध्येयवादी व्यक्तीचे जीवन चरित्र आहे. "पंडीत परमेश्वर शास्त्री वीलुनामा" या त्यांच्या कादंबरीस त्यांच्या मृत्यूनंतर साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. काही काळ त्यांनी चित्रपट व्यवसायही केला. गोपीचंद यांच्या जीवनात साहित्य साधना आणि सत्याचा शोध या दोन्ही गोष्टींचा संगम झालेला आढळतो.

या संग्रहात घेतलेली त्याची "ममता" ही गोष्ट शेतकऱ्याच्या मनात त्याच्या जमिनीबद्दल असणाऱ्या मायेचे अतिशय सूक्ष्म चित्रीकरण करते.

2. बालगुम्मि पद्मराजू

"विज्ञानाचा अभ्यास केल्यामुळे कोणता ना कोणता "इझम" आपल्याला आकर्षित करीत असतो. आमच्या पिढीतील लेखक कोणत्या ना कोणत्या "इझम" च्या बंधनात सापडले आहेत. इतिहासाचे सौंदर्य किंवा जुन्याचे वैभव गेल्या पिढीतील लोकांना जितके उत्तेजक वाटत असे तितके आम्हाला वाटू शकत नाही. राष्ट्रीयतेला आमचा विरोध नाही, परंतु तिची विशेष आराधना करण्याच्या स्थितीत देखील आम्ही नाही. परंपरागत चित्रण असलेल्या एकाच प्रकाराच्या पात्राना आमचे मन विटून गेले आहे. आम्ही मानवता आणि मनुष्याचे व्यक्तिमत्व यांना महत्त्व देतो. जात, धर्म इत्यादी गोष्टींना आम्ही विशेष महत्त्व देत नाही. त्यामुळे आमच्या विचारांशी परिचित होऊन त्यांच्याशी समरस होणे आमच्या वाचकांना कठीण वाटण्याची शक्यता आहे." हे शब्द आहेत पद्मराजूंचे.

"गालिवान" (वादळ) या त्यांच्या कथेस न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यून या दैनिकाने आयोजित केलेल्या जागतिक कथा स्पर्धेत दुसरे पारितोषिक मिळाले

होते. तेलुगू कथेस आंतरराष्ट्रीय यश मिळवून देण्याचे श्रेय त्यांनाच आहे. नाटककार आणि चित्रपट लेखक म्हणूनही हे बरेच प्रसिद्ध आहेत. आंध्रच्या जीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब त्यांच्या कथांमध्ये पडले आहे. मानवी मनाचे विश्लेषण करण्याचे आणि कथा सांगण्याचे त्यांचे कौशल्य वाचकांना चकित करणारे आहे.

या संग्रहातील "नौकायात्रा" या गोष्टीत आपल्या पतीकडून छळ होणाऱ्या तरीही त्याच्यावर प्रेम करणाऱ्या स्त्रीच्या चित्तवृत्तींचे चित्रण आहे. ही कथा वाचताना, आपण देखील नावेत बसून पाण्यातून जात आहोत असा भास होतो.

3. चलम्

श्री गुडिपाटि वेंकट चलम् यांचे स्थान तेलुगू साहित्यात फार वरचे आहे. निरर्थक आचार विचारांनी चढलेल्या समाजावर चलम्च्या कथांनी चाबकाप्रमाणे प्रहार केले आहेत. चलम् यांच्या कथा वाचल्याने स्त्रियांचे विचार दूषित होतात असे एके काळी लोक समजत आणि त्यामुळे चलम् यांच्या कथा जाळल्या जात. परंपरा, नीति, नियम—या सगळ्यांविरुद्ध चलम् यांनी आवाज उठविला. स्त्री हे त्यांचे पूजास्थान आहे. सेक्सच्या बाबतीत स्त्रीने स्वच्छंद असावे असे चलम् यांचे मत आहे. आजच्या समाजातील स्त्रीच्या परिस्थितीचे सहानुभूतीने चित्रण करून चलम् एका महान विचार क्रांतीचे प्रवर्तक ठरले. कथाव्यतिरिक्त "म्यूजिंग", "स्त्री", बिड्डल शिक्षण (मुलांचे संगोपन)", आदी प्रबंधही त्यांनी लिहिले आहेत. "मैदान, ब्राह्मणीकम्", "अमीना", "अरुण", "हंपी कन्या" इत्यादी त्यांच्या प्रसिद्ध कादंबऱ्या असून "पुरूख्" "शशांक" इत्यादी त्यांची नाटके प्रसिद्ध आहेत.

टीकाकारांच्या मते चलम् तत्वज्ञानी नाहीत परंतु त्यांचे एक विशिष्ट कल्पनारम्य तत्त्वज्ञान आहे. सध्या हे तिरुवण्णमले येथील रमणाश्रमात राहात आहेत. चलम् यांनी आयुष्यभर घेतलेल्या शोधाची ही अंतिम अवस्था आहे. शिक्षण खात्यात इन्स्पेक्टर आणि प्रशिक्षण विद्यालयात अध्यापकाचे काम करून ते सेवानिवृत्त झाले आहेत.

त्या संग्रहातील "दोषगुण" या गोष्टीत सेक्समध्ये सर्वनाश झालेल्या स्त्रीचे दयनीय परिणामकारक आणि जिवंत चित्रण आहे.

4. कै. बुच्चि बाबू

पाश्चात्य साहित्याच्या वाचनाने प्रेरणा घेऊन आधुनिक तेलुगू साहित्याला नवी दिशा देणाऱ्या आणि ते समृद्ध करणाऱ्या यशस्वी लेखकांमध्ये बुच्चि बाबू यांचे खास स्थान आहे. मानवी मनाच्या तळापर्यंत जाऊन त्यांचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची प्रतिभा त्यांच्या ठायी आहे. एखादा चित्रकार ज्याप्रमाणे योग्य रंगांनी आणि चांगल्या कुंचल्याने हव्या त्या वस्तूचे चित्र रंगवतो त्याचप्रमाणे बुच्चि बाबू सामर्थ्यवान शब्दांचा उपयोग करून घटनांचे चित्रण करण्यात कुशल आहेत. त्यांच्या कथा आणि तेलुगू कादंबरीतील एक रत्नच असो "चिवरकु मिगिलेदी" (जो शेवटी वाचतो) या हेच सिद्ध करतात. बुच्चि बाबूंचे खरे नाव आहे शिवराजु व्यंकट सुब्बाराव. त्यांनी काही दिवस इंग्रजीचे लेक्चरर म्हणून आणि पुढे शेवटपर्यंत आकाशवाणीवर नोकरी केली. त्यांनी अनेक नाटकेही लिहिली होती. "शेक्सपिअर साहिती परामर्श" नावाच्या त्यांच्या समीक्षात्मक ग्रंथास आंध्र प्रदेश साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले.

स्त्री आणि पुरुष-चुंबक आणि लोखंड या दोहोंत जे आकर्षण असते ते या संग्रहातील "पश्चाताप नाही" या कथेचा आधार आहे. या कथेतील मनोविश्लेषण बुच्चि बाबूंच्या लेखन पद्धतीचा एक सुंदर नमुना आहे.

5. कोडवटिगंटि कुटुंब राव

कथा लिहिणे ही ब्रह्मविद्या नसून फार सोपी गोष्ट आहे हे श्री. कोडवटिगंटि कुटुंब राव यांनी सिद्ध केले आहे. त्यांच्या सर्व कथांमध्ये मध्यम वर्गाच्या जीवनाचे प्रतिबिंब पडले आहे. तेलुगू प्रांतातील मध्यम वर्गीय कुटुंबामध्ये उभ्या राहाणाऱ्या समस्या त्यांच्या कथांचे विषय बनतात. युवक-युवतीच्या प्रेमकथांपासून वर्ग–संघर्षापर्यंत सर्व प्रकारच्या समस्या त्यांनी हाताळल्या आहेत. त्यांची असाधारण वर्णनशैली हे त्यांच्या कथांचे सर्वांत मोठे वैशिष्टय आहे. कोणत्याही प्रकारची कथा ते विलक्षण सहजपणे लिहून जातात. राजकारणात ते मार्क्सवादी विचार प्रणालीचे समर्थक आहेत. अनेक भारतीय भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या "चंदामामा" या मासिकाच्या

संपादक मंडळात काम करीत असताना त्यांनी बरेच बाल साहित्यही लिहिले. तेलुगूमध्ये "सुलभ विज्ञानम्" या नावाने त्यांनी अनेक विज्ञान ग्रंथ सर्वसामान्य वाचकांसाठी सुबोध शैलीत लिहिले. आधुनिक तेलुगू साहित्यातील काही थोड्या समर्थ टीकाकारांमध्ये ते प्रमुख आहेत. "तारा" या त्यांच्या प्रसिद्ध लघु कादंबरीस आंध्र प्रदेश साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले आहे. समाजात उच्च जातीतील स्त्रीने खालच्या जातीतील पुरुषाशी लग्न केले तर त्या पुरुषाचे नुकसान होईल हे या संग्रहातील "पार्वतीपरिणय" या कथेत त्यांनी सांगितले आहे.

६. राचकोंड विश्वनाथ शास्त्री

शास्त्रीजींचा व्यवसाय वकीली हा आहे. कथांमध्ये देखील ते वकीली करतात. आजच्या समाजात उच्च वर्गाकडून अत्याचार आणि अन्याय होऊन शोषित होणाऱ्या हीनदीन जनतेची वकीली ते आपल्या कथांतून करतात आणि आर्थिक व सामाजिक न्यायाचे मंडन करतात. समाजातील अत्यंत खालच्या थरातील भीतीच्या सावल्यांमध्ये जगणाऱ्या या जीवांच्या समस्या आणि त्यांची दुःखे त्यांच्या हृदयस्पर्शी भाषेत प्रकट होऊन वाचकांच्या मनात सहानुभूति निर्माण करतात. शास्त्रीजींची शैली मार्मिक आणि धारदार आहे. नक्कल करता येईल परंतु अनुकरण कोणाला जमणे शक्य नाही. शास्त्रीजी म्हणतात, "प्रत्येक लेखकाने आपल्या लेखनाने कोणत्या चांगल्या गोष्टींची हानी होते आहे कोणत्या वाईट गोष्टींना उत्तेजन मिळते आहे याचा विचार केला पाहिजे. कोणत्याही चांगल्या गोष्टीस धक्का लागू नये आणि वाईटास उत्तेजन मिळू नये असे माझे मत आहे."

तेलुगू कादंबरी विश्वातील यशस्वी प्रयोगात्मक कृतींमध्ये त्यांची "अल्पजीवी" ही कादंबरी उल्लेखनीय आहे. जेम्स जॉईसच्या "चैतन्यधारा" च्या शैलीमध्ये लिहिली गेलेली "अल्पजीवी" ही तेलुगूतील पहिली कादंबरी आहे. जेम्स जॉईसची शली तेलुगू कथामध्ये प्रथम आणण्याचे श्रेयही त्यांचेच आहे. दारू-बंदीमुळे आंध्रमध्ये जे विपरीत परिणाम झाले त्यांचे अद्‌भुत चित्रण त्यांनी "आरू सारा कथलू" या कथेमध्ये केले आहे. या कथेने तेलुगू कथा साहित्यात

एक अद्भुत क्रांती केली आणि लोकांना या सगळ्यांवर पुन्हा विचार करायला लावले. अधिकाराच्या धुंदीबरोबरच श्रीमंतीने माणूस आंधळा झाला म्हणजे तो अधिकाराच्या कशात किती अमानुष कृत्ये करू शकतो हे त्यांच्या "निजम्" (सत्य) या नाटकात त्यांनी रंगविले आहे. त्यांच्या कथा संग्रहास आंध्र प्रदेश साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले आहे.

या संग्रहातील "आंब्याचे झाड" ही गोष्ट मानवी स्वभावाच्या विविध पैलूंचे आकर्षक चित्रण करते.

7. कै. देवर कोंड बाल गंगाधर टिळक

श्री. टिळक मुख्यतः कवी होते. आंध्र मधील "भाव कविता" आणि "अभ्युदय (प्रगती) कविता" यामध्ये त्यांच्या काव्याने सेतूसारखी कामगिरी बजावली. त्यानंतर अस्तित्वात आलेल्या "वचन (गद्य) कविते"चा उपयोगही त्यांनी आपल्या अनेक रचनांमध्ये केला. "अमृतम् कुरिसिन रात्री" (अमृत बरसणारी रात्र) या त्यांच्या काव्य संग्रहास साहित्य अकादमीचे मरणोत्तर पारितोषिक मिळाले. वरच्या दर्जाच्या पाश्चात्य लेखकांनी गाठलेली पातळी त्यांच्याही कथांमध्ये आढळून येते. असाधारण दृष्टीकोनातून जीवनाचे विश्लेषण करून असंभाव्य परिस्थिती – मग ती परंपरागत असो वा नसो—सहृदयतेने रंगवून वाचकांच्या हृदयास स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे.

या संग्रहातील "आशा किरण" या गोष्टीस कवीच्या लेखणीतून उतरलेली कथा म्हणावे काय ? की हृदय पिळवटून टाकणारे काव्य म्हणावे ? भुकेचे अमूर्त भावचित्र म्हणावे की काय म्हणावे ?

8. चागंटि सोमयाजुलू

तेलुगू लेखकांमध्ये "चा. सो." या नावाने प्रसिद्ध असलेले श्री चागंटि सोमयाजलू हे चेकॉव्ह प्रमाणे कथाकार आहेत. त्यांनी फारशा कथा लिहिल्या नाहीत. तरीदेखील ज्या कथा त्यांनी लिहिल्या आहेत त्या उच्च दर्जाच्या मानाव्या लागतील. निवडलेल्या विषयानुसार ते आपल्या

प्रत्येक कथेत वेगवेगळ्या शैलीचा उपयोग करतात. त्यांची कोणतीही एक कथा दुसऱ्या कथेप्रमाणे ते लिहित नाहीत. काही सामाजिक उद्देशाखेरीज लिहिणे व्यर्थ आहे असे त्यांचे मत आहे. सामाजिक न्यायासाठी प्रयत्न करणे त्यांना आवडते. एखाद्या आदर्शाच्या किंवा सिद्धांताच्या शुष्क प्रचारासाठी कथेचे शिल्प सौंदर्य नष्ट करणे त्यांना मान्य नाही. कथा ही स्वाभाविक सहज सुंदर आणि गुणवान असावी असे त्यांना वाटते. चाबकाप्रमाणे प्रवाह करणाऱ्या चा. सो. यांच्या कथा कोणत्याही कसोटीवर पाहिल्या तरी जगातील कोणत्याही भाषेच्या बरोबर ठरतील. त्यांच्या कथांना लाभलेला वैश्विक स्पर्श हेच ह्याचे कारण आहे.

या संग्रहातील "व्हायोलिन" या कथेत मध्यमवर्गीय तेलुगु कुटुंबातील संगीत प्रेमाचे चित्रण केले आहे. हे संगीत प्रेम प्रतीकाच्या रूपात एका गृहिणीच्या हृदयात आईच्या रूपामध्ये प्रतिष्ठित होते. मायलेकीप्रमाणे व्हायोलीनचे संबंध निर्माण होतात हेच या कथेचे वैशिष्ट्य.

९. पेद्दिभोट्ल सुब्बरामय्या

कथाकारांच्या तरुण पिढीमध्ये सुब्बरामय्या यांची लेखनशैली बरीच वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. सामान्य जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करून ते आपली कथावस्तु निवडतात आणि मनुष्याच्या आचारविचारांचे मोठे अद्भुत चित्रण करतात. त्यांची कथा दिसते साधी, परंतु वाचकांवर ती एक कायमची छाप टाकून जाते. सुब्बरामय्या खऱ्या अर्थाने कथाशिल्पी आहेत.

या संग्रहातील "पूर्णाहुति" ही कथा पौरोहित्यावर उपजीविका करणाऱ्या ब्राह्मणाची गोष्ट सांगते. अंत्यसंस्कार करणारे, और्ध्वदेहिक करणारे आणि क्षुद्रदान ग्रहण करणारे जे लोक असतात त्यांचे आपसात पटत नसते. अशा प्रकारचे निकृष्ट जीवन एका महान उद्देशासाठी रामेशम्ने स्वीकारणे हे या गोष्टीचे वैशिष्टय होय. आयुष्य कितीही निकृष्ट असले तरी एक आशा ध्रुवतारा बनून रामेशम्ला घेऊन जात असते. अशा व्यक्तीची आयुष्ये भारतात जवळजवळ एकसारखी असतात.

स्थानिक साप्ताहिकांनी योजलेल्या स्पर्धामध्ये लेखकास अनेकवेळा पारितोषिके मिळाली आहेत. "ध्रुवतारा", "चेदु मात्र" (कडु गोळी), "अंगार

तलनम्," "मुक्ति पंजरम्" या त्यांच्या प्रसिद्ध कादंबऱ्या आहेत. "नयनतार", "नील्लु (पाणी) मुसुरू (पाऊस)" हे त्यांचे कथासंग्रह आहेत. या कथासंग्रहांची टीकाकारांनी फार प्रशंसा केली आहे. श्री. सुब्बारावच्या विजयवाड्याच्या लायोला कॉलेजात तेलुगू विभागात अध्यापन करतात.

10. अवसराल रामकृष्णा राव

जीवनाचा केंद्रबिंदु स्त्री आहे, साहित्याचा देखील तीच आहे. हे सत्य ओळखून लेखन करणाऱ्या तेलुगू कथाकारांमध्ये श्री. राव यांचे विशेष स्थान आहे. जीवनाबद्दल गृहिणींचा जो मर्यादित दृष्टिकोन असतो त्याला ते आपल्या कथांमध्ये विशेष महत्त्व देतात. लेखकाच्या या दृष्टिकोनामुळे त्यांच्या कथेत स्त्रिया प्रमुख भूमिकांत समोर येतात. चातुर्यपूर्ण संवादशैली हे त्यांच्या कथांचे वैशिष्टय आहे. "अर्थमुग्ध कथलु" या त्यांच्या कथा संग्रहास आंध्रप्रदेश साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले आहेत. "संपेंगलूराश जाजुलू" (चाफा आणि सोनजुई) ही त्यांची कादंबरी विशेष लोकप्रिय झाली आहे. "अइदुरकाल आत्महत्यलु" (पांच प्रकारच्या आत्महत्या) हा त्यांचा ताजा कथा संग्रह अतिशय लोकप्रिय झाला आहे. इंग्रजीचे अध्यापन हा त्यांचा व्यवसाय असून ते बरहमपुर येथे राहातात.

या संग्रहातील त्यांच्या कथेमध्ये, माणसामध्ये सामान्यतः सुप्त रूपात असलेल्या सौजन्याचे दर्शन रामकृष्णा रावांच्या खास शैलीने घडते.

11. कोम्मूरि वेणू गोपाळ राव

क्षणभरही स्वस्थ न बसू देणारा डॉक्टरकीचा व्यवसाय करीत असतानाही सतत कथा, कादंबऱ्या लिहिणे ही सामान्य गोष्ट नाही. स्त्रियांच्या साहित्यास आज तेलुगू वाचक विशेष प्रोत्साहन देत आहेत. या साहित्याबद्दल त्यांच्यात आदरही आहे. अशा परिस्थितीत स्त्रियांच्या साहित्यकृतींच्या बरोबरीने लोकप्रिय होणाऱ्या कथांचे श्रेय डॉक्टर वेणू गोपाल राव यांना आहे. त्यांच्या कादंबऱ्यातील आदर्श नायिका हे याचे कारण असावे. "पेंकुटिल्लु" (घरकौलारू)

या त्यांच्या पहिल्या कादंबरीला तेलुगू भाषा समितीचे पारितोषिक मिळाले आहे. त्यानंतर "हाऊस सर्जन" ही त्यांची कादंबरी विशेष लोकप्रिय झाली. ती डॉक्टरी जीवनावर आधारलेली आहे. तेलुगू वाचकांमध्ये ते कादंबरीकारापेक्षाही कथाकार म्हणून अधिक प्रसिद्ध आहेत.

त्यांनी शेकडो कथा लिहिल्या आहेत. त्यांच्या शैलीमध्ये कठोरतेपेक्षा कोमलता अधिक आढळते. सिद्धांत अथवा वाद यांचे ते नांवही घेत नाहीत. त्यांच्या कथेंचे विषय सहसा मध्यम वर्ग अथवा त्यावरील पातळीच्या जीवनाबद्दलचे असतात.

यंत्रवत् वागणारा माणूस पुन्हा मनुष्याच्या रूपात पुनर्जन्म घेतो आणि त्याच्यामध्ये ममता आणि माधुर्य यांचे नवे अंकुर पल्लवित होतात, या विषयावर आधारलेली या संग्रहातील कथा सर्जरीच्या सुरीप्रमाणे सरळ आपल्या विषया-पर्यन्त कशी भिडते हे वाचक स्वतःच समजू शकतील.

12. पुराणम सूर्यप्रकाश राव

मध्यम वर्गातील सामान्य कुटुंबाचे जीवन चित्रित करणाऱ्या 'जीवनगंगा'. या कादंबरीने या लेखकाने तेलुगू वाचकांमध्ये विशेष लोकप्रियता मिळविली. आंध्र मधील कौटुंबिक जीवनातील स्त्रियांची मनोवस्था आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या नाजूक समस्यांचे सावधपणे केलेले कुशल चित्रण हा लेखकाचा बालेकिल्ला आहे. त्यानी अनेक कथा लिहिल्या असून काही कादंबऱ्याही लिहिल्या आहेत. 'मारे मनुष्युलु' (परिवर्तनशील मनुष्य) आणि "आड ब्रतुकु" (स्त्रीजीवन) ह्या त्यांच्या अलिकडच्या कादंबऱ्या आहेत. "काकुलू" (कावळे) आणि "गरिक पोचलु" (तृणपाती) हे त्यांचे कथा संग्रह आहेत.

या संग्रहातील "कावळे" या कथेत रूढींना चुकीचा अर्थ लावून एक गरीब कुटुंबास आवश्यक असणाऱ्या मदतीपासून वंचित करण्याचा प्रकार चित्रित करण्यात आला आहे. श्राद्धाच्या वेळी कावळ्यांना पिंड देण्याच्या प्रथेवर लिहिलेली ही कथा शंभर टक्के तेलुगू कथा लेखकाकडूनच लिहिली जाईल अशी तेलुगू कथा आहे.

लेखक विजयवाड्याच्या आंध्र प्रदेश हॅंडलूम को-ऑपरेटिव्ह सोसायटीत काम करतात.

13. मुल्लपूडि वेंकट रमण

तेलुगू कथेच्या आकाशात मुल्लपूडी वेंकट रमण विजेप्रमाणे चमकत आहेत. सांसारिक प्रेमास इतिवृत्ताच्या रूपात स्वीकारून आंध्रमधील आधुनिक युवक-युवतींना मोहून टाकणाऱ्या शैलीमध्ये प्रेम विषयावर मधुर कथा लिहिण्याचे श्रेय एकट्या वेंकट रमण यांचे आहे. त्यांची लेखणी कोठेही अडत नाही. कथा वाचनीय बनवणारी त्यांची शैली वाचकांना मंत्रमुग्ध करून टाकते. ते बराच काळ पत्रकार होते. पत्रव्यवसायासाठी म्हणून त्यांनी जे लिहिले त्यामुळे ते विनोदी लेखक आहेत असा वाचकांचा गैरसमज झाला. चार्ली चॅपलीनच्या विनोदाप्रमाणेच त्यांच्या कथा बाह्यतः विनोदी असल्या तरी त्यांना कारुण्याचे अस्तर असते. "जनता एक्सप्रेस", "महाराज ..... युवराज", "साक्षी" यासारख्या कथा हे सिद्ध करतात.

"राजकीय वेताळ पंचवीशी" ही गेल्या दहा वर्षात प्रसिद्ध झालेली त्यांची महत्त्वाची व्यंग्यरचना आहे. निवडणुकीपूर्वी तेलुगू प्रांतात दिसणाऱ्या राजनैतिक वातावरणाचे आकर्षक व्यंग्यपूर्ण शैलीत वर्णन करणारा हा संग्रह रमण यांच्या लेखन कौशल्याचे उत्कृष्ट द्योतक आहे.

"वेट" (शिकार), "इद्दु रम्भायिलु-मुग्गुरबयिलु," "दोलडकियाँ (तीन मुलगे)" मुल्लपुडीच्या कथा, जनता एक्सप्रेस-ही त्यांची पुस्तके तेलुगू वाचकांमध्ये लोकप्रिय आहेत. चित्रपट लेखक म्हणूनही ते अतिशय प्रसिद्ध आहेत.

महान सत्याचे कृष्णाच्या बासरीप्रमाणे रूचिर, सुमधुर आणि प्रशंसनीय शैलीमध्ये दर्शन घडविणारी या संग्रहातील त्यांची कथा त्यांच्या असामान्य साहित्य कृतींपकी एक आहे.

14. मधुरांतकम् राजाराम

श्री. मधुरांतकम राजाराम यांच्या कथा घाटदार आणि मनोहर असतात. चित्तूर जिल्ह्यातील निसर्ग सौंदर्याचे वर्णन त्यांच्या कथांमध्ये आढळते. तेथील हिरवीगार शेते, मळे, रस्ते, विहिरी, स्त्री–पुरुष आणि त्यांचे जीवन यांचे अत्यंत रमणीय चित्रण त्यांच्या कथांमध्ये चित्रित झाले आहे. साहित्याने वाचकांचे

कल्याण झाले पाहिजे अशी राजाराम यांची श्रद्धा आहे. क्रियाशील राजकारण किंवा राजनैतिक सिद्धांत यांना ते महत्त्व देत नाहीत. पाल्हाळिक वर्णनाबद्दल त्यांना विशेष प्रेम नाही. प्रत्येक वस्तू त्यांना विलक्षण आणि नाविन्यपूर्ण वाटते. आंध्र प्रदेश साहित्य अकादमीने त्यांच्या कथांना पारितोषिक दिले आहे.

अध्यापन हा त्यांचा व्यवसाय आहे. ते अत्यंत संवेदनशील आहेत. त्यांच्या कथांचे अनेक संग्रह प्रकाशित झाले असून "कम्मतेम्मेर" वक्रगतुलु-इतर कथलू" हे त्यापैकी काही उल्लेखनीय संग्रह आहेत. "त्रिशंकूसर्ग" ही त्यांची कादंबरी प्रसिद्ध आहे.

या संग्रहातील "प्रसन्न हवा" या कथेमध्ये नववधूला वराच्या केविलवाण्या स्थितीची दया येते आणि त्याला शाल पांघरून ती निघून जाते. वाचकांच्या अंत:करणात गुदगुल्या करणारी आणि मधुर स्मृतींना जाग आणणारी ही घटना आहे. श्री. राजाराम यांच्या कथा पूर्णतया तेलुगू कथा आहेत.

15. श्रीमती अब्बूरि छाया देवी

श्रीमती अब्बूरि छाया देवी अधून मधून कथा लेखन करतात. नव्या दिल्लीत त्या ग्रंथपाल आहेत. प्रख्यात कवि आणि लेखक श्री. अब्बूरि वरद राजेश्वरराव यांच्या त्या पत्नी आहेत. त्यांनी काही नियतकालिके आणि एक दोन काव्य संग्रहांचे संपादनही केले आहे.

या संग्रहातील "सुखांत" या कथेमध्ये झोपेसाठी तळमळणाऱ्या एका गृहिणीचे आत्मकथन आहे. बालपणापासून आतापर्यंतच्या तिच्या जीवन चर्येचे अत्यंत आकर्षक चित्रण या कथेत करण्यात आले आहे. एक उत्कृष्ट कथा म्हणून तिचा उल्लेख केला पाहिजे. कथा वाचून झाल्यावर कोणीही म्हणेल की, अशी कथा एक स्त्रीच लिहू शकते.

16. स्माइल

श्री. स्माइल यांचे संपूर्ण नाव इस्माइल असे आहे. त्यांनी फार थोड्या कथा लिहिल्या आहेत. रामचंद्रपुरम येथे ते कमर्शियल टॅक्स ऑफिसर म्हणून काम करतात. त्यांच्या कथांमध्ये कसल्याही प्रकारचा संकोच आढळत नाही.

''इन्टेलिजन्स'' ची ते पर्वा करीत नाहीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच ही निर्भयता आहे. त्यांच्या कथांमध्ये तंत्र नेहमीच्या प्रमाणात आढळत असले तरी या कथा टेक्निकशी बांधील नाहीत. समाजाच्या खालच्या थरात जगणाऱ्या हीनदीन जातींच्या जीवनाशी संबंधित कथावस्तू ते आपल्या कथांसाठी निवडतात.

या संग्रहातील ''रिकाम्या बाटल्या'' ही त्यांची एक यशस्वी कथा आहे. स्मशानाजवळ रिकाम्या बाटल्या विकून जगणाऱ्या दोन स्त्रियांमध्ये बाटल्यांच्या विक्रीवरून झालेले भांडण हे या कथेचे सूत्र आहे. हृदय हेलावून टाकणारी ही कथा आहे. तेलुगू वाचकांमध्ये या कथेने प्रचंड खळबळ उडविली आहे. त्यांच्या ''समुद्र'' या कथेवरही मोठे वादळ उठले होते.

17. वीराजी

श्री. वीराजी यांना सगळे लोक ''तोलि मलुपु'' (पहिले वळण) वाले वीराजी म्हणतात. पत्रकार म्हणून काम करीत असतानाच उत्साहाने कथा कादंबऱ्या लिहून यशस्वी होणाऱ्या युवकांमध्ये त्यांची गणना होते. मध्यम वर्गीय युवक-युवतींचे जीवन हा त्यांच्या कथांचा विषय असतो. मध्यम वर्गाच्या अधांतरी परिस्थितीचा उपहास करण्यात वीराजी पटाईत आहेत. ''तोलि मलुपु'' ''प्रेम पगालु'' (प्रेमाचे लगाम), ''सुखम् कोसम्'' (सुखासाठी), ''इद्दरं ओकटे'' (दोघे एक आहेत.), ''मुलगचेट्टु'' (शेवग्याचे झाड) या त्यांच्या लोकप्रिय कादंबऱ्या आहेत. मद्रासहून निघणाऱ्या एका साप्ताहिकामध्ये काम केल्यानंतर त्याच संस्थेतर्फे विजयवाड्याहून निघणाऱ्या दैनिकात ते काम करीत आहेत. या संग्रहातील ''एक लाख'' या कथेमध्ये लॉटरीच्या मागे लागणाऱ्या मध्यम वर्गीय नागरिकांच्या मनःस्थितीचे सुरेख चित्रण आहे.

18. बलिवाड कांता राव

श्री. कांता राव आदर्शवादी आहेत. मानवाचा विकास त्याच्या चांगल्या आचरणावर अवलंबून आहे अशी त्यांची श्रद्धा आहे. विशाखापट्टमच्या उत्तर भागातील जनजीवनाचे अवलोकन करून आपल्या कथांमध्ये त्याचे चित्रण करणाऱ्या लेखकात कांताराव आघाडीवर आहेत. पंचवीस वर्षांपासून ते कथा

कादंबऱ्या लिहीत आले आहेत. त्यांनी प्रत्येक गोष्ट आपापल्या शैलीने वेगवेगळी मांडली. या रचना वैशिष्ट्यामुळे तेलुगू कथा साहित्यात त्यांना विशिष्ट स्थान प्राप्त झाले आहे. मानवी मूल्यांचा उद्बोध हा त्यांच्या कथांचा हेतू आहे. कामगारांची असफलता चित्रित करणारी त्यांची "दोंगलू" (चोर) ही या विषयावरील तेलुगूतील पहिली कथा आहे. मध्यमवर्गीयांच्या कौटुंबिक जीवनातील प्रेम या विषयावरील कथा लिहून त्यांनी कथा लेखनास प्रारंभ केला. आता विविध प्रकारचे लेखन ते करीत असून त्यांची अनुवादात्मक फळे मिळत आहेत. "दगा पडिन तम्मुडु" (फसवणूक झालेला बंधू) या त्यांच्या प्रसिद्ध कादंबरीत ग्रामवासियांचा अज्ञान आणि शहरी जीवनाबद्दलचा मोह यांचे चित्रण करून खेड्यातील लोक शहरामध्ये सुखी होऊ शकत नाहीत हे त्यांनी दाखवले आहे. "पुण्य भूमि" ही त्यांची आणखी एक प्रसिद्ध कादंबरी. त्यांच्या अलिकडच्या साहित्य कृतींमध्ये आदर्शवाद आणि तत्त्वचिंतन अधिक आढळते.

सध्या ते दिल्लीमध्ये गव्हर्नमेंट आर्मेंट सप्लाय विभागात स्टाफ ऑफिसर आहेत. या संग्रहातील "मुंगुसाची गोष्ट" ही केवळ मुंगुसाची गोष्ट नाही तर दया आणि क्रौर्य यातील अंतराचा वेध घेणारी ही कथा आहे.

19. श्रीमती बीना देवी

"राधम्मा पेंडिल आगिपोयिंदी" (राधम्माचे लग्न राहिले) ही कथा लिहून कथा लेखनाच्या क्षेत्रात बीनादेवींनी प्रवेश केला आणि आज वाचकांना प्रसन्न करणाऱ्या अनेक कथा त्या लिहीत आहेत. प्रसिद्ध लेखक राचकोंड विश्वनाथ शास्त्री त्यांचे गुरू आहेत. त्यांच्या सगळ्या कथा शास्त्रीजींच्या शैलीशी फार जवळचे नाते सांगतात आणि बऱ्याच कथांमध्ये शास्त्रीजींच्या कथांचा प्रतिध्वनि ऐकू येतो असे टीकाकारांचे म्हणणे आहे. तेलुगूमध्ये कादंबरी-पेक्षा कथा अधिक वरच्या दर्जाची आहे हे त्यांच्या कथांवरून दिसून येते. विषयाची निवड आणि कथा सांगण्याची त्यांची पद्धत ही एकदम वेगळी आणि आकर्षक आहे. "राधम्मा पेंडिल आगि पोयिंदी" आणि "फर्स्ट केस" हे त्यांचे दोन कथा संग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

"हॅंग मी विवक्" ही त्यांची पहिली कादंबरी एका प्रमुख तेलुगू साप्ता-

हिकात क्रमशः प्रसिद्ध झाली आणि रसिक वाचकांमध्ये तिने लोकप्रियता मिळविली. या संग्रहातील "थँक्स फॉर द पी. एम्." ही कथा डॉक्टरांच्या अमानुष्य कृत्यांचे चित्रण करते.

20. श्रीमती आचंट शारदा देवी

तिरुपतीच्या श्री. व्यंकटेश्वर विश्वविद्यालयात या अध्यापनाचे कार्य करीत आहेत. चांगल्या गोष्टी लिहिणाऱ्या मोजक्या लेखिकांमध्ये त्यांची गणना होते. त्या फार लिहीत नाहीत. ममता आणि वात्सल्य यावर आधारलेली कथावस्तू त्या कथेसाठी निवडतात. त्यांच्या कथांमधील निसर्ग वर्णन काव्यमय असते. प्राचीन साहित्याचे उत्तम अध्ययन केल्यामुळे त्यांच्या रचनांवर त्याची छाप आढळते. हलकीशी वेदना, काही तरी हरविल्याची भावना आणि झुरणारे एकटेपण या मनोवस्था त्यांच्या कथांमध्ये चित्रीत झालेल्या आहेत. मानवी मनाच्या तळाशी उसळणाऱ्या विषादाचे त्यांनी केलेले चित्रण वाचकांना मोहवते. "पोगडालू" (बकुलमाला) हा त्यांचा कथा संग्रह ही त्यांनी तेलुगू वाचकांना दिलेली एक अपूर्व भेट आहे.

सुप्रसिद्ध लेखक श्री. आचंट जानकी राम यांच्या श्रीमती शारदा देवी. या पत्नी आहेत.

या संग्रहातील "मृगजळ" ही त्यांची कथा हिरव्यागार हिरवळीतून वाहणाऱ्या निर्झराच्या पाण्यासारखी निर्मळ आहे. या कथेतील शब्दांकित सौंदर्यापेक्षाही शब्दापलीकडे सौंदर्य विशेष उल्लेखनीय आहे.

21. काली पट्नम् रामा राव

श्री. रामाराव यांच्या कथांमध्ये कल्पनारम्यता कमी आणि वास्तव जीवनाचे चित्रण अधिक आढळते. तेलुगू मधील बरेच लेखक आरंभी बंगाली साहित्याने प्रभावित होऊन त्याच शैलीमध्ये लेखन करीत असत. त्या प्रभावातून मुक्त होऊन स्वच्छंद आणि स्वच्छ तेलुगू कथा लिहिणाऱ्यांमध्ये रामाराव अग्रगण्य आहेत. श्रीकाकुलमच्या आसपासच्या खालच्या जातीच्या लोकांच्या सामाजिक जीवनाचे, अचारविचारांचे, त्यांच्या समस्यांचे आणि त्या समस्यांच्या

मूलभूत कारणांचे लेखन हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या कथा बहुधा लघु कादंबरीच्या आकाराच्या असतात. "यज्ञ", "हिंसा", "नो रूम", "अभिशक्ती," "पेंपकपु समकारम्" (पालनपोषणाचा मोह), "अभिमानालू" "रागमयी", "सेनापती वीरन्ना", "अविद्या-अज्ञान" इत्यादी अनेक कथा त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या कथांमध्ये अत्यंत तपशीलवार वर्णन आढळतात. कथेतील पात्रांची; भाषा स्थानिक बोलीचा प्रभाव असलेली आणि सहज सुंदर व वक्रोक्तीपूर्ण असते.

या संग्रहातील "नो रूम" या कथेत लेखकाने, समाजात काही लोकांची वासना अतृप्त ठेवणारी सामाजिक व्यवस्था काही लोकांना मानसिक दास्य पत्करण्यास विवश करून त्यांच्यात झगडा निर्माण करते, हे अत्यंत मार्मिकपणे दाखवले आहे. श्री. रामाराव विशाखापट्टणम् येथे राहातात आणि अध्यापन हा त्यांचा व्यवसाय आहे.

22. श्रीपति

एखादे ध्येय अथवा दृष्टिकोन समोर ठवून कथा लिहिणारे लोक फार थोडे असतात. आजच्या तरूण पिढीतील ध्येयनिष्ठ कथालेखकांपैकी श्रीपति हे एक आहेत. त्यांच्या कथांचे विषय बहुधा कणव आणि करुणा निर्माण करणारे असतात. या संग्रहातील त्यांची "हातांची खुर्ची" ही कथा आजच्या ग्रामीण शासनव्यवस्थेचे आणि अधिकाऱ्यांच्या धुंदीचे चांगले व्यंग्य चित्रण करते. या खुर्चीबरोबर वाचक सगळ्या गावात फिरतो आणि अनेक सत्यांचा त्याला शोध लागतो. 'मंचू पल्लकी . . . मरि तोम्मिदि' (तुषारची पालखी आणि नऊ कथा)' हा त्यांचा प्रसिद्ध कथा संग्रह आहे. या संग्रहाने त्यांना मोठे यश मिळवून दिले. त्यांचा व्यवसाय अध्यापनाचा असून ते हैद्राबाद येथे राहातात.

23. आदिविष्णु

अल्पावधीत अधिक यशस्वी बनलेले कथाकार असे श्री. आदिविष्णु यांच्या-बद्दल म्हणता येईल. स्नेह हा त्यांच्या कथांचा विषय आहे. तेलुगू विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या कथा अधिक वाचल्या जातात. आदिविष्णु यांची लेखनशैली अतिशय सुखद, प्रसन्न आणि आकर्षक आहे. या कथांमध्ये मध्यम वर्गीय कुटुंबातील

स्त्री-पुरुषांची दुःखे, आशा-निराशा, ममता, मोह आदींचे चित्रण आढळते. उपरोध, निरोध, भावुकता आणि गौरवपूर्ण शैलीने लिहिण्यात ते कुशल आहेत. संवाद पद्धतीने कथा लिहिणे हे त्यांचे वैशिष्ट्य. तेलुगूतील एका प्रमुख साप्ताहिकाने आयोजित केलेल्या कथा स्पर्धेत त्यांना पारितोषिक मिळाले आहे."

ते चांगले नाटककारही आहेत. "अतिथी", "इदि आत्महत्या (ही आत्महत्या आहे) "मंचु तेरे" (धुक्याचा पडदा) ही त्यांची प्रसिद्ध नाटके आहेत. "अरकुलाभि" "बुड्डुबुड्डु वीडल्लु" "बलिके पाऱ्ही" "मनिषी पुरुष ?" "रोम्माचेल्लु" इत्यादी त्यांची छोटी नाटकेही खूप लोकप्रिय झाली आहेत. या संग्रहातील "कावळ्याचा थोरला" ही कथा तेलुगूमधील एका प्रमुख साप्ताहिकाने घेतलेल्या कथा स्पर्धेत पारितोषिक मिळालेली कथा आहे. या कथेतील करुण रस आणि वास्तवता अतिशय वाचण्या सारखी आहे.

24. श्रीमती मालती चंदूर

मध्यम वर्गीय कुटुंबातील थोडे फार शिकलेल्या प्रत्येक गृहिणीस श्रीमती मालती चंदूर यांचे नाव सुपरिचित आहे. तेलुगू पत्रव्यवसायात प्रसिद्धी मिळविलेल्या हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या महिलांमध्ये श्रीमती मालती चंदूर यांच्या-इतके यश दुसऱ्या कुणालाही मिळालेले नाही. एका प्रमुख तेलुगू साप्ताहिकात त्या महिलांसाठी एक खास सदर नियमाने लिहित असतात. या सदरातील त्यांच्या लेखनाने त्या साप्ताहिकाच्या वाचकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून त्या साप्ताहिकाच्या प्रसारास हे लेखन सहाय्यभूत झाले आहे हे प्रत्येक तेलुगू वाचक जाणतो. खाद्य पदार्थांच्या रीती, शिवण, रंगकाम, इत्यादी स्त्रियोपयोगी अनेक गोष्टींशिवाय पुस्तक परिचय, प्रवास वर्णन इत्यादी अनेक विषयांवर सुगम, सुबोध आणि चित्ताकर्षक शैलीत सातत्याने लिहिणाऱ्या मालती चंदूर यांनी तेलुगूमध्ये चांगल्या कथाही लिहिल्या आहेत. "वंटलु . . . पिंडिवंटलु" "अल्लिकलु-कुट्लु" (विणकाम—शिवणकाम), "नवला परिचयालु" (कादंबरी परिचय) ही त्यांची काही पुस्तके प्रसिद्ध झाली असून त्यांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. मद्रास फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या त्या सदस्य आहेत.

या संग्रहातील त्यांची कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. असहाय होऊन बंगला विकून

टाकल्यानंतर देखील त्याच्यावरील प्रेम काढून घेऊ न शकणाऱ्या जँ यांचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण लेखिकेने या कथेत केले आहे. त्यांच्या चना कौशल्याचे ही कथा उत्कृष्ट उदाहरण आहे.

25. श्रीमती तुरगा जानकी राणी

चांगल्या कथा लिहिणाऱ्या काही थोड्या लेखिकांमध्ये श्रीमती ुरगा जानकी राणी प्रमुख आहेत. अनेक लेखिकांनी कथा लेखन न करताच सरळ कादंबऱ्या लिहून प्रसिद्धी मिळविली आहे, परंतु श्रीमती जानकी राणी यांनी फक्त कथाच लिहून नाव मिळविले आहे.

परंपरेपेक्षा वेगळ्या आणि सुशिक्षित आधुनिक महिलेच्या हृदयाचे स्पंदन त्यांच्या कथांमध्ये स्पष्ट ऐकू येते. "एर्र गुलाबीलु" (लाल गुलाब) हा त्यांच्या कथांचा सुंदर संग्रह आहे. संयम हे त्यांच्या कथांचे वैशिष्टये आहे. अनावश्यक भावनांचे अवडंबर त्या माजवीत नाहीत. निर्मळ शैलीमध्ये कथा सांगण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. त्यांची प्रत्येक कथा हृदयावर हलकासा आघात करते आणि मन आकर्षून घेते.

एकटेपण स्त्रियांना असह्य आणि दुःखदायक ठरते हे सत्य अतिशय नाजूक-पणे "लग्नाला जाते मी" या कथेत त्यांनी सांगितले आहे. श्रीमती जानकी राणी महिला कल्याण विभागात उच्चाधिकारी आहेत.

26. बोम्मिरेड्डी पल्लि सूर्याराव

व्यवसायाने पत्रकार असूनही आपल्या प्रतिमेच्या बळावर लेखक म्हणून प्रसिद्धी मिळविलेल्या व्यक्तींमध्ये सूर्याराव प्रमुख आहेत. न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यूनने आयोजित केलेल्या दुसऱ्या जागतिक कथास्पर्धेमध्ये त्यांच्या "दोंगलुन्नारू जाग्रत" (चोरांपासून सावध) या कथेस अखिल भारतीय पातळीवर पारितोषिक मिळाले. "कथावाहिनी", "सुवर्णरेखलू" (सुवर्णरेखा), हे त्यांचे प्रकाशित कथा संग्रह असून 'शुभलेख' (आमंत्रण) या नावाचे नाटकही प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या कथा आकाराने लहान आणि अस्सल तेलुगूपणाने नटल्या आहेत. त्यांच्या कथांचा शेवट वाचकांना चकित करतो.

27. चार्ल्स चिरंजीवी

श्री. चिरंजीवी यांची प्रतिभा बहुमुखी आहे. ते स्नेहशील आहेत. कवी, कथाकार, नाटककार, बालसाहित्यकार, प्रकाशक, पत्रकार, चित्रपट लेखक अशा बऱ्याच भूमिकात त्यांची प्रतिभा रमली आहे. ते कोणत्याही कॉलेजात गेले नाहीत. त्यांना इंग्रजी आजिबात येत नाही. सगळे लोक त्यांचे मित्र आहेत. चिरंजीवींचे लेखन वीसाहून अधिक संग्रहांच्या रूपाने प्रकाशित झाले आहे. या संग्रहातील "वडाची सावली आणि मोतियाचा वेल" ही कथा आपल्या देशातील धर्माधिकाऱ्यांची मनोवृत्ती स्पष्ट करणारी समर्थ कथा आहे. वडाच्या सावलीत मोतियाचा वेल कसा वाढेल ? वाढणार नाही, वाढणार नाही. ही कथा तेच सांगते.

Printed at Raj Bandhu Industrial Co., C-61 Mayapuri, New Delhi 110 064